# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**इतिहास विभाग**

**तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत**

**इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी**

**सादर केलेला शोध प्रबंध.**

# "मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास"

**(सन 1970 ते 2000)**


**♦ संशोधक ♦**

**श्री. दत्तात्रय पांडुरंग खराडे**

एम. ए., बी.एड., एम.फिल.

**♣ मार्गदर्शक ♣**

**प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे**

बाबासाहेब चितळे महाविद्यालय,

भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली.


**ऑगस्ट 2014**

# * प्रमाणपत्र *

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्विक सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी श्री. दत्तात्रय पांडुरंग खराडे यांनी ''मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास'' (सन 1970-2000) या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध निबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

स्थळ :- भिलवडी **मार्गदर्शक**

दिनांक :-

**प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे**

# * प्रतिज्ञापत्र *

मी श्री. दत्तात्रय पांडुरंग खराडे जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या ''मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास'' (सन 1970-2000) हा माझा स्वतःचा शोध प्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

स्थळ :- भिलवडी **संशोधक विद्यार्थी**

दिनांक :-

**श्री. दत्तात्रय पांडुरंग खराडे**

# * ऋणनिर्देश *

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच. डी.) साठी मी निवडलेल्या प्रबंधाचा विषय 'मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास' हा असून यामध्ये मुसलमान समाजाला सनातनी विचारापासून बाजुला करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने जे योगदान दिले त्याचा अभ्यास केलेला आहे.

संशोधनाचे काम हे संशोधक स्वतः करत असला तरी संशोधन कार्य हे अनेक व्यक्तिच्या सामुदायिक प्रयत्नाचे फलित असते. त्यांचे विचार, कल्पना, अभिप्राय, मार्गदर्शन इत्यादीचा संशोधकास प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या उपयोग होत असतो त्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रस्तुत संशोधकास प्रेरणा दिली, मोलाचे सहकार्य केले, आवश्यक माहिती, छायाचित्रे जमा करण्यास मदत केली त्यांचे ऋण व्यक्त करणे प्रस्तुत संशोधक आपले कर्तव्य समजतो.

प्रस्तुत संशोधकाने या संशोधन विषयाचा अभ्यास डॉ. दीपक देशपांडे, प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय भिलवडी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. या प्रबंधाच्या लिखाणासाठी त्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच अत्यंत आपुलकीने, निरपेक्षवृत्तीने आणि परखडपणे मार्गदर्शन केले. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्यामुळेच मी आपला प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यामुळे प्रस्तुत संशोधक प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे यांच्या ऋणातच राहणे पसंत करतो.

संशोधनाच्या नेहमीच पाठीशी असणारे व प्रेरणा देणारे भिलवडी शिक्षण संस्था भिलवडीचे अध्यक्ष प्रसिध्द उद्योगपती मा. नानासाहेब चितळे, उपाध्यक्ष शिवराम (बापू) यादव, सर्व संचालक, सचिव संजय कुलकर्णी (सर) यांनी पीएच. डी. करण्यास परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

संशोधन कार्य पूर्ण करत असताना मला सतत प्रेरणा व मार्गदर्शन देणारे माझे मित्र, डॉ. विजय गाडे, बाबासाहेब चितळे महाविद्यालय भिलवडी यांचा मी सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई, कार्याध्यक्ष, हुसेन जमादार, सचिव शमशुद्दीन तांबोळी, तसेच आय. एन. बेग, रशीद शेख, प्रा. जमीर शेख, प्रा. सायरा मुलाणी, प्रा. बेनझीर तांबोळी, अर्जुमन रफिक तांबोळी, तमन्ना शेख इनामदार, प्रा. अझरूद्दीन पटेल, दिलावर शेख यांनी मला लिखित माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून दिली व वेळोवेळी मदत केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत  संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी मला माझ्या या संशोधनाच्या काळात ज्या अनेक व्यक्तींनी मदत झाली त्यामध्ये इतिहास संशोधक डॉ. राजा दीक्षित, डॉ. श्रध्दा कुंभोजकर, डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. सी. जी. पाटील या सर्वांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. प्रा. विकास खराडे (ग्रंथपाल) बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी श्री. शरद जोशी (ग्रंथपाल) सेकंडरी स्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, भिलवडी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय पुणे, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, सांगली नगर वाचनालय सांगली, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ग्रंथालय श्रीमंत बाबासाहेब ज्युबिली लायब्ररी मिरज, वि. स. खांडेकर वाचनालय सांगली, मिरज विद्यार्थी संघ ग्रंथ संग्रहालय मिरज, मराठी विश्वकोश ग्रंथालय वाई, टिळक ग्रंथसंग्रहालय वाई यांनी मला लिखित माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून दिली व वेळोवेळी मदत केली. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणाहून दुर्मीळ कागदपत्रे व पुस्तके उपलब्ध झाली या बद्दल मी उपरोक्त सर्व संस्था आणि व्यक्ती यांचा आभारी आहे.

संशोधन कार्य पूर्ण करत असताना माझी आई श्रीमती योगावती खराडे, पत्नी सौ. कांचन, कन्या स्नेहल व सायली व स्नेही श्री. शंकरराव गायकवाड यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या प्रबंधातील मुद्रित शोधन डॉ. विजय गाडे यांनी करून आपला बहुमोल वेळ दिला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. या शोधप्रबंधाचे टायपिंग अचुक व सुबक करून त्यास असे मोहक रूप देऊन या शोध प्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल मी श्री. रविंद्र कुंभार यांचे आभार मानतो.

ठिकाण : भिलवडी **श्री. दत्तात्रय पांडुरंग खराडे**

दिनांक : **संशोधक**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमाणपत्र | | | I |
| 2 | प्रतिज्ञापत्र | | | II |
| 3 | ऋणनिर्देश | | | III |
| 4 | **प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधन आराखडा** | | | 01 |
| | 1.1 | विषयाची निवड | | 02 |
| | 1.2 | मुस्लिम सत्यशोधक चळवळी संदर्भातील संशोधन साहित्याचे परिशीलन | | 04 |
| | | 1.2.1 | पटेल रजिया | 04 |
| | | 1.2.2 | काझी एन. एस. | 05 |
| | | 1.2.3 | आंबाडे किसन मारूती | 05 |
| | | 1.2.4 | मोकाटे नाथा हरिभाऊ | 06 |
| | | 1.2.5 | युसुफ हुसेन महंमद | 07 |
| | | 1.2.6 | रहिम घोमेशी | 07 |
| | | 1.2.7 | अमीन सय्यद अहंमद | 08 |
| | | 1.2.8 | मोरे शेषराव | 08 |
| | | 1.2.9 | पगडी सेतुमाधवराव | 09 |
| | | 1.2.10 | फैजी असफ ए. ए. | 10 |
| | | 1.2.11 | बेन्नुर फक्रुद्दिन | 10 |
| | | 1.2.12 | वकील अलीम | 11 |
| | | 1.2.13 | मौदुदी आबुल आला | 11 |
| | | 1.2.14 | इंजिनिअर असगर अली | 12 |
| | | 1.2.15 | कुरूंदकर नरहर | 12 |
| | | 1.2.16 | दलवाई हमीद | 13 |
| | | 1.2.17 | तांबोळी शमशुद्दिन | 13 |
| | | 1.2.18 | दलवाई मेहरून्निसा | 14 |
| | | 1.2.19 | सय्यदभाई | 14 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 1.3 | प्रबंधाची संक्षिप्त रूपरेषा | | | 14 |
| | 1.4 | विषयाची स्थलकाल मर्यादा | | | 14 |
| | 1.5 | संशोधनाची उद्दिष्ट्ये | | | 18 |
| | 1.6 | गृहितके | | | 18 |
| | 1.7 | संशोधन पध्दती | | | 20 |
| | | 1.7.1 | सर्वेक्षण पध्दती | | 20 |
| | | 1.7.2 | नमुना निवड | | 22 |
| | | 1.7.3 | प्रश्नावली पध्दत | | 23 |
| | | | 1.7.3.1 | प्रश्नावली गुण | 24 |
| | | 1.7.4 | मुलाखत पध्दती | | 25 |
| | | | 1.7.4.1 | मुलाखतीची उद्दिष्ट्ये | 26 |
| | | | 1.7.4.2 | मुलाखतीचे प्रकार | 27 |
| | | | 1.7.4.3 | मुलाखत तंत्राच्या मर्यादा | 28 |
| | | | 1.7.4.4 | मुलाखतीचे अनुभव व आलेल्या अडचणी | 29 |
| | 1.8 | संदर्भ पध्दती | | | 30 |
| 5 | **प्रकरण दुसरे - इस्लामचा इतिहास** | | | | 33 |
| | 2.1 | प्रस्ताविक | | | 33 |
| | 2.2 | इस्लामपूर्व परिस्थिती | | | 34 |
| | | 2.2.1 | सामाजिक परिस्थिती | | 34 |
| | | 2.2.2 | राजकीय परिस्थिती | | 37 |
| | | 2.2.3 | आर्थिक परिस्थिती | | 40 |
| | | 2.2.4 | धार्मिक परिस्थिती | | 42 |
| | 2.3 | इस्लाम म्हणजे काय ? | | | 47 |
| | | 2.3.1 | इस्लाम शब्दाचा अर्थ | | 47 |
| | | 2.3.2 | इस्लामची तत्वे | | 49 |
| | | 2.3.3 | इस्लामची प्रमुख तत्वे | | 51 |
| | | | 2.3.3.1 | तौहीद (एकेश्वरवाद) | 51 |
| | | | 2.3.3.2 | नमाज | 52 |
| | | | 2.3.3.3 | जकात | 53 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 2.3.3.4 | हज | 54 |
| | | | 2.3.3.5 | शरियत | 54 |
| | | | 2.3.3.6 | शरियतचे उगमस्थान | 56 |
| | | | 2.3.3.7 | कुराण | 56 |
| | | | 2.3.3.8 | सुन्ना (हादीस) | 57 |
| | | | 2.3.3.9 | इज्मा (सर्वांचे एकमत) | 58 |
| | | | 2.3.3.10 | कियास (अनुमान) | 60 |
| | | | 2.3.3.11 | फतवा (हुकुम) | 61 |
| | 2.4 | इस्लामी शरियतचे स्वरूप | | | 62 |
| | | 2.4.1 | विवाह विषयक कायदे | | 62 |
| | | 2.4.2 | मेहेर विषयक कायदे | | 63 |
| | | 2.4.3 | तलाक विषयक कायदे | | 63 |
| | 2.5 | इस्लामी संस्कृती | | | 64 |
| | | 2.5.1 | इस्लामी संस्कृतीची मूलतत्वे | | 65 |
| | 2.6 | महंमद (मोहम्मद) पैगंबर | | | 67 |
| | | 2.6.1 | धर्मसाक्षात्कार | | 69 |
| | | 2.6.2 | प्रेषिताचे कार्य | | 70 |
| | | 2.6.3 | प्रेषिताचा मृत्यु | | 75 |
| | | 2.6.4 | प्रेषिताचा प्रभाव | | 76 |
| | 2.7 | इस्लामचा प्रसार व प्रसार | | | 76 |
| | | 2.7.1 | मध्यपूर्व आशियातील प्रसार | | 77 |
| | 2.8 | इस्लामचे भारतातील आगमन | | | 79 |
| | | 2.8.1 | राजकीय परिस्थिती | | 79 |
| | | 2.8.2 | सामाजिक परिस्थिती | | 81 |
| | 2.9 | आजची इस्लामची व्याप्ती | | | 83 |
| | | निष्कर्ष | | | 87 |
| 6 | **प्रकरण तिसरे - इस्लाममधील सुधारणावादी प्रवाह** | | | | 100 |
| | 3.1 | धर्मनिरपेक्षता | | | 100 |
| | | 3.1.1 | धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जोपासना | | 102 |
| | | 3.1.2 | राष्ट्रवाद व्याख्या | | 102 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 3.1.3 | धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? | 103 |
| | | 3.1.4 | धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप | 107 |
| | | 3.1.5 | धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता | 110 |
| | 3.2 | आधुनिक विज्ञानवादी दृष्टीकोन | | 113 |
| | | 3.2.1 | वैज्ञानिक दृष्टीकोन | 115 |
| | | 3.2.2 | वैज्ञानिक दृष्टीकोनाचे स्वरूप | 118 |
| | | 3.2.3 | विज्ञानवादाची आवश्यकता | 125 |
| | 3.3 | इहवाद | | 126 |
| | | 3.3.1 | इहवादाचे स्वरूप | 128 |
| | | 3.3.2 | इहवादी परंपरा | 133 |
| | 3.4 | सूफीझम | | 135 |
| | | 3.4.1 | प्रस्तावना | 135 |
| | | 3.4.2 | सूफीझम विचारधारेचा उगम | 139 |
| | | 3.4.3 | सूफीझमची तत्वे | 141 |
| | | 3.4.4 | सूफी संत | 143 |
| | 3.5 | कमाल पाशा | | 146 |
| | | 3.5.1 | कमाल पाशाचे योगदान | 147 |
| | | 3.5.2 | राजकीय सुधारणा | 148 |
| | | 3.5.3 | शैक्षणिक सुधारणा | 149 |
| | | 3.5.4 | सामाजिक सुधारणा | 149 |
| | | 3.5.5 | कमाल पाशाचा सुधारणावादी दृष्टीकोन | 150 |
| | 3.6 | भारतीय मुसलमानांतील विचारप्रवाह | | 153 |
| | | 3.6.1 | मुसलमानांमधील परंपरागत विचार प्रवाह | 153 |
| | | 3.6.2 | मुसलमानांमधील उदारमतवादी विचारप्रवाह | 156 |
| | | 3.6.3 | मुसलमानांमधील आधुनिक विचारप्रवाह | 161 |
| | | निष्कर्ष | | 168 |
| 7 | **प्रकरण चौथे - मुस्लिम सत्यशोधक चळवळ आणि हमीद दलवाई** | | | 182 |
| | 4.1 | जीवन वृत्तांत | | 182 |
| | 4.2 | हमीद दलवाईचा इहवादी दृष्टीकोन | | 192 |
| | 4.3 | महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळींची परंपरा | | 196 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 4.3.1 | ब्राह्मोसमाज | 197 |
| | | 4.3.2 | मानवधर्म सभा | 200 |
| | | 4.3.3 | परमहंस सभा | 201 |
| | | 4.3.4 | प्रार्थना समाज | 202 |
| | | 4.3.5 | आर्य समाज | 204 |
| | 4.4 | मुसलमानांमधील सुधारणावादी चळवळी | | 207 |
| | | 4.4.1 | वहाबी चळवळ | 208 |
| | | 4.4.2 | अहल-ई-हादीथ | 209 |
| | | 4.4.3 | टिटू मिर ची चळवळ | 210 |
| | | 4.4.4 | अलिगढ चळवळ | 210 |
| | | 4.4.5 | देवबंद चळवळ | 212 |
| | 4.5 | महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव | | 213 |
| | 4.6 | मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय | | 220 |
| | 4.7 | मुस्लिम सत्यशोधक चळवळीची उद्दिष्ट्ये | | 231 |
| | 4.8 | मुस्लिम सत्यशोधक चळवळीची भूमिका | | 236 |
| | 4.9 | मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना | | 240 |
| | 4.10 | तत्कालीन महाराष्ट्रातील परिस्थिती | | 246 |
| | | 4.10.1 | राजकीय परिस्थिती | 246 |
| | | 4.10.2 | सामाजिक परिस्थिती | 252 |
| | | 4.10.3 | धार्मिक परिस्थिती | 261 |
| | | 4.10.4 | आर्थिक परिस्थिती | 267 |
| | | निष्कर्ष | | 272 |
| 8 | **प्रकरण पाचवे - मुस्लिम सत्यशोधक समाजाचे योगदान** | | | 294 |
| | 5.1 | प्रस्तावना | | 294 |
| | 5.2 | मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य | | 295 |
| | | 5.2.1 | मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे आयोजित पुरोगामी परिषदा | 299 |
| | | 5.2.2 | सामुदायिक नेतृत्वास सुरूवात | 306 |
| | | 5.2.3 | शहाबानो प्रकरण | 308 |
| | | 5.2.4 | शरीफा मुल्ला प्रकरण | 311 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 5.2.5 | तलाक मुक्ती मोर्चा | 312 |
| | | 5.2.6 | समान नागरी कायदा | 318 |
| | 5.3 | मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर | | 321 |
| | 5.4 | मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा परिवर्तनशील कार्याचा ठसा | | 324 |
| | 5.5 | मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील अध्वर्यूंचा परिचय | | 329 |
| | | 5.5.1 | अ. भि. शहा | 329 |
| | | 5.5.2 | नरहर कुरूंदकर | 332 |
| | | 5.5.3 | सय्यदभाई | 336 |
| | | 5.5.4 | मेहरून्निसा दलवाई | 340 |
| | | 5.5.5 | हुसेन जमादार | 345 |
| | | 5.5.6 | डॉ. बाबा आढाव | 351 |
| | | निष्कर्ष | | 355 |
| 9 | **प्रकरण सहावे - उपसंहार** | | | 365 |
| 10 | **संदर्भ ग्रंथ सूची** | | | |
| | 1) प्राथमिक संदर्भ साधने | | | 383 |
| | 2) दुय्यम संदर्भ साधने | | | 383 |
| | 3) अप्रकाशित संदर्भ साधने | | | 394 |
| 11 | **परिशिष्टे** | | | |
| | 1) फोटो | | | 396 |
| | 2) जाहीरनामा I | | | 408 |
| | 3) जाहीरनामा II | | | 410 |
| | 4) प्रश्नावली | | | 414 |

# प्रकरण 1

## प्रस्तावना व संशोधन आराखडा

'इतिहास' या विषयाला सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर गेल्या दोनशे वर्षांत 'इतिहास संशोधन' ही संकल्पना रूढ होत गेली. जगभरच्या निरनिराळ्या देशात गतकाळचे पुरावे शोधले गेले. उत्खनने झाली. कागदपत्रे धुंडाळली गेली. शिलालेख वाचले गेले. या सर्व साधनांचा अन्वयार्थ लावुन इतिहास संशोधन झाले. असाच प्रयत्न भारतातही झाला. असे असले तरी इतिहासातील वाटचालीचे सारेच धागेदोरे उलगडले गेले आहेत असे मात्र नाही. पुराव्यांचा शोध घेतला गेला असला तरी अजुनही हजारो पुरावे जगभर विखरून पडलेले आहेतच. त्याची नोंद घेतली गेलेली नाही. संपन्न ऐतिहासिक वारसा असलेल्या आपल्या भारतासारख्या देशात तरी पावलोपावली असे अवशेष अजुनही सापडतात. इतिहास उलगडण्याचे प्रयत्न गेल्या दोनशे वर्षात झालेले असले तरी अजुनही अनेक कालखंड अज्ञातच आहेत. अनेक बाबतीत मिळालेली माहिती परिपूर्ण नाही. त्यामुळे इतिहास संशोधन ही एक सतत चालु राहणारी प्रक्रिया ठरते. जोपर्यंत सर्व भुतकाळ स्पष्टपणे पुराव्याआधारे रेखाटता येणार नाही तो पर्यंत संशोधन ही प्रक्रिया आवश्यक राहणारच.

'इतिहास' या शब्दाची फोड इति + ह + आस म्हणजे असे-असे घडले. घडून गेलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावला की इतिहास आकाराला येतो.[1] इतिहासकार भूतकाळातील ठराविक घटना निवडुन त्या घटनांबद्दल स्वतःचे स्पष्टीकरण सादर करतो. आपण त्यास 'इतिहास' असे संबोधतो. इतिहास हा विविध विचार व मूल्यप्रणालींनी आकार घेतो. त्याचप्रमाणे विविध प्राथमिक व दुय्यम साधनांच्यामुळे इतिहास आकाराला येतो. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या मते 'विशिष्ट काल, स्थल व व्यक्तीचे आचरण या तीन घटकांचे एकत्रिकरण झाले की, प्रसंग निर्माण होतो. या प्रसंगाच्या माध्यमातून इतिहास निर्माण होतो.'[2]

इतिहासामध्ये नविन पुराव्यांची उपलब्धता आणि त्यातून मिळालेला आशय या दोन्ही घटकांमुळे सातत्याने इतिहासामध्ये बदल घडत राहतो. म्हणून इतिहासातील बदल हा प्रकृतीचा स्थायीभाव आहे. इतिहास हा एका अर्थाने सत्याचा शोध आहे. सत्य हे स्वतंत्र मूल्य आहे. सत्य हे मूल्य इतर कोणत्याही मूल्यापेक्षा कनिष्ठ किंवा दुय्यम दर्जाचे असू शकत नाही.[3]

इतिहास लेखक किंवा अभ्यासक हा आपल्या क्षमतेनुसार व आवश्यकतेनुसार इतिहास लेखनाची प्रादेशिक किंवा सांस्कृतिक मर्यादा निश्चित करतो. इतिहास लेखन ही दीर्घकाळ चालत आलेली व अखंडपणे चालू

राहणारी शोधयात्रा आहे. इतिहास लेखनात कोणाचाही व कोणताही शब्द अखेरचा नसतो. तसेच कोणतेही इतिहास लेखन परिपूर्ण नसते.

## 1.1 विषयाची निवड :-

समाजशास्त्रीय संशोधनात एक नित्य नवा दृष्टीकोन महत्वाचा असतो. कोणतीही सामाजिक समस्या अभ्यासताना तिच्या अनेकविध पैलुबाबत शास्त्रीय विवेचन करणे अगत्याचे असते. मुस्लिम सत्यशोधक चळवळ त्यास अपवाद नाही.

"विश्वास किंवा श्रध्दा, सामान्य व्यवहार ज्ञान यामुळे ज्ञानाच्या कक्षा रूंदावत नाहीत. त्यासाठी कोणत्याही घटनेची शास्त्रीय चिकित्सा करण्याची गरज असते. त्यामागे काही नियम असतात, सुसंगती असते."[4] मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे साद-पडसाद देखील महाराष्ट्रातील मुस्लिम समाजावर उमटले आहे.

सामाजिक संशोधनामध्ये एखाद्या विषयाचे आकलन करताना स्वीकार व नकार ही प्रक्रिया सतत घडत असते. हेरिंग म्हणतात, "विद्यमान ज्ञानसंग्रहात भर घालणे हे संशोधनाचे सर्वज्ञात कार्य आहे. पण मनातील साचेबंद ज्ञानाची जळमटे दूर करून गैरलागू सिध्दांत काढुन टाकणे हे ही संशोधनाचे तितकेच महत्वाचे कार्य आहे. संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्राच्या बाबतीत ती एक विसर्जन प्रक्रियादेखील आहे. आकलन हे केवळ ज्ञानात भर पडल्यानेच वाढते असे नाही तर प्रस्थापित गैर समजुतीचा व अंधविश्वासाचा त्याग केल्यानेही वाढते."[5] म्हणजेच अभ्यास विषयाबाबत माहितीचे संकलन करताना उपयोगी तथ्य संकलित करण्यावर भर द्यावा लागतो, व जी अयोग्य आहेत ती नाकारावी लागतात. या अभ्यासातही हाच दृष्टीकोन स्वीकारलेला आहे.

मुस्लिम सत्यशोधक चळवळी बाबत मुस्लिम समाजात भरपूर जिज्ञासा आहे. या विषयावर चर्चाही खूप झाली आहे. त्यामुळे या विषयाचे सकल अंगाने अध्ययन व विश्लेषण केले असता काही नवा प्रकाश पडू शकेल. यासाठी येथे विशेष भर देण्यात आला आहे.

माणुस हा सामाजिक शास्त्राचा केंद्रबिंदू असतो. मानवी जीवनात विविध सामाजिक संस्था कार्य करताना त्या समाज जीवनावर सतत प्रभाव टाकतात. या संस्थांमधील नाते उलगडण्याचे कामच येथे करावयाचे आहे. सामाजिक शास्त्रातील समस्या या परस्परांत गुंतलेल्या असतात. हा गुंता सोडवण्याचे कार्य प्रस्तुत संशोधनाव्दारे केले आहे. मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करताना आजवर उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे आकलन करून त्यात नव्याने भर टाकण्याचा हा प्रयत्न आहे. उपलब्ध तथ्ये आणि घटना यांचे विश्लेषण करून त्याआधारे

कार्यकारणभाव शोधणे व त्यातून नवी सूत्रे मांडणे हे संशोधनाचे प्रयोजन आहे. मुस्लिम समाजातील पारंपारिकता आणि त्यातील विविध पध्दती पाहता असा अभ्यास करणे अत्यंत जटिल आणि गुंतागुंतीचे आव्हान बनलेले असले तरी हे आव्हान संशोधकाने प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने स्वीकारले आहे.

पारंपारिक समाज जेव्हा यंत्रयुगात झपाट्याने बदलु लागतो तेव्हा अशा समाजाचे अंतर्मन व बहिर्मन यात होणारे बदल सूक्ष्मपणे अभ्यासणे येथे गरजेचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाबरोबरच या समाजाच्या सांस्कृतिक जाणीवाही बदलु लागतात. सनातनी व आधुनिक मूल्ये यांचा संघर्ष होऊ लागतो. व त्यातून अनेक प्रश्न उभे राहतात. मुस्लिम सत्यशोधक चळवळ हा सुध्दा असाच एक विषय आहे. या अभ्यासात इस्लामचे भारतात आगमन झाले तेव्हा पासून भारतात इस्लामी संस्कृती रूजली यांचे अध्ययन केले आहे. तसेच त्यांच्यात नवे-नवे विचारप्रवाह उदयास आले. या संदर्भात विश्लेषण केले आहे.

जॉर्ज होमन्सने म्हंटल्याप्रमाणे, ‘‘एकतर विषय संशोधनकर्त्यांच्या आवडीचा असतो किंवा त्या विषयाबाबत संशोधनकर्त्यास शास्त्रीय उत्सुकता असते. म्हणून एखादा विषय संशोधनकर्ता निवडतो. एखादी समस्या अनुत्तरित राहणे हेच बुध्दीला आव्हान असते व ते आव्हान स्वीकारल्यामुळे संशोधक एखादे संशोधन कार्य हाती घेतो.’’[6] पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक प्रबोधनपर चळवळी निर्माण झाल्या. त्यामध्ये आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधकसमाज अशा अनेक चळवळीचा समावेश आहे. त्यातीलच मुस्लिम सत्यशोधक समाज ही एक चळवळ आहे. हिंदू धर्माच्या तुलनेत इस्लाम एक संघटित व परंपरावादी धर्म मानला जातो. या समाजाच्या मागासलेपणाचे मुख्य कारण त्यांचे आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण आहे. या कारणानेच संशोधकासमोर अनेक प्रश्न उभे राहिले.

वुल्फ यांच्या मते, ‘‘घटनेचे सकृत दर्शनीचे स्वरूप, प्रचलित कल्पना व व्यक्तिगत इच्छा आदींनी प्रभावित न होता निश्चित व खरीखूरी वस्तुस्थिती स्वीकारण्याची वृत्ती हीच गाढ ज्ञानाची पहिली गरज आहे.’’[7] या संशोधनात या दृष्टीचा उपयोग केला आहे. संशोधकाने विषयाची निवड करण्यासाठी मार्गदर्शकाशी चर्चा केली. मार्गदर्शकांनी सुचविल्याप्रमाणे संशोधन विषयाची निश्चिती करण्यात आली. संशोधन विषयाची निश्चिती करण्यासाठी नियतकालिके, संदर्भ, ग्रंथ, आत्मचरित्र, स्मरणिका या सर्वातुन संशोधनाचा आढावा घेतला; आणि ‘मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास’ या विषयाची निश्चिती करण्यात आली.

### 1.2 मुस्लिम सत्यशोधक चळवळी संदर्भातील संशोधन साहित्यांचे परिशीलन :-

मुस्लिम सत्यशोधक समाजाचा इतिहास या विषयाची निवड केल्यानंतर इस्लामचा इतिहास, इस्लाममधील सुधारणावादी प्रवाह, महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळी, मुसलमानांमधील सुधारणा चळवळी, तसेच मुस्लिम सत्यशोधक चळवळ संदर्भात झालेला अभ्यास आणि संशोधनाचा गोषवारा देणे अधिक सुकर होईल म्हणुन तो देत आहे.

**1.2.1 पटेल रजिया -** 'भारतीय मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचे राजकारण आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास' अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे जानेवारी 2005, मार्गदर्शक डॉ. सुहास पळशीकर.

सदर संशोधनात संशोधिकेने भारतीय मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचे राजकारण व त्याला अनुसरून महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास केला आहे. या संशोधनात एकूण पाच प्रकरणे आहेत. यामध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या प्रश्नाचे स्वरूप आणि तत्कालीन स्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. मुस्लिम समाजाच्या शिक्षणाच्या राजकारणाचा ऐतिहासिक आढाव्याबरोबर महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व राजकीय स्थितीचे सर्वेक्षण करून त्याचे विश्लेषण केले आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाचे राजकारण, शिक्षण व रोजगार विषयक संधीचा ऊहापोह केलेला आहे. त्याप्रमाणे भारतीय मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचे राजकारण, अभ्यासातून निघालेले निष्कर्ष आणि उपाय यावरही विस्तृत चर्चा केली आहे. या संशोधनामध्ये प्रश्नावली, मुलाखत तंत्राचा वापर केला आहे. त्याचबरोबर जनगणना अहवालाचा आधार घेतला आहे. या प्रबंधाची निष्कर्ष मांडणी खालीलप्रमाणे करणेत आलेली आहे.

1. मुस्लिमांच्या शिक्षणाचे राजकारण, भाषिकवाद, राज्यसत्ता व उर्दू भाषेचा अतिरेकी आग्रह यामुळे मुस्लिमांचे प्रादेशिक भाषांकडे दुर्लक्ष होत आहे.
2. मुस्लिम समाज राजकारणामुळे मागासलेला आहे.
3. मुस्लिमांचे जीवनमान, राहणीमान मागासलेले आहे.
4. शैक्षणिक प्रणाली मध्ये बदल करणे गरजेचे आहे.
5. शिक्षणातून धर्मनिरपेक्षता जोपासणे गरजेचे आहे.
6. मुस्लिम समाजाव्दारे शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.
7. सकारात्मक राजकारणाची मुस्लिम समाजाच्या विकासासाठी गरज आहे.

थोडक्यात या विषयाला अनुसरून केलेले उपरोक्त संशोधन अभ्यासकांना अनेक प्रकारे उपयोगी होऊ शकेल.

**1.2.2 काझी एन. एस. -** 'मुस्लिम अल्पसंख्याकांची सामाजिक अभिवृत्ती' अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर 1986 मार्गदर्शक डॉ. माधव ज. कशाळीकर.

सदर संशोधनात संशोधकाने मुस्लिम अल्पसंख्याकाच्या सामाजिक अभिवृत्तीचा अभ्यास केला आहे. एकूण पाच प्रकरणात सदरचे संशोधन पूर्ण झाले आहे. संशोधकाने मुस्लिम अल्पसंख्याकांच्या सामाजिक, धार्मिक जीवनाचा आढावा घेतलेला दिसतो. या संशोधनात केस स्टडी या संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. या लघुशोध प्रबंधामध्ये पाच प्रकरणात खालील निष्कर्ष काढलेले दिसतात.

1. मुस्लिम अल्पसंख्य समुदाय हा एक प्रभावी अल्पसंख्य गट आहे.
2. मुस्लिम समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. मुलींच्या बाबतीत तर ते फारच कमी आहे.
3. कुटुंब नियोजनाची आवश्यकता तत्वतः मान्य झालेली दिसते तरी अद्याप इतर समाजाच्या बरोबरीने मुस्लिम समाज कुटुंब नियोजना बाबतीत फार सकारात्मक दिसत नाही.
4. विकासाच्या संधी मुस्लिम स्त्रियांना अद्याप मिळत नाहीत.
5. मुसलमान असल्यामुळे बेरोजगारीची समस्या आहे अशी समजुत या समाजात आढळते.
6. मुस्लिम समाज भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात जितका समरस होईल तितके हिंदू-मुस्लिम संघर्षाचे प्रसंग कमी होतील असे प्रस्तुत संशोधकास वाटते.

थोडक्यात या विषयाला अनुसरून केलेले संशोधन अभ्यासकांना उपयोगी होऊ शकेल.

**1.2.3 अंबाडे किसन मारूती -** "महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक अभ्यास", अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे डिसेंबर 1998 मार्गदर्शन डॉ. डी. एस. गायकवाड.

सदर संशोधनात संशोधकाने महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. एकूण सात प्रकरणांमध्ये हे संशोधन पूर्ण झाले आहे. महात्मा फुले आणि त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीचा तत्कालीन जनमानसावर जो परिणाम झाला त्याचा सकारात्मक ऊहापोह संशोधकाने केलेला दिसतो. या शोध प्रबंधामध्ये संशोधकाने निष्कर्ष मांडणी पुढीलप्रमाणे केलेली दिसते.

1. महात्मा जोतिबा फुले यांचे जीवन आणि कार्याचा संशोधकाने आढावा घेतला आहे.
2. महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन तत्कालीन परिस्थिती सत्यशोधक समाज स्थापनेसाठी कारणीभूत ठरली.
3. सत्यशोधक समाज स्थापनेच्या मागे जी तत्वे व नियम होते त्याचाही संशोधकाने आढावा घेतला आहे.
4. सत्यशोधक चळवळीचे आर्थिक व राजकीय कार्य सकारात्मक होते.

5. सत्यशोधक समाजाने जे सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले त्यातून बहुजन समाजाला एक नवी दिशा मिळाली.
6. महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा परिणाम महाराष्ट्रातील इतर अनेक चळवळीवर पडलेला दिसून येतो.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव मुस्लिम सुधारणावादी तरूणांवर पडल्यामुळे महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करणेत आली.

थोडक्यात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला अनुसरून केलेले संशोधन सामाजिक चळवळीच्या अभ्यासकांना अनेक प्रकारे उपयुक्त होऊ शकेल.

**1.2.4 मोकाटे नाथा रामभाऊ -** 'आधुनिक महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक नानासाहेब गोरे', अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, डिसेंबर 2008, मार्गदर्शक डॉ. जगताप धनसिंग बळवंत.

सदर संशोधनात संशोधकाने नानासाहेब गोरे यांच्या समाज सुधारणा विषयक कार्याचे मूल्यमापन केले आहे. एकूण सात प्रकरणात हे संशोधन विभाजित आहे. संशोधकाने आधुनिक महाराष्ट्रातील समाज सुधारणेची विचार प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारणा आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समाज सुधारणांचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने केस स्टडी पध्दतीचा उपयोग संशोधनासाठी केला आहे. या प्रबंधामध्ये संशोधकाने आपले निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडले आहेत.

1. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे, सर रामकृष्ण भांडारकर यांचा वारसा ना. ग. गोरे यांनी चालविला.
2. राजा राममोहन रॉय यांचा ब्राह्मोसमाज, न्यायमुर्ती रानडे, डॉ. भांडारकर यांचा प्रार्थना समाज, महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज यांचा महाराष्ट्रावर प्रभाव होता.
3. समाज सुधारणावादी पक्षाचे नेतृत्व; न्या. रानडे, नामदार गोखले, प्राचार्य आगरकर यांच्याकडे होते. तर राजकीय सुधारणावादी पक्षाचे नेतृत्व लोकमान्य टिळकांकडे होते.
4. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात समाज सुधारकांची पिढी निर्माण झाली.
5. ना. ग. गोरे यांच्यावर महात्मा जोतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव होता.

थोडक्यात या विषयाला अनुसरून केलेले संशोधन अभ्यासकांना उपयुक्त आहे.

**1.2.5 युसुफ हुसेन महंमद -** 'Religion & State of Iraq' अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध. राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, 1982, मार्गदर्शक डॉ. वि. म. बाचल.

सदर संशोधनात इराकी संशोधकाने इस्लाम धर्म आणि इराक मधील इस्लामची स्थिती यांच्या अनुषंगाने सात प्रकरणामध्ये संशोधन केलेले आहे. इराक मधील इस्लामची स्थिती त्याचबरोबर इराकमधील राजकीय परिस्थितीचा संशोधकाने ऐतिहासिक आढावा घेतलेला दिसून येतो. इराक मधील राजकीय संस्कृती तिचा ऐतिहासिक आढावा तसेच राजकीय प्रणाली याचबरोबर इराक मधील इस्लाम धर्माची ऐतिहासिक पार्श्वभूमी संशोधकाने विशद केली आहे. या शोधप्रबंधामध्ये संशोधकांने धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात खालील प्रमाणे निष्कर्ष मांडले आहेत.

1. इराकमध्ये धर्मसत्ता व राज्यसत्ता यामध्ये संघर्ष दिसून येत नाही.
2. इराकमधील मुस्लिम धर्म हा धर्मनिरपेक्षतेच्या मार्गात अडथळा बनुन राहात नाही.
3. इराकची राज्यघटना ही धर्मनिरपेक्षतेला प्रोत्साहन देते.
4. तत्कालीन इराकमध्ये धर्म हा वैयक्तिक जीवनाशी निगडीत असल्याचे दिसते.
5. इराकमध्ये धर्मनिरपेक्षतेला अनन्यसाधारण महत्व आहे.
6. वरील सर्व बाबींमुळे इराकचे सुधारणावादी स्वरूप प्रगट होते.

इराकमध्ये सुन्नी पंथीयांची संस्था लक्षणीय असूनही इराकी मुस्लिम धर्मनिरपेक्षतेला प्रोत्साहन देत असल्याचे दिसुन येते ही बाब आजच्या काळात ही तेवढेच लक्ष वेधुन घेते.

थोडक्यात या विषयाला अनुसरून केलेले संशोधन अभ्यासकांना अनेक प्रकारे उपयोगी होऊ शकेल.

**1.2.6 घोमेशी रहिम -** 'Civil Society in Iran, Developments problems & Future prospects with reference to Human rights.' अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रकाशन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, नोव्हेंबर 2008, मार्गदर्शक डॉ. के. आर. राव.

सदर संशोधनात इराणी संशोधकाने 1997 ते 2004 या कालखंडातील इराणमधील मानवी हक्काचा आढावा घेतला आहे. या शोध प्रबंधामध्ये बहुसंख्य शिया पंथीय इराणी समाजव्यवस्थेचा आढावा घेऊन संशोधकाने राजकीय, सामाजिक बाबींचा सहा प्रकरणामध्ये ऊहापोह केलेला दिसतो. प्रस्तुत संशोधनामध्ये इराणी समाजाची पार्श्वभूमी, इराणी राजकीय प्रणाली, इराणी राजकीय प्रणालीच्या वेगवेगळया बाजु, इराणमधील मानवी हक्काची स्थिती या सर्व बाबींची चर्चा केलेली दिसून येते.

या शोध प्रबंधामध्ये संशोधकाने जे निष्कर्ष काढले आहेत ते पुढीलप्रमाणे.

1. इराणमध्ये मानवी हक्कांना समाजामध्ये स्थान नाही.
2. मानवी हक्काचा म्हणावा तेवढा इराणमध्ये विकास झालेला नाही.
3. मानवी हक्क चळवळीमध्ये अनेक अडथळे दिसुन येतात त्यामुळे मानवी हक्कांच्या अंमलबजावणी मध्ये समस्या निर्माण झालेल्या दिसतात.
4. इराणमधील समाज मानवी हक्काबाबत फारसा जागृत दिसुन येत नाही.
5. भविष्यामध्ये इराणमधील मानवी हक्क चळवळीचा मार्ग खडतर आहे.
6. वरील सर्व निष्कर्षावरून इराणमध्ये मानवी हक्क चळवळीला भविष्यात फार मोठा संघर्ष करावा लागण्याची चिन्हे दिसून येत आहेत. मानवी हक्क चळवळीचा इराणमधील वर्तमानकाळ फारसा आशादायक नाही.

थोडक्यात या विषयाला अनुसरून केलेले संशोधन इस्लामच्या अभ्यासकांना वेगळी दिशा दाखविण्याचे कार्य करू शकेल.

**1.2.7 अमीन सय्यद अहंमद -** 'इस्लाम आणि संस्कृति' प्रकाशक अमीन सय्यद अहंमद सांगली, 17 मे 1950.

सदर ग्रंथात एकूण आठ प्रकरणांचा समावेश आहे. त्यामध्ये इस्लामपूर्व जग ते थेट इस्लामी संस्कृतीच्या विविध अंगाचा ऊहापोह केलेला दिसून येतो. इस्लामच्या जन्मापूर्वीची परिस्थिती त्यातून इस्लामचा उदय कसा झाला याबद्दल लेखकाने विवेचन केले आहे. धर्मशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि तत्वज्ञान या सामाजिक शास्त्रांच्या वेगवेगळ्या दृष्टीकोनामधून लेखकाने इस्लाम संबंधीचे त्याचे विवेचन थोडक्या शब्दामध्ये स्पष्ट केलेले आहे. इस्लामचे विविध पैलू त्यांनी स्पष्ट केलेले असून आपल्या विवेचनामध्ये लेखकाने मुस्लिम आणि मुस्लिमेत्तर विद्वानांचे भरपूर हवाले दिलेले आहेत. इस्लामसंबंधी असलेले समज आणि गैरसमज लेखकाने दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. धर्म, राजकारण, समाजकारण, तत्वज्ञान आणि विज्ञान या सर्व बाजुंचा समावेश या पुस्तकामध्ये झालेला आहे. इतकेच नव्हे तर प्रेषिताच्या मृत्यु नंतर इस्लाम जगभर कसा पसरला यांचेही विश्लेषण लेखकाने केले आहे. या पुस्तकामुळे लेखकाच्या मते सांस्कृतिक एकतेला बळ मिळेल. शेवटच्या प्रकरणात लेखकाने इस्लामी संस्कृतीच्या विविध पैलूंच्या माध्यमातुन ती संस्कृति कशी विश्वमान्य आहे यावर भर दिलेला आहे. लेखकाला आपल्या विषयाचे संपूर्ण ज्ञान असून त्याने तो विषय सुस्पष्ट शब्दात शब्दबध्द केला आहे.

संशोधकाच्या दृष्टीने सदरच्या पुस्तकातील इस्लाम विषयक माहिती त्याच्या संशोधनासाठी उपयुक्त आहे.

**1.2.8 मोरे शेषराव -** "मुस्लिम मनाचा शोध" राजहंस प्रकाशन, पुणे, एप्रिल 2003 ISBN No. 81-7434-253-2

सदर ग्रंथात एकूण दहा प्रकरणांचा समावेश आहे. हा ग्रंथ प्रेषित महंमद आणि कुराणाच्या शिकवणूकीच्या

विश्लेषणावर आधारित आहे. पहिल्या प्रकरणा मध्ये लेखकाने हा ग्रंथ लिहिण्या मागची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यानंतर लेखकाने प्रेषिताच्या जीवनाचे ईश्वरी साक्षात्काराचे विस्तृत विश्लेषण केलेले आहे. प्रेषिताला ईश्वरी साक्षात्कार झाला आणि कुराण धरतीवर अवतरले. त्यासंबंधी लेखकाने सखोल विवेचन केले आहे. कुराणाचे स्वरूप व त्याची मांडणी करताना लेखकाने अनेक इस्लामी तत्वज्ञांचा आधार घेतला आहे. महंमदाच्या पूर्वी जे प्रेषित होऊन गेले त्यावरही लेखकाने भर दिलेला आहे. अल्लाच्या कार्यासाठी इस्लामच्या अनुयायांना संघर्ष करावा लागला त्याचा आढावा या ग्रंथात आलेला आहे. थोडक्यामध्ये इस्लाम जसा आहे तसा वस्तुनिष्ठपणे मांडण्याचा एका हिंदूने सर्वप्रथम हा प्रयत्न केला आहे. कुराण, हादिस आणि प्रेषिताचे जीवनचरित्र या इस्लामच्या तिन्ही बाजुचा अभ्यासपूर्ण विस्तार या ग्रंथात दिसतो. इस्लामचे वस्तुनिष्ठ आकलन या ग्रंथाच्या माध्यमातून होते. आपल्या धर्माबरोबर दुसऱ्या धर्माचा ही अभ्यास करण्याचा लेखकाचा हा सफल प्रयत्न आहे. धर्मग्रंथातील आज्ञा भलेही त्याकाळात योग्य असतील परंतु त्या आजच्या काळात सर्व आज्ञा प्रासंगिकच असतील असे नाही हे लेखकाने दाखवून दिले आहे.

संशोधकाच्या दृष्टीने सदर ग्रंथातील इस्लामविषयक विवेचन त्याच्या संशोधनासाठी उपयुक्त आहे.

**1.2.9 पगडी सेतुमाधवराव -** "भारतीय मुसलमान शोध आणि बोध" परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, 31 मार्च 1986.

सदर पुस्तकात एकूण 36 प्रकरणे आहेत. ही सर्व प्रकरणे इतिहासाशी निगडीत असुन त्यामध्ये ज्याप्रमाणे मुस्लिम जातीयतेचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे उदारमतवादी मुस्लिमांचा परिचय या ग्रंथातुन होतो. भारतीय मुसलमान ही गुंतागुंतीची बाब आहे. आणि या बाबीतून नेमका बोध पगडी यांनी यशस्वी पणे घेतलेला आहे. इतिहासकाराच्या अधिकृत लेखनाच्या आधारे मुस्लिम समस्या व त्याच्याशी संबंधित व्यक्ति, घटना यावर प्रकाशझोत टाकला गेला आहे. याशिवाय मुस्लिम विद्वान आणि विदुषी यांची काही आत्मचरित्रांची लेखकाने समीक्षा केली आहे. मुस्लिमांची परिस्थिती, पाकिस्तान निर्मिती मागील कारणे, अलिगढ विद्यापीठाची स्थापना, अलिगढी चळवळीचा परिणाम, मुस्लिमांच्या इतिहास विषयक भ्रामक कल्पना, ऐतिहासिक मुस्लिम राजवटी, जगभर पसरलेला इस्लाम, मुस्लिम स्त्रियांची बंडखोरी याच बरोबर समान नागरी कायद्याची आवश्यकता या सर्व बाबी लेखकाने स्पष्ट केलेल्या आहेत.

संशोधकाच्या दृष्टीने सदर पुस्तकातील इस्लामविषयक माहिती इस्लामचे स्वरूप स्पष्ट करण्यास उपयुक्त आहे.

**1.2.10 फैजी असफ ए. ए. -** 'इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टीकोन', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, नोव्हेंबर 1991.

सदर पुस्तकात केवळ चार प्रकरणांचा समावेश आहे. हे पुस्तक वर्तमान स्वरूपातील इस्लामी मतप्रणालीचे स्वरूप स्पष्ट करतात. या पुस्तकामधील पहिल्या प्रकरणामध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांची इस्लामच्या संकल्पनेची रूपरेषा दिली आहे. सर्वच धर्म आणि त्यांचे आचार्य हे आदरणीय आहेत अशा पध्दतीने मौलाना आझाद यांनी इस्लामचा आधुनिक व उदारमतवादी अन्वयार्थ लावलेला आहे. धर्म आणि कायदा यांच्या व्याख्या देऊन इस्लामच्या चौकटीतच त्या कशा परस्परापासून भिन्न आहेत हे दाखविण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. इस्लामी विचारवंताचे, इस्लामी कायदा व ईश्वरशास्त्र या क्षेत्रात केलेल्या कार्याचे लेखकाने संक्षिप्त विवेचन केले आहे. तर पुस्तकाच्या अखेरच्या भागात लेखकाने साठोत्तरी इस्लामचे ऐतिहासिक, शास्त्रीय आणि तुलनात्मक तत्वावर आधारित इस्लाम वरील आपले विचार स्पष्ट केले आहेत. थोडक्यात या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने आधुनिक इस्लामची आधुनिक दृष्टीकोनातून चिकित्सा केली आहे. त्यासाठी लेखकाने ऐतिहासिक पध्दतीचा वापर करून आणि आधुनिक विज्ञानाची कास धरून भारतीय मुसलमानांच्या दृष्टीकोनातून इस्लामची समीक्षा केली आहे.

संशोधकाच्या दृष्टीने या पुस्तकातून इस्लामचा आधुनिक दृष्टीकोन स्पष्ट होतो जो त्याच्या संशोधनासाठी उपयुक्त आहे.

**1.2.11 बेन्नुर फक्रुद्दिन -** ''आधुनिक भारतातील मुस्लिम राजकीय विचारवंताचे राष्ट्र विषयक चर्चाविश्व'' पुणे विद्यापीठ प्रकाशन फेब्रुवारी 2013.

सदर पुस्तकात एकूण सात प्रकरणांमध्ये सहा मुस्लिम राजकीय विचारवंताच्या विचारांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. यातील पहिल्या प्रकरणात भारतीय मुस्लिम विचारवंत आणि त्यांचा राजकारणाकडे व समाजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन चित्रित केलेला दिसतो. सय्यद अहमद खान, महंमद इकबाल, बॅरिस्टर महंमद अली जिना, मौलाना महंमद अली आणि वहावी उलेमा अशा अनेक विचारवंताच्या विचारांची लेखकाने मांडणी केली आहे. पुढील प्रकरणामध्ये तुफेल अहमद मंगलोरी, हुसेन अहमद मदनी, हसरत मोहानी, एम. ए. अन्सारी, कुँवर महंमद अशरफ आणि रफीक झकेरिया यांच्या विचाराचा तसेच स्वातंत्र्य चळवळीतील त्याच्या योगदानाचा लेखकाने उल्लेख केलेला दिसतो. उपरोक्त बहुतांश मुस्लिम विचारवंताना विभक्तवादी म्हणूनच संबोधले जात आहे. परंतु फक्रुद्दिन बेन्नुर यांनी या विचारवंताच्या विचारांचे विश्लेषण करून हे सिध्द केले आहे की उपरोक्त विचारवंत धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे समर्थक होते. या सर्वांनी देशाच्या प्रगतीसाठी आपला हातभार लावलेला

आहे. हे सर्व मुस्लिम विचारवंत मातृभूमी आणि धर्म याविषयी शेवट पर्यंत एकनिष्ठ राहिले हा महत्वपूर्ण निष्कर्ष यातून दिसतो.

संशोधकाच्या दृष्टीने सदर पुस्तकातील राष्ट्रवादी विचारांचा प्रवाह देश स्वातंत्र्यासाठी कसा महत्वपूर्ण होता हे लेखकाने म्हंटले आहे.

**1.2.12 वकील अलीम -** ''सूफी संप्रदायाचे अंतरंग'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, मार्च 2000,

ISBN NO. 81-86180-990.

सदरील पुस्तकात एकूण पाच प्रकरणांचा समावेश लेखकाने केलेला आहे. इस्लाममधील एक उदारमतवादी प्रवाह म्हणून सूफी संप्रदायाची ख्याती आहे. या पुस्तकामध्ये लेखकाने सूफींच्या इतिहासाचा मागोवा घेतला आहे. त्याचबरोबर सूफीझम मधील विविध संप्रदाय आणि त्याचे तत्वज्ञान या गोष्टीचा मागोवा घेऊन लेखन केले आहे. सूफी संप्रदाय मध्यपूर्वेतून निघाला आणि आशियाबरोबर भारतीय भूभागावर त्यांनी जे कार्य केले हे लेखकाने मांडले आहे. सूफी संप्रदाय हा कवितेमधून अधिक सुलभ रितीने स्पष्ट होतो म्हणून लेखकाने अनेक सुंदर काव्य ओळी या पुस्तकात दिलेल्या आहेत. इस्लामी चौकटीमध्ये सूफी विचारधारा बसत नाही. बऱ्याचदा इस्लामची पोलादी चौकट ओलांडून सूफीधारा बाहेर पडते हे लेखकाने मूल्यमापन केलेले आहे. सूफीचे तत्वज्ञान लेखकाने विस्तृत स्वरूपात मांडलेले दिसून येते. पुस्तकाच्या शेवटी लेखकाने निष्कर्ष दिलेले आहेत. धर्म आणि मत प्रचारासाठी सूफींनी भारतीय तत्वज्ञानाचा आधार घेतला व त्यामुळेच ते आपल्या विचारांचा प्रसार सहजपणे करू शकले हा लेखकाचा अभिप्राय आहे.

संशोधकाच्या दृष्टीने सदरील पुस्तकातील सुफीझमबद्दलची माहिती अतिशय उपयुक्त आहे.

**1.2.13 मौदुदी अबुल आला -** 'ईस्लाम प्रबोध', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई, जुलै 2007

ISBN-81-87634-04.

सदरील पुस्तकात एकूण सात प्रकरणांचा समावेश आहे. या सातही प्रकरणातून इस्लाम आणि त्याच्याशी संबंधित संकल्पनांवर लेखकाने आपले विचार मांडले आहेत. इस्लाम शब्दाच्या नामकरणा पासून याची सुरूवात केली आहे. इमान आणि आज्ञापालन यांचा इस्लाममध्ये जो प्रभाव आहे याची लेखकाने मांडणी केलेली दिसते. प्रेषितत्व म्हणजे काय ते सांगून लेखकाने प्रेषिताच्या संपूर्ण चरित्राचा धावता आढावा घेतलेला आहे. पुढे लेखकाने इमाँ (श्रध्दा) या विषयावर आपले विचार स्पष्ट केलेले आहेत. इबादत (उपासना) चा अर्थ सांगून नमाज, रोजा, जकात आणि हज यांचे संक्षिप्त विवेचन केलेले आहे. दीन (मजहब) आणि शरिया (इस्लामी कायदा) यामधील फरक स्पष्ट करून लेखकाने शरियतच्या आज्ञासंबंधी आपले विचार मांडले आहेत. शरियतचे आदेश, शरियतची

तत्वे, मुस्लिमांचे ईश्वर विषयक कर्तव्य, स्वतःचा देह आणि आत्म्याचे हक्क, मानवजात प्राणीमात्र आणि वस्तुमात्राचे हक्क या बाबीवर लेखकाने विवेचन केलेले दिसते. तसेच शरियत कशी संपूर्ण जगभर पसरलेली आहे यावर लेखकाने प्रकाश टाकलेला आहे.

संशोधकाच्या दृष्टीने सदर पुस्तकातील इस्लामी संकल्पनांविषयीची माहिती अत्यंत उपयुक्त आहे.

**1.2.14 डॉ. इंजिनियर असगरअली -** "आधुनिक जगाचा इस्लाम" अक्षर प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी 2012.

सदरील पुस्तकात एकूण 14 प्रकरणांचा समावेश आहे. हे पुस्तक देखील इस्लामची सांगोपांग चर्चा करते. या पुस्तकामधून कुराणाचा स्त्री विषयक दृष्टीकोन मांडलेला आहे. लेखकाने इस्लामच्या मूळ स्त्रोताकडे जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. इस्लामचे सर्वच अभ्यासक 'इज्जतेहाद' संकल्पना मान्य करतात. वेळोवेळी निर्माण होणाऱ्या नवनवीन समस्यांची बौध्दीक आणि आध्यात्मीक अंगाने मांडणी करणे म्हणजे इज्जतेहाद होय. मागील शतकापासून मुस्लिम समाजापुढे अनेक नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रश्नाची उकल लेखकाने कुराणाच्या साहाय्याने केलेली आहे. इस्लाम, मुस्लिम समाज, कुराणाची दृष्टी यावर इंजिनियर यांनी परखड भाष्य केले आहे. इस्लामची आध्यात्मीक उंची आणि मुस्लिमांचे आचरण यातील तफावत लेखकाने स्पष्ट केली आहे. इस्लामने मानवी समाजाला दिलेले नैतिक अधिष्ठान, मध्ययुगीन कालखंडात इस्लामला प्राप्त झालेले विकृत स्वरूप आणि आधुनिक काळात कुराणाची नितांत आवश्यकता या दृष्टीने मुस्लिमांनी केलेले प्रयास या सर्व गोष्टीची या पुस्तकामध्ये विस्तृत चर्चा लेखकाने केलेली आहे.

संशोधकाच्या दृष्टीने इस्लाम आणि कुराण याविषयीची माहिती उपयुक्त आहे.

**1.2.15 कुरूंदकर नरहर -** 'शिवरात्र'**,** साधना प्रकाशन पुणे, 14 नोव्हेंबर 1970.

सदर पुस्तकात एकूण 10 प्रकरणांचा समावेश असून जवळपास सर्वच प्रकरणांमध्ये कुरूंदकरांचा इहवाद विषयक दृष्टीकोन प्रकट होतो. राष्ट्रनिष्ठ लोकशाही समाजवाद आणि निर्भेळ इहलोकवादी भूमिका घेऊन कुरूंदकरांनी मुस्लिम समाजाचे भवितव्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. खान अब्दुल गफारखान, मौलाना आझाद, इस्लामिक राज्य, कुराणाचे विश्लेषण, बनातवाला आणि मुस्लिमांचे भविष्य या विविध प्रकरणांमधुन कुरूंदकरांनी त्यांची मुस्लिम जातीयवाद आणि इहलोकवाद यावर आपले विचार मांडले आहेत. कुरूंदकरांच्या मते मुस्लिम समाज मनाचे आधुनिकीकरण किती प्रमाणात पचवतो यावर या देशात मुस्लिम समाजाचे भवितव्य तर अवलंबून आहेच पण भारतीय लोकशाहीचे ही भवितव्य अवलंबून आहे. कुराणाची समीक्षा करताना कुरूंदकरांनी

असे म्हंटले आहे की कुराण फक्त मार्गदर्शन करते, सुन्नतच्या अति आग्रहातून इस्लाममधील समानता व समाजवाद गमविण्याचा धोका आहे. एकुणच हे पुस्तक मुस्लिम जातीयवादाची कठोर तर्कशुध्द चिकित्सा करते.

संशोधकाच्या दृष्टीने या पुस्तकातील इहवाद व इस्लामिक राज्य संकल्पनेची माहिती उपयुक्त आहे.

**1.2.16 दलवाई हमीद -** 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', सुगावा प्रकाशन, पुणे, 15 ऑगस्ट 2012, ISBN No. 978-938166-55-1.

सदरील पुस्तकात एकूण आठ प्रकरणे आहेत. पुस्तकाच्या शीर्षकावरूनच हे स्पष्ट होते की या पुस्तकात हमीद दलवाईंनी राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात भारतीय मुसलमानांचे कर्तव्य स्पष्ट केले आहे. भारतीय इस्लाम, मुसलमानाच्या धार्मिक चळवळी, पाकिस्तानची चळवळ, भारत पाक संबंध, पाकिस्तानची उद्दिष्टे, भारतीय मुसलमान आणि हिंदुत्ववाद या विषयावर दलवाईंनी आपली मांडणी केलेली आहे. भारतामध्ये इस्लामचे आगमन कसे झाले तेथपासून भारताच्या फाळणीपर्यंतच्या ऐतिहासिक घटनाक्रमाचा दलवाईंनी तेथे धावता आढावा घेतलेला आहे. त्यांच्या मते हिंदुत्ववाद हा मुस्लिम जातीयवादाची केवळ प्रतिक्रिया आहे. त्यामुळे या देशाला खऱ्या अर्थाने इस्लामी जातीयवादाचा धोका आहे. फाळणी नंतर येथुन जे मुसलमान पाकिस्तानात गेले त्याचे भविष्य सुरक्षित नाही असेही त्यांना वाटते.

संशोधकाच्या दृष्टीने सदर पुस्तकातील लेखनामुळे मुस्लिम समाजात प्रबोधन व्हावे हा भाग उपयुक्त आहे.

**1.2.17 तांबोळी शमशुद्दिन -** 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 27 एप्रिल 2009 ISBN-978-81-8483-143-6.

या पुस्तकात एकूण तीन विभागामध्ये 23 लेख आहेत. हमीद दलवाई, हमीद दलवाईंची विचार मीमांसा आणि हमीद दलवाई यांचे निवडक लेख हे तीन भाग या पुस्तकात आहेत. पहिल्या भागामध्ये हमीद दलवाई यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्रातील अनेक विचारवंतानी आपली मते मांडली आहेत तर दुसऱ्या भागामध्ये हमीद दलवाईंच्या विचारांची समीक्षा अनेक विचारवंतानी केलेली आहे. या पुस्तकाचा तिसऱ्या भागात हमीद दलवाई यांनी लिहिलेले काही लेख समाविष्ट आहेत. या तिन्ही भागातून समीक्षकाचे सखोल मत प्रदर्शन दिसुन येते. हमीद दलवाईंना मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्य करताना किती अडचणींना व अडथळ्यांना तोंड द्यावे लागले होते. याचा आढावा घेण्यात आलेला आहे तर दलवाईंच्या लेखनामधून त्यांनी केलेली मुस्लिम जातीयवादाची समीक्षा महत्वपूर्ण आहे.

संशोधकाच्या दृष्टीने या पुस्तकातील संपूर्ण माहिती उपयुक्त आहे.

**1.2.18 दलवाई मेहरून्निसा -** 'मी भरून पावले आहे' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ऑगस्ट 2008,

ISBN-978-81-7766-968-8.

सदरील आत्मचरित्र स्वर्गीय हमीद दलवाई यांच्या पत्नी मेहरून्निसा दलवाई यांनी लिहिले आहे. मुस्लिम समाज आधुनिक व्हावा व त्याने राष्ट्रीय प्रगतीमध्ये आपले योगदान द्यावे यासाठी हमीद दलवाईं यांनी आजीवन कष्ट केले. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे कार्य त्यांच्या पत्नी मेहरून्निसा दलवाईं या चालवत आहेत. त्यांनी साध्याशुध्द शब्दात सांगितलेल्या आपल्या सहजीवनाच्या आठवणी या आत्मचरित्रात दिसून येतात. हमीद दलवाईंच्या बरोबर काम करीत असताना मेहरून्निसा दलवाईं यांनाही प्रचंड त्रास झाला परंतु आपल्या पतीची साथ त्यांनी सोडली नाही. आपल्याकडून दलवाईंना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये हे सूत्र मेहरून्निसा यांनी जीवनभर सांभाळले परंतु 19 वर्षांच्या सहजीवनाची अखेर दलवाईंच्या मृत्युने झाली.

संशोधकाच्या दृष्टीने या आत्मचरित्रातील मेहरून्निसा दलवाई यांनी केलेल्या कार्याबाबतची माहिती उपयुक्त आहे.

**1.2.19 सय्यदभाई -** 'दगडावरची पेरणी'**,** अक्षर मानव प्रकाशन पुणे, जुन 2009.

सदरील आत्मकथन हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई यांच्या अनुभवावर आधारित आहे. या पुस्तकामध्ये भारतीय मुस्लिम स्त्रीला सदैव भेडसावणाऱ्या तलाक समस्या आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यासंबंधीचे अनुभव लेखकाने कथन केले आहे. या लेखनामधून नवा समाज घडावा, धार्मिक समस्या नसलेला देश उभा राहावा, येथील माणुस शांत, सुखी असावा ही लेखकाची अपेक्षा आहे. अर्थात सुखी व शांत समाज तयार करणे हे दगडावरच्या पेरणीचे काम आहे. परंतु भविष्यातील पिढ्या हे कठीण कार्य सुध्दा करतील. एकंदर मानवी समाजात काय चालु आहे आणि काय व्हायला हवे याचे मार्गदर्शन पानोपानी होते. नव्या पिढ्या दगडावर सुध्दा पिक घेऊन दाखवितील या लेखकाच्या बळकट आकांक्षेतुन या पुस्तकाचे लेखन झाले आहे.

संशोधकाच्या दृष्टीने मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याविषयीची माहिती अतिशय उपयुक्त आहे.

## 1.3 प्रबंधाची संक्षिप्त रूपरेषा :-

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी सहा प्रकरणांमध्ये केलेली आहे. पहिले प्रकरण प्रास्ताविकाचे आहे. या प्रकरणात इतिहासाची व्याख्या, संकल्पना, व्याप्ती, नवीन प्रवाह, विषयाची स्थलकाळ मर्यादा, संशोधन पध्दती इत्यादी मुद्यांविषयी सविस्तर मांडणी केली आहे. मुस्लिम सत्यशोधक चळवळ हा संशोधन प्रकल्प प्रादेशिक इतिहास अभ्यासाचा एक भाग आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधी कागदपत्रांची उपलब्धता आणि विषय निवडी मागील कारणमीमांसा इत्यादी घटकांची मांडणी पहिल्या प्रकरणात केली आहे.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये इस्लामपूर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीचा आढावा घेणेत आला आहे. इस्लाम म्हणजे काय ? इस्लाम शब्दाचा अर्थ, इस्लामची प्रमुख तत्वे, इस्लामी शरिया, इस्लामी संस्कृती या विषयीची मांडणी केली आहे. तसेच महंमद पैगंबर यांना झालेला धर्मसाक्षात्कार, प्रेषित महंमद पैगंबराचे कार्य तसेच त्याचा प्रभाव कसा पडला यांची चर्चा केली आहे. इस्लामचा प्रचार व प्रसार व आजची इस्लामची व्याप्ती यांची ही मांडणी केली आहे.

तिसरे प्रकरण इस्लाममधील सुधारणावादी प्रवाह अशा शीर्षकाचे आहे. या प्रकरणामध्ये धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?, धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप, धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता, आधुनिक विज्ञानवादी दृष्टीकोन यामध्ये विज्ञानवादाची आवश्यकता, विज्ञानवादाचे स्वरूप यांची मांडणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणात इहवाद म्हणजे काय ? इहवादाचे स्वरूप आणि इहवादाची परंपरा यांची मांडणी केली आहे. तसेच या प्रकरणामध्ये सूफी विचारधारेचा उगम कसा झाला, सूफीझमची तत्वे कोणती आहेत व सूफी संतांनी मुस्लिमांच्या विकासासाठी जी शिकवण दिली व जे योगदान दिले याची माहिती दिली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये तुर्कस्तानचा कमाल पाशा याचा उदय कसा झाला व त्याने आपल्या राष्ट्रात सुधारणावादी दृष्टीकोनाचा स्वीकार कसा केला व राष्ट्राचा विकास कसा केला याची माहिती दिली आहे. या प्रकरणामध्ये भारतीय मुसलमानांमधील विचारप्रवाहाचा आढावा घेताना भारतीय मुसलमानांमध्ये परंपरागत विचार प्रवाह, उदारमतवाद विचारप्रवाह व आधुनिक विचारप्रवाह यांची मांडणी केली आहे.

प्रस्तुत प्रबंधाचे चौथे प्रकरण यामध्ये हमीद दलवाईंचा इहवादी दृष्टीकोन कसा होता व त्यातून त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली याची माहिती देत असताना मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या निर्मितीच्या कारणांचा शोध, मुस्लिम सत्यशोधक चळवळीची उद्दिष्ट्ये, भूमिका यांची मांडणी केली आहे. या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचा आढावा घेतला आहे. तसेच मुसलमानांमधील सुधारणा चळवळी, वहावी चळवळ, अलिगढ चळवळ, देवबंद चळवळ इत्यादी चळवळीची माहिती दिली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा व विचारांचा हमीद दलवाईंवर कसा प्रभाव पडला यांची माहिती दिली आहे. तसेच इ. स. 1970 ते 2000 या काळातील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे.

पाचवे प्रकरण मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या योगदानाचे आहे. या प्रकरणात इ. स. 1970 ते 2000 या काळातील मुस्लिम सत्यशोधक मंडळाने ज्या पुरोगामी परिषदांचे आयोजन केले त्याची मांडणी केली आहे. त्याचप्रमाणे शाहबानो पोटगी प्रकरण, तलाक मुक्ती मोर्चा, शरीफा मुल्ला प्रकरण, समान नागरी कायदा याबाबत

मंडळाने जे कार्य केले त्याचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर कशी पोहचली यांची माहिती घेतली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करण्यामध्ये व मंडळाचे कार्य पुढे नेण्यामध्ये ज्या व्यक्तिंनी सहकार्य केले अशा मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील अ. भि. शहा, नरहर कुरूंदकर, सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई इत्यादी अध्वर्युंच्या योगदानाचा आढावा घेतला आहे.

प्रबंधाचे सहावे प्रकरण हे उपसंहार या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष मांडले आहेत. प्रबंधाच्या शेवटी मुस्लिम सत्यशोधक चळवळीशी संबंधित विविध फोटो व संदर्भग्रंथ सूची आदीची नोंद केली आहे. अशा प्रकारे प्रस्तुत प्रबंधाची मांडणी केली आहे.

## 1.4 विषयाची स्थलकाल मर्यादा :-

महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय ही महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक जीवनातील एक महत्वपूर्ण घटना आहे. मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही सामाजिक परिवर्तनवादी चळवळ असली तरी ती महाराष्ट्रातील राजकीय परिवर्तनाला सहाय्यभूतच ठरली आहे. भारतात खऱ्या अर्थाने निकोप व एकसंघ राष्ट्रवादाची निर्मिती करायची असेल तर मुस्लिम समाज व इतर धर्मीय लोक राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक समाजाची चळवळ सुरू झाली. मुस्लिम समाजामध्ये धर्माच्या माध्यमातून अनेक जाचक रूढी आणि परंपरा निर्माण झाल्या होत्या. उदा. तलाक त्यातून निर्माण झालेली स्त्री-पुरूष विषमता व ही विषमता जाचक रूढी आणि परंपरा नष्ट करण्यासाठी धर्माची चिकित्सा होणे गरजेचे होते. त्यासाठी सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता होती. तसेच भारतात समान नागरी कायद्याची निर्मिती होऊन भारतात समान व निकोप राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी अशिक्षितपणा, परंपरावाद, रूढीप्रियता यामुळे मुस्लिम समाजामध्ये धर्माच्या माध्यमातुन अनेक प्रथा अशा होत्या की, ज्या कालबाह्य ठरलेल्या होत्या. उदा. - मुस्लिम समाजातील पुरूषाला बहुपत्नी विवाहाची संमती आहे, याला धर्मापेक्षाही तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आधार आहे. मुस्लिम समाजातील व्यक्ती जीवनात धर्म वरचढ ठरला. व्यक्तीवर धर्मांचे नियंत्रण निर्माण झाले व व्यक्ती ही पूर्णपणे धर्माधीन झाली. त्यातून मुस्लिम धर्मांमध्ये अनेक अंधश्रध्दांचा जन्म झाला. त्यामुळे धर्माचे स्वरूप विकृत होत गेले. या सर्व प्रथा कालक्रमानूसार अयोग्य कशा आहेत हे सांगण्याची मुस्लिम समाजाला आवश्यकता होती व त्यासाठी प्रबोधनाची गरज होती. यामुळे महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळीची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील मुस्लिम धर्मांतराची चळवळ हीच एक पुरोगामी चळवळ होती. कारण हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेखाली भरडल्या जाणाऱ्या शुद्र व अतिशुद्र समाजातील दीन दलितांनी समतेसाठी इस्लामचा स्वीकार केला. भारतीय

मुस्लिम परंपरेच्या वैभवाबरोबरच महाराष्ट्रातील आजवरच्या समाजपरिवर्तनाच्या परंपरा शिरोधार्य मानणारी मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही एक संघटनात्मक सामाजिक चळवळ आहे.

महात्मा फुलेंना जीवनात एक उदात्त परंतु प्रसंगी प्राणाचे मोल मागणारे प्रयोजन सापडले. इहलोकात स्वार्थापोटी सत्यधर्म दडपला जातो आणि अन्याय चालू ठेवले जातात हे सत्य सांगण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी केली होती. परंतु फुलेंच्या वाट्याला समाजाचा उपहास आणि उपेक्षा आली. मात्र मुस्लिम सत्यशोधकांची वाट महाभयंकर होती. मुस्लिम समाजाला धर्मनिरपेक्ष अशी समाजसुधारणाच मंजुर नव्हती. जे काही सांगावयाचे ते प्रेषितांच्या मुखातुन एकदा बाहेर पडलेले आहे, त्यात बदल करणारा 'अल्ला' हा स्तुतीस पात्र असा जगातील एकमेव देव आहे. महंमद पैगंबर हा अल्लाचा रसूल (दूत) असून त्याच्या करवी अल्लाने कुराणाची शिकवण माणसाला दिली. ही इस्लामची असलेली भूमिका, या भूमिकेला कोणीही जाहीर आवाहन दिले नव्हते. ते हमीद दलवाईंनी दिले. हमीद दलवाईंच्या पूर्वी पुरोगामी विचारांचे अनेक विचारवंत होऊन गेले. मौलाना आझाद सारख्यांनी कुराणाची वेगळी इंटरप्रिटिशन्स केली. न्यायमुर्ती छगलांनी मुस्लिम जातीच्या राजकारणावर टीका केली. परंतु कुराणावर कुणीच टीका केली नाही. मात्र हमीद दलवाईंना मुस्लिम समाजसुधारणेचा ध्यास लागला होता. त्यांच्या समोर मुस्लिम समाज सुधारणेचा प्रश्न होता म्हणून त्यांनी सुरूवातीपासुनच असे सांगितले की महंमद हा देवाचा दूत नसून माणूस आहे. महंमदाने समाजात सुधारणा करण्यासाठी कुराण ग्रंथ लिहिला. त्या काळात समाजात कुराणातील नियम आवश्यक असले तरी बदलत्या परिस्थितीनुसार त्या नियमांमध्ये बदल व्हावयास हवा अशी हमीद दलवाईंची विचारसरणी होती.

अभ्यासाचे कार्यक्षेत्र निवडतांना काही पथ्ये संशोधकाला पाळावी लागतात. कारण अभ्यास विषय व्यापक असल्यामुळे त्याला मर्यादित क्षेत्रात ठेवणे महत्वाचे ठरते. या संशोधनामध्ये अभ्यासाची मांडणी करताना मुस्लिम सत्यशोधक समाजाची निर्मिती 22 मार्च 1970 रोजी पुणे येथे हमीद दलवाई यांनी केली. या चळवळीचे मूलतः तीन टप्पे पडतात. इ.स. 1970-1980, इ.स. 1980-1990, इ.स. 1990-2000 ही या संशोधनाची 30 वर्षांची काल मर्यादा संशोधकाने आखून घेतली आहे.

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीमध्ये अतिशय मौल्यवान योगदान आहे. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्राच्या बाहेर या चळवळीचा फारसा प्रचार व प्रसार झाला नाही. याचे कारण महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा आहे. तर महाराष्ट्राच्या बाहेरील मुस्लिम समाज परंपरावादी व कडवा धर्मांचा अभिमान बाळगणारा आहे. त्यामुळे या चळवळीस बाहेर फारसा प्रतिसाद मिळाला नाही ही या संशोधनाची स्थळ मर्यादा आहे.

### 1.5 संशोधनाची उद्दिष्टे :-

कोणतेही सामाजिक संशोधन हे निश्चित अशा उद्दिष्टाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. यथार्थ उद्दिष्टांची नोंद केली असता संशोधनाची दिशा स्पष्ट होते.

प्रस्तुत संशोधनाचा केंद्रबिंदु म्हणुन खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत. महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे मुस्लिम समाजाच्या विकासा संदर्भात माहिती करून घेणे या व्यापक उद्दिष्टांतर्गत खालील उद्दिष्टे सांगता येतील.

1. इस्लामपूर्व परिस्थितीचा अभ्यास करणे.
2. इस्लामच्या प्राथमिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. इस्लामचे हिंदुस्थानात आगमन झाल्यानंतरच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
4. इस्लाम मधील सुधारणावादी प्रवाहाचा अभ्यास करणे.
5. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या (चळवळीच्या) विचारधारेचा अभ्यास करणे.
6. हमीद दलवाईंच्या सुधारणावादी दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.
7. मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील इतर सुधारणावादी नेतृत्वाच्या प्रचार व प्रसाराचा अभ्यास करणे.
8. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या मुस्लिम समाजाच्या सुधारणेसाठीच्या योगदानाचा अभ्यास करणे.
9. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे.
10. मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या कार्यात आलेल्या अडचणींचा शोध घेणे व त्या एकत्रित करणे, त्याची परिणामकारकता जाणून घेणे.

ही सर्व उद्दिष्टे मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या संदर्भात मुस्लिम समाजाच्या विकासा बाबतची मते जाणून घेण्यासाठी उपयुक्त आहेत. निश्चित उद्दिष्ट ठरविल्यामुळे कोणतेही सामाजिक संशोधन योग्य दिशेने चालले की नाही ते समजु शकते.

### 1.6 गृहितके :-

इतिहासाच्या संशोधनासाठी इतर सामाजिक शास्त्राप्रमाणे संशोधन कार्याच्या प्रारंभी गृहितक निश्चित करून त्या अनुषंगाने विचार करावा लागतो. संशोधन समस्येची विधानाच्या स्वरूपातील मांडणी गृहितकात केली जाते. एका अर्थाने गृहितकात अनुमान काढलेले असते. ते संशोधनाआधारे तपासले जाते. याचाच अर्थ यासाठी होतो की संशोधनाविषयी केलेला तात्कालिक पूर्वानुमान म्हणजे गृहितक होय. संशोधनाचा तो प्रमुख आधार

असतो. या गृहितकालीन अनुमानाचे संशोधनातून परीक्षण होत असते व त्यातून संशोधनाचे तथ्य हाती येते. थोडक्यात गृहितकृत्य हे संशोधनाचे संभाव्य उत्तर असते.

गृहितकामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. निष्कर्ष काढावयासाठी देखील गृहितक मार्गदर्शक ठरते. म्हणुनच गुड अँड हॉट यांनी त्यांच्या 'मेथड इन सोशल रिसर्च' ग्रंथात म्हंटले आहे की, गृहितकृत्याशिवाय होणारे सामाजिकशास्त्र शाखेतील संशोधन दिशाहीन ठरते.[8] थोडक्यात गृहितकामुळे संशोधनातील निष्कर्ष काढण्यास मदत होते. संशोधनाला नेमकेपणा येतो.

सामाजिक संशोधनात गृहितकांना विशेष महत्व असते. कारण अशा या गृहितकृत्यांमुळे पुढील संशोधनाचा मार्ग सुलभ होऊ शकतो. कोहेन व नॅगेल म्हणतात, चौकशी व संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे व समस्यांचे संभाव्य निराकरण व उत्तर सुचविल्या खेरीज आपण संशोधन कार्यात पहिले पाऊल देखील उचलू शकत नाही. समस्येची संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाच्या कोणत्यातरी पैलूंमुळे किंवा पूर्व ज्ञानामुळे सुचतात. अशा उत्तरांचे जेव्हा विधानामध्ये रुपांतर केले जाते तेव्हा ती उत्तरे गृहितकृत्ये बनतात.[9] अशी गृहितकृत्ये नोंदविली म्हणजे पुढील संशोधन कार्यास दिशा मिळेल. त्यामुळे गृहितकृत्यांचे आकलन हे वस्तुस्थिती समजून घेऊनच संशोधकाने गृहितकृत्यांची मांडणी केली आहे.

मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करताना पुढील गृहितकृत्ये मांडलेली आहेत.

1. इस्लामपूर्व धार्मिक स्थितीतून इस्लामची निर्मिती झाली.
2. इस्लाममध्ये पूर्वीपासून सुधारणावादी प्रवाह होते.
3. इस्लाम एक धर्म व जीवनशैली आहे.
4. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची विचारधारा सुधारणावादी दृष्टीकोनास पुरक आहे.
5. इस्लाम मधील सुधारणावादी प्रवाहातील हमीद दलवाई हे एक अग्रणी आहेत.
6. हमीद दलवाई बरोबरच अनेक नामवंत सुधारकांनी या चळवळीत सहभाग घेतला.
7. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे मुस्लिम समाजाच्या विकासात योगदान आहे.
8. महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीमध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विशेष उल्लेखनीय योगदान आहे.
9. महिलांचाही सहभाग या मुस्लिम सत्यशोधक चळवळीत असल्याने त्यांच्या कुटुंबियांना व त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले आहे.
10. मुस्लिम सत्यशोधक चळवळीत सहभागी झाल्यामुळे समाजसुधारकांच्या कुटुंबातील व्यक्तिनांही कमी अधिक प्रमाणात काही समस्यांना तोंड द्यावे लागले आहे.

ही सर्व गृहितकृत्ये पडताळण्यासाठी या अभ्यासात शास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून सामाजिक संशोधनाची आखणी केली आहे. या सर्व गृहितकृत्यांचे महत्व हे इस्लामच्या धार्मिक, पारंपारिक, सांस्कृतिक समाज व्यवस्थेत रूजलेले आहे.

**1.7 संशोधन पध्दती :-**

संशोधनाची तंत्रे व साधने यांचा योग्य वापर केला असता संशोधन प्रक्रिया अधिक त्वरेने पूर्ण करता येते. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनासही उपयुक्त ठरतात. इतिहास संशोधनामध्ये संदर्भ साधने व मजकुर गोळा करण्यासाठी विविध पध्दतीचा वापर केला जातो.[10] प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, तुलनात्मक, प्रश्नावली व मुलाखत या शास्त्रीय पध्दतींचा वापर करण्याचे ठरविले आहे.

**1.7.1 सर्वेक्षण पध्दती :-**

सर्वेक्षण ही संशोधनाची एक पध्दत आहे. ती वर्तमान काळाशी संबंधित आहे. यात आपल्या सभोवती जे घटक आहेत त्यामध्ये आपल्या संशोधन विषयाची आधार सामग्री समाविष्ट असते. थोडक्यात अभ्यासासाठी निवडलेल्या विषयाची माहिती ज्यावेळेस तत्कालीन पर्यावरणात घडणाऱ्या विविध घटनांमध्ये अंतर्भूत असते, त्यावेळी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करावा लागतो. सर्वेक्षण पध्दती ही निरीक्षणावर आधारलेली असते. या पध्दतीत एकाच वेळी अनेक व्यक्तीच्या वर्तनाचे, त्याच्या वैचारिक प्रवृत्तींचे अध्ययन केले जाते. त्यातून विशिष्ट समुहाच्या वर्तनाबद्दल सामान्य नियम सांगितले जातात.

समाजशास्त्रीय अभ्यासात सामाजिक सर्वेक्षणामुळे विशिष्ट प्रश्नाबाबत लोकांची मते पडताळून पाहता येणे शक्य असल्याने तेथे सामाजिक सर्वेक्षण तंत्र तथ्य संकलनासाठी वापरले आहे. बी. एन. घोष म्हणतात "A social survey method is the way of approaching the problem in order to find out truth involved in problem certain steps must be taken in certain order and the ordered steps are called a method."[11] "सामाजिक संशोधन पध्दती म्हणजे समस्येकडे पाहण्याचा एक मार्ग होय. समस्येतील सत्य उलगडण्यासाठी काही योग्य पावले उचलावी लागतात व अशी पावले रचनात्मक पध्दतीने टाकावी लागतात. या रचनात्मक पावलांना पध्दती म्हंटले जाते." या अभ्यासात सुध्दा सर्वेक्षण करताना अशी रचनात्मक पावले टाकलेली आहेत व त्या आधारे सत्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

मुस्लिम सत्यशोधक चलवळीच्या संबंधीत घटकांचे सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी सामाजिक सर्वेक्षण उपयुक्त ठरले आहे.

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र समजण्यास मदत होते. कोणकोणत्या बाबी कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत यांची माहिती कळते. समस्या निराकरणासाठी कोणती स्थिती अपेक्षित आहे. हे ही सर्वेक्षणामुळे कळते.[12] सर्वेक्षणामुळे विशिष्ट काळातील माहिती मोठ्या प्रमाणात संकलित करता येते. प्रश्नावली व व्यक्तीच्या मुलाखती घेऊन थोड्या वेळात कमी श्रमात माहिती संकलित करता येते. अशा या सर्वेक्षण पध्दतीचे अनेक फायदे संशोधनामध्ये आपणास दिसून येतात.

1. प्रश्नांचे आकलन होते.
2. कार्यकारण लक्षात घेऊन त्या आधारे उपाय सुचविता येतात.
3. परिवर्तनाची दिशा समजते.
4. नवीन माहिती मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होऊ शकते.
5. संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती मिळविली जाते.
6. विश्वसनीय माहिती समजु शकते.
7. समस्येच्या अभ्यासाच्या सखोल व रेखीव कामाला सुरूवात करण्यापुर्वी, वर्तमान स्थिती समजुन घेण्यासाठी प्रथमतः सर्वेक्षणाचा फायदा होतो.

सामाजिक सर्वेक्षणाचा अभ्यास विषय समाज जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारा आहे. समाज हा व्यक्तीचा बनलेला असतो. पण व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येक व्यक्तीची मते आवडी-निवडी, छंद, प्रतिक्रिया इत्यादीमध्ये विविधता असते. याचा एक आलेखच सामाजिक सर्वेक्षणात उमटत असतो. या अभ्यासात मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या विविध अंगाचे आकलन करून त्याआधारे नवीन घटकावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात या अभ्यासात जुने सिध्दांत पडताळून पाहून नवा सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन करताना आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी कोणती साधने वापरावी लागतात हे ठरवावे लागते. त्यासाठी साधनाची उपयुक्तता व मर्यादा कोणत्या हे समजून घेणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही साधन परिपूर्ण नसते. प्रत्येक साधनास मर्यादा असतात. वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळी साधने कमी अधिक प्रमाणात उपलब्ध असतात. संशोधनाच्या कोणत्याही साधनाला कमी लेखण्याचे कारण नाही. तथ्य संकलनासाठी किंवा सर्वेक्षणासाठी पुढील साधनांचा उपयोग होतो.

1. नोंदीचा अभ्यास  2. निरीक्षण  3. प्रश्नावली  4. मुलाखत  5. समाजनिति
6. प्रक्षेपण तंत्र इत्यादी.

संशोधनातील काही साधने परिणाम करण्यास साह्य करतात. कशा प्रकारची माहिती आहे व कोणते उद्दिष्ट गाठावयाचे आहे. यावरून कोणते साधन उपयोगात आणायाचे ते ठरविता येते. सर्वच साधने सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून देऊ शकत नाहीत. संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्रत्येक साधनाची उपयुक्तता, विश्वसनीयता व वैधता निरनिराळी असते. त्यामुळे त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठता ठरविता येत नाही. प्रत्येकाचे विशिष्ट गुण व मर्यादासुध्दा निवड करताना विचारात घ्याव्या लागतात. संशोधनात सर्व साधनांचा आवश्यकतेनूसार उपयोग करावा लागतो.

### 1.7.2 नमुना निवड :-

अभ्यासाचा नमुना कसा आहे व तो कशा पध्दतीने निवडला आहे. यावर संशोधनाची दिशा अवलंबून असते. योग्य नमुना निवडला व त्यातील काही पैलूंवर भर दिला तर अभ्यासविषय अधिक स्पष्ट होऊ शकतो.

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासासाठी योगदान याबाबतची मते पडताळुन पाहण्यासाठी या संशोधनात नमुना निवड तंत्राचा वापर केला आहे. पी. व्ही. यंग म्हणतात. ''ज्या सामुग्रीतून नमुना निवडलेला असतो. त्या सामुग्रीचे लक्षण चित्र म्हणजे नमुना होय.'' [13] म्हणजेच संबंधित विषयातील घटकांशी संपर्क साधून माहिती मिळविली जाते. ज्यावेळी समग्र सर्वेक्षण म्हंटले जाते, त्यावेळी अध्ययन विषयाचा आवाका खूप मोठा असेल तेव्हा काही निवडक घटकांचा विचार केला जातो. त्यास निवड पध्दती म्हणतात. मात्र निवडलेला नमुना प्रतिनिधिक असावा लागतो. नमुना निवडण्याच्या दोन प्रमुख पध्दती आहेत.

#### i. संभाव्यता :-

यात प्रत्येक अभ्यासघटकाची निवड करता येणे शक्य होते. निवडलेला घटक, नमुना हा खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक स्वरूपाचा असतो. संभाव्य निवड पध्दतीचे प्रमुख वैशिष्ट्य असे की या पध्दतीत प्रत्येक घटकाची संशोधनामध्ये समाविष्ट होण्याची संभाव्यता कायम आहे हे संशोधक सांगू शकतो.

#### ii. गैरसंभाव्यता :-

यात संशोधक स्वतःला सोयीस्कर वाटणारा नमुना निवडतो. मात्र ही निवड करताना संशोधक स्वतःच्या ज्ञानाने व अनुभवाने योग्य असा प्रातिनिधिक नमुना निवडू शकतो असे गृहित धरले जाते. या गृहितावर ही पध्दती आधारलेली आहे. परंतु यातून निघालेले निष्कर्ष विश्वसनीय असतात असे सांगता येत नाही. मात्र यातून संदर्भ काढणे शक्य होते.

कोणत्याही विचारवंताच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट करीत असताना समाजाच्या विचारप्रवृत्ती, चालीरिती, त्यांच्या श्रध्दा आणि तत्वज्ञान यांचे सूक्ष्म अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यासाठी निःपक्षपाती दृष्टीकोनातून, चिकित्सात्मक दृष्टीकोनातून एकूण परिस्थितीचा संबंधित विचारांशी असलेला संबंध पाहणे आवश्यक असते.

सदर संशोधनासाठी संशोधकाने मुस्लिम सत्यशोधक चळवळीत काम करणाऱ्या अनेक व्यक्तिंची प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. ही माहिती गोळा करताना चळवळीतील व्यक्तींचे वयोमान लक्षात घेऊन स्मरणशक्ती किती आहे. यांचा अंदाज घेऊन विश्वसनीयता आजमावली आहे. या संशोधनासाठी संशोधकाने मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील काही व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत. या माहितीची विश्वसनीयता ठरविण्यासाठी त्यांच्या मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील योगदाना संदर्भात असणारी मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील लोकांचा पत्रव्यवहार, विविध अहवाल, वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या, स्मरणिका, प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे पडताळून पाहिली आहेत. काही वेळी स्मरणशक्ती कमी असल्यामुळे घटनांची सुसंगती मिळत नाही. तेव्हा घडलेल्या घटनांचा अभ्यास लक्षात घेऊन संशोधकाला ती जुळणी करावी लागली आहे. या चळवळीतील व्यक्तींनी या संशोधनातून आम्हास कोणता फायदा होणार असा सर्वसामान्य प्रश्न केला. या संकलित माहितीतून ज्या ऐतिहासिक नोंदी होतील त्यात त्यांचे नाव घेतले जाऊन योगदानही मुस्लिम समाजाच्या परिवर्तना संदर्भात लक्षात घेतले जाईल हे सांगितल्यावर आपण मुस्लिम समाजाच्या सुधारणांसाठी केलेल्या कार्याची ऐतिहासिक नोंद पुस्तकातून प्रबंधातून संशोधनाव्दारे केली जात असल्याचे पाहून त्यांना आनंद वाटला.

**1.7.3 प्रश्नावली पध्दत :-**

सर्वेक्षणाला पुरक आणि म्हंटले तर स्वतंत्र अशी संशोधन पध्दती म्हणजे प्रश्नावली पध्दत. प्रथमतः प्रश्नावली म्हणजे काय ? हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. विशिष्ट प्रकारची माहिती मिळविण्यासाठी जे प्रश्न व त्यांची प्रश्नपत्रिका तयार केली जाते. त्या प्रश्नपत्रिकेला प्रश्नावली म्हणतात. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा विषयासंबंधीच्या संशोधनात ही पध्दत अधिक उपयुक्त आहे. गेल्या पन्नास-पंच्याहत्तर वर्षातल्या चळवळीचा एखाद्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास संशोधन प्रश्नावली पध्दतीने करता येऊ शकतो. कारण ती घटना किंवा एखादी चळवळ समक्ष पाहिलेले लोक आजही उपलब्ध असतात. त्यांनी कदाचित त्या चळवळीत भाग घेतलेला असतो. किमान अलीकडच्या या इतिहासाचे ते साक्षीदार तर निश्चितच असतात. प्रश्नावली पध्दतीतून त्यांच्याकडून चळवळी बाबतची माहिती मिळविता येते.

संशोधन पध्दतीसाठी वापरायची प्रश्नावली अत्यंत काळजीपूर्वक तयार करावी लागते. त्यासाठी प्रथम आपल्या संशोधन विषयाची व्याप्ती, स्वरूप हे निश्चित करावे लागते. आपणास कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे याची स्पष्ट कल्पना संशोधकाला असावी लागते.

प्रश्नावली तयार करणे व त्याचा वापर करणे. एकंदरीत सोपे वाटते पण ती तयार करण्यासाठी श्रम, वेळ, कौशल्य व दक्षता आवश्यक असते. चांगली प्रश्नावली तयार करण्यासाठी तज्ञांनी काही महत्वाचे मुद्दे मांडले आहे.

1. प्रश्नावलीची रचना व्याकरण दृष्ट्या अचूक असावी.
2. मुक्त प्रश्नांचा कमीत कमी व पर्यायी प्रश्नांचा जास्ती जास्त वापर करावा.
3. प्रश्नांत संदिग्धता नसावी.
4. प्रश्न सोप्या भाषेत, सहज समजेल असा असावा.

अर्थात या प्रश्नावली पध्दतीच्या संदर्भात काही गुण तसेच काही मर्यादा दिसून येतात.

### 1.7.3.1 प्रश्नावलीतील गुण :-

1. प्रश्नावली विषयाला धरून व आटोपशीर असावी.
2. प्रश्नावली भरण्यासाठी जास्त वेळ लागू नये.
3. उत्तर देण्याऱ्या व्यक्तीला प्रश्नावली महत्वाची वाटणे आवश्यक असते.
4. प्रश्नावली आपल्या संशोधन विषयाशी संबंधित आणि नेमकी असावी लागते.
5. प्रश्नावलीतून विषयाचे महत्व, त्याचबरोबर हेतु स्पष्ट होणे आवश्यक आहे.

प्रश्नावलीची विभागणी साधारणतः दोन भागात करता येते. पहिल्या भागात माहिती देणाऱ्याचा तपशील विस्ताराने असतो. तर दुसऱ्या भागात प्रत्यक्ष संशोधन विषया संबंधीचे प्रश्न असतात. प्रश्न विचारण्यापूर्वी त्या प्रश्नाविषयीचा प्राथमिक अभ्यास आपण करणे आवश्यक आहे. ज्याची मुलाखत आपण घेणार आहोत त्याला आपल्याविषयी विश्वास वाटला पाहीजे. इतिहास हे शास्त्र आहे ही जाणीव सतत बाळगून असे प्रश्न प्रश्नावलीत टाकावेत की ज्यामुळे उत्तराला नेमकेपणा येईल. निश्चित माहिती उपलब्ध होईल. त्याकरिता प्रश्नांना नेमकेपणा असावा. प्रश्न अर्थपूर्ण असावेत, उत्तरे देणाऱ्याच्या कार्यक्षेत्राचे स्वरूप लक्षात घेऊन प्रश्न विचारावेत. कुणाचे व्यक्तिगत चारित्र्यहनन करणारे प्रश्न नसावेत. ज्याच्या कडून आपण प्रश्नावली भरून घेतो आहोत त्याच्यावर अविश्वास दाखवू नये व अंधविश्वासही ठेवू नये. संशोधकाने येणारी माहिती तटस्थपणे हाताळावी.

या संशोधन पध्दतीत प्रश्नावलीच्या स्वरूपात माहिती आपल्या हाती येते. या माहितीचे विश्लेषण करणे तितकेच महत्वाचे असते. किती प्रकारे त्या घटनेचे, प्रसंगाचे, चळवळीचे विश्लेषण करता येईल याचा अंदाज संशोधकाने घेणे गरजेचे असते. माहिती योग्य क्रम लावणे आवश्यक असते. माहितीचा अन्वयार्थ काढल्यानंतरच खरा विषय स्पष्ट होत जातो. आपल्याला अभिप्रेत नसलेल्या एखाद्या नव्याच मुद्याविषयी काही प्रश्नावलीतून संदर्भ येत असतील तर अशा मुद्यांमुळे संशोधनाची दिशाही बदलू शकेल. थोडक्यात प्रश्नावलीतून आलेली माहितीच खरे तर आपल्या संशोधनाची दिशा निश्चित करायला उपयुक्त ठरते. संशोधनात सर्वेक्षण पध्दतीने माहिती गोळा केली असली तरी प्रस्तुत प्रबंधासाठी प्रश्नावली पध्दतीचाही उपयोग केला आहे. प्रबंधातील मुस्लिम सत्यशोधक

मंडळाचा (चळवळीचा) उदय या घटकाची मांडणी करण्यासाठी प्रश्नावली तयार करून ती या चळवळीत सहभागी झालेल्या व्यक्तीकडून भरून घेतली आहे. महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळींची परंपरा, महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव, 1970 च्या दशकातील महाराष्ट्रातील परिस्थिती, हमीद दलवाईंचे स्त्रियांच्या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आखलेले धोरण, चळवळीत सहभागी झालेल्या व्यक्तीची माहिती इत्यादी प्रश्नांची उत्तरे प्रश्नावलीमधून मिळविली आहेत.

### 1.7.4 मुलाखत पध्दती :-

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदान या संशोधनासाठी संशोधकाने सर्वच उत्तरदाते शिक्षित नसल्याने, म्हणजेच यामध्ये काही अशिक्षित उत्तरदाते असल्याने तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत पध्दतीचा वापर करण्यात आला. गुड व हॅट यांच्या मते ‘‘ज्या प्रश्न मालिकेतील प्रश्न अभ्यासक निवेदकांना प्रत्यक्षपणे विचारून त्यांची उत्तरे भरत असतो त्या प्रश्नमालिकेला मुलाखत अनुसूची हे नांव देण्यात येते.’’ [14] तथ्य संकलनाचे कार्य महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या कार्यात सहभागी झालेल्या काही व्यक्तीची विविध ठिकाणी जाऊन उत्तरदात्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करून उत्तरदात्यांच्या मुलाखती, मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने पार पाडण्यात आले.

विषयाची माहिती मिळविण्यासाठी मुलाखत या तंत्राचा वापर केला जातो. प्रश्नावलीत लिखित माहिती गोळा केली जाते. तर मुलाखतीत मौखिक, तोंडी माहिती जमा केली जाते. या पध्दतीनुसार पूर्वनियोजित मुद्यांवरील प्रश्नांना व्यक्तीकडुन उत्तराव्दारे वैध व विश्वसनीय माहिती समोरासमोर बसून केलेल्या संभाषणातुन मिळविता येते. ही पध्दत मुलाखत या प्रकारात मोडते. मुलाखतीतुन व्यक्तीचे अनुभव, त्यांची मते, विचार, समस्या इत्यादी माहिती करून घेता येते. म्हणून मुलाखत हे एक प्रभावी तंत्र म्हंटले जाते. या पध्दती संदर्भात Gordon W. Allport या तज्ज्ञाने म्हंटले आहे. ‘‘तुम्हास जर लोकांच्या भावनांबद्दल, त्याच्या अनुभवांच्या स्वरूपाबद्दल, त्याच्या स्मरणशक्तीबद्दल त्यांच्या प्रेरणांबद्दल काही जाणून घेण्याची इच्छा असेल तर त्यांना तुम्ही विचारायला हवे. व्यक्तीचे अनुभव विचार, समस्या जाणून घेण्याविषयी मुलाखती उपयुक्त ठरतात. व्यक्तीच्या भावना, इच्छा, आशा, आकांक्षा, अभिवृत्ती, मते, व्यक्तीची मनोराज्ये, व्यक्तीच्या इतर व्यक्तीशी असणाऱ्या संबंधाचे स्वरूप व त्यांच्यात होणारे परिवर्तन या सर्वांनाच सामाजिक संदर्भ किंवा सामाजिक पार्श्वभूमी असते. व या पार्श्वभूमीचे ज्ञान करून घेण्यासाठी मुलाखत तंत्राचा परिणामकारकपणे उपयोग करून घेता येतो.’’ [15]

माहिती संकलित करताना प्रत्यक्ष संपर्क साधून सामाजिक समस्या घटना, याविषयी माहिती मिळवण्यासाठी मुलाखत या तंत्राचा उपयोग करता येतो.

एफ. एन. करलिंगर म्हणतात "मुलाखत ही समोरासमोरील आंतर व्यक्तिगत भूमिकेची एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामध्ये एक व्यक्ती मुलाखतदाता, ज्यांची मुलाखत घेतली जाते, त्या व्यक्तीकडून किंवा उत्तरदात्याकडून त्या प्रश्नाच्या संदर्भात उत्तरे प्राप्त करतो की, जे संशोधन समस्येच्या उद्देशांची पूर्ती करतात."[16] म्हणजेच मुलाखत ही सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक विषयाच्या संदर्भात व्यक्तीच्या मनातील भावना विचार आहे. या तंत्रामध्ये मुलाखतकार प्रत्यक्ष संबंधित व्यक्तीशी भेटून त्याच्याशी चर्चा करीत असतो. त्यामुळे सामाजिक विषयाबाबत तथ्य संकलन करण्याचे हे एक महत्वाचे तंत्र आहे.

मुलाखत अनुसूचीमध्ये उत्तरदात्यांची सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, विविध सामाजिक चळवळी विषयी मत, मुस्लिम समाजामधील विविध प्रश्नासंबंधी मत, मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील त्याचे योगदानाबाबत मत तसेच सध्याच्या काळात राष्ट्रीय एकात्मता निर्मितीसाठी उपाय इत्यादी प्रश्नांचा समावेश मुलाखत अनुसूचीमध्ये केला.

- **सामाजिक, आर्थिक माहिती :-** या गटात लिंग भिन्नता, धर्म, शिक्षण, व्यवसाय, उत्पन्न इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला व उत्तरदात्यांना काही प्रश्न विचारण्यात आले.
- **मुस्लिम प्रश्न, मुस्लिम सत्यशोधक चळवळ :-** या माहितीशी निगडीत काही प्रश्नांचे महत्व लक्षात घेऊन उत्तरदात्यांना काही प्रश्न विचारण्यात आले.
- **राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपाय :-** या माहितीशी निगडीत अशा प्रश्नाचे महत्व लक्षात घेऊन राष्ट्रीय एकात्मतेबाबतचा प्रश्न व प्रश्न सोडविण्याकरीता उपायाबाबतच्या काही प्रश्नांचाही या गटात समावेश करण्यात आला.

वरील सर्व प्रश्नांचा मुलाखत अनुसूचित समावेश केला गेल्यानेचे संशोधन विषयक काही तथ्ये हाती येऊ शकली.

### 1.7.4.1 मुलाखतीची उद्दिष्टे :-

1. मुलाखत होणाऱ्या व्यक्तीचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो.
2. संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकास संवाद साधता येतो व त्यातून कमी वेळेत माहिती तथ्य संकलन करता येते.
3. मुलाखत होत असताना अनेक गोष्टींचे निरीक्षण करण्याची संधी मुलाखतकाराला प्राप्त होत असते.

4. प्रत्यक्ष आणि समोरा समोरच्या संपर्कातून वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन करणे हा मुलाखतीचा प्रमुख उद्देश असतो.
5. मुलाखतीव्दारे वेगवेगळ्या व्यक्तीच्या भावना, विचार, इच्छा, आकांक्षा, मानसिक तणाव, संघर्ष इ. बाबत माहिती मिळवली जाते. त्यामुळे सामाजिक क्रिया व व्यक्तिगत क्रियांच्या संदर्भात गृहितकृत्य निर्माण करण्यास मुलाखतीची मदत होते.
6. समाजात विविध सामाजिक समस्या असतात. या समस्या सोडविण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या पाहीजे. या संदर्भात लोकांचे विचार जाणून घेणे आवश्यक असते. मुलाखतीच्या उद्देशावरून ही पध्दत सामाजिक संशोधनात प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्याकरिता मुलाखतीचे विशेष महत्व असते.

### 1.7.4.2 मुलाखतीचे प्रकार :-

मुलाखतीचे अनेक प्रकार आहेत. जॉन मेज, गुड व हॉट आणि पॉलियन यंग यांनी मुलाखतीच्या अनेक वेगवेगळ्या प्रकारांची चर्चा केली आहे. औपचारिक मुलाखत, अनौपचारिक मुलाखत, निदानात्मक मुलाखत इत्यादी त्यानूसार मुलाखतीचे प्रकार ठरविता येतात.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने वैयक्तिक मुलाखत हा प्रकार वापरला आहे. यात उत्तरदात्याचे लक्ष त्याच्या विशिष्ट अनुभव किंवा अनुभवावर आणि त्यांच्यावर झालेल्या परिणामावर केंद्रीत झाल्याचा, कारणांचा प्रयत्न केला जातो. कोणत्याही अनुभव पैलूवर किंवा विषयावर उत्तरदात्यांना प्रश्न विचारून माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला जातो. अर्थात हे संशोधन समस्येच्या आधारे निश्चित केले जाते. विचारण्यात येणारे प्रश्न कशा प्रकारचे व कोणत्या प्रकारे विचारायचे आहेत. याचे स्वातंत्र्य मुलाखतकारास असते. यातून विषयाबद्दलची माहिती जास्त सखोल व समस्येच्या दृष्टीने उपयुक्त अशी मिळू शकते. मुलाखतीत उत्तरदात्यांनाही बरेच स्वातंत्र्य दिले जाते. पुराव्याचा मागोवा घेण्यासाठी व्यक्तीच्या मनातील प्रेरणांच्या कारणांचा शोध घेण्याचे त्याला स्वातंत्र्य असते.[17]

मुलाखतीमध्ये विषयाबाबत कमीत कमी प्रश्न विचारून किमान सूचना देऊन उत्तरदात्यास मुक्तपणे बोलु दिले जाते. अशा पध्दतीला अनिर्देशित मुलाखत म्हणतात. उत्तरदात्याने त्याच्यापुढे मांडलेल्या विषयांवर मनमोकळेपणे व कोणताही आडपडदा न ठेवता बोलावे यासाठी आवश्यक ते प्रोत्साहन देण्याचे कार्य मुलाखतकारास करावे लागते.

1. मुलाखतीत संशोधकाला वैयक्तिक, खाजगी माहिती घेता येते.
2. संकलित करण्यात आलेली तथ्ये दोषपूर्ण व अपूर्ण राहण्याची शक्यता जास्त असते.

3. मिळालेली माहिती विस्तृत, सखोल व विश्वसनीय असते.

वरील विविध घटकांवरून आपणास मुलाखत तंत्राचे फायदे दिसतात.

मुलाखत अनुसूची परिपूर्ण होण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखत अनुसूचीची पूर्व चाचणी प्रथम घेण्यात आली. अशी पूर्व चाचणी घेतल्यामुळे पुढील अडथळे कोणते आहेत व ते कसे दूर करता येतील याबाबत सावध उपाय योजना करणे शक्य झाले.

मुलाखत अनुसूचीमध्ये अनावश्यक प्रश्न असू नये याची काळजी घ्यावी लागते. गुरूनाथ नागगोंडे म्हणतात, "प्रत्यक्ष संशोधन कार्य सुरू होण्यापूर्वी अनुसूचीतील प्रश्नाचे स्वरूप कसे आहे ? त्यांची मांडणी व्यवस्थित झाली आहे की नाही ? त्यावर उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया कोणत्या ? हे सर्व अगोदर पडताळून पाहिले पाहिजे तरच अनुसूचीच्या स्वरूपात वेळीच बदल करणे शक्य होते."[18] या दृष्टीने काही उत्तरदात्यांची पुणे, कोल्हापूर, सोलापूर येथे अनुसूचीव्दारे मुलाखत घेण्यात आली. त्यामुळे काही निरर्थक प्रश्न टाळणे आवश्यक असल्याचे लक्षात आले. त्याप्रमाणे ते प्रश्न अनुसूची मधुन वगळण्यात आले व काही आवश्यक असलेल्या नवीन प्रश्नांचा समावेश करून नवीन अनुसूची तयार करण्यात आली आणि उत्तरदात्यांशी संपर्क साधून व त्यांना अभ्यासाचा हेतु सांगुन सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. स्वतः अभ्यासक उत्तरदात्यांना प्रश्न विचारून अनुसूचीत नोंद करीत असल्याने उत्तरदात्यांची खरीखुरी व उत्स्फूर्त माहिती मिळु शकली.

### 1.7.4.3 मुलाखत तंत्राच्या मर्यादा :-

1. मुलाखत होत असताना सर्वच गोष्टीची नोंद घेणे शक्य नसते कारण त्यामुळे मुलाखत खंडित होण्याची शक्यता असते. त्यामुळे मुलाखतदाता ज्या महत्वाच्या गोष्टी सांगतो त्या सर्व त्यांच्या लक्षात राहत नाही.
2. मुलाखत तंत्राचा वापर वेळ, पैसा, श्रम या तिन्ही दृष्टीने खर्चिक असतो.
3. संकलित करण्यात आलेली तथ्ये दोषपूर्ण व अपूर्ण राहण्याची शक्यता असते.
4. काही वेळा प्रश्न अशा पध्दतीने विचारले जातात की त्या प्रश्नांच्या उत्तरामुळे मुलाखतकाराच्या मताचे व पूर्वग्रहाचे समर्थन होईल.
5. मुलाखत कर्ता आणि उत्तरदात्यांची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी व भाषा यामध्ये भिन्नता असते. त्यामुळे सांस्कृतिक व सामाजिक तसेच भाषेच्या भिन्नतेमुळे मुलाखत घेताना अनेक अडचणी निर्माण होतात.

### 1.7.4.4 मुलाखतीचे अनुभव व आलेल्या अडचणी :-

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदान यांचे अध्ययन करताना महाराष्ट्रातील काही व्यक्तींच्या मुलाखती उत्तरदात्यांकडून भरून घेण्यास बराच कालावधी लागला. उत्तरदात्यांचे दृष्टीकोन लक्षात घेऊन व त्यांना विषयाची कल्पना देऊन अनुसूची भरून घेण्यात आल्या.

प्रस्तुत संशोधन करताना विविध प्रकारचे अनुभव आले. प्रस्तुत अभ्यास हा सामाजिक व धार्मिक चळवळीशी संबंधित असल्याने उत्तरदाते प्रश्नांची उत्तरे देतील की नाही हा प्रश्न संशोधकासमोर होता. परंतु प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली तेव्हा फारशी अडचण आली नाही. अनुसूची भरून घेताना जे अनुभव व थोड्या फार अडचणी आल्या त्या खालील प्रमाणे देता येईल.

1. मुलाखत अनुसूची भरावयास सुरूवात करण्या अगोदर संशोधक प्रत्येक उत्तरदात्यास स्वतःचा परिचय करून देत असे व प्रस्तुत अभ्यासाकरिता संशोधक माहिती गोळा करत आहे. ही माहिती गोपनीय राहील फक्त संशोधन कार्यासाठीच या माहितीचा उपयोग करण्यात येईल अशी उत्तरदात्यांना खात्री पटवून देत असे. काही उत्तरदात्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली तेव्हा गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींच्या मदतीने उत्तरदात्यांकडून माहिती भरून घेतली. स्त्री व पुरूष अशा दोन्ही घटकांकडुन माहिती संकलित करावयाची होती. परंतु स्त्री उत्तरदात्यांची मात्र माहिती देण्यास उदासीनता दिसुन आली.
2. मुलाखत अनुसूचीतील सर्व प्रश्न मराठीतुनच विचारले होते. कारण काही उत्तरदात्यांची भाषा मराठी होती. परंतु ज्यांची मातृभाषा हिंदी होती त्यांना हिंदीतून प्रश्न विचारले.
3. काही प्रश्नांची उत्तरे देण्यास लोक टाळाटाळ करीत उदा. धर्मासंबंधीचे मत हा प्रश्न महत्वाचा असल्याने तो टाळून उपयोग नव्हता. त्यामुळे प्रश्नांबाबतच्या संशोधनाकरीता असलेली उपयुक्तता त्यांना पटवुन देऊन त्यांच्याकडून माहिती काढून घेतली.
4. प्रत्यक्ष माहिती भरून घेताना काही अडचणी आल्या. संशोधकाकडे लोक साशंक नजरेने बघत. आपली माहिती भरून देण्यास नकार देत. या प्रश्नांचा अभ्यास करून काय निष्पन्न होणार ? असा प्रश्न विचारत. या प्रश्नांची उत्तरे संशोधक अत्यंत समजंसपणाने देत असे. स्वतःची ओळख दाखविण्याकरिता संशोधक आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र जवळ बाळगत असे. तसेच संशोधक एखादी ओळखीची व्यक्ती बरोबर घेऊन उत्तरदात्याकडे जात असे.

5. काही मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील व्यक्तीनी मुलाखत व इतर माहिती सांगण्यास नकार दिला. त्यामुळे पुन्हा-पुन्हा त्यांची भेट संशोधकाने घेऊन त्यांची समजूत घालावी लागली. त्यांना हे मुस्लिम समाजाच्या विकासासाठी चांगले कार्य आहे हे पटवून घ्यावे लागले. तेव्हा त्यांनी माहिती दिली.
6. काही मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील व्यक्तीनी आम्ही समाजासाठी एवढे केले. पण त्यांना किंमत नाही. असे म्हणून संशोधकाला गोंधळात टाकले. त्यावेळी संशोधकाला त्यांची समजूत काढावी लागली. समाज म्हणजे आपणच त्यातील मंडळी आहोत, काहीच्या हातून चूका होतात म्हणून राग धरून चालत नाही असे सांगून समजूत काढली आणि माहिती संकलित केली.
7. संशोधनासाठी सर्वेक्षण करण्यात आलेल्या मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील व्यक्तीचे गांव, त्यांची अंतरे, दळणवळण सोयी या सर्व बाबींचा विचार केल्यास करण्यात आलेले संशोधन हे खूपच व्यापक, जिकीरीचे, खूप वेळ लागणारे आहे हे लक्षात येईल. प्रस्तुत अभ्यासासाठी तथ्यसंकलन डिसेंबर 2012 मध्ये सुरू करण्यात आले तर मे 2013 मध्ये पूर्ण करण्यात आले. सुमारे 5 महिन्याचा कालावधी यासाठी लागला.

वरील सर्व अनुभव, अडचणी लक्षात घेता मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील विविध ठिकाणातून (भागातून) मिळालेली माहिती पुरेशी विश्वसनीय आहे, असा संशोधकाचा दावा आहे.

### 1.8 संदर्भ पध्दती :-

इतिहास संशोधनासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती सर्वेक्षण, प्रश्नावली किंवा मुलाखत पध्दतीतूनच हाती येते असे नाही तर कित्येक संशोधनात संदर्भ पध्दतीचा वापरही करावा लागतो. व्यक्तींच्या कार्यांचे समालोचन किंवा घटनांचे, चळवळीचे मूल्यमापन या संदर्भ पध्दतीने केले जाऊ शकते. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदान या घटकासंदर्भातील कागदोपत्री तथ्यांना अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. पु. ल. भांडालकर म्हणतात, लिखित पुरावा प्रत्यक्षपणे आम्हास गतकालाबाबतची तथ्ये पुरवतो व अप्रत्यक्षात गतकालीन घटना व लोक यांच्याबाबतचे आपले ज्ञान जास्त सखोल व संवेदनशील बनवितो.[19] या अभ्यासातही गतकालीन कागदोपत्री पुराव्यांचा तथ्य शोधण्यासाठी अत्यंत उपयोग झाला आहे.

जॉन मेज यांनी कागदपत्रांचे दप्तर व अहवाल या दोन प्रकारांमध्ये विभाजन केले आहे. ते म्हणतात, एखादी घटना घडत असताना त्या घटनेसंबंधीची माहिती ज्यात नोंदविण्यात येते त्यास दप्तर वा नोंद म्हणावयाचे व घटना घडून गेल्यानंतर तिच्या संबंधी लिहिण्यात येतो तो अहवाल होय.[20] या अभ्यासातही दप्तरी नोंदीचा वापर करून हा अभ्यास परिपूर्ण बनविण्यावर भर देण्यात आला आहे. यामध्ये कोर्टाची नोंद, चळवळीची घटना,

जनगणना अहवाल या साधनांचा वापर करण्यात आला, तर दुय्यम स्वरूपीय साधनांचाही या अभ्यासात वापर करण्यात आला. त्यामध्ये प्रत्यक्ष कागदपत्रांआधारे करण्यात आलेली विविध ऐतिहासिक अध्ययनांचे अहवाल त्याबरोबर विविध अभ्यासकांचे ग्रंथ, चळवळीत प्रकाशित करण्यात आलेली कागदपत्रे, माहिती ही सुध्दा या अभ्यासासाठी साह्यभुत ठरली आहे. तसेच संबंधीत विषयासंबंधीच्या वृत्तपत्रीय कात्रणांचा उपयोगही या अभ्यासासाठी उपयुक्त ठरला आहे.

जॉन मेज म्हणतात, इतिहासकारांची अनुमाने इतिहासकार जे निष्कर्ष काढू इच्छितो त्यांच्याशी संबंधित असतात. इतिहास हा गतकाळ व इतिहासकार यांच्या परस्पर प्रभावातुन साकार होत जातो. तथ्ये इतिहासकाराच्या मनास कलाटणी देतात व इतिहासकारही तथ्यांना घाट देतो.[21] या अभ्यासात हा दृष्टीकोन लक्षात घेऊन विविध इतिहासकारांच्या मतांचा आढावा घेऊनच तथ्याप्रत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

सामाजिक संशोधनाचा उद्देश नवे नियम व नव्या संकल्पना शोधून काढणे. जुने नियम व संकल्पना यांची पुर्नपरीक्षण करणे हा आहे. त्या करीता तथ्यांचे विश्लेषण केल्याशिवाय संशोधन कार्य पूर्ण होऊ शकत नाही.[22] त्यामुळेच प्रस्तुत संशोधनात संशोधकाने तथ्य विश्लेषणाचे कार्य केले आहे.

गुरुनाथ नाडगोंडे म्हणतात, तथ्यांचे विश्लेषण केल्याशिवाय तथ्यातून काही अन्वयार्थ काढणे शक्य होत नाही. पण हे विश्लेषण जितके सुलभ व गतीने होईल तितके संशोधन कार्य सुलभ व वेगाने होत असते. यासाठी तथ्यांचे सांकेतीकरण करणे अपरिहार्य ठरते.[23] या अभ्यासात मुलाखत अनुसूचीमधील प्रश्न व त्यांची पर्यायी उत्तरे यांचा आकार जास्त मोठा असल्याने तथ्यांना लघुरूप देणे गरजेचे होते. या अभ्यासामध्ये आकड्यांचा वापर करून सांकेतीकरण करण्यात आले.

अहवाल लेखनामुळे विशिष्ट परिस्थितीत नेमके काय घडले हे पूर्वकथन करणे शक्य होऊन नवीन ज्ञान प्रकाशात येते. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे योगदान हा सामाजिक अध्ययनास नवी दिशा देणारा विषय आहे. यासंदर्भात पु. ल. भांडारकर म्हणतात, सामाजिक संशोधन कर्त्याने अहवाल लिहिताना आपल्या अध्ययनाचा सामान्य शास्त्रीय संदर्भ लावता येईल इतपत आपल्या अध्ययनाबाबतची माहिती अहवालात समाविष्ट करावी.[24] हे सूत्र लक्षात घेऊन या प्रबंधात अहवाल लेखन केले आहे. मुस्लिम सत्यशोधक चळवळ हा सामाजिक व धार्मिक घटकांशी निगडीत भाग आहे. त्यामुळे या प्रबंधाच्या अंतिम म्हणजे निष्कर्षाचा भाग वस्तुनिष्ठपणे मांडला आहे.

**संदर्भ सूची**

1. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, खंड II, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, मुंबई 1976, पृ. क्र. 507.

2. शहा मु. ब. (संपा.) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड X, धुळे 1988 पृ. क्र. 19.

3. खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्य., मध्ययुगीन भारताचा इतिहास मुंबई 2001 प्रस्तावना पृ. क्र. 56.

4. नाडगोडे गुरूनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन कोल्हापूर 1986 पृ. क्र. 2.

5. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, (तिसरी आवृत्ती) नागपूर 1987 पृ. क्र. 30.

6. कित्ता पृ. क्र. 56.

7. उपरोक्त नाडगोंडे पृ. क्र. 4.

8. देव प्रभाकर डॉ., इतिहास शास्त्र लेखन परंपरा, संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन, नाशिक 2007 (पहिली आवृत्ती) पृ. क्र. 222.

9. Seltiz C. M., Jahoda & others, Research Methods in Social Relations V. S. 1965 P.No.35.

10. देव प्रभाकर डॉ., इतिहास एक शास्त्र, नांदेड 2002 पृ. क्र. 146.

11. उपरोक्त Seltiz C. M. पृ. क्र. 19.

12. उपरोक्त भांडारकर पु. ल. पृ. क्र. 41.

13. उपरोक्त नाडगोडे पृ. क्र. 202.

14. Ghosh B. N., Op. Cit. P. No. 19.

15. उपरोक्त भांडारकर पु. ल. पृ. क्र. 267.

16. कित्ता पृ. क्र. 268.

17. कित्ता पृ. क्र. 272, 273.

18. उपरोक्त Ghosh B. N. पृ. क्र. 161.

19. उपरोक्त भांडारकर पु. ल. पृ. क्र. 217.

20. मेज जॉन, टुल्स ऑफ सोशल सायन्स पृ. क्र. 8.

21. कित्ता पृ. क्र. 110.

22. उपरोक्त भांडारकर पु. ल. पृ. क्र. 225.

23. उपरोक्त नाडगोडे गुरूनाथ, पृ. क्र. 259.

24. उपरोक्त भांडारकर पु. ल. पृ. क्र. 484.

# प्रकरण 2

# इस्लामचा इतिहास

## 2.1 प्रास्ताविक :-

इस्लाम हा जगातील तसेच भारतातील एक प्रमुख धर्म आहे. भारत हा जगातील सर्वाधिक इस्लामचे अनुयायी असलेला देश आहे. हजरत महंमद पैगंबराने 'इस्लाम' या संज्ञेनेच या धर्माचा उल्लेख केला आहे. या धर्माच्या अनुयायांना मुस्लिम अथवा मुसलमान या नावाने ओळखण्यात येते. इस्लामच्या उदयाने जगाच्या इतिहासात एका नव्या युगाची सुरूवात झाली. त्याचा हिंदुस्थानच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर प्रभाव पडला. त्याचे कारण म्हणजे भारतीय लोकसंख्येतील इस्लाम धर्मीयांचे प्रमाणे साधारणतः 13.4 % आहे. इस्लाम हा भारतातील एक प्रमुख धार्मिक अल्पसंख्याक समुदाय होय.

भारतीय संस्कृतीमध्ये प्रबोधनाची परंपरा प्राचीन काळापासून आहे. या परंपरेमध्ये बुध्द, महावीर, चार्वाक, कपिल, कणाद यांचा समावेश होतो. मध्ययुगीन कालखंडामध्ये हिच परंपरा अनेक संत महात्म्यांनी चालविली ज्यामध्ये कबीर, सूरदास, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वर यांच्या पासून थेट संत गाडगेबाबा पर्यंत ही परंपरा अक्षय दिसून येते. अनेक सूफी संतांनी या परंपरेच्या माध्यमातून समाज प्रबोधन घडवून आणले. ज्यामध्ये निजामुद्दीन, हजरत मिरासाहेब, ख्वाजा मुईनुद्दीन, बंदेनवाज, बाबा फरीद, अमीर खुसरो, सलीम चिस्ती, नसरूद्दीन चिराग इत्यादीचा समावेश होतो.

ब्रिटिश राज्य इ. स. 1757 च्या प्लासीच्या लढाईमुळे भारतामध्ये स्थिर झाले. ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय जीवनावर अनेक दूरगामी परिणाम झाले. तंत्रज्ञान व ब्रिटिश औद्योगिक प्रगतीचा भारतीय जनमानसावर प्रभाव पडला आणि भारतामध्ये शिक्षणाची व प्रबोधनाची तसेच सांस्कृतिक पुनरूज्जीवनाची परंपरा वाढीस लागली. राजा राममोहन रॉय यांना आधुनिक भारताचे आद्य सुधारक असे संबोधण्यात येते. या परंपरेमध्ये पुढे महर्षी देवेंद्रनाथ ठाकुर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महर्षी दयानंद सरस्वती, न्या. महादेव गोविंद रानडे, प्रि. गो. ग. आगरकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, कर्मवीर वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, भाई माधवराव बागल, साने गुरूजी इत्यादींचा समावेश होतो.

इस्लामच्या उदयापासूनच इस्लाममध्ये सुधारणावादी प्रवाह दिसून येतात. ज्यामध्ये सूफी संताचा समावेश होतो. कर्मठ इस्लाम व सूफी पंथ यामध्ये अल गजाली याने समन्वय घडवून आणला. अल गजाली चे संपूर्ण नाव

हजवुल इस्लाम इमाम मुहंमद असून त्याचा जन्म इ. स. 1072 मध्ये झाला. त्याचा मृत्यु 1157 मध्ये झाला. तो एक मुस्लिम विचारवंत म्हणून प्रसिध्द आहे. अल गजाली ने आपल्या 55 वर्षाच्या आयुष्यात सुमारे 70 ग्रंथ लिहले.[1] उपरोक्त निर्देशीत सूफी संतांनी समाज प्रबोधनाच्या माध्यमातून आपले विचार मांडले. आधुनिक काळात अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचे संस्थापक सय्यद अहमद खान यांनी मुस्लिम समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. प्रसिद्ध फार्सी शायर डॉ. अल्लमा इक्बाल, शेख हाली, मौलाना आझाद यांनी इस्लाम मध्ये प्रबोधनाची परंपरा पुढे चालविली. आंतरराष्ट्रीय पातळीवर तुर्कस्तानचा केमाल पाशा याचे नाव सुधारणा राबविण्यात अग्रगण्य आहे.

महाराष्ट्रातील मुसलमानांच्या प्रबोधनासाठी स्व. हमीद दलवाई यांनी 22 मार्च 1970 रोजी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाची' स्थापना केली. महाराष्ट्राच्या परंपरेमध्ये सत्यशोधक समाजाला एक वेगळा अर्थ आहे. महात्मा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज यावरून हमीद दलवाई यांनी आपल्या मंडळाचे नाव 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' असे ठेवले. या प्रबोधनपर चळवळी मध्ये प्रा. अ. भि. शहा, प्राचार्य नरहर कुरूंदकर, मुमताज रहिमतपुरे, यदुनाथ थत्ते, प्रा. असफ फैजी, डॉ. मोईन शाकीर, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, सय्यद भाई, मुनीर सय्यद, मुनीर शेख, अन्वर शेख, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी, एन. आर. बारगीर, प्राचार्य वि. अ. शेख, हुसेन जमादार, फक्रुद्दीन बेन्नुर इत्यादींचा समावेश होतो. वरील सर्वांनी महाराष्ट्राची प्रबोधन परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. आणि मुस्लिम समाजामध्ये एक वेगळा विचार प्रवाह निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### 2.2 इस्लामपूर्व परिस्थिती :-

इस्लामपूर्व परिस्थितीचा आढावा घेताना असे दृष्टीपथास येते की इस्लामपूर्व अरब समाज हा अंधारयुगात वावरत होता असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. दुर्दैवाने इस्लामपूर्व परिस्थिती विषयक फारसे लेखन आढळून येत नाही. त्यामुळे कुराण, हादीस, या इस्लामी धर्म ग्रंथातूनच जी माहिती मिळते त्यावर आपणास अवलंबून रहावे लागते.

### 2.2.1 सामाजिक परिस्थिती :-

इस्लामची जन्मभूमी सौदी अरेबिया आहे. अरबी लोकांना 'बेदुइन' असे म्हणत असत. बेदुइन म्हणजे भटके लोक. अरबस्तान हा वाळवंटी प्रदेश आहे. ही भूमी भारताप्रमाणेच तीन बाजूंनी सागराने वेढली आहे. दक्षिणेस हिंदी महासागर, पश्चिमेस लाल समुद्र व पूर्वेस इराणचे आखात आहे. या भूमीमध्ये एकही नदी नाही. परंतु

50 ते 60 मैल रूंदीचा एक सुपीक पट्टा आहे. मक्का व मदिना या शहराचा या पट्ट्यातच अंतर्भाव होतो. विशेषता मदिनेचा भाग शेती करण्या इतपत सुपीक होता. अशा नैसर्गिक परिस्थितीमुळे अरबाचे एकूण जीवनच भटके होते. 'मेंढपाळ, व्यापार, लुटमार हे अरबांचे प्रमुख व्यवसाय होते.'[2]

अरब समाज गुरे चारण्यासाठी पाण्याचा व गवताचा शोध घेत निरंतर भटकत असे. जिथे पाणी व गवताचे कुरण असे त्यावर कोणाची मालकी या प्रश्नावरून या भटकणाऱ्या टोळयांमध्ये वारंवार भांडणे व लढाया होत.

वाळवंटातून जाणारे प्रवाशांचे काफीले लुटणे व त्यावर आपला उदरनिर्वाह करणे हे अरबी टोळयांचे रोजचे कृत्य असे. 'संघर्षाची परिस्थिती असल्यामुळे या लोकांना सदैव सज्ज रहावे लागत असे.'[3] उदरनिर्वाहाचे निश्चित साधन उपलब्ध नसल्यामुळे तसेच वारंवार संघर्षमय परिस्थिती उद्भवल्यामुळे त्यांना भविष्यकाळाची शाश्वती नसे व त्यामुळे हे अरब पराकोटीचे दैववादी बनले होते. 'अन्नाच्या कमतरतेमुळे या अरब समाजात लहान मुलीची हत्या करण्याचा प्रघात होता.'[4]

पाण्याच्या कमतरतेमुळे त्यांचे जीवन अस्थिर होतेच आणि संघर्षप्रधान वातावरणामुळे ते एकटे न राहता टोळी किंवा समुहाने राहात असत. टोळीचा अधिकार एखाद्या प्रमुख नेत्याकडे असे आणि त्या टोळीमध्ये अनेक गट व उपगट असत व त्याचा उपनेता असे. त्यास टोळी लोकशाही असे संबोधले जात असे. आपल्या टोळीचा प्रत्येकाला अभिमान असे. पती-पत्नी पेक्षाही टोळीशी असलेले नाते अधिक जवळचे व दृढ मानले जाई. त्या गटातील सर्वजण आपल्या प्रमुखाचे आदेश प्रामाणिकपणे पालन करीत असत. 'अरबस्तान अशा असंख्य भटक्या टोळींनी बनलेला होता.'[5]

भटके जीवन असल्यामुळे अरबांना चिंतन करणेसाठी वेळ मिळत नसे. दैववादी झाल्यामुळे माणूस ईश्वराच्या इच्छेनेच जगतो व मरतो अशी त्यांची श्रध्दा होती. 'मक्केतील केवळ सतरा जणानांच लिहिता वाचता येत होते. स्वतः प्रेषित महंमद निरक्षर होते. कुराणात अशा अशिक्षित लोकांना 'उम्मी' असे म्हंटले आहे.'[6] अरबस्तानात इस्लामपूर्व काळात वाहतुकीसाठी उंटांचा वापर केला जात असे. त्या भागात खजुराचे उत्पन्न फार मोठ्या प्रमाणात होत असे. तेथील अरब लोक उंटावर खजूर लादत, शेजारच्या सिरिया व जवळपासच्या इतर अनेक देशांशी व्यापार करीत असत. काही भटक्या टोळया आपली भटकंती थांबवून विशिष्ट ठिकाणी त्या टोळया स्थिर झाल्या होत्या. त्यांना भटक्या टोळयांचा वरचेवर उपद्रव होत असे. त्यापासून बचाव करण्यासाठी काही सुस्थिर टोळया भटक्या टोळयांना खंडणी देत असत. त्याच्या मोबदल्यात ते संरक्षण प्राप्त करत असत. 'या

खंडणीला 'बंधुत्व-कर' असे म्हंटले जात असे.'[7]

अरबांच्या या अहिंसक व मर्यादशील मनोवृत्तीचे साने गुरुजींनी आपल्या शब्दात वर्णन केले आहे. "अरब लुटालूट करीत परंतु लुटालूटीतही त्याने आपल्या धर्म मर्यादा ठेवल्या होत्या. तो उगीच कोणाला मारहाण करीत नसे. तो शक्यतो हिंसा टाळी. मी या व्यापाऱ्याचे ओझे फक्त कमी करतो, असे तो म्हणत असे आणि ज्यांना लुटावयाचे आहे तेथे स्त्री असेल तर बेदुइन (अरब) कितीही आडदांड व उच्छृंखल असला तरी स्त्रियांशी तो ममतेने वागे. तो स्त्रीवर हात टाकीत नसे. तो तिला म्हणत असे. 'तुमचे नेसूचे लुगडे किंमतीचे आहे, ते मला हवे आहे. तुम्ही दुसरे नेसा (तोवर) मी दूर जातो.' आणि तो दूर जाऊन पाठ करून उभा राही."[8]

"अरबांच्यात मातृप्रधान कुटुंब पध्दती होती, महंमदाने नवीन धर्म दिल्यावर ती पितृप्रधान झाली. इस्लामपूर्व अरबात स्त्री ही मालमत्ता असे. पिता मेल्यावर मुलगा स्वतःच्या जन्मदात्या आईशिवाय इतर आयांशी विवाह करीत असे. मनुष्य आपल्या पत्नीपेक्षा आईस अधिक मान देई. अरब लोक लहान मुलींना वाळवंटात जिवंत पुरून मारीत असत."[9]

अरबांत दत्तक पध्दती होती. एखाद्या व्यक्तीला आपल्या कुटुंबात सामावून घेत त्याला मालमत्तेचा वारसाही मिळत असे. अरबांची सामाजिक संघटनाही होती. एकाच कुळातील अनेक शाखा मिळून एक फखिधि बने. अनेक फखिधि मिळून एक बनु बने, अनेक बनु मिळून इम्रा बने, अनेक इम्रा मिळून एक कबिला बने. अनेक कबिले मिळून एक शोब बने. अशा प्रकारची अरबांची सामाजिक रचना होती.[10]

अरबांमध्ये गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. त्यासाठी गुलामांची खरेदी विक्री होत असे. गुलाम म्हणजे मिळकतीचा भाग होय. गुलामांमध्ये अनेक प्रकार होते. त्यामध्ये घरातील नोकर चाकर असत. गुलामांचा आणखी एक विशेष प्रकार होता. त्यांना 'किनु' असे म्हणत. तो शेती करीत असे. तो शेताबरोबरच विकला जात असे. तिसऱ्या प्रकारातील गुलामांना मौला असे म्हणत. मौला - धन्याचा पक्षकार असे. तो धन्याच्या जमाती मधीलच असे. त्याला मर्यादित स्वातंत्र्य मिळत असे. मौला गुलामाचे तीन प्रकार होते.

1) गुलामाला त्याच्या चांगल्या वागणुकीसाठी किंवा इतर काही कारणांमुळे मुक्त करणे.
2) एक ठराविक रक्कम गुलाम देईल तेव्हा त्यास मुक्त केले जात असे.
3) इस्लामोत्तर काळात ज्यु आणि ख्रिश्चन एकेश्वर मताचे असल्यामुळे या धर्माच्या लोकांना सहानुभुतीने वागवावे असे प्रेषित म्हणत.

या धर्मांचे जे गुलाम असत त्यांना जिम्मी म्हणत जिम्मी - जिम्मी म्हणजे ज्यु (यहुदी), ख्रिश्चन धर्मीय गुलामांना निम्मी म्हणत. त्यांना मौला म्हणत नव्हते कारण ते मुस्लिम धर्मीय नव्हते. अशा प्रकारची अरबस्तानात गुलामगिरी पध्दत अस्तित्वात होती.[11]

अरब टोळी समाजाचे कार्य आधुनिक काळातील लोकशाहीच्या पध्दतीप्रमाणे होते. टोळीतील प्रत्येक सदस्याला समान अधिकार असत. टोळी प्रमुख हा जन्माने नव्हे तर गुणवत्तेच्या आधारे निवडला जाई. मनुष्य हत्येसाठी मृत्युदंडाची शिक्षा असे. रक्ताला-रक्त, जिवाला-जीव, हाताला हात असे शिक्षेचे नियम होते.[12]

अरबी टोळ्यांमध्ये कमालीची विषमता होती. समाजामध्ये धनदांडग्या लोकांचा एक वर्ग होता. जो बहुदा व्यापार करीत असे किंवा मोठ्या प्रमाणात लुटमार करीत असे. अरब समाजामध्ये गुलामगिरीची पध्दत होती. श्रीमंत लोकांकडे अनेक गुलाम असत. प्रत्येक टोळीमध्ये बहुदा रक्ताच्या नात्याशी संबंधित लोक असत व ती टोळी अन्य टोळी पेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असे. प्रतिष्ठेवरून ही इस्लामपूर्व काळात मोठ्या प्रमाणात टोळ्यांमध्ये संघर्ष होत असे. मानवी जीवनाची सार्थकता व श्रेय प्रेय या संबंधी अरबांमध्ये साहित्य निर्मिती झाली नव्हती. तत्वज्ञान विषयक ग्रंथ ही आढळत नाहीत तरीही अरबी काव्याचा विकास झालेला दिसून येतो. या काळातील काव्यविषय वेगवेगळ्या प्रकारचे होते. त्यामध्ये लौकिक जीवन, शौर्यगाथा, प्रेमगीत इत्यादी काव्य विषयांचा समावेश केला जात असे. कवींना समाजामध्ये सन्मान प्राप्त होता. ‘‘कवींचा वर्ग एकावेळी प्रचारक, इतिहासकार, नितीतज्ञ, भविष्यवेत्ता, अशा भूमिका पार पाडीत असे.[13]

### 2.2.2 राजकीय परिस्थिती :-

इस्लामपूर्व सौदी अरेबियामध्ये जी राजकीय परिस्थिती होती त्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. परंतु सामाजिक परिस्थिती वरून एक गोष्ट लक्षात येते की अरबस्तानामध्ये अनेक टोळ्यांची सत्ता अस्तित्वात होती. अरबस्तानामध्ये लहान मोठ्या टोळ्यांची राज्यपध्दती असली तरी तिला राज्यपध्दती म्हणणे चुकीचे ठरेल. जो प्रबळ असे तोच सत्ताधारी म्हणून मिरवत असे. टोळी प्रमुख सर्वोच्च किंवा टोळीच्या एखाद्या सदस्यावर कोणी अन्याय केला तर सर्व टोळी एकत्र येऊन प्रतिकार करण्यास किंवा सूड घेण्यास सिध्द होत असे.

अरबी लोकांमध्ये अरब-उल-बायदा, अरब-उल-मुतअर्रिबा व अरब-उल-मुस्तार्रिबा असे तीन गट होते.[14] या पोट भेदावरून असे दिसते की हे सर्व गट राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी वारंवार प्रयत्न करत आणि त्यांच्यामध्ये संघर्ष होत असे.

अरबस्तानात लहान मोठ्या टोळ्यांचे राज्य असले तरी त्याच्या शेजारी उत्तर पश्चिमेला रोमन (बायझेंटाइन) तर उत्तर पूर्वेला प्रशियन साम्राज्य पसरले होते.[15] पहिले ख्रिश्चन धर्मीय तर दुसरे पारशी धर्मीय होते.

त्यांचे साम्राज्य अरबस्तानात ही पसरले होते. त्या राज्यामध्ये सुव्यवस्थित राज्यव्यवस्था होती. उत्तरे कडील सिरीया व घस्सन ही राज्ये रोमन साम्राज्य अंतर्गत मांडलिक राज्ये होती तर दक्षिणेकडील व पूर्वेकडील यमन, ओमान, बहरन ही राज्य प्रशियन साम्राज्यातंर्गत मोडत होती.

आपल्या हिताच्या आड जर एखादी राजकीय सत्ता येत असेल तर अरब ती सत्ता झुगारून देत असत. 'ज्याच्या मनगटात जोर तो थोर' हा अरबी राज्यपध्दतीतील प्रघात होता. न्याय-अन्याय हा तलवारीच्या जोरावर ठरत असे, इस्लामपूर्व काळात विशिष्ट राजकीय शासनप्रणाली अस्तित्वात नसल्यामुळे आणि भले ही त्याच्या मध्ये टोळी लोकशाही पध्दत असली तरी अरबांना आपल्या जबाबदारीची जाणीव नसे. ते ठिकठिकाणी टोळया टोळयांनी राहत असत. प्रत्येक टोळी स्वतःला सर्व श्रेष्ठ समजून दुसऱ्या टोळीवर हल्ला करीत असे. या हल्यासाठी कोणतेही विशिष्ट कारण लागत नसे. थोडक्यात क्षुल्लक गोष्टीवरूनही त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात रक्तपात होत असे.

प्राचीन काळापासून मक्का हे शहर धार्मिक, आर्थिक आणि राजकीय केंद्र म्हणून विख्यात होते. एक मध्यवर्ती व्यापार केंद्र असल्यामुळे त्याची फार मोठ्या प्रमाणात भरभराट झाली होती. भारताकडून मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या देशांमध्ये तसेच सिरिया, रोम आणि इजिप्तकडे जाणारे व्यापारी काफिले मक्केमध्ये मुक्काम करीत असत. तसेच दक्षिणेकडील येमेन, उत्तरेस सिरिया, पूर्वेकडील इराक व पश्चिमेकडील ॲनेसिमीया या महामार्गांच्या मध्यवर्ती ठिकाणी मक्का शहर वसले होते. आपण सुरूवातीलाच पाहिले आहे की अरबस्तानात राज्यपध्दती अस्तित्वातच नव्हती. टोळयांचे राज्य असल्यामुळे सर्वत्र बेबंदशाही माजली होती. लुटमार तेथील रोजच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक होता आणि अशा अनेक कारणांमुळे व्यापारी काफिल्यांना त्याचा उपद्रव पोहचत असे.

मक्केमध्ये पाण्याची व्यवस्था होती आणि मक्का हे पवित्र तीर्थक्षेत्र होते. तेथे 'काबा' हे पवित्र मंदिर असल्यामुळे सर्व अरबांचे ते श्रध्दास्थान होते. दरवर्षी यात्रेसाठी तेथे अरब लोक येत असत. हा महिना 'मोहरम' नावाने ओळखला जाई. पवित्र महिन्याच्या या काळात लढाई करण्यास वा रक्तपात करण्यास धार्मिक मनाई होती. त्यामुळे या काळात या परिसरात मुक्काम करणे व्यापाऱ्यांना सुरक्षित वाटत असे. मक्केमध्ये अरब लोकांची बद्दू (बद्दू हा मक्का शहरातील जातीचा समूह होता. याच जातीत हाशिम घराण्यात महंमदाचा जन्म झाला.) जात मोठ्या प्रमाणात होती.[16]

सौदी अरेबियातील मक्केखालोखाल दुसरे प्रमुख शहर मदीना हे होते. हे शहर ही व्यापारी दृष्टीने भरभराटीस आलेले होते. येथे मात्र यहुदी लोकांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात होती आणि त्यांच्यावर यहुदी धर्माचा जास्त प्रभाव होता.[17]

मक्का व मदीना या दोन्ही शहरांमध्ये व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. मक्का या शहरास 'उम्म-उल्-कुरा' (सर्व शहरांची आई) या नावाने ओळखले जाई.[18] ताईफ हे थंड हवेचे शहर म्हणून ओळखले जाई. पर्यटन केंद्र असलेमुळे हे शहर ही व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द पावले होते.

या सर्व कारणांमुळे मक्का-मदीना, ताईफ, ही शहरे वाळवंटी अरबस्तानात असली तरी ती आर्थिक दृष्ट्या समृध्द होती. धार्मिक दृष्ट्या पवित्र होती. या शहरांना मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असे. म्हणून मक्केवर आपली सत्ता राहावी यासाठी अरबी टोळ्यांकडून वारंवार प्रयत्न केले जात असत.

महंमदाचे मूळ पूर्वज कुरेशी या नावाने ओळखले जात. त्या नावावरून त्याच्या टोळीला कुरेश नाव प्राप्त झाले. याच घराण्यात महमंद पैगंबर 12 व्या पिढीत जन्मास आले. प्रेषिताचे पूर्वज कुसय त्याने काबा मंदिराची पुनर्बांधणी केलेली होती. मक्केचा राज्यकारभार त्याने स्वतःच्या हाती घेतला होता. तोच कुरेशी टोळीचा व मक्केचा प्रमुख कारभारी होता. त्याने स्वतःसाठी राजवाडा ही बांधला होता. त्याच्या मृत्युनंतर इ. स. 480 मध्ये त्याचा दुसरा मुलगा अब्दुल मनाफ हा टोळी प्रमुख व कारभारी झाला. त्याच्या मृत्युनंतर हे पद त्याचा तृतीय पुत्र हाशिम याच्याकडे आले. हाशिम हा महंमद पैगंबराचा पणजोबा होता. तो खूपच लोकप्रिय होता. महंमद स्वतःला हाशिमचे वंशज मोठ्या अभिमानाने म्हणवून घेत असत. मक्केतील कुरेश टोळीच्या खऱ्या कर्तृत्वाची, वैभवाची आणि राजकीय परिस्थिती ची सुरूवात हाशिम कडून होते. [19]

हाशिम व त्याच्या मोठ्या भावाचा मुलगा ओमय्या यांच्यामध्ये वारंवार संघर्ष होत असे. मक्का-मदीना या शहरांवर कोणाचे वर्चस्व असावे हा या संघर्षाचा केंद्रबिंदू होता. कुरेश टोळीने ओमय्यास दहा वर्षासाठी तडीपार केले होते. त्यामुळे तो सिरिया या देशात जाऊन राहिला होता. ही घटना यासाठी महत्वाची आहे की पुढील काळात 'ओमय्याच्या वंशजानी 'ओमयाड' खिलाफत स्थापन केली तर हाशिमच्या वंशजानी 'अब्बासाईड' खिलाफत स्थापन केली.' [20]

इ. स. 510 मध्ये हाशिमचा सिरिया या देशात मृत्यु झाला. त्यानंतर गादीवर अब्दुल मुतलिब हा आला, जो मक्केचा प्रमुख सूत्रधार म्हणून ओळखला जातो. इ. स. 570 मध्ये मक्केवर दक्षिण अरबस्तानातील येमेनचा ख्रिश्चन राजा अब्रह याने काबा मंदिर नष्ट करण्यासाठी आक्रमण केले होते. कुरेश जातीचे लोक या आक्रमणास

घाबरून पळून गेले परंतु या लढाईमध्ये अब्रहचा पूर्ण पराभव झाला. या विजयामुळे मुतलिब अधिक प्रबळ बनला. अब्दुल मुतलिब याला एकंदर सहा मुले होती. त्यापैकी अब्दुल याचे मंहमद हे पुत्र होते. 'महंमदाचे आजोळ मदीना हे शहर होते जे मक्केच्या उत्तरेस 270 मैलावर आहे.'[21]

या सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की इस्लामपूर्व काळात अरबस्तानात आदर्श राजकीय व्यवस्था अस्तित्वातच नव्हती. येमेन, नज्द (अरबस्तानच्या तीन प्रमुख स्वाभाविक विभागापैकी एक भाग जो डोंगर, पठाराने बनलेला आहे.) व मक्का मदीना या तीन प्रमुख भूभागावर कोणाचे वर्चस्व असावे यासाठी अरबी टोळयांमध्ये वारंवार संघर्ष होत असे. किरकोळ कारणांवरून मोठ्या प्रमाणात रक्तपात होत असे. राजकीय व्यवस्था नसल्यामुळे व्यापारी काफिले लुटणे. वाळवंटातील लूटमार हा अरबी जीवनाचा रोजचा हिस्सा बनला होता. अरबस्तानात खऱ्या अर्थाने महंमदाच्या पूर्वजांनी मक्का, मदीना शहराच्या परिसरात राजकीय व्यवस्था रूजविण्याचा प्रयत्न केला व त्यामध्ये त्यांना थोडेफार यशही प्राप्त करता आले.

### 2.2.3 आर्थिक परिस्थिती :-

सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करताना आपल्याला असे दिसून येते की तत्कालीन अरब जीवन हे पूर्णपणे भटके जीवन होते. अरबस्तान हा मुळातच वाळवंटी प्रदेश असल्यामुळे तेथे 90 % भूभाग वाळवंटाने व्यापलेला आहे. या भूमीमध्ये नाव होणेसारखी विशेष नदी नाही परंतु या भूमीत 50-60 मैल लांबी रूंदीचा एक सुपीक पट्टा आहे. ज्यामध्ये मक्का-मदीना, ताईफ, बदर ही शहरे येतात. मदीनेचा हा भाग शेतीसाठी सुपीक होता. अशा नैसर्गिक परिस्थितीमुळे या भूमीतील लोकांचे एकूण जीवनच भटके होते. मेंढपाळ, व्यापार आणि लुटमार हे या लोकांचे प्रमुख व्यवसाय होते.

वाळवंटामध्ये ओॲसिस (हिरवळीची जागा) शोधणे, त्याच्यावर मालकी हक्क प्रस्थापित करणे व आपल्या गुरांना चरण्यासाठी गवताळ कुरणे हस्तगत करणे यासाठी वारंवार संघर्ष होत असत. मूळात कोणताही संघर्ष हा शेवटी आर्थिक परिस्थितीशी निगडीत असतो. मेंढपाळ व्यवसायातून ते लोक आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करत असत.

इस्लामपूर्व काळातच मक्का हे व्यापारी केंद्र व तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आले होते. त्यामुळे श्रध्दाळू अरबांची मक्केला ये-जा चालू असे. अरबस्तानातील विविध भागातून मक्का शहरात भाविक येत असत. मक्केचा सूत्रधार हाशिम नामक मंहमदचा पूर्वज होता. हाशिम याने खडकाळ जागेत, व वाळवंटी प्रदेशात असलेल्या मक्केमध्ये अनेक सुधारणा व सुखसोयी निर्माण करून मक्केचे रूपांतर एका व्यापारी केंद्रात केले.[22] इतिहासकार

माणिकलाल गुप्ता लिहितात. "अरब के लोग घुमक्कड थे ; उँटों और घोडों पर लोगों के समुह इधर-उधर भोजन की तलाश में घुमा करते थे ; उपजाऊ भू-खण्डों में खेती व पशुपालन भी करते थे।"[23] अर्थात या वरून असे दिसते की अरबी लोकांचे जीवन भटके होते. ऊंट व घोड्याच्या साहायाने ते अन्न शोधत असत आणि सुपीक जमिनीतून शेती व पशुपालन करीत असत.

उंट हा अरबस्तानातील लोकांचा आधारस्तंभ होता. उंटाच्या व घोड्याच्या साहाय्याने त्यांची वाहतुक व दळणवळण चालत असे. उंटावर सामान घेऊन ते शेजारच्या सिरीया व येमेन शहरातून व्यापार करीत असत व माल आणत असत. हाशिम दरवर्षी हिवाळ्यात यमन शहरातून व उन्हाळ्यात सिरिया प्रांतातून उंटाचे काफिले पाठवून व्यापारासाठी मक्केमध्ये चिज वस्तु आणत असे. त्यामुळे मक्का शहरातील नागरिकांना व व्यापाऱ्यांना मालाचे दुर्भिक्ष्य जाणवत नसे.

इस्लामचा उदय होण्यापूर्वी अरबांचे भारत व युरोप शी व्यापारी संबंध होते.[24] अरब लोक भारत व बाह्य जगा दरम्यानच्या व्यापारी संबंधातील एक दुवा होते. अनेक शतकांपासून अरबांनी भारतातील वेगवेगळ्या व्यापारी वस्तूची वाहतूक केली होती. आणि युरोपमध्ये आपल्या व्यापाराचे बस्तान बसविले होते. थोडक्यात अरबस्तान व भारत यांच्यामध्ये प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. श्री. जे. एल. मेहता लिहितात, "भारतीय व्यापारी भारताच्या किनारपट्टीवरील व पर्शियाच्या आखातातील आपल्या व्यापारी पेढ्यांमधून अरब खलाशी, व्यापारी प्रतिनिधी व अन्य सेवकांची नियुक्ती करीत असत. तर फारशी जहाजे व अरब सौदागरांचे उंटांचे तांडे अरबी समुद्र व अरबस्तानचे वाळवंट यामधून भूमध्य समुद्रापर्यंत आणि तेथून परत अशी व्यापारी मालाची ने-आण करीत असत."[25]

अरबस्तानात गुलामगिरीची प्रथा होती त्यामुळे गुलामांचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. गुलाम विकत घेऊन त्याला वाटेल तसे राबवायचे, त्याला पुरेसे अन्न न देता अर्धपोटी राबवायचे व क्षूल्लक कारणासाठी रक्तबंबाळ करण्याची सजा गुलामाच्या नशिबात सदैव लिहिलेली होती. त्याचबरोबर स्त्रियांचाही व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. टोळी युध्दातून पराभूत झालेल्या स्त्री-पुरूषांना गुलामाचीच वागणूक दिली जात असे. अशी ही अमानूष पध्दत अरबस्तानात सर्वमान्य होती. [26]

आपण वर पाहिले आहे की मक्का शहर पूर्वी पासून खूप प्रसिध्द होते. एक मध्यवर्ती व्यापारी केंद्र म्हणुन मक्का व मदीनेचा नेहमीच उल्लेख केला जातो. मक्केमध्ये बद्दू अरबांचे वर्चस्व होते तर मदीनेवर यहुदयांचा विशेष प्रभाव होता. माणिकलाल गुप्त लिहितात. "दुसरा प्रमुख नगर मदीना था जो कि एक व्यापारिक स्थल था,

जहाँ यहुदी लोग विशेष रूप से बसे हुए थे; यहुदी धर्म का विशेष प्रभाव था। मक्का नगर में अरब लोगों में समुहगत जातियों में बद्दू जाति थी।''[27]

काही लोक कपडे विकण्याचा व्यवसाय करीत तर काही लोक फळफळावळ विकून आपले पोट भरत. अरबस्तानात मोठ्या प्रमाणात खजूर उपलब्ध होतो. त्यावर ही बहुतांश लोक उदरनिर्वाह करीत असत. ताईफ हे अरबस्तानातील थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. ताईफ शहरावर कुरेशांचा अंमल होता. येथील निसर्ग शोभा अवर्णनीय असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात फळफळावळ दिसून येते. त्यामुळे ते शहर एक व्यापारी केंद्र म्हणून भरभराटीस आले होते. प्रसिध्द विचारवंत शेषराव मोरे आपल्या 'मुस्लिम मनाचा शोध' ग्रंथात लिहितात. ''मक्का हे शहर पूर्वीपासून खूप प्रसिध्दीस आलेले होते. मध्यवर्ती व्यापारी केंद्र म्हणुन ते उत्कर्ष पावले होते. भारताकडून सिरिया, रोम, इजिप्त इत्यादी देशांकडे जाणारा आंतरराष्ट्रीय मार्ग मक्केवरून जात होता. तसेच दक्षिणेकडील यमन ते उत्तरेकडील सिरिया व पश्चिमेकडील ॲबेसिनिया ते पूर्वेकडील इराक या दोन महामार्गाच्या छेद बिंदुवर मक्का येत होते. शिवाय हे शहर या महामार्गाच्या मध्यभागी येत असल्यामुळे व्यापाऱ्यांचे काफिले त्याठिकाणी मुक्काम करीत असत. मोहरमच्या महिन्यात मक्का परिसरात लढाई करण्यास व रक्तपात करण्यास धार्मिक मनाई होती. त्यामुळे या काळात या परिसरात मुक्काम करणे काफिल्यांना सुरक्षित वाटत असे. यामुळे मक्का शहरास भरपूर उत्पन्न मिळत असे.'' [28]

उपरोक्त विवेचनावरून असे दिसून येते की अरबी लोकांचे जीवन अस्थिर होते. लुटमार, व्यापार, शेती पशुपालन यांच्या सहाय्याने ते आपला उदरनिर्वाह करीत असत. तत्कालीन अरबस्तानात गुलामगिरीची प्रथा होती. स्त्रियांचा व गुलामांचा मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. त्यामुळे तेथील लोकजीवन अप्रगत झाले होते. अरब व्यापारी भारतातून अनेक वस्तु आयात करून युरोपमध्ये निर्यात करीत असत. अरबस्तानातील मक्का-मदिना, ताईफ, ही शहरे व्यापारी केंद्रे म्हणून भरभराटीस आलेली होती.

### 2.2.4 धार्मिक परिस्थिती :-

इस्लामपूर्व काळातील अरबांची धार्मिक परिस्थिती अत्यंत वेगळी होती. तत्कालीन लोकांना धर्म म्हणजे काय यांची कल्पनाही नव्हती. अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यामध्ये त्यावेळचा अरब समाज गुरफटलेला होता. वाडवडिलांपासून चालत आलेला धर्म आणि परंपरा यांचा अरब अंगिकार करीत होते. थोडक्यात धर्म ही संकल्पना अरबामध्ये परंपरागत विचारावर आधारित होती.

अरब लोक मूर्ती पूजक होते. जिकडे तिकडे मंदिरे व मूर्तीपूजेचा जोर होता. मुस्लिम परंपरेनुसार असे सांगण्यात येते की अरब लोक पूर्वी एकेश्वरवादी होते. मूर्तीपूजक नव्हते तर मूर्ती विरोधक होते. परंतु प्रेषित महंमदाच्या 9 व्या पिढीतील एक पूर्वज व टोळी प्रमुख अबर बिन लुहय याने पहिल्यांदा मक्केत मूर्ती आणली व तिची स्थापना केली.[29] अरब बिन लुहय व्यापारा निमित्ताने सिरीयाला गेला असता त्याने तेथे मूर्तीपूजा पाहिली आणि त्यामुळे तो प्रभावित होवून तेथुन काही मूर्ती त्याने मक्केत आणल्या व आपल्या लोकांना त्याची उपासना करण्यास सांगितले. तेव्हा पासून अरब हे मूर्तीपूजक व अनेकेश्वरवादी बनले. अरबांच्या सामाजिक जीवनाचा विचार करताना आपण पाहिले आहे की अरबी लोक, भटक्या टोळ्यांचे जीवन जगत होते. अरबांच्या प्रत्येक टोळीसाठी स्वतंत्र देव व देवता असत. त्यांची मंदिरे बांधण्यात येत असत. देवतांची पूजा केल्यामुळे आपल्या इच्छा व मनोकामना पूर्ण होतात अशी अरबांची श्रध्दा होती.

मक्केतील काबा मंदिराच्या संदर्भात माणिकलाल गुप्त लिहितात, ‘‘छठी-सातवीं शताब्दी ई. में अरब में दो प्रमुख नगर थे एक मक्का जहाँ काबा का मंदिर था, काबा अर्थात वह काला पत्थर (संगे-अस्वद) जिसके विषय में एक विश्वास यह था कि वह आकाश से टुटे हुऐ तारे का अंश था, दुसरी मान्यता यह थी कि एक देवदूत ने यह पत्थर अब्राहम को, जिसे अरबी लोग अपना पूर्वज मानते थे, दिया था, मक्का इसलिए अरब लोगों का पवित्र तीर्थ स्थान था, यहाँ अरब यात्री आते-जाते रहते थे, काबा को पूजते थे, उसकी परिक्रमा करते थे, उसे चूमते थे, और रात्रि के समय एकत्र होकर कविताएँ या गीत गाते थे, उनकी अरबी भाषा में।[30] यावरून असे दिसते की इस्लामपूर्व काळात अरबस्तानात दोन मुख्य शहरे होती एक मक्का आणि दुसरे शहर मदीना, मक्के मध्ये काबा नामक मंदिर होते काबा अर्थात काळा दगड ज्याबद्दल असे बोलले जात असे, की हा दगड आकाशातून तुटलेल्या ताऱ्यापासून बनविला आहे. तर काही अरबांच्या मते हा दगड एका देवदूताने अरबांचा पूर्वज अब्राहमला दिला होता. मक्का अरबांचे पवित्र स्थान याच कारणामूळे ओळखले जात असे. तिथे अरब यात्रेकरू ये-जा करीत असत. काब्याची पूजा करत असत. त्याची प्रदक्षिणा करत असत. रात्री एकत्र येऊन अरबी भाषेतील कविता, गीते गाऊन काब्याची स्तुती करत असत.

मक्का शहरामध्ये बद्दु (अरबस्तानच्या वाळवंटी प्रदेशात राहणाऱ्याना बेदुइन म्हणजेच बद्दु म्हणत. बेदुइनांना शेती नव्हती. ते सदैव भटकंती करीत असत. त्यांचे दोन प्रकार होते. शेळ्या मेंढ्या वाढविणारे व उंट वाढविणारे, शेळ्या-मेंढ्या चारणारे कुरणाच्या जवळ पाण्याच्या आसपासच राहत परंतु उंट पाळणारे वाळवंटात सर्वत्र भटकत. अरबी बेदुइन उंट पाळणारेच होते.) या अरबी जातीचा प्रभाव होता तर मदीने मध्ये यहुदी धर्माचे

अनुयायी मोठ्या प्रमाणात राहत होते. मक्केमध्ये 340 देवतांची पूजा केली जात असे.[31] तर मक्केतील काबा मंदिरात एकूण 360 मूर्ती बसविलेल्या होत्या. प्रत्येक दिवशी एक-एका मूर्तीची पूजा केली जात असे. [32]

मुर्तीपुढे हजारों जीवांची हत्या होत असे. सणादिवशी मूर्तीपुढे जमुन अरब लोक वेडावाकडा नाच करीत असत. आपण वाटेल ती  दुष्कृत्ये करावयाची  आणि मूर्ती समोर एखादा बकरा बळी दिला की आपले पाप नाहीसे झाली अशी वेडी समजूत तत्कालीन लोकांमध्ये होती. धार्मिक कृत्यासाठी अरब लोक खूप पैसे खर्च करत. मुलाबाळांच्या तोंडचा घास हिरावून मूर्तीपूजा केली जात असे. आपण पूजा केली नाही तर देव आपणास शिक्षा करेल या भितीपोटी अरब आपल्या घरातील लहानसहान वस्तू विकुन पूजापाठ करीत असत. याच मंदिरातील मूर्तीसमोर माणसाचे बळी दिले जात असत.[33] प्रत्येक टोळीचा स्वतंत्र देव असला तरी सर्व टोळ्यांना समानतेने मान्य असणाऱ्या काही देवदेवता होत्या. ते परस्परांच्या दैवतां विषयी आदर बाळगत असत. देवपूजा करावयाची, देवावर, मूर्तीवर श्रध्दा ठेवावयाची व आणखी काही धर्मकांडे करायची. तेवढ्या पुरतीच अरबांची धर्मकल्पना मर्यादित होती.

महंमदाची जन्म टोळी कुरेश या नावानी ओळखली जाते. तिचा टोळी देव अल्लाह हा होता. एकूण सर्व अरब लोक अल्लाह हा सर्वोच्च देव मानत असत.[34]  देव हा पालकाच्या ठिकाणी असल्यामुळे कुरेश टोळीला किंवा जमातीला अल्लाहाची कुटुंब म्हंटले जाई. इतर टोळयांच्याही अशा स्वतंत्र देवी-देवता होत्या. अरब लोक मूर्तीपूजेच्या बाबतीत सहिष्णु राहिला असल्यामुळे त्यांच्यामध्ये देवतेच्या श्रेष्ठत्वावरून कोणतेही संघर्ष होत नसत. कुरेश जमातीचे मक्केवर प्रभुत्व होते व काबा मंदिरावर त्यांचेच वर्चस्व होते. त्यामुळे कुरेश जमातीला अरबस्तानात खुप मोठा मान होता. पर्यायाने त्यांचा कुलदेव अल्लाह यास टोळयाही मान देत असत. थोडक्यात सर्व अरबांचा ‘अल्लाह’ हा एक प्रमुख देव होता. त्याच्या जोडीला इतर टोळीवाले आपल्या विविध देवदेवतांची उपासना करीत असत. म्हणजेच अरबांमध्ये अनेकेश्वरवाद होता.[35]

मक्केच्या काबागृहात एकुण 360 मूर्ती होत्या. तेथे ‘हुबल’ नावाच्या देवाची मानवी आकाराची एक भव्य मूर्ती होती. अरब लोक युध्दात विजयी झाल्यानंतर ‘‘हुबलचा विजय असो’’ अशी घोषणा देत असत.[36] या मूर्ती खेरीज अरबांचे अनेक देव होते. सूर्य, तारे आणि तीन चंद्रदेवता यांना ते मानीत असत. या तीन चंद्रदेवतांची नावे अनुक्रमे ‘अर्ल्उज्जा’, ‘लात’ व ‘मनात’ अशी होती. या देवता प्रसन्न होऊन भक्ताची इच्छापुर्ती करतात अशी अरबांची धर्मश्रध्दा होती. या आभाळात राहणाऱ्या देवांच्या कन्या समजल्या जात. या तीन देवता अल्लाच्या कन्या आहेत असे ही त्याकाळी मानले जात असे.[37] याशिवाय अरबी लोक वृक्ष व डोंगर यांना ही दैवत मानीत असत.

वाऱ्याने वाळु उडून तिचा उंचवटा झाला की लगेच त्या उंचवट्यास देवता समजुन त्याची पूजा होत असे.[38] यावरून असे दिसून येते की तत्कालीन समाजात निसर्ग देवतांची पूजा केली जात असे. प्राचीन काळापासून सर्वच संस्कृती मध्ये निसर्ग दैवतांच्या पूजेचा प्रघात होता त्यास अरबही अपवाद नव्हते. घगलस व गगतेलीस या देवतांच्या सोन्याच्या व चांदीच्या मूर्ती होत्या. अब्राहमाची मूर्ती व त्याच्या मुलाची ही मूर्ती येथे होती. अब्राहमची मूर्ती म्हणजे एक दगडच होता त्याला 'हा अब्राहम' असे म्हणत. याशिवाय अरबांचे देव म्हणजे अर्धवट दैत्यच होते. भुतेप्रेते, पिशाच्चे, जिन, गिऱ्हे या देवदेवतांना अपाय करू नये म्हणून अरब त्यांची पूजा करीत असत. याशिवाय दुसरी एक पितृ पूजा ही अरबांमध्ये होती. काही जुन्या जाती-जमातीतुन वंशपरंपरागत प्रतिके होती. या प्रतिक चिन्हांवरून अरबी कुळांना नावे पडत. एखादा साप, एखादा प्राणी, टेकडी किंवा झाड अशी ती चिन्हे असत. या चिन्हांविषयी अपार आदर व भिती असे या वस्तु पुढे प्रतिके झाल्या. झाड, खांब, निरनिराळ्या प्रकारचे दगडधोंडे, झरे, धबधबे, तळी, सरोवरे, पर्वत, यांची मृत आत्म्याची प्रतिके म्हणून पूजा होवू लागली.[39]

अरबांच्या काबागृहा बद्दल सर्वांच्या मनात आदर व श्रध्दा होती. त्यावरून काबाबद्दल अनेक विचार तत्कालीन समाजात रूढ होते. काबा ही वास्तु आजपर्यंत 10 वेळ पुन्हा पुन्हा बांधली गेली असे मानले जाते. सर्वप्रथम ती स्वर्गातील देवदूतांनी बांधली. दुसऱ्यांदा मूळ पुरूष व पहिला प्रेषित आदम याने बांधली. तिसऱ्या वेळेस त्याचा मुलगा सैथ याने, चौथ्यांदा प्रेषित इब्राहिम याने तर सातव्यांदा कुरेश टोळी प्रमुख कुसैय याने इ. स. 605 मध्ये बांधली. इ. स. 5 व्या शतकात कुसैय हा काब्याचा मुख्य कारभारी होता. कुसैयने नदवा, लिवा, रिफादा अशा तीन संस्था स्थापन केल्या होत्या. नदवा म्हणजे परिषद बोलवून अध्यक्ष होणे, लिवा म्हणजे लष्करी हुकुमत तर रिफादाचा अर्थ कर बसविण्याचा हक्क हे तिन्ही अधिकार कुसैयने स्वतःकडे ठेवले होते.[40] आठव्यांदा मक्केतील कुरेशांनी त्यांचे बांधकाम केले होते. नवव्यांदा व दहाव्यांदा प्रेषित महमंदा नंतरच्या काळात मुस्लिम नेत्यांनी बांधले. इ. स. 696 पासून ती तशीच अस्तित्वात आहे असे मुसलमान मानतात.[41] पहिले प्रेषित आदम याच ठिकाणी स्वर्गातून जमीनीवर उतरले असे मानले जाते. मूळात जेव्हा काबागृह बांधले गेले. तेव्हा तिचा वापर मशीद म्हणूनच केला जात असे, परंतु नंतरच्या काळात काब्यामुळे मूर्तीची स्थापना करून तिचे मंदिर बनविण्यात आले असे मुस्लिम परंपरा सांगते. या काबागृहात एक काळा दगड आहे. (संगे अस्वद) हा दगड अतिशय पवित्र मानला जातो. तो अर्ध वर्तुळाकार असुन त्याची रूंदी 8 इंच, उंची 6 इंच व व्यास 7 इंच आहे. त्याचा रंग तांबडा काळपट असून हा पवित्र दगड स्वर्गातून पाठविला गेला आहे. अशी अरबांची दृढ समजुत होती. महंमदाच्या काळात जेव्हा काबागृहाच्या जीर्णोध्दाराचे काम सुरू झाले तेव्हा पवित्र दगड बसविण्याचा मान आपणास मिळावा यासाठी अरबांमध्ये वाद सुरू झाला. त्यावेळी महंमदाने हा वाद मिटविण्यासाठी जो निर्णय दिला त्यानुसार

हा पवित्र खुला दगड काब्याच्या एका कडेला दर्शनी भागात मनुष्याला जमिनीवर उभे राहुन सहज चुंबन घेता येईल अशा उंचीवर स्थानापन्न करण्यात आला. हा दगड आजही त्याच ठिकाणी आपणास पहावयास मिळतो. [42]

इस्लामपूर्व काळातील अरब अंधश्रध्दाळू होते. ते चमत्कारावर विश्वास ठेवत असत. एखाद्या ढोंगी माणसाने लोकांची दिशाभूल करणारे चमत्कार केले की लोक त्याच्या नादी लागत. त्याला देव समजून त्याला नवस करीत. त्या अंधश्रध्देमूळे अरबस्तानात बुवाबाजीची प्रथा फार मोठ्या प्रमाणात बोकाळलेली होती.[43]

तत्कालीन अरबी जीवनावर मूर्तीपूजेचा मोठा पगडा असल्याचे दिसुन येते. यहुदी व ख्रिस्तीधर्म तसेच पारशांचे साम्राज्य अरबांच्या देशाभोवती पसरलेले होते. ख्रिस्ती व यहुदी धर्माचा एकेश्वरवाद अरबांना प्रभावित करू शकला नाही हेच यावरून दिसून येते. तत्कालीन पारशी समाजाची अग्नी पूजा देखील अरबांना आकर्षित करून शकली नाही. याउलट अनेकश्वरवाद अरबांमध्ये प्रचलित होता असे दिसून येते. प्राचीन अरबांच्या धर्मात सेमिटिक धर्माचे मिश्रण आहे. तसेच खाल्डीयन, फिनिशियन, कॅननाइट्स वगैरे धर्मांचे ही मिश्रण आहे. हा एक प्रकारे अनेक भूतखेतांचा धर्म होता.

थोडक्यात इस्लामपूर्व काळामधील अरबांची धार्मिक, सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती. लुटमार, चोरी, जुगार यांचे प्रस्थ फार मोठ्या प्रमाणात माजलेले होते. मर्यादित प्रमाणात शेती व मेंढपाळी हाच अरबांचा मुख्य व्यवसाय होता. तसेच कापड उद्योग विक्रीचा व्यवसाय व मक्का-मदीना शहरांमध्ये व्यापार व्यवसाय चालू होता. काही ठिकाणी फळफळावळ व सुकामेवा विक्रीचा व्यवसाय चालत असे.

सामाजिक परिस्थितीचा विचार करताना असे दिसून येते की या समाजात स्त्रियांना दुय्यम लेखले जात असे. स्त्रियांची व गुलामाची खरेदी विक्री केली असे. टोळी परंपरा अस्तित्वात असल्यामुळे अनेक वेळा संघर्ष निर्माण होत असे. त्यावेळचा समाज अंधश्रध्देत, कर्मकांडात, व्यसनात, जुगारात, दैववादात, बालहत्या करण्यात, उपभोगात मग्न झालेला होता, मार्गभ्रष्ट झाला होता.

धार्मिक परिस्थितीचा विचार करता असे दिसून येते की हा समाज अनेकेश्वरवादाची शिकार झालेला दिसून येतो. प्रत्येक दिवशी एक अशा प्रमाणे वर्षात 360 देवतांची उपासना केली जात असे. हुबल, लात, मनात व अल्लउज्जा या प्रमुख देवतांची आराधना होत असे. देवतेला प्रसन्न करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा वापर केला जात असे. नरबली व पशुबलीची प्रथा अरब समाजात मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेली दिसून येते.

राजकीय परिस्थितीचा विचार करताना आपणास असे दिसून येते की तेथे आदर्श राजकीय पध्दती अस्तित्वात नव्हती. या उलट टोळ्यांमध्ये सदैव संघर्ष चालत असे. प्रामुख्याने मक्का मदीना शहरांवर कोणाचे

वर्चस्व असावे हा या संघर्षाचा केंद्र बिंदू असलेला दिसून येतो. त्यामुळे किरकोळ कारणांवरून रक्तपात होत असे आणि तलवारीच्या व मनगटाच्या जोरावर टोळी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असे.

## 2.3 इस्लाम म्हणजे काय ?

जगात जितके धर्म आहेत त्यातील प्रत्येक धर्माचे नामकरण एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या नावावरून केले गेले आहे किंवा ज्या जातीत व ज्या राष्ट्रात त्या धर्माचा उदय झाला त्याच्या वरून केले गेले आहे. उदा. ख्रिश्चन धर्माचे नांव, येशु ख्रिस्तांशी निगडीत असलेल्या कारणाने 'ख्रिश्चन' धर्म असे केले गेले आहे. बौध्द धर्माचे संस्थापक महात्मा गौतम बुध्द होते. म्हणून त्यांच्या नावावरून त्या धर्माचे नांव 'बौध्द' धर्म असे ठेवले गेले. झरतुष्ट्र धर्माचे नांव त्याचे संस्थापक 'झरतुष्ट्र' यांच्या नांवावरून ठेवले गेले आहे. यहुदी (ज्यु) धर्म हा 'यहुदा' नामक एका विशिष्ट वंशात जन्मला म्हणून त्या धर्माचे नाव 'यहुदी' धर्म असे ठेवले गेले. अशीच व्यवस्था अन्य धर्माच्या नावासंबंधी आहे. परंतु 'इस्लाम' चे वैशिष्ट्य असे आहे की त्याचे नामकरण कोणत्याही व्यक्तीशी किंवा जातीशी अगर वंशाशी संबंधित नाही. उलट त्याचे नामकरण एक विशिष्ट गुण प्रकट करते. या गुणाचा अविष्कार 'इस्लाम' शब्दाच्या अर्थामध्ये आढळतो.

### 2.3.1 इस्लाम शब्दाचा अर्थ :-

'इस्लाम' हा शब्द अरबी भाषेतील असून त्याचा अर्थ 'ईश्वरास शरण जाणे' किंवा 'ईश्वरी इच्छेप्रमाणे अनुसरण' करणे असा आहे. महंमद इक्बाल यांच्या मते इस्लाम म्हणजे कर्मयोग.[44] इस्लाम मध्ये नश्वरतेच्या विचाराला स्थान नाही. परमेश्वरापुढे शरणागती पत्करून सतत कार्यरत राहणे. तेव्हा इस्लाम शब्दाचे अनेक अर्थ आपल्या समोर येतात. शरण, संयम, सौजन्यशीलता, आज्ञापालन हे इस्लाम शब्दाचे काही अर्थ आहेत. परमेश्वर एक आहे आणि महंमद हा शेवटचा प्रेषित आहे, ही इस्लामची मुख्य भूमिका आहे.[45] प्रेषिताच्या अनुसार या धर्माला अल्लाचा धर्म, सत्यधर्म, सरळमार्ग किंवा इस्लाम असे संबोधले जाते. इस्लामच्या अनुसार ईश्वर एक आहे. ईश्वराचे संपूर्ण पृथ्वीतलावर राज्य असले पाहिजे. संपूर्ण पृथ्वीवर एका ईश्वरावरच विश्वास ठेवणारे (अर्थात-मुसलमान) असले पाहिजेत म्हणून पृथ्वी वरील सर्वांना आस्तिक बनविण्या साठी व नास्तिकांना आस्तिक बनवणे हे इस्लामचे मुख्य कार्य असले पाहिजे. जगातील सर्व मुसलमान एकच होत ही इस्लामची भूमिका आज ठळकपणे दिसून येते.

इस्लाम ही एक श्रध्दा व्यवस्था आहे, जी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करते. इस्लामधर्म समजून घेताना प्रामुख्याने तीन मूलभूत गोष्टींचा प्रभाव दिसून येतो. अल्लाह-सर्वश्रेष्ठ ईश्वर, महंमद पैगंबर सर्वश्रेष्ठ व

अंतिम प्रेषित आणि कुराण ईश्वरीय धर्मग्रंथ यांच्या अध्ययनातूनच इस्लामची मूलभूत तत्वे साकार होतात.[46]

संपूर्ण सृष्टीचा ईश्वर एकच आहे, तोच निर्माता नियंता आहे. त्याच्या शिवाय अन्य कोणी ईश्वर नाही. ईश्वर एकच आहे ही इस्लामची भूमिका आहे. या एकेश्वरवादावर श्रध्दा ठेवणे हे मुस्लिमांचे पहिले व मूलभूत तत्व आहे. याची दुसरी बाजु अशी सांगता येईल की ईश्वर निर्गुण व निराकार आहे. तो कोणत्याही मूर्तीत असू शकत नाही. सबब मूर्ती पूजेला विरोध करणे हे इस्लामचे दुसरे उपतत्व आहे. मूर्तीपूजा करणे म्हणजे ईश्वराला दुय्यम मानणे अर्थात अल्लाहला प्रतिस्पर्धी निर्माण करणे होय. अर्थात अल्लाह शिवाय इस्लाम दुसरी देव-देवता मानीत नाही. त्यामुळे मूर्ती पूजेचा निषेध हे इस्लामचे मूलभूत तत्व होय.[47]

अल्लाह ने महंमदाला आपला प्रेषित म्हणून पाठवले आहे. महंमद हा अंतिम प्रेषित आहे. या वचनावर श्रध्दा असणे हे दुसरे मूलभूत तत्व होय.[48] तर कुराणावर श्रध्दा ठेवणे हे तिसरे मूलभूत तत्व आहे. कुराणा व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही धर्मग्रंथावर विश्वास ठेवणे, त्यातील धार्मिक विचारांचे अनुसरण करणे हे इस्लामला मान्य नाही.[49]

थोडक्यात असे म्हणता येईल की परमेश्वराला शरण जाणे, महंमदाला अंतिम प्रेषित मानणे, कुराणयुक्त मार्गाचा अवलंब करणे आणि त्या पध्दतीने आपले जीवन आचरण करणे ही इस्लामची पार्श्वभूमी होय.

अरबस्तानात इ. स. 570 साली महंमदाचा जन्म बद्दू जाती मध्ये (बद्दू ही भटकी जमात होती) झाला. अरबस्तानातील मक्का शहरात महंमदाचा जन्म झाला होता. प्रेषिताला तत्कालीन समाजातील मूर्ती पूजेचे स्तोम, बेबंदशाही, टोळी युध्दे, धर्माच्या नावावरील अनाचार, भूतप्रेताची उपासना या सर्व गोष्टीबद्दल अत्यंत चीड होती. प्रेषिताने ईश्वराचे खरेखुरे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला. वयाच्या 40 व्या वर्षी प्रेषिताला साक्षात्कार झाला. तू जे ऐकलेस ते इतरांना सांग असा दृष्टांत झाल्यानंतर महंमदास प्रेषित अवस्था प्राप्त झाली. त्यावेळी प्रेषिताने इस्लामची स्थापना केली. परंतु प्रेषिताचा संदेश अरबांना अमान्य होता. त्यामुळे मक्केहून प्रेषिताला मदीनेला स्थलांतर करावे लागले. माणिकलाल गुप्त लिहितात, ‘‘मुहम्मद की मक्का से मदीना तक की यह यात्रा हिज्र कहलाती है। इसी दिन से (मदीना में प्रवेश की तिथि) मुसलमानों का हिजरी सन प्रारंभ होता है। यही दिन इस्लाम धर्म की स्थापना का दिवस स्वीकार किया जाता है।’’[50] सेवादून लिहितो. ‘‘उनका मदीना पलायन जिसे हिज्र कहा जाता है, इस्लाम के विकास में परिवर्तन का केंद्र था क्योंकि इसी समय से उनका प्रचार प्रारम्भ हुआ था।’’[51] येथून इस्लामचा उदय झाला असे म्हणता येईल.

## 2.3.2 इस्लामची तत्वे :-

इस्लामची स्थापना हजरत महंमद पैगंबर यांनी इ. स. 610 साली सौदी अरेबियाच्या मक्का या शहरात केली. इस्लाम अथवा मुसलमान हा एक अब्राहमिक धर्म असून देवाच्या एकत्वावर या धर्माची श्रध्दा आहे. इस्लामचे पालन करणाऱ्या लोकांची संख्या आज सुमारे 150 कोटी आहे. व लोकसंख्येनुसार हा जगातील दुसरा सर्वात मोठा धर्म आहे. यातील 13 कोटी मुसलमान भारतात आहेत व भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मुस्लिम लोकसंख्येचा देश आहे. इस्लाम ही एक श्रध्दा व्यवस्था आहे, ती एक जीवनप्रणाली आहे. इस्लाम समजून घेताना पुढील काही गोष्टीचा विचार करावा लागतो.

**अल्ला -**

सर्वश्रेष्ठ ईश्वर अल्लाह हा इस्लामचा परमेश्वर होय. अल्ला इस्लाम धर्मीयांचे पहिले श्रध्दास्थान होय. अल्ला ही अलौकिक दिव्यशक्ती आहे. अल्लाह हा सर्व शक्तीमान, सर्वसार्वत्रिक व सर्वश्रेष्ठ असून तो एकमेवा-व्दितीय आहे. त्यानेच या विश्वाची निर्मिती केली आहे. तो या जगाचा निर्माता, नियंता व सर्वेसर्वा आहे. कुराणामध्ये अल्ला ची 99 विशेषणे सांगितली आहेत. विश्वनिर्माता (खालिक) कृपाळू (रहीम), पालनकर्ता (हाफिझ), क्षमाशील (गफूर) सर्वशक्तीमान (अजीज) रक्षणकर्ता (मोहायमिन) मार्गदर्शक (हादी) न्यायाधिश (हाकिम) ही अल्लाची काही विशेषणे होत. [52]

इस्लाम हा शब्द अरबी भाषेतील असून मूळ शब्द (अस् + अलम) असा आहे ज्यांचा शब्दशः अर्थ शरणागती पत्करणे व भावार्थ परमेश्वरा समोर शरणागती पत्करणे व त्या परमेश्वराला सर्व शक्तीमान म्हणून आराधना करणे.[53] इस्लामच्या अनुयायांनी इस्लामवर श्रध्दा ही ठेवलीच पाहीजे. त्यासाठी अनुयायांनी निर्गुण निराकार परमेश्वराची आराधना केली पाहिजे. त्याच्या आज्ञा पाळल्या पाहीजेत व अन्य कोणत्याही देवदेवतांची (अनेकेश्वरवाद) आराधना करू नये. थोडक्यात असे म्हणता येईल अल्ला हे मुस्लिमांचे एकमात्र आराध्य दैवत होय. अल्ला शिवाय इतर कोणत्याही देवाशी संबंध जोडू नये. फक्त अल्लाह ला सर्वांनी शरण गेले पाहिजे किंबहुना अल्लाला सर्वश्रेष्ठ मानून जो त्याला शरण जातो, तोच खरा मुस्लिम होय.

**महंमद पैगंबर सर्वश्रेष्ठ प्रेषित -**

मुस्लिमांची अशी श्रध्दा आहे की परमेश्वरा ने महंमद पैगंबरा करवी कुराण धरतीवर पाठविले. या कामी जिब्राईल या देवदूताने मदत केली. अशा रितीने कुराण व महंमद पैगंबराच्या चालीरिती इस्लामनुसार मूळप्रमाणे मानल्या जातात. तसेच इस्लाम हा नवा धर्म नसून प्रेषिताकरवी ईश्वराने प्राचीन काळी एकेश्वर धर्माचे पुनरूज्जीवन केले, अशी इस्लामची मान्यता आहे. इस्लामपूर्व एकेश्वरवादी अब्राहमिक धर्म जे आज यहुदी व ख्रिस्ती धर्माच्या

नावाने ओळखले जातात. त्यांनी परमेश्वराने पाठविलेल्या आज्ञाचा साक्षात्काराचा चूकीचा व सोईचा अर्थ लावून पूर्वीचे धर्मग्रंथ बदलेले असे मानतात व खऱ्या एकेश्वर धर्माची प्रेषिताकडून पुनरूत्थान झाल्याचे इस्लामचे साधक मानतात.[54]

इस्लाम धर्म संस्थापकाचा उल्लेख करताना महंमद पैगंबर इस्लामचे रसूल प्रेषित, प्रवर्तक म्हणून उल्लेख होतो. प्रेषितावरील श्रध्दा व निष्ठा इस्लामचे मूलतत्व होय. मानवाने आपली जीवन प्रणाली कशी स्वीकारावी याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी अल्ला प्रेषिताला या जगात पाठवितो. महंमद पैगंबर इस्लामचे सर्वश्रेष्ठ प्रेषित (रसूल) आहेत म्हणून प्रेषिताची आज्ञा म्हणजेच अल्लाची आज्ञा मानून जीवन व्यतीत करावे हे इस्लामचे आद्य कर्तव्य आहे.

**कुराण (ईश्वरीय धर्मग्रंथ) :-**

पवित्र कुराण अनेक नावाने ओळखले जाते. कुराणातील निरनिराळ्या भागाचे संकलन करण्याचे कार्य हजरत अबु बकर याच्या आज्ञेने करण्यात येऊन ते हजरत उस्मान याच्या कारकीर्दीत पूर्ण करण्यात आले. हे महत्वाचे कार्य झैद अब्दुल व अब्दुर रहिम या तज्ञांच्या नेतृत्वाखाली करण्यात येवून कुराणाची अधिकृत प्रत तयार झाली. तिला वेगवेगळ्या नावानी ओळखले जाते. अल्-किताब (2:2), अल्-फुरकान (25:1), अज्-झिक (15:9), अल्-हदीस (18:6), अल्-हुक्म (13:37), अल-हुदा (2:2), अल्-राहमत (17:82), अल्-खैर (3:103), अल्-बयान (3:137), अन्-नुरे (7:127), अल्-हक्क् (17:81), अल्-मुबारक (21:50) इत्यादी नावांनी हा ग्रंथ ओळखला जातो.[55]

कुराण हे 'कुराण-ए-शरीफ' या नावाने ही ओळखले जाते. कुराणाची भाषा अत्यंत प्रभावी आहे. कुराणातील प्रत्येक आयत म्हणजे एक चमत्कार आहे. म्हणून कुराणाच्या आयतास अरबी भाषेत चमत्काराचा निर्देश अशा अर्थाचा आयात हाच शब्द वापरतात. नवव्या सुरा खेरीज प्रत्येक सुराची सुरूवात 'कृपाळू' व 'दयावंत परमेश्वरा' च्या नावाने या अर्थाच्या शब्दाने होते. एक दोन सुरा सोडले तर बाकीचे सर्व सुरा महमंदाना किंवा लोकांना उद्देशुन परमेश्वर, भाषण करीत असल्या सारखे आहे.[56] कुराणात परमेश्वर स्वतःचा उल्लेख 'आम्ही' असा करतो. ईश्वराच्या वाणीचे भाषांतर करणे चूक आहे. या कारणासाठी कित्येक शतके कुराणाचे भाषांतर करण्यास प्रतिबंध होता.[57]

कुराण हा मुस्लिमांचा एकमेव पवित्र धर्मग्रंथ आहे. इ. स. 610 मध्ये आपल्याला दैवी दृष्टांत झाल्याचे प्रेषिताने सांगितले त्यावेळी प्रेषिताच्या मुखातून जी उस्फुर्त वचने निघाली ती कुराणात आहेत. कुराण हा प्रेषिताने

मानवी कल्याणासाठी दिलेल्या ईश्वरीय संदेशाचा व आदेशाचा संग्रह आहे.[58] कुराणातील वचने ही अल्लाची वचने आहेत. कुराणातील आज्ञा या अल्लाच्या आज्ञा आहेत आणि त्याचे पालन अपरिहार्य आहे. म्हणून यावर मुस्लिमांची विशेष श्रध्दा असते. म्हणून वेगळ्या अर्थाने कुराण हा आदेश ग्रंथ आहे. मूळ कुराण अरबी भाषेत आहे. ते एक गद्य काव्य असून त्यामध्ये 6226 आयत (श्लोक) आहेत. कुराणचा एक अर्थ मोठ्याने कथन करणे असा आहे. व्यक्ती, कुटुंब व समाज या सर्वांचे कल्याण कुराणाच्या मार्गानेच होते असा मुस्लिमांचा विश्वास आहे. त्यासाठी त्याच्या सामाजिक वर्तनात कुराणाचा सातत्याने विचार व उच्चार आढळतो.

### 2.3.3 इस्लामची प्रमुख तत्वे :-

इस्लाम मध्ये अनेक चालीरिती आहेत. इस्लामच्या अनुयायांना पाच मूलतत्वांचे पालन करावे लागते. या पाच तत्वांना पंच अकरान या नावाने ओळखले जाते. जी प्रमुख पाच मूलतत्वे आहेत, ज्यांनी संपूर्ण मुस्लिम समाजाला बांधलेले आहे. 'पंच अकरान' या शब्दाचा अर्थ पाच धार्मिक तत्वांवर आधारित कृत्ये असा आहे. पाच धार्मिक तत्वावर आधारलेल्या गोष्टींचा स्वीकार करून त्यानुसार आपले जीवन जगणे म्हणजे इस्लामचा स्वीकार करणे होय.

#### 2.3.3.1 तौहीद (एकेश्वरवाद) :-

ही इस्लामची सर्वोच्च विचार सरणी आहे, जिला प्रेषिताने घोषित केले आहे. इस्लाममध्ये अल्लाह त्रिभुवनाचा स्वामी आहे. त्याच्या इशाऱ्यावर दिवस-रात्र, चंद्र सूर्यासहित सर्व नक्षत्रे व वायुमंडळ नाचत असते. अल्लाह आपल्या भक्तांची सुख शांती कायम ठेवतो आणि त्याच्या जीवनाला सुख सुविधा प्रदान करतो. दीन दुबळ्याची मदत करणारा अत्यंत कृपाळु, उदार, क्षमाशील आणि संपूर्ण जगाचा अल्लाह निर्माता आहे. म्हणून त्याचीच उपासना केली पाहिजे, अन्य कोणाचीही नाही. इस्लाममध्ये मूर्तीपूजा अमान्य आहे. त्याबरोबर अनेकेश्वर वाद, तौहीद मूळे वर्ज्य मानला जातो. प्रेषिताने याचमुळे ईश्वर फक्त एक आणि एकच आहे असे सांगितले आहे. म्हणून प्रेषिताचे असे स्पष्ट कथन आहे, ईश्वर एक आहे आणि केवळ त्याचीच उपासना करावी. अल्लाह शिवाय इतर कोणाचीही उपासना करून नये म्हणून कुराणातील आयत 'लाइलल्ला इलइलह महंमद उर-रसुलल्लह' अर्थात अल्लाह शिवाय दुसरा ईश्वर नाही आणि महंमद हा त्याचा रसूल आहे. हे इस्लामचे आधारभूत वचन आहे.[59] अल्ला व प्रेषित या दोघांबद्दल मुसलमानांनी कृतज्ञ राहिले पाहीजे आणि इस्लामिक धर्म श्रध्देचा स्वीकार करावा अशी अपेक्षा यातून दिसते.

**2.3.3.2 नमाज :-**

दिवस व रात्र मिळून प्रत्येक मुसलमानांनी अल्लाची प्रार्थना पाच वेळा करणे आवश्यक मानले गेले आहे. या प्रार्थनांच्या वेळाही ठरलेल्या आहेत. फज्र (सूर्योदया पूर्वी), जुहर (दुपारनंतर) अस्त्र (सायंकाळी) मगरिब (सूर्यास्ताच्या वेळी) इशा (रात्रीचा पहिला प्रहर) अशा आहेत. याशिवाय ईद, बकरी ईद आणि संकटाच्या वेळी ही नमाज अदा करणेत येते. नमाज क्रिया शरीर, बुध्दी, आणि हदय या तिन्हीच्या एक मेळातून पूर्ण होत असते. कुराणातील आयतांचा जिभेच्या व्दारा उच्चार केला जातो. बुध्दीच्या माध्यमातून आयताचे चिंतन होते. आणि हृदयाकडून ईश्वराच्या प्रति भक्तिभाव व्यक्त केला जातो.[60] परमेश्वराचे जे उदात्त गुण आहेत त्याचाशी समरस व्हा या इस्लामी आदेशाची सतत जाणीव राहावी हा या पाठीमागील उद्देश आहे. एखाद्या मशीदीत, घरी किंवा उघड्या जागेवर नमाज अदा करता येते. प्रत्येक व्यक्तीने ती व्यक्ती स्त्री अगर पुरूष असो त्यांनी नमाज पढलेच पाहीजे अशा इस्लामची धर्माज्ञा आहे. एखाद्या व्यक्तीस पगार ठरवून त्यांने घरातील सर्व माणसांकरीता म्हणून केलेली प्रार्थना प्रेषिताने रद्द केली. लहानांपासून थोरांपर्यंत परमेश्वराची प्रार्थना स्वतः करण्याचा प्रघात प्रेषिताने पाडला आहे. त्याचप्रमाणे परमेश्वर प्राप्ती करीता कोणत्याही मध्यस्थाची जरुरी इस्लाम मध्ये लागत नाही. प्रत्येक व्यक्तीला सत्कृत्य करून ईश्वर प्राप्ती करून घेता येते. आठवड्यातून एकदा तरी शुक्रवारचा नमाज मशिदीत पढावा अशी एक श्रध्दा मुस्लिम धर्मीयांच्यात प्रचलित आहे. अल्लाची स्तुती त्याच्या कृपादृष्टीसाठी नमाज आवश्यक व महत्वाचा मानला जातो. प्रार्थना करताना कुराणातील ज्या ओळी म्हंटल्या जातात त्यातील काही ओळी खालीलप्रमाणे ''परमेश्वरा ज्यांच्यावर तुझा कृपा प्रसाद झाला आहे. अशांचा सन्मार्ग आम्हाला दाखव, वाममार्गाने जाणाऱ्यांचा किंवा ज्यांच्यावर तुझा कोप झाला आहे अशांचा मार्ग आम्हाला दाखवू नकोस.''

''परमेश्वरा आम्हाला इहलोकी व परलोकी भलेपणा व कृपा दे आणि आम्हाला नरकाग्नीच्या दुःखापासून मुक्त करून आमचे संरक्षण कर. हे अत्यंत दयाळू परमेश्वरा, तुझ्या दयेने व कृपेने मला व माझ्या आईबापांना क्षमा कर व त्यांच्यावर दया कर. त्यांनी बालपणापासून मला वाढविले आहे म्हणून त्यांच्या चांगूलपणाबद्दल त्यांना बक्षीस देऊन त्यांच्या चुकांची क्षमा कर.''[61]

ब्रम्हांडात मनुष्याची अपरिमित किंमत आहे त्या संदर्भात कुराण म्हणते, ''वह अल्लाह ही है जिसने समुद्र को तुम्हारे लिए वशीभूत कर दिया है ताकि उसके आदेश से नौकाएँ उसमें चलें, और ताकि तुम उसका उदार अनुग्रह तलाश करो और इसलिए कि तुम कृतज्ञता दिखाओ। जो चीजें आकाशों में है और धरती में है, उस (अल्लाह) ने उन सबको अपनी ओर से तुम्हारे काम में लगा रखा है।''[62]

नमाज पठण करताना कुराणाचाच आधार घेतला जातो. कुराणास ‘कलामे पाक’ असेही संबोधले जाते. कुराण अरबी भाषेत लिहिले आहे. कुराणातील विभागांना सुरा असे संबोधले जाते. सुरा याचा शब्दश:अर्थ ‘कुंपणाने घेरलेली जागा’ असा होतो. कुराणाची रचना एकूण 114 सुरांमध्ये मांडण्यात आली आहे. एका सुरेमधील प्रत्येक ओळीस आयात असे म्हणतात. याचा शब्दश: अर्थ चिन्ह असा होतो. कुराणामध्ये एकूण 6236 आयते आहेत, तर शब्दांची संख्या 77934 व अक्षरांची संख्या 323621 आहे.[63]

**रोजा (उपवास) :-**

रमजान हा इस्लामचा पवित्र महिना मानला जातो. हा संपूर्ण महिना रोजा करण्याचा असून रोजा सूर्योदयापासून सुरू होतो व सूर्यास्ताच्या वेळी संपतो. या काळात अन्न, पाणी वर्ज्य असून प्रत्येक व्यक्तीने व्रतस्थ जीवन जगावे अशी इस्लामची शिकवण आहे. रोजाची संकल्पना इस्लाममध्ये स्पष्ट आहे. रोजाचा मुख्य हेतु म्हणजे चित्तशुध्दी होय. माणसाने षड्रिपुच्या आहारी जावू नये एवढ्यासाठी रोजा केला जातो. या रोजाच्या काळात कोणाचेही मन दुखावू नये, कुणाचे ही नुकसान करू नये, मनात वाईट विचार आणू नये वगैरे अटी उपवास करताना पाळाव्या लागतात. आजारी लोक, प्रवासी, लहान मुले, यांनी रोजा केलाच पाहिजे अशी अट नाही. या उपवासाच्या काळात हातांनी अन्यायी काम करून नये. अपवित्र वस्तूंना हात लावू नये, कुराणाला स्पर्श करावा हा हाताचा रोजा होय. वाईट ठिकाणी न जाणे हा पायाचा रोजा होय. तर वाईट नजरेने न पाहणे हा डोळ्याचा रोजा होय. थोडक्यात रोजाच्या माध्यमातून शरीर व मन यांचे शुध्दीकरण व्हावे. तसेच व्यक्तीमध्ये त्याग प्रवृत्ती व सहनशीलता निर्माण व्हावी ही त्याच्या पाठीमागील संकल्पना आहे. मराठी विश्वकोश खंड 2 मध्ये रमजान महिन्यातील रोजा बाबत माहिती देताना असे म्हंटले आहे. ‘रमजानच्या महिन्यात उपवास केले जातात याचे मुख्य कारण याच महिन्यात कुराण धरतीवर प्रगट झाले म्हणूनच या पवित्र महिन्यात उपवास केले जातात.’[64]

**2.3.3.3 जकात (दानधर्म) :-**

जकात या शब्दाचा अर्थ दानधर्म करणे असा आहे. प्रत्येक मुसलमानांने आपल्या उत्पन्नाचा अडीच टक्के भाग गोरगरिबांना तसेच गरजूंना दानधर्म म्हणून देण्यावर इस्लामने भर दिला आहे. ज्याच्या जवळ संपत्ती आहे त्या लोकांनी दानधर्म केलाच पाहिजे अशी इस्लामची स्पष्ट आज्ञा आहे. आपली संपत्ती केवळ स्वत:साठी नाही तर समाजासाठी आहे असे मुसलमानांनी मानले पाहिजे. आपल्या मिळकतीत अनाथ मुले, विधवा, गरजू व अपंग यांचाही हिस्सा आहे. याची जाणीव राहावी या साठी हे महत्वाचे तत्व इस्लाम मध्ये आहे. ‘ॠणमुक्तीचा तसेच समाज कल्याणाचा धर्मसंमत कृतीशील मार्ग म्हणजेच जकात होय.’[65]

### 2.3.3.4 हज :-

हज म्हणजे मक्केची यात्रा होय. जगातील सर्व मुसलमानांनी एकत्र जमावे व सर्व लोकांना विश्वबंधुत्वाची जाणीव व्हावी एवढ्या करिताच हा यात्रा विधी प्रत्येकाने पार पाडावयाचा असतो. इस्लाम चे प्रेषित महंमद पैगंबर याचे जन्मस्थान मक्का हे इस्लामचे पवित्र तीर्थक्षेत्र मानले गेले असून याच ठिकाणी इस्लामची स्थापना झाली म्हणून या ठिकाणाला आयुष्यात एकदा तरी भेट द्यावी अशी इस्लामची अपेक्षा आहे.[66] हज (यात्रा) ला जाणाऱ्या व्यक्तीला काही अटींचे पालन करावे लागते.

1. त्या व्यक्तीने आपले कर्ज फेडून टाकले पाहिजे आणि यात्रेच्या काळात त्याने आपल्या मुलाबाळांची व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांची तरतुद करून ठेवली पाहिजे.
2. प्रवासास आवश्यक असणाऱ्या वाहनांची आणि अन्नपाण्याची व्यवस्था करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असले पाहिजे.
3. प्रवासाच्या शक्याशक्यतेचा त्याने विचार केला पाहिजे.
4. त्याने आपल्या शत्रुंना मोकळ्या अंतःकरणाने क्षमा केली पाहिजे.
5. त्याने एखादा गुन्हा केला असेल तर तो कबुल केला पाहिजे व त्या व्यक्तीशी त्याने मैत्री केली पाहिजे. या सगळ्या अटी पाळील त्यालाच मक्केची यात्रा करण्याचा अधिकार आहे.[67]

वरील पाच तत्वांचे काटेकोरपणे पालन करणे आणि त्यानुसार आपल्या जीवनाचा विचार करणे व जीवनाचा मार्ग आखणे हे इस्लामचे मूलभूत तत्व आहे. यातूनच मुसलमान आपल्या जगण्याची शैली ठरवितो व आपला जीवन प्रवास त्या मार्गाने करतो. थोडक्यात या पाच तत्वांचा जो काळजीपूर्वक स्वीकार करतो तोच खरा मुसलमान होय अशी इस्लामची श्रध्दा, संकल्पना व अपेक्षा असते. काबा म्हणजे घर जे परमेश्वराच्या भक्तीचे केंद्र व शांती स्थान आहे. त्याच्या दर्शनासाठी प्रत्येक मुसलमान हज यात्रा करतो. हज यात्रेमध्ये आलेले मुसलमान खालील ओळी एका आवाजात तन्मय होऊन म्हणतात. ‘‘मेरे अल्लाह ! मैं हाजिर हूँ। तेरा कोई शरीक नहीं, मैं हाजिर हूँ। सारी तआरीफ, और नेअमतें तेरे लिए जेबा हैं। हुकुमत और बादशाही भी हैं, तेरा कोई शरीक नहीं।’’[68]

### 2.3.3.5 शरिअत :-

शरिअत या शब्दाचा अर्थ इस्लामी कायदा होय. त्यालाच ‘इस्लामी नागरी कायदा’ असे ही म्हणतात. इस्लामी जगावर शरियतचाच अंमल चालतो. इस्लाम धर्मीयांवर शरियतचा प्रभाव असून धर्मविषयक आदेश शरियतमध्ये आढळतात. कोणती कामे करावीत व कोणती करू नयेत यावर शरियामध्ये आदेश आढळतात.

जोसेफ स्कॅच शरियाबद्दल असे लिहितात "It is impossiable to understand Islam without understanding Islamic law"[69] अर्थात इस्लामला समजणे इस्लामिक कायद्याच्या म्हणजेच शरियतच्या अभ्यासाशिवाय शक्य नाही.

इस्लाम ही एक परिपूर्ण जीवन व्यवस्था आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अल्लाह व त्याचे प्रेषित मुहंमद यांचे परिपूर्ण आज्ञापालन म्हणजे इस्लाम होय. अल्लाहने अवतीर्ण केलेले मार्गदर्शन (कुरआन) आणि प्रेषित महंमद यांनी त्यानुसार केलेले आचरण व शिकवण (हदीस आणि सुन्नत) या दोहोंच्या आधारे शरियत अस्तित्वात येते.[70] 'हादीस' म्हणजे पैगंबराची बोध वचने. इस्लामच्या प्रेषिताच्या जीवनातील घटनांचे सविस्तर विवरण हदीस मध्ये सापडते. तर प्रेषिताची शिकवण ही 'सून्नत' मध्ये संग्रहित केली जाते. इस्लामी धर्मशास्त्राची सुरूवात कुराणाचे विश्लेषण तसेच पैगंबरांच्या आठवणी आणि आख्यायिका यांचा संग्रह करण्याच्या कार्यापासून होते. कुराण, हदीस आणि श्रेष्ठ कायदातज्ञ यांच्या एकवाक्यतेवर बऱ्याच प्रश्नाचा निर्णय लागत असे. परंतु काही वेळा प्रश्न गुंतागुंतीचे असल्यामुळे निर्णय देण्यास अडचणी येवू लागल्या. त्यातून इमाम शाफी ने असा मार्ग काढला की पूर्वीच्या सर्वमान्य निर्णय घेण्यात आलेल्या प्रश्नांशी गुंतागुंतीच्या किंवा नवीनच उद्‌भवलेल्या प्रश्नांचे काही बाबतीत जर साम्य आढळले तर या समानतेच्या आधारावर तारतम्याने निर्णय घ्यावे. तसेच अरबस्तानच्या बाहेर ठिकठिकाणी पूर्वीपासून चालत आलेल्या चालीरितींना धरून निर्णय घेण्याच्या बाबतीत मुस्लिम धर्म पंडितात एकवाक्यता झाली आणि इस्लामी कायदा किंवा शरियत प्रगत झाला. अल् बुखारी, इमाम मुस्लिम, अबु इसा तिरमिझीं, अबु दाऊद, अबु अबदुर रहिमान आणि अबु अब्दुल्ला इब्न माजा या सहा मुस्लिम विद्वानांची संपादित वचने अधिकृत मानली जातात तसेच इमाम शाफी, इब्त हंबल, इमाम मलिक यांचे संकलन ही त्याच योग्यतेचे मानले जाते.[71]

थोडक्यात शरियतच्या माध्यमातून इस्लामच्या चार वेगवेगळ्या शाखा सुरू झाल्या. (हनफी, मालिकी, शाफी आणि हनबाली त्याचे प्रवर्तक क्रमशः अबू हनीफा, मलिक अब्न अनास, मुहंमद शाफी, इब्न हनबाल हे आहेत. हनफी शाखेचे अनुयायी तुर्कस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि हिंदुस्तानात आहेत. मालिकी शाखा अरबस्तानाचा काही भाग व उत्तर आफ्रिकी खंडात आहेत. दक्षिण अरबस्तान, पूर्व आफ्रिका, मलेशिया, इंडोनेशिया आणि भारताचा पश्चिम किनारा भागातील मुसलमान शाफी शाखेचे आहेत. हनबाली शाखेचे अनुयायी फक्त मध्य अरबस्तानात आढळतात.[72]

### 2.3.3.6 शरियतचे उगमस्थान :-

शरियतचे चार प्रमुख स्त्रोत मानले जातात.

1. कुराण
2. सुन्ना
3. इजमा
4. कियास

### 2.3.3.7 कुराण :-

कुराण या शब्दाची उत्पत्ती कुर आन या अरबी शब्दापासून झाली असून त्याचा शब्दशः अर्थ वाचणे असा होतो. कुराण हा शब्द प्रत्यक्ष कुराणामध्ये उल्लेख असून जवळपास 70 वेळा हा शब्द कुराणात वापरला आहे. ज्याप्रमाणे हिंदू धर्म वेद व उपनिषदावर आधारित आहे. ख्रिस्ती धर्म बायबल वर आधारित आहे. त्याच पध्दतीने इस्लाम कुराणावर आधारित आहे. कुराण इस्लाम धर्मीयाचा पवित्र आणि अध्यात्मीक धर्मग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये जवळपास 6 हजार आयता आहेत. ज्यातील केवळ 80 आयता शरियतशी संबंधित आहेत.[73] डॉ. राधाकृष्णन लिहितात "मुसलमानों के लिए यह फरिश्ता जिब्राईल और नबी महंमद के युग्म, (दोन किंवा दोहोंच्या माध्यमातून) अभिकरण व्दारा ईश्वर की शाश्वत वाणी का इल्हाम है।" म्हणजेच जिब्राईल देवदूत आणि प्रेषित महंमद यांच्या माध्यमातून पृथ्वीवर अवतरलले हे दिव्य ज्ञान आहे.[74]

**कुराणाचा काळ :-**

कुराण हे सुमारे 22 वर्षे 5 महिने या कालावधीत अवतरीत झालेले आहे. इ. स. 610 साली प्रेषिताला ईश्वरी साक्षात्कार झाला. त्या काळापासून प्रेषिताच्या मृत्युपर्यंतचा (इ.स. 632) हा कालावधी आहे. कुराणाचे एकंदर 30 भाग (जूज) असून ते 114 प्रकरणात (सुरा) विभागले आहेत. या भागांचे लेखन प्रेषिताच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. पवित्र कुराणामधील निरनिराळ्या भागांचे संकलन करण्याचे कार्य अबु बकर यांच्या कारकिर्दीत सुरू होवून हजरत उस्मान यांच्या कारकिर्दीत पूर्ण करण्यात आले. हे महत्वाचे कार्य झैद, अब्दुला आणि अब्दुल रहिम या तिघांनी मिळून केले आणि कुराणाची अधिकृत प्रत तयार करण्यात आली. कुराणामध्ये नुसत्याच धार्मिक गोष्टींचा समावेश नाही तर त्यामध्ये ऐहिक गोष्टी ही सांगितल्या आहेत. कुराण म्हणजे धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि राजकीय संहिता होय. मनुष्याला मार्गदर्शक होतील अशा अनेक गोष्टींचा त्यामध्ये

अंतर्भाव आहे. अल-बक्र, अन-निसा, उल्-इमरान, अल्-मयदा, अनु-नूर, बनी ईस्त्राईल या भागामध्ये मुस्लिम कायद्याची रूपरेषा आपणास दिसून येते.[75]

महंमद हिदायतुल्ला लिहितात ''मुसलमानों के लिये - कुराण अल्-फरगन अर्थात असत्य से सत्य को और गलत से सही कों साबित करने का एक ताबीज है। अतः उनके लिए कुराण एक ब्रह्मवाक्य है। मुस्लिम धर्म को माननेवालों की धारणा है की अल्लाह का प्रत्येक शब्द ही कानून है, और उनका पालन करना अल्लाह का हुक्म है।''[76] थोडक्यात असे म्हणता येईल की कुराण खरे खोटे व चुक बरोबर यातील फरक स्पष्ट करणारा एक ताईत आहे. इस्लाम धर्मीयांसाठी कुराण ब्रह्मवाक्य आहे. ईश्वराचा प्रत्येक शब्द कायदा आहे आणि त्याचे पालन करणे हे मुस्लिमांचे कर्तव्य आहे. कुराण स्वतःची भूमिका स्पष्ट करताना असे म्हणते हे परमेश्वरी सत्य आहे. ज्याला विश्वास ठेवायचा असेल त्याला ठेवू दे ज्याला नसेल त्याला न ठेवू दे.[77]

कुराण मध्ये दोन भाग आहेत त्यातील एक भाग मक्के मध्ये पूर्ण झाला. ज्यामध्ये प्रेषितांचे जीवन विषयक तत्वज्ञान आणि धर्म संबंधित विचार आहे. तर मदिनेतील झालेल्या रचनेमध्ये इस्लाम विषयक कायदे, विवाह, घटस्फोट, हुंडा आणि काही धर्म विषयक गोष्टींचा समावेश आहे. शरिया प्रामुख्याने स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर भाष्य करते. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''इस्लामी नागरी कायदा अजून अनेक देशात अस्तित्वात आहे. स्त्रियांनी गोषा वापरावा आणि डोक्यापासून पायापर्यंत शरीर झाकून घ्यावे असे धर्मशास्त्रात विहित नाही. तथापि गोषा पध्दती फक्त भारत, पाकिस्तान नव्हे तर संपूर्ण जगभर शतकानुशतके अस्तित्वात आहे. गेल्या 30-40 वर्षात गोषा पध्दती कमी होत चालली आहे. इस्लामी नागरी कायद्यामूळे मुस्लिम स्त्रिया समान हक्कांपासून वंचित झाल्या आहेत. बहुपत्नीकत्वाची चाल अद्यापी अस्तित्वात आहे. परंतु बहुसंख्य मुस्लिम राष्ट्रातून बालविवाह व बहुपत्नीक पध्दती नाहीशी करण्यासाठी अनेक सुधारणा केल्या गेल्या आहेत. पश्चिम आशियाई देशातून एकतर्फी घटस्फोट देण्याच्या नवऱ्याच्या हक्कावर अनेक मर्यादा आल्या आहेत.[78]

### 2.3.3.8 सुन्ना (हादीस) :-

'सुन्ना' या शब्दाचा अर्थ आहे परंपरागत व सरधोपट मार्ग ज्याचा संबंध परंपरा आणि चालीरितीशी आहे. सुरूवातीला यांचा अर्थ सामान्य रितीरिवाज असा होता परंतु नंतर हा शब्द प्रेषितव्दारा स्थापित विशेष परंपरा व चालीरितीशी जोडला गेला. कुराणामध्ये ज्या सिध्दांताचा उल्लेख होता आणि प्रेषिताच्याव्दारे ज्या गोष्टी आचरणात आणल्या गेल्या त्यालाच पुढे हदीस संबोधले जावू लागले. हादीस म्हणजे प्रेषिताची संकलित केलेली बोधवचने होत. जनतेला मार्गदर्शन करण्याकरीता प्रेषिताने जो उपदेश केला व जी बोधवचने सांगितली त्याचे संकलन हादीस

मध्ये केले आहे. हे संकलन कार्य पहिल्या चार खलिफांच्या कारकिर्दीमध्ये अत्यंत परिश्रमपूर्वक करण्यास आले. प्रेषिताच्या जीवन विषयक आठवणीचे व आख्यायिकांचे संग्रह सहा वेगवेगळ्या सुन्नी पंडितानी तयार केले. त्यामध्ये अल्-बुखारी, इमाम मुस्लिम, अबू इसा तिरमिझी, अबू दाऊद, अबू अब्दुल रहिमान, अबु अब्दुला इब्न माजा याचा समावेश होतो. याखेरीज इमाम शाफी, इब्ने हंबल, इमाम मालिक यांचे संकलन अधिकृत मानले जाते. हे संग्रह धर्मशास्त्र व कायदा दोन्हीसाठी फार मोलाचे ठरले. शिया व इतर पंथाच्या वेगवेगळ्या हादीस असतात. [79]

शिया आणि सुन्नी यांच्यात मुख्य भेद हा आहे की शिया पंथीय अशा गोष्टीवर विश्वास ठेवत नाही ज्याचा संबंध प्रेषित किंवा त्याचा जावई अलीशी नाही. तर सुन्नी पंथ अबु बक्र व इतर खलिफांना ज्यामध्ये अबुबक्र, उमर, उस्मान व अली यांना पहिले चार खलिफा मानतात तर शिया पंथीय अली खेरीज इतर खलिफांना मानत नाहीत. मुसलमानांचा असा विश्वास आहे की ईश्वराची वाणी हाच कायदा आहे आणि या कायद्याचे पालन करणे, परमेश्वराची आज्ञा आहे म्हणून या परमेश्वरी कायद्याला शरियत असे संबोधले जाते.

मदिनेच्या दहा वर्षाच्या कारकिर्दीत प्रेषित सत्ताधिश होते. राज्यकर्ता या नात्याने प्रेषितांनी अनेक कायदे केले आणि त्यांची अंमलबजावणी ही केली. प्रेषितांनी केलेल्या निवाड्यांमूळे प्रत्येक शासकीय निर्णयाला धार्मिक निर्णयाचे महत्व प्राप्त झाले. प्रेषिताच्या मृत्युनंतर त्याचे वारसदार किंवा खलिफा हे सुध्दा एकाचवेळी धर्मप्रमुख आणि शासनप्रमुख म्हणून काम करत होते. त्यामुळे शासकीय कार्यप्रणाली व शासकीय निवाड्यांना धर्मशास्त्रात महत्वाचे स्थान मिळाले. इस्लामच्या तत्वज्ञाना प्रमाणे हे सर्व निर्णय परमेश्वरी आज्ञा व मार्गदर्शन यानुसार होते. राज्यविस्तार झाल्यानंतर प्रेषितांना प्रत्येक ठिकाणी जावून मार्गदर्शन करता येत नव्हते त्यामुळे काझींच्या नेमणुका होवू लागल्या. शासनकर्त्या प्रमाणे काझी स्थानिक धर्मप्रमुख झाले आणि दैनंदिन न्यायनिवाडा करू लागले. परंतु हे काम कुराणाच्या मार्गदर्शना प्रमाणे जवळपास अशक्य होते. कारण कुराणात सर्वसाधारण मार्गदर्शन होते. प्रत्येक नव्या प्रश्नाचा निवाडा देण्यासाठी दुसऱ्या परंतु तितक्याच महत्वाच्या मार्गदर्शनाची जरूरी होती. म्हणून प्रेषितांनी वेळोवेळी ज्या ज्या गोष्टी केल्या, जी मते व्यक्त केली त्याच्या आधारे निवाडे देण्याची प्रथा व पध्दती सुरू झाली म्हणून इस्लामी न्यायशास्त्रात हादीसचे महत्व आहे. [80]

### 2.3.3.9. इजमा (सर्वांचे एकमत) :-

इजमा म्हणजे मतऐक्य शब्दाला शरियतमध्ये 'उलमा' किंवा 'उम्म' या नावानेही ओळखले जाते. [81] त्याचा अर्थ सर्वसंमत आज्ञा, धर्मज्ञान्यांच्या परिषदेचे सामुदायिक मत. इजमा म्हणजे असे नियम जे कुराण आणि सुन्ना यांच्या विरोधी मत प्रदर्शन न करता भिन्न भिन्न विद्वानांनी आणि कायदेतज्ञांनी निर्माण केलेले नियम होत. बऱ्याचदा अशा काही वैयक्तिक गोष्टी समोर आल्या ज्याबद्दल कुराण किंवा हादीस मध्ये त्याची उत्तरे मिळत

नाहीत. कदाचित त्या काळात असे प्रश्न उद्‌भवलेही नसतील अशा प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी इजमाचे नियम बनविले गेले. परंतु या संदर्भात एक बाब अत्यंत महत्वपूर्ण आहे ती अशी, हादीस मध्ये सांगितले गेले आहे. "खुदा अपने बंदों को किसी गलत कार्य अथवा बुराई पर सहमत नहीं होने देता।"[82] अर्थात परमेश्वर आपल्या भक्तांना चुकीचे काम किंवा वाईट वागणूक याबद्दल एकत्र मतप्रदर्शन करू देत नाही. म्हणजेच एखादी गोष्ट चुकीची वा वाईट असेल तर तिचे समर्थन करू देत नाही. या दृष्टीने पाहिले तर इस्लामचे विद्वान आणि कायदे तज्ञांच्या व्दारा बनविलेले नियम ईश्वरीय नियमाची बरोबरी करतात. अशा प्रकारे इजमा मुस्लिम कायद्याचा एक प्रमुख आधार बनला. 'सुन्नी मुसलमानांच्यात इजमाच्या नियमाला पूर्ण मान्यता आहे. आपण असे म्हणू शकतो की कुराण आणि हादीस मधील नियम इजमा शिवाय पूर्ण होवू शकत नाहीत.'[83]

इस्लामी कायदेपंडीतांनी विशिष्ट प्रश्नामध्ये निवाडा देण्यासाठी स्थानिक काझींना मार्गदर्शन केले. त्यांच्या मध्ये कोणत्याही मुद्यावर एकमत (इजमा) झाले तर त्या निवाड्याला आधारभूत मानण्यात येई. परंतु हे कायदेपंडीत एकत्र बसून निर्णय घेत नसत. कोणीतरी श्रेष्ठ व्यक्ती आपला निर्णय देत असत. त्यानुसार इतर कायदेपंडीत तशाच प्रकारे न्याय निवाडा देत असत. त्यानंतर इतर कायदेपंडीतांनी अशाच प्रकारचा निवाडा देण्यास सुरूवात केली की या निवाड्याला अधिकृत स्वरूप येत असे. थोडक्यात इजमा याचा अर्थ मतऐक्य असा होतो. माझ्या अनुयायांचे चुकीच्या मार्गावर कधीही एकमत होणार नाही. आपल्या अनुयायांचे ज्या गोष्टीवर एकमत होईल तिच गोष्ट योग्य समजावी हाच अर्थ प्रेषिताच्या वरील वाक्यावरून निघत असल्यामुळे मतेक्यास किंवा इजमाच्या तत्वास इस्लाममध्ये फार मोठे स्थान आहे. या तत्वामुळे निरनिराळ्या काळास पोषक होणारी मतप्रणाली व कायदे यांना इस्लाम धर्मात स्थान आहे. नव्या परिस्थितीस सुसंगत जीवन जगण्यासाठी इस्लाम धर्मीयांना या तत्वाने मार्ग खुला करून दिला आहे.

इजमाच्या आधारावर बनविलेल्या नियमांना सुन्नी पंथीय पूर्णपणे मानतात, परंतु शिया पंथीयां मध्ये याला भिन्न-भिन्न पध्दतीने मान्यता आहे. परंतु या गोष्टीवर शिया पंथीयाचे असे एकमत आहे की जिथे स्पष्ट एकमत आहे तिथे कुणीही असहमत असणार नाही. याचा साधा अर्थ असा आहे की इजमाच्या माध्यमातून प्रस्थापित नियम कोणत्याही परिस्थितीत तोडले जाणार नाहीत. हनफी शाखेचे अनुयायी इजमाला मुस्लिम कायद्याचे मुख्य उगमस्थान मानतात परंतु शाफी शाखेतील मुस्लिमांच्या दृष्टीने इजमा अधिक महत्वपूर्ण नाही.[84]

डॉ. जमील अली जाफरी यांच्या मते "कुल मिलाकर कहा जा सकता है की इजमा महान विद्वानों एवं कानून दोनों व्दारा बताया गया एक विशिष्ठ सांप्रदायिक विधान है।"[85] आपणास असे म्हणता येईल की इजमा इस्लामी विद्वान व कायदेतज्ञाच्या व्दारे बनविलेले विशिष्ट साम्प्रदायिक नियम आहे.

इजमाचे स्वरूप वेळोवेळी बदलत गेले. इजमाचे प्राथमिक रूप 'इजतिहाद' नावाने ओळखले जाई. 'इजतिहाद' या शब्दाचा अर्थ वैयक्तिक प्रयत्न असा आहे. वेळोवेळी वैयक्तिक आणि समाजहितासाठी बदलणाऱ्या परिस्थितीच्या आणि जरूरीच्या कारणासाठी नवीन नियम व नवीन कायद्याची आवश्यकता भासू लागली. त्यासाठी इस्लामी धर्मपंडीतांकडून व इस्लामी विचारवंताकडून जे प्रयत्न केले गेले त्याला इजतिहाद असे म्हंटले जाते.[86] परंतु पुढे सर्वच इजतिहाद मान्य झाले नाहीत. त्यातही काही मतभेद झाले त्यास 'इखतिलाफ' असे म्हंटले जाते.[87]

काळाच्या ओघात वैयक्तिक चिंतनावर आणि विचारांवर प्रतिबंध लागू झाले. ज्यामुळे इस्लामचे स्वरूप कट्टरते कडे झुकले आणि केवळ प्रेषित आणि तत्कालीन धार्मिक विद्वानांच्या एकमतांनी बनविले गेलेले नियम अर्थात इजमाचीच मान्यता पुढे चालू राहीली.

इस्लामी विद्वान सय्यद आमीन लिहितात, 'इजमा हे मुस्लिम कायद्याच्या (शरियत) उगमस्थानापैकी एक उगमस्थान असून त्या कायद्याच्या उत्क्रांतीवादाची ती किल्ली आहे. हे आपण विसरता कामा नये. इस्लामी कायद्याचे स्थितीस्थापकत्व टिकवून त्याच्या विकासास वाव देणारे व त्यास सदैव ताजातवाना ठेवणारे तत्व म्हणजे इजमा होय.'[88]

थोडक्यात असे म्हणता येईल की इजमा म्हणजे एकमत ज्या प्रश्नांची उत्तरे कुराण किंवा हादीस मध्ये मिळत नाहीत. त्या प्रश्नासंबंधीचे वर्तमानकाळास अनुसरून केलेले चिंतन आणि नियम यांना इजमा असे संबोधले जाते. इस्लामच्या शरियत प्रणालीतील हे तिसरे उगमस्थान होय आणि यातूनच शरियतचा कायदा अधिक बळकट झाला.

### 2.3.3.10. कियास (अनुमान) :-

'कियास' यांचा अर्थ अनुमान सिध्दांत होय. एखाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष उल्लेख कुराण किंवा हादीसमध्ये आढळला नाही तर त्याच नमुन्याचे कुराण किंवा हादीस मध्ये आढळणाऱ्या गोष्टी पासून अनुमान काढणे यास कियास म्हणता येईल. कियास शरियतचे अंतिम उगमस्थान होय. उपरोक्त तिन्हीही उगमस्थाने कुराण, सुन्ना (हादीस) आणि इजमा यांच्या तुलनेत कियासला अधिक महत्व नाही. कियासचा शाब्दिक अर्थ तर्काच्या आधारावर

अनुमान काढणे. कियासचा आधार ही हादीस मध्येच सापडतो. उदा. दारू ही नशा आणणारी वस्तु आहे. म्हणून ती निषिध्द आहे, असा कुराणात आदेश आहे. त्यावरून नशा आणणाऱ्या जितक्या वस्तू आहेत. उदा. भांग, धोतरा, गांजा या सर्व वस्तू (कुराणात वा हादीसमध्ये यांचा संदर्भ दिलेला नाही) निषिध्द आहेत असे अनुमान आपल्याला कियास या तत्वाने काढता येते.

हादीसमध्ये एक कथा आहे. एकदा प्रेषिताने यमनच्या मुख्य न्यायाधिशाला एक प्रश्न विचारला, न्यायदानाचे कार्य करताना निर्णयासाठी तू कशाचा आधार घेशील? यावेळी न्यायाधिशाने उत्तर दिले, पवित्र कुराणाच्या आधाराने मी न्याय देईन. प्रेषिताने पुन्हा प्रश्न केला की सदर प्रसंगी कसे वागावे यांचा कुराणात आदेश किंवा उल्लेख नसेल तर त्यावेळी न्यायाधीश म्हणाला तेव्हा मी हादीसच्या आधाराने यांचा निर्णय देईन. प्रेषिताने पुन्हा प्रश्न केला तर हादीसमध्ये ही तसा उल्लेख नसेल तर ? मुख्य न्यायाधिशाने उत्तर दिले तेव्हा मी तर्क किंवा अनुमान सिध्दांत यांचा वापर करून न्यायदानाचे कार्य पूर्ण करेन.[89] या उत्तराबद्दल प्रेषिताने समाधान व्यक्त केले. इस्लाममध्ये अनुमान सिध्दांताला खूप वाव आहे हे यावरून स्पष्ट होते.

अशाप्रकारे तर्कबुध्दीच्या सहाय्याने घेतलेले निर्णय ही शरियतचे उगमस्थान आहे. वास्तविक पाहता कियास या शब्दाचा अर्थ नवीन नियमांचे निर्माण कार्य नसून वस्तुस्थितीच्या समानतेच्या आधारावर तर्कबुध्दीच्या सहाय्याने घेतलेले निर्णय होत. कियास वास्तविक पाहता इजतिहाद (वैयक्तिक प्रयत्न) एक स्वरूप आहे. सुन्नी पंथीयांची याला मान्यता आहे. पण शिया पंथीय याला विरोध करतात कारण शिया पंथीयाचे म्हणणे आहे की एखाद्या नियमाच्या मूल्यमापनाची आणि विस्ताराची जेव्हा प्रक्रिया सुरू होते तेव्हा ते कार्य एखाद्या इमामाच्या व्दारा ही झाले पाहिजे.

थोडक्यात कुराण, हादीस आणि इजमा या तीन कसोट्यावर बऱ्याच प्रश्नांबाबत निर्णय घेता येते असे. तरीसुध्दा काही पंडीतांनी सारासार विवेकबुध्दीने स्वतःच योग्य तो निर्णय घेण्यास सुरूवात केली.

### 2.3.3.11. फतवा (हुकूम) :-

इस्लामी धर्मपंडीत मुफ्ती आणि इस्लामी न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या व्दारे दिले गेलेले निर्णय हे 'फतवा' नावाने ओळखले जातात. हे फतवे मुस्लिम कायद्याच्या सिध्दांताला मदत करतात. फतवे काढण्यासाठी मुफ्ती किंवा न्यायाधिश हे कुराण, हादीस किंवा इजमा याचाच अभ्यास करतात. फतवा म्हणजे कृतीत उतरवलेला शरिया. मुस्लिम समाजाच्या सर्व घरांमधील व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य, रोजच्या आयुष्यातले वर्तन एवढेच नव्हे तर त्यांची संपूर्ण मानसिकताच उलेमांच्या ताब्यात राहते, ती या फतव्याच्या मदतीने. उलेमांना समाजात जी मानसिकता जोपासायची, रूजवायची असेल, त्या मानसिकतेच्या रोखानेच हे सर्व फतवे काढले गेलेले दिसतात. प्रथम प्रश्न

आणि मग निवाडा फतव्यांच्या या कार्यपध्दतीमुळे फतवे हे इस्लामी समाजमत पारखण्याचं उत्कृष्ट भिंग बनतात. तसेच त्या समाजाच्या काळज्या, चिंता, समाजमनात पक्या बिंबवल्या गेलेल्या कल्पना अतिशय स्पष्टपणे दाखवणारा आरसाही बनतात.

इस्लाम धर्मीयांमध्ये प्रमुख पाच फतव्याचे संकलन विशेष महत्वपूर्ण मानले जातात -

1. फतवा-इ-रिझविया खंड 1 ते 12
2. किफात-उल्-मुफ्ती-मुफ्ती किफायतुल्ला के फतावी खंड 1 ते 9
3. फतवा-इ-उलेमा दर अल्-उलुम, देवबंद खंड 1 ते 12
4. फतवा-इ-अहल-इ-हादीस खंड 1 ते 4
5. फतवा-इ-रहमिया खंड 1 ते 3

बहुसंख्य भारतीय मुसलमान हे सुन्नी आहे. काहीच्या मते 85 ते 90 % सुन्नी मुस्लिम आहेत. बहुसंख्य भारतीय सुन्नी बरेलवी आहेत. बरेलवी मुस्लिमांच्या दृष्टीकोनातून 'फतवा-इ-रिझविया' हा सर्वात महत्वाचा सुन्नी कायद्याचा स्त्रोत आहे. औरंगजेबच्या सांगण्यावरून तयार करण्यात आलेला संग्रह 'फतवा-इ-आलमगिरी', शेख ब्र-हानद्दीन अली याचा 'हिदाया' तर इमाम फक्रुद्दिन हसन बिन मन्सुर अल-उजझदी व अल फरथनी याचा 'फतवा-इ-काझीखान' हे ही मुस्लिम कायद्याचे उगम स्त्रोत्र आहेत.[90]

## 2.4 इस्लामी शरियतचे स्वरूप :-

शरियत मुख्यतः इस्लामी कायदेकानु शी संबंधीत आहेत. इस्लामधर्मीयांवर शरियतचा आजही फार मोठा प्रभाव व पगडा आहे. शरियत मधील कायदे कौटुंबिक बाबी, विवाह, वारसा हक्क, यांच्याशी निगडीत असून इस्लामी समाजशास्त्रात त्या पध्दतीने शरियाचा अर्थ लावून निर्णय दिले जातात. एका बाजूला शरियाने स्त्रियांना अनेक हक्क दिले आहेत असे सनातनी, परंपरावादी मुसलमान मानतात तर सुधारणावादी मुसलमानांचे यांच्या बिलकुल विरोधी मत आहे. शरियाचे समर्थक वारंवार सांगतात की इस्लाम मध्ये स्त्रीला जेवढे उच्च स्थान दिले आहे तेवढे अन्य कोणत्याही धर्माने दिले नाही. तर प्रागतिक सुधारकांचा असा विचार आहे की शरिया मुस्लिम स्त्रियांच्या हक्कावर अतिक्रमण करते.

### 2.4.1 विवाह विषयक कायदे :-

विवाह (निकाह) मुस्लिम धर्मशास्त्राच्या अनुसार एक करार आणि समझोता आहे. ज्याचा उद्देश संतती निर्माण हाच आहे. सज्ञान मुस्लिम स्त्री-पुरुष विवाह करू शकतात. परंतु अज्ञानी व वेडे स्त्री-पुरूष ही आपल्या

पालकाच्या संमतीने निकाह करू शकतात. निकाहसाठी वधुवर दोघांचाही संमत्ती आवश्यक असते. जर सहमती नसेल तर तो विवाह अवैध मानला जातो.

निकाह प्रसंगी एक सज्ञान पुरूष व दोन सज्ञान स्त्रीया यांची साक्ष इस्लाम मध्ये आवश्यक मानली जाते. तरच तो विवाह सही (योग्य) मानला जातो. साक्षीदार नसतील तर तो विवाह अयोग्य (फासीद) मानला जातो. मुस्लिम कायदा कलम 264 च्या अनुसार खालील विवाह अवैध मानले जातात.

1) साक्षीदारा शिवाय संपन्न झालेला निकाह.
2) चार बायका जिवंत असताना पाचव्या स्त्रीशी केलेला विवाह.
3) परधर्मियांशी केलेला विवाह.

या पध्दतीच्या व्दारे झालेले विवाह अवैध मानले जातात आणि निर्माण संतती अवैध घोषित केली जाते. एखादी मुस्लिम स्त्री नवरा (पती) जिवंत असताना घटस्फोटाशिवाय दुसऱ्या पुरूषांशी विवाह करेल तर तो विवाह बातील (अनुचित) मानला जातो.

### 2.4.2 मेहर विषयक कायदे :-

इस्लामला बहुपत्नीत्व मान्य आहे. विवाह प्रसंगी पतीला आपल्या पत्नीस 'मेहर' म्हणून एक ठराविक रक्कम देण्याची संमती द्यावी लागते. ती रक्कम अथवा संपत्ती स्त्रीधन मानली जाते. अर्थात त्या रक्कमेवर फक्त त्याच स्त्रिचा अधिकार असतो. घटस्फोट झाल्यानंतर सदरची रक्कम स्त्रीला मिळत असते परंतु पत्नीने घटस्फोट घेतला तर मेहरची रक्कम देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. इस्लामला घटस्फोटीत स्त्रियांचा व विधवा स्त्रीयांचा पुर्नविवाह मान्य आहे.

मुस्लिम कायद्यानुसार मेहरची रक्कम खालील परिस्थितीत लागू होते. [91]

1) विवाहाच्या अवधी समाप्त झाल्यानंतर
2) पती किंवा पत्नी या दोघांतील एकाचा मृत्यु झाल्यानंतर

### 2.4.3 तलाक विषयक कायदे :-

इस्लामला तलाक म्हणजे घटस्फोट मान्य आहे तलाक मंजुर करण्याची त्याची पध्दती खूप साधी व सोपी आहे. मुस्लिम कायद्याप्रमाणे खालील परिस्थितीत तलाक घेतला जावू शकतो.

1. पती आपल्या इच्छेनुसार कोर्टात न जाता सुध्दा पत्नीला तलाक देवू शकतो. त्यासाठी कोणते कारण द्यावे असे त्याच्यावर बंधन नाही.
2. पती-पत्नीच्या परस्पर सहमतीने विवाह विच्छेद केला जावू शकतो.

3. पती किंवा पत्नी यांनी कोर्टात जावून घटस्फोटाची याचिका दाखल करून तलाक प्राप्त करू शकतात.

पती कडून दिला जाणारा घटस्फोट तलाक नावाने ओळखला जातो तर दोघाच्या संमतीने घेतला जाणारा घटस्फोट खुला किंवा मुबारात ओळखला जातो.[92]

**तलाकचे प्रकार -**

**1. तलाक अहसन :-**

या पध्दतीमध्ये केवळ एकदाच म्हणावे लागते 'मैने तुम्हें तलाक दिया!'[93]

**2. तलाक हसन :-**

यापध्दती मध्ये तीन वेळा तलाक दिला जातो. यामध्ये तीन महिन्याचे अंतर असते. तसेच या कालावधी मध्ये पती पत्नीमध्ये कोणत्याही प्रकारे शारीरिक संबंध ठेवण्यास इस्लाम मध्ये मनाई आहे.[94]

**3. तलाक-उल-बिदात किंवा तलाक-ए-बादाई :-**

या पध्दतीमध्ये दोन पध्दतीने घटस्फोट दिला जातो. त्यातील प्रथम पध्दत म्हणजे 'मैं तीन बार कहेंता हूँ कि मैंने तुम्हे तलाक दिया!' किंवा 'मैं तुम्हें तलाक देता हूँ, मैं तुम्हे तलाक देता हूँ, मैं तुम्हें तलाक देता हूँ।[95] असे तीन वेळा म्हणुन तलाक दिला जातो.

## 2.5 इस्लामी संस्कृती :-

इस्लाम या शब्दाचा अर्थ शांती असा आहे.[96] एक सर्वश्रेष्ठ, सर्वशक्तीमान ईश्वरावर विश्वास व निष्ठा, सर्वांशी समान वर्तन, श्रम करून उदरनिर्वाह करणे, सदाचार पूर्वक वर्तन ही इस्लामची मुख्य तत्वे आहेत. सत्य, प्रेम, करूणा या मूल्यांना इस्लाममध्ये महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे इस्लाम शब्दाचे अर्थ शांतता, सुरक्षितता, आणि समर्पण असे होतात. अल्लाह समोर माणसाने पूर्णपणे शरणागती पत्करावी आणि त्या शरणागतीतूनच व्यक्ती, समाज आणि मानव जात शांततेत सुरक्षित जीवन निर्वाह करेल ही इस्लामी संस्कृतीची मुख्य विचारसरणी आहे.

संस्कृती शब्द 'सम्' शब्दाबरोबर 'कृ' धातुची संधी होवून 'क्तिन' प्रत्यय लागून बनलेला आहे. त्याचा अर्थ होतो, समान विकास म्हणजेच संस्कृती मध्ये मनुष्य जीवन जगण्यासाठी धर्म, तत्वज्ञान, इतिहास, रितीरिवाज, परंपरा, नितीशास्त्र, नितीमूल्ये, आचार विचार या सर्वांचा समावेश होतो.[97]

इस्लामी संस्कृतीचे खालील आधार स्तंभ होत.

1) परमेश्वर

2) ईश्वरी ग्रंथ म्हणजे कुराण

3) ईश्वराचे प्रेषित पैगंबर रसूल

4) अंतिम निवाड्याचा दिवस

5) ईश्वरी आदेश

### 2.5.1 इस्लामी संस्कृतीची मूलतत्वे :-

**1. मानवी प्रतिष्ठा :-**

इस्लामने मनुष्याला सृष्टीतील श्रेष्ठ घटक मानले आहे. ही सृष्टी ईश्वराने माणसाच्या विकासासाठी सुखासाठी व ईश्वरी धर्मपालनाची सोय व्हावी म्हणून निर्माण केली आहे. मनुष्य हा ईश्वर निर्मित सृष्टीतील मध्यवर्ती घटक आहे.

**2. माणसाची निष्पाप प्रवृत्ती :-**

इस्लामच्या मते मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो पूर्णतः निष्पाप असतो. मनुष्य हा निसर्ग नियमाच्या अधीन आहे. जो नियम त्याच्या उत्पत्तीसाठी लागू आहे. त्याच्या नुसार तो श्वासोच्छ्वास करतो. अन्न, पाणी, उष्णता, प्रकाश ग्रहण करतो. त्याचे स्नायू, पेशी, ह्दय, बुध्दी, सर्व अवयव निसर्गाने नेमून दिलेल्या पध्दतीने तो करतो. कोणत्याही पूर्व संस्कारांनी किंवा पूर्वजन्मातील संस्कारांनी त्याचे मन पापमय होत नाही. प्रत्यक्ष जीवनात माणूस जे पाप अगर पुण्य करतो त्याचे संस्कार त्यांच्या बुध्दीवर व मनावर उमटतात. इस्लामच्या मते परमेश्वराने माणसाला शुध्द अंतकरण दिले आहे. त्याला बुध्दी असते. तो विचार शक्ती, आकलन शक्ती व निर्णय शक्ती बाळगतो. आपल्या मर्जीनुसार एखादी गोष्ट स्विकारतो किंवा नाकारतो. आपले जीवन चांगले करावयाचे की वाईट करावयाचे ते माणसांच्या इच्छेवर व संकल्पावर अवलंबून आहे. माणूस आपले कर्म करण्यास स्वतंत्र आहे. त्यामुळे तो स्वतःच्या भविष्याचा शिल्पकार आहे. माणसाचे दुःख वा आनंद हा त्याच्याच कर्माचा परिणाम आहे.

**3. मानव एकता :-**

इस्लामने भ्रातृभाव हे मध्यवर्ती तत्व मानले आहे. जात, वंश, रंग, लिंग, संप्रदाय, देश यांचे भेद इस्लामला मान्य नाहीत. कवी डॉ. इक्बाल म्हणतात. -

“चीनों अरब हमारा, हिंदोसिता हमारा

मुस्लिम हैं हम वतन है सारा जहाँ हमारा !”[98]

वरील ओळी वरून इस्लामी एकतेची संकल्पना स्पष्ट होते. माणसाचा अहंकार, श्रेष्ठतेची कल्पना, गर्व, यातूनच मानव जातीमध्ये भेद निर्माण होतात. इस्लामच्या मते सर्व मनुष्य जात पूर्वी एकच समाज होता. अज्ञान व दुर्गूणामुळे माणसामध्ये भेद निर्माण झाले. सामाजिक समता, एकता, भातृभाव ही इस्लामी संस्कृतीची मूलभूत तत्वे आहेत व सर्व मुस्लिम बांधवांनी परस्पराच्या विकासासाठी व कल्याणासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

**4. प्रेषितत्व :-**

इस्लामच्या मते प्रेषित हे परमेश्वर नव्हते, त्याचे रूप नव्हते, किंवा हे ईश्वरपुत्र नव्हे. इस्लामला ईश्वर पुत्र व अवतार या संकल्पना मान्य नाहीत. प्रेषित हा सर्वसामान्य माणूसच असतो. फक्त विशेष साक्षात्कारामुळे त्याला ईश्वराची कृपा लाभते व तो मानव जातीला मार्गदर्शन करू शकतो. ईश्वर निर्मित सृष्टीवर त्याचा ताबा नसतो. त्याचे जीवन हे इतरांना आदर्श व प्रेरणादायी असते. ईश्वरापासून त्याला जे संदेश मिळतात त्यानुसार तो मानव जातीला मार्गदर्शन करतो.

**5. ईश्वर प्राप्तीचा सरळ मार्ग :-**

माणसाने आपल्या सदाचाराने निष्ठापूर्वक ईश्वराची उपासना करावी जी अत्यंत सुगम व सरळ आहे. यावर इस्लामने भर दिला आहे. ईश्वर प्राप्तीच्या मार्गामध्ये खालील तत्वे मार्गदर्शक आहेत.[99]

1) तक्वा (धर्मश्रध्दा)
2) इस्लाम (ईश्वराप्रीत्यर्थ सद्‍वर्तन)
3) तव्वकुल (ईश्वरी कृपेवर पूर्ण विश्वास)
4) सब्र (दृढनिश्चय, सहनशीलता, संतोष)
5) शुक्र (ईश्वरा विषयी कृतज्ञता)

**6. ईश्वर कल्पना :-**

इस्लामच्या मते परमेश्वर हा सर्वश्रेष्ठ, शक्तिमान, सर्वज्ञ, सृष्टीचा निर्माता, पालक, संरक्षक, शास्ता, त्राता, कृपामय, दयाळु, क्षमाशील, उदार व मार्गदर्शक आहे. माणसाची आत्मनिष्ठा हाच ईश्वरी अस्तिवाचा सर्वश्रेष्ठ पुरावा आहे. सर्व सृष्टी व मानवी जीवन हे त्याच्या न्याय, दक्षता, करूणेची प्रतिक आहे. इस्लामने एका अनन्य ईश्वरी संकल्पनेस पायाभूत मानले आहे. ईश्वरी एकता किंवा एकेश्वरवाद हे इस्लामचे प्रमुख तत्व आहे.


वरील सर्व गोष्टीच्या समन्वयातून इस्लामी संस्कृती आकारास येते असे म्हणता येईल.

**2.6 महंमद (मोहम्मद) पैगंबर :-**

महंमद पैगंबराच्या जन्म मुस्लिम इतिहासकारांच्या मतानुसार इ.स. 20 एप्रिल 571 रोजी झाला. महंमद या शब्दाचा अर्थ आहे, ज्याची अतिशय प्रशंसा केली जाते असा. काही इतिहासकारांच्या मते 26 ऑगस्ट 570 रोजी महंमद जन्माला आले. महंमदाचे पूर्वज कुरेश टोळीशी संबधित होते. प्रेषिताचा जन्म प्रेषित इब्राहिम यांच्या वंशात झाला होता.[100]

महंमदाचे मूळ पूर्वज म्हणजे कुरेश या नावावरूनच त्या टोळीला 'कुरेश' हे नाव पडले. त्यांच्यापासून महंमदाची पिढी 12 वी होती. कुसय नामक पूर्वजाने काबा गृहाची पुनर्बांधणी केलेली होती आणि मक्केचा कारभार ही हाती घेतला होता. त्याच्या मृत्युनंतर (इ.स. 480) त्याचा दुसरा मुलगा अब्दुल मनाफ मक्केचा मुख्य कारभारी झाला. त्याच्या मृत्युनंतर त्याचा तिसरा मुलगा हाशीम मक्केचा प्रमुख झाला. हाशीम हा प्रेषिताचा पणजोबा होय. हाशीमने अनेक लोकोपयोगी कामे केली. उदार मनोवृत्तीमुळे हाशीम खूपच लोकप्रिय झाला. हाशिमच्या मृत्युनंतर त्याचा भाऊ मुतालिब हा मक्केचा प्रमुख झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा अब्दुल मुतालिक मक्केचा कारभार पाहू लागला. त्याच्या तिसऱ्या मुलाचे नाव अब्दुला असे होते, जो प्रेषिताचा पिता होय. अब्दुलाचे लग्न जहरा घराण्यातील आमीनाबी नामक स्त्रिशी झाले. या दोघांना महंमद नामक पुत्र प्राप्ती झाली.

महंमद आईच्या पोटात असतानाच त्याचे वडील मृत्यु पावले तर प्रेषित आठ वर्षांचे असताना प्रेषिताच्या आईचे ही निधन झाले. त्यावेळी महम्मदाचे पालन पोषण आजोबा अब्दुल मुतालिब यांनी केले.[101] त्यानंतर मुहंमदाचे पालन पोषण त्याचे चुलते अबु तालीब यांनी केले. त्याकाळी अरब समाजात शिक्षणाचे विशेष महत्व नसल्यामुळे प्रेषिताचे औपचारिक शिक्षण झाले नाही. त्याचे चुलते व्यापारी असल्यामुळे प्रेषिताने त्याच्या बरोबर सिरिया व येमेन या देशाच्या व्यापारी यात्रा केल्या. वयाच्या 25 व्या वर्षी महंमदाचे लग्न खदीजा नामक एका विधवा स्त्रीशी झाले. [102] महंमदाने खदीजा बरोबर सुमारे 25 वर्षे संसार केला. खदीजा पासून त्यांना दोन मुले व चार मुली झाल्या. खदीजा महंमदापेक्षा 15 वर्षानी मोठ्या होत्या. महंमदाची दोन्ही मुले लहानपणीच मृत्यु पावली. त्याचवेळी त्यांची सर्वात मोठी मुलगी जैनब हिचा विवाह कुरेश अबुल-आस बरोबर झाला. तर दुसरी मुलगी रूकैय्या व तिसरी मुलगी उम्मी कुलसम यांचा विवाह तिसरा खलीफा उस्मान बरोबर झाले. तर सर्वांत लहान मुलगी बिवी फातिमा हिचा विवाह चौथा खलीफा हजरत अली बरोबर झाला. महंमद पैगंबराची वंशावळ आपणास खालील प्रमाणे दिसून येते.




वरीलप्रमाणे महंमद पैगंबरांची वंशावळ आहे.[103]

खदीजाचा प्रेषितांना फार मोठा आधार होता. आपल्या पतीला जीवनकार्यात व धर्मप्रसारात तिने सदैव साथ दिली. एवढेच नव्हे तर इस्लामच्या त्या पहिल्या अनुयायी बनल्या.

प्रेषिताच्या काळात अरबस्तानात अंधाधुंदी माजली होती. लुटालुट, स्त्रियांचे अपहरण वगैरे प्रकार अस्तित्वात होते. या सर्व प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रेषिताने खदीजा व आपल्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने 'हल्फल फझुल' (इ.स. 595) या नावाची संख्या स्थापन केली.[104] या संख्येने सुमारे 25 वर्षे कार्य केले. सय्यद अमीन लिहितात, ''या संस्थेंने 25 वर्षापर्यंत बदमाश लोकांच्या अनाचारास पायबंद घालून गोरगरिबांचे व प्रवाशांचे संरक्षण केले.''[105] महंमद या संस्थेचे मुख्य होते. प्राचीन काळी अशीच एक संस्था होती तिच्यात 'फझल', 'फझाल', 'मुफ्फझल' व 'फुझैल' असे चार समुह होते त्या संघास फझुल म्हणत. याच प्राचीन संस्थेचे महंमदाने पुनर्जीवन केले. हाशिम व मुतलिब यांच्या घराण्यातील सर्व वंशज या संस्थेत सामील होते. ही संस्था पुढे 7 व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती.

### 2.6.1 धर्म साक्षात्कार :-

तरूण वयापासूनच प्रेषित एकांतप्रिय होते मनन, चिंतन करण्यासाठी ते हिरा पर्वतावरील गुहेमध्ये जाऊन ध्यान धारणा करत.[106] तत्कालीन अरब समाजातील परिस्थितीचा सातत्याने विचार करून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत. अरबी समाजाचे अध:पतन थाबंविण्यासाठी काय करता येईल हा प्रेषिताच्या ध्यानाचा केंद्रबिंदू होता. 40 व्या वर्षी प्रेषिताला अल्लाहचा प्रथम संदेश (वाही किंवा इलहाम) प्राप्त झाला. 'इलहाम' म्हणजे ज्ञान होय. केवळ अरबस्तानचीच नव्हे तर जगाची अधोगती थांबविण्यासाठी सद्धर्माचा प्रचार करण्याची प्रेषितास आज्ञा झाली. [107]

इस्लामच्या समजुती प्रमाणे वयाच्या 40 व्या वर्षी रमजान महिन्यातील एके दिवशी जिब्राईल नावाच्या देवदूताने प्रेषिताला अल्लाहने त्याचा प्रेषित म्हणून निवडले असा संदेश दिला. देवदूत त्यांना म्हणाला 'वाच' प्रेषिताने देवदूताला आपल्याला 'वाचता येत नाही' असे सांगितले. देवदुताने दुसऱ्यादा त्यांना वाचावयास सांगितले असता त्यांनी परत तेच उत्तर दिले. तिसऱ्यांदा देवदूत म्हणाला ''वाच, आपल्या ईश्वराच्या नावाने ज्यांनी गोठलेल्या रक्तापासून माणूस निर्माण केला वाच, की तुझा ईश्वर मोठा उदार आहे. त्याने लेखनीव्दारे शिक्षण दिले, मनुष्याला ते ज्ञान दिले जे त्यास अवगत नव्हते.''[108] या ओळी कुराणातील सर्वप्रथम अवतरीत झालेल्या ओळी मानल्या जातात. प्रेषिताला कुराण प्राप्त झाले या घटनेस 'वाही' असे संबोधले जाते. काही पाश्चात्य इतिहासकारांच्या मते प्रेषितास अपस्माराचा आजार होता आणि त्या झटक्यामध्ये त्यास ईश्वरी संदेश प्राप्त होत असे. [109]

प्रेषितांनी इस्लामचा हा संदेश सर्वप्रथम आपली पत्नी खदीजा हिला सांगितला आणि खदिजा इस्लामची पहिली अनुयायी झाली. प्रेषिताने त्यानंतर हा संदेश आपले नातेवाईक व इतर मित्रमंडळी पर्यंत पोहचविला. प्रेषिताचे चुलत बंधू हजरत अली व झैद नामक गुलामाने इस्लाम स्विकारला. अबुबक्र, उस्मान, अब्दुर्र रहिमान, साद, झुबैर या प्रेषिताच्या मित्रांनी इस्लामची दीक्षा स्विकारली.[110] हळूहळू प्रेषिताच्या अनुयायांची संख्या वाढू लागली.

प्रेषिताच्या अनुयायांमध्ये काही निग्रो गुलाम देखील होते. त्यामध्ये हबशी बिलाल इस्लामी इतिहासात प्रसिध्द आहे. प्रेषिताचा हा अत्यंत निष्ठावंत शिष्य व इस्लामचा पहिला मुआज्जिन म्हणून त्यांचे नाव इस्लामच्या इतिहासात अमर झाले आहे.[111] तीन वर्षे इस्लामचा अव्याहत प्रचार केल्यावर प्रेषितास जेमतेम 30 अनुयायी मिळाले. इस्लामची तत्वे अरबी समाजाला पटत नव्हती. प्रेषिताला जसे अनुयायी मिळाले तसे विरोधक ही मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. काही लोकांनी मूर्तीपूजा सोडून एकच निर्गुण निराकार ईश्वर मान्य केला त्यांना मुसलमान (आज्ञाधारक) म्हंटले गेले. ज्यांनी या आज्ञा पाळण्यास नकार दिला त्यांना काफीर (नकार देणारे) म्हंटले गेले. अशा प्रकारे मुसलमान आणि मूर्तीपूजक यांच्यात संघर्ष सुरू झाला.

तत्कालीन जनता बहुसंख्येने मूर्तीपूजक होती यामुळे प्रेषिताच्या कुटुंबावर प्रथमतः सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. परंतु त्याही काळात प्रेषिताचे धर्मप्रसाराचे काम चालूच होते. कित्येक वेळा प्रेषितास अपमानास्पद बोलणी ऐकुन घ्यावी लागली. प्रेषिताचा आशावाद मोठा असल्यामुळे इस्लामची ही अत्यंत संथ प्रगती पाहून प्रेषित निराश झाला नाही.

प्रेषिताला ईश्वरी संदेश सतत 23 वर्षे येत राहीले. आणि त्यांची पूर्तता मृत्युच्या काही क्षणापूर्वी झाली. हे संपूर्ण कुराण स्वर्गात ठेवले आहे, आणि आवश्यकतेनुसार त्यातील थोडा थोडा भाग या पध्दतीने संपूर्ण कुराण अवतरले आहे. हा ईश्वरी साक्षात्कार म्हणजे इस्लामचा पाया होय. [112]

### 2.6.2 प्रेषिताचे कार्य :-

इ. स. 615 पासून प्रेषित प्रचार करू लागले. सफा टेकडीवर प्रेषिताने एक सभा बोलविली. त्या सभेत प्रेषितांने अनेकेश्वरवाद व मूर्ती पूजेच्या विरोधात मतप्रदर्शन केले आणि इस्लामची तत्वे विशद करून सांगितली परंतु सभेस जमलेल्या अली व्यतिरिक्त सर्व श्रोत्यांनी प्रेषिताच्या विचाराची टर उडविली आणि तेथून ते निघुन गेले. प्रेषिताचा अनुयायी अली म्हणाला ‘मी तुम्हाला मदत करेन’ यावेळी प्रेषितास प्रखर विरोधाचा सामना करावा लागला.

एकेश्वरवादाच्या आदेशानंतर प्रेषिताने अब्दुल मुतलिब वंशातील लोकांना भोजनाचे निमंत्रण दिले. या सहभोजनास हमजा, अब्बास, अबुतालिब उपस्थित होते. या भोजनानंतर प्रेषिताने पवित्र काबा मध्ये जाऊन एकेश्वरवादाची घोषणा केली. स्वार्थी लोकांना ही घोषणा म्हणजे स्वतःचा व स्वनिर्मित देवाचा अपमान झाल्यासारखे वाटू लागले. त्यामुळे लोक प्रेषिताच्या अंगावर धावून आले. प्रेषिताला वाचविण्यासाठी हारीस बीन, अबी हाला यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले.

रक्तपाताची घटना घडल्यानंतर विरोध टाळण्यासाठी व शांततेच्या मार्गाने धर्मप्रचार करण्यासाठी प्रेषितांनी मक्के जवळील सफा भागातील एका अनुयायाच्या घराचा आश्रय घेतला. केवळ 17 वर्षे वयाच्या अल अकरम याचे ते घर होते, मक्केला येणारे यात्रेकरू त्या घरापासून जात असत. अकरम चे हे घर 'इस्लामचे घर' म्हणून नोंदविले गेले आहे.[113] तेथे धर्मप्रचार व धर्मांतर गुप्तपणे होत असे. प्रेषिताचे चुलते हमजा व तत्कालीन समाजातील एक वजनदार व्यक्ती उमर हे इस्लामचे अनुयायी झाले. त्यामुळे प्रेषिताच्या अनुयायांस फार आनंद झ ाला. त्यांनी सार्वजनिक ठिकाणी प्रार्थना करण्यास सुरूवात केली. हा प्रकार पाहून मक्केतील कुरेश अतिशय संतापले व आपला सर्व राग त्यांनी प्रेषिताच्या कुटुंबावर काढला प्रेषित अथवा त्याच्या नातेवाईकाशी कसलाही व्यवहार करू नये असे कुरेश यांनी ठरविले. सुमारे तीन वर्षे सुरू असलेला हा बहिष्कार प्रेषिताच्या परिवारास हा त्रासदायक झाला. तत्वासाठी प्रेषिताच्या परिवारातील सदस्यांनी हा बहिष्कार आनंदाने सहन केला.

याच सुमारास प्रेषिताची पत्नी खदीजाबी हिचा मृत्यु इ. डिसेंबर 619 मध्ये झाला. प्रेषिताला पुष्कळ मुले झाली परंतु सर्वांचा अकाली मृत्यु झाला. एका मुलीचे फातमाचे लग्न हजरत अलीशी झाले. करबलाच्या युध्दात रक्त सांडणारे हुतात्मे सय्यद हुसेन हे फातमाचे चिरंजिव होते.[114]

प्रेषिताचे चुलते अबु तालिब व पत्नी खदीजाबी यांचे लागोपाठ झालेले मृत्यु पाहून प्रेषिताचे मन उदास झाले. काही दिवस दुसऱ्या गावी गेल्यानंतर थोडे बरे वाटेल म्हणून प्रेषिताने झैद बरोबर ताईफला प्रयाण केले. तेथील रहिवाशांना आपल्या धर्माची तत्वे सांगितली पण ताईफच्या रहिवाशांनी प्रेषितास प्रतिसाद दिला नाही. उलट त्यांना हकलून दिले. त्या शहराजवळील अकबा टेकडीवर प्रार्थना करीत असताना यसरब शहरातील सहा लोकांनी इस्लामची दीक्षा घेतली. नंतर पुन्हा हे सहा लोक आणखी काही लोकांसह प्रेषिताकडे आले. यावेळी सुमारे 75 लोकांनी इस्लामचा स्विकार केला.[115]

प्रेषित पुन्हा मक्केमध्ये आले प्रेषिताला इस्लामच्या नवअनुयायांच्या हालअपेष्टा पहावेनात. त्यावेळी त्यांनी आपल्या अनुयायांना ॲबेसेनिया देशात जाण्याची परवानगी दिली. त्यांच्या अनुयायी पैकी 83 जण ॲबेसेनियात गेले. या प्रयाणास 'मुहाजरत' (पहिले प्रयाण) अशी संज्ञा आहे. [116]

मक्केतील प्रेषितांचे उर्वरीत अनुयायी यसरबला सुरक्षित पोहचले. मात्र प्रेषित आपल्या दोन अनुयायांसह मक्केतच राहीले. प्रेषितास पकडून ठार करण्यासाठी अनेक कुरेश प्रेषितांच्या घराभोवती दबा धरून बसले होते. अलीच्या आग्रहावरून प्रेषिताने मक्केचा निरोप घेतला. तीन दिवसाच्या प्रवासानंतर प्रेषित व अबु बक्र यांनी यसरब शहरात प्रवेश केला. इ. स. 2 जुलै 622 रोजी ही घटना घडली. प्रेषितांनी मक्केहुन मदिनेस जे प्रयाण केले त्यास 'हिजरत' ही संज्ञा आहे. [117] याच वर्षापासून इस्लामच्या 'हिजरी' या कालगणनेस सुरूवात झाली.

प्रेषिताचे मदिनेत आगमन झाल्यानंतर प्रेषिताने अकबाच्या घाटीत सुमारे 12 लोकांना इस्लामची दिक्षा दिली या प्रसंगी त्यांना खालील वचने देण्यात आली.

1. अल्लाहच्या व्यतिरिक्त कोणाचीही उपासना करणार नाही. तसेच अल्लाहच्या अस्तित्वात किंवा व्यक्तिमत्वात अगर गुणवैशिष्ट्या मध्ये कोणालाही सहभागी करणार नाही. कोणालाही अल्लाहच्या हक्कात किंवा कार्यात मदतगार समजणार नाही. सृष्टीची रचना, त्याचे संचलन, जन्म मृत्यु तसेच जीवन जगण्याचा मार्ग व कायदे देण्याचा आणि पूजाअर्चा, भक्ती व उपासनेचा हक्क एकट्या अल्लाहचा आहे.
2. चोरी करणार नाही.
3. व्यभिचार करणार नाही.
4. आपल्या अपत्याची हत्या करणार नाही.
5. कोणाचीही निंदा, नालस्ती करणार नाही.
6. कोणावरही मोठा आळ लावणार नाही.
7. प्रेषित ज्या चांगल्या पुण्यात्मक गोष्टीची आज्ञा देतील त्याची कटाक्षाने अंमलबजावणी करणार आणि त्यांची मदत करणार.[118]

त्यानंतर प्रेषिताने तेथील टोळयांना एकत्रित करण्यास सुरूवात केली आणि त्यांच्यामध्ये आपली शिकवण रूजवली. त्यामुळे तेथे प्रेषिताला मोठा शिष्य वर्ग मिळाला. पुढे या सर्व टोळयांना एकत्रित करून प्रेषिताने मदिनेचा ताबा घेतला. [119]

मक्केतील जाचाला कंटाळून इतरत्र गेलेले मुसलमान मदिनेस परत आले. प्रेषिताने मदिनेतील यहुदी व इतर गटांसोबत जवळीक करत आपली राजकीय शक्ती वाढविली. प्रेषिताच्या वाढत्या शक्तीला आळा घालण्यासाठी मक्केतील विरोधकांनी तीन वेळी मदिनेवर हल्ला केला. या तीन लढाया बद्रची लढाई (जाने. 624) उहुदची लढाई (जाने. 625) आणि अहजाबची लढाई (खंदकाची लढाई) (फेब्रु. 627) या नावांनी ओळखल्या जातात. या तीनही लढायांमध्ये प्रेषिताने विरोधकांचा पराभव केला. [120]

या लढायातील विजयानंतर प्रेषितांनी आपल्या 1400 सहकाऱ्यांसमवेत मक्का येथे हज यात्रेस जाण्याचा संकल्प केला. मक्केतील त्यांच्या विरोधकांनी त्यांना मक्केबाहेर थांबविण्याची योजना आखली. यावेळी प्रेषिताने हुदैबिया या ठिकाणी तळ टाकून आपल्या दूतासोबत संदेश पाठवला की त्याचा उद्देश लढाईचा नसून हज यात्रेचा आहे. या ठिकाणी इ. स. 628 मध्ये प्रेषित आणि त्यांच्या विरोधकांमध्ये तह झाला. हा तह हुदैबियाचा तह म्हणून ओळखला जातो. या तहान्वये ठरले की प्रेषिताने यावेळी परत जावे व पुढील वर्षी हजसाठी यावे. त्यावेळी प्रेषित महंमदाने हा तह मान्य केला.[121]

मध्यंतरीच्या काळात मदिनेतील मुसलमानांचे तेथील यहुद्यांसोबत संबंध बिघडत गेले. अहजाबच्या लढाईपासूनच त्यांचे संबंधात कटुता आली होती. प्रेषितानी यहुद्यांना मदिनेबाहेर निघुन जाण्याचा आदेश दिला. त्यानंतर यहुदी खैबर या ठिकाणी जावून वसले. परंतु तिथेही प्रेषितांनी त्यांच्यावर हल्ला करून पराभव केला व तो प्रदेश इस्लामी राज्यास मिळाला. [122]

अशा प्रकारे खैबर विजयाने उत्तर अरबस्तान तर हुदैबिया विजयाने मध्य अरबस्तान प्रेषिताच्या ताब्यात आला. हुदैबियाच्या तहानंतर मक्केतील कुरेशींनी शांतता करार मोडला. त्यामुळे इ.स. 628 मध्ये प्रेषिताने सुमारे 10 हजार फौज घेऊन मक्केवर आक्रमण केले. मक्केचा प्रमुख सुफीयान यास रक्ताचा एक थेंबही न सांडता पराभूत केले. 11 जाने. 630 रोजी प्रेषिताने मक्केवर ताबा मिळविला आणि या विजयानंतर मक्केतील लोकांचे गट इस्लामचा स्विकार करू लागले. मक्केत मुक्कामास असताना प्रेषिताने परीसरातील सार्वजनिक मूर्ती व मंदीरे नष्ट करून टाकली व तेथील मूर्तीपूजकांना इस्लाम स्विकारण्याचे निमंत्रण दिले.

3 मार्च 632 रोजी प्रेषिताने आपल्या एक लाख अनुयायांसह हजची यात्रा केली. ही त्यांची शेवटची हज यात्रा ठरली. म्हणून या यात्रेला निरोपाची यात्रा (''खुत्ब-ए-हज्ज-तुल-विदा'') असे म्हणतात. यावेळी त्यांनी सांगितले ''मी घोषणा करतो की एक परमेश्वराशिवाय इतर कुणीही पूजनीय नाही. तो एक मात्र आहे. त्याचा कुणीही समकक्ष नाही आणि मी घोषित करतो की मी महंमद त्याचा भक्त आणि प्रेषित आहे.'' शेवटी आकाशाकडे पाहून ते म्हणाले ''हे अल्लाह ! मी संदेश पोहचविण्याचे काम केलेले आहे व माझे कर्तव्य मी पूर्ण केले आहे !''[123]

या भाषणात त्यांनी आपल्या अनुयायांना कुराणाच्या मार्गावरून चालत राहण्याचा संदेश दिला तो पुढीलप्रमाणे -

1) हे लोकांनो माझे शब्द लक्ष देवून एका कारण या वर्षानंतर मी तुम्हाला पुन्हा या जागी कधी भेटेन की नाही हे मला माहित नाही.

2) हे लोकांनो तुमचे जीवन आणि पैसा जो पर्यंत तुम्ही अल्लाह समोर उभे राहात नाही तो पर्यंत पवित्र व अबाध्य आहे. आजचा हा दिवस व हे वर्षे देखील पवित्र व अबाधित आहे आणि कयामतच्या दिवशी ज्यावेळी तुम्ही अल्लाह समोर उभे राहाल त्यादिवशी तुम्हाला तुमच्या बऱ्या वाईट कृत्यांची जबाबदारी घ्यावीच लागेल आणि मी तुम्हाला हा संदेश दिला आहे. ज्या कुणी तुमच्याकडे एखादी अमानत सोपविली असेल ती तुम्ही त्याला परत केलीच पाहीजे.

3) कर्जावर व्याज घेणे सर्वथा बेकायदेशीर आहे परंतु मूळ मुद्दल मिळविण्याचा तुम्हाला अधिकार आहे. कोणावरही अन्याय करू नका तर तुमच्यावर कोणीही अन्याय करणार नाही. ईश्वराने अशी आज्ञा केली आहे की व्याजी कर्जे असणार नाहीत.

4) ''खून का बदला खून से'' ही पध्दती आज पासून रद्दबातल झालेली आहे.

5) तुमच्या हातून क्षुल्लक चुका झाल्या तरी व तुम्ही अल्लाहच्या सर्व आज्ञा इतर बाबतीत पालन केल्यास अल्लाह तुमच्यावर प्रसन्न होईल म्हणून आपल्या श्रध्देची नीट काळजी घ्या.

वरील मुद्यांवरून प्रेषिताच्या अंतिम प्रवचनाची कल्पना येते.[124] याच प्रवचनात प्रेषिताने कुराणातील काही आज्ञांविषयी स्पष्टीकरण दिले आहे.

6) हे लोकांनो तुम्हाला तुमच्या स्त्रीयांवर म्हणजेच बायकांवर हक्क आहे आणि त्यांना ही तुमच्यावर हक्क आहेत. तुम्हाला न आवडणाऱ्या पुरूषांशी संबंध ठेवून त्यांना तुमच्याशी अप्रामाणिक होता येणार नाही किंवा राजरोस दुराचार करता येणार नाही.[125] पण त्या जर पापाचरण करू लागल्या तर त्यांना शयनगृहात बंदिस्त ठेवण्याची आणि त्यांना माफक प्रमाणात चोप देण्याची परवानगी तुम्हाला ईश्वराने दिली आहे.[126] आणि त्यांना पश्चाताप झाला तर त्यांना दयाळुपणे अन्न व वस्त्रे द्या.

7) स्त्रियांशी सभ्यपणे वागा कारण त्या निःसंशय तुमच्या ताब्यात आहेत. त्यांच्या जवळ स्वतःचे असे काहीच नसते. ईश्वराने दिलेल्या हमीवरच तुम्ही त्यांचा स्वीकार केलेला असतो.

8) तुम्ही माझे शब्द समजुन घ्या कारण निःसंशय मी हा माझा संदेश दिलेला आहे. उदा. ईश्वराचा ग्रंथ व प्रेषिताचे आचरण मी तुमच्या हवाली करून जात आहे. तुम्ही जर त्यांना दृढ धरून राहीलात तर तुम्ही कधीच पथभ्रष्ट होणार नाही.

9) हे लोकांनो माझे शब्द लक्ष देवून ऐका व ते समजून घ्या. निःसंशय हे समजा की प्रत्येक मुसलमान हा दुसऱ्या मुसलमानाचा भाऊ आहे व मुस्लिम समाज हा एक भातृसंघ आहे.

एक कुराण वगळता अखेरच्या धर्मोपदेशाएवढा दुसरा कोणताच ग्रंथ मुस्लिमांच्या दृष्टीने पूजनीय नाही. इस्लामी उपदेशाचा प्राण असलेल्या या प्रवचनात कायदा आणि धर्म पूर्णपणे एकजीव झालेले आहेत. या प्रवचना वरून आपणास असे म्हणता येईल की इस्लामनुसार ईश्वरच कायद्याचे व धर्माचे उगमस्थान आहे. शरिया (नैतिक कायदा) व फिकह (नागरी कायदा) या इस्लामविषयक दोन्ही कायद्यांचे उगमस्थान अंतिम प्रवचन होय असेही आपण म्हणून शकतो.[127]

प्रेषितांची शिक्षण विषयक संकल्पना पुढील शब्दात सांगता येईल. पैगंबर स्वतः पंडित नव्हते परंतु ज्ञानविज्ञानाची महती त्यांनी गायिली आहे. मानवी इतिहास लेखणीने लिहिला जातो. लेखणीने मानवाचा निवाडा केला जातो, न्याय दिला जातो. मानवी कृत्यांची छाननी करणारे ईश्वराच्या दृष्टीने छाननी करणारे साधन म्हणजे लेखणी. लेखणी म्हणजे ज्ञान, ज्ञानाशिवाय सारे व्यर्थ आहे शिका, वाचा, पहा असे महंमद पैगंबर सांगतात.[128]

**2.6.3 प्रेषिताचा मृत्यु :-**

अंतिम प्रवचना नंतर यात्रेचे सर्व विधी करून प्रेषिताने मदिनेस प्रयाण केले. मदिनेमध्ये आपला अंतिम श्वास सोडण्याची प्रेषिताची इच्छा होती कारण पडत्या काळात मदिनेने प्रेषिताला आधार दिला होता. इ. स. 632 हे प्रेषिताच्या जीवनाचे शेवटचे वर्ष होते. प्रेषिताच्या मृत्युपर्यंत जवळपास संपूर्ण अरबस्तान वर इस्लामचा प्रभाव व प्रेषिताचा ताबा होता. प्रेषिताला सातत्याने म्हणजे अगदी त्याच्या मृत्युपर्यंत साक्षात्कार होत होते व या सर्व साक्षात्कारी संदेशाचा मिळूनच इस्लामचा पवित्र ग्रंथ म्हणजे कुराण तयार झाला आहे. यामध्ये प्रेषितास नबी व रसूल असेही म्हंटले जाते.[129]

प्रेषिताच्या ताब्यातील सर्व प्रांतांची प्रशासकीय व्यवस्था लावण्यात येत होती. नव मुस्लिमांचे व्यवस्थापन प्रेषिताने केले होते. पण दरम्यानच्या काळात प्रेषिताची प्रकृती खालावली. प्रेषित अत्यंत शांत व गंभीर राहू लागले. जो पर्यंत शक्ती होती तो पर्यंत ते नमाज अदा करत होते. मशिदीतील शेवटच्या प्रवचना नंतर प्रेषित शांतपणे म्हणाले, मुस्लिमांनो कोणाच्या बाबतीत माझ्याकडून अन्याय झाला असेल तर सांगा. त्याचे उत्तर देण्यासाठी मी येथे उभा आहे. तसेच जर मी कोणाचे काही देणे लागत असेल तर माझे जे काही कदाचित असेल ते सारे तुमचेच आहे. या जगात मान खाली घालावी लागली तरी हरकत नाही. परंतु परलोकी ईश्वरासमोर खाली मान नको. वेळच्या वेळी प्रार्थना करीत जा. धार्मिक व्रते पाळा, बंधुभावाने वागा, शांतीने रहा व सर्वाबद्दल सदिच्छा बाळगा. यानंतर कुराणातील पुढील आयत त्यांनी म्हंटली - ‘‘जे नम्र आहेत, जे अन्याय गोष्ट करत नाहीत, त्यांना परलोकी प्रासाद

मिळतील. जे पवित्र व धर्मशील आहेत त्यांना परिणामी सुख आहे.''[130] हा चरण म्हणून ते घरी आले. हे त्याचे शेवटचे प्रवचन व ती अंतिम सामुदायिक प्रार्थना होती.

वयाच्या 63 व्या वर्षी 12 रब्बी उल अव्वल हिजरी 11 अर्थात जून 11 इ. स. 632 सोमवार रोजी प्रेषिताचे निधन झाले. ''अल्लाहम बिर्रफिकील आला'' अर्थात हे अल्लाह सर्वात श्रेष्ठ मित्राला (ईश्वराला) भेटण्याची फक्त इच्छा आहे हे त्याचे शेवटचे शब्द होते. प्रेषिताच्या मृत्युनंतर त्याचा मित्र अबु बक्र हा पहिला खलिफा म्हणून घोषित झाला.[131]

**2.6.4 प्रेषिताचा प्रभाव :-**

प्रेषिताने केवळ 23 वर्षाच्या कालावधीमध्ये सौदी अरेबियात मोठा बदल घडवून आणला. लुटमार व अनिश्चिततेची जीवन जगत असलेल्या अरब समाजाला प्रेषिताने एक नवीन मार्ग उपलब्ध करून दिला. मूर्ती पूजेचा बोलबाला नष्ट करून अरबांना एकेश्वरवादाची शिकवण देण्याचे काम प्रेषिताने केले. मायकेल हर्ट याने जगावर प्रभाव टाकणाऱ्या शंभर महापुरूषांची माहिती देणारा 'The 100' हा ग्रंथ (1978) लिहिला आहे. मायकेल म्हणतो ''प्रेषित महंमद ही मानवी इतिहासातील अशी एकमेव व्यक्ती आहे, की जी धार्मिक आणि ऐहिक दोन्ही पातळीवर कमालीची यशस्वी झालेली होती. आज 1300 वर्षानंतर ही अद्यापही प्रेषिताचा प्रभाव प्रचंड व व्यापक आहे.'' यासाठी त्याने प्रेषिताला पहिल्या क्रमांकाचे स्थान दिले आहे. [132]

प्रेषिताच्या आयुष्याचे व शिकवणूकीचे दूरगामी परिणाम अधिक महत्वपूर्ण आहेत. प्रेषिताच्या शिकवणुकीने अरब समाजाला एक आत्मविश्वास प्राप्त झाला. या आत्मविश्वासाच्या बळावर आपआपसात लढणारे अरब बाहेरचे जग जिंकायला निघाले. प्रेषिताच्या मृत्युनंतर जवळपास शंभर वर्षाच्या आतच अरबी साम्राज्य पश्चिमेस फ्रान्स व स्पेन पासून संपूर्ण उत्तर आफ्रिका खंडाच्या सुवेझ पर्यंत व प्रशिया पासुन मध्य आशियात मंगोलिया पर्यंत पसरले.[133] आधुनिक जगात ही जगातील सर्वात मोठ्या धर्मापैकी एका धर्माचे संस्थापक म्हणून जगाच्या एका मोठ्या भागावर प्रेषिताचा प्रभाव निःसंशय आजही आहे.

**2.7 इस्लामचा प्रचार व प्रसार :-**

प्रेषिताच्या मृत्युपर्यंत जवळपास संपूर्ण अरेबियन व्दिपकल्प इस्लाममय झाले होते. प्रेषिताने आपल्या जीवनात विशेषता आयुष्याच्या शेवटच्या 23 वर्षांत जी काही युध्दे केली त्यातून अरबी समाज आपसातील लाथाळ्या थांबवून आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार अरबस्तानच्या बाहेर कसा होईल या बाबत विचार करू लागला आणि प्रेषिताने आपल्या अनुयायांना जो आत्मविश्वास दिला त्यांची इतिहासात नोंद झाली आहे. अरबस्तान

सारख्या मागासलेल्या प्रदेशातील इस्लामच्या अनुयायांनी युरोप पासून मंगोलिया पर्यंत व आफ्रिकेपासून हिंदुस्तान पर्यंत ज्या लढाया केल्या त्याचाच परिणाम इस्लामच्या प्रचार प्रसारात झाला. इस्लामच्या प्रचार व प्रसारासाठी अरबी समाजातील गुण त्यास कारणीभूत आहेत. प्रेषिताच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव अरबी समाजावर होता व त्यातूनच अरबी योध्दे अरबस्तानच्या बाहेर पडले. तात्विक दृष्टीने इस्लाम राष्ट्रवाद मानत नाही. कारण एक परमेश्वर आणि त्याचा प्रेषित या दोघांचे अनुयायी म्हणजे मुसलमान हे राष्ट्रवाद न मानता विश्वइस्लामवाद (Pan Islamism) ही भूमिका होऊन जगभर आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करीत राहिले. मुसलमानांची एक निश्चित मातृभुमी नाही. उलट संपूर्ण विश्व हे आपलेच आहे हा इस्लामी प्रचार व प्रसाराचा मुख्य गाभा आहे. त्याचेच प्रतिबिंब इस्लामच्या प्रचार व प्रसारात पडलेले दिसून येते. प्रसिध्द कवी महंमद इकबाल यांच्या दोन ओळी यांची पूर्वपिठीका स्पष्ट करतात.

**चीनों, अरब हमारा हिंदोसिताँ हमारा**

**मुस्लिम हैं हम, वतन हैं सारा जहाँ हमारा !** [134]

### 2.7.1 मध्यपूर्व आशियातील प्रसार :-

प्रेषिताच्या मृत्युनंतर अरबस्तानची सत्ता सूत्रे प्रेषिताचा मित्र अबु ब्रक यांच्याकडे गेली. अबु ब्रक हा प्रेषिताचा केवळ मित्र नव्हता. तर इस्लामचा, पैगंबरांचा एक निष्ठावंत अनुयायी पण होता. त्याला पहिला खलिफा (उत्तराधिकारी) म्हणतात. अबू बक्र आणि त्याचे साथीदार इस्लामची तलवार हातात घेऊन इ. स. 632 मध्येच बाहेर पडले. काही वर्षातच ते मेसोपोटेमिया आणि इराणवर चालून गेले.[135] इस्लामची ही विजयी यात्रा इ. स. 632 मध्ये सुरू झाली आणि उपरोक्त दोन्ही देशावर त्यांनी विजय मिळविला. काही काळानंतर मध्य आशिया, काबूल, बलख आणि भारताच्या सीमेवर सिंधपर्यंत अरबी मुसलमानांच्या स्वाऱ्या होत राहिल्या.[136] पश्चिमेला सिरिया, पॅलेस्टाईन, इजिप्त, सुदान व उत्तर आफ्रिकेमध्ये इस्लामचे साम्राज्य पसरले.[137] पहिला खलिफा अबु बक्र यांचा मृत्यु इ. स. 634 मध्ये झाला. त्याच्या कारकिर्दीतील सिरीया वरील विजय इस्लामच्या इतिहासात विशेष महत्वपूर्ण मानला जातो.


इतिहासकार एच. जी. वेल्स अबु बक्रचे मूल्यमापन करताना म्हणतात "यात कोणताही संशय नाही की प्रेषित हा इस्लामची कल्पना आणि त्यामागील मेंदू आहे. तर अबु बक्र हा इस्लामचा आत्मा व प्रेरणा आहेत. ते दोघे आजीवन एकत्र राहात होते. प्रेषित केवळ उपदेश देत होता तर अब्रु बक्र त्याची अंमलबजावणी करत होता." [138]

अबु बक्रच्या मृत्युनंतर उमर (इ.स. 634-644) हा खलिफा झाला. त्याच्या कालखंडात त्याने जवळपास आफ्रिकेच्या बऱ्याच भागावर ताबा मिळविला. उमरच्या मृत्युनंतर उमियाद परिवारातील उस्मान नावाची व्यक्ती खलीफा झाली. इ. स. 644 ते 654 हा त्याचा कालखंड होय. उमियाद परिवारातील लोक इ.स. 749 पर्यंत खलिफा या पदावर विराजमान होते. इ. स. 654 साली प्रेषिताचा दत्तकपुत्र अली खलीफा झाला. अलीच्या वेळी प्रेषिताच्या वारसांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडण सुरू झाले. त्याचा परिणाम इस्लामच्या विभाजनात झाला. शिया व सुन्नी असे दोन पंथ निर्माण झाले.[139] अलीच्या मृत्युनंतर उमियाद परिवार व प्रेषिताच्या कुरेशी परिवारात करबलाची प्रसिध्द लढाई झाली. त्यामध्ये अलीची दोन्ही मुले हसन आणि हुसेन मृत्यु पावली आणि या लढाईची स्मृती म्हणून मोहरमचा सण शिया पंथीय साजरा करू लागले.[140] या लढाई मागील कारणमिमांसा पाहता असे दिसते, प्रेषिताच्या मृत्युनंतर त्याच्या अनुयायांमध्ये काही मतभेद व संघर्ष निर्माण झाले परिणामतः त्यांच्यात काही मतभेद झाले. प्रेषिताने अबु बक्र यास आपला वारस नेमले होते. नंतर प्रेषिताच्या वारसा हक्कावरून शिया व सुन्नी असे दोन पंथ उदयास आले. पहिला पंथ म्हणजे अबु बक्र व इतर खलिफांना प्रेषिताचे वारस मानणारा परंपरावादी लोकांचा सुन्नी पंथ होय. तर प्रेषिताचे जावई अली यास त्याचा वारस मानणारा शिया पंथ होय. सुन्नी पंथीय अबु बक्र, उमर, उस्मान व अली यांना पहिले चार खलिफा मानतात परंतु शिया पंथीय अली खेरीज इतर खलिफा मानत नाहीत.

अलीचे पुत्र हुसेन मदिनेवरून कुफा शहराकडे जात असताना प्रतिस्पर्धी गटाचा खलिफा यजीद याने हुसेन व हसन या दोघांची करबल्याच्या लढाईत हत्या केली.[141] अली इस्लामच्या इतिहासातील चौथा खलिफा व पहिला इमाम आहे.

इ. स. 711 मध्ये जिब्राल्टर च्या मार्गाने अरबी मुस्लिमांनी युरोप मध्ये प्रवेश केला आणि संपूर्ण स्पेनवर ताबा मिळविला. इ. स. 732 मध्ये इस्लामला पहिली हार पत्करावी लागली. पोईतिअर या फ्रान्स मधील रणांगणात चार्ल्स मार्टेल च्या नेतृत्वाखाली युरोपीयन सेनेने इस्लामचा पराभव केला. थोडक्यात पश्चिमेला स्पेन पासून उत्तर आफ्रिका व इजिप्त पासून पूर्वेला सिंध प्रांतापर्यंत इस्लामी साम्राज्य पसरले होते.

इ. स. 749 नंतर अब्बासी परिवारातील व्यक्ती खलीफा झाली. अब्बासी खलिफां मध्ये हारून रशीद याचा कालखंड विशेष महत्वपूर्ण मानला जातो. हा कालखंड इस्लामी साम्राज्याचा सुवर्णकाळ आहे. त्याच्या कालखंडात इस्लामी साम्राज्याचा विस्तार झाला. इस्लामच्या साम्राज्य विस्तारात शिया व सुन्नी संप्रदायातील विविध भेदही कारणीभूत ठरले. प्रत्येकाने आपापल्या परीने इस्लामी साम्राज्य वाढविण्याचा प्रयत्न केला. त्याची कल्पना आपणास खालील तक्त्यावरून दिसून येते.[142]




इस्लामच्या साम्राज्याला इ. स. 1258 पासून उतरती कळा लागली. इ. स. 1258 मध्ये बगदाद शहर मंगोली टोळ्यांकडून संपूर्णपणे नष्ट करण्यात आले. मंगोलियन नेता हालाकु ने अंतिम खलिफाचा वध केला व खलिफापद नष्ट केले. अरबांनी दोन-तीन शतकापर्यंत एक लक्षणीय संस्कृती निर्माण केली होती परंतु 13 व्या शतकातील मंगोलांच्या विलक्षण आक्रमणामुळे मध्य आशियातील तुर्केस्तान, इराण, इराक आदि देशात अरबी संस्कृतीचा संपूर्ण नाश झाला व खलिफाच्या घराण्याची संपूर्ण वाताहात इ. स. 1258 मध्ये झाली. त्या वंशातील खलिफा कैरो येथे जाऊन जगू लागले. त्यानंतर इ. स. 1512 मध्ये उस्मानी वंशाचा सुलतान सलीम याने खलिफाची गादी पुन्हा स्थापन केली जी पहिल्या महायुध्दापर्यंत अस्तित्वात होती. तुर्कस्तानचा आधुनिक शिल्पकार कमाल पाशा याने खलिफा हे पदच आपल्या कार्किदीत 3 मार्च 1924 रोजी रद्द करून टाकले होते.[143]

## 2.8 इस्लामचे भारतातील आगमन :-

### 2.8.1 राजकीय परिस्थिती :-

भारतात अरब प्रथम व्यापारी म्हणून येवू लागले. त्यांनी पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वसाहती उभ्या केल्या. मलबारचे मोपले व कोकणी मुसलमान हे त्यांचे वंशज मानले जातात. अरबाची शेकडो घराणी हिंदुस्तानात स्थाईक झाली आहेत. उदाहरणार्थ प्रेषिताची मुलगी फातमा व जावई अली. फातमाला हसन, हुसेन अशी दोन मुले झाली. हसनच्या वंशजाना सय्यद म्हणतात तर हुसेनच्या वंशामध्ये एकामागून एक दहा गुरू झाले, त्यांना इमाम म्हणतात. त्याच्यापैकी मुसाल, रिजा, नकी, जाफर इत्यादी इमामांच्या नावावरून त्यांच्या वंशजानी मुसवी, रिजवी, नकवी, जाफरी, अशी आडनावे लावली. अलीचे इतर वंशज अलवी, खलिफा उमरचे वंशज फारूखी आणि खलीफा अबु बक्र यांचे वंशज सिद्दीकी हे होत. ही सर्व घराणी हिंदुस्थानात स्थाईक झाली.[144]

इस्लामी साम्राज्याची पहिली राजधानी मक्का होती त्यानंतर सिरीया मधील दमास्कस आणि शेवटी इराक मधील बगदाद या राजधान्या होत्या. बगदादच्या खलिफाच्या आज्ञेवरून इ. स. 710 मध्ये महंमद बीन कासीम याने सिंधचा ब्राह्मण राजा दाहिरचा पराभव केला.[145] भारतातील हे पहिले इस्लामी आक्रमण होय. सिंध प्रांत अरबांच्या ताब्यात जवळपास 150 वर्षे होता. अरबांनी सिंधच्या बाहेर हातपाय पसरण्याचा प्रयत्न केला परंतु गुर्जर, प्रतिहार, गुजरातचे चालुक्य व चितोडचे बप्पा रावळ यांच्या प्रखर प्रतिकारामुळे ते शक्य झाले नाही. अरबांच्या ताब्यातुन सिंध प्रांत पुढे तुर्कांच्या ताब्यात गेला. अरबांनी मध्य आशिया जिंकुन घेतल्यावर इ. स. 9 व्या शतकात तुर्कांनी इस्लामचा स्वीकार केला. त्यानंतर तुर्क खलिफाच्या सैन्यात भरती होऊन सर्व अरबी साम्राज्यात पसरले. त्यातील एका प्रमुख राज्याचा बादशाह महंमद गझनी हा होता. इ. स. 999 ते 1050 च्या दरम्यान गझनीने हिंदुस्तानवर देवळे व मूर्ती फोडण्याच्या हेतुने एकूण 17 स्वाऱ्या केल्या. परंतु हिंदुस्तान जिंकणे हा त्याचा हेतु नव्हता. गझनीच्या मृत्युच्या वेळी त्याच्या ताब्यात पंजाब, सिंध व सीमा प्रांत हे होते. त्याच्या वंशजाने इ. स. 1190 पर्यंत पंजाबमध्ये राज्य केले.[146] अफगाणिस्तानातील एक तुर्की सरदार महंमद घोरीने हिंदुस्तान जिंकण्यासाठी स्वारी केली.[147] (इ.स. 1191) तराईच्या लढाईत पृथ्वीराज चौहान याने महंमद घोरीचा पराभव केला. घोरीने पुन्हा स्वारी केली आणि पृथ्वीराजला ठार मारले व अजमेर जिंकून घेतले. पुढे कनौजवर स्वारी करून जयचंद राठोडला ही ठार केले आणि उत्तर हिंदुस्तानात इ. स. 1206 पर्यंत तुर्कीचे राज्य पसरले.[148] इ. स. 1206 पासुन इ. स. 1526 पर्यंत दिल्लीवर गुलाम, खिल्जी, तुघलक, सय्यद, लोदी घराण्यातील 34 राजांनी राज्य केले. मध्य आशियातील मोगल टोळ्या हिंदुस्थानावर सतत हल्ले करत होत्या. तैमुरलंगने इ. स. 1398 मध्ये तुघलकचा पराभव करून संपूर्ण दिल्ली शहर लुटले. सय्यद व लोदी घराण्यातील राजे परकीय आक्रमकाच्या स्वाऱ्या व अंतर्गत लाथाळ्यांमुळे खिळखिळे झालेल्या राज्यावर आले. यावरून असे म्हणता येईल की या साऱ्या राजवटींचे आसन डळमळीत होते. याचवेळी इ. स. 1526 मध्ये पानिपत येथे बाबराने इब्राहिम लोदीचा पराभव करून भारतामध्ये मोगली साम्राज्याचा पाया घातला.

बाबराचा मुलगा हुमायुन होता. शेरशहा सुरीने मोगलांविरूध्द देशी मुसलमानांचे नेतृत्व केले. त्याने हुमायुनला हिंदुस्तानच्या बाहेर हाकलून दिले. शेरशहाच्या मृत्युनंतर इ.स. 1555 मध्ये हुमायुनने आपले राज्य परत मिळविले. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा अकबर इ. स. 1556 ते 1605 या कालावधीत गादीवर होता.

अकबर, जहाँगीर, शहाजहान व औरंगजेब या चार मोगल सम्राटांनी इ. स. 1556 ते 1707 या काळात राज्य केले. अकबराने नवा प्रदेश जिंकणे, जिंकलेल्या प्रदेशावर ताबा ठेवणे, कर वसुली, इत्यादी बाबींवर आपले लक्ष केंद्रीत केले होते. त्याने रूढीवादी इस्लामचा त्याग करून ‘दीन-ए-इलाही’ या नव्या धर्माची स्थापना केली

होती (इ.स. 1582). जहाँगीर व शहाजहानच्या काळात मोगल साम्राज्याचे वैभव टिकले. या काळात इस्लामच्या प्रचार व प्रसारासाठी हिंदूचा छळ होत नव्हता, असे नाही. औरंगजेबने इतर धर्मीयांशी सलोखा करण्याचे धोरण सोडून दिले आणि हिंदूंची देवळे व मूर्ती फोडण्याचा सपाटा लावला. इस्लामेतर प्रजेवर जिझिया कर लादला. या गोष्टीमुळे मोगलांपासून रजपुत दूर गेले व दक्षिणेस मराठी सत्तेचा उदय झाला.[149] इ. स. 1707 मध्ये औरंगजेब मृत्यु पावला. इ. स. 1757 मधील प्लासीच्या लढाईपर्यंत मोगल साम्राज्य कसेबसे टिकून होते. प्लासीच्या लढाई नंतर बंगाल मध्ये ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली व भारतातील मोगल सत्तेचा शेवट झाला.[150]

वरील परिस्थितीवरून असे दिसते की हिंदुस्तानच्या सिंहासनावर तुर्की व अफगाणी या परक्या जमाती सत्तेसाठी सदैव भांडत होत्या. काही राजवर्चस्वामुळे तर काही मुस्लिम साधुसंताच्या धर्मांतराच्या कार्यामुळे हजारो भारतीय इस्लामचा स्वीकार करून मुसलमान झाले. काश्मीर खोऱ्यात आज शेकडा 92 % मुसलमान आहेत. यांचे मुळ कारण हामदानी नामक सूफी साधू होय.[151] पूर्व बंगालमधील जनतेने 16 व्या शतकापर्यंत मोठ्या प्रमाणात धर्मांत्तर केले. पश्चिम पंजाबमधील जाट, गुजरातेतील बोहरी, केरळ मधील मोपले, सिंध मधील बहुसंख्य लोक याच काळात मुसलमान झाले.[152] वरील ऐतिहासिक आढाव्यावरून हिंदुस्थानातील त्याकाळची इस्लामची स्थिती लक्षात येण्यासारखी आहे. आपले पूर्वज एकेकाळी या भूमीचे राजे होते असे मुसलमान मानतात. इस्लामचा जो काही प्रभाव शिल्लक आहे, त्याचे हेच मुख्य कारण आहे. मूळच्या वंशाने शुध्द असणाऱ्या मुसलमानांची वंशिक शुध्दता हिंदू बरोबरच्या विवाहामुळे हळुहळु कमी होऊ लागली आहे. मुसलमानातील काही घराणी वांशिक दृष्टीने आम्ही शुध्द आहोत असा जरी दावा करीत असतील तरी बहुसंख्य मुसलमान त्यातल्या त्यात बंगाल व दक्षिण हिंदुस्थानातील मुसलमान वंशाने हिंदूच आहेत. [153]

**2.8.2 सामाजिक परिस्थिती :-**

कोणतेही सामाजिक परिवर्तन हे समाजातील अंतरक्रियेचा भाग असते परंतु राजकीय शक्ती त्याला गती देते. इस्लामच्या एकेश्वरवाद तत्वाने भारतात सामाजिक परिवर्तनास सुरूवात केली होती. मुरे टायसन आपल्या 'इंडियन इस्लाम' (1930) या ग्रंथात असे म्हणतो - ''शांतीपूर्ण व संयमी धर्मांतराचे अनेक पुरावे मिळतात. धार्मिक प्रचारक व व्यापाऱ्यांच्या माध्यमातून धर्मांतर घडून आलेले आहे आणि हे ही कबुल करण्याची गरज आहे, की इस्लामच्या अत्यंत प्रभावी लोकतांत्रिक सामाजिक पध्दतीने भारतातील पददलितांना, मागास जातींना केलेल्या समतेच्या आवाहनामुळे भारतातील लाखो लोकांनी धर्मांतर केले आहे.'' [154]

अरबी व्यापाराचा पहिला संबंध व्यापाराच्या माध्यमातून इ. स. 6 व्या शतकातच झालेला आहे. अरब व्यापारी समुद्री व्यवसाय पारंगत होते. ते बसरा व जेद्दाह या बंदरातुन भारतातील कराची, भडोच, खंबात, कोकणपट्टी, केरळचा समुद्र किनारा ओलांडून सिंध पर्यंत जात होते.

हिंदुस्थानात इस्लामचा चंचु प्रवेश इ. स. 629 पासुनच सुरू झाला. यावर्षी भद्रेश्वर (कच्छ) येथे त्यांनी सोळा खांबी मशिद बांधली. इ. स. 629 मध्येच कंगानुर (केरळ) येथे जामेमशिद बांधल्याचा उल्लेख आढळतो.[155] मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणाच्या वेळी समाज जसा आचार धर्माच्या ओझ्याखाली डोळेझाक करित होता. तसेच राज्यकर्ते देखील या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहताना दिसत नव्हते. उत्तर हिंदुस्थानातील काही राजांनी मुस्लिमांना प्रखर विरोध केला. पण काही राजांनी मात्र मुस्लिमांचे स्वागत केले. तसेच दक्षिणेतील अनेक राजांनी मुसलमानांचे आपल्या राज्यात स्वागत केले. मलबार (केरळ) येथील चेरामल, पुरूमल राजांनी अरब सौदागरांचे स्वागत तर केलेच पण अरबांनी आपल्या व्यापाराने मलबार समृध्द करावा म्हणून चेरामल, पुरूमल राजानी इस्लाम धर्म स्विकारला.[156]

झमोरिन  राजानेही अरबांचे सागरी कौशल्य आपल्या प्रजेला प्राप्त व्हावे म्हणून असा आदेश दिला की ‘माझ्या राज्यामधील प्रत्येक कोळी परिवारांतील एका पुरूषाने तरी इस्लाममध्ये गेले पाहिजे.’ [157]

हे ज्ञात आहे की अनेक अरब व्यापारी भारताशी व्यवसाय करत होते. या व्यापाऱ्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून युरोपपर्यंत व्यापारी मार्ग विकसित केले होते. बरेच अरब सिंध मध्ये वस्ती करून रहात होते. अनहिलवारा, कॉम्बेय, सिंधान, कालिकत आणि सिलॉन येथे मुस्लिम वस्ती होवू लागली. हिंदुशी कौटुंबिक संबंध जोडून ते येथेच स्थाईक झाले. मुरे टायटसच्या मते अरब आणि हिंदु यांच्या संमिश्र संस्कृतीने येथे आकार घेतला. यांची मुले ‘नातिया’ मुस्लिम म्हणून प्रसिध्द झाली. कोंकणी मुस्लिम व मोपला मुस्लिम अशा प्रकारे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतुन भारतात निर्माण झाले.[158]

तर जफर शरीफ ‘इस्लामची जीवन पध्दती’ या ग्रंथात म्हणतात “नातिया म्हणजे इस्लाममध्ये नव्याने आलेले लोक अशी समजूत आहे परंतु हे नाव अरबी कुरेश टोळीच्या नाईत या शाखेवरून आले असण्याचा अधिक संभव आहे. त्याच्याबद्दल असे म्हंटले जाते की त्यांना इ. स. 8 व्या शतकामध्ये इराकमधून हाकलून लावण्यात आले व ते दक्षिण हिंदुस्थानात आले. पश्चिम किनारपट्टीत राहणाऱ्या नातियानी हिंदुस्थानी लोकां बरोबर बेटी व्यवहार करणे टाळून आपल्या रक्ताची शुध्दता राखली आहे. काही काळ पर्यंत तर त्यांनी वरिष्ठ वर्गीय मुस्लिम कुटुंबाशी सख्य करणे नाकारले होते.” [159]

केरळी मोपल्यांच्या संदर्भात जफर शरीफ म्हणतो, मोपला हे नाव खरे म्हणजे ‘माप्पीला’ आहे. ही सन्मानदर्शक पदवी आहे व तिचा अर्थ श्रेष्ठ मुले असा आहे. पश्चिम किनाऱ्यावर मोपलांची मिश्र रक्ताची जमात आहे. या जमातीत मलबार मधील गुलाम टोळ्या धर्मांतर करून सतत भरती होतात. मोपला लोकांत शिया व सुन्नी अशा दोन्ही शाखा आहेत. ते अधून मधून धर्मवेडाने झपाटले जातात. [160]

कंगानुरच्या मलिक बिन हबीब याने सर्वप्रथम क्युलोन (केरळ) येथे मशिद बांधली त्यानंतर हिली, मरावी, सहित आणि सात ठिकाणी मशिदी बांधल्या. मलबारमध्ये इस्लाम धर्म वेगाने पसरण्याचे कारण म्हणजे झामोरिन या हिंदू राजाने स्विकारलेला इस्लाम धर्म होय. त्याच्यामुळे हजारों हिंदूनी इस्लामचा स्वीकार केला. [161]

हिंदुस्थानातील मुसलमान हे मुख्यतः चार गटात विभागले आहेत. सय्यद, शेख, मोगल आणि पठाण अशा चार गटात विभागले.[162] गुजरात व मध्य हिंदुस्थानातील बोहरा हे इस्माईलिया पंथाचे आहेत. ते मुसा-अस-सादीकच्या ऐवजी इस्माईल-इब्न-जफरला खरा इमाम मानतात. बोहरा लोकांत सुन्नी व शिया दोन्ही शाखांचे लोक आहेत. शिया बोहरांचा नेता आगाखान हा होता.[163]

मेमना हे रुढीवादी शिया मुस्लिम आहेत. ते मूळचे गुजरात मधील हिंदू होते. इस्माईलिया धर्मप्रचारकांनी त्यांना इस्लाममध्ये आणले परंतु अहमदाबाद मधील मोमना काही वेळा स्वतःला हिंदू नावे लावतात व लग्न लावण्यासाठी काझीबरोबर ब्राह्मणांनाही बोलवतात. [164]

अशाप्रकारे हिंदुस्थानात इस्लामचा प्रवेश इ. स. 6 व्या शतकात झालेला दिसून येतो. इस्लामची राजकीय सत्ता इ. स. 12 व्या शतकात प्रस्थापित झाली म्हणजेच सुमारे 500 वर्षे भारतीय समाज रचनेमध्ये इस्लामचा प्रवेश झाला आहे हे ऐतिहासिक सत्य आहे. वरील सर्व घटकांवरून असे स्पष्ट होते की इस्लामचा प्रचार, प्रसार तलवारीच्या जोरावर होण्यापूर्वी भारतात इस्लाम अस्तित्वात होता. मुस्लिमांचे वेगवेगळे समुह हिंदुस्थानामध्ये स्थाईक झाले होते आणि त्यातुनच इस्लामी प्रचार व प्रसार अधिक सहज सुलभ झाला. व्यापाराच्या निमित्ताने आलेले अरबी मुस्लिम येथील लोकांशी कौटुंबिक संबंध जोडून ते येथेच स्थाईक झाले आणि यातूनच खऱ्या अर्थाने भारतामध्ये इस्लामची मुहर्तमेढ रोवली गेली असे आपणास म्हणता येईल.

## 2.9 आजची इस्लामची व्याप्ती :-

इस्लाममध्ये सुन्नी व शिया हे मुख्य दोन पंथ आहेत. सुन्नी या शब्दाचा अर्थ ईश्वराने आखून दिलेल्या मार्गाने जाणारा, परंपरेनुसार वागणारा असा आहे. तर शिया शब्दाचा अर्थ अनुयायी म्हणजे प्रेषिताची चुलत भावंडे व जावई अली यांचा अनुयायी असा आहे.[165] शिया लोक अलीला पहिला इमाम मानतात त्यामुळे सुन्नी लोक मानत

असलेल्या अबु वक्र, उमर व उस्मान या पहिल्या तीन खलिफांना ते मानत नाहीत म्हणून शियांना इमामीया असे म्हणतात. तर सुन्नी शियांना 'राफीजी' म्हणजे सत्य सोडून दिलेले असे म्हणतात. [166]

हिंदुस्थानात शिया व सुन्नी यांचे संबंध मित्रत्वाचे नसले तरी परस्परात सहिष्णुता दिसते. धर्मग्रंथ, परंपरा व धर्माज्ञांचे निर्णय यावरून इस्लाम ही बाह्यतः सुसंघटित संस्था आहे असे दिसते. पण सर्व हिंदुस्थानभर तत्व, धार्मिक निधी, सामाजिक आचार याबाबतीत पुष्कळ फरक दिसतात. हिंदुस्थानातील बहुसंख्य मुस्लिम गट इस्लामच्या मध्यवर्ती केंद्रापासून एकटे पडल्याने व इस्लामच्या धर्मांतरीत अनुयायांनी आपल्या बरोबर मूळ धर्मातील रूढी, रितीरिवाज व तत्वे आणल्यामुळे हे फरक पडलेले आहेत. हिंदुस्थानात असलेल्या इस्लामचे जे स्वरूप आहे, त्यामुळे हे फरक असणे स्वाभाविक आहे. कारण हिंदुस्थानमध्ये इस्लामचे कोणतेही मोठे केंद्र नाही. श्रध्दा व आचारातील तळमळ ही सामान्यतः विशिष्ट वर्गाच्या भक्तापुरती व विशिष्ट प्रसंगापुरती मर्यादित आहे. मोहरमच्या सणात धार्मिक उत्साह ओसांडून वाहतो पण हा सण शियासाठी दुःखाचा व आत्मग्लानीचा असतो.[167] रमजान हा उपवासाचा महिना असतो याचवेळी विशिष्ट प्रार्थना मोठ्या भक्तीने म्हंटल्या जातात.

2001 च्या भारतीय जनगणनेतील उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार मुस्लिम लोकसंख्या 13 % होती. विशेष म्हणजे मुसलमानांच्या एकूण लोकसंख्येपैकी 71.2 % मुसलमान ग्रामीण भागात राहणारे असून 27.8 % मुसलमान शहरी भागात राहतात. जम्मु व काश्मीर भागात मुस्लिमांची लोकसंख्या 64 % आहे. लक्षव्दीप बेटावर देखील ते बहुसंख्य आहेत. केरळ व पश्चिम बंगाल राज्यामध्ये त्यांचे प्रमाण 21 % आहे. उत्तर प्रदेश मध्ये 16 %, बिहार मध्ये 14 %, कर्नाटक मध्ये 17 % असून महाराष्ट्रात त्यांचे प्रमाण 10 % पेक्षा थोडेसे जास्त आहे. महाराष्ट्राच्या 30 जिल्ह्यात 20 % पेक्षा जास्त व 50 % पेक्षा कमी प्रमाण आहे. भारतातील 102 जिल्ह्यांमध्ये मुस्लिमांची लोकसंख्या 5 ते 10 % पर्यंत आहे. किंबहुना भारतातील एकूण 356 जिल्ह्यातून मुस्लिम विखुरलेले असुन ओरिसा सारख्या राज्यात त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण 1.23 % एवढे कमी आहे.[168]

मुसलमानांची ही विखुरलेली लोकसंख्या व विविध राज्यातील त्याच्या लोकसंख्येचे वेगवेगळे प्रमाण यांचे प्रमाण त्यांची समाजरचना, वर्तन व मानसिकता यावर झालेले आहे. भारतीय मुसलमानांमध्ये इस्लाम मधील सर्व पंथ व भेद आहेतच पण भारतीय समाजरचनेतून काही मिश्रीत पंथ निर्माण झालेले दिसून येतात. भारतीय मुसलमानांच्यात शिया, सुन्नी व वहाबी हे भेद असून अहमदीया, कादियानी व मेहदवी हे पंथ तर सर्वस्वी इथेच निर्माण झालेले आहेत. याशिवाय इस्माईली, दाऊदी बोहरा, खोजा, सुलेमानी खोजा व कच्छी मेमन हे पंथ देखील आहेत. याशिवाय तबलिगी जमात व जमाते इस्लामी यासारख्या अनेक चळवळीचे रूपांतर एक प्रकारे पंथ भेदात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतातील या वेगवेगळ्या पंथातील मुसलमानांमध्ये सर्वप्रकारचे संघर्ष व

फरक दिसून येतात. अनेक ठिकाणी त्यांचे धर्मगुरू, मशिदी, धर्मप्रवचने व धार्मिक आचार-विचार यांच्यात भिन्नता असते. त्यांचे धर्मशास्त्र व व्यक्तिगत कायदे देखील भिन्न भिन्न आहेत. प्रत्येक राज्यातील इस्लामी पंथीयाचे सांस्कृतिक जीवन, चालीरिती यामध्ये भिन्नता आढळते. किंबहुना वेगवेगळ्या भारतीय प्रदेशातील भाषा व संस्कृतीचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो.

मुस्लिम समाजरचनेवर प्रादेशिक संस्कृतीचे परिणाम झालेले दिसून येतात. उत्तरेतील मुसलमानांवर तेथील नबाब, संस्थानिक, जमीनदार व धर्मगुरू यांच्या संस्कृतीचा व सरंजामशाहीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. तर महाराष्ट्रातील मुसलमान येथील मातीच्या प्रभावाखाली असलेला दिसून येतो. दक्षिण भारतातील मुसलमान हे वांशिक दृष्ट्या पूर्णपणे हिंदू समाजाचा घटक आहे.[169] यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की भारतीय मुसलमान हा धार्मिक व वांशिकदृष्ट्या हिंदुपेक्षा फारसा वेगळा नाही. कारण भारतातील बहुसंख्य मुस्लिम हे धर्मांतरीत आहेत. त्यामुळे आक्रमण, स्थलांतर आणि धर्मांतर यामुळे त्याच्या जीवनशैलीत थोडासा फरक असलेला आढळून येतो. इम्तियाज अहमद यांचे म्हणणे आहे, की ‘‘सर्व मुसलमान इस्लामची सर्व तत्वे व सिध्दांत मानत असले तरी त्याच्या व्यवहारात भिन्नता आहे. ते ज्या प्रदेशात असतात त्या प्रदेशातील संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव असतो.’’[170]

मूलतत्ववादाच्या चळवळी भारतात सुरू असल्या तरी त्याचा प्रभाव काही मूठभर लोकांवरच आहे. कारण भारतीय मुसलमान पूर्णतः पोथीनिष्ठ नाहीत. भारतातील बहुसंख्य मुसलमान सूफी संतांच्या दर्ग्यांना मानतात. मोहरमचा सण भारतात ज्या पध्दतीने साजरा होतो तसा अन्य कोठेही साजरा होत नाही. यावरून असे म्हणता येईल की मूठभर मूलतत्ववाद्यांच्या चळवळी जरी भारतात असल्या तरी ही मिश्र व प्रादेशिक श्रध्दा तसेच प्रादेशिक संस्कृतिच्या प्रभावापासून भारतीय मुसलमान मुक्त नाहीत. धर्मांतरीत जाती जमातीनी इस्लाम स्विकारला असला तरी सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या ते भारतीय संस्कृतीचा एक घटक आहेत. म्हणून वहाबी व तबलीगी चळवळी इ. स. 1920 साला पासुन प्रयत्न करीत आहे, की ज्या गोष्टी गैर इस्लामी आहेत त्या इस्लाममधून नष्ट झाल्या पाहिजेत, परंतु भारतातील बहुसंख्य मुस्लिमांनी याला पाठिंबा दिलेला नाही. सूफी दर्ग्यांना विरोध करणारी तबलीगी चळवळ येथे सफल झाली नाही.[171]

भारतात आज मुसलमान अल्पसंख्याक आहेत. मध्ययुगीन भारतात त्यांना राजकीय वर्चस्व होते पण ते आज शिल्लक नाही त्यामुळे मुस्लिम समाज आपले वेगळेपण दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी आवश्यकता आहे ती म्हणजे शिक्षणाची आणि आज मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. इतर धर्मीयांच्या तुलनेत शिक्षणाबाबतची अनास्था मुस्लिमांमध्ये अधिक प्रमाणात जाणवते ही वस्तुस्थिती आहे.

मुस्लिमांमध्ये असणारे आर्थिक व सामाजिक मागासलेपण या बाबीस कारणीभूत आहेत. शिक्षण नसल्यामुळे आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये ही मुसलमान मागे आहेत. नेसार अहमद यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार मुसलमान पुरूष 59.5 % साक्षर आहेत तर स्त्रियांचे प्रमाण 38 % इतकेच आहे. मुस्लिम समाजाचे शाळा गळतीचे प्रमाण 6.9 % इतके आहे. ग्रामीण भागातील 2.2 % मुस्लिम पुरूष व 0.5 % मुस्लिम स्त्रिया पदवीधर आहेत.[172]

मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येचा 80 % पेक्षा जास्त समाज हा अकुशल कामगारांचा आहे. लहान मोठे दुरुस्तीचे व्यवसाय तसेच मोलमजुरी करून हा वर्ग आपले पोट भरतो. जो सर्वसाधारणपणे अशिक्षित व अडाणी असतो. त्यामुळे या समाजात आर्थिक विवंचना कायमच असतात. हा वर्ग दारिद्र्य रेषेखालील असून सर्वप्रकारच्या अंधश्रध्दा बाळगून असतो. विशेष म्हणजे हे सर्व घटक मुस्लिमांतील मागासलेल्या व्यावसायिक जमातीतील दिसुन येतात. उदा. बागवान, मोमीन, जुलाहा (विणकर), नदाफ, तांबोळी, आत्तार, मणियार, खाटीक इत्यादी म्हणजे एका अर्थाने हे बलुतेदार पध्दतीतीलच लोक आहेत. इस्लामचा स्वीकार केल्यावर ही ग्रामीण व शहरी जातीतील व्यवसायाचे व संस्कृतीचे स्वरूप फारसे बदलेले नाही. धर्मांतरीत भारतीय मुसलमानातील जाती व्यवस्था नष्ट झालेली नाही त्यामुळे त्यांच्यात रोटी व्यवहार होत असले तरी बेटी व्यवहार मात्र होत नाही. जरी जगातील सर्व मुसलमान एक आहेत असे इस्लामचे मत असले तरी भारतीय मुसलमान जातीव्यवस्थेपासून मुक्त होवू शकला नाही.[173]

भारतीय मुसलमानांची भाषा कोणती याबाबत असंख्य मतभेद दिसून येतात. मुळात उर्दू ही लष्कराची, छावणीची भाषा म्हणून जन्माला आली. उत्तर भारतातील मुसलमान प्रामुख्याने खडी बोली हिंदी व तिच्या प्रादेशिक बोलीभाषांचा वापर करतो, तर दक्षिणेतील मुसलमान तेथील प्रादेशिक भाषांमध्ये आपला व्यवहार करतो. महाराष्ट्र, मराठवाडा व आंध्र प्रदेशचा काही भाग याठिकाणी दखन्नी हिंदीचा वापर केला जातो. उर्दूला मुस्लिमांची धर्मभाषा बनविण्याचा प्रयत्न गेल्या 70 ते 80 वर्षापासून मुस्लिमांच्यातील एका अभिजात वर्गाने केला आहे. उत्तर भारतातील मेरठ, दिल्ली, लखनौ, बिहारचा काही भाग व हैद्राबाद हा भाग सोडला तर मुसलमान प्रत्यक्षात उर्दूचा वापर करत नाहीत.[174] मुसलमानांच्या मध्ये शेतकरी वर्ग असा फारसा नाही, जो काही मुसलमान आहे तो शेतमजुर किंवा ग्रामीण भागातील बलुतेदारी व्यवसाय करणारा आहे.

भारतात सरकारी नोकरी मध्ये फक्त 5 % सेवक मुसलमान आहेत. केंद्र सरकारच्या मालकीच्या उद्योगामध्ये 3.3 % मुसलमान आहेत. राज्य सरकारच्या मालकी उद्योगात 10.8 % मुसलमान आहेत. भारतामध्ये IAS सेवेत त्याचे प्रमाण 3 %, IFS सेवेत 1.8 % तर IPS सेवेत 4 % आहे.[175] यावरून कोणत्याही बाजुने व कोणत्याही क्षेत्रातील मुस्लिमांचे प्रमाण पाहिले तर ते अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

भारतातील साक्षरता आणि उच्च शिक्षणामध्ये मुस्लिम महिलांची परिस्थिती खूप वाईट आहे. केवळ 14% शहरी मुस्लीम महिला 10 वी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्या आहेत, तर ग्रामीण महिलांच्या बाबतीत हे प्रमाण केवळ 3 % आहे.[176] प्रजनन संदर्भात एकुण जनन प्रमाण अधिक आहे. पण कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करण्याची प्रवृत्ती कमी आहे. त्याच बरोबर वैद्यकीय सोयीचा लाभ जन्म प्रक्रियेमध्ये घेण्याचे प्रमाण मुस्लिमांमध्ये खूपच कमी आहे. मुस्लिम महिलांना भेडसावणारे असंख्य प्रश्न आज आहेत. ज्यामध्ये बुरखा पध्दती, धर्माचा चुकीचा अर्थ, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी यामुळे मुस्लिम महिलांची स्थिती निराधार झाली आहे. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वितरण व्यवस्था या क्षेत्रांचा मुस्लिम लाभ घेत नाहीत. या सेवांचा लाभ या समाजाला मिळत नाही.[177]

वरील सर्व बाबींवरून असे म्हणता येईल की मुस्लिम समाजामध्ये परिवर्तनाची गती अत्यंत संथ आहे. भारतीय मुस्लिम समाजात एकीकडे साचलेपण जाणवते तर दुसरीकडे काही क्षेत्रात भारतीय मुसलमान राष्ट्रीय प्रवाहात आपला ठसा उमटवताना दिसुन येतात. उदा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम. मुस्लिम समाजाची वाटचाल अत्यंत संथ गतीने सुरू आहे. वर्तमान युग जागतिकीकरणाचे आहे. खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण यामुळे भारतातील नव्हेच तर जागतिक लघु उद्योग समुहाची परिस्थिती अतिशय बिकट आहे. आपण वर पाहिले आहेच की भारतीय मुसलमान हा पारंपारिक उद्योगधंद्याशी निगडीत असुन त्यांचे व्यवसाय या बदलत्या अर्थव्यवस्थेत मोडकळीस येऊ लागले आहेत. कल्याणकारी अर्थशास्त्र ही संकल्पना मागे पडून पुन्हा शतकापूर्वीचे ॲडम स्मिथचे अर्थशास्त्र आज जगावर राज्य करू लागले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या, परकीय भांडवल, नवीन तंत्रज्ञान, परदेशी वस्तुंची आयात, इलेक्ट्रॉनिक मीडिया या सर्व बाबींमुळे बाजारवाद वाढीस लागला आहे. त्यामुळे देशी उद्योगांवर त्याचा वाईट परिणाम होत आहे. पर्यायाने देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. त्याचाच परिणाम देशाच्या विकास दरावर होतो. त्यामुळे कृषी क्षेत्र ही प्रभावित होत आहे. या सर्व बाबींचा परिणाम संपूर्ण भारतावर होत आहे. त्यामुळे मुस्लिम वर्ग ही यापासून मुक्त होऊ शकत नाही. मुस्लिम समाजाने शिक्षणाची कास धरून जर प्रयत्न केले तरच ते मागासलेपणातून मुक्त होतील अन्यथा त्यांची स्थिती पूर्ववत राहील.

**निष्कर्ष :-**

इस्लाम जगाबरोबरच भारतातील एक प्रमुख धर्म आहे. या धर्मांच्या अनुयायांना मुस्लिम अथवा मुसलमान म्हणून ओळखले जाते. इस्लामचा प्रभाव हिंदुस्तानच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक जीवनावर पडलेला दिसून

येतो. इस्लाम हा भारतातील एक प्रमुख धार्मिक अल्पसंख्य समाज होय. इ. स. 2001 च्या जनगणनेनुसार भारतात 13 % मुस्लिम आहेत.

भारतीय संस्कृतीमध्ये प्रबोधनाची परंपरा फार प्राचीन आहे. ज्यामध्ये बुध्द, महावीर, चार्वाक, कपील हे येतात. मध्ययुगात संत महात्म्यांनी या परंपरेला आधार दिला ज्यामध्ये कबीर, सूरदास, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, गुरूनानक, चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वर यांच्या पासुन थेट संत गाडगे महाराजांपर्यंत या परंपरेचा प्रवाह दिसतो. इस्लाममध्येही प्रबोधनाची परंपरा आहे. ज्यामध्ये निजामुद्दीन, ख्वॉंजा मुईनुद्दीन, बंदेनवाज, बाबा फरीद, इत्यादींचा समावेश होतो. आधुनिक काळात ब्रिटिश राजवटीमुळे भारतामध्ये अनेक सुधारक उदयास आले. त्यात प्रामुख्याने राममोहन रॉय, महर्षी देवेंद्रनाथ ठाकुर, महर्षी दयानंद सरस्वती, न्यायमूर्ती म. गो. रानडे, प्रि. गो. ग. आगरकर, महात्मा फुले, राजर्षि शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, वि. रा. शिंदे, प्रबोधनकार के. सी. ठाकरे इत्यादी नावे समोर येतात.

इस्लाममध्ये सुरूवातीपासून सुधारवादी प्रवाह दिसून येतात. कर्मठ मुसलमान पोथीनिष्ठ मुसलमान तर सूफी उदारमतवादी होते. कर्मठ इस्लाम व सूफी पंथ यामध्ये अल गजाली याने समन्वय घडवून आणला. आधुनिक काळात सर सय्यद अहमदखान यांनी मुस्लिम समाज आधुनिकतेकडे कसा जाईल यांचा प्रयत्न केला. डॉ. इक्कबाल, शेख हाली, मौलाना आझाद हे प्रबोधन परंपरेचे पाईक होते.

महाराष्ट्रातील मुसलमानांच्या प्रबोधनासाठी हमीद दलवाई यांनी 22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. या प्रबोधनपर चळवळी मध्ये त्यांना अनेक विचारवंताचे सहाय्य मिळाले ज्यामध्ये प्राचार्य नरहर कुरुंदकर, प्रा. अ. भि. शहा, मुमताज रहिमतपुरे, मोईन शाकीर, सय्यदभाई, हुसेन जमादार, अन्वर शेख, बशीर तांबोळी इत्यादी होते. या सर्वांनी महाराष्ट्राची प्रबोधन परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

इस्लामपूर्व परिस्थितीचा अभ्यास करताना असे दिसून येते की इस्लामपूर्व अरब समाज हा रूढीग्रस्त होता. सौदी अरेबियात इस्लाम हा धर्म जन्मास आला. अरबांचे पूर्वीचे जीवन एकुण भटके होते. मेंढपाळ, व्यापार, लुटमार हे अरबांचे प्रमुख व्यवसाय होते. सदैव संघर्षाची परिस्थिती असल्यामुळे व उदरनिर्वाहाची निश्चित साधन उपलब्ध नसल्यामुळे त्यांना भविष्यकालाचे भय वाटत असे. त्यामुळे हे अरब पराकोटीचे दैववादी झाले होते. अरबांचे एकूण कौटुंबिक जीवन अस्थिर होते. अरबांमध्ये गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. स्त्रियांना समाजामध्ये फारसा सन्मान नव्हता. 'बळी तो कान पिळी' हा तत्कालीन दंडक होता. थोडक्यात टोळी करून राहणारा हा समाज होता.

अरबी लोकांमध्ये अरब-उल-बायदा, अरब-उल् मुतअर्बिया व अरब-उल्-मुस्तादिबा असे तीन समुह होते. यांचे सत्तेसाठी आपसात सारखे संघर्ष चालत असत. रोमन व प्रशियन साम्राज्य अरबस्तानच्या चोहीकडे पसरले

होते. त्यांच्याशी अरबांचा तंटा होत असे. प्राचीन काळापासुन मक्का हे शहर एक मध्यवर्ती व्यापारी केंद्र असल्यामुळे त्यांची फार मोठ्या प्रमाणात भरभराट झाली होती. अरबस्तानात टोळ्यांचे राज्य असल्यामुळे सर्वत्र अनागोंदी व बेबंदशाही माजली होती. यामुळे व्यापारी काफिल्यांना त्याचा सदैव उपद्रव पोहचत असे. आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना असे दिसते की अरब भारत व बाह्य जगादरम्यानच्या व्यापारी संबंधातील एक दुवा होते. भारतातुन वस्तु आणून युरोप मध्ये विकणे हा अरबांचा मुख्य व्यवसाय होता. अरबस्तानात गुलामगिरीची प्रथा होती. गुलामांबरोबर स्त्रियांचाही व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. अरबी लोकांचे जीवन अस्थिर होते. लुटमार, व्यापार, शेती, पशुपालन यावर ते आपला उदरनिर्वाह करीत असत. मक्का, मदीना, ताईफ ही शहरे व्यापारी केंद्रें म्हणून भरभराटीस आली होती.

इस्लाम धार्मिक परिस्थितीचा विचार करता असे दिसुन येते की हा समाज अनेकेश्वरवादाची शिकार झालेला दिसून येतो. प्राचीन अरबी धर्मात सेमिटिक धर्मांचे मिश्रण आहे. सेमिटीक विचारधारे मध्ये ख्रिस्ती, यहुदी आणि इस्लाम बरोबरच खालडीयन, फिनिशियन, कॅननाईटस् वगैरे धर्मांच्या खुणा ही दिसून येतात. प्रत्येक दिवशी एक अशाप्रमाणे 360 देवतांची उपासना केली जात होती.

इस्लाम हा एक धर्म असून ती एक श्रध्दा व्यवस्था देखील आहे. अल्लाह सर्वश्रेष्ठ, महंमद अंतिम प्रेषित व कुराण ईश्वरीय धर्मग्रंथ हा इस्लामचा पाया आहे. अल्लाह निर्गुण निराकार आहे. सबब इस्लामला मूर्तीपूजा मान्य नाही. परमेश्वराला शरण जाणे, महंमदास अंतिम प्रेषित मानणे, कुराणयुक्त मार्गाचा अवलंब करणे ही इस्लामची जीवन पध्दती होय. त्यातूनच इस्लामी धर्म व संस्कृती आकारास येते. इस्लामची प्रमुख तत्वे नमाज, रोजा, जकात, हज व तौहीद ही आहेत. इस्लामी समाजव्यवस्था शरियत अर्थात मुस्लिम नागरी कायद्यावर चालते. शरियतचे चार प्रमुख स्त्रोत, कुराण, सुन्ना (हादिस), इज्जमा (एकमत), कियास (अनुमान) व फतवा हे आहेत. इस्लामी संस्कृतीचे पुढील आधारस्थंभ होत ज्यामध्ये परमेश्वर, कुराण, प्रेषित रसूल, ईश्वरीय आदेश, अंतिम निवाड्याचा दिवस आदी आहेत. ईश्वरी प्राप्तीच्या मार्गामध्ये तक्वा, इस्लाम, तवकुल, सब्र व शुक्र या तत्वाचे मार्गदर्शन होते.

प्रेषित कुरेशी या टोळीत जन्मास आला. वयाच्या 25 व्या वर्षी प्रेषिताने खदिजा नामक विधवा स्त्रीशी विवाह केला. तरूण वयापासून प्रेषित एकांतप्रिय होता. हिरा पर्वतावर महंमदास साक्षात्कार झाला आणि त्याने इस्लामची स्थापना केली. आपले संपूर्ण जीवन प्रेषिताने इस्लामच्या प्रचार प्रसारासाठी घालविले. इ.स. 632 मध्ये प्रेषिताचे निधन झाले पण तो पर्यंत जवळपास संपूर्ण अरबस्तान इस्लाममय झाला होता. प्रेषिताच्या शिकवणुकीने अरब समाजाला आत्मविश्वास प्राप्त झाला. शंभर वर्षांच्या कालावधीत इस्लामचे साम्राज्य युरोप, आफ्रिका, मध्य आशिया पर्यंत पसरले होते. तत्कालीन ख्रिश्चन धर्माची तुलना करता इस्लामचा संदेश केवळ अरबांच्या वर नव्हे

तर ते ज्या ज्या ठिकाणी गेले त्या त्या ठिकाणच्या लोकांवर फार मोठा परिणाम झाला. बेलगाम राजे व शिरजोर पुरोहित यांच्यामुळे जनता त्रस्त झाली होती. तिला बदल हवा होता. इस्लामने तो बदल दिला. यावरून असे म्हणता येईल, महंमद पैगंबर आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत जनतेला सन्मार्ग दाखविण्यासाठी झटत होते.

इस्लामच्या साम्राज्याला इ. स. 1258 पासुन उतरती कळा लागली. पुढे खलिफाचे पद नामधारी राहिले. जे कमाल पाशाने 3 मार्च 1924 रोजी रद्द करून टाकले. भारतामध्ये अरबांच्या वसाहती इ. स. 7 व्या शतकापासून होत्या आणि भारताच्या किनारपट्टीवर अनेक अरब स्थाईक झाले होते. इ. स. 710 मध्ये महंमद बीन कासिमने आक्रमण केले. सिंध प्रांत जवळपास 150 वर्षे अरबांच्या ताब्यात होता. इ. स. 1206 पासुन इ. स. 1757 पर्यंत भारतामध्ये इस्लामिक राजवट होती आणि त्यानंतर ब्रिटिश सत्तेचा उदय झाला. भारतामध्ये धर्मांतराने व काही वेळा हुकुमशाहीमुळे हजारो भारतीय इस्लामचा स्विकार करून मुसलमान झाले. भारतातील बहुसंख्य मुसलमान हे पूर्वाश्रमीचे हिंदूच आहेत. त्यामुळे जरी ते धर्मांतरित झाले. तरी त्यांनी आपली जातीव्यवस्था इस्लाममध्येही कायम ठेवलेली दिसते. भारतामध्ये अनेक वेगवेगळ्या पंथातील मुसलमानांमध्ये अनेक फरक दिसुन येतात. मुस्लिम समाजरचनेवर प्रादेशिक संस्कृती आणि भाषा यांचा प्रचंड प्रभाव दिसुन येतो. भारतीय मुसलमान हा धार्मिक व वांशिकदृष्ट्या येथील हिंदूपेक्षा फारसा वेगळा नाही. यांचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील बहुसंख्य मुस्लिम हे धर्मांतरित आहेत. मूलतत्ववादाच्या चळवळीस भारतात फारसा प्रतिसाद मिळालेला दिसत नाही कारण भारतीय मुसलमान पूर्णतः पोथीनिष्ठ नाहीत. अनेक जाती जमातींनी इस्लामचा स्विकार केला असला तरी सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या ते भारतीय संस्कृतीचा एक घटक आहेत.

मुस्लिमांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करताना असे दिसून येते की मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. शिक्षणाबाबतची अनास्था व आधुनिकतेला विरोध मुसलमानांमध्ये अधिक प्रमाणात जाणवतो. मुसलमानांमध्ये असलेले आर्थिक व सामाजिक मागासलेपण या बाबीस कारणीभूत आहेत. शिक्षण नसल्यामुळे आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मुसलमान मागे आहेत. मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येचा 80 % पेक्षा अधिक भाग हा अकुशल कामगारांचा आहे. हिंदु धर्मीयातील ज्या बलुतेदारांनी धर्मांतर केले त्यांच्यातील जातीव्यवस्था नष्ट होऊ शकली नाही त्यामुळे त्यांच्यात रोटी व्यवहार होत असले तरी बेटी व्यवहार होऊ शकत नाहीत. जगातील सर्व मुसलमान एक आहेत असे इस्लामचे मत असले तरी भारतीय मुसलमान जातीव्यवस्थेपासुन मुक्त होऊ शकला नाही. उर्दूला मुसलमानांची धर्मभाषा बनविण्याचा प्रयत्न गेल्या 70/80 वर्षांपासून होत आहे पण उत्तर भारतातील काही भाग वगळता भारतीय मुसलमान हा प्रादेशिक बोली भाषा व हिंदीचा वापर करतो. सरकारी नोकरीमध्ये फक्त 5 % मुसलमान आहेत यावरून सार्वजनिक क्षेत्रातील मुस्लिमांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे

दिसते. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वितरण व्यवस्था या क्षेत्रातील सुविधा मुस्लिमांना उपलब्ध होत नाहीत. साक्षरतेचे प्रमाण या समाजामध्ये अत्यंत कमी आहे. मुस्लिम महिलांची परिस्थिती अधिक वाईट आहे. बुरखा पध्दती, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, यामुळे मुस्लिम महिलांची स्थिती निराधार झाली आहे.

वरील सर्व बाबींवरून असे म्हणता येईल की मुस्लिम समाजामध्ये प्रगतीची चिन्हे दिसून येत नाहीत कारण मुस्लिम समाजाची वाटचाल अत्यंत संथ गतीने सुरू आहे. एकीकडे हा समाज डबक्याप्रमाणे दिसतो तर काही क्षेत्रामध्ये या समाजातील लोक आपली छाप सोडून देत आहेत.

जागतिकीकरणाचा रेटा मानव जातीला प्रगतीपथाकडे ढकलत आहे. यास हिंदुस्थान ही अपवाद नाही. आजच्या मुस्लिम समाजाने शिक्षणाची कास धरली तर तो समाज निश्चित प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागेल व एका समृध्दी बलशाली व बलिष्ठ हिंदुस्तानच्या पायाभरणीत आपले योगदान देईल याबद्दल संशोधकाच्या मनात कोणताही संशय नाही.

**संदर्भ सूची**

1. अमीन सय्यद अहमद - 'इस्लाम आणि संस्कृती', प्रकाशक अमीन सय्यद सांगली, प्रथम आवृत्ती 1950 पृ. क्र. 164.
2. मोरे शेषराव - 'मुस्लिम मनाचा शोध', राजहंस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 73.
3. कित्ता पृ. क्र. 74.
4. कित्ता पृ. क्र. 74.
5. उपरोक्त - अमीन सय्यद, 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 5.
6. भावे विनोबा - 'कुराण सार' परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा 1983 पृ. क्र. 56.
7. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 37-38.
8. साने गुरूजी - 'इस्लामी संस्कृती' ॲमिटी प्रकाशन, कोल्हापूर तृतीय आवृत्ती 1993 पृ. क्र. 14.
9. अमीन सय्यद अहमद - 'हजरत महंमद पैगंबर' प्रकाशक अमीन सय्यद सांगली, तृतीय आवृत्ती 1956 पृ. क्र. 9.
10. साने गुरूजी उपरोक्त 'इस्लामी संस्कृती' पृ. क्र. 28.
11. कित्ता पृ. क्र. २९.

12. उपरोक्त - मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 76.

13. कित्ता पृ. क्र. 76.

14. उपरोक्त अमीन सय्यद - 'हजरत महंमद पैगंबर', पृ. क्र. 2.

15. उपरोक्त मोरे शेषराव - 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 76.

16. गुप्त माणिकलाल - 'विश्व का इतिहास' एटलॅटिक पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स दिल्ली, प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 60.

17. कित्ता पृ. क्र. 61-62.

18. उपरोक्त अमीन सय्यद 'हजरत महंमद पैगंबर' पृ. क्र. 2.

19. लेव्ही रूबेन अनुवाद केळकर श्रीपाद - 'इस्लामची सामाजिक रचना' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1976 पृ. क्र. 24.

20. Savary R. M. - 'Introduction to Islamic civilization' P. N. 18.

21. कित्ता पृ. क्र. 22.

22. कित्ता पृ. क्र. 16.

23. उपरोक्त - गुप्त माणिकलाल - 'विश्व का इतिहास' पृ. क्र. 59.

24. उपरोक्त - मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 77.

25. मेहता जे. एल. 'मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास' खंड तीन के. सागर पब्लिकेशन पुणे व्दितीय आवृत्ती 2010 पृ. क्र. 89.

26. उपरोक्त अमीन सय्यद अहमद - 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 19.

27. उपरोक्त गुप्त माणिकलाल - 'विश्व का इतिहास' पृ. क्र. 60.

28. उपरोक्त मोरे शेषराव - 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 77.

29. मौलाना मौदुदी - 'इस्लामची जीवन व्यवस्था' इस्लामी मराठी पब्लिकेशन मुंबई 1994 पृ. क्र. 22.

30. उपरोक्त गुप्त माणिकलाल - 'विश्व का इतिहास' पृ. क्र. 60.

31. कित्ता पृ. क्र. 61.

32. उपरोक्त अमीन सय्यद - 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 5.

33. कित्ता पृ. क्र. 5.

34. कहाळे एम. यु. - 'प्रेषित महंमद (स) विश्वनायक' इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई प्रथम आवृत्ती 2007 पृ. क्र. 13.

35. उपरोक्त मोरे शेषराव - 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 78.

36. उपरोक्त साने गुरूजी 'इस्लामी संस्कृती' पृ. क्र. 34.

37. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 78.

38. कित्ता पृ. क्र. 79.

39. उपरोक्त साने गुरूजी 'इस्लामी संस्कृती' पृ. क्र. 42.

40. उपरोक्त अनुवाद केळकर श्रीपाद 'इस्लामची सामाजिक रचना' पृ. क्र. 39.

41. उपरोक्त मोरे शेषराव - 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 79.

42. उपरोक्त अमीन सय्यद अहमद 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 18.

43. कित्ता पृ. क्र. 30.

44. पगडी सेतु माधवराव 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध' परचुरे प्रकाशन मुंबई मार्च 1986 पृ. क्र. 3.

45. मौदुदी अबुल आला भाषांतर शेख अब्दुल हमीद, 'इस्लाम प्रबोध' इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई सातवी आवृत्ती जुलै 2007 पृ. क्र. 8.

46. कित्ता पृ. क्र. 8.

47. घुगरे सूर्यकांत डॉ. 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज' साधना बुक स्टॉल गडहिंग्लज दूसरी आवृत्ती 2002 पृ. क्र. 138.

48. कित्ता पृ. क्र. 138-139.

49. कित्ता पृ. क्र. 139-140.

50. उपरोक्त गुप्त माणिकलाल 'विश्व का इतिहास' पृ. 60.

51. कित्ता पृ. 60-61.

52. उपरोक्त मौदुदी - 'इस्लामी प्रबोध' पृ. क्र. 57-58.

53. कित्ता पृ. क्र. 8.

54. http://mr.wikipedia.org/w/index.php?title=इस्लामधर्म & oldid=1017232.

55. जमीला अली जाफर डॉ. 'हिंदी कविता इस्लामी संस्कृति के परिप्रेक्ष्य में', विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी 1975 पृ. क्र. 62.

56. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा) मराठी विश्वकोश खंड II महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ मुंबई 1976 पृ. क्र. 663.

57. http://mr.wikipedia.org/w/index.php?title=इस्लामधर्म & oldid=1017232.

58. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा) मराठी विश्वकोश खंड II पृ. 662.

59. कित्ता, पृ. 664.

60. Mhtm/:file./m.islam:mht.

61. उपरोक्त अमीन सय्यद 'प्रेषित महंमद पैगंबर' पृ. क्र. 113.

62. कुराण 45:12, - 13.

63. कुरुंदकर नरहर 'जागर' देशमुख आणि कंपनी पुणे पृ. क्र. 218-219.

64. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड II पृ. 665.

65. उपरोक्त मौदुदी  अबुल आला 'इस्लामी प्रबोध' पृ. क्र. 97-98.

66. कित्ता - पृ. क्र. 99-100.

67. उपरोक्त अमीन सय्यद अहमद 'प्रेषित महंमद पैगंबर' पृ. क्र. 115.

68. उपरोक्त जमीला अली जाफरी डॉ. 'हिंदी कविता इस्लामी संस्कृति के परिप्रेक्ष्य में' पृ. क्र. 66.

69. उपरोक्त Savary R. M. - Introduction to Islamic Civilization P.N. 54.

70. mhtml:/m/shariat.mht.

71. उपरोक्त अमीन सय्यद 'इस्लाम आणि संस्कृति' पृ. 36-37.

72. mhtml:/m/shariat.mht.

73. M.Hidaytullah.priniciple of Mohamadan Law Ed. 17th 1972 P. N. 21.

74. उपरोक्त मोदूदी अबुल आला 'ईस्लाम प्रबोध' पृ. क्र. 25.

75. उपरोक्त अमीन सय्यद 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 34.

76. झारी विजयदेव 'हिंदी कहानी में मुस्लिम जीवन और संस्कृति' शारदा प्रकाशन नई दिल्ली 1979 पृ. क्र. 35.
77. कुराण 18:29.
78. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा) मराठी विश्वकोश खंड II पृ. क्र. 665.
79. चिश्ती अनीस, 'मदरसे आणि जागतिक दहशतवाद' सुशील प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती एप्रिल 2004 पृ. क्र. 36.
80. उपरोक्त Savory R. M. Introduction to Islamic Civilization P. N. 56-57.
81. उपरोक्त, झारी विजयदेव, 'हिंदी कहानी में मुस्लिम जीवन और संस्कृति' पृ. क्र. 36.
82. कित्ता पृ. क्र. 36.
83. कित्ता पृ. क्र. 36.
84. कित्ता पृ. क्र. 37.
85. जाफरी जमील अली, 'इस्लाम : एक अध्ययन' इस्लामी मराठी पब्लिकेशन मुंबई 1997 पृ. क्र. 51.
86. मौदूदी मौलाना - 'इस्लामची जीवन व्यवस्था' इस्लामी मराठी पब्लिकेशन मुंबई 1994 पृ. क्र. 37.
87. कित्ता पृ. क्र. 37-38.
88. उपरोक्त अमीन सय्यद, 'इस्लाम आणि संस्कृती' पृ. क्र. 38.
89. कित्ता पृ. क्र. 39.
90. शौरी अरूण, 'द वर्ल्ड ऑफ फतवा', मेहता पब्लिशिंग हाउस पुणे मार्च 1999 प्रस्तावने मधुन.
91. उपरोक्त M. Hiydaytullah-Mohamadan law P. N. 295.
92. कित्ता पृ. क्र. 296.
93. इंजिनिअर असगरअली डॉ. 'आधुनिक जगाचा इस्लाम' अक्षर प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती फेब्रुवारी 2012 पृ. क्र. 16.
94. कित्ता पृ. क्र. 17.
95. कित्ता पृ. क्र. 17.
96. उपरोक्त मौदुदी अबुल आला 'ईस्लाम प्रबोध' पृ. क्र. 8.

97. आपटे वामन शिवराम 'संस्कृत हिंदी कोश' विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी 1966 पृ. क्र. 198.

98. पंडित प्रकाश (संपा.) 'इकबाल की शायरी' हिंदी पॉकेट बूक्स नई दिल्ली 1982 पृ. क्र. 37.

99. उपरोक्त कहाळे एम. यू. डॉ. - प्रेषित महमंद (सं.) विश्वनायक पृ. क्र. 29.

100. कित्ता पृ. क्र. 12.

101. कित्ता पृ. क्र. 13.

102. उपरोक्त चिश्ती अनीस 'मदरसे आणि जागतिक दहशतवाद' पृ. क्र. 103.

103. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 80.

104. उपरोक्त साने गुरूजी 'इस्लामी संस्कृती' पृ. 28-29.

105. उपरोक्त अमीन सय्यद 'हजरत महंमद पैगंबर' पृ. क्र. 18.

106. सईद इब्राहिम - 'इस्लाम समज गैरसमज' इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 9.

107. कित्ता पृ. क्र. 09-10.

108. कुराण 96:1-5.

109. उपरोक्त सईद इब्राहिम - 'इस्लाम समज गैरसमज' पृ. क्र. 11-12.

110. उपरोक्त अमीन सय्यद अहमद 'हजरत महंमद पैगंबर' पृ. 21.

111. उपरोक्त साने गुरूजी 'इस्लामी संस्कृती' पृ. 59.

112. उपरोक्त कहाळे एम. यु. प्रेषित महंमद (सं.) विश्वनायक पृ. 19-20.

113. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 94-95.

114. उपरोक्त साने गुरूजी 'इस्लामी संस्कृती' पृ. क्र. 107.

115. कित्ता पृ. क्र. 109-110.

116. उपरोक्त सय्यद अमीन अहंमद 'हजरत महंमद पैगंबर' पृ. 26.

117. कित्ता पृ. क्र. 40.

118. कित्ता पृ. क्र. 184.

119. उपरोक्त कहाळे एम. यू. प्रेषित महंमद (सं.) विश्वनायक पृ. क्र. 58-59.

120. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 180.

121. कित्ता पृ. क्र. 202-203.

122. कित्ता पृ. क्र. 208.

123. कित्ता पृ. क्र. 257.

124. फैजी ए. ए. 'इस्लाम संबंधी एक आधुनिक दृष्टिकोन', - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1991 पृ. 42-43.

125. कुराण, 65:1.

126. कुराण, 4:34.

127. कित्ता कुराण, 49:10.

128. उपरोक्त कहाळे एम. यू. प्रेषित महंमद (सं.) विश्वनायक पृ. क्र. 63.

129. उपरोक्त मौदुदी अबुल आला 'ईस्लाम प्रबोध' पृ. क्र. 36.

130. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 73.

131. उपरोक्त कहाळे एम. यू. प्रेषित महंमद (स) विश्वनायक पृ. क्र. 111.

132. उपरोक्त मोरे शेषराव 'मुस्लिम मनाचा शोध' पृ. क्र. 273.

133. उपरोक्त गुप्त माणिकलाल 'विश्व का इतिहास' पृ. क्र. 64.

134. उपरोक्त पंडीत प्रकाश 'इक्बाल की शायरी' पृ. क्र. 63.

135. उपरोक्त गुप्त माणिकलाल 'विश्व का इतिहास' पृ. क्र. 66-67.

136. कित्ता पृ. क्र. 67.

137. कित्ता पृ. क्र. 67.

138. कित्ता पृ. क्र. 66.

139. कित्ता पृ. क्र. 67.

140. दिनकर रामधारी सिंह - 'संस्कृति के चार अध्याय' उदयांचल प्रकाशन पटना, 1970 पृ. क्र. 288.

141. कित्ता पृ. क्र. 288.

142. उपरोक्त झारी विजयदेव 'हिंदी कहानी में मुस्लिम जीवन और संस्कृति' पृ. क्र. 30.

143. अमीन सय्यद - ‘अतातुर्क गाजी कमाल पाशा’ - सय्यद अहंमद अमीन सांगली 1942 पृ. क्र. 206.

144. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव ‘भारतीय मुसलमान शोध आणि बोध’ पृ. क्र. 3.

145. कित्ता पृ. क्र. 2.

146. करजावी युसूफ डॉ. ‘ईस्लाम, मुसलमान आणि देशबांधव’ इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट मुंबई प्रथम आवृत्ती 2000 पृ. क्र. 21.

147. कित्ता पृ. क्र. 24.

148. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव ‘भारतीय मुसलमान शोध आणि बोध’ पृ. क्र. 5.

149. उपरोक्त करजावी युसूफ ‘ईस्लाम, मुसलमान आणि देशबांधव’ पृ. क्र. 90.

150. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव ‘भारतीय मुसलमान शोध आणि बोध’ पृ. क्र. 12.

151. पगडी सेतुमाधवराव ‘सूफी संप्रदाय, : तत्वज्ञान आणि कार्य’ परचुरे प्रकाशन मुंबई 1953 पृ. क्र. 98.

152. कित्ता पृ. क्र. 98.

153. शरीफ जफर ‘इस्लामची जीवन पध्दती’ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1976 पृ. क्र. 4.

154. मुरे टायटस - ‘इंडियन इस्लाम’ ओरिएंटल बुक्स दिल्ली 1930 पृ. क्र. 36.

155. कित्ता पृ. क्र. 35.

156. लोहिया राम मनोहर ‘फाळणी आणि हिंदू मुसलमान’ मोकाशी गोपाळ पुणे प्रथम आवृत्ती 1959 पृ. क्र. 61.

157. कित्ता पृ. क्र. 61.

158. उपरोक्त मुरे टायटस - ‘इंडियन इस्लाम’ पृ. क्र. 37.

159. उपरोक्त शरीफ जफर ‘इस्लामची जीवन पध्दती’ पृ. क्र. 8.

160. कित्ता पृ. क्र. 8.

161. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव ‘भारतीय मुसलमान शोध आणि बोध’ पृ. क्र. 50.

162. कित्ता पृ. क्र. 51-52.

163. कित्ता पृ. क्र. 52-53.

164. उपरोक्त शरीफ जफर ‘इस्लामची जीवन पध्दती’ पृ. क्र. 9.

165. कित्ता पृ. क्र. 9-10.

166. कित्ता पृ. क्र. 10.

167. उपरोक्त मोदुदी अबुल आला - ‘इस्लाम प्रबोध’ पृ. क्र. ९५.

168. बेन्नूर फक्रुद्दीन - ‘भारतीय मुसलमानांची समाज रचना व मानसिकता’ - प्रतिमा प्रकाशन पुणे 2012 पृ. क्र. 12.

169. कित्ता पृ. क्र. 15.

170. कित्ता पृ. क्र. 22.

171. देशपांडे स. ह., लेले य. श. ‘भारताचा राष्ट्रवाद’ कॉन्टिनेंटल प्रकाशन व ज्ञानप्रबोधिनी पुणे 1972 पृ. क्र. 197-198.

172. शानेदिवाण राजेखान (संपा.) ‘भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य’ निर्मिती विचारमंच कोल्हापूर 2008 पृ. क्र. 81-82.

173. उपरोक्त बेन्नुर फकरूद्दीन ‘भारतीय मुसलमानांची समाजरचना व मानसिकता’ पृ. क्र. 23.

174. कित्ता पृ. क्र. 37.

175. कित्ता पृ. क्र. 192.

176. उपरोक्त शानेदिवाण राजेखान, ‘भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य’ पृ. क्र. 87-88.

177. मुरसल हुमायून ‘सच्चर समिती अहवाल’, निर्मिती विचारमंच कोल्हापूर प्रथम आवृत्ती 2010 पृ. क्र. 25.

# प्रकरण 3

# इस्लाम मधील सुधारणावादी प्रवाह

**प्रास्ताविक :-**

इस्लाममधील सुधारणावादी प्रवाहांचा आढावा घेताना सुधारणावादाची प्रमुख तत्वे कोणती आहेत याचा सर्वप्रथम शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. सुधारणावाद हा प्रामुख्याने समाजाला प्रगतिपथाकडे घेऊन जातो आणि सुधारणावादाला होणारा विरोध ही त्यामध्ये अभिप्रेत असतो.

मूलतः कोणताही समाज हा स्थितीशील असतो. अल्पसंख्य समाजामध्ये ही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसते तर बहुसंख्य समाज ही बऱ्याच वेळा सुधारणांना विरोध करताना दिसून येतो. यांच्या मागील कारण एवढेच असते की कोणताही समाज आपल्या स्थितीमध्ये बदल घडवण्याची मानसिकता बाळगत नाही. यामुळे बऱ्याचवेळा समाजसुधारणेची अपेक्षित गती संथ असलेचे दिसून येते.

जागतिक स्तरावर अनेक देशांमध्ये समाज सुधारणेच्या चळवळी दिसून येतात. आज या सर्व बाबींचा सातत्याने विचार केल्यावर असे दिसते की सुधारणावादाच्या चळवळीस जितका पाठिंबा मिळतो, तितकाच विरोधही जाणवतो.

सुधारणावादी चळवळीसाठी काही गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. ज्यातून तो समाज प्रगत आणि पुरोगामी म्हणून ओळखला जातो त्यामध्ये खालील तत्वांचा समावेश होतो.

1. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जोपासना.
2. आधुनिक विज्ञानवादी दृष्टिकोण.
3. इहवादाचा स्वीकार.

वरील तीन तत्वांतूनच खऱ्या अर्थाने सुधारणावादी प्रवाहास बळ मिळते असे प्रस्तुत संशोधकास वाटते.

## 3.1 धर्मनिरपेक्षता :-

आधुनिक जगात धर्मनिरपेक्षता, इहवाद आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकास हा या संकल्पनेमधूनच उदयास आला. धर्मनिरपेक्षता ही सामाजिक जडणघडणी मध्ये आपली महत्वपूर्ण भूमिका निभावते. धर्मनिरपेक्षतेची जाणीव ही पूर्णपणे भौतिक विचारसरणीच्या पायावर उभी आहे. ज्या समाजामध्ये धर्मनिरपेक्षता आढळत नाही तो समाज धर्मांधतेच्या वाटेने जाऊ लागतो. हे जागतिक सत्य आहे. निधर्मी, सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता अशा अनेक नावांनी सेक्युलॅरिझम ओळखला जातो.

सेक्युलॅरिझमचा इतिहास जरी आधुनिक काळापासून सुरू होत असला तरी भारतामध्ये तो प्राचीन काळापासून अस्तित्वात होताच हे आपणास सांगता येईल.

इटलीच्या मार्सिग्लीओ (1270-1340) याने सेक्युलॅरिझम (धर्मनिरपेक्षता) हा शब्द वापरला.[1] माणसाच्या ऐहिक जीवनातून धर्माचे वर्चस्व दूर करून शासन संस्थेने माणसाच्या भौतिक कल्याणाची बांधिलकी मानावी तेवढ्या प्रमाणात धर्माचे क्षेत्र मर्यादित करून माणसाच्या खाजगी व आध्यात्मवादी क्षेत्रातच धर्म असावा अशी भूमिका मार्सिग्लिओने घेतली.[2] यावरून आपणास असे म्हणता येईल व्यक्ती जीवनात धर्मश्रध्देचा पुरस्कार पण ऐहिक जीवनात धर्माचा संकोच अशी अवस्था म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. तोच अर्थ संपूर्ण जगभर पसरला कारण जगातील बहुसंख्य लोकसंख्या ही धर्मश्रध्दाळू व धर्मप्रेमीच आहे.

धर्मनिरपेक्षतेच्या विविध व्याख्या अनेक विचारवंतानी केलेल्या आहेत ज्यातून ही संकल्पना स्पष्ट होते. 28 नोव्हेंबर 1947 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधींनी धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप स्पष्ट करताना असे म्हटले आहे ‘‘हे धर्मनिरपेक्ष शासन आहे याचा अर्थ ते कोणत्याही धर्मावर आधारित नाही. किंबहुना हे कोणत्याही विशिष्ट धर्मांचे सरकार नाही.’’[3] यावरून स्वतंत्र भारताचे प्रजासत्ताक धर्मनिरपेक्ष असले पाहिजे हा म. गांधींचा आग्रह होता असे म्हणता येईल.

श्री. रा. प. नेने यांच्या मतानुसार ‘‘धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविहिनता नव्हे किंवा धर्मविरोधी नव्हे. धर्माचा तिरस्काराने उच्छेद करणे हे तर निश्चित नव्हे.’’[4] त्याचा अर्थ ईश्वरावर श्रध्दा ठेवण्याचा अथवा न ठेवण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क अबाधित असला पाहिजे. माणसाच्या सार्वजनिक जीवनावर धर्माने आक्रमण करू नये हाच अर्थ यातून ध्वनित होतो. प्रसिध्द समाजवादी विचारवंत श्री. ना. ग. गोरे यांच्या मते, ‘‘धर्मातील शासन म्हणजे धर्म म्हटला की त्याचा उच्छेद करणारे शासन असा नव्हे. धर्म म्हणजे ईश्वराशी, मनुष्याचे नाते जोडणारा मार्ग ज्याला जो मार्ग पसंत पडेल त्याने तो स्विकारावा, त्याला शासनाची आडकाठी येणार नाही, मात्र त्याने शासनाकडून काही खास हक्क मिळविण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करता कामा नये.’’[5] 1976 साली माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 42 वी घटना दुरूस्ती करून घटनेच्या सरनाम्यात सेक्युलॅरिझम (धर्मनिरपेक्षता) आणि समाजवाद या शब्दांचा समावेश करण्यात आला. सरनाम्यातील Sovereign Democratic Rupublic या शब्दात घटना दुरुस्ती करून Sovereign Secular Democratic Republic असा बदल करण्यात आला.[6] त्यामुळे देशाच्या सांस्कृतिक सामाजिक व आर्थिक प्रगतीची घटनात्मक दिशा स्पष्ट झालेली दिसते.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, ''धर्म ही वैयक्तिक बाब आहे, धर्मनिरपेक्षता हा एक जीवनाचा मार्ग आहे.''[7] म्हणजेच त्या समाजात धर्मनिरपेक्षतेचे आधिष्ठान वाढते.

प्रा. फक्रुदिन बेन्नुर यांच्या मते, ''भारतात धर्मनिरपेक्षतेची संकल्पना ही निश्चितपणे मांडता आलेली नाही. किंबहुना भारतातील धर्मनिरपेक्षतेची संकल्पना जिच्यामध्ये गांधीप्रणित सर्व धर्मांची मूलभूत सूत्रे व तत्वे आणि परमेश्वर एकच असल्याने धार्मिकतेमुळे प्रादेशिक राष्ट्रवाद किंवा भिन्न-भिन्न जमातीच्या बंधुत्व भावनेला धक्का पोहचत नाही इथपासून ते सर्व धर्मियांना समान वागणूक किंवा सर्वधर्मसमभाव म्हणजेच सर्वांना धार्मिक स्वैराचाराचे स्वातंत्र्य या संकल्पना मांडल्या जाताना दिसून येतात.''[8] यावरून धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? तिचे स्वरूप नेमके काय आहे ? तिची वैचारिक मांडणी या सर्व बाबीवर प्रचंड मानसिक गोंधळ असल्याचे दिसून येते. पुढील भागामध्ये धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप व तिची लक्षणे स्पष्ट करण्याचा प्रस्तुत संशोधकाने प्रयत्न केला आहे.

### 3.1.1 धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जोपासना :-

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रवाद या दोन पूर्णपणे वेगळ्या संकल्पना आहेत. धर्मनिरपेक्षतेला राष्ट्रवादाची जोड दिल्यावर ते राष्ट्र खऱ्या अर्थाने बलशाली बनते असे अनेक विचारवंत मानतात. आपल्या देशाच्या संदर्भात विचार केला तर असे दिसून येते की आपल्या देशातील बहुसंख्य विचारवंतानी जरी ते धर्माने हिंदू असले तरीही त्यांनी धर्मनिरपेक्षता हाच राष्ट्रीयत्वाचा आधार मानला आहे. यामध्ये न्या. महादेव गोविंद रानडे, राजा राममोहन रॉय, वि. दा. सावरकर, गो. ग. आगरकर इत्यादींचा समावेश होतो.[9] रविंद्रनाथ टागोर यांना राष्ट्रवाद ही संकल्पनाच मान्य नव्हती म्हणून त्यांनी ''विश्वभारती'' चे स्वरूप आपल्यासमोर ठेवले आहे.[10] भारत स्वतंत्र होताना धर्मनिरपेक्ष हे तत्व घेऊनच भारतीय वाटचाल चालू आहे.

### 3.1.2 राष्ट्रवाद व्याख्या :-

बर्कर नामक विचारवंताच्या मते राष्ट्रीयतेची परिभाषा पुढील शब्दात करता येईल. -

''A Nation is a body of man inhabiting definite territory who normoly are drawn from diffrent races but possess a common stook of thaughts & relling acauired & teansmitted during the course of a common History, but on the whole are the man though more in the past, than in the present include in that common language at the vehicle of their thoughts & felling & who beside common thought & felling also cherish a common will & accordingly from or did not to from a seprate state to the expression of that will.''[11]

लोकमान्य टिळक यांच्या मते - "आपल्या भिन्न भिन्न विचारांना सोडून जेव्हां लोक एकाच भावनेने एकत्र येतात, अर्थात यांच्यामध्ये एकता प्रस्थापित होते त्यावेळी त्यांच्यामध्ये राष्ट्रीय भावना अर्थात राष्ट्रवाद जागृत होतो असे म्हणता येईल."[12]

तर श्री. अरविंद घोष यांच्या मते राष्ट्रवाद हा मानवाला परमेश्वराकडूनच प्राप्त होतो. ही आत्मा आणि ह्दयाची भावना आहे. त्यांच्या मते "Nationalism is a religion that has come from God. Nationalisam is creed in which you shall have to live. It is attitude of heart, of the soul."[13] थोडक्यात राष्ट्रीयता एक सामुहिक भाव आहे. एक सहकार्याची भावना आहे . मी आपल्या मातृभूमिशी संबंधित आहे. आपल्या मातृभूमिशी आपली श्रध्दा असली पाहिजे, तिच्या पासून वेगळे होण्याची भावना नसावी व व्यक्ति च्या सर्व निष्ठा मातृभूमिच्या पायाशीच असल्या पाहिजेत.

राष्ट्रवाद ही एक अमूर्त संकल्पना आहे. ज्याच्यामध्ये पुढील तत्वाचा समावेश होतो. भौगोलिक एकता, जातीय एकता, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा, भाषा एकता, धर्म एकता, आर्थिक व राजनैतिक एकता या सर्वांनी मिळून राष्ट्रवादाचा जन्म होतो असे आपणास म्हणता येईल. भारताने धर्मनिरपेक्षता या तत्वाचा स्विकार जरी स्वातंत्र्यप्राप्ती नंतर केला असला तरी भारतात प्राचीन काळापासूनच धर्मनिरपेक्षता अस्तित्वात असल्याचे दिसून येते. धर्मनिरपेक्षतेसाठी आणखी एक प्रतिशब्द 'सर्वधर्मसमभाव' हा वापरला जातो. परंतु 'धर्मनिरपेक्षता' आणि 'सर्वधर्मसमभाव' या दोन वेगवेगळया संकल्पना आहेत असे संशोधकाला वाटते. राष्ट्र बलवान करावयाचे असेल तर प्रबळ राष्ट्रवादाला धर्मनिरपेक्षतेची जोड दिल्या खेरीज हे शक्य नाही. जगातील बहुसंख्य राष्ट्रे ही धर्मनिरपेक्ष आहेत परंतु त्या सर्व राष्ट्राचा एकच समानधर्म आहे. उदा. ख्रिश्चन, इस्लाम आणि बौध्द राष्ट्रे त्यामुळे या सर्व राष्ट्रामध्ये धर्मनिरपेक्षता ही वेगळया पध्दतीने विकसित झाली तर आपल्या देशामध्ये विविध जाती धर्माचे अस्तित्व आहे. या देशातील मूळ निवासी आणि आक्रमक या सर्वांचा या देशामध्ये संघर्ष झाला. परस्परांच्या संस्कृतिचा एकमेकां वर परिणाम झाला. त्यामुळे या देशाची संस्कृति संमिश्र-संस्कृती आहे असे मानले जाते.[14] परंतु या संस्कृतिचा गाभा हिंदुत्वाशी निगडीत आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. या सर्व बाबींचा विचार करून धर्मनिरपेक्षतेचे खरे स्वरूप जगासमोर आणण्याची आजही गरज आहे.

### 3.1.3 धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?

धर्मनिरपेक्षता या शब्दाला इंग्रजीमध्ये सेक्युलॅरिझम असे म्हटले जाते. त्याचे मराठीमध्ये अनेक अर्थ दिले जातात. ज्यामध्ये निधर्मी, धर्मातीत इत्यादी पण या शब्दांनी सेक्युलॅरिझम या मूळ शब्दाची संकल्पना स्पष्ट होत

नाही. आजकाल सेक्युलॅरिझम या शब्दाच्या जोडीला 'स्युडो सेक्युलॅरिझम्' हा शब्द वापरला जातो. स्युडो सेक्युलॅरिझम हा शब्द सतत सेक्युलिरिझमचा बाऊ करणारे लोक हिंदुत्ववादास नावें ठेवतात व अल्पसंख्याकाचा सतत उदो करतात. या वर्तनाला उजवी मंडळी सरकारी स्युडो सेक्युलॅरिजम म्हणतात.[15] निधर्मी सारख्या शब्दप्रयोगाने राज्यसंस्था स्वतःचा अधिकृत असा कोणताही धर्म मानणार नाही इतकाच अर्थबोध होतो. राज्यसंस्थेने कोणताही शासकीय धर्म अधिकृत मानला नाही तरी त्या समाज जीवनात धर्माचे स्थान राहाणारच म्हणून सर्वप्रथम धर्म म्हणजे काय ? याचा विचार केला पाहीजे. महाभारतामध्ये धर्माची व्याख्या "धृ धारियते इति धर्म" म्हणजे जो धारण करतो तो धर्म होय.[16] धर्माचे लक्षण पुढील शब्दात सांगता येते.

अत्यंत पवित्र संपूर्ण मानवी जीवनाशी जोडले गेलेले जीवन, विश्व वा निसर्ग यांचा नियंत्रक (परमेश्वर) अशी माणसाची श्रध्दा असते. त्या शक्तीचा स्वतःशी पवित्र घनिष्ठ संबंध जोडणे व त्यातून निघालेली आचरणाची पध्दत म्हणजे धर्म होय आणि त्या शक्तीशी प्रतिकुल मनप्रवृत्ती व आचरण म्हणजे अधर्म होय. थोडक्यात असे म्हणता येईल की त्या नियंत्रकाशी संबंध जोडणे ही श्रध्दा आणि त्या नियंत्याचे अस्तित्व नाकारणे म्हणजे अधर्म होय. परंतु नास्तिक विचारधारेतील लोकही ज्यावेळी ईश्वराचे अस्तित्व नाकारतात. त्याचवेळी ईश्वर नाही या गोष्टीवर त्यांची ठाम श्रध्दा असते. असे म्हणता येईल की माणसाच्या आत्मिक उन्नतीचा मार्ग म्हणजे धर्म होय यातुनच श्रध्दा आणि श्रध्देय तत्वज्ञान निर्माण झाले.[17]

धर्मनिरपेक्षतेचा विचार करताना असे दिसते, जगात असंख्य धर्म आहेत. त्याचबरोबर त्यांचे आपले तत्वज्ञान आहे आणि या तत्वज्ञानाचा वैयक्तिक पातळीवर स्वीकार करणारा मनुष्य धर्मनिरपेक्ष असू शकतो.

प्रा. अ. भि. शहा यांच्या मते वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनात उपस्थित होणारे प्रश्न सोडवताना त्यांच्याकडे मानवाच्या ऐहिक कल्याणाच्या दृष्टीकोनातून पाहावे. मग हे प्रश्न नीती, शिक्षण, अर्थव्यवस्था, राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील असोत या भूमिकेला सेक्युलॅरिझम् असे म्हणतात."[18]

Muslim and Indian Secularism या निबंधात एस. ई. हुसेन असे म्हणतात- "Some people try to ridicule secularism by terming it as an irreligious system of government. We should remember that this is a wrong interpretation of the term 'Secularism.' Indian secularism is closely connected with democracy. Where there are no restrictions or discrimination on the ground of caste, religion or culture. Every Indian Citizen, whatever his Caste, Community, race or language, his equal rights of Citizenship in India. It is not proper to give an incorrect interpretation of Indian secularism

and criticize it on the basis of the wrong interpretation. Indian secularism is based on the principle of equal citizenship rights to every one irrespective of his caste, creed or colour."[19] अर्थात काही लोक धर्मनिरपेक्षतेकडे निधर्मी शासन व्यवस्था म्हणून पाहतात पण हे धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचे चुकीचे स्पष्टीकरण आहे. भारतीय धर्मनिरपेक्षता ही लोकशाहीशी संबंधित असून भारतीय राज्यघटनेने सर्वांनाच धर्मस्वातंत्र्य, आचरण स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे या चुकीच्या स्पष्टीकरणावर आधारित धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप आपल्या समोर वारंवार मांडले जाते. भारतीय धर्मनिरपेक्षता ही समान नागरी हक्कावर आधारित आहे. जिच्यामध्ये जात, वंश, वर्ण, आदि बाबींचा विचार केला जात नाही.

जेष्ठ विचारवंत प्रा. नरहर कुरूंदकर धर्म आणि धर्मनिरपेक्षता याचा विचार करताना असे म्हणतात. "धर्म ही फक्त पारलौकिक प्रश्नाचा विचार करणारी संस्था आहे."[20] म्हणजेच धर्म या संकल्पनेला इहवादी व जडवादी दृष्टीकोनाशी काहीही देणे घेणे नाही असा अर्थ निघतो. धर्म आणि धर्मनिरपेक्षता हे कधीच एकत्र येऊ शकत नाही असे कुरूंदकरांचे मत आहे. म्हणून त्यांच्या मते "परलोकाच्या नावे चालणारा इहलोकाचा सार्वजनिक व्यवहार ही धर्माची मुख्य कक्षा असते. समाज जीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून धर्म बाजुला सारणे व तो केवळ पारलौकिक बाबीसाठी मर्यादित करणे."[21] हा त्यांच्या मते धर्मनिरपेक्षतेचा अर्थ होय. कुरूंदकरांची ही व्याख्या म्हणजे सरळ सरळ धर्मविरोधी असलेली दिसते कारण सेक्युलॅरिझम ही संकल्पनाच धर्मविरोधी चळवळीतून क्रमाने विकसित होत आली आहे.

धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा पहिला उल्लेख बायबल मध्ये सापडतो. तेथे येशु ख्रिस्त स्पष्टपणे सांगतो की, "सीझरचे देणे सीझरला द्या आणि देवाचे देणे देवाला द्या."[22] परंतु ख्रिस्ती धर्म राज्यमान्यता पावल्यानंतर त्याच्या अनुयायांना या तत्वाचा विसर पडला. पुढे मध्ययुगाच्या शेवटापासून युरोपमध्ये राजसत्ता व धर्मसत्ता यांच्यामध्ये अधिकार क्षेत्राबाबत संघर्ष सुरू झाला. शेवटी उभयतांनी आपली अधिकार कक्षा ठरवून जी तडजोड केली ती धर्मनिरपेक्षतेच्या चळवळीची खरी सुरूवात असे म्हणता येईल. शासनाने सर्व नागरिकांना समानतेच्या पातळी वरून वागवावे, त्याच्यामध्ये भेदभाव व अन्याय करू नये असा विचार पुढे येऊ लागला. व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, मूलभूत मानवी हक्क, त्यांना पायाभूत असलेल्या ऐहिकता व व्यक्तीची सर्जनशीलता व प्रतिष्ठा या कल्पनांना महत्व प्राप्त झाले. आधुनिक समाजाच्या निर्मितीसाठी प्रगतीशील व वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारून त्याच्या आड येणाऱ्या धार्मिक श्रध्दांना दूर सारणे यातून धर्मनिरपेक्षता विकसित झाली व आधुनिकतेचे एक मूल्य म्हणून या तत्वाचा स्विकार होऊ लागला.

धर्मनिरपेक्षता ही संकल्पना आपण ज्या सेक्युलॅरिझम या इंग्रजी शब्दासाठी वापरतो त्यातील सेक्युलर या शब्दाचा अर्थ जे आध्यात्मिक नाही किंवा ज्याचा धर्माशी संबंध नाही ते असा आहे. 14 व्या शतकात इटलीमध्ये मार्सिग्लिओ याने सर्वप्रथम सेक्युलर राज्याची संकल्पना मांडली. दैवी कायदा आणि मानवी कायदा यातील फरक स्पष्ट करून त्याने असे सांगितले की ''माणसाच्या इहलौकिक जीवनाचे नियमन मानवी कायद्याव्दारेच केले जावे आणि तो अधिकार राजसत्तेलाच असेल, धर्मसत्तेला नव्हे, धर्मसत्तेचा अधिकार फक्त पारलौकिक जीवनाशी असेल अशा प्रकारे राजसत्ता व धर्मसत्ता यांची अधिकारक्षेत्रे वेगळी व स्वायत्त असतील.''[23] हा विचार अत्यंत क्रांतिकारक असा होता. युरोपात सुरू असणाऱ्या धर्मसत्ता व राज्यसत्ता यांच्यातील तीव्र संघर्षाची त्याला पार्श्वभूमी होती. 13 व्या शतकापासून 18 व्या शतकापर्यंत हा संघर्ष सुरू होता संपूर्ण युरोप या वादाने ढवळून निघालेला होता.

भारतीय राज्यघटनेनुसार 25(1) या कलमात प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य म्हणजे धर्म पाळण्याचे, त्याचा आचार करण्याचे व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे पण यावर दोन बंधने आहेत. 25(1) या कलमातच एक बंधन घातले आहे की कायदा व सुव्यवस्था, नितीमत्ता व आरोग्य यांच्या मर्यादेतच हे स्वातंत्र्य उपभोगता येईल.[24] 25(2-अ) या कलमाप्रमाणे आणखी एक बंधन धर्मस्वातंत्र्यावर घालण्यात आले आहे की धार्मिक आचाराशी संलग्न असणाऱ्या आर्थिक, वित्तीय, राजकीय व इतर ऐहिक विषया संबंधी कायदे करण्याचा किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्याची कार्यवाही करण्याचा राज्याचा अधिकार अबाधित राहील.[25] हे कलम अशा रितीने ऐहिक (दैनंदिन जीवनातील व्यावहारिक गोष्टी) व पारलौकिक (व्यक्तिगत श्रध्दा जसे स्वर्ग-नरक, देव-दानव, पाप-पुण्य, उपासना पध्दती इत्यादी) या गोष्टीमध्ये फरक करते. सर्व पारलौकिक विषय व्यक्तिगत तर सर्व ऐहिक विषय राज्यसंस्थेच्या (सरकारच्या) कक्षेत येतात. थोडक्यात ''राज्यसंस्था कोणत्याही धर्मियाच्या पारलौकिक गोष्टीमध्ये, श्रध्दामध्ये तो पर्यंत ढवळाढवळ करत नाही जो पर्यंत सार्वजनिक सुव्यवस्था, नितिमत्ता, आरोग्य व दुसऱ्याचे मुलभूत हक्क या गोष्टी धोक्यात येत नाहीत किंवा त्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वरील चार पैंकी कोणत्याही गोष्टीचे उल्लंघन होत असल्यास सरकारला त्या धार्मिक कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. म्हणजेच सरकार याठिकाणी धर्मनिरपेक्ष म्हणजे राज्यघटने प्रमाणे निर्णय घेते. धर्माला कायद्यातुन नियमनांतून, धोरणातून बाजुला काढणे यालाच धर्मनिरपेक्षता म्हणतात.'' धर्माचे स्थान या चार तत्वाच्या चौकटीत असावे त्यापलीकडे नाही. परंतु दुर्दैवाने आज अल्पसंख्याकांच्या धार्मिक भावना संभाळण्याला धर्मनिरपेक्षता म्हणण्यात येत आहे.[26]

यावरून आपणास असे म्हणता येईल की धर्मनिरपेक्षता हा शब्द इंग्रजीतील सेक्युलॅरिझम या शब्दाऐवजी सर्रास वापरला जातो. जातीयवाद व जमातवाद यावर धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करावा असे म्हटले जाते.[27] म्हणून

1980 नंतर जमातवादाचा विस्तार होऊ लागल्यावर धर्मनिरपेक्षता हा एक वाद विषय बनला. काही हिंदुत्ववादी विचारसरणीच्या लोकांच्या मते भारतातील धर्मनिरपेक्षतावाद हा नकली (Psudo-Secularism) धर्मनिरपेक्षतावाद आहे व त्यांच्या मते तेच खरेखुरे धर्मनिरपेक्ष आहेत.[28] त्यामुळे 1980 नंतरच्या समाजाची विभागणी धर्मनिरपेक्षतावादी व जमातवादी अशा दोन गटात झालेली दिसते. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? याचा खुलासा वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक वेगवेगळा करतात. जो तो आपल्या परीने फायद्याचा ठरेल असा अर्थ त्यातून काढत असतो. पण त्याचा खरा अर्थ धर्माचे सार्वजनिक जीवनातून उच्चाटन करणे किंवा आपल्या सार्वजनिक जीवनातून धर्माचा प्रभाव नाहीसा करणे हाच अभिप्रेत आहे. भारताचे संविधान तयार करताना राज्यघटनाकर्त्यांनी धर्मनिरपेक्ष राज्यसंस्था (सेक्युलर स्टेट) निर्माण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले होते.[29] परंतु दुर्दैवाने धर्म, राजकारण, समाज जीवन, ऐहिक व पारलौकिक गोष्टी यातून धर्मनिरपेक्षता कितपत साध्य झाली हा सर्वात गंभीर प्रश्न आहे.

### 3.1.4 धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप :-

धर्मनिरपेक्षतेच्या वरील चर्चेवरून धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप समजण्यास मदत होते. धर्मनिरपेक्षता म्हणजे अपवित्र, धर्माबद्दल असहिष्णुता असे नाही तर ऐहिक जीवनाची व्यवस्था लावताना धर्मकल्पना अप्रस्तुत आहेत. तर त्या ऐवजी शास्त्रीय ज्ञान, मानवी मूल्ये आणि विवेकनिष्ठा याच बरोबर इहवादाचा व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्विकार करणे हे होय. धर्म या गोष्टीचा मानवी जीवनावरील प्रभाव सर्वंकष असू नये. मानवी व्यवहाराचा एक भाग धर्मनिरपेक्ष तत्वानी नियंत्रित केला जावू शकतो. ही धर्मनिरपेक्ष तत्वे धर्मविरोधी नसतात, फक्त मानवी व्यवहारांना मौलिक आधिष्ठान देणाऱ्या विभिन्न मतप्रणाली असू शकतात.

धर्मनिरपेक्षता ही पुढील पातळ्यावर कार्यान्वित होऊ शकते. त्या पातळ्या पुढील प्रमाणे. -

### 1. वैयक्तिक जीवनाचे क्षेत्र :-

इतरांशी अजिबात संबंध येत नसलेने निव्वळ वैयक्तिक जीवनाचे क्षेत्र ज्यामध्ये स्वतःपूरत्या पाळण्याच्या विधी निषेधाचा समावेश होतो. हे विधीनिषेध लिंग, जाती, पुनर्जन्म, कर्म, पाप-पुण्य सिध्दांत, ईश्वर, धर्मभेद आदि कल्पनां वर आधारित नसेल तर ते धर्मनिरपेक्ष ठरते. अर्थात धर्म हिच एकमेव नैतिक तत्वप्रणाली असू शकते अशा आशयाची मूलतत्ववादी भूमिका समोर येवू शकते. श्रध्दा व विवेक यांच्या संघर्षातुन आपल्या व वर्तनासाठीचे व आचरणाचे मानदंड विकसित करणे असा ही विचार पुढे येवू शकतो. याउलट धर्माधिष्ठीत नैतिकतेची गरज नाही. पूर्णपणे निधर्मी नितीमत्ता, विकसित करता येईल अशी निखळ इहवादी धर्मविरहित भूमिका ही घेतली जावू शकते. विधीनिषेध परिस्थितीनुसार बदलतात. उदा. - प्रकृतीस हानीकारक असल्यामुळे मांसाहार व मद्य न घेणे परंतु हे

विधीनिषेध परिस्थितीनुसार बदलतात. या उलट धर्मसापेक्ष विधीनिषेध नेहमी परिस्थिती निरपेक्ष बंधनकारक मानले जातात.[30]

**2. सामाजिक जीवनाचे क्षेत्र :-**

मानव व मानव किंवा व्यक्ति व समाज यांच्यामधील संबंध दुसऱ्या पातळीवरचे आहेत. धर्मनिरपेक्षतेची स्वतःची भूमिका असली तरी तिच्यातून उत्पन्न होणारे विधीनिषेध दुसऱ्यावर न लादणे, उलट त्याच्या भावनांची मोकळ्या मनाने कदर करणे हे धर्मनिरपेक्षतेचे दुसरे तत्व आहे. सार्वजनिक व्यवहार व त्याचे नियमन धर्मनिरपेक्ष आधारावर करावे. सार्वजनिक व्यवहाराच्या क्षेत्रात सांप्रदायिक श्रध्दा असणाऱ्या गटाचा व व्यक्तीचा वावर असतो. त्यामूळे कोणत्या ही एक धर्माच्या आधारावर असे व्यवहार नियंत्रित करणे गैर असते. त्यामुळे धर्माच्या आधारावर समुह घडवून त्याच्या सामुहिक हिताचा पाठपुरावा करणे सार्वजनिक हिताच्या विरोधात आहे, म्हणून सुहास पळशीकर यांच्या मते ‘‘सार्वजनिक व्यवहाराचा हेतु व सार्वजनिक व्यवहाराची जडणघडण ही धर्मनिरपेक्ष असावयाला हवी.’’ [31]

**3. समाजाची रचना :-**

भारतीय समाजाची रचना विविधतेने नटलेली आहे. समाजात केवळ अनेक धर्माचे लोक राहतात एवढेच नाही तर व्यक्तिगत जीवन व सार्वजनिक जीवन यामध्ये धर्माशिवाय इतर अनेक हितसंबंध असू शकतात. कोणी हिंदू मनुष्य धर्माने जसा हिंदू असतो तसा भाषा, व्यवसाय, प्रदेश अशा आधारावरही तो संघटित होवू शकतो. संघटनांचे व हितसंबंधाचे आधार एकात एक संलग्न असतात. त्यामूळे सार्वजनिक व्यवहारात संघटित होण्यासाठी धर्मनिरपेक्ष आधार असावे लागतात. समाजातील सर्व लोक जरी एकाच धर्माचे असले तरी त्याचे हितसंबंध वेगवेगळे असू शकतात. ते केवळ एकाच धर्मांचे आहेत म्हणून त्यांच्या हितसंबंधात एकवाक्यता असेलच असे नाही. म्हणून, ‘‘संघटनाचे व सामुहिक हितसंबंधाचे आधार बहुविध व धर्माच्या पलीकडे असतात हे होय.’’[32] समाजामध्ये राहत असताना आणि व्यावहारिक पातळीवरून पाहताना आपण जो व्यवहार करतो त्या मध्ये दोन्ही व्यक्ति या परस्परांच्या जाती व धर्म यांचा विचार करीत नाहीत. उदाहरणार्थ एखादा व्यापारी मालविक्री करताना ग्राहकाची जात वा धर्म पहात नाही तर समान पातळीवरच त्यांचा व्यवहार पूर्ण होतो.

**4. श्रध्दा स्वातंत्र्याचा आदर :-**

कुराणामध्ये सुरे ‘काफरून’ नावाचा एक सुर आहे. त्यामध्ये म्हटले आहे तुझे विचार मला पूज्य वाटणार नाहीत, माझे विचार तुला पूज्य वाटणार नाहीत म्हणून काय झाले. तुझा धर्म तुला असो, माझा धर्म मला असो.

"लक्म दिनुकुम वलीये दिन्"[33] यावरून परस्परांच्या मताबद्दल आदर बाळगणे हे धर्मनिरपेक्षतेचे आणखी एक तत्व आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या धार्मिक श्रध्दा विभिन्न असू शकतात. केवळ एकाच धर्मातील लोक देखील वेगवेगळ्या श्रध्दांवर विश्वास ठेवू शकतात त्यामुळे विविध पंथ, उपपंथ निर्माण होतात अशा वेळी प्रत्येक व्यक्तीने व समुहाने दुसऱ्याचे श्रध्दा स्वातंत्र्य मान्य करून त्याचा योग्य तो आदर करावयास हवा. एकमेकांच्या श्रध्दा बद्दलचा हा आदर व श्रध्दा वर आधारित जीवन जगण्याची मोकळीक व्यक्ती, व्यक्ती व समुह, समुहां मध्ये असलीच पाहीजे. तुझा धर्म काय आहे ? माझ्या श्रध्दा कोणत्या आहेत ? या बाबींवर चर्चा न करता प्रत्येकाने दुसऱ्याच्या श्रध्दांचा व भावनांचा आदर करणे हे धर्मनिरपेक्षतेचे खरे तत्व व स्वरूप आहे.

**5. राज्यसंस्थेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप :-**

आधुनिक काळात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाची व्याख्या 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात मांडण्यात आली. ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या अनुसार धर्मनिरपेक्षता म्हणजे 'शासन, नितीनियम, शिक्षण इत्यादी धर्मापासून स्वतंत्र असले पाहिजे हे मत होय.'[34] आधुनिक काळातील शासन धर्मनिरपेक्ष असावे अशी अपेक्षा केली जाते. धर्मनिरपेक्ष शासन म्हणजे धर्मस्वातंत्र्याची हमी, सत्ता, संपत्ती यांचे वाटप धर्मांवर आधारित नसेल आणि शासनाचे सार्वजनिक हिताचे निर्णय सर्व धर्मांच्या व्यक्तींना धर्मनिरपेक्षपणे लागू केले जातील यांची हमी. थोडक्यात शासन कोणत्या ही एका धर्मांविषयी अनाठायी पक्षपात करणार नाही आणि कोणतीही एक धर्मश्रध्दा हा तिच्या निर्णयाचा आधार असणार नाही. कारण धर्मनिरपेक्षता ही व्यक्ती स्वातंत्र्य आणि न्याय यांच्यावर आधारित ती पूर्व अट आहे. अशा राज्यात सामाजिक हिताच्या मर्यादेत राहून सर्व धर्मांना आपल्या मार्गाने जाण्याचे स्वातंत्र्य असते.

संपूर्णतः धर्मनिरपेक्ष असलेले शासन जगात कोठेच नाही, हीच धर्मनिरपेक्षतेची खरी शोकांतिका आहे. भारतीय राज्यघटना अनुच्छेद 25(2-ब) असे सांगतो की समाजकल्याण आणि सुधारणा यासाठी केलेला कोणताही कायदा हा धर्मस्वातंत्र्याच्या हक्कावर अवैध ठरतो म्हणून तो अयोग्य आहे असे कोणासही म्हणता येणार नाही.[35]

**6. नागरिकांचे हक्क व कर्तव्य :-**

नागरीकांचे हक्क, कर्तव्य, कर आकारणी इत्यादी व्यावहारिक बाबतीत धर्माच्या नावाखाली भेदभाव नसणे व कोणतेही शासकीय धोरण ठरविताना धर्माचा विचारही न करणे ही शासकीय धर्मनिरपेक्षता आहे. उदा. - एखाद्या हिंदू गुन्हेगारास मनुस्मृती प्रमाणे शिक्षा ठोठावणे व मुस्लिम गुन्हेगारास शरियाच्या आधारे शिक्षा देणे हे सुसंगत नाही. भारतीय दंडविधानाप्रमाणे त्यांना शिक्षा देणे हेच योग्य आहे, त्यामुळे शासन धर्मनिरपेक्ष असते.

धर्मनिरपेक्षता ही विचारसंघर्षातूनच निर्माण होते. नवे विचार धर्म आणि त्याच्याशी संबंधित विचारप्रवाहातून बाहेर येतात. मानवी मनाची धर्मांच्या गुलामगिरीतून सुटका तीन कारणांमुळे होते. एक तर पराभवामुळे धर्मश्रध्दांना धक्का बसलेला असतो, दुसरे कारण म्हणजे विज्ञान, धर्माला मान्य नसणारी पण नाकारता न येणारी सत्ये प्रस्थापित करते. या सत्याच्या भोवताली समाजाचे नवे हितसंबंध निर्माण होतात. या नव्या हितसंबंधाना धर्माची मान्यता नसली म्हणजे इहलोक आणि परलोक यांचा संघर्ष सुरू होतो. आणि तिसरे कारण म्हणजे उदारमतवादी लोक धर्मविरोधी झगडू लागतात.[36] यातूनच धर्मनिरपेक्षतेचे मूल्य उदयास येते. सर्वसामान्य श्रध्दाळू भाविक धर्माच्या पलीकडे जग असू शकते हा विचारच करू शकत नाही. त्यामुळे जग कोठे चालले आहे.? विज्ञानाने काय प्रगती केली आहे. ? जागतिकीकरणाच्या या लाटेमध्ये धर्मांचे स्थान काय आहे ? कोणती नवीन आधुनिक विचार मूल्ये आपणासमोर येत आहेत ? स्पर्धेच्या या युगात आपल्या श्रध्दांना कितपत उराशी बाळगुन ठेवावयाचे आहे.? यांचा विचार प्रत्येक व्यक्तीने केला तर त्याचे पाऊल धर्मनिरपेक्षतेच्या वाटेवर पडले असे म्हणता येईल. थोडक्यात विज्ञानवादी दृष्टीकोन, संकल्पना स्विकार व धर्माचा केवळ वैयक्तिक वापर या गोष्टी मानवी जातीला धर्मनिरपेक्षतेच्या मार्गावर घेऊन जातील यात कोणताही संशय नाही.

### 3.1.5 धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता :-

आधुनिक लोकशाहीच्या संकल्पनेत धर्मनिरपेक्षतेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. धर्मनिरपेक्षता हा शब्द संविधानाच्या प्रस्तावनेतच दिसून येतो. लोकशाही समाजव्यवस्था आणि धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन माणसाला धर्माच्या पलीकडे व प्रगतीच्या वाटेवर घेऊन जातो. लोकशाहीची सफलता धर्मनिरपेक्षतेच्या पायावर उभी असते. विवाह, घटस्फोट, वारसाहक्क इत्यादी सामाजिक महत्वाच्या बाबीतील एकच समान नागरी कायदा करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या 44 व्या कलमाव्दारे हीच अपेक्षा व्यक्त केली गेली आहे. परंतु दुर्दैवाने घटनेचे 44 वे कलमच रद्दबातल करावे अशी बऱ्याचदा हाकाटी उठलेली दिसते. राष्ट्रीय एकता व एकात्मतेसाठी कधीही धर्म पुरेसा नसतो. हिंदुस्थानच्या फाळणीमुळे पाकिस्तान निर्माण झाला परंतु भाषिकवादामूळे व उर्दू भाषा लादल्यामुळे पूर्व पाकिस्तानाचे बांगलादेशात रूपांतर झाले. जो इतिहास सर्वांना ज्ञात आहे. देशाचे विभाजन केल्यानंतर अनेक छोटी-छोटी राष्ट्रे निर्माण होतात परंतु ती सर्व राष्ट्रे परावलंबी होतात आणि अंतर्गत समस्यांनीही त्रस्त होतात. सोवियत युनियनचे विभाजन याचे उत्तम उदाहरण आहे. सोविएत युनियन चे विभाजन घेऊन 13 वेगवेगळी राष्ट्रे निर्माण झाली. स्वत:ला धर्मराज्य म्हणवून घेणारे अनेक देश परावलंबी आहेत तसेच त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर काहीही किंमत नाही. याउलट बहुधर्मिय भारताची वाटचाल आज विशेष उल्लेखनीय मानली जाते. सन 2020 पर्यंत

भारत जगातील एक प्रमुख आर्थिक महासत्ता बनेल असा आशावाद बहुसंख्य नागरिकांच्या मनात आहे.[37] अर्थात भारत हा सुध्दा पूर्णपणे धर्मनिरपेक्ष देश नाही.

धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा साधा व सोपा अर्थ असा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक समता यांच्या आधाराने इहवादाची मांडणी करून लोकशाहीची वाटचाल करून भारतीय संघराज्य सुखी, समृध्द व संपन्न होईल. सामाजिक व सार्वजनिक जीवनात धर्माला कोणतेही स्थान असणार नाही. भारतीय लोकसभेने जनतेवर विशिष्ट धर्म लादू नये एवढीच मर्यादा घटनेने घालून दिली आहे.

धर्मांच्या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. अशी भारतीय राज्यघटनेच्या 15 व्या कलमात तरतुद केली आहे.[38] कलम 15 अन्वये राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा या पैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरीकाला प्रतिकुल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही. प्रत्येकाला धर्मांचरणाचे व धर्मप्रसाराचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेच्या 25 व्या कलमात बहाल केले आहे.[39] तर भारतीय राज्यघटनेचे 26 वे कलम सर्वधर्मियांना धार्मिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार देते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की भारतीय लोकसभेने कोणताही धर्म विचारात न घेता सर्वांनाच मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. कोणत्या एका विशिष्ट धर्माला घटनेमध्ये खास अधिकार दिलेले नाहीत.

आपल्या देशात धर्मातीत किंवा धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्था निर्माण व्हावी या दृष्टीने काही तरतुदी राज्यघटनेत केल्या गेल्या आहेत. धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे. उपासना स्वातंत्र्य व त्याची हमी राज्यघटनेने दिली आहे. कोणी कोणता धर्म आचरणात आणावा हे त्या व्यक्तीच्या मनावर आहे. आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. तसेच कोणताही धर्म आचरण करणारा लोकसमुह त्यांच्या स्वतःच्या व्दारे स्थापित संस्था मधुन धार्मिक शिक्षण देण्याचा अधिकार बाळगतो. परंतु कायदा, शांतता, सुव्यवस्था, सामाजिक  आरोग्य, नितीमत्ता यांना कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही. अशा पध्दतीनेच या अधिकाराचा उपयोग झाला पाहिजे हे घटनेचे बंधन सर्वांना आहे. शासन संस्थेकडून कोणत्याही धर्मांचा प्रसार केला जावू नये किंवा शासनव्यवस्था विशिष्ट धर्मांशी निगडीत होऊ नये. तसेच धर्माधिष्ठीत निकषांवर व्यक्ती-व्यक्तीत फरक केला जाऊ नये, अशीही तरतुद राज्यघटनेत केली आहे.

वरील सर्व बाबी धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता पटवून देताना दिसतात पण वास्तवात चित्र मात्र याच्या अगदी उलटे आहे. आज 21 व्या शतकामध्ये ही धर्माचा पगडा वाढत असलेला दिसून येतो. देशाला स्वातंत्र्य मिळुन जवळपास 65 वर्षाचा कालावधी लोटला. धार्मिक संस्था राजकारणावर व समाजकारणावर कब्जा मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत. विशिष्ट धर्मियांची व जमातीची एक गठ्ठा मते आपल्याला

मिळावीत यासाठी व निवडणुकीत आपला पक्ष बहुमताने सत्तारूढ व्हावा याकरिता धर्मनिरपेक्षतेला सर्वधर्मसमभाव हे गोंडस नाव देवून धर्माधिष्ठीत राजकारणच या देशात थैमान घालताना दिसून येते. प्रसंगी अल्पसंख्याक वर्गाचे लांगूलचालन करण्यात येते व त्यालाच विरोध करणारे जातीयवादी ठरतात.

धर्मांच्या पगड्यामुळे समाजाची प्रगती बऱ्याचदा खुंटते त्यामुळे असा समाज गतिहीन व मृतप्राय होतो. त्यात समाजनियंत्रणाचे जे जे नियम बनविले जातात ते त्या धर्मांचेच अविभाज्य घटक बनतात आणि त्या नियमांचे समाजाकडून काटेकोरपणे पालन केले जाते. काळ बदलतो पण धर्म बंदिस्तच राहतो म्हणून धर्मांवर नियंत्रण आणणारे तत्व धर्मनिरपेक्षतेच्या रूपाने आपल्या समोर येते. थोडक्यात मानवी विकासाला अडथळा आणणारे व धर्मांचे आवश्यक नितीनियम, धार्मिक बाबी या सर्वांपासून मुक्त होणे म्हणजे धर्मनिरपेक्ष होणे असे म्हणता येईल.

प्रत्येक मानवाचे पर्यायाने समाजाचे एक मन असते. एकदा ते धार्मिक संकल्पनेचे गुलाम वा बंदी झाले की ते त्यातच कैद होते. मग मानवी बुध्दी धर्मांची चिकित्सा करू शकत नाही. आणि माणसाने धर्मांच्या पलीकडे पाहुच नये यासाठी धर्ममार्तंड प्रयत्नशील असतात. यावरूनही धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता असलेली दिसून येते. धर्मनिरपेक्ष विचारसरणी धर्माला विरोध करत नाही फक्त धर्माला सार्वजनिक क्षेत्रामधून हद्दपार करते. परंतु व्यक्तिगत पातळीवरील उपासना पध्दतीला ती मान्यताही देते. परंतु त्यासाठी प्रोत्साहन किंवा मदत करत नाही. कोणताही धर्म पाळण्याचा किंवा न पाळण्याचा, धर्मावर विश्वास ठेवण्याचा किंवा न ठेवण्याचा माणसाला अधिकार देते. परंतु आपला धर्म सर्वश्रेष्ठ असून तो परधर्मियांवर लादण्याचा अधिकार अमान्य करते. थोडक्यात श्रध्दाशील व श्रध्दाहीन या दोघांचे ही धर्मनिरपेक्षता अधिकार मान्य करते. या संदर्भात असे म्हणता येईल, भारतीय धर्मांच्या (हिंदू, जैन, बौध्द, शीख) तुलनेत सेमेटिक धर्म (ख्रिश्चन, इस्लाम व यहुदी) हे विचार स्वातंत्र्य मान्य करताना दिसून येत नाहीत. यासाठी समाजाचे प्रबोधन होणे आवश्यक आहे व त्याकरिता धर्मनिरपेक्षतेची गरज आहे.

धर्मनिरपेक्षता खऱ्या अर्थाने आचरणात आणण्यासाठी पुढील गोष्टीची आवश्यकता आहे -

1. राज्याने कोणत्याही विशिष्ट धर्मांचा पुरस्कार करू नये.
2. धार्मिक प्रभावापासून शिक्षण मुक्त केले पाहीजे.
3. आंतरजातीय व आंतरधर्मीय रोटीबेटी व्यवहाराला प्रोत्साहन दिले पाहिजे.
4. सर्व जाती जमातींच्या संघटना एकत्र करून त्यांच्याव्दारे धर्मनिरपेक्षतेचा प्रचार व प्रसार केला पाहिजे.
5. समतावादी, वैज्ञानिक दृष्टीकोन आचरणात आणला पाहीजे.
6. अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून (आकाशवाणी, दूरदर्शन) धर्मनिरपेक्षतेची शिकवण लोकांना दिली पाहीजे.

7. नैतिकता हे नितीमूल्य लोकांपर्यंत पोहचले पाहिजे.
8. सार्वजनिक ठिकाणी कसलेही धार्मिक कार्यक्रम करण्यात येऊ नयेत. रस्त्यावर नमाज पढण्याची प्रतिक्रिया म्हणून महाआरतीचा स्विकार हिंदू धर्मीयांनी केला. अशा सर्व गोष्टींवर कायद्याने बंदी आणावी.
9. न्यायालयात व मंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी कोणत्याही धर्मग्रंथाचा वापर करू नये.
10. अनेक राजकीय नेते धार्मिक कार्यक्रमात उजळ माथ्याने वावरत असतात त्यावर बंधने आणली पाहीजेत.
11. धर्मांच्या जाहीर प्रदर्शनावर बंधने आणली जावीत. कोणत्याही धर्माला वा धार्मिक संघटना किंवा त्याच्याव्दारे संचालित धार्मिक चळवळींना शासकीय मदत, अनुदान तसेच मान्यता दिली जावू नये. यात हजयात्रा अनुदान, कुंभमेळा अनुदान यावर बंदी आणावी.
12. सर्वांसाठी समान नागरी कायदा आणावा.
13. धार्मिक स्थळांचे बांधकाम व त्यांचे जीर्णोध्दार इत्यादीसाठी कायदेशीर परवानगी घेतली जावी.
14. धर्मनिरपेक्षतेसाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस शासकीय मदत मिळावी.[40]

वरील विवेचनावरून आपणास असे म्हणता येईल की घटनेच्या सरनाम्यात समाविष्ट असलेली धर्मनिरपेक्षता खऱ्या अर्थाने आचरणात आणण्यासाठी वरील सर्व उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे व धर्मनिरपेक्षतेची याचसाठी आवश्यकता आहे. 21 व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व बलशाली, सुखी, समृध्द हिंदुस्थान घडविण्यासाठी धर्मनिरपेक्षता आवश्यक आहे. याबाबत कोणाच्याही मनात संशय असणार नाही. ज्या ज्ञानाधिष्ठीत समाजाचे स्वप्न भारतीय विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ पाहत आहेत ते स्वप्न साकार करण्यासाठी धर्मनिरपेक्षता आपल्या अंगी बाणवणे व तिचा अंगीकार करणे हे प्रत्येक भारतीयाचे परम कर्तव्य आहे. उद्याचा हिंदुस्थान सुखी, समृध्द बनविण्यासाठी धर्माला दूर सारून, धर्माचा पगडा कमी करून वैज्ञानिक व इहवादी दृष्टीकोनाचा स्विकार करून आपल्याला पुढे जायचे आहे. धर्मांचा उधळलेला बेलगाम घोडा जर थोपवावयाचा असेल तर त्याला शिक्षणाचा लगाम असणे आवश्यक आहे व शिक्षण प्रक्रियेतूनच धर्मनिरपेक्षता उदयास येईल याबद्दल कोणताही संदेह नाही.

### 3.2 आधुनिक विज्ञानवादी दृष्टीकोन :-

युरोपात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात विज्ञान व विज्ञानेत्तर ज्ञानशाखा असा भेद नव्हता. निश्चितता किंवा तार्किक अनिवार्यता आणि सार्वत्रिकता ही दोन ज्ञान लक्षणे मानली जात होती. एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विज्ञानाची युरोपमध्ये 16 व्या शतकात सुरूवात झाली. तर प्राचीन भारतात वैज्ञानिक दृष्टीकोन हा कणाद, अश्वघोष, भास्कराचार्य, सुश्रुत, वराहमिहीर यांच्याव्दारे सुरू झाला. त्यामुळे युरोपच्या तुलनेत भारतामध्ये प्राचीन

काळापासूनच वैज्ञानिक दृष्टीकोन अस्तित्वात होता हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कश्यप हा पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ होता. त्याने 'वैशेविक सूत्रे' मध्ये असे प्रतिपादन केले आहे की सृष्टिमधील प्रत्येक पदार्थ विशिष्ट मूलद्रव्यांच्या कणांपासून (अणुपासुन) तयार झालेला असतो. कणांच्या रचनेवर पदार्थाचे गुणधर्म अवलंबून असतात. कण (अणू) हे अविभाज्य आहेत तसेच ते नित्य आहेत म्हणजे त्याची निर्मिती अथवा नाश करता येत नाही. कणाचे भंजन करण्याऱ्यास पस्तावण्याची पाळी येईल असे कश्यपचे मत होते.[42] आजचे अणुबॉंब पाहिलेवर हे भाकित खरे ठरले की काय अशी भीती वाटते. त्याच्या या मतास 'कणवाद' म्हणतात म्हणून लोक त्यास 'कणाद' असे म्हणू लागले. बाराव्या शतकात भास्कराचार्य नावाचा महान गणितज्ञ होऊन गेला. त्याने 'सिद्धांत शिरोमणी' व 'लीलावती' या जगप्रसिद्ध ग्रंथांची रचना केली. या ग्रंथाच्या माध्यमातून त्याने बीजगणित, भूमिती आणि खगोलशास्त्राची माहिती दिली.[43]

प्राचीन भारतातील सुश्रुत, जीवक, चरक, नागार्जुन असे अनेक वैद्यकशास्त्रज्ञ होऊन गेले. आयुर्वेद ही भारताची जगाला देणगी आहे. सुश्रुत हा मोतीबिंदू, हार्निया व त्वचारोपण आदि क्रिया करत असे.[44]

वराहमिहिर हा खगोलशास्त्रज्ञ होता. त्याने 'पंचसिद्धांतिका' नामक ग्रंथाची रचना केली असून त्यामध्ये ज्योतिषशास्त्र सिद्धांताची चर्चा केली आहे. पृथ्वीचा आकार गोल असून ती दोन्हीं धृवापाशी चपटी असलेचे त्याने प्रतिपादन केले.[45] त्याच्या बरोबरच ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट हे खगोलशास्त्रज्ञ हिंदुस्तानात होऊन गेले. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विचार करताना सर्वप्रथम विज्ञान म्हणजे काय यांचा शोध घेणे क्रमप्राप्त होय. विज्ञानाची व्याख्या - ''विज्ञान म्हणजे विशुध्द ज्ञान, पुन्हा पुन्हा पारख करून परीक्षा घेऊन शास्त्रीय कसोट्या लावून त्यातून जे निष्कर्ष परिक्षणाअंती आपल्या हातात येतात त्यास विज्ञान म्हणता येईल.''[46] थोडक्यात प्रयोग, परीक्षण, निरीक्षण आणि निष्कर्ष या विज्ञानाच्या काही पायऱ्या होत.

विज्ञानवादी जीवन शैलीचा स्वीकार करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करणे होय. जीवनामध्ये अनेक गोष्टीचे माणसाला प्राचीन काळापासून कोडे पडले आहे. या कोड्याची अर्थात समस्यांची उकल करणे हे माणूस आपले ध्येय मानत आला आहे. त्यासाठी त्यांनी विविध प्रयोग केले. आणि त्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी शोधून काढली. त्या उत्तरातून त्याने आपले जीवन सुखी व समृध्द बनविले. मानवाने वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार केला आणि विज्ञानाच्या सहाय्याने त्याने आपल्याला भेडसावणाऱ्या समस्यांवर मात केली. तेथूनच खऱ्या अर्थाने वैज्ञानिक दृष्टीकोनाचा उगम झाला असे मानव जातीच्या इतिहासाचे अध्ययन केल्यावर आपणास दिसून येते. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्विकार केल्यानंतर मानवी जीवन सुखी व समृध्द बनते परंतु त्यासाठी माणसाला अनेक

तत्वांचा स्वीकार करावा लागतो. ज्यामध्ये धर्मग्रंथाची कठोर समीक्षा / चिकित्सा, अंधश्रध्दांना तिलांजली, आधुनिकतेचा स्वीकार, निकोप व निरोगी जीवनशैलीचा स्वीकार, सुधारणावादी दृष्टीकोन, भौतिकवादाचा स्वीकार, विज्ञानाचा स्वीकार, वैज्ञानिक नियमाचा शोध, यंत्र संस्कृतीला प्रोत्साहन, यशस्वी समायोजन आणि इहवादी जीवनशैलीचा पुरस्कार या सर्वांतून वैज्ञानिक दृष्टीकोन आकारास येतो असे आपणास म्हणता येईल.

### 3.2.1 वैज्ञानिक दृष्टीकोन :-

अनुभवाला आलेल्या घडामोडींचा खुलासा मिळविण्याची जिज्ञासा मनुष्याला स्वाभाविकच असते. सृष्टीतील मानवी व्यापारापासून स्वतंत्र अशा घडामोडीचा खुलासा देणारे जे संशोधन असते त्याला वैज्ञानिक संशोधन म्हणतात.[47] आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण अनेक गोष्टींचा वापर करीत असतो. ज्याचा आपल्या जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध असतो आणि त्या गोष्टींचा विज्ञानाशी संबंध असतो. मात्र हा संबंध लक्षात येण्यासाठी आणि विज्ञानाचा शोध घेण्यासाठी आपल्या जवळ चिकित्सक वृत्ती, चिकाटी व अंधश्रध्दांपासून दूर जाण्यासाठी प्रभावी इच्छा असावी लागते यालाच वैज्ञानिक दृष्टीकोन असे म्हणता येईल.[48] निसर्गाबद्दलच्या मानवाच्या कुतुहलातून विज्ञान निर्माण झाले आहे. का ? काय ? कसे ? केव्हा ? कोठे ? कधी ? यामधूनच विज्ञानाचा जन्म झाला. एक अचूक उत्तर एक विशिष्ट विषयाची ज्ञान प्राप्ती करून देते त्यावेळी ज्ञानाची नवीन क्षितिजे आपणासमोर प्रगट होतात. विज्ञानाची सुरूवात परिक्षण, निरिक्षण आणि निष्कर्ष यातूनच होते. त्यातून निर्माण झालेले नियम व सिध्दांत या सर्वातून वैज्ञानिक दृष्टीकोन समोर येतो.

वैज्ञानिक दृष्टीकोन वाढत जाऊन त्यातुन असंख्य गूढ प्रश्नांची उत्तरे मिळू लागतात आणि मानवी संस्कृती विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागते. आजही संपूर्ण मानव जातीने वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारला आहे, हे म्हणणे बरोबर नाही. निसर्गातील घडामोडी बद्दल माणसाला कुतुहल वाटते आणि हा दृष्टीकोन पूर्वग्रह, अंधश्रध्दा, शब्दप्रामाण्य या सर्व बाबींवर परिणाम करतो. निसर्गाविषयाच्या अज्ञानातून अंधश्रध्दा जन्माला येतात निसर्गाबद्दलचे गूढ उकलल्यावर त्या नष्ट व्हायला हव्या परंतु व्यवहारात असे घडताना दिसत नाही. याला जबाबदार मानवी दृष्टीकोनच आहे. जो पर्यंत मानव खऱ्या अर्थाने वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करत नाही तो पर्यंत तो विकसित होणार नाही हेच सत्य यातून समोर येते.

परंपरेने प्राप्त झालेले ज्ञान व समकालीन सुधारणा यांची सांगड घालून आपले जीवन समृध्द करावे हे वैज्ञानिक दृष्टीकोनाचे लक्षण आहे. परंतु भुतकाळ आणि जुन्या रूढी परंपरांना आपला समाज आजही चिकटुन बसला आहे आणि गतकाळात खरे ज्ञान मात्र न वापरल्यामुळे ते पोथ्या पुस्तकांमध्ये अडकून पडले आहे. उदा. जगातील सर्वच धर्मग्रंथ अपौरूषेय आहेत असा दावा सर्व धर्माचे श्रध्दावंत करतात. यामध्ये वेद, उपनिषद, कुराण,

बायबल यांचा समावेश होतो. धर्मग्रंथ हे ईश्वरी वाणी आहेत. थेट ईश्वराकडून मानव जातीला प्राप्त झालेले आहेत. ते मर्त्य मानवाने लिहिलेले नाहीत असा बहुसंख्य धार्मिक लोकांचा दावा आहे. परंतु त्या धर्मग्रंथामध्ये एखाद्या विशिष्ट, भौगोलिक स्थळाबद्दलचे वर्णन असेल व जर ते स्थळ पृथ्वीच्या एखाद्या विशिष्ट भागात असेल तर त्याबाबत शंका निर्माण होते. उदा. वेदांमध्ये सरस्वती नदीचा बऱ्याच ठिकाणी उल्लेख सापडतो. मग ती नदी स्वर्गातील सरस्वती मानावयाची की अफगाणिस्तानातील सरस्वती किंवा राजस्थानातील लुप्त सरस्वती ? असे प्रश्न सर्वच धर्मग्रंथातील वर्णनावरून माणसाला पडतात. यातूनच वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होतो.[49]

ख्रिश्चन समाजात मार्टिन ल्युथर किंगच्या सुधारणांमुळे आणि युरोपातील प्रबोधनयुगामुळे युरोपीय समाजात आमूलाग्र बदल झाला आणि त्या समाजात आधुनिकतेचे मोकळे वारे वाहू लागले. त्यातून पुढे औद्योगिक क्रांतीचा उदय झाला परंतु पूर्वी युरोपमध्ये तमोयुगात अनेक शास्त्रज्ञांचा अपरिमित छळ झाला. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे म्हणणाऱ्या कोपर्निकस, गॅलिलिओ यांना प्रचंड मानहानीला सामोरे जावे लागले. कारण त्यांचे संशोधन व त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन बायबल विरोधी मानला गेला.[50]

**निकोलस कोपर्निकस (1473 ते 1553) -** याने पूर्वीच्या जुन्या विश्वव्यवस्थेसंबंधिच्या कल्पनांना झुगारून नव्या कल्पनांची मांडणी करण्याचे महत्वाचे काम पार पाडले. त्याने मांडलेली विश्वविषयक उपपत्ती, नोंदणी, टांचणे यावरून त्याचा रेव्ह्युलेशन हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्याने मांडलेले निष्कर्ष 1500 वर्षापर्यंत अस्तित्वात असलेल्या विश्वाच्या परंपरागत कल्पनेशी विरोध दर्शविणारे होते. त्याचे निष्कर्ष त्या वेळच्या धर्म कल्पनेविरूध्द असलेने अनेकांना ते आवडणार नाहीत याची त्याला कल्पना होती. त्यामुळे रेव्ह्युलेशन हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यास तो तयार नव्हता. तसा त्याच्या निष्कर्षांना विरोध ही झाला होताच. आपल्या या ग्रंथात विश्वाच्या मध्यभागी सूर्य असून आपली पृथ्वी एक सामान्य ग्रह असून ती सूर्याभोवती भ्रमण करते असे मत त्याने मांडले.[51]

**गॅलिलिओ (1564-1642) -** गॅलिलिओला शब्दप्रामाण्य वा व्यक्तिप्रामाण्य मान्य नव्हते. साहजिकच अशा बंडखोर शास्त्रज्ञाचा धर्मगुरूंनी छळ केला. ॲरिस्टॉलच्या सिद्धांताना विरोध केल्यामुळे त्यास पिसा विद्यापीठ सोडावे लागले तेथून तो पादोआ विद्यापीठात गेला. पण तेथून ही त्याला बाहेर पडावे लागले. गॅलिलिओचा छळ धर्मगुरूंनी चालूच ठेवला. शेवटी त्यास अटक करून त्याच्या कडून त्याची पापकृत्यांची कबुली घेणेत आली आणि कैदेतच त्याचा 1642 साली मृत्यु झाला. [52]

जिऑरडेनो ब्रुनो या शास्त्रज्ञास इ. स. 1600 साली जिवंत जाळण्यात आले. कारण त्याचा पृथ्वीच्या परिभ्रमणाचा सिद्धांत बायबलच्या विरोधी होता.[53] जॉन हंस (1369-1475) या विचारवंतास जाळून टाकण्यात आले.[54] फ्रान्सिस बेकन यांच्या मते सत्यदेवता ही बायबलची कन्या नसून मानवी प्रज्ञेची कन्या आहे.[55]

या परंपरेमध्ये पुढे टायको ब्राही, केपलर, न्युटन यांचा समावेश होतो. त्यांनी युरोपमध्ये प्रबोधनाची परंपरा पुढे चालवली. सृष्टीनिर्मितीचे सिध्दांत पुराण, कुराण व बायबल येथे ईश्वरी अस्तित्व गृहित धरून आलेले आहेत. परंतु आधुनिक विज्ञान असे उत्पत्ती शास्त्र मान्य करत नाही. त्यामुळे कट्टरवादी, मूलतत्ववादी, अट्टाहासाने शब्दप्रामाण्याची कास धरतात. शब्दप्रामाण्या ऐवजी प्रयोगप्रामाण्य व बुध्दीप्रामाण्य यांचा आधारच प्रबोधनासाठी, वैज्ञानिक दृष्टीकोनासाठी आवश्यक आहे. इतिहास, परंपरा याबाबत चिकित्सक प्रवृत्ती हे प्रबोधन घडविते आणि त्यामुळे माणूस आत्मपरिक्षण करतो. आत्मपरिक्षणाबरोबर धर्मचिकित्साही तितकीच महत्वाची असते. जोपर्यंत माणसाला पूर्ण अधिकार दिला जात नाही व त्याचे भाग्य शब्दप्रामाण्यापासून दूर जावून बुध्दीप्रामाण्याचा स्वीकार करत नाही तो पर्यंत वैज्ञानिक दृष्टीकोन रूजणे अवघड नाही तर अशक्य आहे. जीवन जगण्यासाठी आपल्या पूर्वजांनी जे साधे, सोपे, सरळ व सहज नियम घालून दिले त्याच्यातूनच पुढे रूढी व परंपरा निर्माण झाल्या आणि हे करू नका, ते करू नका, हे करा, ते करा असे असंख्य निर्बंध निर्माण झाले. आणि मानव स्वत:च्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करू लागला. त्यातही लपलेले ढोंग दिसून येते. माणूस आपल्याला नको असलेल्या गोष्टीतून, नियमातून पळवाटा शोधू लागला आणि त्या पळवाटीचाच नवा नियम होतो. आणि वैज्ञानिक दृष्टीकोन तेथे नष्ट होतो व निर्माण ही होतो.

मुस्लिम समाजात अनेक पुरोगामी व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करणारे विचारवंत होऊन गेले त्यामध्ये केमाल पाशा, सय्यद अहमदखान, मौलाना अबुल कलाम आझाद, बॅ. महंमद हिदायतुल्ला, बॅ. न्यायमुर्ती एम. सी. छागला, हमीद दलवाई इत्यादींचा समावेश होतो. हमीद दलवाई यांनी वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या संदर्भात आपले विचार मांडताना असे म्हंटले आहे. ‘‘मुस्लिम मन हे कुराण, हादिस, पैगंबराचे जीवन व इस्लामिक परंपरा यांच्या आधारे बनते. सनातनी व मूलतत्ववादी हे इस्लामामध्ये पूर्णधर्म व परिपूर्ण समाज आहे असे मानतात त्याच्या दृष्टीने प्रेषिताने जो प्रयोग केला व त्याचे फक्त अनुकरण करणे व कोणत्याही परिस्थितीत चिकित्सा न करणे हे आपले काम आहे. या भूमिकेतून जे मुस्लिम मन बनते ते धर्मसुधारणेस व समाज प्रबोधनास कसे तयार होणार ?[56]

हमीद दलवाई यांनी इस्लामच्या संदर्भातील वैज्ञानिक दृष्टीकोनाचे अपयश अचूक व मोजक्या शब्दात स्पष्ट केले आहे. जो पर्यंत मुस्लिम मन शब्दप्रामाण्यातुन व धर्मांधतेतून मुक्त होत नाही. तो पर्यंत तो समाज वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करू शकत नाही. केमाल पाशाचा एकमात्र अपवाद सोडला तर मुस्लिम समाजात यापूर्वी असा कोणीही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही हे मोठ्या खेदाने या ठिकाणी नमुद करावे असे वाटते.

परंपरागत इस्लामी चौकटीत अनेकांनी जुजबी बदल सुचविण्याचे धाडस केले. परंतु हमीद दलवाईंनी जातियवादाच्या मूळावरच घाव घातला हे सत्य कोणालाच नाकारता येणार नाही.

संत कबीर, अकबर, दारा शुकोह, सावित्रीबाई फुले यांची सहकारी व पहिली मुस्लिम शिक्षीका फातिमा शेख, न्या छागला, न्या. हिदायतुल्ला, मौलाना आझाद, जाकिर हुसेन, अब्दुल हमीद यांच्याकडे मुस्लिम समाज उपेक्षित दृष्टीने का पाहतो ? आज ही अफगाणिस्तान मधील तालिबान्यांना व लादेनला का पाठिंबा दिला जातो ? शहाबानो केस मध्ये तिला पोटगी मिळाल्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या या निकाला विरोधात का गदारोळ उठतो ? या सर्व बाबींमुळे मुस्लिम मन हे अजूनही प्रतिगामी व परंपरावादी आहे हेच सिध्द होते. या सर्व बाबींमधून मुस्लिम मन जो पर्यंत मुक्त होत नाही व प्रखर राष्ट्रवादाचा स्वीकार करीत नाही तो पर्यंत हा समाज वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अंगिकार करू शकणार नाही हेच सत्य आपल्यासमोर येत आहे.

### 3.2.2 वैज्ञानिक दृष्टीकोनाचे स्वरूप :-

वैज्ञानिक दृष्टीकोन हा सामाजिक तत्वज्ञानाची बैठक पक्की करतो. धर्मभोळेपणा, रूढी, आंधळी परंपरा-प्रियता हे समाजाबरोबर राष्ट्राच्या प्रगतीचे शत्रु असतात. या सर्वांचा मुख्य आधार म्हणजे धर्मग्रंथ होत. वैज्ञानिक दृष्टीकोन धर्मनिष्ठा आणि ग्रंथनिष्ठा यावर हल्ला करतो, धर्मग्रंथाच्या कचाट्यातून मानवी बुध्दीला मुक्त केल्याशिवाय समाजाचे व राष्ट्राचे अभ्युत्थान होणे असंभव आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर वैज्ञानिक दृष्टीकोनाबाबत लिहितात "पोथीजात, जातिभेदाचा निपात केल्याशिवाय ज्या अर्थी आम्हां बुध्दीनिष्ठ विज्ञानवादी सुधारकांनी सर्व प्रकारचे धार्मिक भाबडेपण आणि लुच्चेगिरी मग ती वैदिक असो, बायबली असो, कुराणी असो व पुराणीय असो तिच्या कचाट्यातून सोडवून मानवी बुध्दीला मुक्त करणे हेच आमचे पवित्र धर्मकृत्य होय. यातच मानवाचे, अवघ्या मनुष्य जातीचे कल्याण आहे असे आम्हाला वाटते."[57]

समाजाला पोथीमुक्त केल्यानंतर जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी समाजाला दिली पाहिजे याची सावरकरांना पूर्ण कल्पना होती म्हणूनच त्यांनी आधुनिकवादाची माता म्हणून विज्ञानवादाचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन हा सामाजिक विकासाचा पाया आहे व नव्या युगातील प्रगतीचा तो आधारस्तंभ आहे. युरोप व अमेरिकेने विज्ञानवादी दृष्टीकोन स्वीकारून स्वतःचा विकास केला आहे आणि त्यांच्या आधुनिकतेचे हेच खरे रहस्य आहे. कारण भारतीय पिढी ही आता महत्वाकांक्षी विज्ञानवादी व आधुनिक झालीच पाहीजे. खऱ्या अर्थाने भारत आजही आधुनिक झाला आहे हे आजही तर्कसंगत वाटत नाही. यासाठी आधुनिकता व वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा स्वीकार करणे क्रमप्राप्त आहे. ती केवळ आधुनिक प्रगती आणि संस्कृतीची ही गरज नाही तर ती मनाची प्रवृत्ती देखील आहे. कारण आधुनिक यंत्र व साधने वापरून ही मानवी मन सनातनी व पुराणमतवादी असू

शकते यांचा प्रत्यय आपणास व्यवहारात घडोघडी दिसून येतो. भारतीय जनमानस औद्योगिक क्रांतीनंतरची भौतिक उपभोगवादी संस्कृती सहजतेने स्वीकारताना दिसते परंतु मानसिक दृष्ट्या मात्र अजून ही मध्ययुगीनच आहे असे कथन वावगे ठरू नये कारण मानसिक दृष्टिने आम्ही विज्ञानवाद, आधुनिकता स्वीकारताना मानसिक दृष्ट्या प्रगल्भ झालेले नाही आहोत हे सत्य आहे.

**1. चिकित्सक बुध्दी :-**

मानवी मन धर्मग्रंथाचे गुलाम असते. धर्मग्रंथाच्या पलीकडे ही ज्ञान असू शकते हे हिंदू व ख्रिश्चन धर्मीयांनी ओळखले परंतु इस्लामी मानसिकता अद्याप कुराणामधुन बाहेर पडण्यास तयार नाही. जो पर्यंत धर्मग्रंथांचे जोखड मानेवर आहे तोपर्यंत माणूस धर्मग्रंथांची कठोर चिकित्सा व समीक्षा करू शकणार नाही. ख्रिश्चन धर्मामध्ये मार्टिन ल्युथर किंग पासून ही परंपरा चालू झाली आणि आज ख्रिस्ती समाज व राष्ट्रे प्रगतीच्या शिखरावर जाऊन पोहचली आहेत. हिंदू धर्मामध्ये ही परंपरा चार्वाक, महावीर आणि गौतमबुध्द यांच्या पासून सुरू झाली. त्या परंपरेमध्ये अश्वघोष, नागार्जुन, कणाद, भास्कराचार्य यांच्या पासून 20 व्या शतकातील म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेमहाराज यांच्या पर्यंत यांचा विस्तार झालेला दिसून येतो. या सर्वांनी परंपरेची, धर्मग्रंथाची, तत्वज्ञानाची आणि इतिहासाची कठोर चिकित्सा व समीक्षा केली. इस्लाम धर्मांच्या दुर्दैवाने अशी परंपरा फारशी आढळून येत नाही. केमाल पाशा आणि हमीद दलवाई हे यातील सन्माननीय अपवाद होत.

**2. अंधश्रध्दांचा त्याग :-**

कोणत्याही संस्कृतीचा विकास होत असताना श्रध्दा व अंधश्रध्दा एकाचवेळी जन्म घेतात. किंबहुना श्रध्देबरोबरच अंधश्रध्दा निर्माण होते. अंधश्रध्दा मानवी प्रगतीला हानीकारक असतात आणि त्यातून माणुस देवभोळा व धर्मभोळा होतो. एकुणच अंधश्रध्दा वैज्ञानिक दृष्टीकोनासाठी अपायकारक असतात. कोणतीही श्रध्दा ही अंधश्रध्दाच असते असेही काही विचारवंत म्हणतात. नित्शे या जर्मन विचारवंताने ईश्वराचे अस्तित्व नाकारताना असे म्हंटले आहे. ‘‘देवा शपथ ! देव अस्तित्वात नाही.’’[58] म्हणजेच नित्शेला देखील ईश्वराचे अस्तित्व नाकारताना शेवटी ईश्वराचा आधार घ्यावा लागला. वेडगळ श्रध्दा, समजुती, विश्वास, नवस या शेवटी अंधश्रध्दाच ठरतात. म्हणून त्यांचा त्याग केल्याशिवाय यातील वैज्ञानिक दृष्टीकोन समोर येत नाही. सूर्यग्रहण वा चंद्रग्रहण लागले असताना अंधश्रध्देपोटी माणसे ‘दे दान सुटे गिराण’ असे म्हणतात परंतु यातील भौगोलिक सत्याकडे सर्वजण डोळेझाक करतात. त्यामुळे रूढी, परंपरा, व्रतकैवल्ये या सर्वांचा मानव जातीने त्याग केला पाहिजे हा वैज्ञानिक दृष्टीकोनाचा एक आधारस्तंभ होय.

**3. आधुनिकतेचा स्वीकार :-**

आधुनिकता ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. यामध्ये सातत्याने सूक्ष्म बदल होत असतात. आधुनिकतेतुन मानव जात प्रगतीकडे जाते. आधुनिकतेचा स्वीकार करणे म्हणजे नेमके काय ? या बद्दल अनेक मतभेद आहेत. काही लोकांच्या मते जुने सर्व विचार टाकणे व नवीन विचारांचा स्वीकार करणे म्हणजे आधुनिकता होय परंतु जुने सर्वच विचार टाकाऊ असतीलच असे नाही. यंत्र संस्कृतीचा स्वीकार, विज्ञानवादी दृष्टी, पुरातन विचारसरणीचा त्याग, नव्या अर्थशास्त्रीय संकल्पनाचा स्वीकार या सर्व बाबी आधुनिकतेमध्ये येतात. आधुनिकीकरण ही केवळ संकल्पनाच नसून ती मानवी संस्कृतीची एक मूलभूत गरज आहे. त्यासाठी माणसाने स्वतः आधुनिक झाले पाहिजे. बऱ्याचदा असे दिसुन येते माणसे आचाराने आधुनिक असतात परंतु विचाराने ते सनातनीच राहतात यासाठी मनानेही आधुनिक होणे गरजेचे आहे.

**4. विज्ञान हाच सर्वश्रेष्ठ धर्म :-**

जगामध्ये आज अनेक धर्म आहेत. जवळपास सर्व धर्म आजही पुराणमतवादी विचारसरणीला कवटाळुन बसले आहेत. विज्ञानाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टीकोन काहीसा उपेक्षेचा आहे. किंबहुना धर्म आणि विज्ञान परस्परांच्या विरोधात उभे ठाकल्याचे पदोपदी दिसुन येते. माणसाने धार्मिक रूढींचा त्याग केला पाहिजे किंबहुना धर्माची पट्टी डोळ्यावरून काढून टाकली पाहिजे. तुमचा वैयक्तिक धर्म कोणताही असो परंतु तो धर्म तुमच्या खाजगी जीवनापुरताच मर्यादित राहिला पाहिजे व त्याचे आचरण वैयक्तिक बाब असली पाहिजे. परंतु आमचा धर्म आम्हाला रस्त्यावर घेऊन येतो व हिंसाचारास प्रवृत्त करतो. जो वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. म्हणून वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारून विज्ञान हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे आपल्या आचरणाने आपण सिध्द केले पाहीजे. जे वैज्ञानिक दृष्टीने टाकाऊ आहेत व सिध्द होत नाहीत अशा सर्व धर्मकल्पनांचा ज्या वेळेस मानव त्याग करेल आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाची जोपासना करेल त्यावेळी जगामध्ये विज्ञान हा सर्वश्रेष्ठ धर्म म्हणून अवतरेल याबाबत कोणताच संशय नाही.[59] हाच वैज्ञानिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून हमीद दलवाई यांनी इस्लामचे आधुनिक रूप जगासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला.

**5. सुधारणावादी दृष्टीकोन :-**

माणसातील सनातनी प्रवृत्ती ही त्याच्या प्रगतीच्या मार्गातील एक मोठी अडचण आहे. सुधारणांचा स्वीकार केल्या शिवाय माणूस प्रगती करू शकत नाही. समाजाची प्रवृत्ती ही गतीशील नसुन स्थितीशील असते. मानवी समाज "ठेवले अनंते तैसेची रहावे।" या विचारसरणीचा असतो. अर्थात याला काही मूठभर समाजसुधारक अपवाद असतात पण इतिहासाची साक्ष आहे की जगातील सर्वंच समाजसुधारकांना त्यांच्या कार्यामध्ये समाजाचे

शिव्याशाप सोसावे लागले. त्याची छळवणूक, आडवणूक व पिळवणूक झाली. परंतु त्यांनी धैर्य न सोडता सुधारणावादाचा पुरस्कार केला. मूळातच सुधारणा या धर्म विरोधीच असतात असा समाजामध्ये प्राचीन काळापासून समज असल्याचे दिसून येते. मार्टिन ल्युथर किंग, इरॅस्मस, सॉक्रेटिस् या युरोपीय विचारवंताना[60] तसेच प्राचीन भारतातील अनेक संत महात्म्यांना एवढेच नव्हे तर इस्लामच्या प्रेषिताला सुध्दा सुरूवातीच्या काळात प्रचंड विरोध सहन करावा लागला.[61] सुधारणांचा स्वीकार करणे म्हणजे आधुनिक होणे परंतु समाजाची स्थितीशील प्रवृत्ती याला सहजा सहजी मान्यता देत नाही. सुधारणावादी दृष्टीकोन हा निकोप व निरोगी जीवन शैलीचा मार्ग प्रशस्त करतो आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाकडे मानव जातीला घेऊन जातो.

**6. इहवादी विचाराचा स्वीकार :-**

इहवादी विचारसरणी ही वैज्ञानिक दृष्टीकोनाची सर्वांत मोठी व महत्वाची पायरी आहे. इहवाद अंधश्रध्देची जोखडे फेकून देतो, धार्मिक ग्रंथाची कठोर चिकित्सा व समीक्षा करतो. विज्ञान हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे मानतो. इहलोकातील प्रगतीचा विचार करतो. कर्मसिध्दांत, पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य या सर्व संकल्पना तो रद्द ठरवतो. इहवादी विचारसरणी राज्यघटनेवर श्रध्दा व विश्वास ठेवण्यास शिकवते. परस्परांच्या भावनांचा आदर करण्यास मदत करते. विचारांबाबत मतभेद असतील तर ते टाळून किंवा त्याचे समायोजन करून पुढे जाण्यास मदत करते. इहवादी संकल्पना स्वीकार केल्यानंतर मानवी जीवन खऱ्या अर्थाने सुखी व समृध्द बनते हे नि:संशय खरे आहे. परंतु आजही इहवादाकडे एक पाखंड व पाखंडी दृष्टीकोन म्हणूनच पाहिले जाते, ही इहवादाची नव्हे तर मानव जातीची शोकांतिका आहे. इहवादी विचारधारा हा आधुनिक विचार नसून प्राचीन काळापासूनच भारतामध्ये प्रचलित आहे. यांचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे चार्वाक हे होय. चार्वाकाने प्राचीन काळीच एक प्रश्न उपस्थित केला 'भस्मीभुत देहः कुतस्य पुनरागमन ?'[62] अर्थात देह भस्म झाल्यानंतर आत्मा केव्हा पुनर्जन्म घेतो ? यावरूनच इहवादी विचारसरणीचा प्रभाव भारतात प्राचीन काळापासून आढळतो असे म्हणता येईल. इहवादी विचारसरणीतून मनुष्य वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या वाटेवर मार्गक्रमण करतो असे आपणास या संदर्भात म्हणता येईल.

**7. भौतिकवादाचा स्वीकार :-**

भौतिकवादी दृष्टीकोन ही विज्ञानवादाची एक महत्वपूर्ण पायरी आहे. भौतिकवादामध्ये तंत्रज्ञान, यंत्र संस्कृती, ऐहिकता, धर्मनिरपेक्षता, ऐहिक अभ्युदय, विज्ञान बोध, उपयुक्तता इत्यादी अनेक मुद्दे यामध्ये समाविष्ट आहेत. भौतिकवाद स्विकारण्यात कदाचित आम्ही अमेरिकेच्याही पुढे आहोत. रूढ अर्थाने भारतीय समाज आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला असला तरी भौतिक सुधारणांचा वापर दैनंदिन जीवनात करणे म्हणजे आधुनिकता नव्हे. तर त्यासाठी जुनाट चालीरीती, परंपरा यांचा जो पर्यंत विनाश होत नाही व त्यातून सामाजिक

सुधारणा होत नाहीत तो पर्यंत भौतिकवाद वा भौतिकवादी दृष्टिकोण हा आपल्या संदर्भात व्यर्थ आहे असेच म्हणावे लागते. यातील उपरोक्त मुद्यांचा विचार केल्यावर असे दिसून येते की भौतिकवादी दृष्टीकोन अंधश्रध्दा व अशास्त्रीय संकल्पनांचा त्याग करतो. यंत्रसंस्कृतीच्या माध्यमातुन माणसाने विमान, अंतरिक्षयान, मोठी जहाजे, औद्यागिक प्रगती इत्यादीचा विकास केला. औद्योगिक क्रांती ही भौतिकवादाच्या स्वीकारातूनच जन्मास आलेली आहे. भौतिकवाद हा उपयुक्ततेच्या कसोटीवर आधारित आहे. जे उपयुक्त आहे, समकालीन वातावरणाशी जुळवून घेते आणि मानवी जीवन संपन्न करते. भौतिकवादाचाच स्वीकार माणसाला ऐहिक विकासाकडे घेऊन जातो. ऐहिक अभ्युदय घडवून आणतो आणि भौतिक सुखसोयी आणि सुविधा प्रदान करतो. भौतिकवादामध्ये धर्मश्रध्दा व अंधश्रध्दा या दोन्हीस ही काहीही स्थान नसते किंबहुना धर्म भौतिकवादाच्या खिजगणतीत ही नसतो एवढेच आपल्याला या संदर्भात सांगता येईल.

**8. शब्दप्रामाण्य नव्हे तर बुध्दीप्रामाण्य :-**

बऱ्याच वेळा धर्मग्रंथ, पोथी, परंपरा, रूढी याला अनुसरूनच मानवी वर्तन घडत असते. परंपरेने जे सांगितले आहे त्याला विरोध केला जात नाही. धर्मग्रंथाच्या पलीकडे काहीही नाही हिच भावना यामध्ये अनुस्युत असते त्यामूळे 'बाबा वाक्य प्रमाणम्' हीच व्यक्तीची पर्यायाने समाजाची मनोधारणा असते. चिकित्सक बुध्दीचा वापर केला जात नाही. बुध्दीचा वापर केल्यानंतर जगातील सर्व गूढे उकलली जातात परंतु तसे होताना दिसत नाही कारण माणूस परंपरेला सोडत नाही. यासाठी बुध्दीवादाचा वापर करणे महत्वाचे असते, पोथीमध्ये जे आहे तेच खरे असे मानणारे बहुसंख्याक असतात. बुध्दीवादाच्या दृष्टीने असे म्हणता येईल की धर्ममत आणि परंपरा या मानवी जातीचा मोठा ठेवा आहे. परंतु प्रत्येक धर्ममतामध्ये जे चिरंतन सत्य आणि ज्याच्यामुळे मानवी जीवन सुकर व सुखकर होईल त्याचाच वापर दैनंदिन जीवनात करणे म्हणजे बुध्दीप्रामाण्य होय आणि त्यानेच बुध्दीवादाचा स्वीकार केला आहे असे आपण म्हणू शकतो. बुध्दीवादामुळेच वैज्ञानिक प्रगती होऊ शकते. आजच्या वैज्ञानिक युगात ज्या खुळचट रूढी, परंपरा, व्रते, मते प्रचलित आहेत ती मानव जातीने सोडली पाहिजेत परंतु असे दिसते की आजही मानवी मन वेडगळ संकल्पना आणि चुकीच्या धर्म परंपरा सोडत नाही. त्यामुळे शब्दप्रामाण्याचा त्याग करून बुध्दीवादाचा आणि बुध्दीप्रामाण्याचा स्विकार केला जात नाही तोपर्यंत मानवी मन गतानुगतिक पध्दतीने रानटी धर्ममूल्यांचा अवलंब करीत राहिल आणि अशा परिस्थितीत वैज्ञानिक दृष्टीकोन व विज्ञानवाद विकसित होण्याची सुतराम शक्यता नाही. भारतीयांमध्ये मोठी वैज्ञानिक परंपरा असली तरी या परंपरेनंतर मोठा अंधार शेकडो वर्षे होता आणि भारतीयांची मानसिकता विज्ञानाच्या विरोधीच असलेली दिसते.

## 9. वैज्ञानिक नियमाचा शोध :-

या सृष्टीमध्ये होणारी प्रत्येक क्रिया ही वैज्ञानिक नियमाच्या आधारेच होते. पृथ्वी, चंद्र, सर्व ग्रह हे सूर्याभोवती परिक्रमा करतात ते देखील वैज्ञानिक नियमांच्या आधारावरच. न्युटनच्या गतीविषयक नियमान्वये हे सिध्द झालेले आहे.[63] कोपर्निकस, गॅलिलियो, कणाद, भास्कराचार्य यांनी वैज्ञानिक नियमांमध्ये फार मोठी भर घातली आहे. मूळात वैज्ञानिक नियम हा प्रयोगामुळे सिध्द होतो. प्रयोग केले जातात त्यातून निरीक्षण, परीक्षण व अन्वीक्षण केले जाते. आलेल्या निष्कर्षाचे विश्लेषण करून वैज्ञानिक नियम तयार होतात. परीक्षणा अंती निघालेले निष्कर्ष हे क्रियाकारणभाव यामध्ये जेव्हा चपखलपणे बसतात तेव्हाच तो वैज्ञानिक नियम सिध्द होतो, एरवी नाही. वैज्ञानिक नियमामुळे मानवी सृष्टीची रहस्ये उकलण्यास मदत होते. ऋतुंचे क्रमबध्द येणे जाणे, आकाशातील ग्रह गोलाचे परिवलन, परिभ्रमण, पदार्थ विज्ञानातील गृहितके व प्रमेये, गणितातील बीजसूत्रे ही सर्व वैज्ञानिक नियमांनी बध्द असतात. पृथ्वीवर घडणाऱ्या प्रत्येक नैसर्गिक गोष्टीला देखील वैज्ञानिक नियमांचाच आधार असतो म्हणून वैज्ञानिक दृष्टीकोन हा वैज्ञानिक नियमाच्या आधाराने अधिक स्पष्ट होतो. प्रबोधन हा शब्द इंग्रजी 'रेनेसांस' या शब्दाला मराठी पर्याय म्हणून वापरला जातो. इ. स. च्या 14 व्या शतकानंतर युरोपमध्ये प्रबोधन चळवळ सुरू झाली. या चळवळीलाच पुनरूज्जीवनाची चळवळ आहे असे ही संबोधले जाते. या चळवळीपुढे युरोपीयन समाजाने जुन्या परंपरागत विचारांचा व कल्पनांचा त्याग केला आणि नव्या बुध्दीवादी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाचा स्वीकार केला. या सुमारास युरोपात सुरू झालेल्या धर्मसुधारणेच्या चळवळी पुढे समाज जीवनावरील धर्मसंस्थेचा प्रभाव कमी झाला यांचा एकत्रित परिणाम म्हणजे युरोपचा आधुनिक युगात झालेला प्रवेश होय.

रेनेसांस (प्रबोधन) या शब्दाचा थोडक्यात अर्थ म्हणजे जुन्या आचार विचारांना, रूढी परंपराना टाकून देऊन व बदलून नव्याने जगण्याचा प्रयत्न करणे होय.[64] युरोपात असे प्रबोधन झाले होते. मध्ययुगाची अंधार यात्रा संपवून सर्वच क्षेत्रात नव्या जाणीवा आणि नवी क्षितिजे प्रकट झाली होती. इ. स. 1453 मध्ये तुर्कांनी इस्तंबुल शहर जिंकले त्यामुळे युरोपचा आशिया खंडाशी चालणारा व्यापार धोक्यात आला. कारण हे शहर युरोप व आशिया यांच्यात जमीनीवरील मार्गाने चालणाऱ्या व्यापारातील एक महत्वाचे केंद्र होते. युरोपिय राष्ट्रांना मसाल्याच्या पदार्थासाठी आशियावर अवलंबून रहावे लागत असलेमुळे त्यांच्या दृष्टीने हे व्यापारी संबंध अतिशय महत्वपूर्ण होते. अशा परिस्थितीत आधुनिक दृष्टीकोन प्राप्त झालेल्या युरोपीय राष्ट्रांनी पूर्वेकडे जाण्याचे नवे जलमार्ग शोधून काढण्याचे प्रयत्न चालविले. यातूनच कोलंबसला अमेरिकेचा शोध लागला तर इ. स. 1498 वास्को-दी-गामा हा कालिकत येथे पोहचला.

तुर्कोनी ज्यावेळेस इस्तंबुलवर आपली सत्ता प्रस्थापित केली तेव्हा तेथे वास्तव्य करून असणाऱ्या विव्दानांनी पलायन केले व पश्चिम युरोपात आश्रय घेतला. जुने ग्रीक ज्ञान, ग्रीक ग्रंथ, ते आपल्या बरोबर घेऊन आले होते. युरोपमध्ये नव्याने त्या ग्रंथाचे अध्ययन व त्या ज्ञानाची उपासना सुरू झाली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये एकप्रकारे वैचारिक व सांस्कृतिक क्रांती यातून उभी राहिली. ऐहिक विषयाच्या स्वतंत्र अध्ययनातून प्रस्थापित चर्च नियंत्रित धर्मव्यवस्थेला नवीन आव्हाने मिळाली. ज्ञान व त्याचा प्रसार ही केवळ चर्चची मक्तेदारी उरली नाही. डॉ. भा. ल. भोळे आपल्या 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' या ग्रंथात म्हणतात. ''ग्रीक विद्येचे पुनर्जीवन आणि यातून युरोपियनांना प्राप्त झालेली नवी जीवन दृष्टी या अर्थाने रेनेसांस हा शब्द तिकडे रूढ झाला. कांट हा तत्ववेत्ता त्याला 'चिकित्सेचे युग' असे संबोधितो त्या युगाचा हा प्रारंभ होता.[65]

### 10. यंत्र संस्कृतीला प्रोत्साहन :-

यंत्र संस्कृतिचा शोध लागण्यापूर्वी मानव हातानेच सर्व कामे करीत होता. उत्क्रांतिच्या या टप्यात मानवाला अग्नीचा शोध लागला आणि तेथून खऱ्या अर्थाने यंत्र युगाची सुरूवात झाली असे म्हणता येईल कारण दोन विशिष्ट दगड एकमेकांवर घासून ठिणग्या पाडून माणूस अग्नी प्रज्वलीत करू लागला. ते विशिष्ट दगड म्हणजे त्याचे एकप्रकारचे प्राथमिक यंत्रच होते. इ. सनाच्या 16 व्या शतकामध्ये युरोपमध्ये जी बौध्दीक क्रांती झाली, विज्ञानाव्दारे नवेनवे शोध लागले आणि वैज्ञानिक नियमाने जेव्हा हे संपूर्ण विश्व बध्द झाले त्यावेळी खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांतीची पहाट झाली. औद्योगिक क्रांतिने यंत्रयुगाचा पुरस्कार केला. नवनवीन हजारो यंत्रे मानवासमोर गुलामासारखी सिध्द होऊन काम करू लागली आणि औद्योगिक क्रांतीचा पाया भक्कम झाला. तरीही 20 व्या शतकात व आज 21 व्या शतकात सुध्दा काही वेडगळ समजुतीमुळे आजही माणूस यंत्रसंस्कृतीला विरोध करताना दिसून येतो. त्यावेळी त्याच्या बुध्दीची कीव करावी लागते. यंत्र संस्कृतीला प्रोत्साहन दिल्यामुळेच विज्ञानाची प्रगती झाली हे वैश्विक सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. आज भारतातील काही महानगरे सायबर सिटीज् म्हणून ओळखली जातात. हे सर्व यंत्रसंस्कृतीला प्रोत्साहन दिल्यामुळेच झालेले आहे हे निःसंशय खरे आहे.

युरोपातील प्रबोधन ही अनेक अर्थाने नवनिर्मिती होती. साहित्य, संगीत, कला, छंद, तर्क, नैतिकता, समाजकारण, धर्मकारण, राजकारण या सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले होते. व्यक्तिला व्यक्ति म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. कारण या युगात सर्वच गोष्टी ज्या मानवी जीवनाशी संबंधित आहे. तत्ववेत्ता कान्ट म्हणतो, ''सर्वच गोष्टीनी ही चिकित्सा करून घ्यायला मान्यता दाखविली पाहिजे. धर्म आपल्या पावित्र्याच्या जोरावर आणि कायदा आपल्या महत्तेच्या जोरावर कदाचित अशा चिकित्से पासून निसटू पाहतील पण मग ते स्वतः बद्दल संशय

निर्माण करतील. आणि हा संशय योग्य ठरेल. ज्या गोष्टी स्वतःचे मोकळेपणाने आणि खुलेपणाने केलेले परीक्षण सहन करू शकतात अशा गोष्टी विषयीच बुध्दीला जो मनःपूर्वक आदर वाटतो ते त्या आदराला पात्र ठरणार नाहीत.'' [66]

रेनेसांसमधून जी तत्वे प्रगट झाली त्यामध्ये मानवी जीवनाला केवळ ऐहिकच संदर्भ आहे. मरणोत्तर सद्‌गतीसाठी झटण्यापेक्षा जिवंत असे पर्यंतच्या सुखासाठी माणसाने झटावे. विवेक आणि अनुभव महत्वाचे आहेत. भ्रम, अज्ञान, सामाजिक विषमता यातून माणसाची मुक्ती व्हावी. व्यक्तिवाद, मानवतावाद, धार्मिक सहिष्णुता, बुध्दीप्रामाण्य, वैज्ञानिकदृष्टी, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे रेनसांस मधील महत्वपूर्ण विचार आहेत.

19 व्या शतकामध्ये आपल्या देशामध्ये अनेक विचारवंत उदयास आले. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोनाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आणि भारतीय समाज विज्ञानवादाकडे वाटचाल करू लागला. अनेक समाजसुधारकांनी धर्मग्रंथाची कठोर समीक्षा केली व धर्माचे सत्यस्वरूप लोकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. वेडगळ रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यांचा त्याग केला गेला आणि भारतीय आधुनिकतेचा स्वीकार करू लागले. शब्दप्रामाण्य नव्हे तर बुध्दीप्रामाण्य हा नवा निकष समोर आला. जीवनाशी संबधित समस्यावर विचार केला जावू लागला. अनेक प्रयोग झाले. परीक्षणाअंती निघालेल्या निष्कर्षाचे रूपांतर वैज्ञानिक नियमामध्ये झाले. लोकांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. आज विज्ञान हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे मानणाऱ्याची संख्या बरीच आहे. 20 व्या शतकाच्या अंतिम दशकात माहितीचा स्फोट झाला आणि Internet च्या माध्यमातून जग परस्परांशी जोडले गेले. आज आपण वैश्विक खेड्यात राहात असून हे संपूर्ण जग हाकेच्या अंतरावर आले आहे. मानव जातीने इहवाद व भौतिकवादाचा स्विकार केला आहे. आपले ऐहिक जीवन निकोप व निरोगी कसे होईल या दिशेने मनुष्य विचार करू लागला आहे ही समाधानाची बाब आहे. सुधारणावादी दृष्टीकोन स्वीकारून माणसाने यंत्रसंस्कृतीला प्रोत्साहन दिले. रोजगाराच्या नव्या-नव्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. विज्ञानाचा स्वीकार केल्यामूळेच हे सर्व शक्य झाले आहे. हे सर्व होत असताना समाजातील एक वर्ग अद्यापही जुन्याच रूढी परंपरांना चिकटून बसलेला आहे. जोपर्यंत हा वर्ग आपल्या रूढी परंपरांना तिलाजंली देत नाही तोपर्यंत विज्ञानवादी समाज संपूर्णपणे अस्तित्वात येणे एक स्वप्नच ठरेल असे वाटते.

### 3.2.3 विज्ञानवादाची आवश्यकता :-

विज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे मानवी जीवन आणि संस्कृती सुखी, संपन्न आणि समृध्द बनते. मात्र हे ही नोंद ठेवणे आवश्यक आहे की विज्ञान दुधारी तलवार आहे. विज्ञान हे जसे वरदान आहे तसा तो एक अभिशाप ही आहे. उदाहरणार्थ अणुशक्तिचा वापर मानवाच्या विनाशासाठी करता येतो तसेच मानवाच्या प्रगतिसाठी

अणुशक्तिमधून वीज निर्मिती ही करता येते. मानवी जीवन विज्ञानामुळे एका बाजूने सुकर झाले तर दुसऱ्या बाजूने कठीण सुध्दा झाले. माणसाला जीवे मारणारी नवीन नवीन शस्त्रे विज्ञानामुळे माणसाच्या हातात आली परंतु मेलेला माणूस जिवंत करू शकेल असे एकही शस्त्र विज्ञान शोधू शकले नाही. परंतु तरीही विज्ञानाचे महत्व आणि महात्म्य कमी होऊ शकत नाही कारण मानवी मन बुध्दीचा प्रचंड महासागर असते. माणूस आपल्यासमोरील अडचणी, संकटे व समस्या यावर मात करण्यासाठी रात्रंदिवस धडपडतो. येथेच वैज्ञानिक दृष्टीकोनाचा जन्म होतो. विज्ञान व अध्यात्म यांचा झगडा पुरातन काळापासून चालू आहे. परंतु विज्ञान तर्कशक्तीच्या कसोटीवर ज्याप्रमाणे उतरते त्याप्रमाणे अध्यात्म उतरत नाही हे पण या ठिकाणी नमुद करावे वाटते.

यामध्ये 21 वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. आज रोजगाराच्या नव्या नव्या संधी व क्षितिजे मानव जातीला खुणावत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात ज्ञानाचा चिरंतन प्रवाह वाहताना दिसत आहे. आजच्या युगात धर्मश्रध्दा, रूढी, परंपरा एवढेच नव्हे तर ईश्वर विषयक संकलन सुध्दा कालबाह्य झालेल्या आहेत. 21 व्या शतकाचे सर्वांत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या सर्वांमुळे इतिहासाचा मृत्यु झाला असे मानले जाते. या संकल्पनेवर थोडासा विचार केल्यानंतर आपल्याला जाणवते की पुरातन रूढी परंपरा, संस्कृती व सभ्यता, धर्म व धार्मिक श्रध्दा या सर्व संकल्पना माणसाने सोडून दिलेल्या आहेत आणि माणूस आधुनिकतेकडून उत्तर आधुनिकतेकडे निघालेला आहे. काही विचारवंत त्यापुढे जाऊन 'पराआधुनिकतावाद' ही संकल्पना मांडताना दिसत आहेत. इतिहास is an unending process अर्थात इतिहास ही अंतहीन प्रक्रिया आहे.[67] त्यामुळे इतिहासाचा अंत ही परिकल्पना अशक्य आहे. कारण इतिहास व मानवसमूह याच्यामध्ये अतूट नाते आहे. मानव इतिहासापासून बोध घेतो आणि पुढील वाटचाल करू लागतो परंतु वर्तमान मानव इतिहासापासून काहीच बोध घेत नाही उलट ऐतिहासिक परंपराचा अस्वीकार करतो आणि पुढे जातो. पण इतिहासाचे अस्तित्व कायम रहाणार आहे. भूतकाळाच्या पूर्वी ही इतिहास होता, आजही इतिहास जिवंत आहे व भविष्यकाळात ही त्याचे अस्तित्व राहीलच म्हणून इतिहासाचा मृत्यु झाला आहे असे कथन गैर लागू आहे. 21 व्या शतकात विज्ञानवादाची यासाठीच आवश्यकता आहे. अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यांचा त्याग करून नवनवीन संकल्पनांचा शोध घेणे आणि त्यातून आपली जीवनशैली समृध्द करणे यासाठी विज्ञानवादाची आवश्यकता आहे असे वाटते.

### 3.3 इहवाद :-

धर्मनिरपेक्षता व इहवाद या दोन शब्दाच्या स्पष्टीकरणामध्ये फार मोठा गोंधळ असलेला दिसुन येतो. धर्मनिरपेक्षतेचा मूळ अर्थ इहवाद असाही सांगितला जातो परंतु संशोधकाच्या मते इहवाद हा बुध्दिवाद, विज्ञानवाद,

प्रयोगनिष्ठा यांचा गौरव करतो तसेच इहवाद हा निरिश्वरवादी आहे. म्हणजेच तो अस्तिक विचारधारेला पूर्णपणे नाकारतो. इहवाद ही संकल्पना अनेक लक्षणांनी स्पष्ट करता येते. जगाच्या संदर्भात आणि जगासबंधीच केलेला विचार म्हणजे इहवाद होय. यावरून आपणास म्हणता येईल की इहवाद हा केवळ मानवी सृष्टीशी संबंधित आहे. यामध्ये धर्म-कर्म सिध्दांत, स्वर्ग-नरक या गोष्टींना कोठेही थारा देत नाहीत. बऱ्याचदा इहवाद हा परंपरागत धर्मश्रध्दा व विचारांना छेद देण्याचे कार्य करतो. जगातील रूढ धार्मिक संकल्पनांना यामध्ये स्थान नाही. इहवाद हा परिवर्तनशीलतेला मदत करतो. धर्मचिकित्सा, धर्मग्रंथ चिकित्सा या वादाचा एक आधार आहे. धर्मग्रंथ हे अपौरूषेय नाहीत ही इहवादाची भूमिका दिसून येते. भारतीय संस्कृतीने सांगितलेल्या धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरूषार्थां पैकी इहवादाच्या दृष्टीकोनातून अर्थ व काम हेच दोन प्रमुख पुरूषार्थ आहेत. पारलौकिक जीवनाचा विचार इहवाद करीत नाही. आत्मा व परमात्मा यांचे अस्तित्व आजपर्यंत कोणीही सिध्द करू शकला नाही. सबब त्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवता कामा नये ही इहवादाची मुख्य भूमिका आहे. इहवादी विचारसरणी भारतामध्ये प्राचीन काळापासूनच रूढ आहे. चार्वाक, बृहस्पती, बुध्द, महावीर यांनी इहवादी विचारधारेलाच प्रोत्साहन दिल्याचे दिसुन येते.

इहवादाची सुस्पष्ट व्याख्या करताना पु. ग. सहस्त्रबुध्दे आपल्या 'इहवादी शासन' या पुस्तकात म्हणतात, "इहवादी म्हणजे ऐहिकनिष्ठ या जगातील व्यवहाराला जीवनाला महत्व देणारे तत्व म्हणजेच इहवाद."[68] पुढे ते म्हणतात, "इहवाद म्हणजे बुध्दिवाद, विज्ञानवाद, प्रयोगनिष्ठा, व्यक्ती स्वातंत्र्य असा शब्दार्थ नसला तरी भावार्थ निश्चित आहे."[69] थोडक्यात भारतीय व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्याचा हक्क जपताना मानवाच्या भौतिक कल्याणाच्या मार्गात कोणताही धर्म व कोणाचेही धर्मस्वातंत्र्य, हक्क, अडथळा निर्माण करणार नाहीत याची व्यवस्था भारतीय राज्यघटनेने केली आहे.[70]

थोर विचारवंत व विश्वमानव संकल्पनेचे जनक मानवेंद्रनाथ रॉय यांनी इहवादाची संकल्पना नवमानवतावादाच्या दृष्टीकोनातून मांडलेली आहे. "इहवाद म्हणजे माणूस धर्मांच्या बंधनातून मुक्त होणे."[71] रॉय यांच्या या विवेचनामध्ये मार्क्सवाद दिसुन येतो. मुळात कोणताही वाद व त्यांचा प्रवर्तक हा अनुक्रमे धर्म व प्रेषिताच्या भूमिकेतच असतो. त्यामुळे एम. एन. रॉय यांचे प्रस्तुत मत हे मार्क्सवादी विचारधारेचे समर्थन करते कारण मार्क्सवादाने धर्माला अफूची गोळी म्हंटले आहे हे सर्वश्रुत आहे. धर्माची नशा मानवी बुध्दी गहाण ठेवते आणि धर्मनशा ही उत्तरोत्तर वाढतच जाते. मार्क्सच्या विचारातून होणारा अभिप्रेत अर्थ इतकाच आहे. यालाच अनुसरून हेरॉल्ड लास्की या युरोपीय विचारवंताच्या मते, "कम्युनिझम हा एक धर्मपंथ असून स्टॅलिन हा त्याचा

पोप आहे.''[72] यावरुन आपणास म्हणता येईल की कोणतीही विचारधारा शेवटी धर्मपंथाचे रूप धारण करते आणि त्याचा प्रवर्तक शेवटी प्रेषित बनतो.

कार्ल मार्क्सने ईश्वर व धर्म या संकल्पना शोषणाच्या संस्था असल्याचे शास्त्रीय पध्दतीने विवेचन केले. परंतु मार्क्सवाद सर्वांनाच मान्य होत नाही. प्रत्येक संस्कृतीतील नास्तिकांनी ईश्वराच्या आस्तित्वावर प्रश्न चिन्ह निर्माण केले आहे. परंतु त्यांची संख्या फार कमी होती याउलट बहुसंख्य लोक हे धर्म व ईश्वर यांनाच कवटाळून राहिले. ईश्वर सत्य नाही हे या मंडळीना रूचले नाही पचले नाही म्हणून इहवादाचा स्विकार खऱ्या अर्थाने मानव जातीने केला नाही. आज इहवादास पाखंड मानले जाते. हे खरे तर मानवी जीवनाला अधिक हानी पोहोचवणारे आहे.

स. मा. गर्गे यांनी 'भारतीय समाजविज्ञान कोशां' मध्ये इहवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.

1. या जगाच्या संदर्भात व जगासंबंधी केलेला विचार म्हणजे इहवाद.
2. इहवादामध्ये रूढ धर्मवादाचा विचार येत नाही.
3. इहवादात मनुष्यजीवन, त्यांच्या समस्या, अर्थ आणि काम, अनुभवजन्य ज्ञान व प्रवृत्तीवादी जीवन यांचा विचार केला जातो.
4. अपरिवर्तनशील विचारपध्दती इहवादास मान्य नाही कारण ती इहवादी प्रगतीला उपकारक ठरू शकत नाही.
5. पारलौकिक जीवनाचा विचार इहवादाला अनावश्यक वाटतो.
6. परलोक किंवा त्याच्याभोवती उभारलेल्या कल्पना यांचा इहवादी जीवनाशी संबंध कोणालाही सिध्द करता आलेला नाही.
7. शब्दप्रामाण्य हे मानवी बौध्दीक सामर्थ्यांचा अपमान करते.
8. बुध्दीला प्रमाण मानणे योग्य ही इहवादाची मध्यवर्ती कल्पना आहे.[73]

वरील सर्व बाबींचा साकल्याने व सर्वंकष विचार करून विवेचनाच्या पुढील भागामध्ये प्रस्तुत संशोधकाने इहवादाचे स्वरूप उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### 3.3.1 इहवादाचे स्वरूप :-

इहवादाचा विचार करताना असे दिसून येते की ही संकल्पना पूर्णपणे पाश्च्यात्य विचारावर अवलंबुन आहे. बऱ्याच वेळा सुशिक्षित व उच्च विद्याविभूषित लोक इहवादी व्याख्या करताना तिला (इहवादाला) धर्मनिरपेक्षता, निधर्मी, सर्वधर्मसमभाव या संकल्पनांशी जोडतात. आपण वर पाहिले आहे की धर्मनिरपेक्षता मानव

जातीला धर्मांच्या पलीकडे पहावयास शिकविते तर सर्वधर्मसमभाव हा समाजाला धर्मबंधनात जखडून ठेवतो. भारतासारख्या विशाल देशात प्राचीन काळापासूनच सहिष्णु परंपरा होती व आजही आहे. त्यामुळे भारतीयांना धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? हे सांगण्याची गरज नाही. हिंदू तत्वज्ञानानुसार पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते अर्थात मूलतत्वे मानली जातात. या पंचमहाभूतांचे जसे सृष्टित अस्तित्व असते तसेच मानवी देहात ही त्याचे अस्तित्व असते. इतकेच नव्हे तर निर्जीव वस्तुमध्ये ही चैतन्य असते असे ही मानले जाते.[74] नद्या, पर्वत, सागर, नक्षत्रे या सर्वांमध्ये ईश्वराचे अस्तित्व आहे अशी हिंदूची श्रध्दा आहे. सर्व मानव समान आहेत, एकाच ईश्वराची संतान आहेत त्यामळे सर्वांच्या ठाई एकच चैतन्य भरून राहीले आहे. या संपूर्ण सृष्टित लहान मोठा कोणी नाही आणि ईश्वरापुढे सर्व समान आहेत ही सहिष्णु प्रवृत्ति हिंदू धर्मियांच्या हाडीमांसी खिळून राहिली आहे. म्हणूनच एका बाजूला हिंदू धर्म आपल्या अनुयायांना ईश्वराची संतान म्हणवतो.[75] तर दुसऱ्या बाजूला जरी आपल्या विरोधी मत असले तरी त्या मताचा सहिष्णुपणे स्वीकार करतो. म्हणूनच बुद्ध, चार्वाक, कपिल व महावीर यांनी उघडपणे हिंदू तत्वज्ञानाच्या विरोधात आपली मते मांडली तरी हिंदू धर्म व संस्कृतीने त्यांचा छळ केला नाही उलट त्यांच्या विचारांची गुणग्राहकता समजावून घेतली. इहवाद हा पूर्णपणे धर्मातीत दृष्टीकोन बाळगतो. निधर्मी शब्दामध्येही धर्माचे वर्चस्व मानले जातेच त्यामुळे सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता आणि निधर्मी या तीन पायऱ्या ओलांडुन जेव्हा मनुष्य पुढे जातो त्यावेळेसच तो खऱ्या अर्थाने धर्मातीत किंवा इहवादी होतो. ज्यामध्ये पुढील तत्वे अनुस्युत आहेत. स्थूल मानाने इहवाद या पुढील वाटचाल आहे. माणूस इहवादी असतो म्हणजे नेमका काय असतो व त्याची तत्वे कोणती असतात याबद्दलही अनेक विचारवंत गोंधळलेले आहेत. इहवादाची तत्वे माणसाला प्रगतीच्या मार्गाकडे घेऊन जातात. भारताचा प्राचीन इतिहास अत्यंत वैभवशाली आहे. इहवादाने भारतीयांना मुक्त चिंतन करावयास शिकविले होते. येथील जनतेवर इहवादाचे संस्कार झाले असलेच पाहिजेत असे थोर विचारवंत पु. ग. सहस्त्रबुध्दे म्हणतात, ‘‘कर्मा-कर्माचा निर्णय करताना समाज उत्कर्षाची चिंता वाहताना प्रत्यक्ष इतिहास देश, काल, परिस्थिती पाहुन निर्णय करणे तसे करताना धर्मग्रंथातील अंध सिध्दांतांचे वर्चस्व मनावर येऊ घ्यावयाचे नाही हा साधारणतः इहवादाचा मतितार्थ आहे आणि तो ध्यानी घेता इहवाद व अभ्युदय (प्रगती) यात दृढ कार्यकारणसंबंध आहे. भारताच्या प्राचीन इतिहासासंबंधी तर असे निश्चित विधान करावयास भरपुर प्रमाणे (पुरावे) उपलब्ध आहेत.’’ [76]

वरील विवेचनावरून इहवादाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते. इहवाद ही एक जीवनशैली असून जी माणसाला आधुनिकतेकडे घेऊन जाते. भारतीय संस्कृती (हिंदू संस्कृती) मध्ये अनेक दोष आहेत. जातीभेद, चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता यांची मूळे पोथीवादात असल्यामुळे मध्ययुगानंतर हा समाज इहवादशून्य होऊन शब्द प्रमाण्याच्या आहारी गेला आहे. वेदबंदी, स्पर्शबंदी, शुध्दीबंदी, सिंधूबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी व व्यवसायबंदी या सात

शृंखला त्याने आपण होऊन आपल्या पायात ठोकुन घेतल्या आहेत त्याचा परिणाम आजही दिसून येतो.[77] म्हणून इहवादाची आजही गरज आहे.

**इहवादाची तत्वे :-**

1. धर्माची परिवर्तनशीलता
2. बुध्दीवाद
3. विवेकप्रामाण्य
4. शब्दप्रामाण्याचा त्याग
5. ऐहिक जीवनातील उत्कर्ष, समृध्दी व वैभव यांची दुर्दम्य आकांक्षा
6. प्रवृत्तीपरता
7. विश्वविजयाची आकांक्षा
8. धर्मापेक्षा राज्य श्रेष्ठ
9. इतिहास व परंपरांची चिकित्सा
10. अंधश्रध्दांचा त्याग
11. मानवी मनाचे मुक्त चिंतन
12. आत्मस्वातंत्र्य
13. बलवान राष्ट्रवाद
14. लोकशाहीवर श्रध्दा
15. मानव हाच सर्वश्रेष्ठ [78]

थोडक्यात वरील तत्वावरून इहवादाची परिभाषा पुढीलप्रमाणे आपणास करता येईल -

जी व्यक्ती बुध्दीप्रामाण्याचा स्विकार करते, धर्म व परंपरा तसेच त्याच्याशी निगडीत इतिहासाची कठोर चिकित्सा करते, पोथीवादाचा त्याग करते, लोकशाहीवर आणि राज्यघटनेवर आपली निष्ठा ठेवते, ती व्यक्ती इहवादी आहे. आणि हाच इहवाद आहे असे आपल्याला म्हणता येईल. थोडक्यात इहवाद हा माणसाला स्वतंत्र व मुक्त चिंतन करण्यास शिकवितो, हे कथन अनुचित नाही. या मुक्त चिंतनातूनच इहवादाची इमारत उभी राहताना दिसून येते.

इहवादी व्यक्तीच्या समुहाने मिळूनच इहवादी राज्य उदयास येते. भारत हे इहवादी राज्य आहे असे मानले जाते. अनेक विचारवंतानी इहवादी राज्याच्या परिभाषा देण्याचा प्रयत्न केला आहे. सुरूवातीस इहवादी राज्य म्हणजे

काय ? याबद्दल अनेक मतभेद आहेत. तसेच इहवादी राज्यात धार्मिक बाबतीत शासनाचे धोरण काय असावे ? याबाबतही गोंधळ असतो. इहवादी राज्यात कोणताही धर्म अधिकृत धर्म असत नाही. जागतिक इतिहासाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की राजाचा धर्म तोच प्रजेचा धर्म असतो. धर्माला राजाश्रय मिळाल्याशिवाय धर्म प्रस्थापित होत नाही ही पाश्चात्य संकल्पना दिसून येते. तिला सेमिटिक (यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम) धर्माच्या इतिहासात आधार दिसून येतो. याउलट भारतामध्ये प्राचीन काळापासून बहुसंख्य प्रजा हिंदू होती परंतु शासनकर्ते बौध्द व जैन धर्मिय होते. त्यामुळे भारताच्या इतिहासात पाश्चात्य राष्ट्रांसारखा संघर्ष आढळत नाही. काही ठिकाणी अपवादात्मक संघर्ष झाले असतील परंतु स्थूलमानाने इहवादी राजवटच आपल्याला दिसून येते. [79]

आर्य चाणक्याने धर्मग्रंथ, व्यवहार (कायदा), चरित (इतिहास) व राज्यशासन हे धर्माचे चार आधार आहेत असे सांगून त्यात विरोध आल्यास "पश्चिमः पूर्वबाधक :" असे उत्तरोत्तर प्रामाण्य मानावे असा निर्णय दिला आहे.[80] याचाच अर्थ शासनावर धार्मिक ग्रंथाचे त्यातील अंधसिध्दांताचे मूळीच वर्चस्व असू नये हा तर इहवादाचा आत्माच मानला पाहीजे.

स्थुलमानाने डोनाल्ड स्मिथ याने इहवादी राज्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली दिसते. ती व्याख्या गृहितक स्वरूपात दिलेली असल्यामुळे तिला शास्त्रीय व्याख्या म्हणणे कठीण आहे. स्मिथ याच्या मते इहवादी राज्य म्हणजे ते राज्य -

1. वैयक्तिक आणि संघटित धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते.
2. प्रत्येक व्यक्तीला नागरिक म्हणून धर्मनिरपेक्ष वागणूक देते.
3. घटनात्मक दृष्ट्या कोणत्याही विविक्षित धर्माशी निगडीत नसते.
4. कोणत्याही धर्माला प्रोत्साहन देत नाही किंवा धर्मात हस्तक्षेप करत नाही. [81]

या विषयावर वेदप्रकाश लुथेरा म्हणतात- इहवादी राज्यात राज्य व धर्म यांची संपूर्ण फारकत असते. अमेरिकन अध्यक्ष थॉमस जेफरसन यांनी राज्य आणि चर्च यामध्ये एक भिंत उभी असावयास पाहिजे अशी संकल्पना मांडली होती. लुथेरा इहवादी राज्याच्या संकल्पनेचा उगम येशु ख्रिस्ताच्या एका वचनात शोधतात सिझरचे सिझरला घ्या आणि प्रभुचे प्रभुला द्या[82] पण मध्ययुगात युरोपमध्ये राज्य व धर्म यांच्यामध्ये जो सत्ता संघर्ष झाला त्यामध्ये इहवादी राज्याच्या संकल्पनेचे मूळ सापडते. पोपने राज्य कारभारात हस्तक्षेप करू नये असे पोपला बजाविणारा डान्टे याने आपल्या 'डी मोनार्किया' या पुस्तकात इहवादी राज्याची संकल्पना सर्वप्रथम स्पष्ट केली आहे.[83]

तर आधुनिक इहवादी राज्याच्या संकल्पनेचा उगम येशुच्या उपदेशात शोधता येणार नाही असे मत ए. बी. शहा यांनी मांडले होते. ते म्हणतात, - "एक धर्म संस्थापक (म्हणजे येशु) हाच इहवादी राज्याच्या संकल्पनेचाही जनक असावा हा एक उपरोध आहे. ऐतिहासिक दृष्टीने पाहीले तरी येशुला इहवादी राज्याच्या संकल्पनेचा जनक मानणे तर्कदुष्ट ठरेल कारण यहुदी धर्म, ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम यामध्ये अखंडता आहे. यहुदी धर्मापासून ख्रिश्चन धर्माचा व या दोहोंपासून इस्लामचा उदय झाला. यहुदी आणि इस्लामी ही दोन्ही राज्ये धर्माधिष्ठीत आणि दोन्ही मधील ख्रिश्चन धर्माला मात्र इहवादी राज्य अभिप्रेत असावे हे तर्काला पटण्यासारखे नाही. स्वतःच्या दौर्बल्याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच सीझरचे सीझरला द्या अशी पळवाट येशुने काढली. सामर्थ्याच्या भूमिकेतून सीझरने ही प्रभुचे देणे मान्य करावे असाच आदेश येशुने दिला असता."[84]

तर डान्टे आपल्या 'डी. मोनार्कीया' या पुस्तकात म्हणतो "चर्च आणि इहवादी राजा यांच्यात संघर्ष आला तर राजाचा अधिकार अंतिम राहील. सीझरचे सीझरलाच मिळाले पाहिजे आणि त्याच्या आड धर्मसत्ता येता कामा नये. धर्मसत्तेचे वर्चस्व इहवादी सत्तेवर असणे गैर आहे आणि दोहोंमध्ये संघर्ष झाला तर इहवादी राजाचा शब्द अखेरचा असेल."[85]

डोनाल्ड स्मिथ, वेदप्रकाश लुथेरा, अ. भि. शहा व डान्टे यांच्या विवेचनावरून असे स्पष्ट होते की यामध्ये धार्मिक सत्ता व राजकीय सत्ता यांच्यात संघर्ष अभिप्रेत आहे. त्यामुळे वरील विवेचने ही असमाधानकारक आहेत. आज इहवादी राज्य या संज्ञेसंदर्भात नवा विचार प्रवाह समोर आला आहे तो पुढील प्रमाणे आहे.

1. मूलतः ते राज्य आहे.
2. इतर कोणत्याही राज्याप्रमाणे ते स्वतःच्या अस्तित्वासाठी प्रयत्नशील असते आणि आपले सामर्थ्य, समृध्दी, वैभव इत्यादींना पोषक अशा तऱ्हेची धोरणे ते आखीत असते.
3. अशा राज्यांमध्ये एखाद्या ऐहिक संस्थेमार्फत सार्वभौम सत्ता राबविली जाते त्यासाठी धर्माच्या आधाराची आवश्यकता नसते.
4. असे राज्य इहवादी असल्यामुळे त्याची उद्दिष्ट्ये निव्वळ ऐहिक असतात म्हणजेच आपल्या नागरिकांचे पारलौकिक सुख साधण्यासाठी असे राज्य कोणत्याही प्रकारे प्रयत्नशील नसते.
5. संरक्षण, प्रादेशिक महत्वाकांक्षा, नागरिकाचे ऐहिक कल्याण, राजकीय, सामाजिक व आर्थिक न्याय इत्यादी ऐहिक उद्दिष्ट्ये आहेत.

6. अशा ऐहिक उद्दिष्टांशी जे जे विसंगत अथवा विरोधी असेल त्याचा इहवादी राज्य मुकाबला करते. अशा विरोधी अथवा विसंगत गोष्टीमध्ये रूढी, धर्मतत्वे, धर्माचार यांचा समावेश होऊ शकतो. त्याचा बिमोड करण्यास असे राज्य सज्ज असते.
7. साहाजिकच इहवादी राज्य म्हणजे सर्वधर्मसमभाव नव्हे तर ज्या प्रमाणात ज्या धर्मांचा ऐहिक उद्दिष्टांना विरोध असतो त्या प्रमाणात त्या धर्मात हस्तक्षेप केला जातो.
8. असे राज्य इहवादी असल्यामुळे राज्यातील रहिवाशांचा फक्त नागरी दर्जाच लक्षात घेतला जातो. नागरिकाचा धर्म संपूर्णपणे दुर्लक्षित केला जातो.
9. अशा राज्यात ऐहिक उद्दिष्टांच्या दृष्टीने संपूर्णपणे निरूपद्रवी अथवा अशा उद्दिष्टांना पुरक असे धार्मिक स्वातंत्र्य दिले जाते. [86]

इहवादाच्या वरील स्वरूपावरून आपणास असे म्हणता येईल की इहवादी राज्य धर्माच्या बाबतीत उदासीन राहू शकत नाही. इहवादी राज्याला केव्हा ना केव्हा तरी नागरिकाच्या सद्सद्विवेक बुध्दीला इजा पोहचविल्या शिवाय आपली ऐहिक उद्दिष्टे साध्य करणे अशक्य आहे. त्याला पर्याय नाही. ज्या राज्यात सर्व धर्मांवर बंदी आहे असे राज्यच आदर्श इहवादी राज्य बनु शकेल. धर्माचा राजकारणावरील ताबा दूर करण्याचा असेल तर सर्व धर्मांवर बंदी घालणे हा त्यावर एकमेव उपाय आहे. परंतु जगाच्या पाठीवरील बहुसंख्य राज्यात धार्मिक स्वातंत्र्याची मूलभूत हक्कात गणना केली जात असल्यामुळे आज संपूर्ण इहवादी राज्य एक स्वप्नच आहे.[87] ते वास्तवात कधी अवतरेल हे आजमितीस सांगणे अशक्य आहे. उपरोक्त विवेचनावरून इहवादी राज्याची परिभाषा पुढीलप्रमाणे करता येईल. जे राज्य राज्याचे व राज्यातील नागरिकांचे ऐहिक हितसंबंध पूर्ण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असते. नागरिकाचा धर्म विचारात न घेता केवळ त्याचा नागरी दर्जाच विचारात घेते आणि हितसंबंधाशी विरोधी अथवा विसंगत अशा विचारांचा मुकाबला करते ते इहवादी राज्य होय.

### 3.3.2 इहवादी परंपरा :-

आधुनिक काळातील इहवादी राज्याची संकल्पना सर्वप्रथम डान्टे (1265-1321) या इटालियन विचारवंत महाकवी ने मांडली.[88] तत्पूर्वी या परंपरेमध्ये मार्सिग्लिओ (1270-1340) ग्रीस बरोबरच इंग्लंडमधील ओखॅमचा विल्यम (1290-1345) आणि फ्रान्सचा पियरी डुबाईस यांची नावे विशेष उल्लेखनीय आहेत.[89]

ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्रा. जॉन वायक्लिफ (इ.स. 1324-1394) याने पोपच्या सत्तेला सर्वप्रथम आव्हान दिले. धर्मसत्ता आणि राजसत्ता या दोन स्वतंत्र सत्ता असून धर्माची राज्यशासनावर कदापी सत्ता असता कामा नये. धर्मपीठांनी राज्यशासनावर सत्ता चालविणे हे पाप आहे असे त्याचे मत होते. वायक्लिफच्या या

मतावरून तो व्यक्तीवादी, बुध्दीवादी आणि प्रखर राष्ट्रवादी होता. इहवादाचा हाच पाया आहे. प्रत्येक मनुष्याला पूर्ण विवेक स्वातंत्र्य असेल पाहिजे. त्याच्या आचार, विचार, उच्चारावर कोणतेही अंध, तर्कशून्य बंधन असता कामा नये हे त्याचे मुख्य तत्व होते. [90]

जॉन हस (इ.स. 1369 ते 1415) हा बोहेमियन प्राग विद्यापीठातील प्राध्यापक होता. जॉन हस याने पोपच्या सत्तेला आव्हान दिले आणि हंगेरीचा राजा सिसिग्मंड ने त्यास जिवंत जाळून मारण्याची शिक्षा दिली. पुढील बारा वर्षात बोहेमियन हासाईट (हसचे अनुयायी) व रोमन सम्राट यांच्यामध्ये पाच धर्मयुध्दे झाली. पाची युध्दात रोमचा पराभव झाला आणि त्यांनी शरणागती पत्करली. त्यावेळी दोन्ही पक्षात जो तह झाला त्याची कलमे पुढील प्रमाणे होती. [91]

1. पोपची ऐहिक व्यवहारावरील सत्ता नष्ट व्हावी.
2. धर्म प्रवचनांचे सर्वांना स्वातंत्र्य असावे.
3. धर्मगुरूंनी प्राचीन ऋषी प्रमाणे वैराग्याने रहावे.
4. धर्मगुरूंच्या बाबतीत सरकारी न्यायालयांना न्याय करण्याचा अधिकार असावा. [92]

इहवाद, बुध्दीप्रामाण्य, राजसत्तेचे श्रेष्ठत्व यांचे समर्थपणे समर्थन मार्सिग्लिओने केले. मार्सिग्लिओ हा ऑरिस्टॉटलचा भक्त होता. त्यांची विद्वत्ता इतकी असामान्य होती की लोक त्याला ‘प्रति ऑरिस्टॉटल’ म्हणत असत. तो पोपच्या अधिसत्तेचा विरोधक होता. त्याच्या मते - “सर्व ख्रिस्ती जगातील लोकांच्या सर्वमताने पोपची निवड व्हावी व लोकांच्या सार्वमताने त्याला पदच्युत करण्याचा अधिकार लोकांना असावा. ऐहिक क्षेत्रात त्याला कसलाही अधिकार असू नये व पारमार्थिक क्षेत्रातही धर्मपीठाचा एकंदर कारभार राजसत्तेच्या अंकित असावा. रोमन सम्राटाच्या निवडणुकीवर व त्याच्या कारभारावर पोपचे कसलेही नियंत्रण असू नये.” [93]

इंग्लंड मधील विल्यम हा तत्ववेत्ता मार्सिग्लिओप्रमाणेच आपली मते मांडत होता. पोप व त्याच्या धर्मगुरू यांच्या राजवैभवाची व विलासाची त्याला चीड होती. धर्मक्षेत्रातील लोकांना द्रव्यलोभ असू नये असे त्याचे मत होते. या दोघांनीही एक पाऊल पुढे जाऊन पोपलाच पाखंडी व नास्तिक ठरविले होते. विल्यम याने मोहःमुढ लोकांना धर्मक्षेत्राच्या जवळही न येण्याचे आवाहन केले. त्याच्या मते स्वतः अवलोकन करणे, उपलब्ध ज्ञानाची पूर्वीच्या ग्रंथातील सिध्दांताची रूढ विचारांची स्वतः बुध्दीने चिकित्सा करून मगच सत्याचा निर्णय करणे हे प्रबोधनपर कार्य विल्यम याने केले म्हणूनच विल्यमच्या विचाराचा प्रभाव युरोपवर सर्वाधिक पडला होता.

या परंपरेतील पुढील तत्ववेत्ता इटालियन महाकवी डान्टे हा होता. धर्मगुरू ऑगस्टाईन याच्या मतावर त्याने टिका करून राजाच्या ऐहिक सत्तेवर धर्मसत्तेचे नियंत्रण असावे या त्याचा मताचा त्याने निषेध केला आहे. डान्टे राष्ट्रवादी नव्हता तर तो साम्राज्यवादी होता. रोमन साम्राज्याचा तो अभिमानी होता आणि सर्व युरोपवर रोमन व इटालियन यांचेच साम्राज्य असावे हा त्याचा आग्रह होता. प्राचीन काळी रोमन व इटालियन लोकांनी युरोपवर दीर्घकाळ साम्राज्य प्रस्थापित केले होते. त्यामुळे युरोपच्या साम्राज्य पदावर रोमन व इटालियन लोकच अधिक लायक आहेत हे त्याचे मत होते. डान्टेच्या अनुसार राजसत्ताही सर्वोच्च होती तर धर्मसत्ता ही दुय्यम होती.[94]

पियरी डुबाईस हा फ्रेंच तत्ववेत्ता डान्टे प्रमाणेच साम्राज्यसत्तावादी होता पण त्याच्या मते फ्रेंच राजे हेच खरे सम्राट पदाला योग्य होते. डूबाईस हा पूर्णपणे इहवादी दृष्टीकोनाचा समर्थक होता. त्याच्या मते ‘‘कायदा व राज्य संस्था या गोष्टी परमेश्वर प्रणित नसून परिस्थिती व गरज यातूनच निर्माण होतात म्हणून त्या पूर्णपणे मानवकृत आहेत.’’[95]

प्रबोधन युगाच्या या पहाटेपासुन युरोपचा अर्वाचीन इतिहास सुरू होतो. अंध धर्मसत्तेने मानवी बुध्दीवर जी बंधने घातली होती, त्यामधून युरोपमध्ये इहवादी व बुध्दीप्रामाण्य मानणाऱ्या अनेक विचारवंताचा उदय झाला. त्यामध्ये वायक्लिफ, जॉन हस, मार्सिग्लिओ, विल्यम, डुबाईस, डान्टे यांनी घातलेल्या पायावर समाजामध्ये नवजागृती सुरू झाली. प्रबोधन, नवजागृती, पुनरूज्जीवन आणि ग्रीक विद्येचे पुनरूज्जीवन झाले. 14 व्या शतकात इटालीयन कवी पेट्रार्क याने शिक्षणाच्या माध्यमातून इहवादाचा प्रचार व प्रसार केला. मॅन्युएल क्रिसो लोरास, थिओडोर गाझा, लॉरेंझो, मेंडीसी हे इटालियन तत्ववेत्ते, जोहान मुल्लर, रूडाल्फ ॲग्रिकोला हे जर्मन विचारवंत तर ग्रेगरी टिफरसन, जेरोम ॲलिअंडर हे फ्रेंच विचारवंत इहवादाचे समर्थक आहेत. लिओ नार्दो-दि-व्हिन्सी, अल्पिनी, प्रॉस्पेरो, ॲड्रिया व्हेसॅलियस, पेट्रार्क, इरॅस्मस, थॉमस मुर, कॉलेट इत्यादी विचारवंताचा या इहवादी परंपरेत समावेश होतो. विक्लिफ अत्यंत बंडखोर थेट धर्मसत्ता नाकारणारा झुगारणारा तत्वज्ञ होता.[96]

## 3.4 सूफीझम :-

### 3.4.1 प्रस्तावना :-

मानवी जीवनात धर्म ईश्वर आणि ईश्वराची भक्ती यास महत्व आहे. निर्गुण, निराकार, सगुण व साकार अशा परमेश्वराची भक्ती करण्याची परंपरा पूर्वीपासूनच होती. परमेश्वराची भक्ती करण्यासाठी स्विकारलेला आचारमार्ग म्हणजेच भक्तीमार्ग होय. ईश्वरापुढे श्रध्दायुक्त अंतःकरणाने संपूर्ण शरणागती स्विकारणे. भौतिक सुखांचा त्याग करून आपले सर्वस्व परमेश्वरचरणी अर्पण करणे. त्या ईश्वराच्या प्राप्तीसाठी व मोक्षप्राप्तीसाठी ईश्वर उपासनेचा आचारलेला मार्ग म्हणजे भक्तीमार्ग होय. वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळे भक्ती संप्रदाय

उदयास आले. या संप्रदायातील संतांनी समाजपरिवर्तनाचे काम केले. जनसेवा, दु:खितांचे दु:ख निवारण, मानवतेचे कल्याण साधने यातूनच ईश्वर उपासना घडते. असा विचार या संतांनी मांडून समाजप्रबोधन केले व लोकांना डोळस भक्ती शिकवली. मध्ययुगात जे काही प्रभावी संप्रदाय होवून गेले. त्यापैकी इस्लाम धर्मातील सूफी संप्रदाय महत्वाचा आहे. इस्लाम धर्माच्या उदयापासून आधुनिक काळापर्यंत म्हणजे 21 व्या शतकापर्यंत इस्लामधर्मात जे काही प्रभावी संप्रदाय होवून गेले, त्यापैकी इस्लाम धर्मातील सूफी संप्रदाय महत्वाचा असून सूफींनी इस्लामची कट्टरता कमी करून इस्लामच्या प्रसाराचे विधायक कार्य केले. इस्लामधील सूफी पंथाचा विकास हा कोणत्याही धर्मात होणाऱ्या रहस्यवादी (गूढ) चळवळीच्या सफलतेचा व लोकप्रियतेचा महत्वपूर्ण इतिहास आहे.

**सूफीझम :-**

'सूफी' शब्द सूफ पासून बनला आहे. सूफ याचा अर्थ लोकर आहे. लोकरीचा कपडा धारण करणाऱ्यास सूफी म्हणतात. म्हणजेच ज्याचे जीवन सरळमार्गी व भगवंत प्रेमाने भरलेले आहे. त्यास सूफी म्हणतात.[97] सूफी शब्द सोफिया म्हणजे ज्ञान आणि सूफी म्हणजे ज्ञानी. जाडे भरडे वस्त्र धारण करून ज्यांनी भौतिक जगाशी नाते तोडले ते 'सूफी' ही व्याख्या इब्न खल्दून, एडवर्ड ब्राऊन, निकोल्सन, डॉ. जकी मुबारक आणि डॉ. मीर वलिउद्दीन यांच्या सारख्या विद्वानांनी मान्य केली आहे. मोझेस परमेश्वर भेटीस गेले तेव्हा त्यांनी सूफी वस्त्रे परिधान केली होती.[98]

थोर सुफी संत हुजविरी म्हणतात- ''सूफी वस्त्रे धारण केल्याने हृदयात श्रध्देची उर्मी अनुभवास येते. ही वस्त्रे परिधान केल्याने जगापासून विरक्ती निर्माण होते.''[99] ख्रिश्चनांमध्ये जाडी भरडी वस्त्रे अधिक प्रचलित होती. मुसलमानांनी तसली वस्त्रे घालू नयेत. असा आग्रह काही मुसलमान धरीत असत. इमाम मुहंमद इब्न सीरीन (इ.स. 653-729) याने मुसलमानांना तंबी दिली होती, की मुसलमानांनी ख्रिश्चनांसारखा पोशाख करू नये.[100] इ.स. 778 च्या काळात सूफी वस्त्रांचा सर्रास वापर सुरू झाला होता. ती वस्त्रे इतकी लोकप्रिय झाली की कुणीही उठावे आणि सूफी वस्त्रे घालावी. प्रसिध्द सूफी संत हसन बसरी यांने ही सूफी वस्त्राची निर्भत्सना केली होती, ते म्हणतात की या वेशात पुण्यकर्म नाही. पुण्यकर्म आत्मिक शांती सदाचरणात आहे. सूफींच्या वेशाला विरोध होण्याचे आणखी एक कारण होते की सूफी वस्त्रे ज्या जनावरांच्या कातड्यापासून बनविली जात ती जनावरे घाणीत रहात. तसेच सूफी वस्त्रे धारण केली की, त्या अनुषंगाने अनेक खडतर जबाबदाऱ्या अंगावर येत. त्यामुळे सर्वसामान्य लोक या वस्त्रांच्या वाटेस जात नसत. सूफींजवळ वस्त्रे ही फार कमी असत. ते मोहावर नियंत्रण ठेवण्याचे लक्षण मानले जाई. कपड्यांना आणि फेट्यांना ठिगळे लावण्याचा प्रघात सूफींमध्ये होता. ठिगळे लावलेल्या कफनीला मरका

म्हणत. काही सूफींच्या ठिगळांची संख्या इतकी वाढे की मरक्याचे किंवा फेट्याचे वजन तेरा रत्तल पर्यंत वाढत असे. (1 रत्तल = 2564 ग्रॅम) ठिगळे लावण्यासाठी सूफी नवीन कपडेही फाडून टाकीत. ठिगळे लावण्याची एक विशिष्ट पध्दती असे पण ही पध्दत गुरूच्या पध्दतीनुरूप असे. [101]

शेख बसरी म्हणतात ''ज्याला जमिन आसरा देत नाही आणि आकाश छत देत नाही तो सूफी.'' शेख अबू बक्र शिबली यांच्या मते ''सूफी भौतिक जगापासून तुटलेला आणि परमेश्वराशी जोडलेला असतो.'' सूफींना ज्या वेगवेगळ्या संज्ञानी ओळखले जाते. त्या अशा ज्युआ, फुकरा, मरबाई, शपकतीगाह, दरवेश, वली, दोस्ताने-खुदा, औलिया, अहेलेनजर, अहेलेदिल, अहेले सफा, अहेले तरीकत, अरबाबे हाल, अरबाबे बातिन, अरबाबे सलाह, स्वालेहीन, अरफाई अस्काई, अरवयाई, अबरार, जिक्रे बातिन आणि इबान अशी काही नांवे होती.[102]

सूफी दर्शन हे इस्लामचेच अपत्य आहे. दोघांनाही कुराण ग्रंथ मान्य पण कट्टर मुसलमानांना, उलेमांना तो पूर्णपणे मान्य तर सूफी संताना तो विशिष्ट प्रमाणात विशिष्ठ दृष्टीने मान्य. सूफी म्हणतात कुराणात दोन प्रकारचे ज्ञान आहे. 1) इल्मे सफीना म्हणजे ग्रंथनिहित ज्ञान आणि 2) इल्मे सीना म्हणजे ह्दयनिहित ज्ञान. पहले ज्ञान हे सर्वसाधारण मुसलमानांसाठी आहे. तर दुसरे ज्ञान हे महंमदसाहेबांच्या ह्दयापर्यंतच राहिलेले आहे.[103] या दुसऱ्या ज्ञानाबद्दल सूफींना जिव्हाळा आहे. इस्लाम मध्ये कुराणा इतकेच हदीसलाही महत्व आहे. हदीस म्हणजे महंमद साहेबांची कुराणाबाहेरची वचने. कट्टर सनातनी मुसलमान हे कुराणाच्या आणि हदीसच्या केवळ शब्दार्थावर भर देतात. सूफी संत हे त्यातून गूढ स्वरूपाचा अध्यात्मवादी आणि साक्षात्कारवादी आशय शोधून काढतात. हिंदू धर्मात कर्मठ ब्राह्मण आणि उदार मानवतावादी संत यांच्यात जो फरक आहे. तोच इस्लाममध्ये उलेमा आणि सूफी संत यांच्यात आहे.[104] उलेमा व कट्टर मुसलमान हे कर्मकांडाच्या, बाह्याचारांच्या परिपालनाबद्दल कठोर कटाक्ष बाळगणारे. सूफी संत हे उदार वृत्तीचे अंतर्शुध्दीला प्राधान्य देणारे. सनातनी वृत्तीच्या इस्लाममध्ये, मुसलमान म्हणजे विश्वासास पात्र आणि काफिर म्हणजे विश्वासास अपात्र या भेदाचे फार स्तोम माजविले जाते. सूफी हा भेद मानीत नाही. जिहादही अर्थ हे कट्टर मुसलमानाहून निराळा घेतात. आपल्याच ठिकाणच्या दुष्ट अनिष्ट प्रवृत्तींशी लढा देणे, हाच खरा जिहाद असे सूफी समजतात. सूफी संत हे संन्यस्त, विरक्त वृत्तीने राहणारे आहे. त्यांना संसाराबद्दल आकर्षण नाही. परंतु हदीसमध्ये म्हंटलेले आहे. की ''ला रूहबनियत फिल इस्लाम'' म्हणजे इस्लाममध्ये संन्यासाला स्थान नाही.[105]

खरे सत्य असे आहे की वैराग्याशिवाय धर्मपालन आणि ईश्वरकृपा संपादन अशक्य आहे. कुराणाच्या सुरूवातीच्या सुरातून वैराग्याची महती सूचित केलेली आहे. सूफी साधकांना एकांतवास प्रिय आहे, कारण तो परमार्थाला पोषक आहे. कट्टर इस्लामला त्यांचे महत्व अमान्य आहे.

इ. स. 9 व्या शतकाचा उत्तरार्ध व 10 व्या शतकाच्या सुरूवातीलाच अव्दैताला सूफीमताच्या सिध्दान्त रूपात प्रवेश करताना पाहतो. अद्वैत याचा अर्थ म्हणजे ईश्वर व त्याचा भक्त एकच आहेत. किंबहुना ईश्वर हा भक्तापासून वेगळा अर्थात अलग होवूच शकत नाही. म्हणून गेसूदराज एके ठिकाणी म्हणतो -

**"दिल में हैं तस्वीरे यार की**

**जब चाहे देख ली, गर्दन झुका ली !"** [106]

सूफी विचारांचा इतिहास सांगतो की सर्वात आधी एकांतवासात राहून पवित्र व शुध्द जीवनाची भावना निर्माण करणे-एकान्तवास इस्लामच्या पूर्वी ईसायांच्या प्रभावाने अरबस्थानात आला होता. प्रेषित महंमद व त्याचे अनेक साथीदार व खलिफा शांतीचे आचरण ठेवत असत व पवित्र जीवन जगत असत. प्रलय होवून जगाचा शेवट होणार या आणि ईश्वराच्या भितीने त्या काळातील अनेक लोकांना विरक्त बनविले होते. वास्तविक पाहता पूर्व काळातील सूफी गूढवादीं पेक्षा भटके व वैराग्य स्विकारलेले बरेचजण होते. [107]

सूफी मतानुसार मानवाचे चार विभाग आहेत. नक्स म्हणजे विषयभोगवृत्ती, रूह म्हणजे आत्मा, कलब म्हणजे हृदय आणि अक्ल म्हणजे बुध्दी. कलब किंवा हृदय एक स्थिर व चेतनामय अशी गोष्ट आहे. त्याच्यावर दृश्य वस्तूचे प्रतिबिंब पडते. दृश्य स्थूल वस्तू अनित्य आहे. पण त्याची भावना नित्य आहे. हृदयावरच दृश्य वस्तूंचे प्रतिबिंब उमटत असते.[108] सूफी लोक स्वतः स्विकार करतात की त्यांना बरेच काही भारतीय तत्वज्ञानाकडून मिळाले. या गोष्टी भारतीय योगशास्त्राशी मिळत्या जुळत्या आहेत. अष्टांगयोगा मध्ये यम, नियम, आसन, प्रत्याहार, प्राणायाम, ध्यान, धारणा, समाधी यांचा समावेश होतो. जग चार प्रकारचे मानले गेले आहे. आलमे नासूत म्हणजे भौतिक जग. आलमे मलकूत म्हणजे चित्त जग, आलमे जबरूत म्हणजे द्वंद्वातीत आनंदी जग, व आलमे लाहूत म्हणजे ब्रह्मजगत किंवा मानवलोक आहे. मलकूत अदृश्यलोक आहे. अबरूत श्रीमंत किंवा उच्चलोक आहेत. तर लाहूत परलोक आहे. काही सूफी आणखी एका जगाची कल्पना करतात. ज्याला आलमे मिशाल किंवा पारमार्थिक जगाची सत्ता हृदयात प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे या साठी हृदय स्वच्छ होणे आवश्यक आहे व यासाठी नामस्मरण आणि ध्यान आवश्यक आहे. [109]

### 3.4.2 सूफी विचारधारेचा उगम :-

इतिहासकार सेतुमाधवराव पगडी म्हणतात की, मुसलमानी परंपरेनुसार सूफी पंथाला सुरूवात ही महंमद पैगंबरापासूनच झाली होती.[110] आठव्या शतकातील युसूफ हुसेन याच्या मते सूफी विचारांचा जन्म इस्लाम धर्मामध्ये झाला. आणि बाहेरच्या विचारांचा किंवा रितीरिवाजांचा त्यावर प्रभाव पडला नाही.[111] डॉ. ए. एल. श्रीवास्तवांच्या मते सूफी विचारांवर हिंदू विचारांचा आणि रीतीरिवाजांचा जास्त प्रभाव पडला. ह्या मताला सर्वच विचारवंतानी पाठिंबा दिलेला दिसतो. इतर संस्कृती प्रमाणे मुस्लिम संस्कृती हिंदू संस्कृतीत विलीन होवू शकली नाही. परंतु दोन्ही संस्कृतींच्या कायम वास्तव्यामुळे दोन्हींची ही कट्टरता हळूहळू कमी झाली व भारतात उदारमतवादाचा उदय झाला.[112]

इ. स. 712 मध्ये अरबांचे भारतावर आक्रमण झाले त्यानंतरच सूफी भारतात आले असावेत असे एक मत आहे. प्रारंभीच्या सूफी मंडळीत 8 व्या शतकातील हसन-अल-बसरी हा प्रमुख होता. याच शतकात इब्राहिम बिन आदम, हुजाईल बिन इयान, आणि राबिया हे सूफी होवून गेले. राबीया नावाच्या स्त्री नंतर सूफी पंथाला वेगळे वळण मिळाले होते.[113] इ. स. 1200 नंतर भारतात इस्लामी राजवट प्रस्थापित झाली व त्यानंतर सूफींचे भारतात मोठ्या प्रमाणात आगमन झाले. त्यामागे इस्लामचा प्रसार करणे हेच कारण होते. भारतात येणारा पहिला सूफी संत इराणमधील बुखाऱ्याचा शेख इस्माईल होता. तो 1005 साली लाहोरला आला.[114] त्याच्यानंतर शेख अली बिन उस्मान हुजवेरी हा इराकमधुन हिंदुस्थानात आला. तो दाता गंज बक्श या नावाने ओळखत जात होता. त्याला भारतातील सूफी पंथाचे संस्थापक मानले जाते. त्याचा सामान्य जनतेवर मोठा प्रभाव होता.[115] नवव्या शतकात पर्शियामध्ये इस्लामच्या रीतीवादाच्या कठोर पालनाच्या विरूध्द एक प्रतिक्रिया म्हणून सूफी पंथाची चळवळ रीतसर सुरू झाली. बगदादच्या अब्बासिद खलिफांच्या काळात सूफी मताला गूढवादाचा वैचारिक आधार मिळाला. सूफी संतानी ख्रिश्चन, हिंदू, बौध्द आणि जैन व अन्य धर्मातील गूढवादी संकल्पना मुक्तपणे स्विकारल्या त्याचे वर्णन करताना ताराचंद म्हणतात- ‘‘सूफीपंथ हा गुंतागुंतीचा चमत्कार होता. लहान-मोठे ओहोळ येवून मिळाल्याने ज्याचा प्रवाह रूंदावत जातो. अशा ओढ्याशी त्याची तुलना करता येईल.’’ [116] प्रो. हूमायूँ कबीर यांच्या मतानुसार सूफी पंथाच्या विचाराला कुराणात आधार होता परंतु भारतीय विचारधारांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर पडलेला आहे. परमेश्वरा करिता सर्वस्वाचा त्याग करणे आणि समाजापासून लांब एकांतात बसून परमेश्वराचे चिंतन करणे ही सूफींच्या प्रारंभिक काळातील तत्वे होती.[117] परमेश्वराच्या अवकृपेची भीती सूफींच्या मनात सतत दबा धरून बसलेली असे व म्हणून ईश्वराविरोधी बोलण्यास वा कृती करण्यास ते धजावत नसत. शिया व सुन्नी पंथीय

मूलतत्ववाद्यांना गूढवाद मान्य नव्हता. परिणामी सूफी संतांचा छळ करण्यात आला आणि त्यांच्या पैकी काहींचा धर्मत्यागाच्या आरोपावरून शिरच्छेद करण्यात आला. कर्मठ इस्लाम व सूफीपंथ यांच्यात समेट घडवून आणण्याचे श्रेय अल गझाली (इ.स. 1057-1112) या अरब तत्ववेत्याला दिले जाते. त्याने इस्लामी धर्मशास्त्राचाच एक भाग म्हणून गूढवादाला तात्विक आधार दिला.[118] अरबांच्या सिंधवरील स्वारीपासूनच सूफी संत भारतामध्ये येवू लागले. उत्तर, मध्य आणि पश्चिम भारतातील राजपूत राजांनी व्यक्तिशः किंवा सामूहिकरित्या मोठ्या धैर्याने अरबांचा प्रतिकार करून त्यांना तीन शतकाहून अधिक काळ सिंध व मुलतान मध्येच थोपविले होते. अर्थात याच काळात भारताच्या विविध भागात सूफी संतानी शिरकाव केला.[119] उत्तर भारतात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यानंतर मध्य आशियातील मुस्लिम देशांमधील सूफींनी भारतात मोठ्या संख्येने स्थलांतर करण्यास सुरूवात केली. अर्थातच या मागे लष्करी विजयाने जो प्रदेश जिंकला होता. त्याचा लाभ घेवून लोकांना इस्लामची दीक्षा देऊन इस्लामसाठी अनुयायी मिळावे हा उद्देश होता. सूफीनी अनेक ठिकाणी आपले मठ स्थापन केले, भारतीय साधूंसारखी वस्त्रे परिधान केली व त्यांच्या जीवन शैलीचे अनुकरण केले. हिंदूंची वस्ती असलेल्या शहरांच्या अगदी जवळ जिथे कनिष्ठ जातींची वस्ती होती तिथे त्यांनी आपले बस्तान बसविले. त्यांचे प्रेम व विश्वास संपादन करून परकीय सत्ता स्वीकारण्याबाबत त्यांची मानसिक तयारी करणे, तद्वतच परकेपणा दूर करून सामंजस्य साधणे हे त्यांचे पहिले उद्दिष्ट होते.[120] इस्लामचा स्विकार करावा यासाठी हिंदूंना आग्रह करून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. बहुतांश काळ दिल्लीच्या सुलतानशाहीचा विस्तार भारताच्या एका भागापुरताच मर्यादित होता. परंतु सूफी पंथ मात्र देशभर पसरला व त्याने शांततामय मार्गाने इस्लामचा प्रचार केला. अर्थात यातून हिंदू राजकर्त्यांची उदारता आणि मनाचा मोठेपणाही स्पष्ट होतो. कारण दिल्लीच्या तुर्की, अफगाण राजांविरूध्द जीवघेणा राजकीय संघर्ष सुरू असतानाही त्यांनी सूफी संतांना आपल्या हिंदू प्रजेचे धर्मांतर करण्याची परवानगी दिली होती.[121]

सूफी संप्रदायाच्या उगमाबद्दल विविध मते मांडली जातात. सूफी संप्रदाय हा इस्लाममधील उदारमतवादी विचारप्रणाली असलेला संप्रदाय आहे. मध्ययुगीन कालखंडात भारतात ज्याप्रमाणे भक्तिसंप्रदाय लोकप्रिय झाला होता त्याप्रमाणे सूफी संप्रदाय लोकप्रिय झाला होता. हिंदू व मुस्लिम या दोन्ही धर्मांतील लोकांवर सूफी संताचा प्रभाव पडलेला होता. सूफी संतांनी इस्लाम धर्मातील भक्तीचा महिमा वाढविला. ईश्वर उपासना आणि समाजसेवा यावर त्यांनी भर दिला. सूफी कर्मकांडातून ज्ञानमार्गाकडे वळले. जुन्नुन मिसरी हा बगदादचा रहिवासी होता. तो सुफी विव्दान संत होता. त्याला इस्लामी परंपरेचे अंधानुकरण पटत नव्हते. त्याने मुस्लिम धर्माचारावर अनेक ग्रंथ लिहले. तत्कालीन पंडितांशी धर्मविषयक चर्चा करून त्याने सूफी पंथाचे तत्वज्ञान स्वतः विकसित केले.[122]

त्यामुळे सूफी पंथाचा, विस्तार सर्वत्र झालेला दिसून येतो. हिंदू धर्मीयांशी सूफींचा संपर्क आल्यानंतर यांच्याकडील सत्य, विशुध्दता, स्वच्छता यांचा त्यांनी अंगिकार केला. भारतीयांचा अद्‌भूत शक्ती देणारा राजयोग सूफी पंथाने स्विकारला. [123]

### 3.4.3 सूफीझमची तत्वे :-

सूफी संप्रदायातील सर्वत्र संतांचे विचार आणि सिध्दांत एक सारखे नव्हते. महंमद पैगंबरापासून ते अनेक थोर सूफी संतांच्या विचारसरणीमधून सूफी संप्रदायाचे तत्वज्ञान तयार झाले. परमेश्वरावर प्रेम करणे हा त्यांच्या तत्वज्ञानाचा मुख्य भाग होता. एकेश्वरवाद या इस्लामच्या मूलभूत तत्वावरच सूफी तत्वज्ञान आधारलेले होते.

नवव्या शतकापर्यंत सूफी पंथ म्हणजे फक्त अध्यात्मिक आचारसंहिता होती. नवव्या शतकानंतर ही कल्पना उत्क्रांत होत गेली. सूफी तत्वज्ञानामध्ये पाच निरनिराळे प्रवाह आढळून येतात.

1. सूफी संप्रदायाच्या भूमिकेचा उगम संत हुसेन बिन मन्सूर याच्या काळात झाला. त्याने आत्मा व परमात्माच्या एकात्मतेवर भाष्य केले. त्याने अन-ल-हक, अनलहक (मी आहे, मी आहे) असा मंत्र दिला. हा मंत्र म्हणजे उपनिषदातील अहं-ब्रह्मस्मी, अहं ब्रह्मास्मि (मी ब्रह्म आहे). मी ब्रह्म आहे. उक्तीचे भाषांतर आहे. [124] या उच्चत्तम पातळीवरून त्याच्या गूढवादाची तत्वे साकार झाली. त्याच्या भूमिकेबद्दल थोडक्यात असे सांगता येईल की, निर्मिती पूर्वी परमेश्वर सर्व काही होता. आणि प्रेमस्वरूप साधनाने त्याने विश्वरूप धारण केले. तसेच सर्व चराचर वस्तू एकाच मूलतत्वापासून निर्माण झाल्या आहेत. [125] निर्माता (हक) आणि निर्मिती (खलक) यांच्यात एकरूपता असते. ईश्वराचे अस्तित्व हीच विविधते मागील एका आणि सर्व घटनाचक्रा मागील वास्तवता आहे. शेख मुहिउद्दीन इब्नुल अरबी म्हणतात ईश्वरा शिवाय येथे दुसरे काहीच नाही. त्याच्या शिवाय (ईश्वर) दुसरे कशाचे ही अस्तित्व तेथे नाही. तेथे सर्व वस्तूंचा गाभा एकच आहे. हा सिध्दांत वेदान्त तत्वज्ञानातील पूर्ण एकेश्वरवादाच्या सिध्दांताला अनुरूप होता. त्यानुसार ईश्वर आणि त्याची निर्मिती (मानव) किंवा ईश्वर आणि आत्मा हे मिळून अंतिम सत्य होते. परमेश्वरा बद्दल अपार प्रेमभाव, समर्पण व प्रत्यक्ष ईश्वराशी संपर्क साधणे असे ईश्वराशी तादात्म्य पावण्याचे तत्वज्ञान सूफी संतांनी सांगीतले. [126]
2. इब्न सीना याच्या विचारानुसार परमेश्वरच्या अलौकिक व विश्वव्यापक स्वरूपावर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. परमेश्वराच्या इच्छेने सर्व काही घडते. सर्व काही परमेश्वरात आहे. हा अव्दैतवादाचा तर्कशुध्द निष्कर्ष होता. परमेश्वर सर्वाभूती आहे अशी या तत्वाची धारणा आहे. [127]

3. सुऱ्हावर्दी तत्वाप्रमाणे अंतिम ध्येय ईश्वरामध्ये विलीन होईपर्यंत आत्मा पुनर्जन्म घेत राहतो व शेवटी आपले अंतिम ध्येय साध्य करतो. हा विचार यात मांडलेला आढळतो. व्यक्तीचा आत्मा आपले हे अंतिम ध्येय साधण्याकरिता नेहमीच झगडत राहतो. व एका शरीरातून तो दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो व उच्च कोटीला पोहचत असतो. शेवटी तो 'फना' (विलयन) अवस्थेला म्हणजे संपूर्ण वासनाक्षय अवस्थेप्रत पोचतो.[128] हीच कल्पना मंडुकोपनिषदात आढळते. त्यात म्हंटले आहे की, आपआपल्या कर्माप्रमाणे आत्मा शरीरामागून शरीरात प्रवेश करीत जातो. शेवटी सर्व कर्मे संपतात त्या वेळी आत्मा मुक्त होतो व परमात्म्यात विलीन होतो. [129]
4. इब्न-अल अरबी याचा चौथा विचार प्रवाह होता. त्याच्या मते परमेश्वराचे प्रतिबिंब निसर्ग व मानव या उच्चतम कोटीला पोचण्याचे उद्दिष्ट केवळ ज्ञानामुळेच साध्य होईल असेच तो ही प्रतिपादन करतो. या अवस्थेमध्ये अशाश्वत जग पूर्णपणे नष्ट होते. आणि फक्त शाश्वत सत्य शिल्लक रहाते. तसेच श्रध्दा व अविरत चिंतन यांच्या सहाय्यानेच हे ज्ञान प्राप्त करून घेता येते. याचा अर्थ असा होतो, की जो कोणी ही साधना करील तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, ध्येयाचा किंवा रंगाचा असला तरी ही तो आपले अंतिम उद्दिष्ट साध्य करून शकेल. ध्येयाच्या व पंथाच्या बाबतीतील त्याच्या सहिष्णुतेच्या धोरणाचा हाच पाया आहे.[130]
5. अब्दुल करीम अल जीली याचा पाचवा विचार प्रवाह मानला जातो. त्याच्या मते संपूर्ण विश्व हे परमात्म्याचे स्वरूप आहे. आणि मानवाची परिपूर्ण व्यवस्था म्हणजे परमेश्वराची प्रतिकृती आहे. अल जीलीचे तत्वज्ञान आदर्श एकेश्वरवादी स्वरूपाचे आहे. सर्व गूढवादी विचारांचा शेवट व उच्चांक त्यामध्ये दिसून येतो. सर्व विचार हे परमेश्वराबद्दलचे विचार आहेत असे तो म्हणतो. सर्व प्रकारच्या पूजा व त्याच परमेश्वराचे कोणते ना कोणते तरी रूप प्रगट करणाऱ्याच आहेत. जे फरक दिसून येतात ते केवळ आभासात्मक आहेत. ते त्याच्या वेगवेगळ्या नावामुळे आणि गुणांमुळे निर्माण झालेले आहेत आणि हे सर्व मिळूनच त्याचे परिपूर्णत्व निर्माण होते.[131] महम्मद पैगंबरापासून अनेक थोर संतांच्या विचारसरणीमधून सूफी संप्रदायाचे तत्वज्ञान तयार झाले होते. परमेश्वरावर प्रेम करणे हा त्यांच्या तत्वज्ञानाचा मुख्य भाग होता.

1. ईश्वर एकच आहे.
2. ईश्वर हा या सृष्टीचा निर्माता होय.
3. ईश्वरावर प्रत्येकाची अढळ श्रध्दा व विश्वास असला पाहिजे.

4. ईश्वराच्या प्राप्तीसाठी सूफींनी संगीताची उपासना करावी.
5. ईश्वराच्या प्राप्तीसाठी गुरूंची आवश्यकता आहे. गुरूला शेख, पीर असे संबोधतात. शिष्याने गुरूच्या आज्ञेत रहावे व त्याची भक्ती करावी.
6. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. एक दुसऱ्यांची निंदा करणे परमेश्वराला मान्य नाही. जे लोक मानव जातीशी प्रेम करीत नाहीत ते ईश्वराला कधीही प्राप्त करून घेवू शकत नाहीत.
7. परमेश्वर विश्वव्यापी आहे. परमेश्वर मंदिर किंवा मस्जिद मध्ये रहात नसून मनुष्याचा ह्रदयात निवास करतो. [132]

सूफींच्या तत्वज्ञानानुसार अहंकार व आसक्ती यामुळेच परमात्म्याचा मनुष्याला विसर पडतो. अज्ञान हे सर्व दु:खाचे मूळ आहे. मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाश, अहंकार व आसक्ती यांचा निरास आहे. परमेश्वर कृपेनेच सर्वश्रेष्ठ ज्ञान व शाश्वत आनंद प्राप्त होतो अशी सूफींची धारणा होती. सूफी पंथाने आत्मज्ञान, ईश्वराशी तादात्म्य, साक्षात्कार हे आपले ध्येय मानले. भारतीय योगशास्त्रा प्रमाणेच सूफी संप्रदायातही योगशास्त्रीय सिध्दांत विकसित झाले आणि यौगिक अनुभवांचे अन्वयार्थ लावून वेगवेगळी विचार प्रणाली मांडली गेली. त्यांनी इस्लाम व मानवतेची सेवा महत्वाची मानून आपला आत्मिक विकास केला. वैराग्य, एकांतवास, जप, ईश्वराशी तादात्म्य व विविध प्रकारच्या अतिंद्रिय अनुभूती यांची मीमांसा सूफी संप्रदायात आढळते. [133]

### 3.4.4 सूफी संत :-

इस्लाम धर्मांच्या स्थापनेबरोबरच गूढवादी तत्वज्ञान जोपासणारा पंथ म्हणजे सूफी होय.[134] इस्लाममध्ये हिंदू धर्माच्या प्रभावामुळे अनेक उदारवादी विचारप्रणाली सुरू झाल्या. त्यात सूफी विचार प्रणाली विशेष प्रसिध्द होती. सुलतानशाही व मुघलशाही काळात अनेक सूफी संत भारतात होवून गेले. सूफी संतानी ईश्वर उपासना आणि समाजसेवा यावर विशेष भर दिला. हे उद्दिष्ट साधण्याकरिता त्यांनी एकांतसाधना, संयम, दया, क्षमा, शांती व समतेचा मार्ग अवलंबिला. सांसारिक भोगविलास आणि धर्मांधतेच्या भावनेचा परित्याग करण्याचा त्यांनी स्वधर्मियांना उपदेश केला. त्यांनी इस्लाम धर्मीयांमध्ये पुरोगामी विचार रूजविण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी एक नविन तत्वज्ञान भारतीय समाजापुढे ठेवले. [135] त्यापैकी महत्वपूर्ण सूफी संत याप्रमाणे -

### 1. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती :-

सूफी पंथातील सर्वश्रेष्ठ संत ख्वाजा मोईनुद्दीन हा चिस्त येथील पर्शियन संत ख्वाजा उसमान शरवानी याचा शिष्य असून तो गझनीहून लाहोर येथे इ. स. 1161 मध्ये आला व अजमेर येथे स्थायिक झाला.[136] त्याचा जन्म इ. स. 1140 मध्ये झाला. बालपणापासून विरक्त असलेल्या मोईनुद्दीनचा ईश्वर भक्तीकडे ओढा होता.

इस्लामच्या पवित्र स्थलांना समरकंद, बगदाद, हमदान, मक्का इ. त्याने भेट दिली. दिल्लीचे प्रसिध्द संत कुतुबुद्दीन बख्त्यार काकी याने ख्वाजा मोईनुद्दीन चिस्तीचे शिष्यत्व स्वीकारले. तो काही काळ पंजाबमध्ये वास्तव्यास होता. इ. स. 1156 मध्ये तो चिश्ती संप्रदायाचा प्रमुख झाला. त्याने सूफी तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी दोन ग्रंथ लिहते. एका ग्रंथात त्याची व दुसऱ्या ग्रंथात गुरू उस्मानची बोधवचने दिली आहेत. त्याने भारतामधील सूफी संप्रदायामधील चिश्ती संप्रदाय सर्वात मोठा बनविला. या पाठीमागे त्याची साधी राहणी व सर्वांना पेलतील अशी धर्मकर्तव्ये हे प्रमुख कारण होय. इ. स. 1236 मध्ये अजमेर या ठिकाणी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्युनंतर अजमेर येथे त्याची समाधी बांधली ती 'ख्वाजा साहबचा दर्गा' म्हणून प्रसिध्द आहे. हिंदू, मुस्लिम लोक मोठ्या भक्तीने तेथे दर्शनास जातात. अकबराने आपल्या कालखंडात 10 वेळा या दर्ग्यास भेट दिली होती. आज ही येथे मोठ्या प्रमाणात उरूस साजरा होतो. त्यात हिंदू मुस्लिम आनंदाने सहभागी होतात.[137]

### 2. ख्वाजा कुतुबुद्दीन :-

हा प्रसिध्द सूफी संत होता. तो ख्वाजा मोईनुद्दीन चिश्तीचा शिष्य होता. दिल्लीचा सुलतान अल्तुमश त्याचा आदर करीत असे व त्याच्या दिव्य शक्तीवर विश्वास ठेवीत असे. सुलतानाने त्याला शेख-उल-इस्लाम हे पद दिले पण त्याने ते नाकारले. त्याचे जीवन अतिशय पवित्र व साधे होते. त्याला दिल्ली सोडून अजमेरला जावेसे वाटत होते पण दिल्लीतील त्याची लोकप्रियता पाहून शेख मोईनुद्दीनने त्याला दिल्लीतच राहण्याचा आदेश दिला होता. त्याचा मृत्यु इ. स. 1235 मध्ये झाला होता. [138]

### 3. शेख हमीदउद्दीन नागौरी :-

हा ख्वाजा मोईनुद्दीन चा शिष्य होता. त्याने मोइनुद्दीन चिस्ती याच्या तत्वज्ञानाचा प्रचार केला. त्याचा जन्म दिल्लीमध्ये मुस्लिम सत्तास्थापनेनंतर झाला. तरूण वयातच त्याने शेख मोईनुद्दीन चिश्तीचे शिष्यत्व स्विकारले होते. त्याची धार्मिकता एवढी प्रभावी होती की लोकांनी त्याला सुलतान तारीकीन (संन्यासाचा सुलतान) ही पदवी दिली होती.[139] शेख हमीदउद्दीन नागौर गावात अत्यंत साध्या पध्दतीने रहात होता. तो स्वतः शेती करीत असे व स्वतः कपडे तयार करून वापरीत असे. मुस्लिम राजवटीत तो वैभवाने जगू शकला असता कारण अनेक मुस्लिम अधिकारी त्याच्या साठी भेटवस्तु घेवून येत असत परंतु त्याने त्यांचा स्वीकार केला नाही. शेख हमीदउद्दीन मुस्लिमेतर व्यक्तिंच्या आध्यात्मिक गुणांची कदर करीत असे.[140]

### 4. बाबा फरीउदीन :-

बाबा फरीउदीन याचा जन्म काबूलच्या राजघराण्यात इ. स. 1173 मध्ये झाला. बाबा फरीदने राजघराण्यातील ऐश्वर्याचा त्याग करून वैराग्य पत्करले. बगदादच्या सूफीसंताकडे बाबा फरीदने इस्लाम धर्मशास्त्र

व तत्वज्ञान यांचा अभ्यास केला. काबूल सोडून तो भारतात आला आणि मुलतान-दिल्ली रस्त्यावर सतलज नदी काठी एका पर्णकुटीत त्यांने वास्तव्य केले. बाबा फरीदने हिंदू-मुसलमानांना प्रेमाची शिकवण दिली. त्याच्या शिकवणीने दोन्ही धर्मातील लोक प्रभावीत झाले. इ. स. 1265 मध्ये त्याचा मृत्यु झाला.[141]

**5. हजरत शेख निजामउद्दीन औलिया :-**

हा बाबा फरिदचा शिष्य व उत्तराधिकारी होता. इ. स. 1258 मध्ये तो दिल्लीला आला व त्यानंतर त्याने साठ वर्षे धर्मकार्य करण्यात घालविली. दिल्लीच्या सुलतानशाहीमध्ये त्या कालखंडात अनेक सुलतान आले आणि गेले परंतु निजामुद्दीन औलिया एकाच्याही दरबारात गेला नाही. सुलतानापाशी जाऊन आपल्याला काही मिळवावयाचे नाही असे तो म्हणत असे. अल्लाउद्दीन खिलजी त्याला भेटण्याकरिता गेला असता त्याने भेटीस नकार दिला. निजामुद्दीन औलिया याला कट्टर उलेमांबद्दल तिरस्कार वाटत असे. अध्यात्मिक जगतात त्याला प्रतिष्ठा होती. त्याचा शिष्यवर्ग साऱ्या भारतात पसरलेला होता. मानवसेवा हीच ईश्वर सेवा समजून त्याने चिश्ती संप्रदायाच्या माध्यमातून प्रबोधन व इस्लामचा प्रसार केला. महंमद तुघलक हा त्याचा प्रिय शिष्य होता. निजामुद्दीन अवलियामध्ये धार्मिक किंवा सामाजिक कट्टरता नव्हती. हिंदू मुस्लिम यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न त्याने करून शांतता निर्माण केली. समाजसेवा आणि मानव विकासावर जास्त जोर दिला. अन्य सूफी संताप्रमाणे निजामुद्दीन औलिया संगीत, नृत्य, भजन इत्यादी साधनांच्या व्दारे ईश्वर उपासना करीत असे. आपल्या धार्मिक विचारांशी तो एकनिष्ठ राहिला. इ. स. 1325 मध्ये तो मरण पावला.[142]

**6. शेख नुरूद्दीन :-**

शेख नुरूद्दीन काश्मीर मधील प्रसिध्द सूफी संत होता. त्याचा जन्म श्रीनगर जवळील एका गावात झाला. लहानपणापासून त्याला संसारात रूची नव्हती. तरूणवयातच घराचा त्याग करून तो ईश्वराच्या शोधात निघाला होता. त्याचे आचरण साधे व पवित्र असल्याने जनतेत तो लोकप्रिय झाला. त्याची शिकवण अशी होती की परमेश्वराला जर प्रयत्न करून घ्यायचे असेल तर अहंपणाचा त्याग केला पाहिजे. त्याचा मृत्यु वयाच्या 63 व्या वर्षी झाला. त्याची समाधी चरारे शरीफ कश्मीर मध्ये आहे. त्याचे भक्त श्रध्देने फूल चढविण्यासाठी तेथे जातात.[143]

**7. महात्मा गेसुदराज :-**

महात्मा गेसुदराज महान सुफी संत होता. त्याचे नांव ख्वाजा बन्देनवाज होते. त्याचा जन्म इ. स. 1321 मध्ये दिल्ली येथे झाला. लहानपणी वडीलांच्या बरोबर त्याने उत्तर दक्षिण वाऱ्या केल्या होत्या. त्यानंतर त्याचे कार्यक्षेत्र गुलबर्गा हे ठिकाण झाले. सूफी पंथाच्या प्रसारासाठी त्यांने 105 पुस्तकांची रचना केली. ईश्वराची भक्ती करावी आणि मनुष्यमात्राची सेवा करावी ही त्याने आपल्यासमोर उद्दिष्ट्ये ठेवलेली होती. अव्दैतावर त्याचा

विश्वास होता. संपत्ती गोळा करण्यावर त्याचा विश्वास नव्हता, तो नेहमी ईश्वराच्या ध्यानात मग्न रहात असे. इ. स. 1442 मध्ये त्याचा मृत्यु झाला. हिंदू मुस्लिम यांच्यात एकता निर्माण करण्याचा त्याने प्रयत्न केला. गुलबर्गा येथे त्याचा दर्गा आहे.[144]

**8. अमीर खूसरो :-**

सूफी विचारांच्या इतिहासात अमीर खूसरोंचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्याचा जन्म ईसवी सन 1254 मध्ये पटियाला (उत्तर प्रदेश) मध्ये झाला. जन्मजात प्रतिभावंत साहित्यिक म्हणून तो प्रसिध्द होता. सुलतानशाही मध्ये हिंदू-मुस्लिमांचे तो प्रतिनिधित्व करीत होता. सूफी होण्याबरोबरच देशप्रेमाची भावना त्याच्यामध्ये ओतप्रोत भरलेली होती. सूफी संत शेख निजामुद्दीन अवलियाचा तो शिष्य होता. निजामुद्दीन चे खूसरोंवर विशेष प्रेम होते. निजामुद्दीन ने खूसरोला 'तुर्कल्ला' ही पदवी दिली होती. शेख निजामुद्दीनच्या मृत्युची घटना खूसरो सहन करू शकला नाही. इ. स. 1325 मध्ये त्याचा मृत्यु झाला. हिंदुच्या बद्दल त्याच्या मनात अपार प्रेम होते. हिंदू धर्मातील भक्ती आणि त्यागामुळे खूप प्रभावित झाला होता. त्यांनी मुसलमानांना आग्रह केला होता हिंदू धर्मातील भक्ती आणि त्याग यांचा प्रसार करा. युसूफ हुसैन म्हणतात की- 'अमीर खूसरो आपल्या काळात हिंदु-मुस्लिम संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत होते.' [145]

शेख निजामुद्दीन औलियाच्या पश्चात चिश्ती संप्रदायाचा प्रसार भारतात झाला. चिश्ती संप्रदाय प्रसाराचे कार्य त्याच्या अनेक शिष्यांनी केले. शेख सिराजउद्दीन उस्मानी याने बंगालमध्ये, शेख बुरहानुद्दीन गरीब याने दौलताबाद क्षेत्रामध्ये तर शेख हिसामुद्दीन, सैय्यद हुसेन आणि शाह बरकउल्ला यांनी गुजरातमध्ये धर्म प्रसाराचे कार्य केले. शेख नसिरूद्दीन चिराग दिल्लीमध्ये कार्य केले तसेच शेख सलीम चिश्ती अकबरकालीन प्रसिध्द सूफीसंत होवून गेला. दावल मलिक, सादिक अली, सरमस्त इ. सूफी संत भारतात होवून गेले.[146] अशा प्रकारे शेकडो सूफी संतानी इस्लाम धर्माच्या प्रसाराचे कार्य केले, आपल्या तत्वज्ञानावर त्यांची गाढ श्रध्दा होती. समाजाला आध्यात्मिक दिशा देण्याचे काम शेकडो सूफी संतांनी केले. भारतात चिश्ती संप्रदाय सर्वांत जास्त लोकप्रिय झालेला दिसून येतो.

**3.5 कमाल पाशा :-**

इ. स. 1881 मध्ये सेलोनिका शहरात मुस्तफा केमालचा एका गरीब कुटुंबात जन्म झाला. कमाल निसर्गतः क्रांतीकारक होता. त्यामुळे अनियंत्रीत सुलतानशाही उलथवून टाकावी असे विचार त्याच्या मनात येवू लागले. मोनास्टीरहून शिक्षण पूर्ण करून कमाल सेलोनिकास परत आला. गावी परत आल्यावर निष्कारण वेळ न दवडता

त्याने पाद्री लोकांच्या जवळ फ्रेंच भाषेचा अभ्यास केला. फेदी नावाच्या तरूणाशी त्याचा परिचय झाला. फेदीला फ्रेंच भाषा उत्तम येत होती. त्याच्या बरोबर व्हॉल्टेअर, रूसो, हॉब्स, मिल यांच्या ग्रंथाचा अभ्यास कमालने केला. या वाचनाने त्याला नवीन जगाची ओळख झाली. त्याची दृष्टी प्रगल्भ झाली. त्याचे विचार अधिकच क्रांतीकारक बनले. लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि स्वायत्तता या महान तत्वांचे बीजारोपण त्याच्या अंतकरणात झाले.[147]

कमालच्या मनात लष्करी शिक्षण सोडून देवून स्वातंत्र्ययुध्दात उडी घ्यावी असे त्याला वाटू लागले. पण याच लष्करी शिक्षणाचा आपणाला भविष्यकाळी अतिशय उपयोग होईल असा विचार करून आपला अभ्यासक्रम पूर्ण करावयाचे त्यांने ठरविले. 'सिनियर मिलिटरी स्कूलमध्ये' सर्व परीक्षा चांगल्या रीतीने पास झाल्यावर त्याची 'जनरल स्टॉफ कॉलेज' साठी निवड झाली. व त्याला सब-लेफ्टनंटचा हुद्दा मिळाला. 'जनरल स्टाफ कॉलेज' मध्ये जाण्याकरिता तो कॉन्टॅटिनोपल येथे गेला. तेथील सर्व परीक्षा पास झाल्यानंतर त्याला 1905 मध्ये कॅप्टन करण्यात आले.[148] केमाल पाशा तुर्कस्थानातील 'वतन' नामक क्रांतिकारक संघटनेचा सभासद होता. ही संघटना तुर्कस्थानातील सुलतानाची हूकुमशाही उलथवून लोकशाही शासनाची स्थापना करणे, धर्मगुरूंच्या जोखडातून मुक्त करणे, स्त्रीयांना गोषातून बाहेर काढणे हे या संघटनेचे ध्येय होते.[149]

24 जुलै 1923 च्या लोझॅन तहाने तुर्कस्थानचे राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मान्य केले. कमालच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सभेने 29 ऑक्टोंबर 1923 रोजी तुर्कस्तानचे प्रजासत्ताक जाहीर केले आणि कमाल त्याचा पहिला राष्ट्राध्यक्ष झाला. पुढे सन 1927, 1931 आणि 1935 मध्ये त्याची राष्ट्राध्यक्ष म्हणून सार्वमतानुसार फेरनिवड झाली. ह्या मुदतीत त्याने सर्व सत्ता आपल्या हाती घेवून एका मागून एक ठराव संमत करून तुर्कस्थानात आमूलाग्र बदल घडवून आणले.

### 3.5.1 कमाल पाशाचे योगदान :-

कमाल पाशाने अनियंत्रित राजसत्ता नष्ट करून तुर्कस्थानची राजकीय सत्ता जनतेपर्यंत आणून पोचवली. जनतेच्या सार्वभौमत्वावर आधारलेले तुर्कस्थानचे प्रजासत्ताक निर्माण केले.[150] राजकारणाप्रमाणेच तुर्कस्थानच्या आर्थिक, सामाजिक रचनेत आमुलाग्र क्रान्ती करण्याचा त्याने निश्चय केला. तुर्की समाज म्हणजे अव्यवस्थित अजागळ व पुराणमतवादी लोकांचा समुह असा जो समज सर्व युरोपभर पसरला होता. तो नाहीसा करून आपला समाज, कार्यक्षेत्र, सुसंस्कृत करण्याचा त्याने चंग बांधला. राष्ट्रविकासास किमान वेग आणण्यासाठी काही काळ तुर्कस्थानात हुकूमशाही राबवली पाहिजे असे कमालचे मत होते. लोकशाहीसाठी हुकूमशाही या तत्वावर कमालचा ठाम विश्वास होता म्हणून कमालने आपल्या हाती सर्व सत्ता केंद्रिभूत केली. कमालचे हुकूमशाहीचे स्वरूप

लोककल्याणाशी जोड साधणारे होते. राष्ट्रीय सभेत व मंत्रीमंडळात आपल्याच माणसाची निवड करून आपल्या हुकूमशाहीचा पाया त्याने भक्कम केला. अर्थात कमालच्या हुकूमशाहीचे स्वरूप घटनात्मक होते. घटनेच्या चौकटीत राहून त्याने आपली सर्वकष सत्ता राबवली. आपल्या पश्चातही लोककल्याणकारी राजवट तिला हुकूमशाहीचा वास आला तरी हरकत नाही, ती निरंतर चालू रहावी अशी कमालची इच्छा होती. भविष्यातील उद्दिष्टे दृष्टी समोर ठेवून त्याने 'लोककल्याणकारी हुकूमशाही' तुर्कस्थानात स्थापन केली व त्याने तुर्की राष्ट्राच्या परिवर्तनाला सुरूवात केली.[151]

### 3.5.2 राजकीय सुधारणा :-

कमाल पाशाने प्रारंभी राजकीय परिवर्तन घडवून आणले. 1908 च्या क्रांतीनंतर पारंपारिक अनियंत्रित राजेशाहीवर बंधने घालण्यात आली. नवीन घटना व कायदेमंडळाची निर्मिती केली.[152] कमाल पाशाला वझीरपदावर सुलतानाने नियुक्त केले. नंतर तो युध्दमंत्री व सेनापती झाला. सुलतानचे कायदा, न्याय, युध्द, परराष्ट्र धोरण व आर्थिक अधिकार त्याने कमी केले. परिणामी नियंत्रित राजेशाही व प्रतिनिधिक शासन तुर्कस्थानात प्रस्थापित झाले. तुर्की सुलतानाने परकीय सत्तांशी हातमिळवणी करून कायदेमंडळ बरखास्त केल्यानंतर 1920 साली कमाल पाशाने अनाटोलिया प्रांतातील अंकारा येथे हंगामी सरकारची स्थापना केली. नवीन घटना व द्विगृही कायदे मंडळाची निर्मिती करून कमाल पाशा नवीन सरकारचा अध्यक्ष व सरसेनापती बनला.[153] अंकारा येथून तुर्की सुलतान व परकीय सत्तेशी त्याने संघर्ष चालू ठेवला. ग्रीस युध्दातल्या विजयानंतर तुर्कस्थान पूर्णतः स्वतंत्र व स्वयंभू बनला. 1923 साली स्वतंत्र तुर्कस्थानची घटना तयार करण्यात आली आणि त्यानुसार कमाल पाशाच्या नेतृत्वाखाली लोकशाही प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली. सुलतानपद सन 1922 मध्ये रद्द करून कमाल पाशाने सर्व सत्ता आपल्या हाती घेतली.[154] सनातनी समाज, विविध गटाचा विरोध व कमालीचा मागासलेपणा ह्या कारणामुळे त्याने राष्ट्राच्या प्रगतीचे सत्तेचे केंद्रीकरण केले. आपला व्यापक सुधारणावादी कार्यक्रम अंमलात आणला. अध्यक्षीय लोकशाही अस्तित्वात आणली. अध्यक्षाचा कालावधी 4 वर्षाचा करण्यात आला. ग्रॅंड असेब्ली नावाचे व्दिगृही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. कायदेमंडळाचा कालावधी चारच वर्षाचा होता. त्यापैकी एक लोकप्रतिनिधिचे कनिष्ठ गृह होते. मतदारांची वयोमर्यादा 22 वर्षाची होती व निवडलेल्या प्रतिनिधीचा कालावधी चार वर्षाचा होता. घटनेत न्यायव्यवस्थेची स्वायत्तता, व्यक्तीस्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता व जनकल्याणाची तरतुद केली होती. तुर्की ला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता दिली. राजसत्तेवरील धर्मसत्तेचा प्रभाव नष्ट केला आणि धर्मनिरपेक्ष राज्याची घोषणा केली. प्रशासन, कायदा, धर्म, जनकल्याण, संरक्षण, व्यापार, उद्योग, महसूल व दळणवळणाचे सर्व अधिकार कमालने आपल्या हाती एकवटले.[155]

6 डिसेंबर 1934 रोजी राष्ट्रीय सभेने कमालच्या इच्छेनुसार देशाच्या राज्यघटनेमध्ये दुरूस्ती केली. या दुरूस्तीनुसार, 23 वर्षावरील सर्व स्त्री पुरूषांना राष्ट्रीय सभेसाठी मतदान करण्याचा हक्क देण्यात आला. त्याचप्रमाणे 31 वर्षावरील कोणालाही स्त्री, पुरूषास राष्ट्रीय सभेच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क प्राप्त झाला.[156] 1935 मध्ये राष्ट्रीय सभेवर प्रथमच स्त्रिया निवडून आल्या. त्याच वर्षी आंतरराष्ट्रीय महिला परिषद इस्तंबूल मध्ये भरली. साप्ताहिक सुट्टीचा दिवस शुक्रवार होता तो बदलून रविवार ठेवण्यात आला. अशा प्रकारे कमालने राजकीय आणि प्रशासकीय सुधारणा पाश्चात्य धर्तीवर घडवून आणल्या.[157]

### 3.5.3 शैक्षणिक सुधारणा :-

कमाल पाशा समोर पाश्चात्य समाजजीवनाचा आदर्श होता. त्यासाठी त्याने अनेक सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा तुर्कस्थानमध्ये घडवून आणल्या. तुर्कस्थानमधील बरीच जनता अशिक्षीत होती. तुर्कस्थानमधील सर्व शैक्षणिक व्यवस्था धर्माधिष्ठीत पवित्र संस्थेच्या अखत्यारीत होती. सर्व शाळांची प्रशासन व्यवस्था उलेमा नावाच्या मुस्लिम धर्मगुरूकडून चालविली जात असे. तसेच शाळांच्या इमारती, अध्यापक वर्ग व पैसे यांचाही अभाव होता. त्यामुळे तुर्कस्थानात नवीन शिक्षण पध्दती लागू करणे अत्यंत कठिण होते. तेव्हा कमालने धर्मसंस्थांनी व उलेमांनी चालविलेल्या सर्व शाळा बंद करून टाकल्या आणि पाश्चिमात्य शिक्षण पध्दतीवर आधारलेल्या शासकीय नियंत्रणाखाली नव्या शाळा व महाविद्यालये चालू केली. नवीन शिक्षण पध्दतीसाठी अनेक योजना तयार केल्या. सरकार तर्फे शाळा, महाविद्यालयासाठी अनेक इमारती बांधल्या. पाश्चात्य शिक्षण पध्दतीवर आधारित शिक्षकांना ट्रेनिंग देण्याची व्यवस्था केली. अरबी लिपीच्या ऐवजी लॅटिन लिपी शाळेमध्ये सुरू केली.[158] शिक्षण हा सर्वांगीण उन्नतीचा पाया असतो. ह्या सूत्राचा कमालने पुरेपूर उपयोग केला. प्राथमिक शिक्षण व संशोधनावर लक्ष केंद्रीत केले. पंच्याऐंशी टक्के समाज निरक्षर असल्याने सर्वांना साक्षरतेची सक्ती केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. सात हजार शाळा सुरू केल्या. शिक्षण खाते व शिक्षण मंत्र्यावर लष्करी, इंजिनिअरिंग, कृषी, कायदा, वाणिज्य, आरोग्य व अर्थशास्त्र शिक्षणाची जबाबदारी सोपविली. पूर्वीच्या इस्तंबूल विद्यापीठाची पुनर्रचना करून 'अंकारा' विद्यापीठाची स्थापना केली. असंख्य विद्यालये, महाविद्यालये, वाचनालये, ग्रंथालये व संशोधन केंद्रे स्थापन केली. भौतिकशास्त्र व पाश्चात्य शिक्षणावर भर दिला. धर्मनिरपेक्ष आधुनिक शिक्षणाचा पाया घालण्याचे काम कमाल पाशाने करून तुर्कस्थानचा कायापालट घडवून आणला.[159]

### 3.5.4 सामाजिक सुधारणा :-

प्रागतिक आणि आधुनिक तुर्कस्थानचा आदर्श प्राप्त करण्यासाठी कमाल पाशाने अनेक सामाजिक सुधारणा तुर्की समाजात घडवून आणल्या. सुरूवातीच्या काळात तरूण तुर्क संघटनेच्या चळवळीव्दारे तुर्की

समाजाचे प्रबोधन करण्यात आले. तुर्की समाज रूढीप्रिय होता. त्यातच धर्माचा प्रभाव फार मोठा असल्याने समाज विकासात त्याचा मोठाच अडथळा होता. तो अडथळा दूर करण्यासाठी कमालने विविध सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. तुर्की पध्दतीचा पोषाख वेंधळा व गबाळा दिसत असे म्हणून कमालने स्त्री-पुरूषांवर पाश्चात्य पध्दतीची वेशभूषा करण्याची सक्ती केली. सैनिकांनी वेगळ्या पध्दतीची केपी टोपी आणि सरकारी नोकरांनी हॅट वापरावी अशी आज्ञा काढली. 1925 साली गोंड्याची तुर्की फेझ टोपी न वापरता सर्वांनी हॅट वापरावी असे फर्मान जारी केले.[160] इस्लामी जगातील सर्वसाधारण स्त्री समाज अत्यंत मागासलेला आणि अनेक बंधनांनी जखडलेला होता. तेव्हा आधुनिकीकरण स्त्री मुक्ती शिवाय शक्य नाही हे जाणून त्यांच्यासाठी काही सुधारणा घडवून आणल्या. त्याने बुरखापध्दती रद्द केली. बहुभार्या पध्दती कायद्याने रद्द केली. तलाक-घटस्फोट पध्दतीस आधुनिक कायद्याचे स्वरूप देण्यात आले. प्रत्येक विवाहाची नोंदणी कायदेशीरपणे सरकारी नोंदकचेरीत करण्याची सक्ती करण्यात आली.[161] या सुधारणामुळे तुर्की स्त्री मुक्तपणे पुरूषांच्या बरोबरीने समाजाच्या सर्व क्षेत्रात वावरू लागली. प्राचीन संस्कृतीचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. व लोकसाहित्याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला. एकमेकांना नमस्कार करण्याच्या पध्दतीत बदल करण्यात आला. नमस्कार करताना ‘स्वाभिमानी हो’, ‘धैर्यशील हो’ असे शब्द प्रत्येक तुर्की माणूस उच्चारू लागला. प्रत्येकी तुर्की नागरिकास आपल्या जबाबदारीची सतत जाणीव रहावी हाच उद्देश या नव्या अभिवादन पध्दतीत होता. अशा प्रकारे प्रागतिक आणि आधुनिक तुर्कस्थानचा आदर्श प्राप्त करण्यासाठी कमाल पाशाने अनेक सामाजिक सुधारणा तुर्की समाजात घडवून आणल्या होत्या.[162]

### 3.5.5 कमाल पाशाचा सुधारणावादी दृष्टीकोन :-

तुर्की समाज म्हणजे अव्यस्थित अजागळ व पुराणमतवादी लोकांचा समूह असा जो दुर्लोकिक साऱ्या युरोपभर पसरला होता. तो नाहीसा करून आपला समाज कार्यक्षेत्र व सुसंस्कृत करण्याचा त्याने चंग बांधला. आपल्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नती ज्या ज्या मार्गानी होण्यासारखी आहे ते सर्व मार्ग अंमलात आणण्याचा कमालने प्रयत्न केला व तुर्कस्थानाच्या क्रांतिकारक सुधारणेस सुरूवात केली. तुर्कस्थानात अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मवेड, मागासलेपणा, दारिद्र्य, अंतर्गत कलह अशा अनेक शृंखलेत अडकलेल्या गर्तेतून तुर्कस्थानाला कमालने जिद्दीने आणि निष्ठेने बाहेर काढले व तुर्कस्थानचा पूर्णपणे कायापालट केला.[163]

“साऱ्या जगाला आदर्शभूत होऊन राहील अशा प्रकारचे आपले राष्ट्र बनविण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. जगातील इतर संस्कृतीची भर आपल्या संस्कृतीत टाकली पाहिजे. जगामध्ये जे काही सत्य, शिव, सुंदर असेल ते सर्व आपण आत्मसात करून आपल्या देशास सुसंस्कृत केले पाहिजे” असे त्याचे विचार होते.[164]

हे विचार साध्य करण्याकरिता कमाल पाशाने भगिरथ प्रयत्न केले. तुर्की जनता आचार विचारात मागासलेली असल्यामुळे तिला शिक्षित करण्याकरिता कमाल पाशाने शिक्षकाची भूमिका स्विकारली. एखाद्या शिक्षकाप्रमाणे सामोपचाराने जमले नाही तर आग्रह करून किंवा वेळप्रसंगी जबरदस्ती करून आपल्या देशबांधवांना शिक्षीत करण्याचा निश्चय केला. पूर्वीचा बेडौल, अव्यवस्थित वेश बदलून पाश्चात्य धर्तीचा पोषाख घालण्यास शिकविले. जनतेच्या मनावर पूर्व संस्कार होते ते असे पाश्चात्य ड्रेस घालावयास तयार नव्हते. तेव्हां कमाल पाशाने कायद्याचा आश्रय घेतला व सक्तीचा कायदा वरून नवीन पध्दतीचा वेश परिधान करण्यास लोकांना भाग पाडले. [165]

परिवर्तनामधला सगळ्यात महत्वाचा आणि धोक्याचा निर्णय त्याने घेतला तो खिलाफत समाप्त करण्याचा. तुर्की सुलतान हा संपूर्ण मुस्लिम जगतात खलिफा म्हणून मानला जात होता. त्यामुळे धार्मिक आणि राजकीय अधिकार एका व्यक्तीच्या हातात एकवटलेले होते. अखेरचे काही सुलतान राजकीय दृष्ट्या निव्वळ परकीयांच्या हातातले बाहुले झाले होते. त्यांना राजकीय ताकद राहिलीच नव्हती. पण खलिफा म्हणून त्यांची धार्मिक सत्ता मात्र चालूच राहिली. बदलत्या तुर्कस्थानाला ती घातक होती. निरंकुश सत्ता अंगात मुरलेले खलिफा या सुधारणांना वाव देतील अशी सुतराम आशा नव्हती. त्यामुळे कमाल पाशाने हे पदच 3 मार्च 1924 रोजी विधानसभेच्या संमतीने नष्ट केले. खलिफाला व त्याच्या कुटूंबियांना तुर्कस्थान बाहेर घालवून देण्यात आले.[166]

कमाल पाशाला संप्रदायनिष्ठ समाजव्यवस्था बदलून त्या ऐवजी विज्ञाननिष्ठ अद्ययावत समाजरचना आणावयाची होती. तुर्कस्थानातल्या समाजरचनेविषयी तो म्हणत असे- ‘‘गेली 500 वर्षे एक विशिष्ट तत्वज्ञान, नियम यांच्यावर आळशी, निरूपयोगी धर्मोपदेशकांनी पिढ्यान् पिढ्या केलेल्या विवरणावर तुर्कस्थानचा दिवाणी फौजदारी कायदा अवलंबून आहे. राज्यघटनेचे स्वरूप प्रत्येक तुर्की माणसाचे व्यक्तिगत जीवन, त्याची भोजनपध्दती, त्याचा वेश, त्याचे शिक्षण, त्याचे विचार या सर्व गोष्टी धर्मगुरूंनी ठरविल्या आहेत. आधुनिक तुर्कस्थानात त्यांची जरा ही उपयुक्तता नाही.’’[167] कमाल पाशाने परदेशाहून तज्ञ कायदे पंडीत बोलावून त्यांच्या सहाय्याने इटालीयन व स्विस सिव्हील कायद्याच्या धर्तीवर नवीन कायदे जारी केले. या नवीन कायद्याने तुर्कस्थानचे सामाजिक स्वरूप पार बदलून गेले. स्विस कायद्यामुळे कौटुंबीक रचनेत आमूलाग्र क्रांती झाली. प्रत्येक मनुष्याने एकच बायको करावी. जनानखाना बाळगू नये. स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असावे. त्यांची गोषातून मुक्तता करावी. म्युनसिपाल्टीच्या व असेंब्लीच्या निवडणूकीत त्यांना मतदानाचा हक्क असावा. नागरिकत्वाचे हक्क त्यांना मिळावे. असे कायदे अस्तित्वात आले.[168] कमाल पाशाच्या भगिनी मकबुला बेगम हिच्या सहाय्याने स्त्रियांमध्ये जागृती करण्यात आली. अंगोरामध्ये तुर्की विदुषींना न्यायाधिशाची जागा देण्यात आली.[169]

असेंब्लीमध्ये अनेक लोक कल्याणाची बिले पास करून घेतली. सांप्रदायिक मठ, मुल्ला मौलवी, धर्मगुरू यांच्याकडील संपत्ती जप्त केली. तिचा विनियोग देशकार्यासाठी केला. शिक्षणाच्या क्षेत्रात ही असेच राष्ट्रीय धोरण सुरू करण्यात आले. शाळांतून तुर्की भाषेला प्राधान्य मिळालेच पाहिजे व तुर्की शिक्षक काही प्रमाणात नेमलेच पाहिजेत अशी आज्ञा त्याने दिली. मुलांच्या मनावर राष्ट्रीय संस्कार प्रथम व्हावा यासाठी सर्व प्राथमिक शिक्षण तुर्की शाळांतूनच झाले पाहिजे असे ठरविण्यात आले. राष्ट्रीय शाळा काढण्यात आल्या व चाळीस वर्षाखालील सर्व तुर्कांनी या शाळेत गेले पाहिजे अशी राजाज्ञा निघाली.[170]

कमाल पाशाने विवाहासंबंधी एक अत्यंत महत्वाचे बिल पास केले. विवाहापूर्वी वधुवरांनी आपली प्रकृति डॉक्टराकडून तपासून घेऊन ती सदृढ आहे असे सर्टिफिकेट दाखल केल्याखेरीज त्यांना विवाह करण्यास बंदी करण्यात आली.[171]

तुर्कांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा स्विकार केल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही या विचारांशी कमाल पाशाचा दृढ विश्वास होता. विसाव्या शतकातील आधुनिक राष्ट्राच्या बरोबरीने तुर्कस्तानचा विकास घडून येवून जगात एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून उदयास यावे अशी कमाल पाशाची इच्छा होती म्हणून तो देशाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक न्यायक्षेत्रामध्ये क्रांतिकारी बदल करून देश प्रगतीपथावर पोहोचविणे हा त्याचा त्या पाठिमागे उद्देश होता. सनातन धर्म परंपरा आणि चालिरीती त्यांच्या जाळात अडकलेल्या देशाला त्यातून बाहेर काढून त्याचा सर्व क्षेत्रात उत्कर्ष साधणे व पाश्च्यात्य सभ्यतेचा स्विकार करणे ही विचारसरणी कमालला पसंत होती. तुर्कस्थानात राष्ट्रीय जागृतीला प्रारंभ करताना कमाल पाशाने आपल्या डोळ्यासमोर तीन उद्दिष्ट्ये ठेवलेली होती.

1. जुलमाचे प्रतीक असलेले सुलतानपद आणि खलिफा पद रद्द करणे.
2. राज्यकारभारावर धर्माचे वर्चस्व होते ते नाहीसे करून धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण करणे.
3. पाश्चात्य धर्तीवर समाजाची पुनर्रचना घडवून आणणे.[172]

तुर्की समाजाचा कायापालट करण्यासाठी 'पीपल्स पार्टी' ची स्थापना केली. त्यावेळी कमालने स्वतःचे असे तत्वज्ञान आणि सहा तत्वाचा उद्घोष केला ती तत्वे पुढीलप्रमाणे होती. 1) प्रजासत्ताक वाद 2) राष्ट्रवाद 3) लोकतंत्रवाद 4) क्रांतीवाद 5) धर्मनिरपेक्षता 6) शासकीय नियंत्रण[173]

अशा रीतीने कमाल पाशाने तत्वांचा उद्घोष करून ती तत्वे अंमलात आणून संपूर्ण तुर्कस्थानचा कायापालट घडवून आणला.

### 3.6 भारतीय मुसलमानांतील विचार प्रवाह :-

मूळात कोणत्याही समाजात अनेक विचार प्रवाह दिसून येतात. समाजातील काही लोकांना ‘जैसे थे’ या परिस्थितीवर ठाम राहण्यास आवडते तर काही लोक त्या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. परंतु ती परिस्थिती नष्ट व्हावी असे त्यांना वाटत नाही. तर काही लोकांना पूर्वीची परिस्थिती पूर्णपणे नष्ट करून नवीन परिस्थिती निर्माण व्हावी असे वाटते. काही लोक त्याच्या ही पुढे जाऊन धर्मांचे, संस्कृतीचे व परंपरेचे अस्तित्व नाकारतात व नव-समाज निर्मितीचे प्रयत्न करतात. कोणत्याही धर्माच्या प्रबोधनपर चळवळीत आपल्याला प्रामुख्याने हे टप्पे दिसून येतात. हमीद दलवाईंच्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या उदयाची कारणे यातूनच दिसून येतात.

इस्लामच्या इतिहासाचे अध्ययन करताना आपल्याला तीन मतप्रवाह दिसून येतात. ते तीन प्रवाह पुढीलप्रमाणे-

- मुसलमानांमधील परंपरागत विचारप्रवाह
- मुसलमानांमधील उदारमतवादी विचारप्रवाह
- मुसलमानांमधील आधुनिक विचारप्रवाह

### 3.6.1 मुसलमानांमधील परंपरागत विचारप्रवाह :-

इस्लामचा इतिहास मूळात सरंजामशाहीचाच इतिहास आहे. इस्लामच्या उदयापासून इस्लामचे स्वरूप परंपरागत कर्मठ व सरंजामदारी स्वरूपाचेच असल्याचे दिसते. बाकी सर्व धर्मात व इस्लाम मध्ये एक मूलभूत फरक आहे. बाकी सर्व धर्म (हिंदु धर्माचा अपवाद) हे कोणीना कोणी महापुरूषाने निर्माण केलेले आहेत. ज्यांनी हातामध्ये कधीही तलवार घेतली नाही. या उलट प्रेषिताने इस्लामची स्थापना केल्यापासून तलवारीच्या छायेतच इस्लामचे रक्षण केले. सुमारे तेराशे वर्षांचा इस्लामचा इतिहास हा युध्दे व लढाया यांनीच व्यापला गेला आहे. अर्थात प्रेषिताने तलवार घेतली नसती तर इस्लाम जगभर मोठ्या प्रमाणात पसरला असताच हे कथन तर्कसंगत असे वाटत नाही. प्रेषित हा स्वतः एक अजोड सेनापती होता. त्यामुळे इस्लामचे स्वरूप शेवटपर्यंत संरजामशाहीचे राहिले. इस्लामचा स्वीकार अथवा मृत्युदंड हीच पूर्वीपासून मनोधारणा राहिल्यामुळे इस्लामचे अंतरंग कायम परंपरागत व कर्मठ असेच राहिले. जे कुराणात नाही, त्याचे अस्तित्व नाही, ही भूमिका मुस्लिम समाजाने स्विकारल्यामुळे इस्लाम अलगतेची भावना घेऊनच जगभर पसरला. इ. स. 710 मध्ये महंमद बीन कासिमने हिंदुस्थानवर आक्रमण करून सिंध प्रांत जिंकला. तेथपासून भारतामध्ये राजकीय सत्तेच्या स्वरूपात इस्लाम उदयास

आला.[174] इ.स. 629 मध्येच इस्लामचा चंचूप्रवेश भारतात अरब व्यापाऱ्यांच्या रूपाने झालेला होता. परंतु खऱ्या अर्थाने इ.स. 1206 महंमद घोरी याने भारतामध्ये मुस्लिम राजवटीची स्थापना केलेली होती.[175] इ. स. 1206 ते इ. स. 1707 (औरंगजेबचा मृत्यु) पर्यंत सुमारे 500 वर्षे मुस्लिम सत्ता भारतात अव्यहत होती.[176] या 500 वर्षाचा विचार करता असे दिसून येते की भारतातील मुसलमान हे अलगतेची भावना घेऊनच या देशात राहिले. डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांच्या मते ''भारतातील मुसलमान हे भारताशी इथल्या समाजाशी, इथल्या संस्कृतीशी कधीही एकरूप झाले नाहीत. एवढेच नव्हे तर हिंदू समाजाशी एकरूप होण्याचे त्यांनी कटाक्षाने, निर्धाराने टाळले आहे. अफगणिस्तान, इराण, तुर्कस्तान, अरबस्तान, इजिप्त आदि देशात व जगात अन्यत्र जे जे मुसलमान आहेत ते सर्व मिळून आपण एक मुस्लिम विश्व असेच भारतीय मुसलमान तेव्हापासून आजपर्यंत मानत आलेले आहेत. पूर्ण मुस्लिमवाद (पॅन इस्लामीझम) हा शब्द अलीकडचा आहे पण त्यातील भावना जुनीच आहे.''[177]

'स्टडीज इन इस्लामिक कल्चर इन द इंडियन एनव्हिरानमेट' या पुस्तकात प्रा. अजीज अहमद म्हणतात ''दिल्लीचा सुलतान शमशुद्दीन अल्तमश ( इ.स. 1210 ते 1235) हा भारतातील पहिला पॅन इस्लामिस्ट होय. जगातील सर्व मुस्लिम हे स्वतंत्र मुस्लिम विश्व असून बगदादचे अब्बासीद खलीफा हे त्याचे धार्मिक व सामाजिक शास्ते होत.''[178]

वरील बाबींवरून असे दिसते की इस्लाममध्ये आपण भारतीय समाजाचे घटक नसून मुस्लिम विश्वाचे घटक आहेत या वेगळेपणाच्या भावनेची जोपासना मुस्लिम समाज शतकानुशतके करत आहे. सर जदुनाथ सरकार यांनी असे म्हंटले आहे की ''मुसलमान हा हिंदुस्थानात होता पण तो हिंदुस्थानचा नव्हता.''[179] आपणास असे म्हणता येईल सुमारे 750 वर्षे भारतात राहूनही आपण या भारतीय समाजाचे एक घटक आहोत असे मानण्यास मुस्लिम तयार नाहीत. जदुनाथांच्या म्हणण्याप्रमाणे ते येथे राहतात परंतु येथील होत नाहीत. या सर्व बाबींचा विचार करता आपणास असे दिसून येईल की येथील बहुसंख्य मुस्लिम समाज हा धर्मांच्या पगड्या खाली आहे व तो भारतीय समाजात एकरूप होण्याऐवजी जगातील इतर मुस्लिम राष्ट्राकडे पाहत असतो.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी हिंदू शब्दाची व्याख्या करताना असे म्हंटले आहे. की ज्याची पुण्यभूमी, पितृभूमी भारतामध्ये आहे ते सर्व हिंदू होत. सावरकरांच्या या व्याख्येत हिंदू, जैन, बौध्द व शिख यांचा समावेश होतो. तर मुस्लिम, ख्रिश्चन, यहुदी हे आपोआपच वगळले जातात. कदाचित मुसलमानांच्या या विचारसरणीमुळे सावरकरांनी सदरची व्याख्या केली असावी -

**‘‘उत्तर पश्चिमेस हिंदू-उत्तर पूर्वेस ब्रह्मपुत्रा (सिंधू)**

**पूर्वेस गंगासागर, दक्षिणेस हिंदू महासागर**

**पश्चिमेस पश्चिम सागर अशी ही सिंधूवेष्टित भारतभूमी**

**ज्याची ज्याची पितृभूमी व पुण्यभूमी आहे तोच हिंदू’’** [180]

औरंगजेबच्या मृत्युनंतर मोगल साम्राज्य मोडकळीस आले. मराठ्यांनी हिंदुस्थानातील मुस्लिम सत्ता खिळखिळी करून नष्ट केली. त्याच काळात हिंदुस्थानात जाट व शीख यांचा उदय होत होता. यामुळे मुस्लिम सत्ताच नव्हे, तर इस्लाम धर्मच नष्ट होणार अशी भिती मुसलमानांना वाटणे सहज व स्वाभाविक होते. इस्लाम मध्ये राजकारण व धर्म अविभाज्य घटक आहेत. मुस्लिम समाज जेथे आहे तेथे इस्लामचीच सत्ता असली पाहिजे असा इस्लामचा प्रघात असून काही कारणामुळे ही सत्ता नष्ट झाली तर परक्या सत्तेशी जिहाद म्हणजे धर्मयुध्द पुकारून मुस्लिमांनी ती नष्ट केली पाहिजे. म्हणजेच हा देश पुन्हा ‘दार-उल-इस्लाम’ केला पाहीजे आणि हे जमले नाही तर त्या देशाचा त्याग केला पाहिजे. अशी इस्लामची आज्ञा आहे. याचाही प्रभाव मुस्लिम समाजमानसावर पडतो व म्हणूनच मुस्लिम समाज परंपरावादी विचारसरणीला सोडून देण्यास तयार होत नाही.

नक्शबंदी शाखेचा प्रसिध्द मौलवी शेख अहंमद सरहिंदी हा परंपरागत मुस्लिम प्रवाहातील एक प्रभावी नेता होय.[181] त्याचा जहाँगीर व शहाजहानवर फार मोठा प्रभाव होता. सरहिंदीचे अनुयायी हे कडवे सुन्नी होते. ते शिया पंथीय मुस्लिमांचाही व्देष करीत. स्वधर्मातल्या एका पंथाच्या अनुयायांशीसुध्दा जे सहजीवन मान्य करत नव्हते त्यांचे इतर धर्मीयाशी कसे वर्तन असे हे सांगण्याची गरज नाही.

‘स्टडीज इन इस्लामिक कल्चर इन द इंडियन एनव्हिरन्मेन्ट’ या पुस्तकात अजीज अहमद म्हणतात. ‘‘आज भारतात इस्लामला जे दुराग्रही व जीर्ण मतवादी रूप आले आहे ते त्यावेळी सरहिंदीने बुध्दीवाद व उदारमतवाद यावर जो सहज विजय मिळवला त्यामूळेच होय, आज भारतीय मुस्लिम समाज सहजीवन विरोधी सनातनी, सुधारणाव्देषी, मनात परिवर्तन मान्य असूनही प्रत्यक्षात आणण्यास न धजणारा व इतर संस्कृतीपासून विभक्त असा झाला आहे. तो सर्व सरहिंदीच्या मुळेच होय. याचे कारण उघड आहे. अर्वाचीन भारतातील सर सय्यद अहमद, कवी इक्बाल, अबुल कलाम आझाद इत्यादी नेते केव्हा ना केव्हा तरी सरहिंदी च्या प्रभावाखाली आलेले होते.’’ [182]

18 व्या शतकाच्या सुरवातीस अरबस्तानात वहाब नामक मुस्लिम धर्मनेता उदयास आला. तो मूलतत्ववादी, दुराग्रही व सुधारणा विरोधी विचारसरणीचा होता. सरहिंदी नंतर भारतीय मुसलमानांवर त्याचाच

प्रभाव दिसून येतो. या शतकातील भारतीय मुसलमानाचा नेता वलीउल्ला त्याचा मुलगा अब्दुल अजीज त्याचा नातु महमद इशाक व त्याचा शिष्य सय्यद अहमद बरेलवी हे ही वाहबी पंथीय होते. वलीउल्ला प्रथम परिवर्तन व सुधारणा यांना अनुकुल होता. पण भारतीय जनतेशी मुस्लिमांनी कधीही एकरूप होता कामा नये असे त्याचे धोरण होते. [183]

डॉ. आय. एच. कुरेशी लिहितात, ''हिंदुस्थानातील जीवनाशी मुस्लिमांनी एकात्म होण्यास वल्लीउल्लाचा सक्त विरोध होता. सर्व बाहेरच्या मुस्लिम जगाशीच त्याचे संबंध जागते राहीले पाहिजेत तरच इस्लामचे खरे तेज खरे सत्व त्याच्या ठाई जिवंत राहील असे तो म्हणे. भारतात मुस्लिमांचा पराभव झाला तो हिंदूंशी संपर्क आल्यामुळे, त्या काफराच्या संबंधामुळे इस्लामला जे मालिन्य आले त्यामुळे झाला. असे वल्लीउल्ला सांगत असे. थोडक्यात म्हणजे मुस्लिम हे हिंदी झाले, भारतीय झाले, हे इस्लामच्या सर्व अधःपतनाचे कारण होय असे त्याचे मत होते. त्यामुळे या दोन जमाती पृथक, अलिप्त व विभक्त राहील्या पाहीजेत असा आयुष्यभर प्रचार करून त्याने अर्वाचीन काळातल्या विभक्त वृत्तीचा पाया दृढ करून ठेवला.'' [184]

भारतातील मुस्लिमांचे राज्य नष्ट झाले व मराठे आणि शीखांची सत्ता सर्वत्र पसरल्यामुळे भारत हा दार-उल-हारब राहिला तो दार-उल-इस्लाम होईपर्यंत जिहाद चालू ठेवलाच पाहिजे अशी इस्लामची आज्ञा आहे. मुसलमानांच्या परंपरागत दृष्टीकोनाचे हेच सर्वात मोठे कारण आहे. त्यामुळे आजही हा समाज अलगतेची भावना घेऊन जगत आहे.[185]

थोडक्यात भारतीय मुस्लिम भारतीय जीवनाशी कधीही समरस झालेले नाहीत. उलट विश्व मुस्लिम वादाच्या काल्पनिक अभ्यासपूर्ण जगातच ते राहिले याचे मुख्य कारण म्हणजे त्या समाजावरील मुल्ला मौलवीचे वर्चस्व होय. हे मुल्ला मौलवी इराण, तुर्कस्तान, अरबस्तान या देशातील मुल्लांकडे मार्गदर्शनासाठी पाहत असत. त्यामुळे जीर्णमतवाद, मूलतत्ववाद, हेकट मताचा पगडा त्यांच्यावर होता. त्यामुळे इस्लाम मध्ये परिवर्तन, प्रगती, सुधारणा, नवचैतन्य सर्व अशक्य होऊन बसले. विश्वमुस्लिमवाद, धर्माची अपरिवर्तनीयता, शरीयत या सर्वावरील अंधश्रध्दा भारतीय मुस्लिमांच्या विचारसरणीवर प्रभाव टाकणाऱ्या ठरल्या. त्यामुळे लोकशाही, राष्ट्रनिष्ठा, इहवाद, बुध्दीप्रामाण्यवाद, समता या तत्वाचा मुस्लिम समाजाने मनापासून स्वीकार केलेला दिसत नाही. त्यामुळे आजच्या मुस्लिम समाजात बहुसंख्य मुसलमान परंपरागत मतप्रवाहास चिकटून आहेत असे दिसून येते.

### 3.6.2 मुसलमानांमधील उदारमतवादी विचारप्रवाह :-

मध्ययुगात भारताचे राजकीय चित्र पालटले. भारतामध्ये इस्लामचे आगमन झाले. त्यापूर्वी भारतावर अनेक विदेशी आक्रमणे झालेली होती. उदा. शक, पल्लव, कुशाण, ग्रीक इत्यादी परंतु या सर्व जमाती भारतीय

समाज जीवनात इतक्या एकरूप झाल्या की पुढे त्याची नामोनिशाणीही अस्तित्वात राहिली नाही. परंतु इस्लामचा संपर्क आल्यावर यामध्ये फार मोठा बदल झाला. एक पोथी, एक प्रेषित व एकच परमेश्वर, आपलाच खरा धर्म, आमचा धार्मिक ग्रंथ, ईश्वरी आज्ञांची शेवटची आवृत्ती, पूर्वीचे धर्मग्रंथ म्हणजे जुन्या आवृत्या म्हणून त्या कालबाह्य अशी इस्लामची धारणा होती व आजही आहे. भारतामध्ये त्याची गाठ पडली उदारमतवादी व महासमन्वयवादी भारतीय संस्कृतीशी आणि या दोन्हीचा मेळ भारतीय भूमीवर बसणे अवघडच होते. परंतु मध्यपूर्वेतच 10 व्या शतकात सूफी पंथाचा उदय झाला आणि पूर्वीचे विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, एकीकडे व दुसरीकडे इस्लामचा कट्टर पोथीनिष्ठवाद याचा संघर्ष इस्लाममध्ये सुरू झाला.

सूफी पंथाचे ध्येय एकच ते म्हणजे अन-ल-हक (मैं ही खुदा हूँ) ही घोषणा पोथीनिष्ठ इस्लामच्या कट्टर विरोधातील होती. 14 व्या शतकात हा पंथ भारतात आला आणि हा हा म्हणता पसरला. भारतामध्ये सूफी मताचा प्रचार प्रसिध्द सूफी अल हुजवेरी याने केला. ऐने अकबरी मध्ये सूफी पंथाच्या 14 संप्रदायाचा उल्लेख आढळतो. त्यामध्ये प्रसिध्द पंथ कादरी पंथ, सुहरावर्दी पंथ, नक्शबंदी आणि चिस्ती पंथ हे प्रमुख आहेत.[186]

सूफी पंथाचा मूळ प्रणेता इलेअरबी हा अरबी तत्वज्ञ होता. दिल्लीचा निजामुद्दीन अवलिया, अजमेरचा मुईनुद्दीन चिस्ती ही काही नावे या संदर्भात महत्वाची आहेत. सूफींच्या अव्दैत तत्वज्ञानाच्या विचारसरणीला व भारतीय अव्दैतवादाला जोडणारा एक धागा निर्माण झाला व उदारमतवादी मुस्लिम विचारवंताची एक परंपरा निर्माण झाली. भारतीय संस्कृती खऱ्या अर्थाने समजून घेण्याची ज्याच्या मनामध्ये तळमळ होती असे अनेक मुस्लिम विचारवंत या देशात उदयास आले, जे प्रत्यक्ष कृतीने उदारमतवाद उपयोगात आणीत ही सर्वात महत्वाची गोष्ट होय. एका दृष्टीने हा समन्वयवादी भारतीय संस्कृतीचा विजय होता. या संदर्भात काही उदारमतवादी विचारवंताचा उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यामध्ये निजामुद्दीन अवलियाचा शिष्य भारताचा सर्वोत्तम फारसी पंडीत व हिंदीचा आदिकवी अमीर खूसरो हा होय. त्याच्या कवितेतून भारताबद्दलचा मोठा अभिमान प्रगट झाला आहे.[187] त्यानंतर सम्राट अकबर याचे नाव सर्वपरिचित आहे. अबुल फजल याने महाभारताचे फार्सी मध्ये भांषातर केले.[188] फैजी हा अबुल फजलचा भाऊ त्याने नल दमयंतीवर फार्सी भाषेमध्ये महाकाव्य लिहिले. मुल्ला मसीहा याने 13 हजार ओळीचे फार्सी मध्ये रामायण महाकाव्य लिहिले. दाराशुकोह याने भगवतगीतेचे फार्सी भांषातर केले. योगवशिष्ठाच्या फार्सी भाषांतराला प्रस्तावना लिहिली व 65 उपनिषदांचे फार्सी भाषेत अनुवाद केले. हिंदू व मुसलमान हे दोन धर्म कसे समान आहेत हे दाखविणारा एक ग्रंथ लिहिला त्याचे नाव 'मज्मुअलबहारे' म्हणजे 'समुद्रसंगम' हा ग्रंथ लिहिला.[189] दाराशुकोहचा मित्र महिबुल्ला हा अव्दैत वेदांती पंडीत होता. मजहर जानेजाना हा

18 व्या शतकाच्या शेवटी उदारमतवादी तत्वज्ञ होऊन गेला. यावरून हे ऐतिहासिक उदारमतवादी विचारवंत आपणास दिसून येतात.[190]

सर सय्यद अहमदखान हे सुधारणावादी, परिवर्तनवादी व बुध्दीवादी होते. पाश्चात्य विद्या आत्मसात केल्याशिवाय भारतीय मुसलमानांची प्रगती होणार नाही असे त्यांचे मत होते. हिंदी मुसलमानांमध्ये जागृती घडवून आणण्यात त्यांनी फार मोठी कामगिरी बजावली आहे. सन 1857 च्या स्वातंत्र्य युध्दानंतर हिंदी मुसलमानांची फार मोठ्या प्रमाणात प्राणहानी व वित्तहानी झाली. मुस्लिम समाजाला वर आणावयाचे असेल तर त्यांनी आधुनिकतेचा स्वीकार केला पाहीजे, इंग्रजी शिक्षण घेतले पाहिजे. इंग्रजांशी सहकार्य केले पाहीजे व आपल्या समाजात बदल घडवून आणले पाहिजेत ही विचारधारा हिंदी मुसलमानांमध्ये निर्माण झाली. या विचारसरणीचे नेतृत्व सर सय्यद अहमदखान यांचेकडे होते. आपला समाज पुढे न्यायचा असेल व ब्रिटिशांचा हिंदी मुसलमानांवरील राग कमी करावयाचा असेल तर इंग्रजांशी सहकार्य अपरिहार्य आहे. याची त्यांना जाणीव होती व यामुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पासून ते दूरच राहिले. सय्यद अहमद यांनी पॅनइस्लामीझम बद्दल उदासिनता दाखविली. त्यामुळे ते ब्रिटिशांना जास्त प्रिय झाले. अर्थात जगातील सर्व मुसलमान कधीही एक झालेले नाहीत व ना त्यांनी कुठल्यां प्रकारचे विधायक कार्य केले. आपल्या मताचा प्रचार करण्यासाठी सय्यद अहमद यांनी कुराणावर नवे भाष्य लिहिले व सांयटिफिक सोसायटी स्थापन केली. सन 1875 साली पाश्चात्य विद्या व सुधारणावाद मुस्लिम समाजात रूजविण्यासाठी अलीगढ येथे मुस्लिम कॉलेजची स्थापना केली. त्याचेच रुपांतर पुढे अलिगढ मुस्लिम विद्यापीठात झाले.[191]

प्रसिध्द भारतीय कवी महंमद इक्बाल हा उदारमतवादाचा प्रतिक मानला जातो. इक्बाल सुरूवातीस कट्टर राष्ट्रवादीच होता परंतु नंतर त्याच्या मनात परिवर्तन होत गेले. इंग्लंड व जर्मन विद्यापीठातून त्याने डॉक्टरेटस् मिळविल्या व लिंकन्स इन मधून बॅरिस्टरची पदवी घेतली. मुस्लिम समाजाचे स्वत्व व वैभव नष्ट झाले आहे याची त्याला खंत वाटत असे. इस्लामिक तत्वज्ञानात भर घालणारे त्याचे तत्व म्हणजे खुदी ची संकल्पना होय. 'खुदी' म्हणजे चेतना होय. ती त्याने वसुगुप्त प्रणित काश्मीरी शैव संप्रदायातील स्पंदन शास्त्रातुन घेतली आहे असे म्हणतात.[192] इकबाल आपल्या कवितेमध्ये ईश्वराला प्रश्न विचारतो -

**" खिरद मंदो से क्या पुछूँ कि मेरी इब्तिदा क्या है ?**

**कि मैं इस फिक्र में रहता हूँ मेरी इन्तेहा क्या है ?**

**खुदी को कर बुलंद इतना कि हर तकदीर से पहले**

**खुदा बंदे से खुद पुछे तेरी रजा क्या है ?"** [193]

अर्थात ज्ञानी लोकांना प्रश्न करतो की माझी सुरवात काय आहे ? मी याच विचारात गुंग आहे की माझी अखेर काय आहे ? माणसाने स्वतःला इतके मोठे व मजबुत बनवावे की स्वतः परमेश्वराने नशीब लिहण्यापूर्वी विचारावे तुला कोणती संकटे पाठवून देऊ ?

खुदी म्हणजे चेतना अस्मिता होय. तिला सुरूवात नाही व शेवटही नाही. युगायुगामधुन तिचा प्रवाह वाहत चालला आहे. अखेरीस ती मानवामध्ये प्रकट झाली. तिचे तेज सार्वभौम होय. इक्बालच्या मते इस्लाम म्हणजे कर्मयोग, इस्लाम मध्ये नश्वरतेच्या विचाराला स्थान नाही. परमेश्वरापुढे शरणागती पत्करून सतत कार्यरत राहाणे आणि इहलोकातील साधन सामग्रीचा उपभोग घेणे हे मुसलमानांचे प्रथम कर्तव्य आहे असे त्याचे मत होते.[194] इक्बालने आपल्या विचारसरणीतून राम, गौतम, कृष्ण, नानक, शिव, गंगा, बुध्द, महावीर, टीपू सुलतान व गांधी यांच्याबद्दलचा आपला आदरभाव प्रकट केला आहे.[195] 'जावेद नामा' हे त्याचे काव्य उदारमतवादी विचारांना प्रकट करते.[196]

भारतात निर्माण झालेला आंतरराष्ट्रीय किर्तीचा एक मुस्लिम धर्मशास्त्रज्ञ म्हणजे अबुल कलम आझाद होय. 'इस्लाम हा एकच खरा धर्म आहे. बाकीचे सर्व धर्म असत्य आहेत. काफराशी रात्रदिवस युध्द प्रसंग अपरिहार्य आहे. आमची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी आम्ही इतरांच्याहुन वेगळे व अलग आहोत हे आमच्या आचरणातुन आम्ही दाखविले पाहीजे.' अशा प्रकारच्या धार्मिक शिकवणीला कुराणात अगर हादिस मध्ये काही आधार नाही हे दाखविण्याचे कार्य आझाद यांनी केले. आझादांच्या उदारमतवादी शिकवणीचे सार थोडक्यात असे सांगता येईल की ईश्वरावर श्रध्दा सर्व धर्म ठेवतात. सर्व धर्म सत्य आहेत. हीच कुराणाची शिकवण आहे. ईश्वरावर श्रध्दा जर सर्व धर्मातून दिसते. तर मुसलमानांनी सर्व समाजाच्या जवळ यायला हवे. आमचा मुसलमान समाज इतरांपासून वेगळा आहे. अशी भूमिका काही विशिष्ट ऐतिहासिक कारणातून निर्माण झालेली आहे. ती इस्लामचा अटल सिध्दांत नाही. आझाद यांनी दीन व शरा यांच्यातील भेद दाखविला आहे. दीन म्हणजे धर्म व शरा म्हणजे रूढी. या देशकालपरत्वे वेगवेगळ्या असू शकतात. त्यामुळे परस्परात भांडण करण्याचे कारण नाही. 'हिंदूंच्या बरोबर मैत्री आणि सहकार्य यातुनच 'उमातुल्ल वाहिदा' असे भारतीय राष्ट्र निर्माण होऊ शकेल. 'उमातुल्ल वाहिदा' म्हणजे एक राष्ट्र होय. मौलाना आझाद यांचा दृष्टीकोन अखंड भारत टिकविण्याचा होता. ब्रिटिश शांततेने सत्तांतर करून या देशातून निघून गेले असते तर या देशाचे पहिले पंतप्रधान मौलाना आझाद हेच झाले असते पण आझाद एक गोष्ट विसरले

प्रेषिताने मुस्लिमेत्तर नागरिकांशी केलेला करार प्रेषितालाच टिकवून ठेवता आला नाही आणि आझादाचा हा प्रयोग फाळणीच्या पार्श्वभूमीवर टिकणे अशक्यच होते.'[197]

इस्लामच्या तेराशे वर्षाच्या इतिहासात कुराणावर या पध्दतीने कोणीही भाष्य केलेले नव्हते. ते करून आपल्या उदारमतवादी विचारसरणीचा परिचय मौलाना आझाद यांनी करून दिला. हे महत्वाचे आहे. मुस्लिमांनी आधुनिक शिक्षणाचा स्वीकार करावा. नव्या तंत्रज्ञानावर मौलाना आझाद यांच्या विश्वास आयुष्याच्या अंतिम टप्यापर्यंत वाढतच राहिला. आधुनिकीकरणाच्या बाबतीत त्याचे मन गांधीपेक्षा पंडित नेहरूंना जास्त जवळ असे होते. मौलाना आझाद हे गैरमुकलीद म्हणजे परंपरा मान्य न करता पवित्र ग्रंथाचा अर्थ लावत होते. आझाद हे बुध्दीप्रामाण्यवादी होते. नरहर कुरूंदकर आपल्या 'शिवरात्र' या ग्रंथात मौलाना आझादांबद्दल लिहितात- ''मौलाना हे मुस्लिम धर्माच्या इतिहासात तेराशे वर्षात प्रथम उदयास आलेले परंपरा सोडून तर्क चालविणारे गैरमुकलीद, मुजतहिद (भाष्यकार) होते म्हणून त्याच्या बद्दल एवढा प्रचंड गहजब (गोंधळ) करण्यात आला आहे. माझा परमेश्वरावर व परमेश्वरी ग्रंथावर विश्वास आहे. त्यातील प्रत्येक वाक्यावर विश्वास आहे. पण मी परमेश्वरी ग्रंथ परमेश्वरी पुस्तक वाचून, समजून घेईन. सर्व हादिस मानवी भाष्ये आहेत. मानवी भाष्ये चुकू शकतात. हादीसने चुका केलेल्या आहेत. मी पवित्र ईश्वरी ग्रंथाचा अर्थ प्रेषित व प्रेषितांचे समकालीन ज्याप्रमाणे करीत त्याप्रमाणे करू इच्छितो. प्रेषितांच्या निधनानंतर दोन अडीचशे वर्षांनी जन्माला येणारे लोक परमेश्वरी ग्रंथाचा अर्थ ज्या प्रमाणे करतात तो अर्थ मान्य करण्यास मी तयार नाही.''[198]

थोडक्यात सेक्युलर स्टेट हेच परमेश्वरी धर्मग्रंथाचे प्रतिपादन आहे. हे विवेचन मौलाना आझाद यांनी केले आहे.

उदारमतवादी परंपरेतील आणखी एका व्यक्तीचे नाव घेतले जाते आणि ते म्हणजे खान अब्दुल गफारखान उर्फ सरहद्द गांधी. वायव्य सरहद्द प्रांतात गफारखानांचा जन्म झाला. सन 1930 नंतर गफारखान यांचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस बरोबर घनिष्ट संबंध जुळुन आले. विशेषता गांधींच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव गफारखानांवर पडला. कट्टर मुस्लिम असूनही 'गीता' हिंदुचा धर्मग्रंथ त्यांच्या अध्ययनाचा विषय झाला. भगवतगीतेचा व कुराणाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. 'खुदाई-इ-खिदमतगार' या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी हिंदू-मुस्लिम एकतेचा प्रचार व प्रसार केला. गफारखानांचे व्यक्तीमत्व सर्वधर्मसमभाववादी झाले. गफारखानांचे राजकारण व समाजकारण इस्लामी कट्टरतेच्या विरोधी होते. 'हिंदुत्ववाद्यांनी जसा हिंदु गांधींचा उत्कट व्देष केला तितकाच उत्कट व्देष कट्टर मुसलमानांनी गफारखानांचा केला. सामान्य हिंदू जनता जशी म. गांधीच्या मागे आपला त्राता म्हणून श्रध्देने गेली.

तसे पठाण ही श्रध्देने आपल्या या नेत्याच्या मागे गेले.'[199] प्रा. नरहर कुरूंदकरांनी गफारखानांचे मूल्यमापन मोजक्या व अचूक शब्दात वरील प्रमाणे केले आहे.

सर्वधर्मसमभावी गफारखानांच्या मनाचा विकास होत राहिला. सामाजिक व आर्थिक सुधारणाच्या प्रश्नांनी त्यांचे लक्ष वेधले गेले. उदारमतादी सर्वांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी न्याय व समाजव्यवस्था निर्माण करण्याचा सरहद्द गांधीनी शेवटपर्यंत प्रयत्न केला. गफारखान हे भारतीय स्वातंत्र्ययुध्दातील एक महान सेनापती होते. पठाण जातीसारख्या सदैव शस्त्रसज्ज असलेल्या या समुहाला गफारखानांनी अहिंसेची व उदारमतवादाची शिकवण दिली ती फार महत्वाची होती. मौलाना आझादांचे राजकीय शिष्य म्हणून गफारखानांनी आपल्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीची सुरूवात केली. परंतु ते आपल्या गुरू पेक्षा मोठे झाले आणि स्वातंत्र्य चळवळीतील एका महानायकांचे प्रतिरूप म्हणून त्यांना आज ओळखले जाते. त्याचे कारण ते उदारमतवादी एवढेच होय.

### 3.6.3 मुसलमानांमधील आधुनिक विचार प्रवाह :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या देशातील सामाजिक मन विचार करू लागले. फाळणी मुळे अस्वस्थ झालेले हिंदू व मुसलमान जातीयवादी म्हणून एकमेकांना बोट दाखवित राहिले. त्याचा परिणाम जसा हिंदुवर झाला तसाच तो मुस्लिमांवर ही झाला. या सर्वाचा परिणाम म्हणून मुस्लिमांमध्ये आधुनिक विचारांचा पुरस्कार करणारे अनेक विचारवंत उदयास आले. हिंदू धार्मिक व सामाजिक सुधारणांची सुरूवात राजा राममोहन रॉय यांच्यापासुन झाली. तर इस्लाम मध्ये हे श्रेय सय्यद अहमदखान यांच्याकडे जाते. आधुनिक विचारवंतानी सय्यद अहमदखान यांचा वारसा पुढे नेण्याचा निश्चितच प्रयत्न केला असे या संदर्भात म्हणता येईल.

बॅ. महंमद हिदाय्यतुल्ला या परंपरेतील एक महत्वपूर्ण नाव आहे. व्यवसायाने वकील असलेल्या हिदाय्यततुल्लांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश पद बरीच वर्षे भूषविले होते. सामाजिक, कायदा, संविधान, मुस्लिम कायदे अशा अनेक विषयावर पुस्तके लिहून त्यांनी आपल्या उदारमतवादी व आधुनिकतेचा जगाला परिचय करून दिला. 'जामिया मिलिया इस्लामिया' विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ, पंजाब विद्यापीठ या विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम पाहीले. देश विभाजनाच्या वेळी त्यांना पाकिस्तानात येण्याचा अनेक मुस्लिम नेत्यांनी आग्रह केला. परंतु पाकिस्तानात न जाता हिदाय्यतुल्ला येथेच राहिले. आपल्या लेखनातून भारतीय मुस्लिम समाजाला त्यांनी प्रगतीचा व आधुनिकतेचा संदेश दिला आहे. ते एक शिक्षणतज्ज्ञ म्हणूनही ख्यातनाम होते. मुस्लिम समाजाचे मागासलेपण शिक्षणामुळे दूर होईल असा त्यांना विश्वास होता. कायद्याचे प्राध्यापक म्हणूनही त्यांनी बरीच वर्षे काम केले.[200]

आधुनिक विचार प्रवाहातील दुसरे नाव न्यायमूर्ती महंमद करीम छगला यांचे घ्यावे लागते. न्या. छगला शंभर टक्के राष्ट्रवादी व निर्भीड उदारमतवादी विचारवंत होते. छगलांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात मुस्लिम लीगच्या माध्यमातून केली परंतु मुस्लिम लीगच्या जातीयवादी राजकारणाचा त्यांना तिटकारा आला. पुढे त्यांचे बॅ. जिनांबरोबर मतभेद झाले. अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवणारे छगला हे केवळ अर्थतज्ज्ञ नव्हे तर नामवंत कायदेतज्ज्ञ होते. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश म्हणूनही त्यांनी कार्य केले. मुस्लिम समाज प्रागतिक व्हावा यासाठी त्यांनी सदैव धडपड केली. कायद्याचे आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून ही त्यांनी काम केले. मुस्लिम लीग मधुन बाहेर पडल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर दलित समाजाच्या प्रगतीसाठी त्यांनी आपले योगदान दिले. स्वतंत्र भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द विशेष उल्लेखनीय ठरली. त्यांनी इंग्रजी भाषेत लिहिलेले 'रोजेस इन डिसेंबर' हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या केवळ वैयक्तिक जीवनाचाच नाही तर आधुनिक विचारसरणीचा व सार्वजनिक जीवनाचाही परिचय देते. मुस्लिम समाज अंधश्रध्देचे जोखड जो पर्यंत फेकून देत नाही आणि आधुनिक दृष्टीकोनाचा स्वीकार करू शकत नाहीत तो पर्यंत मुस्लिमांची प्रगती होणार नाही याबद्दल त्यांचे विचार ठाम होते. शिया मुस्लिम परिवारात जन्मलेल्या न्या. छगला यांनी केवळ शिया अथवा मुस्लिम धर्माचाच विचार केला नाही तर संपूर्ण भारतीय समाजाचा व त्याच्या प्रगतीचा विचार करणारा हा एक आधुनिक मुस्लिम विचारवंत होता.[201]

'धर्मनिरपेक्षतेची संकल्पना' या लेखात श्री. न्या. छगला असे म्हणतात ''भारतातील मुस्लिमांनी प्राचीन भारतीय आर्यांचा अभिमान धरला पाहिजे. मुस्लिमांनी मुस्लिम कर्तृत्वाचा अभिमान धरावाच पण भारतीय संस्कृतीला आर्य येथे आले. तेव्हापासूनच प्रारंभ झाला आहे. तेव्हापासूनची भारतीय संस्कृती ही आपली आहे हे त्यांनी ध्यानी घ्यावे. पुढे ते असे ही म्हणतात ''मुस्लिम देशांनी उलेमांना बाजुला सारून मुस्लिम कुटुंब कायद्यात बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. काही मुस्लिम राष्ट्रांनी तर इहवादाच्या दृष्टीने खूपच प्रगती केली आहे. पण हिंदी मुस्लिम मात्र अजून परिवर्तनविरोध भूमिकेवरच ठामपणे उभे आहेत. अजून ते मध्ययुगीन वातावरणातच आहेत. त्यामुळे या समाजाची प्रगती खुंटून जाईल. प्रगतीसाठी कायद्याचे ऐहिकीकरण अपरिहार्य आहे.''[202]

मुसलमानांमधील आधुनिक विचारप्रवाहांचा विचार करीत असता प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे नाव समोर येते. प्रा. फैजी इस्लामी संस्कृतीचे थोर चिकित्सक अभ्यासक होते. फैजी इतका इस्लामचा इतक्या विविध पैलुंनी अभ्यास केलेले विद्वान या देशात फार थोडे असतील. आधुनिक चिकित्सक पध्दतीचा स्वीकार करून त्यांनी इस्लामचे अध्ययन केले होते. त्यामुळे परंपरागत पध्दतीचा आंधळेपणा त्यांच्या अभ्यासात अजिबात नव्हता. प्रा.

फैजी हे समान नागरी कायद्याचे समर्थक होते. त्यांचे विचार असे सांगता येतील, ‘‘मुस्लिम समाजाने सामाजिक प्रश्नांना सामोरे जावे. प्रश्नाची उपेक्षा करून प्रश्न सुटत नसतात. चार स्त्रियांशी विवाह करण्याचा प्रथेचा व तलाकच्या प्रथेचा सर्रास होत असलेला गैरवापर थांबला पाहिजे. हा जणु ईश्वरदत्त आधिकार आहे असे समजुन स्वतःच्या वासनातृप्तीसाठी चार चार सवती घरात आणणे, जबानी तलाकचा वापर करून स्त्रीला पोतेऱ्या सारखे वागवणे आणि मुलाचे लेंढार निर्माण करून त्यांची आबाळ करणे. हे कोणाही सुसंस्कृत माणसाला शोभण्यासारखे नाही. मग कोणत्याही धर्मांचा तो दावा करीत असो. धर्माची दुहाई देत सामाजिक दुराचाराची पाठराखणी करून स्वतःच्या पायावर मुस्लिमांनी धोंडा पाडून घेवू नये.’’[203] असे प्रा. फैजी यांचे उदारमतवादी विचार होते.

सन 1933 मध्ये प्रा. फैजी यांनी पुढाकार घेऊन ‘‘इस्लामिक रिसर्च असोसिएशन्स’’ स्थापन केली. या संस्थेचे उद्दिष्ट होते की इस्लाम विषयक संशोधनाचा मागोवा घेणे. ही संस्था इस्लामी संस्कृतीच्या सर्व पैलूंचे अध्ययन करील. साप्रंदायिक दृष्टीकोन न अंगीकारता इस्लामचा सखोल, व्यापक, परिपूर्ण अभ्यास व संशोधन ही संस्था करेल.[204] थोडक्यात प्रा. फैजी यांचे विचार स्पष्ट करताना असे म्हणता येईल की मुस्लिमांनी आधुनिक दृष्टीकोन स्वीकाला पाहिजे आणि संशोधनाचा वापर करून आजवर अज्ञात असलेले इस्लामचे अनेक पैलू जगासमोर आणले पाहिजेत व मुसलमानांनी जास्तीत जास्त सुसंस्कृत बनण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

धर्मपरिवर्तन व सामाजिक सुधारणा या दृष्टीने तुर्कस्थानातील नेत्यांनी क्रांती केली. ती क्रांती त्यांनी मानवकृत कायद्यांनी केली आहे. अल्लाचा कायदा हा एकच कायदा आम्ही जाणतो. असे ते म्हणत नाहीत पण धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक कोणत्याही कायद्याला हात लावणे म्हणजे इस्लामवर आघात होय असे भारतीय मुस्लिम मानतात तसे त्या देशातील मुस्लिम जनता व नेते मानीत नाहीत. त्या देशांतील आधार घेऊनच प्रा. फैजी यांनी हिंदुस्थानात मुस्लिम कायद्यांत एक भार्या कायदा करण्याची वेळ आली आहे असे आपले मत मांडले होते म्हणून प्रा. फैजी म्हणतात ‘भारतातील मुस्लिम कायदा हा घटनेवर आधारलेला आहे. शरियतवर नाही तेव्हा कुराण व शरियत यांची नावे पुन्हा पुन्हा सांगण्यात अर्थ नाही. भारतीय दंडविधान कायदा करताना धर्मशास्त्र किंवा शरियत पाहत नाही. न्याय, समता, विवेक हे त्याचे आधार आहेत. मोरोको, तुर्कस्तान, सिरिया, इराण, पाकिस्तान इ. बहुसंख्य मुस्लिम देशांनी एक तर बहुभार्या पध्दती नष्ट केली आहे किंवा अत्यंत दुर्घट केली आहे तेव्हा भारतात एक-भार्या हा नियम व्हावा व बहु-भार्या अपवाद ठरावा.’[205]

भारताचे पहिले मुस्लिम राष्ट्रपती व स्वातंत्र्य सेनानी मौलाना आझादांचे राजकीय शिष्य ‘जामिया मिलिया इस्लामिया’ चे संस्थापक व कुलगुरू तसेच एक थोर शिक्षणतज्ज्ञ म्हणून डॉ. जाकिर हुसेन सर्वपरिचित आहेत.

महात्मा गांधी व अजमल खान यांच्या बरोबर त्यांनी कार्य केले आहे. सर्वधर्मसमानत्व हे तत्व जाकिर हुसेन यांना मान्य होते. 'जामिया मिलीया इस्लामिया' या राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना करून त्यांनी सर्व समाजात विशेषतः मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा ही त्यांची मनोकामना होती.[206]

''मौलाना आझाद यांच्या मते सर्व धर्माचे धर्मग्रंथ पूज्य मानणे म्हणजे खरा इस्लाम असे ते म्हणत'' [207] डॉ. जाकिर हुसेन यांनाही मौलाना आझादाचे हे मत मान्य होते. ''एक सर्वधर्म पूजागृह बांधुन सर्व धर्मियांनी एकत्र प्रार्थना करावी. आपआपल्या धर्माच्या उपासनेने सर्वांना मोक्ष मिळेल.'' [208] असे डॉ. जाकिर हुसेन यांचे मत होते.

प्रत्येक भाविकाला आपला धर्म सर्वश्रेष्ठ वाटतोच यात काही आश्चर्य नाही परंतु इस्लामी मानसिकतेचा विचार करता डॉ. जाकिर हुसेन यांची मते निश्चितच आधुनिक दृष्टीकोनाचा परिचय करून देतात हे निसंशय सिध्द होते.

आधुनिक मुस्लिम विचारवंतातील एक नाव अबिद हुसेन यांचे आहे. डॉ. जाकिर हुसेन यांचे सहकारी, अर्थतज्ज्ञ, उर्दू, फारसी, इंग्रजी व जर्मन भाषेचे विद्वान, 'भारतीय मुसलमान समाज आणि संस्कृती' या जगप्रसिध्द ग्रंथाचे लेखक व जामिया मिलियातील प्राध्यापक डॉ. अबिद हुसेन आधुनिक विचार प्रवाहातील एक अग्रगण्य नाव आहे. प्रशासकीय आधिकारी, राजनैतिक मुत्सद्दी, भारताचे अमेरिकेतील राजदूत, अर्थशास्त्राचे प्राध्यापक व हैद्राबाद विद्यापीठाचे कुलगुरू अशा अनेक जबाबदाऱ्या डॉ. अबिद हुसेन यांनी पार पाडल्या होत्या. तर प्रा. हुमायुन कबीर यांनी केंद्रीय मंत्रीमंडळात शिक्षण मंत्री म्हणून काम केले होते. या दोघांनी ही 'दि नॅशनल कल्चर ऑफ इंडिया' (अबिद हुसेन) व 'द इंडियन हेरिटेज' (हुमायुन कबीर) या आपल्या ग्रंथात मध्ये एक वेगळीच विचारसरणी मांडली आहे. त्यामध्ये ते म्हणतात, ''मुस्लिम भारतात आल्यानंतरचा हजार वर्षांचा इतिहास हा दोन्ही जमातीच्या स्नेहाचा सौहार्दाचा, सहकार्याचा, एकात्मतेचा इतिहास आहे. युध्दे झाली, लढाया झाल्या, रक्तपात झाले, संघर्ष झाले पण हे सर्व अपवादात्मक होय. इतिहासकारांनी त्यावरच सर्व भर दिल्यामुळे हे चित्र विकृत दिसते. पण ते खरे नाही. भारतीय संस्कृती ही केवळ हिंदूची संस्कृती नाही. ती हिंदू-मुस्लिमांची सामाईक संमिश्र संस्कृती म्हणजे हिंदुस्थानी संस्कृती आहे. ती वेद, उपनिषदे, महाभारत यांनी प्रथम घडविली व पुढील काळात हिंदुस्थानात आलेल्या सर्व जमातीनी ती हिंदू प्रमाणेच विकसित केली. गणित, वैद्यक, ज्योतिष या विद्या भारतात प्रगत झाल्या होत्या. अरब व इतर मुस्लिम राष्ट्रे यांची त्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष छाप होती. 9 व्या शतकात दक्षिण भारतात शंकराचार्यांचे अव्दैत तत्वज्ञान व भागवताचा भक्ती पंथ यांच्या मागे इस्लामचीच प्रेरणा होती. चित्र, शिल्प, संगीत या कलांच्या बाबतीतही अशीच देवाण घेवाण झाली आहे. सूफी पंथाने धर्माच्या बाबतीत हिंदू धर्म व इस्लाम यांच्यात समन्वय

साधून एकात्मतेला फार मोठे सहाय्य केले. रामानंद, कबीर, नानक, चैतन्य, मुईउद्दीन चिस्ती इत्यादींनी सूफी पंथाचे कार्य पुढे  चालवून दोन्ही जमातींना एकजीव करून टाकले. त्यांच्यात लढाया झाल्या त्या आर्थिक व राजकीय कारणांनी झाल्या, धार्मिक कारणे त्यामागे मूळीच नव्हती तशीच जातीय कारणे ही नव्हती. हिंदू मुस्लिम यांचे लढे होत तसेच हिंदू-हिंदू व मुस्लिम-मुस्लिमांतही लढे होत तेव्हा त्यावर या जमातीत धार्मिक वैर होते असे म्हणता येणार नाही.''[209] म्हणूनच असे म्हणता येते की या जमातींचा इतिहास हा ऐक्याचा, सातत्याचा, समन्वयाचा व एकात्मतेचा आहे.

उपरोक्त विवेचनाचे विश्लेषण करताना असे लक्षात येते की उभय विचारवंतांनी इतिहासाचा एक नवा दृष्टीकोन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. भले ही त्यांचे सर्वच विचार आपणास मान्य होतील असे नाही पण इतिहासाची एक नवी मांडणी आधुनिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून त्यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे हे निर्विवाद सत्य आहे.

महंमद अली अलाबक्ष हे नाव फारसे परिचित नाही. त्यांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी सुरू करून नावारूपाला आणलेली 'मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक', इस्लाम धर्माप्रमाणे व्याज देणे घेणे हा गुन्हा समजला जातो आणि बँक म्हणजे तर उघड उघड व्याजबट्याचा धंदा करणारी संस्था. मुस्लिम समाज अंधश्रध्दा व पूर्वग्रह यांच्या आहारी जाऊन आपल्याच पायावर धोंडा पाडून घेत आहे. आणि हजार वर्षापूर्वीच्या सामाजिक स्थितीत उपयोगी पडणाऱ्या पण आता कालबाह्य ठरलेल्या जुन्या नियमांचा व्यर्थ उदोउदो करीत आहे, हे त्यांना दिसून आले. सर्व जगात मान्यता पावलेल्या बँक या आर्थिक संस्थेला विरोध करणे हा मूर्खपणा असुन बँक काढणे हेच इस्लामच्या हेतुशी अधिक सुसंगत आहे. असे आपले म्हणणे त्यांनी चिकाटीने व परिश्रमाने मुस्लिम समाजाच्या गळी उतरविले व मुस्लिम बँक सुरू केली.[210]

धर्म व भाषा यांची घातली जाणारी सांगड ही त्यांना चुकीची वाटे. दाऊदी बोहरा समाजाने व्यावहारिक शहाणपण दाखवून गुजराती भाषेचा स्वीकार केला होता. एवढेच नव्हे तर पारशी समाजा प्रमाणे स्वतःची एक शैली देवून गुजराती भाषा समृध्द संपन्न केली होती. अशा स्थितीत आंधळेपणाने आपला हा गुजराती भाषेचा शतकाचा वारसा सोडून उर्दूकडे वळणे चुकीचे आहे असे महंमद अली अलाबक्ष यांना वाटत असे. त्यांनी भाषेबाबत आंधळेपणा स्विकारला नाही.[211]

शेख मोहिमुद्दीन अहमंद ही व्यक्ती व्यवसायाने शिक्षक होती त्यांच्या मते सामाजिक सुधारणांची उपेक्षा करून मुसलमान स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतात. महाराष्ट्रातील मुसलमानांनी प्रादेशिक भाषा मराठीचा उमदेपणाने स्वीकार करावा असे ते म्हणत. मराठी भाषेचा वापर केला व मराठी पोशाख केला तर इस्लामला इजा

पोहचते ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. त्यामुळे ते अस्सल मराठी बोलत, लिहित आणि धोतर, कोट, टोपी असाच पोशाख नेहमी वापरत.[212]

शिक्षणाच्या माध्यमाबद्दल त्यांचे मत पुढीलप्रमाणे होते, ‘‘उर्दू भाषेचा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकार केल्यामुळे उपलब्ध होणाऱ्या स्थानिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोईंना मुसलमान समाज वंचित होतो. उर्दू शाळा म्हणजे मुसलमानांची वेगळी शाळा असा अर्थ होतो. त्यामुळे बालपणापासुनच एक चमत्कारिक मनोगंड मुस्लिमांमध्ये निर्माण होतो. त्यामुळे तो समाज जीवनाच्या व्यापक प्रवाहा पासून वेगळा पडतो.’’[213]

इस्लाम विषयी त्याचे मत पुढीलप्रमाणे होते ‘‘इस्लामचे परिपालन म्हणजे इतर समाजापासून वेगळे होणे नव्हे. धर्म ही वैयक्तीक बाबच राहिली पाहिजे. मुस्लिम स्त्रियांनी बुरखा पध्दतीचा त्याग करावा, आधुनिक शिक्षणाचा लाभ घ्यावा.’’[214]

मुस्लिम समाजाने उर्दू या भाषेच्या पाठीमागे न धावता प्रादेशिक भाषेचा मोकळ्या मनाने स्विकार केला पाहिजे. तसेच स्त्रियांनी त्यांचे हक्क मिळविण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब आहे व ती खाजगीच राहिली पाहिजे. अशा प्रकारची आधुनिक विचारसरणी शेख मोहियुद्दीन अहमद यांची होती. थोडक्यात यावरून आपणास असे दिसून येते की शेख मोहियुद्दीन अहमद हे आधुनिक विचार प्रवाहाचे असलेले दिसतात.

आधुनिक विचारवंत असगर वजाहत लिहितात की ‘‘प्रत्येक धर्माची स्वतः संरचना व इतिहास असतो. तेराशे वर्षापूर्वी निर्माण झालेल्या या धर्मामध्ये ज्याचे सर्व नियम लिखित स्वरूपात आहेत त्याची तुलना अडीच तीन हजार वर्षापूर्वी निर्माण झालेल्या धर्म परंपरेशी कशी करता येईल या कारणामुळे आजचा भारतीय मुसलमान मागास आहे. सामाजिक स्वरूपाचे कोणतेही आंदोलन किंवा चळवळ नसल्यामुळे मुस्लिम समाज जेवढा गतीशील असावयास हवा तेवढा झाला नाही.’’[215] थोडक्यात आजच्या मुस्लिम समाजामध्ये सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अतिशय धिमेपणाने चालली आहे असे असगर वजाहत यांचे मत आहे. यावरून ते आधुनिक विचार प्रवाहातील असलेले दिसतात.

असगर अली इंजिनियर यांनी तर शरियतवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते ‘‘शरियत मधील निर्माण प्रक्रियेत मानवाचे जे काही योगदान आहे, त्याला अपरिवर्तनीय समजणे दूरच राहो त्याला पवित्र सुध्दा समजणे ठीक नाही. मुस्लिम विचारवंतानी आजची सामाजिक लोकव्यवस्था, आचार विचार आणि व्यवहाराचे ही भान ठेवावयास हवे. विशेषतः 21 व्या शतकामध्ये आपण प्रवेश केला आहे. आपल्या वर्तमानकालीन धर्म विचारांवर भविष्यकाळाचा प्रभाव पडावयास हवा यासाठी इस्लामला सरंजामशाहीतून मुक्त

करावयास हवे आणि प्रगतीशील आत्म्याचे प्रत्यारोपण करून त्याला संपन्न केले पाहीजे. एकीकडे नवी आधुनिक प्रणाली गतीने स्विकारली जात आहे तर दुसरीकडे कोणत्याही नव्या विचाराला विरोध करण्याची भूमिका ठरवली जात आहे.''[216] यावरून असे म्हणता येईल की इस्लामने परिवर्तन स्वीकारले पाहिजे हा इंजिनिअर यांच्या विचारांचा गाभा होय.

रफीक झकेरिया यांच्या मते ''हिंदू-मुस्लिम संबंधातील नकारात्मक पैलूनांच वारंवार सामोरे आणले गेले आहे. त्यामुळेच हिंदु-मुस्लिमांच्या मनात परस्परांविषयी तिरस्काराचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही समाजांनी परस्परांना समजून घेणे आवश्यक आहे. मनात तिरस्कार ठेवला तर केवळ नुकसान होईल त्यामुळे देश कमजोर, कमकुवत बनेल. दोन्ही समाजांमध्ये विश्वासाचे वातावरण तयार होऊ लागल्यानंतर साहचर्य वाढेल. या सहयोगातून राष्ट्र प्रकाशाच्या दृष्टीने वाटचाल करू लागेल.''[217]

रिजवान कैसर यांनी मौलाना आझाद यांच्या एका विधानाची आठवण करून दिली आहे. ''मी आपणास असा कधीही सल्ला देणार नाही की तुम्ही सरकारकडून प्रमाणपत्र घ्यावे किंवा तशी अपेक्षा करावी. मी आपणास हा सल्ला देतो की एकत्रित भारतीय जीवनाच्या उन्नतीसाठी तुम्ही जे काम केले आहे ते आठवा, तुम्ही जे केले तो संपन्न वारसा आपण स्विकारायला हवा. कारण त्यावर आपली छाप आहे. म्हणून तुम्ही जो पर्यंत बाहेर पडण्याची इच्छा करित नाही तो पर्यंत कोणीही तुमच्यावर सक्ती करण्याची हिम्मत करणार नाही. आपण सर्वजण शपथ घेवू या की हा देश आमचा आहे. आणि या देशाच्या भल्यासाठी आपण आहोत. भारताचे भविष्य मुस्लिमांच्या योगदाना व्यतिरिक्त अपुरे आहे.''[218]

रिजवान कैसर पुढे असे म्हणतात ''जे राजकीय वातावरण आणि परिस्थिती या देशात या क्षणी आहे. त्यामध्ये मुसलमानांशी संबंधीत अनेक समस्या आहेत. असे असले तरी परकेपणाची भावना वाढीस लागू देणे नुकसानीचे आहे. इतरांसारखे मुसलमानांनी ही आपल्या मायभूमीसाठी पुढे यायला हवे कारण समाजाचे हित राष्ट्राच्या हिताशी जोडलेले असते.''[219] यावरून आपणास असे म्हणता येईल की जर एखाद्या समाजाचे नुकसान झाले तर पर्यायाने ते राष्ट्राचे नुकसान असते. हा आशय उपरोक्त विवेचनावरून दिसून येतो.

नेसार अहमंद यांनी ''भारतीय मुसलमान सामाजिक व आर्थिक स्थिती'' या लेखात मुस्लिम महिलांच्या संदर्भात आपले विचार मांडले आहेत. त्यामध्ये ते म्हणतात, ''आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी सामाजिक व आर्थिक स्तर सुधारण्यासाठी या समाजातील लोकांनी पुढे यायला हवे. यामध्ये मुस्लिम राजकीय नेते व धार्मिक नेत्याची भूमिका महत्वपूर्ण आहे. शिक्षणामध्ये मुसलमान विशेषतः मुस्लिम महिलांना रोजगाराच्या भागीदारामध्ये

समाविष्ट करून घ्यावयास हवे. त्याच बरोबर महिलांवर लादलेल्या अनिष्ठ प्रथा परंपरा आणि धार्मिक बंधनापासून मुक्त करावयास हवे. मुस्लिम समाजातील तरूण, तरूणींनी इतर धर्मीयांच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावयास हवे यामुळे मुस्लिम समाजाची प्रगती होईल. याकामी मुस्लिम राजकीय नेते, धार्मिक नेते यांनी मुस्लिमांना आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान, नवी संधी याविषयी जागृत करून त्यापासून मिळणारे फायदे घेण्यास प्रवृत्त करून सक्षम बनावयास हवे."[220]

एस. वाय. कुरेशी आपल्या 'इस्लाम, मुसलमान आणि कुटुंब नियोजन' या लेखात लहान कुटुंबाच्या समर्थनाची बहुपत्नीत्वाच्या विरोधाची भूमिका मांडतात. त्याच्या मते "काळाच्या बरोबर धावत असताना काही बाबीं संदर्भात गांभिर्याने पुर्नविचार करण्याची वेळ आली आहे. जे मुसलमान आपण असुरक्षित आहोत या नावाखाली अधिक मुले हवीत अशा तऱ्हेचा युक्तीवाद करत असतील तर ते चूक आहे. आज संपूर्ण विश्वातील मुस्लिम समाजाचा विचार केला तर एक बाब स्पष्टपणे जाणवते की हा समाज कुटुंब नियोजन, परिवार नियंत्रण या संदर्भात गांभीर्याने व सकारात्मक पध्दतीने विचार करत आहे. कुटुंब नियोजन, लोकसंख्या नियोजन या बाबींची आवश्यकता या समाजाला पटू लागली आहे."[221]

अतहर फारूकी आपल्या 'मुस्लिमांच्या विकासासाठी इस्लामची नवी व्याख्या अनिवार्य आहे' या लेखामध्ये म्हणतात "आपल्या देशात मिश्र संस्कृती असल्यामुळे तीव्र गतीने भाषेमध्ये परिवर्तन होते. आम्ही आपल्या संस्कृती, शैक्षणिक, भाषिक, समस्यांना वेगवेगळ्या पातळीवरून पाहू नये कारण त्यांची मूळे एकमेकात गुरफटलेली आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी व्यावहारिक पातळीवर संयुक्तपणे प्रयत्न करावयास हवेत. मुस्लिम व्यक्तीगत कायद्याचा ठेका घेणाऱ्या काही ठेकेदारांना इस्लामचे प्राथमिक ज्ञानही नाही. या कायद्यामुळे (शरीया) निर्माण झालेल्या नवनव्या अडचणींना ते कसे सामोरे जाणार ? या कायद्याने अगोदरच हतबल झालेल्या मुस्लिमांच्या समस्या अधिकच वाढत आहेत. इस्लामच्या नियमावलीचे पुस्तक आकाशातून आलेले नाही. काळाच्या आवश्यकतेनुसार व्यावहारिक जीवनाला मार्ग दाखविण्याचे काम या पुस्तकातून होते."[222]

**निष्कर्ष :-** विज्ञानवादाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे माणूस आपली बुध्दी धर्मश्रध्दांकडे गहाण न ठेवता स्वतंत्र विचार करू लागतो आणि नवनवीन माहिती व तंत्रज्ञान शोधून काढतो. या सर्वांसाठी तो असंख्य वेळा प्रयोग करतो आणि येणारे निष्कर्ष वैज्ञानिक नियमांच्या माध्यमातून स्वीकारतो. विज्ञानवादी दृष्टीकोनामुळे यंत्रसंस्कृतीचा विकास होतो. वैज्ञानिक नियम सत्यतेच्या कसोटीवर उतरतात. आज माणसाचे पाऊल आकाश गंगेच्या दुसऱ्या टोकाकडे जात आहे. मानव निर्मित याने शनि, मंगळ नव्हे तर सूर्यमालेच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन पोहचली

आहेत. या सर्वांतून मानव जातीचे भविष्य मंगलमय होणार आहे आणि मानव जातीचा ऐहिक अभ्युदय होण्यास मदत होत आहे. एक निरोगी जीवनशैली विज्ञानवादी दृष्टीकोनाचा स्वीकार केल्यामुळे मानवाला उपलब्ध होत आहे. वेगवेगळ्या रोगांवर नवनवीन औषधे बाजारामध्ये आज उपलब्ध होत आहेत. त्याचे कारण देखील विज्ञानवाद हेच आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार केल्यानंतर आपण म्हणू शकतो की विज्ञानवादी विचारांच्या स्वीकारामुळेच मनुष्य सुखी होईल. या सर्व बाबींसाठी विज्ञान वादाची मनुष्यजातीला गरज आहे नव्हे तर ती त्याची आवश्यकता सुध्दा आहे. धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व इहवाद या कल्पनांचा जगभर सर्वत्र स्वीकार झाला याचे साधे, सोपे कारण आहे की जगातील इस्लामेत्तर धर्म आपणामध्ये सुधारणांना वाव आहे असे मानतात. युरोप व हिंदुस्थानात प्रबोधनाची दीर्घ परंपरा आहे. परंतु दुर्दैवाने इस्लामला ती परंपरा नाही आणि इस्लाममध्ये कुराणापलिकडे काही नाही हा जो दुराग्रह दिसून येतो त्याचाच दुष्परिणाम इस्लाममध्ये या तत्वाचा जाणीवपूर्वक स्वीकार केला गेला नाही.

आजच्या युरोपच्या प्रगतीचे रहस्य इहवादी परंपरेत लपलेले आहे असे म्हणणे अनुचित होणार नाही बुध्दीप्रामाण्यवाद, विवेक स्वातंत्र्य, प्रवृत्तीपरता, धर्माची, इतिहासाची, परंपराची कठोर चिकित्सा करणारे, वेळप्रसंगी मृत्युदंड हसत स्विकारणारे तत्वज्ञ, शास्त्रज्ञ, कलावंत आणि लेखक युरोपमध्ये सदैव निर्माण होत राहिले म्हणूनच युरोप इहवादाचा स्विकार करू शकला आणि अंध धर्मसत्तेला त्याने फेकून दिले. गेल्या सहाशे वर्षाचा युरोपचा इतिहास हा प्राधान्याने अंध धर्मश्रध्दा व धर्मसत्ता या बरोबर इहवादाच्या संघर्षाचाच इतिहास आहे.

मध्ययुगीन भारतीय समाजाचे स्वरूप व जडण घडण यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यात एक सामाजिक शक्ती म्हणून सूफी पंथाने महत्वाची भूमिका बजावली. शांततामय व अहिंसक मार्गांनी इस्लाममध्ये धर्मांतर घडवून आणण्यास उत्तेजन देवून सूफींनी मुस्लिम समाजाचे संख्याबळ वाढविले. मुस्लिमांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन घडविण्यात सूफींनी महत्वाची भूमिका बजावली. मुस्लिमांचे भारतीयकरण लवकरात लवकर घडून यावे यासाठी त्यांनी अनुकूल घटनांना चालना दिली. जीवनाकडे पाहण्याचा एक निरोगी व विवेकनिष्ठ दृष्टीकोन विकसित केला. हिंदू मुस्लिम यांच्यात समेट घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावली. थोडक्यात सूफींनी भारतात मानवतावादी व हिंदू-मुस्लिम यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. हिंदू-मुस्लिमांच्या आचार विचारांची देवाण घेवाण होवून एक संमिश्र संस्कृती उदयास आली. परस्पराबद्दलची व्देष भावना कमी होवून दोन्ही धर्माच्या समाजात समन्वय निर्माण झाला.

पहिल्या महायुध्दानंतर उध्वस्त झालेला, अस्मिता विसरलेल्या आणि अपमानित झालेल्या तुर्कस्थानात नवचैतन्याचे वारे निर्माण करून नवराष्ट्राची निर्मिती करणारा म्हणून कमाल पाशाचे नाव जगाच्या इतिहासात

अजरामर झाले. कमाल पाशाने मातृभूमीवरच्या आपल्या प्रेमातून निराश झालेल्या तुर्की तरूणात जागृतीचे कार्य केले. राष्ट्रप्रेमाची ज्योत त्यांच्या मनात निर्माण केली. अत्यंत कठीण परिस्थितीत देशाचे नेतृत्व कमालने आपल्याकडे घेतले. देशात नैराश्याची लाट पसरली होती. सेव्हरेस तहाने तुर्कस्थानच्या प्रदेशाची चिरफाड केली होती. त्याच वेळी देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी कमालने आपल्या अंगावर घेतली. त्याने लोकात राष्ट्रप्रेम निर्माण केले. स्वत्व आणि स्वाभिमान तुर्कांच्या अंतःकरणात रूजविला. तुर्की परंपरा सुदृढ करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक होत्या, त्या कमाल पाशाने विरोधकांची पर्वा न करता केल्या. आधुनिक वैज्ञानिक युगात उद्योग व्यवसाय, वाहतुकीची साधने, कृषी विस्तार, लष्करीकरण, आरमार अशासारखे योजनाबध्द कार्यक्रम हाती घेवून राष्ट्राची उन्नती केली. कारागीर, व्यापारी आणि मजूर वर्ग या सर्व वर्गात सहकार्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्योत्तर भारतीय मुस्लिम विचारवंताच्या विचाराचा हा धावता आढावा घेतल्यावर आपण या निष्कर्षप्रत पोहचतो की आधुनिक हिंदी मुस्लिम विचारवंत धर्माच्या पलीकडे पाहू लागले आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब म्हणून स्विकारण्यास त्यांची काहीही हरकत नाही परंतु धर्माच्या नावाखाली कर्मठ, पुरातन, रूढी व परंपरा जपण्यास त्यांचा विरोध आहे. एवढेच नव्हे तर इतिहासाकडे पाहण्याची त्याची दृष्टीही वेगळीच आहे. अनिष्ठ रूढी परंपरामुळे मुस्लिम समाजाला वारंवार शिकार व्हावे लागते, त्या सर्व परंपराचा मुस्लिम विचारवंतानी धिक्कार केलेला दिसतो. जागतिकीकरणाच्या या लाटेमध्ये आज धर्मापेक्षा अर्थशास्त्र महत्वाचे ठरले आहे. त्याचेच प्रतिबिंब प्रस्तुत विचारवंतांच्या लेखनात पडलेले आपणास दिसून येते.

मुस्लिमांचे मागासपण, बेरोजगारी, जातीय मनोवृत्ती, तलाक समस्या, बहुपत्नीत्व समस्या, फुटीर प्रवृत्ती, धर्मांधता, शैक्षणिक मागासलेपण, उर्दू भाषेचा अतिरेकी आग्रह, कुटुंब नियोजना बाबत अज्ञान स्वतःच्या कोषात रमण्याची प्रवृत्ती, बुरखा पध्दती इत्यादी बाबीवर खुल्या मनाने विचार व्यक्त करणारी हिंदी मुस्लिम विचारवंताची पिढी आज पुढे येत आहे व मुस्लिम समाजाला प्रबोधनाच्या दिशेने पुढे घेऊन जात आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची**


1. सहस्त्रबुध्दे पु. ग. 'इहवादी शासन', केसरी प्रकाशन, पुणे 26 जानेवारी 1972, पृ. क्र. 95.
2. बाळ प्रकाश, बेडकीहाळ किशोर (संपा.) - 'धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती', अक्षर प्रकाशन सातारा 3 री आवृत्ती सप्टेंबर 2004 पृ. क्र. 26.

3. वैद्य भाई - 'धर्मनिरपेक्ष', सामाजिक समता परिषद पुणे 1993 पृ. क्र. 30.

4. कित्ता पृ. क्र. 38.

5. कित्ता पृ. क्र. 71.

6. गायकवाड प्रदीप (संपा.) - 'भारताचे संविधान' प्रकाशक गायकवाड प्रदीप नागपुर नववी आवृत्ती 2006 पृ. क्र. 3.

7. सूर्यवंशी जी. एस. - 'धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता' प्रयत्न प्रकाशन औंदुबर, प्रथम आवृत्ती 1989 पृ. क्र. 137.

8. बेन्नुर फकरूद्दीन - 'धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?' भूमी प्रकाशन 1991 लातूर पृ. क्र. 55.

9. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण - 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपळापुरे आणि कंपनी नागपूर दुसरी आवृत्ती जून 2003 पृ. 15.

10. कित्ता पृ. क्र. 411.

11. Mukhi H. R. - 'Modern Indian Political Thoughts' सुरजीत बुक डेपो दिल्ली 1970 - पृ. क्र. 4.

12. लो. टिळक लोकमान्य - सुक्ति संग्रह - केसरी प्रकाशन पुणे 1963 पृ. 173.

13. उपरोक्त Mukhi H. R. - Modern Indian Political Thoughts पृ. क्र. 46.

14. हुसैन आबिद - भारताची राष्ट्रीय संस्कृती - नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली - 1992 पृ. क्र. 71

15. उपरोक्त - भोळे भास्कर लक्ष्मण 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पृ. क्र. 678.

16. शास्त्री भक्तराज - 'आधुनिक हिंदी काव्य और संस्कृति' - चंद्रलोक प्रकाशन कानपुर 1996 पृ. क्र. 103.

17. कित्ता पृ. क्र. 103.

18. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड VIII महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1979 पृ. क्र. 30.

19. Hassnain S. E. - 'Indian Muslims Challenge & Opportunity', Lalvani Publishing House Bombay 1968 P.N. 25.

20. कुरूंदकर नरहर - 'जागर' देशमुख आणि कंपनी पुणे जानेवारी 1969 पृ. क्र. 167.

21. कित्ता पृष्ठ क्र. 168.

22. बाईबल सोसायटी ऑफ इंडिया 'नवा करार' दी गाईडोन्स इंटरनॅशनल सिकंदराबाद 2007 पृ. क्र. 30.
23. बेडकीहाळ किशोर, बाळ प्रकाश (संपा.) 'धर्म आणि राजकारण - विपर्यास आणि वस्तुस्थिती' अक्षर प्रकाशन सातारा सप्टेंबर 2004 पृ. क्र. 25.
24. कित्ता पृ. क्र. 26.
25. उपरोक्त गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान' पृ. 216.
26. दरेकर समीर - 'धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेला सुरूंग', अभिनव निर्माण प्रकाशन पुणे ऑक्टोबर 2009 पृ. क्र. 143-144.
27. उपरोक्त भोळ भा. ल. - 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पृ. क्र. 677.
28. कित्ता पृ क्र. 678.
29. उपरोक्त गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान' पृ. क्र. 3.
30. उपरोक्त शास्त्री भक्तराज - 'आधुनिक हिंदी काव्य और संस्कृति' पृ. क्र. 103-104.
31. पळशीकर सुहास - 'जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही', प्रतिमा प्रकाशन पुणे जानेवारी 2006 पृ. क्र. 62.
32. कित्ता पृ. क्र. 62.
33. कुरूंदकर नरहर - 'शिवरात्र' साधना प्रकाशन पुणे नोव्हेंबर 1970 पृ. क्र. 144.
34. Oxford Dictionary - Ashok Prakashn Delhi 2000, P. N. 349.
35. उपरोक्त गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान' पृ. क्र. 216.
36. उपरोक्त कुरूंदकर नरहर - 'जागर' पृ. क्र. 181.
37. Kalam A. P. J. - India 2020 Introductory Page.
38. उपरोक्त गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान' पृ. क्र. 209.
39. कित्ता पृ. क्र. 216.
40. कित्ता पृ. क्र. 217.
41. सूर्यवंशी जी. एस. - 'धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता', प्रयत्न प्रकाशन औदुंबर प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 1989 पृ. क्र. 153.

42. रेगे मे. पु. (संपा.) मराठी विश्वकोश खंड XVI महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई 1999 पृ. क्र. 982.

43. चौबळ बा. मो - 'विज्ञान आणि संस्कृती', महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर प्रथम आवृत्ती जुन 1961 पृ. क्र. 28.

44. कित्ता पृ. क्र. 29.

45. उपरोक्त विश्व रेगे मे पुं. (संपा.) मराठी विश्वकोश खंड XVI पृ. क्र. 983.

46. कित्ता पृ. क्र. 964.

47. डॉ. वाड विजया (संपा.) मराठी विश्वकोश खंड XVII महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 2007 पृ.क्र. 290.

48. कित्ता पृ. क्र. 299.

49. सावरकर वि. दा. - 'समग्र सावरकर वाङ्मय खंड VIII' महाराष्ट्र प्रांतिक हिंदू सभा पुणे प्रथम आवृत्ती 1964 पृ. क्र. 394.

50. सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन', केसरी प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 1972 पृ. क्र. 110.

51. कित्ता पृ. क्र. 97.

52. जोशी प्र. न. - 'विज्ञान उदय आणि विकास', सन प्रकाशन पुणे 1989 पृ. क्र. 159.

53. कित्ता पृ. क्र. 163.

54. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. 'इहवादी शासन' पृ. क्र. 99.

55. उपरोक्त चौबळ बा. मो. 'विज्ञान आणि संस्कृती' पृ. क्र. 83.

56. दलवाई हमीद - 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन पुणे 2002 पृ. क्र. 47.

57. उपरोक्त सावरकर वि. दा. - 'समग्र सावरकर वाङ्मय खंड III', पृ. क्र. 419.

58. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड VIII, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई 1979 पृ. क्र. 814-815.

59. उपरोक्त चौबळ बा. मो. - 'विज्ञान आणि संस्कृती' पृ. क्र. 59.

60. 'वैज्ञानिक दृष्टिकोण' महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती प्रथम आवृत्ती फेब्रुवारी 1993 पृ. क्र. 3-4.

61. सईद इब्राहिम - ‘इस्लाम समज, गैरसमज’ इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 7-8.

62. आठवले सदाशिव - ‘चार्वाक इतिहास आणि तत्वज्ञान’, प्राज्ञपाठ शाळा मंडळ वाई 1980 पृ. क्र. 42.

63. उपरोक्त चौबळ बा. मो. - ‘विज्ञान आणि संस्कृती’ पृ. क्र. 92-93.

64. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - ‘इहवादी शासन’ पृ. क्र. 96.

65. उपरोक्त भोळे भा. ल. - ‘आधुनिक भारतातील राजकीय विचार’ पृ. क्र. 24.

66. कित्ता पृ. क्र. 24.

67. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड II महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1976 पृ. क्र. 508.

68. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - ‘इहवादी शासन’ पृ. क्र. 2.

69. कित्ता पृ. क्र. 2.

70. उपरोक्त गायकवाड प्रदीप - ‘भारताचे संविधान’ पृ. क्र. 217.

71. शिंदे ज. रा. डॉ. - ‘भारतीय प्रबोधनकार’, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती 1987 पृ. क्र. 175.

72. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - ‘इहवादी शासन’ पृ. क्र. 13.

73. गर्गे स. म. - ‘भारतीय समाज विज्ञान कोश’ समाज विज्ञान मंडळ पुणे 1986 पृ. क्र. 19.

74. रेगे मे. पु. (संपा.) मराठी विश्वकोश खंड IX महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1980 पृ. क्र. 913-914.

75. कित्ता पृ. क्र. 914-915.

76. उपरोक्त सहस्त्रबुधे पु. ग. - ‘इहवादी शासन’ पृ. क्र. 130.

77. सावरकर वि. दा. - ‘विज्ञाननिष्ठ निबंध खंड 1 व 2’, रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर ऑगस्ट 2013 पृ. क्र. 200.

78. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - ‘इहवादी शासन’ पृ. क्र. 132, 133, 135, 136.

79. सूर्यवंशी जी. एस. - ‘धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता’, प्रयत्न प्रकाशन औदुंबर 1989 पृ. क्र. 131.

80. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवाद शासन' पृ. क्र. 131.

81. सारथी अरूण - 'भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने', रविराज प्रकाशन पुणे मार्च 1993 पृ. क्र. 117.

82. कित्ता पृ. क्र. 121.

83. उपरोक्त सूर्यवंशी जी. एस. - 'धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता' पृ. क्र. 130.

84. उपरोक्त सारथी अरूण - 'भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने' पृ. क्र. 121.

85. कित्ता पृ. क्र. 122.

86. कित्ता पृ. क्र. 123.

87. उपरोक्त सूर्यवंशी जी. एस. - 'धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता' पृ. क्र. 158.

88. उपरोक्त सारथी अरूण - 'भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने' पृ. क्र. 122.

89. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृ. क्र. 94-95.

90. कित्ता पृ. क्र. 95.

91. कित्ता पृ. क्र. 94.

92. कित्ता पृ. क्र. 94.

93. कित्ता पृ. क्र. 95.

94. उपरोक्त सारथी अरूण - 'भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने' पृ. क्र. 124.

95. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवाद शासन' पृ. क्र. 95.

96. कित्ता पृ. क्र. 96.

97. शर्मा एल. पी. - 'मध्यकालीन भारत का इतिहास' विनोद प्रकाशन मंदिर आगरा 1975 पृ. क्र. 343.

98. वकील अलीम - 'सूफी संप्रदायाचे अंतरंग', प्रतिमा प्रकाशन पुणे 2000 पृ. क्र. 13.

99. कित्ता पृ. क्र. 17.

100. डॉ. कादीर गुलाम - 'कुराण और हदीस के रोशनी में', इस्लामी मरकजा पब्लिशर्स दिल्ली 1994 पृ. क्र. 36-37.

101. कित्ता पृ. क्र. 54.

102. कित्ता पृ. क्र. 60, 61, 62.

103. डॉ. देशपांडे अ. ना. - 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', व्हीनस प्रकाशन पुणे 1973 पृ. क्र. 97.

104. कित्ता पृ. क्र. 98.

105. कित्ता पृ. क्र. 98.

106. मिश्र दुर्गाशंकर - 'नीरज का काव्य एक विश्लेषण', हिंदी साहित्य भंडार लखनऊ 1985 पृ. क्र. 123.

107. डॉ. जैन विमलकुमार - 'सूफी मत और हिंदी साहित्य', हिंदी अनुसंधान परिषद दिल्ली 1955 पृ. क्र. 30.

108. व्दिवेदी हजारी प्रसाद - 'मध्यकालीन धर्म साधना' साहित्य भवन इलाहाबाद 1952, पृ. क्र. 249-250.

109. कित्ता पृ. क्र. 250.

110. पगडी सेतुमाधवराव - 'सूफी सांप्रदाय तत्वज्ञान आणि कार्य', परचुरे प्रकाशन मुंबई 1993 पृ. क्र. 106.

111. कोलारकर श. गो. - 'भारताचा इतिहास', मंगेश प्रकाशन नागपुर 2003 पृ. क्र. 414.

112. कित्ता पृ. क्र. 415.

113. उपरोक्त देशपांडे अ. ना. 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास' पृ. क्र. 96.

114. उपरोक्त वकील आलीम - 'सूफी संप्रदायाचे अंतरंग' पृ. क्र. 133.

115. कित्ता पृ. क्र. 134.

116. मेहता जे. एल. 'मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास' खंड तिसरा के. सागर पब्लीकेशन 2010 पृ. क्र. 128.

117. उपरोक्त वकील अलीम - 'सूफी संप्रदायाचे अंतरंग' पृ. क्र. 34-35.

118. उपरोक्त मेहता डी. एल. - 'मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास', खंड ३ पृ. क्र. २२९.

119. कित्ता पृ. क्र. 230.

120. कित्ता पृ. क्र. 130.

121. कित्ता पृ. क्र. 131.

122. उपरोक्त वकील अलीम - 'सूफी संप्रदायाचे अंतरंग' पृ. क्र. 18.

123. उपरोक्त पगडी सेतूमाधवराव 'सूफी संप्रदाय तत्वज्ञान आणि कार्य' पृ. क्र. 98.

124. उपरोक्त देशपांडे अ. ना. - ‘प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास’ पृ. क्र. 100.

125. चिटणीस कृ. ना. - ‘मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था’ भाग - 2 समाज व संस्कृती पुणे 1987 पृ.क्र. 51.

126. उपरोक्त मेहता जे. एल. - ‘मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास खंड 3’ पृ. क्र. 131-132.

127. उपरोक्त चिटणीस कृ. ना. - ‘मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था’ भाग - 2 पृ. क्र. 51.

128. कित्ता पृ. क्र. 52.

129. देवधर स. कृ. (संपा.) ‘मुंडकोपनिषद व मांडूक्योपनिषद’ - प्रसाद प्रकाशन पुणे 1987 पृ. क्र. 89.

130. उपरोक्त चिटणीस कृ. ना. - ‘मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था’ भाग 2 पृ. क्र. 52.

131. कित्ता पृ. क्र. 53.

132. दीपककुमार, ‘मध्यकालीन भारत का संपूर्ण इतिहास’, राज पब्लिशिंग हाऊस, जयपूर, 2010 पृ. क्र. 69, 70.

133. उपरोक्त व्दिवेदी हजारी प्रसाद - ‘मध्यकालीन धर्म साधना’ पृ. क्र. 250.

134. कित्ता पृ. क्र. 249.

135. उपरोक्त वकील आलीम - ‘सूफी संप्रदायाचे अंतरंग’ पृ. क्र. 133.

136. आचार्य कृ. अ., आपटे भा. कृ., ‘मध्ययुगीन भारत’, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी साहित्य प्रसार केंद्र नागपूर 1978 पृ. क्र. 131.

137. उपरोक्त दीपक कुमार - ‘मध्यकालीन भारत का संपूर्ण इतिहास’ पृ. क्र. 71.

138. महाजन वी. डी. - ‘मध्यकालीन भारत’, एस. चंद अँड कंपनी दिल्ली 1990 पृ. क्र. 243.

139. कित्ता पृ. क्र. 243.

140. कित्ता पृ. क्र. 243.

141. आचार्य धनंजय - ‘भारताचा इतिहास’ साईनाथ प्रकाशन नागपुर 2004 पृ. क्र. 441.

142. उपरोक्त दीपक कुमार - ‘मध्यकालीन भारत का संपूर्ण इतिहास’ पृ. क्र. 71.

143. कित्ता पृ. क्र. 72.

144. कित्ता पृ. क्र. 72.

145. उपरोक्त महाजन वी. डी. - 'मध्यकालीन भारत' पृ. क्र. 244.

146. मेहता जे. एल. - 'मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास खंड 3' पृ. क्र. 237-238.

147. जोगळेकर ज. द. - 'निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार' राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1 ऑगस्ट 1980 पृष्ठ - 73.

148. अमीन सय्यद - 'अतातूर्क गाजी केमाल पाशा' - अमीन अहमद 1942 पृ. क्र. 24-25.

149. उपरोक्त जोगळेकर ज. द. - 'निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार' पृ. 73.

150. उपरोक्त अमीन सय्यद - 'अतातुर्क गाजी केमालपाशा' पृ. क्र. 127.

151. कित्ता पृ. क्र. 228-229.

152. कोलारकर श. गो. - 'आधुनिक जग', मंगेश प्रकाशन नागपुर प्रथम आवृत्ती 2001 पृ. क्र. 230.

153. कित्ता पृष्ठ क्रं. 232.

154. कित्ता पृष्ठ क्रं. 238.

155. जोशी पी. जे. - 'आधुनिक जग', विद्या प्रकाशन नागपूर 2000 पृ. क्र. 546, 547.

156. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड VII महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ मुंबई 1977 पृ. क्र. 407-408.

157. फडके श्री. रा., गायकवाड रा. ज्ञा, कोलारकर श. गो. - 'अर्वाचीन जगाचा इतिहास' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर 1979 पृ. क्र. 319.

158. खुराना के. एल., शर्मा आर. सी. - 'विश्व का इतिहास', लक्ष्मीनारायण अग्रवाल आगरा 2007 पृ. क्र. 261.

159. उपरोक्त जोशी पी. जी. - 'आधुनिक जग' पृ. क्र. 549-550.

160. उपरोक्त फडके श्री. रा., गायकवाड रा. ज्ञा., कोलारकर श. गो. 'अर्वाचीन जगाचा इतिहास' पृ. 321.

161. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड IV महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ मुंबई 1976 पृ. 236-237.

162. उपरोक्त कोलारकर श. गो. - 'आधुनिक जग' पृ. क्र. 243.

163. कित्ता पृ. क्र. 245.

164. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड 4 पृ. क्र. 236-237.

165. उपरोक्त सय्यद अमीन - 'अतातूर्क गाजी कमाल पाशा' पृ. क्र. 221.

166. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड IV पृ. क्र. 237.

167. उपरोक्त कोलारकर श. गो. - 'आधुनिक जग' पृ. क्र. 238-239.

168. उपरोक्त जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड IV पृ. क्र. 238.

169. उपरोक्त सय्यद अमीन - 'अतातूर्क गाझी कमालपाशा' पृ. क्र. 221-222.

170. उपरोक्त कोलारकर श. गो. - 'आधुनिक जग' पृ. क्र. 242-243.

171. उपरोक्त सय्यद अमीन - 'अतातूर्क गाझी कमालपाशा' पृ. क्र. 222-223.

172. उपरोक्त कोलारकर श. गो. - 'आधुनिक जग' पृ. क्र. 238..

173. कित्ता पृ. क्र. 239.

174. पगडी सेतुमाधवराव - 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध' परचुरे प्रकाशन मुंबई 1986 पृ. क्र. 2.

175. कुरूंदकर नरहर - 'जागर' - देशमुख आणि कंपनी जानेवारी 1969 पृ. क्र. 235.

176. सूर्यवंशी अ. प. (अनु.) - 'इस्लामची जीवन पध्दती' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई प्रथम आवृत्ती 1976 पृ.क्र. 3-4.

177. उपरोक्त, सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृष्ठ क्र. 177.

178. अहमद अजीज - 'स्टडीज इन इस्लामिक कल्चर इन इंडियन इन्व्हारमेंट' पृ. क्र. 92.

179. उपरोक्त, सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन'पृ. क्र. 177.

180. सारथी अरूण - 'हिंदू मुस्लिम वैमनस्याची ऐतिहासिक मीमांसा' अस्मिता प्रकाशन पुणे, सप्टेंबर 2003, पृष्ठ क्र. 65.

181. उपरोक्त - पगडी सेतुमाधवराव - 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध' पृ. क्र. 19.

182. उपरोक्त अहमद अजीज - 'स्टडीज इन इस्लामिक कल्चर इन द इंडियन एनव्हिरान्मेन्ट' पृ. क्र. 139.

183. देशपांडे स. ह., लेले य. श. (संपा.) - 'भारताचा राष्ट्रवाद' कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे पृ. क्र. 200.

184. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृ. क्र. 180.

185. उपरोक्त कुरुंदकर नरहर - 'जागर' पृ. क्र. 240-241.

186. शर्मा शिवकुमार - 'हिंदी साहित्य, युग और प्रवृत्तियाँ', अशोक प्रकाशन दिल्ली 1996 पृ. क्र. 155.

187. नारंग गोपीचंद - 'अमीर खुसरो का हिंदवी काव्य', वाणी प्रकाशन दिल्ली 2002 पृ. क्र. 143.

188. सतीशचंद्र - 'मध्ययुगीन भारत', के. सागर पब्लिकेशन पुणे दूसरी आवृत्ती नोव्हेंबर 2010 पृ. क्र. 240.

189. कित्ता पृ. क्र. 240-241.

190. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव - 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध' पृ. क्र. 89.

191. कित्ता पृ. क्र. 33.

192. कित्ता पृ. क्र. 36.

193. देहवली अमर संपा. - 'इकबाल की शायरी' - स्टार पब्लिकेशन दिल्ली 1983 पृ. क्र. 102.

194. उपरोक्त पगडी सेतुमाधवराव - 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध' पृ. क्र. 35.

195. उपरोक्त देहवली अमर संपा. 'इकबाल की शायरी' - शायर के बारे में पृ. क्र. 2.

196. कित्ता पृष्ठ क्र. 2.

197. उपरोक्त कुरूंदकर नरहर - 'शिवरात्र' पृ. क्र. 94.

198. कित्ता पृ. क्र. 83-84.

199. कित्ता पृ. क्र. 171.

200. /en.wikipedia.org/wiki/mohammad hidaytullah

201. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृ. क्र. 206.

202. कित्ता पृ. क्र. 224.

203. जमादार हुसैन (संपा.) - 'मुस्लिम मनाचा कानोसा', मानसन्मान प्रकाशन पुणे फेब्रुवारी 1986 पृ. क्र. 24-25.

204. कित्ता पृ. क्र. 26.

205. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृ. क्र. 225.

206. बेन्नुर फक्रुद्दीन - 'आधुनिक भारतातील मुस्लिम राजकीय विचारवंताचे राष्ट्र विषयक चर्चा विश्व', पुणे विद्यापीठ फेब्रुवारी 2013 पृ. क्र. 31.

207. उपरोक्त सहस्त्रबुध्दे पु. ग. - 'इहवादी शासन' पृ. क्र. 204.

208. कित्ता पृ. क्र. 204.

209. उपरोक्त देशपांडे स. ह., लेले य. श. - 'भारताचा राष्ट्रवाद' पृ. क्र. 202.

210. उपरोक्त जमादार हुसैन - 'मुस्लिम मनाचा कानोसा' पृ. क्र. 17.

211. कित्ता पृ. क्र. 13.

212. कित्ता पृ. क्र. 13.

213. कित्ता पृ. क्र. 14.

214. कित्ता पृ. क्र. 14

215. शानेदीवान राजेखान (संपा) 'भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य', निर्मिती विचारमंच कोल्हापूर नोव्हेंबर 2008 पृ. क्र. 24-25.

216. चौसाळकर अशोक (संपा.) 'समाज प्रबोधन पत्रिका समाज' एप्रिल जून 2013 प्रबोधन संस्था पुणे पृ. क्र. 6-7.

217. उपरोक्त बेन्नुर फक्रुद्दीन - 'आधुनिक भारतातील मुस्लिम राजकीय विचारवंताचे राष्ट्र विषयक चर्चा विश्व' पृ. क्र. 212-213.

218. उपरोक्त शाने दीवान राजेखान (संपा.) 'भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य' पृ. क्र. 74.

219. कित्ता पृ. क्र. 74.

220. कित्ता पृ. क्र. 89.

221. कित्ता पृ. क्र. 96.

222. कित्ता पृ. क्र. 164.

# प्रकरण 4

# मुस्लिम सत्यशोधक चळवळ आणि हमीद दलवाई

**प्रास्ताविक :-**

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई हे स्वतःच मुस्लिम सुधारणा चळवळीची एक प्रमुख प्रेरणा होते.[1] जागतिक पातळीवर मुस्लिमांना चिकित्सावादी बनविण्याचे व भारतीय मुसलमानांना धर्मनिरपेक्ष प्रवाहात आणण्याचे स्वप्न पाहणारे हमीद दलवाई हे स्वतः मुसलमानांच्या प्रगतीला व विकासाला पडलेले एक दिव्य स्वप्न होते. पण हमीद दलवाईंचा संदेश न समजल्याने मुस्लिम समाज या स्वप्नाने हादरून गेला. आपला मूलभूत विचार जनसामान्य मुस्लिम समाजात उतरवून जनआंदोलन उभारू पाहणारे व आपल्या कार्यांच्या ओढीने झपाटलेले हमीद हा एक लोकविलक्षण व्यक्तीमत्वाचा माणूस होता. आपल्या पुरोगामी विचाराने मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्याचा ध्यास घेतलेला हा माणूस आपल्या प्रतिमेची जराही तमा न बाळगता हा सर्वसंचारी, अवलिया, स्वजन, कार्यकर्ते आणि परिचित काय, पण व्यक्तिशः कट्टर विरोधकांचा ही अस्सल मित्र होता.[2]

भारतातील मुस्लिम संस्कृतीने मला घडविले आहे. या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत त्याचा मला अभिमान आहे. आणि ज्या विद्रूप गोष्टी त्या बदलल्या पाहिजेत अशी भूमिका घेउन चळवळी उभारणाऱ्या हमीद दलवाईं यांचे योगदान महत्वाचे आहे. हमीद दलवाईंना अभिप्रेत असणारा विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, आधुनिक मानवी मूल्ये जोपासणारा समाज घडविण्यासाठी दीर्घ कार्यकाल लाभला नाही, तरीही जेमतेम दहा वर्षांच्या कालावधीत केलेल्या योगदानाची प्रेरणा पुढील शेकडो वर्षांसाठी उपयोगी पडणारी आहे.

## 4.1 जीवन वृत्तांत :-

हमीद उमर दलवाई यांचा जन्म कोकणात मुस्लिम समाजात 29 सप्टेंबर 1932 रोजी रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यातील मिरजोळी या खेड्यात झाला.[3] त्यांचे माध्यमिक शिक्षण चिपळुणमध्ये झाले. 1951 साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.[4] मुस्लिम समाजात जन्मलेल्या हमीद दलवाईंवर राष्ट्रसेवा दलाचे संस्कार बालपणीच झाले होते. समाजवादी चळवळीशीही त्यांचा घनिष्ठ असा संबंध आला होता. प्रतिष्ठीत घराणे, श्रीमंती, उच्च शिक्षण यासारखे कोणतेही भांडवल त्यांच्या जवळ नव्हते. दारिद्र्याशी झगडत स्वतःच्या व वडिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांनी अविश्रांत धडपड केली. मुंबईच्या इस्माईल युसुफ कॉलेज व रूपारेल कॉलेजात त्यांचे इंटरमिडीएट आर्टस् पर्यंतचे शिक्षण झाले. परंतु पुढे आर्थिक अडचणीमुळे ते पदवीचे शिक्षण पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे रूढ अर्थाने ते विव्दान नव्हते पण त्यांना तीक्ष्ण बुध्दिमत्तेची देणगी लाभली होती.

त्यांचा इतिहासाचा गाढा व्यासंग होता. सत्याला सामोरे जाण्यासाठी जे धाडस लागते ते त्यांच्या जवळ होते. हमीद दलवाई हे एक निर्भय वृत्तीचे आणि विधायक दृष्टीचे विचारवंत होते. आधुनिक दृष्टिकोण, समाजसुधारणेची तळमळ, धडपड, ईर्ष्या ही त्यांची वैशिष्ट्ये होती त्यांचा व्यासंग सखोल आणि व्यापक होता. अल्पशिक्षित असुनही त्यांना वाचनाची आवड होती. मराठी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते.

सन 1954 ते 1963 पर्यंत हमीद दलवाईं काही किरकोळ नोकऱ्या करत राहीले. पूर्वीपासून ते राष्ट्रसेवा दल व समाजवादी पक्षातर्फे राजकीय व सांस्कृतिक कार्य करीतच होते. दरम्यान, हमीद दलवाईंनी 'मौज', 'सत्यकथा', 'वसुधा' आदि नियतकालिकातून कथा लेखन केले होते. 'लाट' हा त्यांचा एकमेव कथासंग्रह सन 1960 साली साधना प्रकाशनाने काढला.[5] तसेच 'मौज' प्रकाशनातर्फे सप्टेंबर 1966 साली 'इंधन' ही त्यांची एकमेव कादंबरी प्रसिध्द झाली होती.[6] या कादंबरीवरून त्याकाळी मोठेच काहुर निर्माण झाले होते. कारण 'इंधन' कादंबरी व काही कथांना मुस्लिम समाजाची पार्श्वभूमी होती. 'इंधन' या आत्मकथनपर कादंबरीत कोकणातील एका गावात स्वातंत्र्योत्तर काळात वातावरण कसे बदलत गेले. आणि हिंदू-मुसलमान तणाव कसा वाढत गेला याचे संवेदनशील आणि वास्तव चित्रण त्यांनी केले होते. तसेच 'कफनचोर' या कथेमुळे हमीद दलवाईं सर्जनशील लेखक म्हणून प्रसिध्दीस आले.[7]

सन 1963 ते 1968 याकाळात हमीद दलवाईंनी 'मराठा'त पत्रकारिता केली.[8] सन 1968 नंतर मुस्लिम समाजसुधारणेचे पूर्णवेळ काम करण्यासाठी त्यांनी नोकरी सोडली. त्यांचे साहित्यलेखनही थांबले आणि समाज प्रबोधनाच्या कार्यासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. अत्याधुनिक विचारसणीचा पाठपुरावा करून समाजाला व देशाला सुधारण्याची आत्यंतिक तळमळ हे त्यांचे लक्षणीय विशेष होते. मात्र समाजसुधारणेचे कंकण बांधुन पुढे जाणाऱ्यांना प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागते. मानहानी सहन करावी लागते. हे सर्व सहन करण्याची मानसिक ताकद त्यांच्यात होती. तर्कशुध्द विचारपध्दती, प्रामाणिक भूमिका ही त्यांची ठळक वैशिट्ये होती. समाजपरिवर्तनासाठी आवश्यक ते समाजचिंतन हमीद दलवाईं जाणीवपूर्वक करीत असत. कोणतीही अंधश्रध्दा न स्वीकारणारे नवे बुध्दीवादी मन आणि त्या मनातील विचार जगासमोर ठेवण्यासाठी लागणारा बंडखोरपणा, निर्भयपणा हे त्यांचे सामर्थ्य होते.[9] हमीद दलवाईंनी भारतभर भ्रमण केले होते. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल अशा अनेक प्रांतातील मुसलमान समाजाची, विशेषतः स्त्रियांची परिस्थिती त्यांनी बघितली होती. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या.[10] भारतात धार्मिक एकात्मता निर्माण व्हावी असे स्वप्न पाहणारे हमीद दलवाईं म्हणजे भारतीय

समाजातील उगवता नवा विचार होते. जन्माने मुसलमान असलेले हमीद दलवाई अस्सल भारतीय होते. आधुनिक विचारसणीचे हमीद दलवाई समाजसुधारणेच्या कामात नेहमीच अग्रेसर होते. ते एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व होते.

हिंदू धर्माच्या तुलनेत इस्लाम एक संघटित व परंपरावादी धर्म मानला जातो. या समाजाच्या मागासलेपणाचे मुख्य कारण त्याचे आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण आहे. मुस्लिम समाजाला या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी व त्यांच्यामध्ये वैज्ञानिक आणि इहवादी दृष्टीकोन जोपासण्यासाठी व मुस्लिम समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच भारतीय मुस्लिम समाजाचे वास्तव चित्र माहित करून घेण्यासाठी हमीद भारतभर फिरले. या काळात त्यांना त्यांच्या या दौऱ्यासाठी 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम', 'आंतरभारती', 'कोल्हापूरचा कोरगांवकर ट्रस्ट', 'सेक्युलर फोरम', 'मराठा', 'मौज' इत्यादीनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले होते.[11] भारतात असलेले मुसलमान हे वेगवेगळ्या विचारसणीचे तसेच विविध व्यक्तिमत्वाचे आहेत व मुस्लिम समाज संघटित असल्याचा मुस्लिम नेतृत्वाचा दावा चुकीचा आहे, असे या दौऱ्यानंतर हमीद दलवाईंचे मत बनले होते. आणि त्यानंतर त्यांनी आपली विचारप्रणाली व भूमिका स्पष्टपणे मांडावयास सुरूवात केली. भारतात बहुसंख्याक असणाऱ्या हिंदूना हमीद दलवाई म्हणतात -

"ज्या हिंदूना मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे, ते हिंदूना सनातनी बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि ज्या हिंदूना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यायचे आहे. ते मुस्लिम जातीयवाद्यांना कवटाळून आहेत. हे दृश्य बदलले पाहीजे. मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूच्या मी बाजुचा आहे. पण हिंदुना सनातनी बनविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा मी विरोधक आहे.[12] त्याबरोबर हिंदूना आधुनिक बनवणाऱ्यांना माझा पाठिंबा आहे. परंतु मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे."[13] असे हमीद दलवाई म्हणत असत यावरून त्यांचा आपणास पुरोगामी विचार दिसुन येतो.

हमीद दलवाई एक लोकशाही समाजवादी कार्यकर्ते होते. त्यांच्यावर राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व काही प्रमाणात महात्मा गांधींचा प्रभाव होता.[14] एकंदर भारतीय समाजात व विशेषतः भारतीय मुस्लिमांत जी धर्म आणि राजकारण यांची गल्लत झाली आहे. तिच्यावर आघात करून त्या दोन्हींची फारकत हमीद दलवाईंना अभिप्रेत होती. तसेच सध्याच्या मुस्लिम जातीयवादाला भारतातील सर्वच राजकीय पक्ष जबाबदार आहेत. त्यांनी मतांच्या राजकारणासाठी मुस्लिमांचा जातीयवाद अप्रत्यक्षपणे पोसला आहे. असा विचार हमीद दलवाईंनी मांडला होता.[15]

हमीद दलवाईंच्या मते मुस्लिम मन हे कुराण, हदीस, पैगंबरांचे जीवन व इस्लामिक परंपरा यांच्या आधारे तयार झाले आहे. सनातनी व मूलतत्ववादी हे इस्लाममध्ये पूर्ण धर्म व परिपूर्ण समाज आहे असे मानतात.[16] त्यांच्या दृष्टीकोनातून महंमद पैगंबरांनी जो प्रयोग केला त्याचे फक्त अनुकरण करणे व कोणत्याही परिस्थितीत चिकित्सा न करणे हे आपले काम आहे. अशा प्रकारचे मुस्लिम मन बनले आहे. त्यामुळे हे मुस्लिम मन धर्मसुधारणा व समाजप्रबोधनास तयार होत नाही. हमीद दलवाई यांना वाटत असे की मुस्लिम मन या शब्दाप्रामाण्यातून व धर्मांधतेतून मुक्त व्हावे.

हमीद दलवाई यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे की ते अत्यंत प्रखर असे पुरोगामी व धर्मनिरपेक्षवादी राष्ट्रभक्त होते. समाजवादी नेते एस. एम. जोशी यांनी इ. स. 1941 मध्ये सुरू केलेल्या राष्ट्रसेवा दलामध्ये ते इ.स. 1946 मध्ये सामील झाले. त्यातून त्यांनी समाजवादी विचारांचा अंगीकार केला होता.[17] मानवी मूल्यांना केंद्रबिंदु मानून सामाजिक रचना असावी व धार्मिक रूढी, परंपरा, मानवी मूल्यांचा आड येऊ नयेत असे दलवाईंना वाटत असे. समाजवादी आंदोलनातील डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व एस. एम. जोशी यांच्याबद्दल दलवाईंना आदरभाव वाटत होता. ते मनाने पूर्णपणे इहवादी असले व इंडियन सेक्युलर सोसायटीचे सदस्य असले तरी संविधानात सांगितलेल्या व व्यक्तीला अर्पण केलेल्या धर्मस्वातंत्र्याचे ते कट्टर पुरस्कर्ते होते.[18]

हमीद दलवाईंना धर्मातीतता, धर्मनिरपेक्षता, इहवाद या प्रतिशब्दांनी परिचित असलेले सेक्युलॅरिझम हे मूल्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीयत्व, विज्ञाननिष्ठा आदी आधुनिक जागतिक मूल्यांइतकेच महत्वाचे वाटत होते.[19] जागतिक पातळीवर मुस्लिमांना चिकित्सावादी बनविण्याचे व भारतीय मुस्लिमांना धर्मनिरपेक्ष प्रवाहात आणण्याचे स्वप्न पाहणारे हमीद दलवाई हे स्वतःच मुसलमानांच्या प्रगतीला व विकासाला पडलेले स्वप्न होते असे म्हंटले तरी आपला वावगे होणार नाही. आपला मूलभूत विचार मुस्लिम समाजात उतरवून जन आंदोलन उभारू पाहणारे, कार्याने झपाटलेले लोकविलक्षण व्यक्तिमत्वाचे हमीद दलवाई होते.

मुसलमान लोक आजही मध्ययुगीन अंधश्रध्दांना कवटाळून बसल्यामुळे आधुनिक जगात मागे पडत चालले आहेत. या परिस्थितीला त्या समाजाची बौध्दिक व आर्थिक स्थिती कारणीभूत असलेली दिसते. जर इहवादी लोकशाही ध्येये प्रत्यक्षात आणायला हवी असतील तर भारतातल्या सर्व उदारमतवादी शक्ती एकत्र येणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी कोणताही राजकीय सत्तासंपादनाचा हेतु मनात न ठेवता कार्य करायला हवे परंतु यावेळी हताश होऊन चालणार नाही. माणसांना पशुचे जीवन जगायला लावणारे नियम कुणीही केले असले तरी ते बदलले पाहिजेत अशी त्यांची भूमिका दिसते. हमीद दलवाई म्हणत ‘‘सर्व मुसलमान आपले सोडून सगळ्या जगाचे

बोलतात, मी फक्त आपलंच बोलतो, कारण ज्यांना आपला समाज सुधारता येत नाही त्यांनी जगाच्या गप्पा मारू नये. तर आधी आपल्या घरातील घाण काढू या.''[20]

आपले पुरोगामी विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी लेख, भाषणे, जाहीर सभा याव्दारे हमीद दलवाईंनी एक मोहीम काढली होती. आपल्या विचारांशी संवाद साधतील अशा तरूण वर्गाच्या संपर्कात येण्यासाठी त्यांनी इ. स. 1968 साली प्रा. अ. भि. शहांच्या समवेत 'इंडियन सेक्युलर सोसायटी' मुंबईत स्थापन केली.[21] आपल्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी त्यांनी भारतभर भ्रमण केले व त्यावेळी सभा संमेलने इत्यादी मार्गाचा अवलंब केला. परंतु इंडियन सेक्युलर सोसायटींच्या स्थापनेनंतर दोन वर्षापर्यंत स्वतः दलवाई खेरीज एकही मुस्लिम त्या सोसायटीकडे आला नाही. मुस्लिम समाज किती झापडबंद आहे याचे यापेक्षा अधिक योग्य उदाहरण काय असू शकते ? तरीही निराश न होता हमीद दलवाईंनी भाषणे देणे, प्रसारमाध्यमांना लेख लिहिणे, दौरे असे उपक्रम चालूच ठेवले होते. पुणे, कोल्हापूर, बेळगांव या शहरांत आणि गडहिंग्लज, निपाणी, आजरा, उत्तुर, कुरूंदवाड या ग्रामीण भागात राष्ट्रसेवादला तर्फे त्यांचा एक महत्वाचा दौरा आयोजित केला गेला होता.[22] त्यावेळी भाषणे, सभा, चर्चा इत्यादी मार्गाने मुस्लिम तरूणांशी आपल्या विचारसणीबाबात व त्यांची मते आजमावण्यासाठी ते संवाद साधत असत.

हमीद दलवाई, अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर, भाई वैद्य व डॉ. बाबा आढाव या समविचारी मंडळीनी त्यांच्या कामात सहाय्य केले. भाई वैद्य व डॉ.बाबा आढाव यांना हमीद दलवाईंच्या विचारांना साथ देतील असे पुण्यातील काही मुस्लिम तरूण माहित होते.[23] त्यात सय्यदभाई, मुन्नीर सय्यद, अमीर शेख, अन्वर शेख, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी इत्यादी बरोबर त्यांनी हमीद दलवाईंची ओळख करून दिली. कोल्हापूरच्या हुसेन जमादारांचा कोल्हापूरच्या दौऱ्यात परिचय झाला होता. यावेळी एन. आर. बारगीर, महंमद गौस नाईक, आय. एन. बेग, मुमताज रहिमतपुरे ही मंडळी हुसेन जमादारांसोबत होती. अशा प्रकारे पुणे, कोल्हापूर, अहमदनगर, मुंबई, सातारा येथील या सर्व तरुणांशी एकत्रित येऊन चर्चा झाल्यावर मुस्लिमांसाठी, मुस्लिमांची एखादी संघटना काढण्याची हमीद दलवाईंना गरज वाटू लागली व पुढे लवकर मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली.

सन 1966 ते 1977 अशी फक्त 11 वर्षे हमीद दलवाईंना मुस्लिम सत्यशोधक चळवळीसाठी देता आली. नवी दिल्लीची 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स', पुण्याची 'महाराष्ट्र राज्य मुस्लिम महिला

परिषद’, मुंबईची ‘मुस्लिम सामाजिक परिषद’ व कोल्हापूरची ‘मुस्लिम शिक्षण परिषद’ या ठिकाणी अनेक कार्यक्रम हमीद दलवाईंनी आपल्या मंडळाव्दारे आयोजित केले व ते यशस्वी करून दाखविले.[24]

हमीद दलवाईंना महान विचारवंत म्हणुन किर्ती, प्रतिष्ठा मिळवण्याची इच्छा नव्हती. त्यांना समाज परिवर्तनाचे आंदोलनच अधिक प्रिय होते. महंमद पैगंबर आणि कुराण याबाबत चर्चा करून समाजाचे मन दुखवावे असे त्यांना वाटत नव्हते. तसेच मुस्लिम समाजाने नास्तिक झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह नव्हता. मुस्लिम समाजाचे आमूलाग्र परिवर्तन होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी प्रत्येक मुस्लिम कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन एखादा कार्यक्रम हाती घेऊन समाजसुधारणे साठी समाज तयार करावा हे दलवाईंना मान्य होते. इस्लामवरील श्रध्दा, महंमद पैगंबरावरील श्रध्दा, इस्लामच्या धार्मिक व राजकीय इतिहासावरील श्रध्दा या सर्व गोष्टी बाजूला ठेवून मुस्लिम समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ते सतत जागृत होते. सामाजिक आंदोलन करायला ते तयार होते.

हमीद दलवाई अस्वस्थ आणि आक्रमक व्यक्तिमत्वाचे होते. जी गोष्ट करायची ती निधडेपणाने, मनस्वीपणे आणि मनमुरादपणे ते करत. मुस्लिम समाजात आधुनिक मूल्ये रूजवणे हे त्यांचे मिशनच होते. त्याचा त्यांनी अहोरात्र ध्यास घेतला होता. हमीद दलवाईंनी मुसलमान प्रश्नाच्या अभ्यासासाठी भारतभर प्रवास केला. मुसलमानांची सांस्कृतिक बैठक त्या प्रांतात आहे त्या उत्तर प्रदेशात ते गेले. तेथील खानद अदब पाहिले. देवबंद, अलिगढ ही मुसलमानांमधील विचारप्रवाह निर्माण करणारी केंद्रे पाहून आले. लखनऊची नबाबी संस्कृती पाहून ते म्हणत तिथे इतके नरम विचाराची सोय नाही. तिथले लोक मागून खंजीर खुपसून पुढून आदाबअर्ज करून ‘जनाब, आपको तकलीफ तो नहीं हुई’ ? असे विचारतील[25] यावरून असे दिसते की मुस्लिम समाजामध्ये सनातनी विचारांचे फार प्रस्थ होते.

हमीद दलवाईंना खऱ्या अर्थाने माणसांचे व्यसन होते. पुणे, मुंबईत आणि भारतात इतरत्र खूप माणसे (लोक) त्याच्या जिवाभावाची होती. ज्यांना ते आपले मार्गदर्शक मानत अशा व्यक्तीमध्ये श्री. पु. भागवत, अ. भि. शहा, वसंत नगरकर, मे. पु. रेगे, नरहर कुरूंदकर, यदुनाथ थत्ते इत्यादी व्यक्तीनीं हमीद बरोबर मुस्लिम जातीयवादावर कोरडे ओढले होते. हमीद व अ. भि. शहा यांच्यामध्ये जरी वैचारिक मतभेद झाला तर तो वाद त्याच ठिकाणी ठेवत असत. अ. भि. शहांच्या “कमिटी ऑफ कल्चरल फ्रिडम” या समितीवर अमेरिका धार्जिणी असा शिक्का होता. हमीद दलवाई शहांचे मित्र असल्यामुळे जातीय मुस्लिम व हिंदु विरोधक कम्युनिस्ट मंडळी त्यांच्यावर (हमीद) सी. आय. ए. चा एजंट असल्याची टिका करीत असत.[26]

जसे हमीद दलवाईंचे अनेकांशी मित्रत्वाचे संबंध होते. तसेच त्यांचे त्यांच्याशी प्रखर मतभेद होते अशांशी सुध्दा ते चांगले संबंध ठेवीत असत. कर्तारसिंग थत्ते हिंदुत्वनिष्ठ गृहस्थ होते. शस्त्र बाळगता यावे म्हणुन त्यांनी शीख धर्म स्वीकारलेला होता. मुसलमानांविषयी त्यांच्या मनात व्देष होता. हमीद दलवाईंना ते भेटले की प्रथम म्हणायचे मला दहा रूपये द्या. तेव्हा हमीद निमुटपणे नोट काढून देत. एकेदिवशी कर्तारसिंग भेटले ते काही बोलण्यापूर्वी हमीदनी त्यांला दहा रूपयांची नोट दिली आणि म्हणाले ‘‘माझ्या पूर्वजांनी तुमच्या पूर्वजांकडून जो जिझिया कर घेतला होता त्यांची प्रथम भरपाई होऊ द्या, मग दुसरे बोलु.’’[27] हमीद दलवाईंचे ज्यांच्याशी मतभेद होते त्यांच्याशी मैत्रीचे संबंध त्यांना स्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मुस्लिम नेतृत्वामधील जातीय व आक्रमक प्रवृत्तीवर प्रहार करणारे हमीद दलवाई निघाल्याने ते एक मुस्लिम सामाजिक प्रक्रियेचे टप्पा ठरले. अ. भि. शहांमुळे हमीद दलवाईंना एक उत्तम वैचारिक बैठक मिळाली होती. अ. भि. शहांचे इस्लामविषयावरील खाजगी ग्रंथालय हमीद दलवाईंना उपयोगी पडले. त्यामुळे जागतिक स्तरावरील इस्लामचा त्यांना मोठा परिचय झाला. तसेच दिल्लीचे एक वरिष्ठ पोलीस अधिकारी वसंत नगरकर यांच्या मुस्लिम प्रश्नाच्या गाढ्या व्यासंगाचा फायदा हमीद दलवाईंना मिळाला. त्याप्रमाणे इस्लामिक हिस्टरीचे अलिगढ विद्यापीठातील जागतीक किर्तीचे विव्दान प्रा. इरफान हबीब यांचाही फायदा झाला. यावेळी दिलीप चित्रे ह्या प्रसिध्द लेखकाने हमीद दलवाईंच्या लेखाचीं इंग्रजी भाषांतरे केली. तर अ. भि. शहांनी ती ‘क्वेस्ट’ मधून छापून आणली. त्यामुळे हमीद दलवाईंची भूमिका आखिल भारतीय स्तरवर माहित झाली.[28] यावेळी अ. भि. शहा, हमीद दलवाई, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर व इतरांनी सेक्युलर फोरम स्थापन करून सेक्युलरिस्ट हे इंग्रजी नियतकालिक काढून आखिल भारतीय स्तरावरच्या मुस्लिम समाजापर्यंत पुरोगामी विचार पोहचविण्याचा प्रयत्न केला.[29] हमीद दलवाई हे फक्त पुरोगामी भूमिका घेऊन थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या वैचारिक भूमिकेवरून मुस्लिम समाजात सामाजिक दृष्टीने चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला होता.

मुसलमान समाजातील सनातनी मंडळीनी यावेळी मोठ्या प्रमाणात हमीद दलवाईंच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला व ते सांगू लागले की ‘‘ही आपल्या धर्मात मोठ्या प्रमाणात ढवळाढवळ आहे. सनातनी मुस्लिम लोक (मंडळी) म्हणू लागले की शरियत हा ईश्वरी कायदा आहे, त्यात कोणी बदल करू शकत नाही. परंतु अ. भि. शहा, हमीद दलवाई आणि इतरांनी त्यांना दाखवून दिले की, इतिहासात शरियतमध्ये वेळोवेळी बदल झालेले आहेत. उदा. - शरियतमध्ये चोरीच्या गुन्ह्याबद्दल हात तोडण्याची शिक्षा आहे आणि इस्लामिक राज्यांमध्येही ती अमलात येऊ शकत नाही.’’[30]

हमीद दलवाईंनी मुस्लिम स्त्रियांच्या तलाकचा प्रश्न, समान नागरी कायदा, उर्दू भाषेचा प्रश्न, धर्मनिरपेक्षता, असे विविध प्रश्न आपल्या हातात घेतले. मुस्लिम समाजात चळवळ घडवून आणण्याचा प्रयत्न केला. हमीद दलवाईंच्या वैचारिक बैठकीमुळे मुस्लिम तरुणांची एक लाट सुरूवातीच्या काळात त्यांच्याकडे आकर्षित झाली.

हमीद दलवाईंची विचारसरणी पुरोगामी होती. समाजसुधारणेची त्यांना तळमळ होती. असामान्य बुध्दी, वाचनाची आवड, मराठी भाषेवर प्रभुत्व असे असले तरी त्यांनी फार मोजकेच लेखन केले आहे. 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय', 'इस्लामचे भारतीय चित्र' व 'मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' हे इंग्रजी भाषेतील पुस्तक यांचा त्याच्या लेखनसंग्रहात समावेश होता.[31] याशिवाय त्यांनी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी व त्या त्या काळात घडणाऱ्या मुस्लिम समाजासंदर्भातील घटनांवर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी विविध विषयांवर अनेक लेख लिहिले व अनेक व्याख्याने दिली. हे लेख त्यांनी 'क्वेस्ट', 'सेक्युलॅरिस्ट', 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन एक्सप्रेस' आदि इंग्रजी व 'मराठा', 'महाराष्ट्र टाईम्स', 'साधना' आदि मराठी दैनिके व साप्ताहिकात लिहिले.[32]

राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यापेक्षा समाजप्रबोधन करणाऱ्यांचे जीवन खडतर असते. त्याला स्वतःच्याच समाज बांधवाकडून फार त्रास होतो. त्याच्या संपूर्णपणे नायनाट करण्यासाठी त्याचेच बांधव हातात शस्त्र घेऊन उभे असतात. त्या सर्वांना प्रेमाने जिंकून त्यांना नवविचारांची प्रेरणा देण्याचे खडतर काम त्या समाजसुधारकास करावयाचे असते. महात्मा जोतिबा फुले किंवा प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांचा हिंदू समाजाने छळ केला. मुसलमान समाज हा स्वभावतःच आक्रमक असल्यामुळे हमीद दलवाईंच्या कार्य व विचारांना मुस्लिम समाजातील जमातवादी, धार्मिक व राजकीय नेत्यांनी विरोध केला व त्यांना काफीर, हिंदूचा एजंट अशी विशेषणे लावून त्यांच्या बदनामीची मोहीम आखली होती.

हमीद दलवाईंचा 3 मे 1977 या दिवशी मृत्यु झाला. त्यापूर्वी ते किडनीच्या विकाराने आजारी होते. त्यावेळी हमीद दलवाईंचे मित्र किडनी दात्याला शोधू लागले. त्यावेळी केलेल्या आवाहनाला काही जातीयवादी मंडळीनी अतिशय हीन पातळीवरची पत्रे पाठविली होती. एका पत्रात 'मेरे घर के कुत्ते की किडनी मैं देने को तैयार हूँ।' असे लिहले होते. परंतु अशा पत्राचा हमीद वर काहीही परिणाम झाला नाही. हमीद दलवाईंच्या आजारांचे गांभीर्य लक्षात घेऊन अ. भि. शहा, वसंत नगरकर, शरद पवार यांच्या सहकार्याने त्यांना मुंबईच्या जसलोक हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. येरवड्याच्या तुरूंगात फाशीची शिक्षा भोगत असलेल्या फिरोज दारूवाला

याने हमीद दलवाईंसाठी किडनी देण्याचे जाहीर केले. तत्पूर्वी आंतरभारतीचे श्री. जवाहर कोटेचा यांनीही किडनी देण्याची तयारी दाखविली होती. फिरोज दारूवालाच्या किडनीच्या दानामूळे हमीद दलवाईंना जीवदान मिळाले होते.[33] या आजारपणात महाराष्ट्र सरकारने त्यांना 50 हजार रूपयांची आर्थिक मदत केली होती. स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधीनी वैयक्तिकरित्या दोन हजार रूपये पाठवले होते. तसेच शरद पवारांनी बहुमोल असे सर्वतोपरी सहाय्य केले होते.

हमीद दलवाईंच्या या किडनी ऑपरेशन नंतर अमेरिकेला जागतिक परिषद होती त्यावेळी त्या परिषदेसाठी जयप्रकाश नारायण आणि हमीद दलवाईं यांची निवड झाली होती.[34] तेव्हा हमीद अमेरिकेला जाऊन आले परंतु नंतर प्रकृती बिघडत गेली आणि त्यातूनच फिरोज दारूवाल्याची किडनी काढावी लागली. यावेळी त्यांची मुलगी रूबिना हिने किडनी देण्याचे ठरविले परंतु त्यावेळी तिचे वय 18 वर्षे पूर्ण नव्हते. यावरून रूबीनाचे लहान वयातील धाडस वाखाणण्यासारखे दिसते.

हमीद दलवाईंच्या मृत्युनंतरही पुणे व मुंबई महापालिकेत मुस्लिम नगरसेवकांनी दलवाईंना श्रध्दांजली वाहण्यास विरोध केला.[35] अमरावती शहरात तर मुसलमानांनी पेढे वाटले.[36] यावरून मुस्लिम जातीयवाद्यांचे नैतिक अध:पतन कोणत्या थराला गेले होते याची कल्पना येते.

दलवाईंच्या मृत्युनंतर त्यांचे चुलत भाऊ अबु दलवाई व इतर मंडळी प्रेत मिरजोळीला घेउन जाण्याच्या तयारीत होते परंतु अ. भि. शहा व शरद पवार यांनी त्यांना दलवाईंच्या मृत्युपत्रातील इच्छेप्रमाणे त्यांचे प्रेत मुंबईतच विद्युतदाहिनीत दहन केले जाईल असे सांगितले व चंदनवाडी विद्युतवाहिनीत हमीदचे शव दहन करण्यात आले.[37]

हमीद दलवाईंनी आपल्या मृत्यु पूर्वी जी अंतिम इच्छा व्यक्त केली होती त्यामध्ये ते म्हणतात, ‘‘माझ्या मृत्युनंतर माझे शव माझ्या गावी नेऊ नये, विद्युतवाहिनीत माझ्या शवाचे दहन करावे, मुसलमान किंवा हिंदु पध्दतीने कोणताही धार्मिक संस्कार अगर श्रध्दांजलीची भाषणे करू नयेत. निरिश्वरवादी म्हणून मी जगलो व निरिश्वरवादी म्हणूनच मला मरायचे आहे. माझे स्मारक उभारू नये.’’ [38] ‘‘या देशात इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्युट स्थापन करावी ही माझी आवडती इच्छा आहे. काही खाजगी व निमसरकारी यंत्रणाही चालविलेल्या काही संस्था आहेत. पण त्यांच्या कामाने माझे समाधान झालेले नाही. इस्लाम व त्यांची संस्कृती सुधारू इच्छिणाऱ्या माझ्या मित्रांनी असी संस्था स्थापन करावी.’’ [39] ‘‘सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय असा मूलभूत चळवळींचे तसेच शहरी चळवळीचे प्रतिबिंब या संशोधनात दिसले पाहीजे. इस्लामच्या समस्यांना वाहिलेले एक नियतकालिकही त्या

संस्थेने सुरू करावे. जगातील इस्लामिक चळवळीची दखल या नियतकालिकाने घ्यावी. मी सुखाने जगलो. माझी आता कोणाविरूध्द तक्रार नाही. माझ्याशी ज्यांचे मतभेद होते. त्यांच्याशी मी झगडलो, पण माझा कोणाहीविरूध्द आकस नाही, म्हणून त्यांच्याशी ही वैयक्तिक संबंध ठेवण्याचा मी प्रयत्न केला.''[40]

हमीदनी वयाच्या 12 व्या वर्षी गांधी टोपी घातल्याबद्दल मुसलमानांचा मार खाल्ला होता[41] ते पक्के नास्तिक होते. भाषणातून संधी मिळेल तेव्हा ते सांगत 'मी नास्तिक आहे' मला परमेश्वर मान्य नाही. त्यामुळे त्यांना प्रेषित व धर्मग्रंथ सुध्दा अमान्य होता.

धर्माविषयी दलवाईंची भूमिका वेगळी व टोकाची होती. आपण मुसलमान आहोत म्हणून आपल्या समाजातील दोषांचे दिग्दर्शन करून ते सुधारणे हे आपले कर्तव्य आहे, असा दलवाईंचा आग्रह होता.[42] 'धर्म ही खाजगी बाब' मानणारे दलवाई नास्तिक, निरिश्वरवादी होते पण आपली भूमिका त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांवर लादण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. नास्तिकता ही दलवाईंची वैयक्तिक भूमिका होती.

प्रा. अ. भि. शहा हमीद दलवाई विषयी म्हणत, ''दलवाई स्वतः नास्तिक होते, परंतु आपण मुसलमान आहोत यांचा त्यांना मौलाना आझाद यांच्या प्रमाणेच अभिमान वाटत होता.''[43] प्रेषित महंमदाने सांगितलेला धर्म एवढाच इस्लामचा अर्थ ते घेत नसत, तर त्या धर्मांने जन्मास घातलेल्या संस्कृतीचाही ते इस्लाम या संज्ञेत समावेश करीत. त्यांनी इस्लामकडे चिकित्सक दृष्टीने पाहीले. जे चांगले होते त्याचा स्वीकार केला, जे वाईट होते ते नाकारले आणि असे करताना सनातनी किंवा तथाकथित आधुनिक मुसलमान विचारवंताप्रमाणे इस्लाममध्ये नंतर घुसडण्यात आलेल्या गोष्टी असा खुलासा करून ते मोकळे झाले नाहीत. अशी दृष्टी ठेवणारे ते भारतातील नव्हे तर जगातील एकमेवाव्दितीय मुस्लिम विचारवंत होते. इस्लामच्या इतिहासात ते मार्टिन ल्युथर पेक्षाही मोठे होते. आपल्या मानवतावादी श्रध्देचा उद्‌घोष करावयास न घाबरणारे असे इस्लामी जगातील पहिले पूर्णमानवतावादी असे त्यांचे वर्णन करावे लागेल.[44]

हमीद दलवाई समाजवादी असले तरी समाजपरिवर्तनासाठी लागणाऱ्या मूलभूत समाजचिंतनाची जबाबदारी त्यांनी पत्करली होती. कोणतीच अंधश्रध्दा न स्वीकारणे मूलतः नवे मन आणि त्या मनातील विचार जगासमोर ठेवण्यासाठी लागणारा बंडखोर निर्भयपणा हेच दलवाईंचे सामर्थ्य होते. दलवाई विषयी नरहर कुरुंदकर म्हणतात, ''दलवाईंच्या कार्यातील अडचणी लक्षात घेता खऱ्या आश्चर्यकारक गोष्टी दोन आहेत, पहिली आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्यांना आजारी पडून मरण्याची संधी मिळावी, त्यांना हुतात्मा व्हावे लागले नाही.

त्याहून अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेराशे वर्षाच्या परंपरेविरूध्द बंड करणाऱ्या या बंडखोराला पाहता पाहता तीन-चारशे अनुयायी मिळाले.''[45]

हमीद दलवाईंच्या कार्याविषयी पु. ल. देशपांडे म्हणतात ''महाराष्ट्रातल्या समाजप्रबोधनच्या इतिहासकाराला महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हमीद दलवाई ही नावे अत्यंत आदराने उच्चारूनच या प्रबोधनाचा विचार करावा लागेल. किंबहुना महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या समाजप्रबोधनाच्या संपूर्ण इहवादी आणि 'माणुसकी हाच धर्म मानायला हवा' या विचार वृक्षाला आलेले हमीद दलवाई हे रसरशीत फळ होते.''[46]

### 4.2 हमीद दलवाईंचा इहवादी दृष्टीकोन :-

इस्लाम धर्म हा एकाच धर्मग्रंथावर (कुराण) आणि एकाच प्रेषितावर (हजरत महंमद पैगंबर) आधारलेला धर्म आहे. जीवनाची सर्व उत्तरे मुस्लिमांनी कुराणात शोधली पाहिजेत असा दंडक आहे. प्रेषित महंमदचा शब्द हाच अंतिम शब्द आहे. मुस्लिमांची धर्मश्रध्दा एकस्तंभी आहे. धार्मिक मूलतत्ववादाची बीजे या दृष्टीकोनात आहेत. जीवनाची सर्व उत्तरे धर्मग्रंथात शोधणे, आपलाच धर्म सर्वश्रेष्ठ आहे असे मानणे आणि इतरांच्या धर्मश्रध्दांचा अनादर करणे, झापडबंद दृष्टीकोनाचा स्वीकार करणे ही धार्मिक मूलतत्ववादाची काही ठळक लक्षणे आहेत.

हिंदू समाजात प्रबोधनाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली त्या तुलनेत मुस्लिम समाजात ती मंद राहिली. समाजसुधारकांची एक अखंड अशी मालिकाच हिंदू समाजात निर्माण झाली. पण मुस्लिम समाजात हे घडले नाही. या गोष्टीची कारणमीमांसा मुस्लिम बुध्दीवाद्यांनी करायला हवी. मध्ययुगीन काळात सूफी संतांनी मात्र हिंदू संतांप्रमाणे मानवतावादी दृष्टीकोन स्वीकारला होता. संतांचा व संत साहित्याचा प्रभाव हिंदू समाजावर व्यापक प्रमाणात पडला तसा सूफी संतांचा व त्यांच्या काव्याचा प्रभाव मुस्लिम समाजावर पडला नाही. रामजी सिंह म्हणतात. ''हिंदू धर्म किंवा इस्लाम धर्म प्रभावी तोपर्यंतच राहील जोपर्यंत ते वैश्वीक व निखळ मानवतावादी भूमिकेत आहेत. यामुळेच हिंदुत्व किंवा इस्लाम जेव्हा एक संप्रदाय बनतो तेव्हा तो आपल्या मूळस्थानापासुन दूर जाऊन राजकारणाचे एक साधन बनतो.''[47] समाजाचा खरा आधार धर्म असतो, परंतु हा आधार जेव्हा संप्रदाय बनतो तेव्हा तो राजकारणाकडे वळतो आणि धर्माचे खरे स्वरूप मलिन होते. बऱ्याच वेळा स्वतःला मूलतत्ववादी म्हणविणारे लोक धर्माचा असाच अवाजवी वापर करत असताना दिसतात.

भारतीय मुस्लिम समाजाविषयी अद्यापही नीटशी कल्पना नसलेला फार मोठा वर्ग भारतात अस्तित्वात आहे. हिंदू-मुस्लिम प्रश्नांच्या संदर्भात मुस्लिम जनमानस नीट समजावून घेण्याचा प्रयत्न होत नाही. साधारणतः मुस्लिम समाजाविषयी दोन विचारप्रवाह हिंदू समाजात अस्तित्वात आहेत. एक वर्ग मुस्लिम समाजाचे मनोगत हिंदू

विरोधी आहे असे मानतो तर दुसरा वर्ग उदारमतवाद्यांचा आहे. मुस्लिम समाजाच्या प्रतिगामी चळवळीचे अस्तित्व हा वर्ग सतत नाकारत आलेला आहे. [48]

मुसलमान लोक आजही मध्ययुगीन अंधश्रध्दांना कवटाळून बसल्यामुळे आधुनिक जगात मागे पडत चालले आहेत. या परिस्थितीला त्या समाजाची बौध्दीक व आर्थिक स्थिती जबाबदार आहे. इज्जत, खानदान, मजहब, मुल्ला मौलवींचे फतवे, जहन्नमची (नरक) दहशत इत्यादी गोष्टीतुन मुस्लिम स्त्रिला तिच्या धर्मात व समाजात दुय्यम स्थान आहे. ‘‘जर इहवादी लोकशाही ध्येये प्रत्यक्षात आणायला हवी असतील तर भारतातल्या सर्व उदारमतवादी शक्ती एकत्र यायला पाहीजेत. त्यांनी अपक्ष भूमिकेवरून आणि कोणत्याही राजकीय सत्तासंपादनाचा हेतु मनात न ठेवता कार्य करायला हवे. हताश होऊन जे जे होईल ते ते पहावे अशी भूमिका घेऊन चालणार नाही. माणसांना पशुचे जीवन जगायला लावणारे नियम कुणीही केलेले असले तरी ते बदलले पाहिजेत.’’ [49] असा हमीद दलवाईंचा ठाम निर्धार होता. यातुनच त्यांनी धर्मांतर्गत विरोधकांचा राग ओढावून घेतला. त्यांच्या जीवनातील प्रत्येक दिवस हा नवी आव्हाने स्वीकारण्याचा दिवस होता.

हमीद दलवाईंनी हिंदू जातीयवाद हा मुस्लिम जातीयवादाची प्रतिक्रिया आहे असे मानले.[50] हिंदू समाजात आधुनिक मूलभूत मानवी मूल्यांचे महत्व ओळखणारा एक उदारमतवादी वर्ग निर्माण झाला आहे आणि तो हिंदु जातीयवादाशी सतत संघर्ष करत आहे. हा उदारमतवादी वर्ग हिंदूच्या प्रगतीची वाहक नाडी आहे आणि असा वर्ग मुसलमानांमध्ये निर्माण झाला आणि त्याने मुस्लिम जातीयतेविरूध्द संघर्ष केला तर मुसलमानांमध्येही आधुनिक दृष्टी येईल असे हमीद दलवाईंना वाटत होते. दलवाई या दोन जातीयवादांची तुलना करताना म्हणतात - ‘‘मुस्लिम जातीयवादाचे मूलभूत स्वरूप आक्रमक व विस्तारवादी आहे. हिंदू जातीयवादी प्रतिक्रियावादी, बचावात्मक भूमिका घेणारा आहे. त्याला कितीही आक्रमक स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला गेला तरी तो काही मर्यादेच्या पलिकडे आक्रमक स्वरूप धारण करू शकणार नाही.’’ [51] हिंदू समाजाचा विस्कळीतपणा, संघटित असलेल्या मुस्लिम आक्रमकतेला रोखण्याची उदारमतवादी हिंदू वर्गाची सतत चालेली धडपड ही त्याची कारणे दलवाईंना वाटतात.

मुस्लिम मनाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी हिंदू मनाचे स्वरूप जाणून घेतले पाहिजे. हिंदू समाजात मत स्वातंत्र्य आहे. त्यामुळे समाजात वेगळा किंवा नवा विचार येत राहीला आहे. त्याप्रमाणे मुस्लिम समाजात देखील नवा विचार आला पाहिजे असे दलवाईंना वाटत होते. राष्ट्राच्या सीमा नेहमीच विस्तार पावत असतात. या सीमा कधी भौगोलिक तर कधी सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय प्रभावाच्या असतात. आपल्या देशाच्या सीमा मागे हटल्या याला आपल्या देशातील बहुसंख्य समाजाच्या पुरेशा चैतन्यशीलतेच्या अभावाचे लक्षण आहे. देशातील हिंदू जसा

चैतन्यशील नाही तसाच मुसलमान समाजही अजिबात चैतन्यशील नाही.[52] आज जगात कुठेही इस्लामी संस्कृतीचा प्रभाव आढळून येत नाही. दलवाईंना मुसलमानांचे हे रूप सुध्दा चैतन्य गमावलेल्या समाजाची लक्षणे वाटतात. इस्लामी नेतृत्व केवळ धर्म विस्तार करण्यातच मशगुल राहिलेले आहे, त्याला चैतन्यशीलता असे मुसलमान मानतात.

ईश्वर एकच आहे तो सर्वश्रेष्ठ आहे. सर्व स्तुतीस तो पात्र आहे व महंमद पैगंबर त्याचा रसूल (दूत) म्हणजे संदेश सांगणारा आहे. महंमद पैगंबरानी ह्या आज्ञा मानव जातीला दिल्या, त्या ईश्वरीय आज्ञा आहेत. त्या ईश्वरीय आज्ञांचा संग्रह कुराण आहे. पवित्र कुराणातील एक ईश्वरीय आज्ञा ही की ईश्वर एक असल्यामुळे धर्म ही एकच आहे व तो कुराणामध्ये सांगितलेला हा धर्म परिपूर्ण व निर्दोष आहे. म्हणून त्यात बदल होवू शकत नाही. महंमद पैगंबर शेवटचे प्रेषित असल्यामुळे ह्यानंतर ईश्वराचा नवा संदेश येऊ शकत नाही. म्हणुन इस्लामच्या प्रथा परंपरेत धर्मांचा काही भाग उपयोगशून्य झाला, रद्द झाला असे म्हणणारे धर्मांतील वचनात बदल करणारे सारे धर्मद्रोही, देवद्रोही आहेत व ते मृत्युदंडास पात्र आहेत. इस्लाम ह्या सर्वांना जातिबहिष्कृत करतो. अशा आपल्या धर्माची कठोर चिकित्सा करण्याचा पहिला प्रयत्न हमीद दलवाई ह्यांच्या पासून सुरू होतो. स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या एकाही विचारवंताने हे कार्य करण्याचे धाडस दाखविलेले नाही. मुस्लिम समाजात हमीद दलवाई आणि हिंदु समाजात राजा राममोहन रॉय, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, दयानंद सरस्वती, रामसामी पेरियार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख व महात्मा जोतिबा फुले हे अपवाद आहेत. समाजवादी, कम्युनिष्ठ, कॉंग्रेस ह्या पक्षात अनेक मुस्लिम नेते होते व आहेत. त्यांच्यातील रफी अहंमद किडवाईं, युसुफ मेहरअल्ली, मौ. आजाद, झेड. ए. अहमद, हसरत मोहानी, कॉ. मकदूम ही पुरोगामी विचारांचीच माणसे होती पण ह्यांच्यातील एकही जण स्वतःच्या धर्माचा चिकित्सक अभ्यास करू शकला नाही. उलट इस्लाम म्हणजे समता, इस्लाम म्हणजे लोकशाही, इस्लाम म्हणजे समाजवाद, इस्लाम म्हणजे राष्ट्रवाद अशा भ्रामक समजुती आग्रहाने सांगण्यात ह्या नेत्यांनी जन्म घालविला.[53] परंतु धर्म व धर्मग्रंथ प्रमाण मानुन त्यांचा आशय बदलण्याचा अयशस्वी पण महत्वाचा प्रयोग करणारे मौलाना आझाद हे होते.[54] भारतीय मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाच्या इतिहासात पुरोगामी नेत्यांचा अभाव आढळतो. समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रध्देच्या चौकटीमुळे उदारमतवादी नेतृत्वाचा विकास खुंटल्यामुळे धार्मिक व सांप्रदायिक नेत्यांचा मुस्लिम समाजात सुळसुळाट आढळतो. हमीद दलवाईंनी या मुस्लिम नेत्यांचे वर्णन हेकेखोर, मुक्तचर्चा विरोधी, मूलतत्ववादी, इतरांना दोष देणारे व आत्मपरीक्षणाची पात्रता नसलेले असे केले आहे.[55]

हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात तसेच महाराष्ट्रभर व्याख्याने दिली तसेच भारतातील इतर प्रांतात जाऊन व्याख्याने दिली व आपल्या विचारांचे स्वतंत्र व्यासपीठच निर्माण केले. यावेळी त्यांनी आपल्या समाजापुढे विचार मांडले, स्वातंत्र्यपूर्व काळात मुसलमान फुटीर वृत्तीने का वागले ? किंवा आजही भारतातील मुसलमान मुख्य प्रवाहात का येत नाहीत किंवा समरस होत नाहीत ? याचे खापर केवळ हिंदुत्वावाद्यांवर फोडून चालणार नाही. मुस्लिमांच्या इतिहासाचे व्यवस्थित परिक्षण केल्यावर मुस्लिम राजकारणामागच्या शक्ती लक्षात येतील. इस्लामला तेराशे वर्षांच्या इतिहासात पराभव जवळपास माहित नाही. एका लहान, कोणाला माहीत नसलेल्या देशात हा धर्म उदय पावला आणि एक तृतीयांश जगात त्याचे राज्य पसरले. भारतातही मुस्लिम नेतृत्वाला आपण राज्यकर्ती जमात आहोत याचा अजूनही अहंकार आहे. तेव्हा या प्रवृत्ती ज्यांच्यात परंपरेने जोपासल्या गेल्या आहेत. त्यांना सेक्युलर कसे बनवायचे या आव्हानाचा विचार करा असे परखड विचार त्यांनी मुस्लिम समाजापुढे मांडले होते.[56]

हमीद दलवाईंनी ज्याप्रमाणे मुस्लिम समाजापुढे आपले परखड विचार मांडले होते त्याप्रमाणे कडव्या हिंदूना उद्देशुन ते म्हणतात, ''इतिहासाच्या एका क्षणी हिंदुस्थानची फाळणी झाली. फाळणीची चिकित्सा होऊ शकेल, फाळणीचे गुन्हेगार ठरवता येतील. चक्र उलटे फिरविण्याचे स्वप्न पाहू नका. कित्येक प्रांतातल्या लोकांनी या देशातून फूटायचा निर्णय त्यावेळी घेतला होता हे विसरू नका. आता भारतातल्या आठ कोटी मुसलमानांना पाकिस्तान आश्रय देणार नाही, शिवाय त्यांची तिकडे जायची तयारी नाही. ही आठ कोटी माणसे आपण समुद्रात बुडवू शकत नाही. तेव्हा त्यांच्याशी जुळवून घेण्याचा विचार केला पाहिजे. त्यांना बरोबरीचे स्थान देऊन सर्वसामान्य मुस्लिम समाजाची मुल्ला मौलवींच्या संधिसाधू पकडीतून कशी सुटका करता येईल ते पहा. त्यासाठी त्यांचा व्देष करणे सोडून त्यांच्यातल्या सामाजिक सुधारणांना हात घातला पाहिजे. जातीय दंगली करून प्रश्न सुटणे अवघड आहे.[57] हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजाबाबत ज्या प्रमाणे आपले परखड मत मांडले होते त्याप्रमाणे आपल्या देशात एकात्मता राहिली पाहीजे याचा विचार करीत असताना त्यांनी कडव्या हिंदूना सुध्दा त्यावेळी ठणकावून सांगितले की राष्ट्र, देश एकसंघ राहिला पाहीजे व मुसलमानांना सुध्दा आता आपण राष्ट्रीय एकात्मतेमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे. यावरून असे दिसते की हमीद दलवाई यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असे, की ते अत्यंत प्रखर असे पुरोगामी व धर्मनिरपेक्षवादी राष्ट्रभक्त होते.

भारतीय मुस्लिम समाज सनातनी, कर्मठ, अंधश्रध्दा व संघटित आहे. एकूण भारतीय समाजाप्रमाणे तो दारिद्र्याने, निरक्षरतेने, बेकारी, महागाई इत्यादी आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला आहे. पण धार्मिकतेचा पगडा, धर्मचिकित्साविरोध आदि बाबतीत तो अति संवेदनशील आहे. अनेक प्रकारच्या चळवळी व आंदोलने उभारून

समाजाला पुढे नेण्याचा इतिहास असलेल्या संघटित मध्यमवर्गाचा त्यात अभाव आहे. अल्पसंख्य असल्याने या समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. आणि म्हणूनच त्याचा सतत राजकीय वापर होत राहिला आहे. याशिवाय आपला धर्म परिपूर्ण असल्याची त्याची आंधळी श्रध्दा असल्याने मुस्लिम समाजाच्या बाबतीत धर्मनिष्ठा जास्त प्रभावी असल्याचे दिसते. यावरून हमीद दलवाई असे म्हणत ‘‘मोकळ्या मनाने विचार करणारी आत्मनिरिक्षणाची सवय असलेली अंतर्मुख बनलेली आणि धर्मांतीत विचार करणारी माणसे या समाजात बोटावर मोजण्याइतकी सापडतील. यासाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष आत्मनिरिक्षणपर, बौध्दिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात आहे असे मला खेदाने म्हणावे लागते.[58] यावरून हमीद दलवाईंचा मुस्लिम समाजविषयाचा सुधारणावादी दृष्टीकोन दिसतो.

**4.3 महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळींची परंपरा**

**प्रास्ताविक :-**

मुस्लिम समाजात बुध्दिप्रामाण्य व विवेकशीलतेचा एक प्रवाह सुरू व्हावा, तसेच भारताच्या समाजप्रबोधनाच्या चळवळींमध्ये मुस्लिम समाजात प्रबोधनाची उणीव असल्यास एकूणच समाजाचा समतोल विकास होऊ शकणार नाही. मुसलमानांच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी त्या समाजाचे विचार प्रबोधन करणे, त्याला पोषक अशा वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळावी, धर्मांकडे बघण्याचा मुस्लिमांचा दृष्टीकोन बदलला जावा आणि ते आपल्या राष्ट्रीय विचार प्रवाहात सामील व्हावेत म्हणजे खऱ्या अर्थाने दोन्ही समाजाचे ऐक्य होऊ शकेल. मुस्लिम समाजावर मुल्ला-मौलवींच्या परंपरागत रूढी परंपरांचा फार मोठा प्रभाव आहे. समाज सुधारण्यासाठी समाजाला नवे विज्ञानपर विचार समजून घेण्यासाठी अशा धर्मांध विचारांचा काहीही उपयोग नाही. असा विचार समोर ठेवून हमीद दलवाई यांच्या प्रेरणेतुन 22 मार्च 1970 रोजी पुणे येथे ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळा’ची स्थापना झाली.[59] भारतीय मुस्लिम समाजाच्या इतिहासातील ही पहिली क्रांतिकारी संघटना म्हणावी लागेल.

पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक प्रबोधनपर चळवळी निर्माण झाल्या त्यामध्ये आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज अशा अनेक चळवळींचा समावेश आहे. त्यातील ‘मुस्लिम सत्यशोधक समाज’ ही एक चळवळ आहे.

19 व्या शतकाचा पूर्वार्ध हा आधुनिक भारताच्या इतिहासातील धार्मिक, सामाजिक, व राजकीय सुधारणांचा व प्रामुख्याने प्रबोधनाचा उषःकाल मानला जातो. 14 व्या शतकाने युरोपियन राष्ट्रांना प्रबोधनाची प्रेरणा

दिली ते आधुनिक विचार प्रवाह भारतात 19 व्या शतकाच्या आरंभापासून वाहू लागले. त्यापूर्वी भारतीय समाजात बुध्दिस्वातंत्र्य पूर्णपणे लयास जाऊन याची जागा परंपरावादाने घेतली होती. शास्त्रीय दृष्टीकोन मागे पडून हानीकारक रूढीप्रियता बळाबली होती. समाजाची धारणा करणारी मूलगामी धर्मतत्वे व नैतिक मूल्ये यांचा ऱ्हास होऊन शब्दअवडंबर आले होते. यामुळे समाजातील गतिशीलता, विकसनशीलता नाहीशी होऊन समाज जीवनावर अज्ञानाची, गतिहीनतेची, हतबलपणाची छाया पसरली होती. समाजाचा नैतिक कणाच मोडला होता.

19 व्या शतकाच्या प्रारंभी भारतात सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीचा उदय घडून आला. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संपर्कात काही सुबुध्द भारतीयांचा संबंध आला. त्याच्या संपर्कामुळे ब्रिटीश आचार विचारांची जीवन पध्दतीची व उंचावलेल्या राहणीमानाची भारतीयांना माहिती प्राप्त झाली व त्यातूनच भारतात नवे वारे वाहू लागले. भारतीयांनी आपला विवेक जागृत करून पाश्चिमात्य शास्त्रीय चिकित्सा, पुरोगामी दृष्टीकोन, स्वीकारून भारतीय व्यवस्थेचा तसेच धर्मव्यवस्थेचा अभ्यास करून त्यात समाविष्ट झालेल्या अनिष्ट चालीरिती, रूढी, कर्मकांड, अंधश्रध्दा दूर करून खऱ्या धर्मतत्वाची लोकांना ओळख पटवून देण्यासाठी सामाजिक व धार्मिक चळवळी सुरू केल्या.

हमीद दलवाई यांनी घडवून आणलेल्या सामाजिक क्रांतीचे स्वरूप समजावून घेण्याकरिता हमीद दलवाईच्या मुस्लिम सत्यशोधक चळवळी पूर्वी महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळींची सामाजिक, धार्मिक व राजकीय पार्श्वभूमी समजावून घ्यावी लागते. सन 1818 पासुन महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजकारणास सुरूवात झाली.[60] या सत्तेने जी आर्थिक, प्रशासकीय परिवर्तन केली त्यामुळे येथील समाजात मोठी खळबळ उडाली. वरिष्ठ स्तरांतील लोकांना येथे ब्रिटिशांची सत्ता येणे ही आपल्या सामाजिक आणि राजकीय कर्तुत्वाचा घोर पराभव वाटू लागला. त्यामुळे ते अंतर्मुख झाले आणि सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक चिंतनात काही चुकले काय ? आपल्या परंपरा, आपली संस्कृती कुठे सदोष आहे काय ? याविषयी विचार करू लागले. याचा परिणाम म्हणुन देशात सामाजिक, धार्मिक परिवर्तनांच्या चळवळी सुरू झाल्या.

### 4.3.1 ब्राह्मोसमाज :-

सामाजिक व धार्मिक चळवळीच्या इतिहासात बंगाल प्रांताचे योगदान ऐतिहासिकदृष्ट्या महत्वपूर्ण समजले जाते. या परिवर्तन चळवळींचा उगम सर्वप्रथम बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांच्या चळवळीने झाला.[61] आपल्या धर्मातील अनिष्ठ रूढी व परंपरामुळे आपल्या समाजाची अधोगती झाली आहे. आपल्या धर्मात सर्वांगीण क्रांती घडवून आणण्यासाठी आपल्या आचारात आणि विचारात बदल झाला पाहिजे. आपण विज्ञाननिष्ठ झाले पाहिजे, अंधश्रध्दांना तिलांजली दिली पाहिजे, शिक्षणाचा प्रसार करून समाजाचा दर्जा उंचवला पाहिजे, असे ज्या

काही नवशिक्षित तरूणांना वाटत होते. त्यापैकी राजा राममोहन रॉय हे एक होते. रॉय यांनी फारशी, अरबी भाषांचा व इस्लाम तसेच बौध्द साहित्याचा अभ्यास केला होता. विविध धर्मांच्या अभ्यासामुळे त्यांना कोणत्याही धर्माचे आकर्षण राहिले नाही. हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरिती व कर्मकांड यांचा त्यांना परिचय झाला. धर्मसुधारणेला प्राधान्य दिले पाहिजे असे त्यांचे परखड मत बनले होते. यावेळी रॉय यांना देवेंद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर, मधुसुदन दत्त इत्यादींनी सहकार्य केले होते.

राजा राममोहन रॉय यांनी भारतात सर्वांगीण प्रबोधनाची प्रक्रिया सुरू केली. भारतीय प्रबोधनाचे प्रणेते म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान अनन्यसाधारण मानले जाते. जीवनाकडे व समाजाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन शास्त्रीय व बुध्दीवादी असला पाहीजे असे रॉय यांचे मत होते. धर्म ही भारतीय समाजात धारक व प्रेरक शक्ती असल्यामुळे धर्मतत्वावरील कर्मकांडाची बांडगुळे दूर करून मूळ धर्मतत्वाची ओळख भारतीयांना करून देण्यासाठी 20 ऑगस्ट 1828 रोजी त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली.[62] आपल्या धर्मश्रध्दा चुकीच्या आहेत. अनेक देवदेवतांच्या कल्पना सामान्य माणसाची मती गुंग करून टाकतात त्यामुळे त्यांच्यात अंधश्रध्दा बळावतात आणि कर्मकांडाचे अर्थहीन स्तोम माजते. निरनिराळ्या धर्मपंथाचा आणि जाती संस्थेचा उगम यातच आहे यामुळे समाज विभक्त होतो. एकजुट अशक्य होते. चुकीच्या रूढी निर्माण होतात.

आपल्या दुबळेपणाचे हे कारण आहे तेव्हा आपण अनेक देवदेवतांऐवजी एकाच ईश्वरावर श्रध्दा ठेवावी व मूर्तीपूजेला विरोध करावा. सर्व अंधश्रध्दा आणि कर्मकांड यांचा त्याग करावा, जातिभेद, स्पृश्यास्पृश्यतेचे भेद, बालविवाह, सतीची प्रथा इत्यादी बंद करावे. असे केल्याने आपला समाज बलवान होईल आणि ब्रिटिशांप्रमाणे आपणही प्रगती करू अशा प्रकारचे विचार राजा राममोहन रॉय यांनी मांडलेले होते. 'आधुनिक भारत' या ग्रंथात आचार्य जावडेकर लिहितात "ब्राह्मोसमाज हा कोणत्याही ग्रंथांना ईश्वर निर्मित मानीत नाही. तो एक शुध्द व बुध्दिगम्य असा एकेश्वरी पंथ आहे."[63]

अनेक धर्मांच्या सखोल अभ्यासातून राजा राममोहन रॉय यांची दृष्टी व्यापक बनली होती व या व्यापक दृष्टीची छाप त्यांच्या ब्राह्मो समाजावर होती. पण तरीही ब्राह्मो समाज अधिक लोकप्रिय होऊ शकला नाही. हिंदू धर्मातील परंपरागत मूर्तिपूजेविषयीचे प्रेम अजिंक्यच राहिले. धर्माची व्यावहारिक बाजू लक्षात घेणाऱ्या व त्याप्रमाणे दैनंदिन आचरण करणाऱ्या अनेक हिंदूधर्मियांना आपली विविध देवतांची देवळे व तेथील प्रार्थना, पूजा-अर्चा यांचा त्याग करणे शक्य होऊ शकले नाही. त्यामुळे आपल्या धार्मिक व सामाजिक विचारसरणीव्दारे हिंदू समाजाचे हदय परिवर्तन करण्यात राजा राममोहन रॉय यांना पूर्णपणे यशप्राप्ती झाली नाही. त्यांचा ब्राह्मोसमाज भारतीय समाज

जीवनात मूळ धरू शकला नाही. आणि त्यामुळे राजा राममोहन रॉय यांना मूलगामी स्वरूपाची धार्मिक व सामाजिक परिवर्तने भारतीय समाजात करता आली नाहीत.

धर्मातील विकृती समाजाच्या अध:पतनास कारणीभूत होतात. कारण असा धर्म अमानुष आणि घातक रूढी परंपरांचे पोषण करतो अशी राजा राममोहन रॉयची दृढ धारणा होती. राजा राममोहन रॉय यांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे भारतातील सती प्रथेविरूध्द त्यांनी केवळ लोकमतच जागृत केले नाही तर ही प्रथा नष्ट करण्यासाठी ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड विल्यम बेटिंग याला भाग पाडले. सतीच्या प्रथेसंबंधी त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट होते. सतीची प्रथा म्हणजे नैसर्गिक भावना, सामाजिक नितीमत्ता आणि अनुशासनाचा निषेध होय[64] असे ते म्हणत. धार्मिक स्वातंत्र्य व बौध्दीक स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी पाश्चिमात्य शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या राजा राममोहन रॉय यांनी स्त्री स्वातंत्र्याच्या व्यापक प्रश्नाला प्रथम चालना दिली. स्त्रियांना वडिलोपार्जित मालमत्ता वारसा हक्क मिळावा या बद्दलही प्रयत्न केले. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्या खेरीज त्यांचे सामाजिक दास्य नष्ट होणार नाही या तत्वाचा त्यांनी पुरस्कार केला. त्यामुळे सतीची चाल कायद्याने इ. स. 1829 पासून बंद झाली. व लॉर्ड विल्यम बेंटिंगने या संदर्भात कायदा केला. [65] त्याचे सर्व श्रेय राजा राममोहन रॉय यांना दिले जाते.

राजा राममोहन रॉय जाती व्यवस्थेचेही कडवे विरोधक होते. राष्ट्रीय निर्मितीच्या आड येणाऱ्या सामाजिक संस्था या देशात रूढ आहेत. त्यात जाती संस्था ही प्रमुख आहे. जातीसंस्था राष्ट्रभावनेला घातक आहे. म्हणूनच जाती भेदाचे निर्मूलन करणाऱ्यावर ब्राह्मोसमाजाच्या माध्यमातून त्यांनी अधिक भर दिला.[66]

ब्राह्मो समाज जरी भारतीय समाज जीवनात मूळ धरू शकला नसला तरी पण भारतीय समाजात जे जे अनिष्ट आहे त्या विरूध्द राममोहन रॉय यांनी बंड पुकारले होते. सर्व धर्मांच्या एकतेसाठी आणि सामंजस्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. म्हणूनच भारताच्या सामाजिक व राजकीय जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते खऱ्या अर्थाने बुध्दिवादी व बुध्दिप्रामाण्यवादी होते. त्यांची अशी प्रामाणिक समजुत होती की भारताचा विकास पाश्चिमात्य ज्ञानविज्ञानाच्या विकासाच्या अनुषंगाने झाला पाहिजे. राजा राममोहन रॉय यांनी मानवतावाद बुध्दिनिष्ठ शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारून या काळात कार्य केले.

19 व्या शतकात ब्राह्मो समाजाने महत्वाचे कार्य केले, या चळवळीमुळे जागृत तरूणांचा एक वर्ग पुढे आला व त्यांनी या चळवळीचा देशभर प्रसार केला.

महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक म्हणून गोपाळ हरी देशमुखांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी 'प्रभाकर' या साप्ताहिकातून 'लोकहितवादी' या नावाने प्रकाशित केलेली 100 पत्रे (शतपत्रे) महाराष्ट्रात सुप्रसिध्द आहेत. त्यांनी या पत्रांमधून ब्राह्मणी संस्कृती आणि धर्मकल्पनांवर कठोर प्रहार केले.[67] लोकहितवादींचा

धर्मवाङ्:मयाचा अभ्यास चांगला असल्याने धर्माविषयी त्यांनी समतोल विचार मांडले. धर्मांचा उगम मानवाच्या बुध्दीमध्ये झाला असे त्यांचे ठाम मत होते. आजचा धर्म अतिशय विकृत झाला आहे. धर्माच्या नावावर अनेक निंद्य प्रकार घडत आहेत असे त्यांचे मत होते. लोकहितवादींनी आपली धार्मिक शिकवण समाजाला सांगितली. त्यामध्ये ते म्हणतात ''मानवाच्या सुखासाठी आणि हितासाठी धर्मशास्त्र आणि नितीशास्त्र यांचा जन्म झाला. ही शास्त्रे ईश्वरप्रणित नसून मानवप्रणित आहेत. त्यांच्यात सुधारणा करण्याचा मानवाला अधिकार आहे. मूर्तीपूजेचा अतिरेक करू नये, जपतप हा खरा धर्म नसून दया हा खरा धर्म आहे. भक्ती व वैराग्य यापेक्षा कर्म चांगले. समाजाच्या उत्कर्षासाठी धर्मनियम केले आहेत. ज्याने उत्कर्ष साधतो त्यालाच धर्म म्हणावे.'' [68] धार्मिक बाबतीत प्रत्येकाला आपल्या विचारांप्रमाणे आचार करण्याची आणि लिहिण्याबोलण्याची मोकळीक असावी असे लोकहितवादींनी म्हंटले होते.

लोकहितवादींचे धार्मिक विचार पाहिल्यास त्यांच्या पुरोगामित्वाची कल्पना येते. समाज व धर्म यातील प्रत्येक अनिष्ट गोष्टींवर त्यांनी टीका केली. त्यांच्या लिखाणामुळे धार्मिक सुधारणांची निकड हिंदू समाजाला पटु लागल्याने धर्मसुधारणा चळवळीला गती मिळाली.[69]

**4.3.2 मानवधर्म सभा :-**

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी सुरत येथे शासकीय सेवेत असताना तेथे दुर्गाराम मंछाराम मेहता, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय व दामोदर दास या आपल्या सुधारणावादी विचारांच्या मित्रांच्या सहकार्याने 22 जून 1844 रोजी मानवधर्म सभा स्थापन केली.[70] या संस्थेचे अध्यक्ष म्हणून दादोबा पांडुरंग यांची तर कार्यवाह म्हणून दुर्गाराम मंछाराम यांची निवड झाली. प्रत्येक धर्मात चांगल्या वाईट गोष्टी असतात. सर्व धर्मातील चांगले तेवढे घेऊन कार्य केले तर धर्माधर्मांतील भांडणे बंद होऊन अखिल मानवजातीचे कल्याण होईल या उद्देशाने मानवधर्म सभेची स्थापना झाली होती. मानवधर्म सभेने आपली सात धर्मसूत्रे किंवा मूलभूत तत्वे मानली होती व त्यानुसार सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पुरस्कार केला होता.

1. ईश्वर एकच असून त्याची सर्वांनी भक्ती करावी.
2. खरा धर्म हा ईश्वरनिष्ठेमध्ये आहे.
3. सर्व जगताचा धर्म एक आहे तो म्हणजे मानवधर्म होय.
4. प्रत्येक मानवास विचार स्वातंत्र्य आहे.
5. सर्वांनी विवेकाने व सदाचाराने वागावे.
6. सर्वांची जात एकच असून ती मानव जात होय.

7. सर्वांनी स्वतःच्या उन्नतीकरिता शिक्षण घ्यावे. [71]

मानवधर्म सभेने पूर्वापार चालत आलेल्या हिंदू समाजातील अंधश्रध्दा नाकारल्या. या सभेचा हिंदू धर्मातील जातिसंस्थेलाही विरोध होता. म्हणून जातिभेद न पाळणे हे या संस्थेचे ब्रीद ठरले. मानवामानवातील समानतेवर मानवधर्म सभेच्या सभासदांचा विश्वास होता. सर्वधर्मसमभाव व मानवतावादी दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न मानवधर्मसभेव्दारे आंशिक स्वरूपात सफल झाला. कारण निरपेक्षबुध्दीने काम करणारे निष्ठावान कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळाले नाही त्यामुळे मानवधर्म सभेला पूर्णविराम मिळाला.

**4.3.3 परमहंस सभा :-**

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांची मानवधर्म सभा अल्पजीवी ठरली परंतु दादोबा पांडुरंग यांनी निराश न होता आपल्या काही सहकार्यांबरोबर सन 1849 मध्ये मुंबई येथे ‘परमहंस सभा’ किंवा ‘परमहंस मंडळी’ नावाची संस्था स्थापन केली.[72] या सभेच्या स्थापनेत भाऊ महाजन, डॉ. आत्माराम पांडुरंग, या सुधारकांचा हातभार लागला. खरे तर मानवधर्म सभा व परमहंस सभा यांचे सभासद थोड्या फार फरकाने तेच होते.[73] हिंदू धार्मिक, सामाजिक परंपराच्या विरूध्द ते एक बंडच होते. परमहंस सभेच्या सभासदांना जातिभेद न पाळण्याची शपथ घ्यावी लागे. त्यांना ख्रिश्चनांच्या हातचा ब्रेड आणि मुस्लिमांच्या हातचे पाणी घ्यावे लागे. आठवड्यातून एकदा त्यांच्या सभा होत. त्यावेळी त्यांना तेथे ठेवलेल्या रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करावी लागे. त्यांच्या सभेत समाज सुधारणांच्या विषयांवर चर्चा होत. अर्थातच त्या सभासदांपुरत्या मर्यादित असत. समाजरोषाच्या भितीने ते सभेच्या कामकाजा विषयी किंवा तेथे होणाऱ्या चर्चाविषयी पूर्ण गुप्तता पाळीत.[74] त्यामुळे या सभेचे विचार त्यांच्या सभासदांपुरते मर्यादित राहिले. समाजात बाहेर व्यापक प्रमाणात ते विचार पोहचले नाहीत.

जातिभेद पाळू नये, मूर्तिपूजा करू नये, पुनर्विवाह करू द्यावेत. आज या गोष्टी अगदी सामान्य वाटतील पण ज्या काळात ही संस्था स्थापन झाली होती. तो काळ विचारात घेतला तर त्या एका मर्यादित अर्थाने क्रांतिकारक स्वरूपाच्याच होत्या असे म्हणावे लागते. परमहंस सभेचे धुरीण दादोबा पांडुरंग या सभेच्या गुप्त सभांना हजर राहात नसत. ‘एक जगव्दासी आर्य’ या टोपण नावाने दादोबांनी लिहिलेले ‘धर्मविवेचन’ नावाचे हस्तलिखित सभासदांना वाचावयास दिले जात असे.[75] कोणताही धर्म ईश्वरनिर्मित नाही असे प्रतिपादन या हस्तलिखितात केले होते. ईश्वर एक आहे व सर्व मनुष्यांची जात व धर्म एकच आहे. अशी परमहंस सभेच्या संस्थापकांची भूमिका होती.

परमहंस सभेच्या शाखा पुणे, अहमदनगर, सातारा, बेळगाव व रत्नागिरी या ठिकाणी स्थापन करण्यात आल्या होत्या. अहमदनगर शाखेचे सभासद तर कासमभाई महंमदजी ढालवाणी या नावाचे एक मुसलमान गृहस्थ

होते.[76] सभेच्या लोकांनी गुप्तपणे मुंबई इलाख्याबाहेर सुध्दा सभेचा प्रसार केला व त्यामधुन कलकत्ता, मद्रास, काशी येथे शाखा सुरू झाल्या. असे मुंबईचे वर्णन लिहिणारे गोविंद नारायण माडगावकर म्हणतात. सभेच्या उद्दिष्टांना हळूहळू यश प्राप्त होऊ लागले व त्यामुळे जातिभेद न मानणे, मूर्तिपूजेला विरोध करणे, विधवा विवाहाला चालना देणे इत्यादी गोष्टी सभेकडून होऊ लागल्या. म. फुल्यांचाही काही काळ परमहंस सभेशी संबंध आला होता. परमहंस सभेचे सभासद केशव शिवराम भावलकर हे पुण्यात सभेचे काम पहात होते. भावलकर व म. फुल्यांनी पुण्यात या सभेच्या कामाला मोठी चालना दिली. [77] पुढे परमहंस सभेतूनच 'प्रार्थना समाज' अस्तित्वात आला. त्याचे तत्वज्ञान म. फुल्यांना न पटल्याने त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला.

सन 1860 पर्यंत परमहंस सभेचे कामकाज चांगले चालले होते. बाबा पद्मनजीच्या आठवणीनुसार एका सभासदाने सन 1860 साली सर्व सभासदांची नावे फोडल्याने व ती वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याने परमहंस सभेला ओहोटी लागली, मुंबईतील एक शिक्षक रामकृष्ण अनंत जोशी उर्फ गुजाबा जोशी पुणेकरने परमहंस सभेवर टिका करणारी एक कविता (काव्य) ''परमहंस मत् प्रशंसा'' या नावाने प्रसिध्द केले. हे काव्य सभेच्या निंदानालस्तीने पूर्ण भरलेले होते. यावेळी सभेची बाजू मांडण्याचे काम भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' मधून केले.[78] परंतु ज्यांनी उत्तर देणे आवश्यक होते ते गप्प राहिले, त्यामुळे सभेच्या कार्याबद्दल लोकांच्या मनात संशय निर्माण झाला. तसेच सभासदांची नावे वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याने सामाजिक बहिष्काराची भीती सदस्यांच्या मनात घर करू लागली. सदस्यांत आपआपसात भांडणे सुरू झाली. सदस्यांनी हळूहळू काढता पाय घेतला व त्यामुळे चालक मंडळीना परमहंस सभेचे विसर्जन करावे लागले. तरी दहा ते बारा वर्षांच्या कालावधीत परमहंस सभेने सामाजिक सुधारणेची चांगली पार्श्वभूमी तयार केली.

### 4.3.4 प्रार्थना समाज :-

19 व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात राजा राममोहन रॉय यांनी सामाजिक व धार्मिक प्रबोधनाच्या कार्याचा प्रारंभ केल्यापासून अनेक भारतीयांनी देशाच्या विविध भागात भिन्न गटात, संप्रदायात व्यक्तिगत किंवा संघटितरित्या त्यांचे हे कार्य जोमाने चालवले होते. या सामाजिक व धार्मिक सुधारणेने आधुनिक विचाराने नवे रक्त मिळून चेतनाहीन बनलेला समाज क्रियाशील बनू लागला. या धार्मिक सामाजिक, वैचारिक जागृतीने राजकीय जागृतीला अनुकुल अशी पार्श्वभूमी याकाळात महाराष्ट्रात तयार झाली होती. या समाज प्रबोधनाच्या काळात समाज सुधारणेचे कार्य करणाऱ्यात ब्राह्मोसमाज व प्रार्थना समाजाचे कार्य महत्वाचे होते. महाराष्ट्रातील प्रार्थना समाजाचे कार्य आधुनिक भारताच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते.

परमहंस सभेच्या विसर्जनानंतरही तिच्या तत्वाविषयी आत्मीयता बाळगणारा व त्या तत्वांचे आकर्षण असणारा विचारवंताचा एक वर्ग तेथे होताच. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी धर्मसुधारणेच्या कार्याला गती देण्याची आवश्यकता या वर्गाला वाटत होती. याच सुमारास इ. स. 1864 मध्ये केशवचंद्र सेन मुंबईत आले होते. ते समाजसुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळे मुंबईतील समाजसुधारकांना नव्याने प्रेरणा मिळाली आणि त्याचा परिणाम म्हणजे 31 मार्च 1867 रोजी मुंबई येथे डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी पुढाकार घेऊन ''प्रार्थना समाजाची'' स्थापना केली. सुरूवातीला या संस्थेला 'एकेश्वर भक्तमंडळी' असे नांव होते.[79] या संघटनेत डॉ. आत्माराम पांडुरंग, वामन आबाजी मोडक, न्या. सर नारायण गणेश चंदावरकर, न्या. म. गो. रानडे व डॉ. रा. गो. भांडारकर इत्यादी विचारवंतांचा सहभाग होता. डॉ. आत्माराम पांडुरंग हे या सभेचे पहिले अध्यक्ष होते.[80]

प्रार्थना समाजावर बंगालमधील ब्राह्मो समाजाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. त्याचे स्वरूप प्रामुख्याने धार्मिक होते. प्राचीन भारतीय आणि पाश्चिमात्य ज्ञान अशा दोन्ही विचारांचा त्यावर प्रभाव होता. ईश्वर हा पिता आणि अखिल मनुष्य जाती ही माता आहे. हे त्यांचे प्रमुख सूत्र होते. त्यांचा मूर्तिपूजेवर विश्वास नव्हता. याचा प्रसार शहरी सुशिक्षित वर्गापलीकडे झाला नाही. याचे मुख्य कारण या समाजाचे कार्य गुप्त नसले तरी प्रार्थना आणि चर्चापुरतेच मर्यादित होते आणि ते ही केवळ आपल्या सभासदांमध्ये.[81] सामुहिक प्रार्थना, चर्चा आदीमुळे प्रार्थना समाजाचे स्वरूप वर-वर ख्रिस्ती धर्मासारखे दिसत असले तरी त्यांचे मुख्य प्रेरणास्थान उपनिषदे आणि संतसाहित्य हेच होते.[82]

परमहंस सभेचे स्वरूप असलेल्या प्रार्थना समाजावर बंगाल मधल्या ब्राह्मो समाजाचा प्रभाव असला तरी ब्राह्मो समाजाचा अनुभव व महाराष्ट्रातील परिस्थिती लक्षात घेऊन न्या. म. गो. रानडे व डॉ. रा. गो. भांडारकरांनी समाजाची तत्वे व उपासना पध्दती निश्चित केली होती. ''विवेचक बुध्दीने सर्व धर्मांमध्ये जे सत्य आहे त्याचे ग्रहण करावे आणि असत्याचा परित्याग करावा'' हा प्रार्थना समाजाचा पहिला सिध्दांत होता.[83] सर्वसंग परित्याग करून वनवास स्वीकारणे प्रार्थना समाजाला मान्य नव्हते. मूर्तिपूजा त्याला मान्य नव्हती. प्रार्थना समाजाने कबीर, नानक यांच्या ग्रंथांना तसेच तुकाराम महाराजांच्या अभंगांना विशेष महत्व दिले.

प्रार्थना समाज हा धर्मसुधारणेच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेला एक सुधारणावादी पंथ होता. त्याची उद्दिष्टे व तत्वे निश्चित स्वरूपाची होती. प्रार्थना समाजातील व्यक्ती आपल्या धर्मात, समाजात सुधारणा घडून याव्यात अशा विचारसरणीचे होते. प्रार्थना समाजाला विव्दान व सुधारक विचारांच्या अनेक व्यक्ती नेते म्हणून

लाभल्या असल्या तरी प्रार्थना समाजाचे कार्य मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा व अहमदनगर अशा काही शहरांमध्ये पसरू शकले. प्रार्थना समाजाने विधवा विवाह पुरस्कार, बाल विवाहाला विरोध, अस्पृश्यता निवारण तसेच स्त्री शिक्षणाचाही जोरदारपणे पुरस्कार केला होता.[84] प्रार्थना समाजाने मुंबईत शाळा चालवल्या, वृत्तपत्र काढले, पंढरपुरच्या अनाथाश्रमासारख्या उपयुक्त संस्था नावारूपाला आणल्या तरी प्रार्थना समाजाची चळवळ मूठभर प्रतिष्ठित उच्च विद्याविभूषित वरिष्ठ जातीच्या माणसांपुरती मर्यादित राहिली. सामुदायिक प्रार्थना आणि चर्चा आपल्या सभासदापुरत्याच मर्यादित ठेवण्याच्या धोरणामुळे आणि त्यातील वरिष्ठ जातीच्या नेतृत्वामुळे सामान्य माणुस या समाजाच्या कार्याविषयी नेहमीच अलिप्त, उदासीन आणि सहानुभूतीशून्य राहिला.

### 4.3.5 आर्य समाज :-

आधुनिक भारताच्या जडणघडणीत स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाजाचा मोलाचा वाटा आहे. आर्य समाजाच्या स्थापनेमुळे धार्मिक व सामाजिक जागृतीच्या कार्याला नवी दिशा प्राप्त झाली. आर्य समाजाच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या सदस्यांनी त्यागी, संन्यस्त वृत्तीने लोकसेवेचे व्रत साधून मानवसेवेचा नवा आदर्श समाजापुढे ठेवला.

स्वामी दयानंद सरस्वती हे खऱ्या अर्थाने समाजसुधारक होते. त्यावेळी हिंदू धर्मातील अंधश्रध्दा, रूढी, परंपरा आणि चालिरिती यामुळे जेव्हा हिंदु समाजाचे विघटन होण्यास सुरूवात झाली होती. अशा परिस्थितीमध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजातील वाईट चालीरिती, रूढी, आणि अंधश्रध्दा या विरूध्द बंड उभारले होते. म्हणूनच खऱ्या अर्थाने ते सामाजिक क्रांतीचे जनक होते. त्याच्या मनात प्रथमपासूनच मूर्तीपूजेबद्दल चीड होती. हिंदू धर्मातील रूढी, परंपरा या कशा निरूपयोगी आहेत हे जनतेला पटवून देऊन अव्दैतवादाचा प्रचार त्यांनी केला. वेदांचे महत्व मान्य करून त्यातील सर्वोच्चता त्यांना मान्य होती. हिंदू धर्माच्या पुनरूज्जीवनासाठी एखादी संघटित संस्था असावी असे त्यांना वाटत होते. आणि त्यातुनच त्यांनी 10 एप्रिल 1875 मध्ये मुंबई येथे ''आर्य समाजाची'' स्थापना केली.[85] 24 जुन 1877 रोजी लाहोर येथे डॉ. रहीमखान यांच्या हवेलीत आर्य समाजाची शाखा स्थापन झाल्यानंतर आर्य समाजाचे 10 नियम सुस्पष्टपणे लोकांच्यासमोर मांडण्यात आले. हे नियम आर्य समाजाची घटना मानले जातात.[86] घटनेवर आधारित ही संघटना असल्यामुळे सुशिक्षित समाजाने त्यावेळी आर्य समाजाला मोठा पाठिंबा दिला.

वेद हे सर्व जातीसाठी व समाजासाठी आहेत. सर्वांनाच त्यांचे मनन, चिंतन करण्याचा अधिकार आहे असे स्वामी दयानंद सरस्वतींचे मत होते. आर्य समाजाने अस्पृश्यता उध्दाराबरोबरच स्त्री उध्दाराचे कार्य हाती घेतले होते. त्यावेळी समाजात स्त्रियांना पुरूषासारखे अधिकार नव्हते. स्त्रियांना शिक्षण स्वातंत्र्य नव्हते. मुसलमानी

आक्रमणामुळे पर्दा प्रथा वाढीस लागली होती. म्हणून त्यांनी स्त्री मुक्तीसाठी आंदोलन सुरू केले होते.[87] बालविवाहासारख्या अनिष्ट चालींना आर्यसमाज प्रखर विरोध करीत असे. ही चळवळ वैदिक धर्माभिमानी लोकांची असूनही महाराष्ट्रातील कर्मठ सनातनी ब्राह्मणांना आणि त्यांच्या पाठीराख्यांना ती मुळीच रूचली नाही. स्वामी दयानंदाच्या सन्मानार्थ निघालेल्या मिरवणुकीस उत्तर म्हणून पुण्यातील प्रतिगामीनी एका गाढवाची मिरवणुक काढली. त्यांनी एक गाढव सजवून त्याचे 'गर्दभानंद' असे नाव ठेवले. गर्दभानंदाच्या या मिरवणुकीची गाठ स्वामी दयानंदांच्या मिरवणुकीशी पडताच झालेल्या गोंधळाचे विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी उपहासाने वर्णन करून स्वामीजींची टर उडविली आहे.[88]

स्वामी दयानंद सरस्वतीनी आपल्या "सत्यार्थ प्रकाश" या ग्रंथातून नित्यनेमाने ध्यानधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली असून यम, नियम, आसन व प्राणायाम याव्दारे आत्मा व अंतःकरणाची पवित्रता. प्राप्त करणे म्हणजे सत्य दर्शन असून सत्याचा खरा धर्म समजावून घेणे होय. या सत्याच्या अर्थाने मानवी जीवन प्रकाशित होते. हा त्यांचा सिध्दांत होता. भारतीय संस्कृतीच्या रक्षणार्थ "वेदांकडे परत चला" हा त्यांचा संदेश रूसो यांच्या "निसर्गाकडे परत चला" या संदेशाइतकाच महत्वाचा आहे. राष्ट्रासमोरील आजच्या सर्व समस्यांची उत्तरे वेदांमध्ये आहेत म्हणून वेदांकडे परत चला असे त्याचे मत होते.[89]

आर्य समाजाने राष्ट्रीय जागृतीचे कार्य केले. राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, अखंडता, सामाजिक समता, सामाजिक प्रबोधन, धार्मिक ऐक्य, स्त्री शिक्षण, स्वातंत्र्य व आर्थिक पुनर्रचना आदि विचारांचा पुरस्कार करून भारतीय समाजास जागे केले होते. भारतातील राजकीय व्यवस्था लोकशाही तत्वावर आधारलेली असावी. समाजाच्या कल्याणासाठी असलेल्या कायद्याचे पालन सर्वांनी करावे या तत्वांचा पुरस्कार आर्य समाजाने केला होता. त्यामुळेच राष्ट्रीय चळवळीतील जहाल गटात आणि क्रांतीकारी चळवळीतील आघाडीला असलेले पंजाबातील लाला लजपतराय, लाला हंसराज, लाला हरदयाळ, स्वामी श्रध्दानंद यासारखे बरेच क्रांतिकारक आर्य समाजाच्या चळवळीशी संबंधित होते.[90]

उमा चक्रवर्ती यांच्या मते "स्वामी दयानंद सरस्वती कलकत्यात असताना ते स्त्रियांच्या स्थानाबद्दल विचार करू लागले. त्यांच्यावर ईश्वरचंद्र विद्यासागरांचा प्रभाव होता. मुले नसलेल्या विधवांनाच पुनर्विवाहाची परवानगी दिली पाहिजे या मतावर ते ठाम होते. प्राचीन काळात नवऱ्याच्या मृत्युनंतर दिराशी लग्न करण्याची नियोग पध्दत होती असे ही ते सुचवू पाहत."[91] स्वामी दयानंद सरस्वतींच्या म्हणण्याप्रमाणे प्राचीन भारतात बहुपत्नीकत्व, बालविवाह, स्त्रियांना एकटे टाकणे यासारख्या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या. मुख्य म्हणजे पुरूषांच्या बरोबरीने

स्त्रियांना हक्क होते. बालविवाहामुळेच बालविधवांचा प्रश्न समाजात निर्माण झाला होता. त्यावेळी त्यांनी विधवा पुर्नविवाह चळवळीवर भर दिला. वृत्तपत्रांमध्ये विधवा विवाहाची जाहिरात देऊन विधवा विवाहाची पध्दत सुरू केली.[92] बालविवाह प्रमाणेच बहुपत्नीकत्वाची पध्दत रूढ होती. या पध्दतीमुळे स्त्रियांचे जीवन दयनीय होते. या प्रथेला आर्य समाजाने प्रखर विरोध केला.

सन 1880 च्या दशकाच्या मध्यास आर्य समाजाने स्त्रीशिक्षण चळवळीवर भर दिला. मुलींसाठी शाळा सुरू केल्या. जालंधर येथे आर्य समाजाने मुलींसाठी सन 1890 मध्ये आर्यकन्या शाळा उभारली.[93] या शाळेत बालविधवांना अविवाहित मुली म्हणून प्रवेश दिला. तसेच आर्य समाजाने स्त्रियांसाठी वैदिक शाळा आणि विधवांसाठी आश्रम चालविले. मुलींना उच्च शिक्षण देण्याच्या प्रश्नावरून आर्य समाजामध्ये दोन गट पडले होते. मुला-मुलींना समान शिक्षण द्यावे का ? हिंदू मुलींच्या शिक्षणाचे विषय मुलांपेक्षा वेगळे असावेत का ? या विषयी हा वाद होता. परंतु पुढे सन 1891 मध्ये मुलींच्या उच्च शिक्षणासाठी कन्या महाविद्यालय सुरू केले. यामध्ये मुलभूत साक्षरते व्यतिरिक्त संख्याशास्त्र आणि काव्य शिकविले जाई तसेच इतर विषयांमध्ये आर्य समाजाचे साहित्य, शिक्षण, भरतकाम, संगीत, आरोग्य हे विषय शिकविले जात.[94]

प्रार्थना समाज व ब्राह्मोसमाज यांच्यापेक्षा लोकांवर आर्य समाजाचा अधिक पगडा होता. भारतातील प्रमुख ठिकाणी गुरूकुल विश्वविद्यालय, माध्यमिक शाळा, अनाथालये, विद्याश्रम हे स्थापन करून आर्य समाजाने भारताच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले. या संस्थामधून मुलांप्रमाणे मुलीही शिकु लागल्या. त्यामुळे आर्य समाजाने स्त्री-शिक्षणाबाबत घेतलेला दृष्टिकोण भारतीय स्त्रीशिक्षणाचे प्रमाण बाढवणारा ठरला.

आर्य समाजाने प्रस्थापित केलेल्या शिक्षण संस्थात पौर्वात्य व पाश्चात्य शिक्षणक्रमाचा मुख्यतः भौतिकीशास्त्रांचा समन्वय साधण्यात आला. इतकेच नव्हे तर अशा शिक्षण व्यवस्थेतून विद्यार्जन करणाऱ्या तरूणांत राष्ट्रीयत्वाची प्रखर राष्ट्राभिमानाची भावना रूजविण्याचा प्रयत्न केला होता.

19 व्या शतकात एखाद्याने हिंदू धर्म सोडून दुसऱ्या धर्मात प्रवेश केला तर त्यास पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश नव्हता. या उलट ख्रिश्चन, मुसलमान हे धर्मपरिवर्तनाव्दारे आपला धर्म आणि समाज वाढविण्याचे कार्य करीत होते. हिंदू धर्म कायम ठेवण्यासाठी आर्य समाजाने शुध्दीकरणाची चळवळ सुरू केली होती.[95]

आधुनिक भारताच्या सामाजिक व धार्मिक चळवळीचा इतिहासात आर्य समाजाचे स्थान महत्वाचे आहे. ख्रिस्ती व इस्लामी आक्रमणाविरूध्द हिंदूना जागृत करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. वैदिक धर्माचे स्वरूप स्पष्ट करून हिंदू धर्मातील अनिष्ट रूढीचे तीव्र शब्दात खंडन केले. शुध्दी कार्यात आर्य समाजाने पुढाकार घेतला. वैदिक

धर्मांच्या शिक्षणाबरोबरच पाश्चिमात्य शिक्षणाचा लाभ भारतीयांनी घ्यावा या हेतुने आर्य समाजाने अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये सुरू केली. त्यांच्या या कार्यामुळे राष्ट्रीय चळवळीला पोषक वातावरण निर्माण झाले. म्हणून आर्य समाजाविषयी बिपीनचंद्र पाल म्हणतात, 'हिंदू समाजात सामाजिक व धार्मिक जागृती करून त्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले.'[96] आर्य समाजाच्या देशभर अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहाने शाखा उघडल्या जाऊ लागल्या. अत्यंत अल्पकाळात आर्य समाजाच्या अनेक शाखांचे देशभरात जाळेच निर्माण झाले. यावरून आपणास विसाव्या शतकातील भारताची पाया भरणी आर्य समाजाने केली असे म्हणता येईल.

### 4.4 मुसलमानांमधील सुधारणावादी चळवळी :-

भारतात 19 व्या शतकाच्या प्रारंभी सुरू झालेल्या समाजसुधारणेच्या व धर्मसुधारणेच्या चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने हिंदू धर्मापुरतीच सीमित राहिली होती. सुरूवातीच्या काळातील बहुतेक भारतीय समाजसुधारक हिंदूधर्मीय होते. त्यांनी आपल्या धर्मातील अनिष्ट चालीरीती, रूढीविरूध्द लोकांत जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न केले होते. त्यामुळे त्यांच्या कार्याचा प्रभाव प्रामुख्याने हिंदूधर्मीयावरच पडला होता. परंतु पुढील काळात अन्य धर्मांच्या लोकांतही बदलाचे व नवविचारांचे वारे वाहु लागले. त्यातून मुस्लिम धर्मातही सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले.

मध्ययुगीन काळापासून सन 1857 पर्यंत मुस्लिम राज्यकर्त्यांनी कमी अधिक प्रमाणात हिंदुस्थानावर सत्ता गाजविली असल्याने या समाजाचा हिंदुस्थानावर प्रभाव राहिला होता. ब्रिटिश सत्तेच्या उदयाने मुसलमानांची सत्ता गेली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनेक राज्ये खालसा केली व राजांना जिंकून घेतले. त्यांच्या विस्तारवादी धोरणामुळे मोंगल व इतर मुसलमानी सरदारही सत्ताहीन झाले. त्यामुळे इ. स. 1857 च्या क्रांतियुध्दापूर्वीच हिंदूप्रमाणे मुसलमानही असंतुष्ट होते. इ. स. 1833 मध्ये मेकॉलेच्या खलित्यानुसार इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. त्यामुळे हिंदुस्थानातील हिंदू व मुस्लिम समाजात नवजागृती होऊ लागली होती. पाश्चात्यीकरणामुळे हिंदू व मुस्लिमांनाही आपआपल्या समाजातील उणीवांची जाणीव होऊ लागली व काही अंशी धर्माबद्दलचा अभिमान जागृत झाला. मुस्लिमांमध्ये हिंदूसारखी जातीबंधने व अस्पृश्यता नव्हती, परंतु बालविवाह, बहुपत्नीत्व, पडदा पध्दती ह्या अनिष्ट चालीरीती अस्तित्वात होत्या. त्याचा सर्वांत मोठा फटका स्त्रीयांना बसत असे. असे असले तरी मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्याचे काही प्रयत्न झाले. मुस्लिम समाजातील असंतोषाची व धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील जागृतीची बहुतेक कारणे समान होती. परंतु पुढे परिस्थितीनुरूप भेद निर्माण होऊ लागले.

19 व्या शतकाच्या सुरूवातीपासुन हिंदूच्या धार्मिक आणि पुनरूज्जीवन चळवळीमुळे त्यांच्यात झालेले बदल मुस्लिम नेत्यांना जाणवत होते. त्यामुळे पाश्चात्य शिक्षण न घेणे व ब्रिटिशांविरोधी नीती अवलंबणे याचे परिणाम मुस्लिम समाजाला घातक ठरतील याची जाणीव शहा अब्दुल अजीज सारख्या दूरदृष्टीच्या मुस्लिम नेत्याला झाली होती. त्यांनी मुस्लिम समाजाच्या पुनरूज्जीवनाकरिता कलकत्ता येथे मदरसा मध्ये इंग्रजीचे वर्ग सुरू केले होते.[97] युरोपियन मिशनऱ्यांनी हिंदू व मुस्लिम धर्मावर केलेली जहाल टिका ही मुस्लिमांच्या आत्मशोधनासाठी उपयोगी ठरली. हिंदू समाजात राजा राममोहन रॉय यांनी तर मुसलमानात शहा वलीउल्लाह यांनी धर्मक्षेत्रातील अनिष्ट धर्मकल्पना, रूढी नष्ट करून धर्माचे पुनरूज्जीवन करण्याकरिता प्रयत्न केले.

**4.4.1 वहाबी चळवळ :-**

इ. स. 1857 च्या क्रांतियुध्दापुर्वीच मुसलमानांनी ब्रिटिश राजवटीस विरोध केला होता. वहाबी चळवळीच्या नेत्यांनी हिंदुस्थानातील मुसलमानांना धर्माच्या नावाखाली संघटित करून क्रांतीची पूर्वतयारी करून घेतली होती. वहाबी चळवळ अरब प्रांतात 18 व्या शतकाच्या शेवटी सुरू झाली होती. अरबस्तानात तिचे स्वरूप सुरूवातीस पूर्णतः धार्मिक होते. मुस्लिमांमधील पहिली सुधारणा चळवळ म्हणून वहाबी चळवळीचा उल्लेख केला जातो. अरबस्तानातील महंमद वहाब नावाचा एक मुस्लिम धर्मनेता उदयाला आला. तो जीर्णमतवादी, दुराग्रही, परिवर्तनविरोधी व सुधारणाव्देष्टा होता. या व्यक्तीने प्राचीन मुस्लिम धर्माचे पुनरूज्जीवन करण्यासाठी वहावी चळवळ सुरू केली.[98]

शाह वलीउल्लाह (इ. स. 1702 ते 1762) 18 व्या शतकातील भारतीय मुसलमानांचा प्रथम नेता होता. ज्याने भारतीय मुसलमानांच्या पतनाबद्दल चिंता व्यक्त केली. मुसलमानांमध्ये असलेल्या अंधप्रथा, चालीरीतीकडे त्याने लक्ष वेधले. त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी जे कार्य केले त्यामध्ये भारतीय मुसलमानातील आपआपसातील विभाजन कमी होऊन परस्पर सामंजस्यावर त्याने भर दिला. धार्मिक बाबतीत व्यक्तीने आपल्या वैयक्तिक अंतःप्रेरणेवर विवेकानुसार भर द्यावा असे म्हंटले. जेथे कुराण आणि हदीसच्या शब्दांची परस्पर विरोधी व्याख्या केली जाते. तेथे व्यक्तींनी आपल्या विवेकानुसार व अंतःप्रेरणेनुसार निर्णय घ्यावा असे प्रतिपादन त्याने केले होते.[99]

'भारतीय प्रबोधन' या ग्रंथातील 'मुस्लिम समाज' या लेखात शाह वलिउल्लाह या धार्मिक राजकीय नेत्याबद्दल दलवाईंनी लिहिले की, "या वलिउल्लाहाने भारतीय मुसलमानांना प्रथम राजकीय दृष्ट्या संघटित होण्याचे आवाहन केले. सत्ता मुसलमानांच्या हातून निसटत आहे असे त्याने प्रथम म्हंटले. वहाबी चळवळीने

ब्रिटिश राज्यकर्त्यांची 19 व्या शतकाच्या आरंभी काही काळ झोप उडवली होती.''[100] वलीउल्लाहची चळवळ ही धार्मिक आणि राजकीय या दोन्ही स्वरूपाची होती.

19 व्या शतकाच्या सुरूवातीच्या दोन दशकात हीच चळवळ भारतातही सुरू झाली. भारतात या चळवळीचे नेतृत्व सय्यद अहमद बरेली यांनी केले होते. या चळवळीमुळे भारतातील मुसलमान संघटित झाले. व त्यांना आपल्या राजकीय हक्काची जाणीव होऊ लागली. मुसलमान समाजातील काही धार्मिक कल्पनांचा नव्याने विचार होऊ लागला. पीरसाहेबाच्या पूजेस विरोध करण्यात आला. शेख करामत अली यांनी चळवळीचे शांततापूर्ण नेतृत्व केले व मुस्लिम समाज सुधारणेचा प्रयत्न केला.[101] ब्रिटिश राजवटीस विरोध करण्यासाठी सर्व मुसलमान संघटित झाले परंतु दुर्दैवाने धर्माभिमानाच्या प्रेरणेने ते हिंदूच्याही विरोधात गेले.

18 व्या शतकातील भारतीय मुस्लिमांचा नेता शहा वलीउल्लाह, त्याचा मुलगा अब्दुल अझीझ, त्याचा नातु महंमद इशाक आणि त्याचा शिष्य सय्यद अहंमद बरेली हे कमी अधिक प्रमाणात वहाबी पंथी होते. शाह वलीउल्लाह प्रथम काही प्रमाणात परिवर्तन व सुधारणा यांना अनुकुल होता. पण भारतीय जनतेशी मुस्लिमांनी कधीही एकरूप होता कामा नये, हे त्याचे मुख्य सूत्र होते. डॉ. आय. एच. कुरेशी म्हणतात, ''हिंदुस्थानातील जीवनांशी मुस्लिमांनी एकात्म होण्यास शाह वलीउल्लाहचा सक्त विरोध होता. सर्व बाहेरच्या मुस्लिम जगाशीच त्यांचे संबंध जागते राहिले पाहिजेत, तरच इस्लामचे खरे तेज, सत्व त्यांच्या ठायी जिवंत राहील. भारतात मुस्लिमांचा पराभव झाला तो हिंदूशी संपर्क आल्यामुळे'' असे तो सांगत असे.[102] थोडक्यात म्हणजे मुस्लिम हे भारतीय झाले हे इस्लामच्या सर्व अध:पतनाचे कारण होय असे त्याचे मत होते. त्यामुळेच हिंदू व मुस्लिम या दोन जमाती अलिप्त व विभक्त राहिल्या पाहिजेत असा आयुष्यभर प्रचार करून त्याने आधुनिक काळातल्या विभक्त वृत्तीचा पाया दृढ करून टाकला.

### 4.4.2 अहल-ई-हादीथ :-

भारतातील बहावी चळवळीचा संस्थापक सय्यद अहमद बरेली याच्या मृत्युनंतर त्याचा शिष्य सय्यद नजीर याने 'अहल-ई-हादीथ' या संस्थेची स्थापना केली. आणि या संस्थेमार्फत मुस्लिम समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. या संस्थेने 'सूफी पंथ' व मुस्लिम समाजातील बहुपत्नीत्व यास मोठ्या प्रमाणात विरोध केला. त्याचप्रमाणे सय्यद नजीर याने मुसलमान समाजात असणाऱ्या हुंडा प्रथेस विरोध करून विधवा विवाहाचा पुरस्कार केला आणि मुस्लिम समाजातील स्त्रीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आपल्या संस्थेमार्फत केला होता.[103]

### 4.4.3 टिटू-मीर ची चळवळ :-

भारतातील वहाबी चळवळीचा संस्थापक सय्यद अहमद बरेली याचा अनुयायी टिटु मीर याने सन 1872 ते 1891 या काळात बंगालच्या ग्रामीण भागात इस्लाम धर्माची मूलतत्वे प्रसृत करण्यासाठी ही चळवळ सुरू केली. इस्लाम धर्म हा जगातला एक महत्वाचा धर्म आहे. ईश्वर (अल्लाह), कुराण, फरिश्ते (देवदूत), पैगंबर रसुल, आखिरत (अंतिम निवाड्याचा दिवस) या इस्लामच्या मूलभूत श्रध्दा आहेत. इस्लामच्या आचारधर्मात पवित्र धार्मिक आचरणाबरोबरच नैतिक आचरणाला महत्वाचे स्थान आहे असे विचार दिले. टिटु मीर याने हिंदू जमीनदारांच्या अन्याय-अत्याचाराविरूध्द मुस्लिम शेतकऱ्यांना एकत्रित करून बंडास प्रवृत्त केले होते. तसेच मुस्लिम शेतकऱ्यांना घेऊन त्याने तत्कालीन ब्रिटिश राजवटीविरूध्द बंड केले होते. ग्रामीण भागातील मुस्लिम शेतकऱ्यांना एकत्रित करण्याचा व त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न त्याने केला.[104]

### 4.4.4 अलिगढ चळवळ :-

हिंदू समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणांचे कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. तेच कार्य मुस्लिम समाजात सर सय्यद अहमद खान यांनी केले. सर सय्यद अहंमद खान हे सुधारणावादी, परिवर्तनवादी व बुध्दीवादी होते. पाश्चात्य विद्या आत्मसात केल्यावाचून भारतीय मुस्लिमांची प्रगती होणार नाही असे त्याचे मत होते. त्यांनी प्रथम मुस्लिमांमध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करून त्यांना आधुनिकतेकडे वळविले. त्याचे हेच कार्य 'अलिगढ चळवळ' या नावाने ओळखले जाते.[105] आपल्या या मताचा प्रचार करण्यासाठी त्यांनी कुराणावर नवे भाष्य लिहिले. 'सायंटिफिक सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली व अनेक इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर करवून घेतले. अलिगढ येथे सन 1875 साली त्यांनी कॉलेज स्थापन केले, ते पाश्चात्य विद्या व सुधारणावाद मुस्लिमांत रुजविण्याच्या हेतुनेच होय.[106] त्याकाळापर्यंत भारतीय मुस्लिम समाज वहाबी पंथाच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे, ते इंग्रजी भाषा, इंग्रजी विद्या व पाश्चात्य संस्कृती यांचा मोठा व्देष करीत. त्यांच्या प्रसारामुळे इस्लाम धर्म नष्ट होईल, असे त्यांना वाटे.

सर सय्यद अहमदखान यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने इ. स. 1870 मध्ये 'तहजीब-अल-अखलक' या वृत्तपत्रामध्ये अनेक लेख लिहुन मुस्लिम समाजात सुधारणा करण्याचे कार्य सुरू केले होते.[107] इस्लामधील सामाजिक दृष्टप्रवृत्ती नष्ट व्हावी म्हणून त्यांनी मुसलमानांचा विश्वास असलेल्या 'पीर' ला विरोध करून ती वाईट प्रथा समाजातून समाप्त करण्याचा प्रयत्न केला. पीर आणि फकीर स्वतःला सूफी मानीत

असत आणि आपल्या शिष्यांना (मुरीदी) गूढ अशी नावे देत. सर सय्यद अहमदखान यांनी ही गुलामांची प्रथा इस्लाम विरोधी आहे असे मत व्यक्त केले होते. पडदा पध्दत, बहुपत्नीत्व याला ही त्यांनी विरोध केला होता.[108]

सर सय्यद अहमदखान यांनी अलिगढ चळवळीव्दारे कुराणावर भाष्य केले. त्यात त्यांनी परंपरागत भाष्यकारांवर टिका केली आणि तत्कालीन विज्ञानाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. कुराणाच्या अध्ययनावर भर देऊन त्यांनी असे सांगितले की, ईश्वरी ज्ञानाची व्याख्या ईश्वरी कार्याव्दारेच केली पाहिजे. त्यांच्या या कार्यात मौलाना चिराग अली यांनी सहकार्य केले होते. [109] मोहमेडन सोशल रिफार्मर या वृत्तपत्रामधुन अनेक लेख लिहून मुस्लिम स्त्रियांचे धार्मिक व दुषित पूर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न केला.[110] व मुसलमानांची मानसिकता आधुनिक बनवण्याचा प्रयत्न केला. आपल्या लिखाणातून व भाषणातून मुस्लिम स्त्रियांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा ते करत. मुस्लिमांच्या सर्वांगीण प्रगती करिता स्त्रियांना पाश्चात्य शिक्षण अनिवार्य आहे. त्यात इस्लामविरोधी काही नाही. एवढेच नव्हे तर ब्रिटिश स्त्रियांप्रमाणे त्यांनी पुरूषांत मिसळावे, बुरखा घेऊ नये, पाश्चात्य शिक्षण घ्यावे याविषयी ते आग्रही दिसतात. इंग्लडमधील सुधारणांविषयी कारणे सांगताना त्यांना असे वाटते की, त्यांची इंग्रजी ही एकच भाषा आहे. त्यातच सर्व ज्ञान आहे. भारतात अनेक भाषा असल्याने भारतीयांना सर्व भाषेतील ज्ञान नाही त्यामुळे मातृभाषेत सर्व ज्ञान त्यांना दिले पाहिजे.[111] यासाठी त्यांनी शिक्षण केंद्रे, विज्ञान संस्था प्रस्थापित करणे, शैक्षणिक परिषदा आयोजित करणे हे ध्येय ठरविले.

अलिगढ चळवळीने भारतीय मुसलमानांचे पाश्चात्यीकरण करण्यास सुरूवात केली. या सुधारणा चळवळीने सन 1886 मध्ये 'मोहोमेडन एज्युकेशन कॉन्फरन्स' ची सुरूवात झाली. या परिषदेच्या वेळी बोलताना सर सय्यद अहमद खान म्हणतात, ही संस्था मुसलमानात राष्ट्रीय बंधुभाव व स्त्रियांमध्ये जागृती करेल. याच परिषदेच्या माध्यमातुन मुस्लिम विद्यापीठाची कल्पना त्यांनी मांडली जी सन 1920 मध्ये प्रत्यक्षात उतरली. पुढे हेच ठिकाण मुस्लिमांचे धार्मिक व सामाजिक चळवळीचे केंद्र बनले. येथूनच अनेक मुस्लिम स्त्रिया शिक्षित होऊन मुस्लिम समाजात जागृती झाली. म्हणून बिपीनचंद्र "इंडियाज स्ट्रगल फॉर इनडिपेन्डस" या पुस्तकात लिहतात. "Lastly, Women's education was successfully opposed by the orthodox virtually till the 1920. This weakened not only the emergence of a modern intelligent among Muslim but diluted its commitment to modernity. When it did emerge. The neglect of modern education not only strengthened the elements of cultural backwardness, but also further weakened the position of Muslims in the professions."[112]

खरे पाहता आपणास असे दिसून येते, सरकारी सेवांकरिता कार्यक्षम व बुध्दिवान मुस्लिम तरूण तरूणी तयार होण्यासाठी ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांसारखे हे मुस्लिम विद्यापीठ बनविणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. ही सामाजिक व सांस्कृतिक चळवळ होती. पुढे जहाल राजकीय चळवळीच्या पार्श्वभूमीवर ही चळवळ ब्रिटिशांच्या राजकीय एकनिष्ठतेची चळवळ बनली.

इ. स. 1875 मध्ये अलिगढ येथे 'ॲग्लो ओरिएंटल कॉलेज' स्थापन केले. ज्याचे पुढे 'अलिगढ विद्यापीठात' रूपांतर झाले. हे विद्यापीठ अलिगढ चळवळीचे मुख्य केंद्र बनले होते.[113] अलिगढ चळवळीने शिक्षण, सामाजिक सुधारणा, आर्थिक प्रगती व आधुनिकीकरणच्या दिशेने मोठे कार्य केले होते व मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. अलिगढ चळवळीने मुस्लिम समाजाला जुन्या चालीरिती, प्रथा, जुने विचार यांच्या जोखडातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पुढे हळूहळू भारतीय मुसलमान या सुधारणांकडे आकर्षित होऊ लागले. परंतु दुर्दैवाने ही चळवळ पुढे देशविरोधी गेली. भारतीय राष्ट्रवादाला ती एक आव्हान ठरली. तरीही अलिगढ चळवळीने मुस्लिम समाजाला निष्क्रियता व नैराश्याच्या दरीतुन वर काढून मध्ययुगीन वातावरणातून आधुनिक युगात आणण्याचे कार्य केले.

### 4.4.5 देवबंद चळवळ :-

इस्लाम धर्मातील 'देवबंद' पंथाची स्थापना सन 1866 मध्ये महमद नानौतवी व रशीद अहमद गंगोही यांच्या नेतृत्वाखाली परंपरागत मुस्लिम शिक्षणाचे पुरस्कर्ते उल्मन यांनी उत्तर प्रदेशातील सहारनपुर जिल्ह्यातील देवबंद येथे देवबंद चळवळ सुरू केली.[114] या चळवळीचे प्रमुख दोन हेतु होते. मुस्लिमांमध्ये कुराण आणि हदीस यांचे शुध्द शिक्षण देण्याचा प्रसार करणे आणि परकीय शासकांविरूध्द 'जिहाद' ची भावना कायम ठेवणे. या पंथाच्या अनुयायांनी शील व चारित्र्य यावर भर दिला.[115] सर्व धर्म एक आहेत व ते इस्लामविरोधी नाहीत असे या पंथाचे मत होते. मौलाना शिबली निमानी या फारशी व अरबी विद्‌वानाने या पंथाचे काम आपल्या हाती घेतले व त्याने इंग्रजी भाषा व विज्ञान मुस्लिम समाजाने स्वीकारले पाहीजे असे मत मांडले होते.[116] मुस्लिम समाजातील जुन्या प्रथा, जुने विचार बाजूला टाकून मुस्लिम समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला पाहिजे. तसेच मुस्लिम हे हिंदुस्थानचे नागरिक असून त्यांनी हिंदुस्थानशी निष्ठा राखली पाहीजे. अशी विचारसरणी देवबंद चळवळीची असलेली आपणास दिसून येते. देवबंद ही कडव्या मूलतत्ववाद्यांची चळवळ आहे. आजही इतक्या वर्षानंतर सुद्‌धा या चळवळीचा हिंदी मुसलमानांवर प्रभाव दिसून येतो. इ. स. 1888 मध्ये देवबंदच्या उलेमांनी सर सय्यद अहमद खान यांच्या मुस्लिम ॲग्लो ओरिएंटल सभेविरूध्द फतवा काढलेला दिसतो कारण देवबंद पंथ हा पाश्चात्य विद्येचा

व्देष्टा होता. इंग्रजी भाषा, इंग्रजी विद्या व पाश्चात्य संस्कृती यांचा कडवा विरोधक होता. असे असले तरी देवबंद चळवळीचा नवा नेता महमुद-उल-हसन (1851-1920) यांनी या चळवळीला राजकीय व बौध्दिक रूप देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यावेळी त्याने राष्ट्रीय इच्छा, आकांक्षा व मुस्लिम निष्ठा यांच्यात समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता.[117]

देवबंद चळवळीचा मुस्लिमांच्या धार्मिक सुधारणा चळवळीत इस्लाम धर्माचा प्रसार करण्याचा हेतू असला तरी राष्ट्राविषयी समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो.

### 4.5 महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव :-

कोणत्याही विचारवंताच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट करीत असताना समाजाच्या विचारप्रवृत्ती, चालीरीती, त्यांच्या श्रध्दा आणि तत्वज्ञान याचे सूक्ष्म अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यासाठी निःपक्षपाती दृष्टीकोनातुन, चिकित्सात्मक दृष्टीकोनातून एकुण परिस्थितीचा संबंधित विचारांशी असलेला संबंध पाहणे आवश्यक असते. मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या संदर्भात महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाच्या प्रभावाचा अभ्यास करण्याची गरज आहे. महात्मा फुले यांच्यानंतरच्या काळात अनेक लेखकांनी महात्मा फुलेंवर लिखाण केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरूस्थानी मानले आणि महात्मा फुले यांच्या विचारांना समाजामध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. अलिकडच्या काळात डॉ. एन. डी. पाटील, हरी नरके, डॉ. गजमल माळी, डॉ. गंगाधर पानतावणे, मा. पं. मंगुडकर, इत्यादिंनी भरपूर लिखाण केलेले आहे.

महात्मा फुले यांनी सन 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि त्याव्दारे आपल्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आणि आपल्या विचारांना प्रत्यक्षात आणण्यासाठी एक सामाजिक चळवळ उभी केली.[118] या चळवळीला पुढे दुर्दैवाने अब्राह्मणी चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. महात्मा फुले यांचा सामाजिक समतेचा, स्त्री-पुरूष समानतेचा, कष्टकऱ्यांच्या उध्दारांचा उदात्त विचार मागे पडून ब्राह्मणव्देषामधुन राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी महात्मा फुले यांच्या चळवळीचा उपयोग करण्यात आला. आजही सत्यशोधक समाज अस्तित्वात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे दलितांमध्ये विशेषतः महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव अधिक जाणवतो. आज तर शहरांमध्ये, खेड्यांमध्ये, शाळा, महाविद्यालयांमधून महात्मा फुले यांचे पुतळे आणि प्रतिमा दिसून येतात. शासनाची गरिबांना आर्थिक सहाय्य देण्याची योजना महात्मा फुले यांच्या नावाने चालू आहे. प्रचलित कायदे आणि शासनाची ध्येय धोरणे आणि विविध कार्यक्रम समाजातील लोकांच्या विचारांचे आणि आशाआकांक्षाचे प्रतिनिधित्व महाराष्ट्रातील शासकीय धोरणे आणि कार्यक्रम यावर बऱ्याच प्रमाणात महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि चळवळीचा परिणाम दिसून येतो.

पूर्वीपेक्षा महात्मा फुले यांचा विचार आज अधिक प्रभावी झालेला दिसतो. आज अनेक कार्यकर्ते महात्मा फुले यांच्या विचारांना प्राधान्य देताना दिसून येतात. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा फुले यांच्या विचारांना मानाचे स्थान आहे. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास लिहीत असताना महात्मा फुले, राजर्षि शाहू, न्यायमुर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, यांच्या कार्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेले परिवर्तन व्यापक आणि सर्वसमावेशक होते. सामाजिक, धार्मिक परिवर्तन हा तर त्यांच्या विचारांचा मूळ गाभा होताच, परंतु त्याचबरोबर ते प्राप्त आर्थिक, राजकीय परिस्थिती यांच्यावरही संतुष्ट नव्हते. त्यातही त्यांना परिवर्तन हवे होते. तसेच त्यांना अभिप्रेत असलेले सामाजिक परिवर्तन तसे व्यापक आणि सर्वसमावेशक होते तसेच ते अत्यंत मूलग्राहीही होते.[119]

समाजात सर्वांना न्याय मिळाला पाहिजे. जातिव्यवस्थेमुळे समाजाची रचना श्रेणीबध्द होते. काहींना वरिष्ठ दर्जा प्राप्त होतो तर इतरांना कनिष्ठ. वरिष्ठ दर्जातील लोकांना मानसन्मान, विशेषाधिकार प्राप्त होतात. तर कनिष्ठ दर्जातील लोकांच्या वाट्यास दु:ख, दरिद्र्य, अपमान येतात. त्यांना सर्व लाभापासून वंचित रहावे लागते. महात्मा फुले हे सर्वांना समान न्याय मिळवून देण्यासाठी मानवी समतेचा आग्रह धरतात.

म. फुल्यांची दृष्टी सर्वव्यापक होती. जे दीन दुबळे आहेत त्यांची बाजू त्यांनी घेतली. त्यांच्यासाठी ते झगडले. स्वत: अत्यंत हाल सहन केले. जिवाचा धोका पत्करला. समाजाची अप्रियता पत्करली. केवळ सत्याचा झेंडा हातात घेतला. अंधश्रध्देत बुडलेल्या हिंदू धर्मीयांना नवी दृष्टी दिली. मानवतेचा संदेश दिला. ईश्वर हा शब्दही काढून टाकला. त्याठिकाणी ‘निर्मिक’ शब्द तयार केला.[120] ईश्वराची रूढ कल्पना बदलून टाकली. धर्माची रूढ कल्पना बदलली. विश्वकुटुंबवादाचा पुरस्कार केला. मानवी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या पायावर सत्याची कास धरली.

म. फुल्यांनी हिंदू धर्मावरच नव्हे तर सर्व धर्मांवर आघात केले. हे धर्म राष्ट्राराष्ट्रांत व मानवामानवांत भेद पाडणारे आहेत म्हणून त्याज्य ठरविले. हिंदू धर्मातील मूर्तिपूजेवर परोपजीवी फुकटखाऊ वर्ग पोसला जातो. ब्राह्मणांची सर्व मदार त्यावर अवलंबून म्हणून ब्राह्मण जातीची कारस्थाने चव्हाट्यावर मांडली. ईश्वर मानला, पण ईश्वराची रूढ कल्पना बदलून टाकली. [121] भारतातले पहिले समाजक्रांतिकारक महात्मा फुले झाले.

सत्यशोधक चळवळ ही सामान्यांची, सामान्यांसाठी सामान्य समजलेल्या माणसाने चालवलेली चळवळ होय. मनुष्याचा मोठेपणा केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून नसतो. म. फुल्यांनी अभ्यास केला तो समाज ग्रंथाचा. त्या समाजाच्या अंतरंगात शिरून सुख दु:खे जाणुन घेऊन, त्यांची दु:खे निवारण्याचा मार्ग काढला. त्यासाठी संघटना तयार केली. सत्यशोधक समाज त्या समाजाने केलेली चळवळ ती सत्यशोधक चळवळ ही चळवळ

झाली. ती महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ ही प्रतिक्रियात्मक होतीच होती, पण नकारात्मक नव्हती. तिचा गाभा लोकशाही, समाजवाद व निधर्मी राज्य हाच होता.[122] स्वातंत्र्याचा लाभ सर्वांना व्हावा हा होता.

हिंदू समाजात प्रबोधनाची प्रक्रिया अधिक गतीमान झाली. मुस्लिम समाजात ती मंद राहिली. समाज सुधारकांची अखंड एक अशी मालिकाच हिंदू समाजात निर्माण झाली. पण मुस्लिम समाजात हे घडले नाही. या गोष्टीची कारणमीमांसा मुस्लिम बुध्दीवाद्यांनी करायला हवी. मध्ययुगीन काळात सूफी संतानी मात्र हिंदू संतांप्रमाणे मानवतावादी दृष्टीकोन स्विकारला होता. संतांचा व संत साहित्याचा प्रभाव हिंदू समाजावर व्यापक प्रमाणात पडला तसा सूफी संतांचा व त्यांच्या काव्याचा प्रभाव मुस्लिम समाजावर पडला नाही.[123]

मुसलमानांच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी मुस्लिम समाजाचे विचार प्रबोधन करणे हा महत्वाचा उद्देश, त्याला पोषक अशा वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळावी, धर्मांकडे बघण्याचा मुस्लिमांचा दृष्टिकोन बदलला जावा आणि ते आपल्या राष्ट्रवादी प्रवाहात सामील व्हावेत यासाठी हमीद दलवाईंसारखा सत्यशोधक आणि त्यांनी स्थापन केलेले 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' महाराष्ट्रात निर्माण व्हावे याला महाराष्ट्रातील सव्वाशे वर्षांची महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, सुधारक गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रार्जषि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटीलांपासून आजतागायत डॉ. बाबा आढावांपर्यंत लक्षणीय आणि अविचरत चालत आलेली समाजसुधारकांची परंपरा कारणीभूत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून हिंदू धर्मातील जुनाट रूढी, परंपरा, अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला. तोच आदर्श समोर ठेवून हमीद दलवाईंनी आपल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या आधारे सामाजिक सुधारणेचे कार्य मुसलमान समाजात केलेले दिसते. हिंदू समाजात धर्मांची चिकित्सा करणारे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारखे थोर समाजसुधारक होऊन गेले. त्यांच्याच बुध्दिप्रामाण्यवादी परंपरेत अनेक हिंदू विचारवंत आजही कार्य करताना दिसतात. पण मुस्लिम समाजात धर्म चिकित्सा वर्ज्य असल्यामुळे प्रबोधनाची चळवळ त्या समाजात निर्माण होऊ शकली नाही. हेच कार्य करण्याच्या उद्देशाने हमीद दलवाईंनी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' स्थापन करून पहिले पाऊल टाकलेले दिसते.[124]

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात 'सत्यशोधक' या शब्दाला एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या सभासदापुढे आहे. असा उल्लेख मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहीरनाम्यात आहे.[125] म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव हमीद दलवाई यांच्यावर पडलेला

दिसतो. त्या समाजाच्या आधारेच आपण ही आपल्या समाजात पुरोगामी विचार देवून सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.[126] त्यामुळे महाराष्ट्रातील समाजक्रांतीच्या उज्ज्वल परंपरेशी या समाजाचा धागा जोडला जातो. म. फुलेंनी हजारो वर्षांच्या दुष्ट रूढींविरूध्द व ग्रंथनिष्ठेविरूध्द बंड पुकारले तेच काम मुस्लिम सत्यशोधक समाजाला करावयाचे होते. समाज सुधारणा कोणत्याही जमातीत केल्या तरी त्याचा परिणाम एकत्रितपणे समाजावर होत असतो हे मानले जाते. त्यानुसार हिंदू अगर मुस्लिम समाजाने रूढीग्रस्तांशी लढा देण्याने भारतीय एकात्मता दृढ होईल असे हमीद दलवाईंना वाटत होते.

सत्यशोधक चळवळीने महाराष्ट्रात आपल्या कार्याच्या माध्यमातून एक प्रकारे सामाजिक क्रांतिच घडवून आणली. या चळवळीने महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. या चळवळीत समाजाच्या सर्व स्तरांतील व सर्व जातीचे लोक सभासद झाले होते. त्याप्रमाणे ब्राह्मण जातीचेही अनेकजण या चळवळीत सामील झाले होते. यावरून ही चळवळ ब्राह्मणविरोधी नव्हती हे सिध्द होते. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणे हे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते. मानवतावाद, बुध्दिप्रामाण्यवाद व व्यक्तिस्वातंत्र्य या मानवी मूल्यांची जोपासना या चळवळीने केली.[127] याच उद्दिष्टांचा व मूल्यांचा आघार घेऊन 22 मार्च 1970 मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात आली. वैज्ञानिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून परिवर्तनशील असा मुस्लिम समाज घडविण्यासाठी सत्यशोधक चळवळीची प्रेरणा घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात आली. प्रभाकर वैद्य हे ‘‘महात्मा फुले आणि त्यांची परंपरा’’ या आपल्या ग्रंथात या विषयी लिहितात की, ‘‘महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे नाव आणि परंपरा यांचा आधार घेऊन महाराष्ट्रात एक नवे आंदोलन आणि तिचे नेतृत्व करणारी एक नवी संस्था अलिकडेच स्थापन झाली आहे. कदाचित सत्यशोधक समाजानंतर आणि चळवळीनंतर सत्यशोधक असे नाव घेऊन वावरू लागलेली ही पहिलीच चळवळ असेल आणि ती म्हणजे ‘‘मुस्लिम सत्यशोधक चळवळ’’[128] सनातनी रूढीग्रस्त मुस्लिम समाजाला जागृत करण्यासाठी ही चळवळ उभारण्यात आली होती. मुस्लिम सनातन्यांविरूध्द मुस्लिम बहुजन समाजाची ही चळवळ होती. मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे मुख्य प्रवर्तक हमीद दलवाई हे होते. हमीद दलवाई यांचे वक्तृत्व प्रभावी स्वरूपाचे असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात दौरे काढुन त्यांनी मुस्लिम समाजात जागृती करण्याचे कार्य केले.

महात्मा फुल्यांची सत्यशोधक चळवळ ही परिवर्तनवादी चळवळ होती. तत्कालीन महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने ही चळवळ सुरू करण्यात आली होती. खऱ्या

अर्थाने ही चळवळ सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिकदृष्ट्या वर्गाविरूध्द कनिष्ठ वर्गाने आपले न्याय हक्क मिळविण्यासाठी सुरू केलेली चळवळ होती. सामाजिक अन्याय व आर्थिक शोषण यांचा बळी ठरलेल्या शुद्रातिशुद्रांना संघटित करण्यावर या चळवळीचा भर होता. भांडवलशाही समाजव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर कार्ल मार्क्सने कामगार वर्गाला ज्या कारणासाठी संघटित होण्याची हाक दिली होती त्याच कारणासाठी म. फुल्यांनी येथील जातिधिष्ठीत समाजरचनेच्या पार्श्वभूमीवर शुद्रातिशुद्रांना संघटित होण्याची हाक दिली होती.[129] याच विचारसरणीच्या आधारे हमीद दलवाई यांनी सनातनी विचारांच्या मुस्लिम जातियवाद्यांवर प्रचंड हल्ला चढविलेला होता. प्रभाकर वैद्य हे आपल्या ‘‘महात्मा फुले आणि त्यांची परंपरा’’ या ग्रंथात लिहितात की, ‘‘मुस्लिम सत्यशोधक चळवळीने प्रथमच जो प्रश्न हाती घेतला तो मुस्लिम स्त्रियांच्या गुलामगिरीचा, त्यांच्या विवाहाचा म्हणजेच मुस्लिम पुरूषांच्या चार बायका करण्याच्या हक्कांचा, त्याच प्रमाणे हवा तेव्हा एकतर्फी ‘तलाक’ देण्याच्या हक्कांचा. थोडक्यात म्हणजे कुराणाच्या नावाने चाललेल्या एका महत्वाच्या अन्यायाविरूध्द तो ही समाजातील अत्यंत दलित अशा स्त्रियांवरील घोर अन्यायाविरूध्द हा लढा होता.’’ [130]

मुस्लिम समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे महत्वाचे काम मुस्लिम सत्यशोधक मंडळाने केले. मुस्लिम महिलेवरील अत्याचाराचा प्रश्न या समाजाने हाती घेऊन महत्वाची कामगिरी पार पाडलेली आहे. मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव या मंडळाला आहे. तलाक, बहुपत्नीत्व विरोध, पोटगीचा कायदा इत्यादी प्रश्नावर मुस्लिम सत्यशोधक चळवळीने आवाज उठविलेला आहे. याविषयी प्राध्यापक शमशुद्दीन तांबोळी असे लिहितात की ‘‘महिलेवरील अन्याय अत्याचार हा अतिशय अमानवी असून आज आपणास त्याचे चित्र हिमनगासारखे दिसते. ज्यामुळे अन्याय, अत्याचार हा एक अष्टमांश भाग दडपलेला आहे. पुरूषांचे अधिकार कमी करून मुस्लिम महिलांना बरोबरीचे अधिकार देण्यासाठी, त्यांच्या हक्कासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ सतत प्रयत्नशील आहे.’’[131]

मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे आणखी एक प्रवर्तक प्राध्यापक ए. बी. शहा होते. मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे लोण मुस्लिम स्त्रियांपर्यंत आणि बहुजन मुस्लिम समाजापर्यंत जाऊन पोहचलेले होते. मध्यमवर्गीय मुस्लिम महिला या चळवळीत धैर्याने पुढे आल्या, हा मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा सर्वात महत्वाचा परिणाम झालेला आहे. प्राध्यापक शमशुद्दीन तांबोळी पुढे लिहितात की, ‘‘मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला सुरूवात होऊन वीस वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्रात मुंबई, कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी मुस्लिम

सत्यशोधक मंडळाच्या कामाचे क्षेत्र वाढले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राबाहेर 'अखिल भारतीय पुरोगामी मुस्लिम परिषदेची' स्थापना 22 मार्च 1970 रोजी करून मंडळाने आपल्या कामाची व्याप्ती देशभर पसरवली आहे."[132]

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा हा मुस्लिम समाजावर झालेला महत्वाचा परिणाम समजला पाहिजे. यातूनच मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना होऊन मुस्लिम समाजात अनिष्ट प्रथा, कायदे, मूलतत्ववाद इ. दूर करण्याचा प्रयत्न आज मुस्लिम सत्यशोधक मंडळ जोराने करित आहे. हा सर्वात महत्वाचा परिणाम सत्यशोधक चळवळीचा समजला पाहीजे.

आधुनिक भारतीय मुस्लिम राजकारणाच्या इतिहासात हमीद दलवाई इतका मूलगामी चिंतन करणारा असा निर्भय विचारवंत दुसरा नाही. महात्मा फुले यांच्या काळात त्यांचे कार्य जेवढे अवघड होते. त्यापेक्षाही हमीद दलवाईंचे काम काही प्रमाणात अधिक कठीण होते. कारण हमीद दलवाईंना त्यांच्या मुस्लिम समाजातून फार मोठा प्रतिसाद कधीच मिळू शकला नाही. म. फुले आणि हमीद दलवाई या दोघांच्यामध्ये जवळजवळ एका शतकाचे अंतर आहे. म. फुले यांचा काळ कितीतरी जुना, यांच्या काळी हिंदू समाजाची रचना व जडणघडणच विस्कळीत आणि विविधतेला वाव देणारी अशी होती. म. फुले यांच्या काळी हिंदू समाज आजच्या मानाने कितीतरी रूढीप्रिय, अंधश्रध्दाळू आणि परंपरावादी होता परंतु वेगवेगळ्या जातिजमाती, चालीरिती, परस्परविरोधी भिन्न भिन्न विचार हिंदू समाजात नेहमीच वावरत आले. एक ग्रंथाचे प्रामाण्य मानणारा असा हिंदू समाज नव्हता आणि आजही नाही, परंतु मुस्लिम समाज यापेक्षा निराळा आहे. मुस्लिम समाजातही शिया-सुन्नींच्या सारखे मतभेद आहेत. एक प्रेषित, एक धर्मग्रंथ यामुळे आणि जवळपास एक असणाऱ्या कायद्यामुळे मुस्लिम धर्मांचे स्वरूप हिंदूच्या मानाने कितीतरी सुसंघटित आहे. पण विचारस्वातंत्र्याची त्यांची परंपरा मर्यादित आहे. हमीद दलवाई आचार-विचार, स्वातंत्र्य यांची परंपरा नसलेल्या समाजात उदयाला आले होते.[133] त्यामुळे हमीद दलवाई पुढे म. फुले यांच्यापेक्षा समोरच्या अडचणीचे स्वरूप फार मोठे होते हे आपणास दिसून येते.

दुसरे असे की, ब्रिटिशांनी आपला पराभव केला, आपले राज्य गेले याला आपल्या परंपरेतच काही चुका आहेत असे मानण्यास हिंदू समाज हळूहळू शिकत होता. यावेळी म. फुले यांच्या जवळपास आपल्या धर्मांची, परंपरेची कठोर चिकित्सा करणारे लोक होते. उदा. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख. आपला पराभव झाला कारण आपल्या धर्मात, परंपरेत, समाजरचनेत काही तरी दोष आहेत असे मानण्याकडे हिंदू विचारवंतांचा कल असतो. मुस्लिम समाजाला सुध्दा इंग्रजी राजवट आल्यामुळे आपला पराभव झाला असे वाटतच होते.[134] पण या पराभवाचे कारण आपल्या धर्मांत किंवा परंपरेत काही दोष आहेत असे त्यांना वाटत नव्हते.[135] आपला धर्म व

परंपरा निर्दोष आहे असे त्यांना वाटे. इंग्रजी विद्या व ज्ञान याविषयी आस्था असणारे सर सय्यद अहमद खान सुध्दा आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार करतात. स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार करतात पण पुढे जाऊन इस्लामची चिकित्सा ते करत नाहीत.[136]

हमीद दलवाई हे ग्रंथप्रामाण्य झुगारून देऊन मुस्लिम धर्मांची चिकित्सा करणारे पहिले मुस्लिम पुरोगामी विचारवंत होते. हमीद दलवाईंनी धर्मांची चिकित्सा केली त्यामुळे मुस्लिम समाज दलवाईंना काफिर, हिंदूचा एजंट असे म्हणत असत.[137] कारण दलवाईंनी केलेली धर्मांची चिकित्सा ही मुसलमानांच्या हिताला बाधक आहे असे त्यांना वाटे. मुस्लिम समाजातील विचारवंतांचे मनच धर्मांच्या चिकित्सेला तयार नसते तसेच आजही ते तयार नसलेले दिसते. खरे तर हमीद दलवाईंच्या समोर अशी अडचण होती की मुस्लिम समाजात राजकीय पराभव विचारवंतांना अधिक कर्मठ आणि परंपरावादी होण्याची प्रेरणा देतो.

खरे पाहता महात्मा फुले यांच्या कालखंडात त्यांच्या प्रयत्नाला इंग्रजांनी जरी फार मोठा पाठिंबा दिला नसला तरी त्याचे शाब्दिक कौतुक केले.[138] त्याच्या उपक्रमास पाठिंबा व्यक्त केला. थोडक्यात ब्रिटिशांनी यावेळी आपणावर आक्रमण होवू नये याची काळजी घेतली. परंतु हमीद दलवाईंच्या बाबतीत मात्र असे घडले नाही. इंग्रजांनी यावेळी मुस्लिम समाजाच्या कर्मठपणाला जास्ती जास्त पाठिंबा दिला.[139] यावेळी कोणताही मुस्लिम समाजातील नेता आपल्या धर्मपरंपरेवर टिका करत नसे. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात सुध्दा मुसलमान समाजातील सर्व परंपरावाद जतन करण्याची चढाओढ आपल्या राजकीय पक्षात सुरू झाली कारण त्यांना वाटत होते की, आपली मते फुटू नयेत. थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिम समाजातील सर्व परंपरावाद जतन करण्याचे कार्य केले गेल्यामुळे पुरोगामी विचारसरणीच्या हमीद दलवाईंचे कार्य अधिकच बिकट होत गेले होते.

महात्मा जोतिबा फुले यांच्यापेक्षा हमीद दलवाईंचे कार्य अधिक बिकट होते. तरीही त्यांना मुंबई, पुणे, कोल्हापूर, अमरावती अशा वेगवेगळ्या ठिकाणी असणारा मुस्लिम समाजातील पुरोगामी विचारांच्या तरूण कार्यकर्त्यांचा एक गट आपल्या भोवती गोळा करता आला. खरे तर दलवाईंना मुस्लिम समाजात फार मोठा पाठिंबा नव्हता. मुस्लिम समाजातील सर्व राजकीय नेते सुध्दा दलवाईंच्या विरूध्द होते. कारण हमीद दलवाईंनी धर्म विरोधी भूमिका घेतली होती. म्हणून मुस्लिम समाज त्यांच्यामागे नव्हता परंतु हमीद दलवाईंना महान विचारवंत म्हणुन किर्ती मिळविण्याची इच्छा नव्हती. त्यांना मुस्लिम समाजामध्ये परिवर्तन घडवून आणावयाचे होते. त्यांना महंमद पैगंबर आणि कुराण याबाबत चर्चा करून समाजाचे मन दुखवावे असे वाटत नव्हते. दलवाई स्वतः नास्तिक होते पण मुस्लिम समाजाने नास्तिक व्हावे असा त्यांचा आग्रह नव्हता. त्यांना मुस्लिम समाजाचे आमूलाग्र परिवर्तन व्हावे असे वाटत होते.[140]

महात्मा फुल्यांनी 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करून महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचा पाया घातला. मानवतावाद, बुध्दिप्रामाण्यवाद व व्यक्तिस्वातंत्र्य या मानवी मूल्यांची जोपासना या चळवळीने केली. त्याप्रमाणे हमीद दलवाई यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून परिवर्तनशील असा मुस्लिम समाज घडविण्यासाठी सत्यशोधक चळवळीची प्रेरणा घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली होती. म्हणजेच म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव मुस्लिम सत्यशोधक मंडळावर पडलेला होता आणि त्यातूनच एक मुस्लिमांचा नवा वर्ग उदयाला आला. त्याला आपल्या मानवी हक्काची जाणीव झाली होती. थोडक्यात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतून प्रेरणा होऊन नवीन संघटना अस्तित्वात आली होती आणि ती म्हणजे मुस्लिम सत्यशोधक चळवळ होय. पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टिने परिवर्तनशील चळवळीचे हे पुढचे पाऊल होते असे प्रस्तुत संशोधकास वाटते.

### 4.6 मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय :-

समाज परिवर्तन एक तर आपोआप घडत असते किंवा ते जाणीवपूर्वक घडवावे लागते. आपोआप घडून येणारे समाजपरिवर्तन परिस्थितीच्या रेट्याने घडत असते. त्यामुळे ते समाजाला हितकारक व इष्ट वाटणाऱ्या दिशेनेच घडून येईल असे नाही. त्याची तीव्रता आणि गती बदलत्या परिस्थितीच्या तीव्रतेवर व गतीवर अवलंबुन असते. 19 वे शतक हे नवतेचे व आधुनिकतेचे शतक असून या शतकाच्या उत्तरार्धात जाणीवपूर्वक समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. ही समाजपरिवर्तनाची प्रक्रिया दोन अंगानी सुरू झाली. एक विचारनिर्मितीतून आणि दोन कृतिशील चळवळीतून. या काळातील वैचारिक पातळीवरील समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेची चार उपांगे आढळून येतात. पहिले म्हणजे ब्रिटिश राज्याचे अनेक कारणांसाठी होणारे गुणगान आणि या राज्यापासून झालेल्या फायद्याची जाणीव ठेवून, शिक्षणाचे मान वाढवून अधिकाधिक फायदा एतद्देशीयांनी करून घ्यावा ही भूमिका लोकहितवादी व महात्मा फुले यांनी घेतली.[141] दुसरे म्हणजे इंग्रजांच्या विरोधात एतद्देशीय समाजाने, त्यांच्या महान परंपरांचे गुणगान करून त्यांच्यातील चेतना व अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न करणे ही भूमिका विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी घेतली. [142] तिसरे म्हणजे इंग्रजी राज्याकडून होणाऱ्या पिळवणुकीची आणि त्यातुन निर्माण होणाऱ्या दारिद्र्याच्या प्रश्नाची परखड चिकित्सा करणे ही भूमिका लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी घेतली[143] आणि चौथे म्हणजे एतद्देशीय समाजाची त्यातील निरर्थक रूढी परंपरांची कठोर टीका करून, आत्मपरिक्षणाची व सामाजिक व धार्मिक बदलांची आवश्यकता निर्माण करणे यातून वैचारिक पातळीवर धार्मिक पुनरूज्जीवनाचा आणि सामाजिक प्रबोधनाचा काळ महाराष्ट्रात अवतरला.

आधुनिक काळातील सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा प्रारंभ इंग्रजी राजवटीत झाला. ह्यापूर्वीच्या शेकडो वर्षांच्या काळात सामाजिक सुधारणांसाठी कुणी प्रयत्न केले नसतील असे म्हणता येणार नाही. परंतु तत्कालीन समाजजीवनावर धर्माचे प्राबल्य असल्याने नव्या कल्पनांचा अविष्कारही धर्माच्याच माध्यमातून झाला.

सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हणून महात्मा फुले यांचेच नाव घ्यावे लागते. प्रत्येक व्यक्ती हे एक स्वतंत्र मूल्य आहे. परमेश्वराने सर्व स्त्रीपुरूषांना जन्मतःच सारखेच अधिकार दिलेले आहेत. म्हणून एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर बळजबरी करण्याचा किंवा तिचे शोषण करण्याचा अधिकार नाही अशी कल्पना म. फुले यांच्या विचारांत होती.[144]

सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात नुसता विचार निरूपयोगी ठरतो. कोणत्याही कृतीशील चळवळीचे सातत्य आणि त्याच्या प्रसाराची परिणामकारकता या गोष्टी त्या चळवळीने लोकांच्या मनात किती घर केले आहे ? यावर अवलंबून असतात. सामाजिक परिवर्तन चळवळ ही सामान्यतः मागासलेल्या समाजाच्या सुधारणेची चळवळ असते. मग ती आर्थिक व राजकीय जाणिवेच्या दृष्टीने मागासलेली असतील. हे मागासलेपण दूर व्हावे आणि उभा समाज सुधारलेल्या अवस्थेत एकसंघ व्हावा यातच या चळवळींची अंतिम हेतुपूर्तता असते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी तीन अंगानी काम करीत असतात. एक विविध कार्यक्रमाव्दारे विशिष्ट प्रश्नांविषयी जनजागृती करणे, दोन सरकारवर दबाव आणून आवश्यक ते कायदे करवून घेणे व त्यांची अंमलबजावणी परिणामकारक करणे आणि तीन विशिष्ट प्रश्नांच्या बाबतीत विरोधी भूमिका असणाऱ्यांना विरोधात उभे राहून त्याच्यावर दबाव आणून त्यांची भूमिका व कृती बदलायला भाग पाडणे. जनजागृती, कायद्यांची अंमलबजावणी करणे, पुरोगामी भूमिकेचा स्वीकार करणे ह्या प्रमुख समस्या 19 व्या शतकात विचारवंतांना भेडसावत होत्या.

हिंदु धर्मातील चातुवर्ण्य व्यवस्थेखाली भरडल्या जाणाऱ्या शुद्र व अतिशुद्र समाजातील दीन-दलितांनी समतेसाठी इस्लामचा स्वीकार केला. हे धर्मांतर सूफी संतांनी केले. 9 व्या शतकात नुरोद्दीन इजिप्तहुन भारतात आला आणि दक्षिण भारतात हा पंथ आला. त्याने राक्षसभुवन व गोणगाव येथे धर्मप्रसार केला असे सांगितले जाते. 13 व्या शतकापर्यंत मुसलमानांची राजवट दक्षिण भारतात स्थापन झालेली नव्हती, तर सूफी संत आल्यानंतर मुस्लिम राजवटी स्थापन झाल्या असे सेतुमाधवराव पगडी यांनी 'सूफी संप्रदाय' या पुस्तकात नमुद केले आहे.[145]

इस्लामचा महाराष्ट्रात सर्वत्र परिचय झाला तो सूफी संतांमुळे. महाराष्ट्रातील सूफी केंद्रामध्ये पैठण हे महत्वाचे केंद्र होते.[146] अहमदनगर जिल्ह्यातील तीसगाव मढी येथे राहुन शहा रमजान याने निजामुद्दीनच्या सांगण्यावरून धर्म प्रसार केला असे सांगितले जाते. महाराष्ट्रातील मुसलमानांची संख्या काश्मीर, बंगाल, केरळ, आसाम या मानाने बरीच कमी आहे.

सेतुमाधवराव पगडी यांच्या मते मध्यकाळात भारतात दोन बादशाह राज्य करीत असत. त्यात पहिले म्हणजे सुलतान किंवा मुस्लिम सम्राट व दुसरे म्हणजे लोकांच्या मनावर राज्य करणारे सूफी संत होत. 'ऐन-ए-अकबरी'त चौदा सूफी संप्रदाय शाखांचा (सिलसिले) उल्लेख सापडतो. या सूफी संप्रदायांनी इतर धार्मिक प्रवाहांशी समन्वय व देवाण घेवाणीचे मार्ग अवलंबून भारतात सांस्कृतिक एकता निर्माण केली. जागतिक स्तरावरही मध्य आशिया व अफगाणिस्तान, इराण भागातही सूफींनी फारसी (इरस्त्रुत) बौध्द व तांत्रिक स्थानिक पंथाची एकरूपता दर्शविलेली दिसते. भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही मुख्यत्वे चिश्ती, कादरी व नक्शबंदी, सुऱ्हावर्दी सूफी सिलसिले जास्त प्रमाणात विकसित झाले.[147]

सूफी संप्रदायाचा उदय मूलतः अरबी जगतात झाला. इस्लाम म्हणजे शांती व ईश्वराजवळ संपूर्ण शरणागती, कुराण हा इस्लामचे सर्वस्व असलेला दिव्य ग्रंथ, ईश्वरनिष्ठा आणि सौजन्यनिष्ठा या दोन निष्ठांच्या परममंगल आणि परमश्रेयस्कर अशा प्रकाशाने हा समग्र ग्रंथ उजळून निघालेला आहे. इस्लामचे प्रवर्तक प्रेषित महंमद पैगंबरांनी याचा लोकसमुहात प्रचार केला. सूफी तत्वज्ञान यानंतरच्या काळात सामंजस्य व समन्वयमार्गाने मुळ अरबी भूमीपासून दूर जाऊन विकसित होत पसरत गेले. व्यापारी व संतांव्दारे इस्लामचा प्रसार जगभर झाला. खुद्द भारतात पश्चिमी किनाऱ्यावर आठव्या व नवव्या शतकात अरबी व्यापारी व सूफी संतांव्दारे इस्लामचा प्रसार शांततेच्या मार्गाने झाला.[148] बहुसंख्य सूफी दिल्ली, अहमदाबाद हून आले. राजसत्ता भारतात त्यांचे स्वागत करीत होती. महाराष्ट्रात खुलताबादचे हाजी अली, माहिम मुंबईचे अली सादीकशा, नाशिकचे मुहंमदबाबा श्री. गोंदेकर, नागपुरचे ताजुद्दीन या सूफी विद्वान मंडळीनी महाराष्ट्रात आपला मोठा शिष्य समुदाय निर्माण करून महाराष्ट्रात ठिकठिकाणी शिष्यांचे मठ तसेच सूफींच्या समाधी (दर्गा) उभारल्या. त्यातून त्या भागात उरूस, यात्रा सुरू झाल्या आणि धर्मांतरामध्ये माळी, बागवान, विणकर, कसाब, माहुत, कोळी इत्यादी कुटुंबातील व्यक्ती धर्मांतरित झाल्याचे दिसते. सूफी साधुसंताचे मठ म्हणजे हजारो पीडितांना दिलासा देणारी केंद्रेच होती. त्यातूनही धर्मांतर झाली आहेत.[149]

भारतातील सूफींनी देवाची एकात्मता एकेश्वरवादात पाहिली व त्याचा प्रसार केला. ज्यांना केवळ देवदर्शनालाच नव्हे तर देवाच्या नावावर जनावरांचे जगणे भोगावे लागत असे, त्यांच्यासाठी हे सूफी जीवनाचा आनंद घेऊन आले होते. असे विचार प्रकाश देशपांडे केजकर यांनी, 'भारताची राष्ट्रीय संस्कृती' या ग्रंथात मांडले आहेत. [150]

अगदी अल्प काळात सूफींची चळवळ आणि त्यांचे मठ (खानकाह) यांचा विस्तार मुलतान ते लखनौ, पंजाब ते देवगिरी पर्यंत झाला. इतक्या जलद सफलतेचे प्रमुख कारण सूफींनी भारतीय सामाजिक आणि धार्मिक वातावरणाच्या रूपाने स्वतःला बदलले. स्थानिक भाषेचा वापर ते प्रबोधनासाठी करत असत. ते जनतेच्या समस्यांचे निराकरण संतोषजनक पध्दतीने करीत असत.

मुरे टायटस म्हणतो, अत्यंत सोप्या आणि साध्या पध्दतीने सांगण्यात येणारे समतेचे तत्व आणि ईश्वराप्रती अगदी साधी व्याख्या, समतेचे अत्यंत सरळ व सोपे दर्शन या सर्वांमुळे असंख्य लोकांनी इस्लाम स्वीकारला. यात मुस्लिम संतांच्या अत्यंत शांत, संयमी व ममतामयी वर्तुणूकीने सुध्दा हजारो लोकांची मने जिंकून घेतली. सूफी संत आपले विचार घेऊन तळागाळातील लोकांच्या घरापर्यंत गेले आणि त्यातूनच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी गतीमान झाल्या.[151]

समाज हा नेहमी प्रवाही व परिवर्तनीय असतो. समाज परिवर्तनाला प्रेरणा देण्याचे काम काही घटना, व्यक्ती व त्या व्यक्तीचे विचार आणि कृती करीत असतात. महान व्यक्तीच्या विचारातून आणि चिंतनातून परिवर्तनाच्या प्रेरणा प्रकट होत असतात. महाराष्ट्र ही भूमी तिच्या नावाप्रमाणेच महान आहे कारण याच महाराष्ट्राच्या भूमित परिवर्तनाचा विचार प्रकट झाला. याच भूमित त्याला खतपाणी मिळाले व परिवर्तनाच्या लाटा पुढे सर्व हिंदुस्थानभर पसरल्या. महाराष्ट्रात निर्माण झालेल्या या परिवर्तनवादी विचारांनी अखिल मानव जातीला प्रेरणा दिल्या. याच भूमित अनेक परिवर्तनवादी चळवळी निर्माण झाल्या व त्यातुन महाराष्ट्र आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला. अशा या महाराष्ट्राच्या भूमित हमीद दलवाई यांनी हिंदूधर्माप्रमाणेच मुस्लिम समाजामध्ये धर्मांच्या माध्यमातून अनेक जाचक रूढी आणि परंपरा निर्माण झाल्या होत्या, त्यातून स्त्री पुरूष विषमता व जाचक रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी धर्मांची चिकित्सा होणे गरजेचे होते. याकरिता सामाजिक प्रबोधनाची गरज होती. मुस्लिमांचे प्रबोधन व्हावे या हेतुने त्यांनी आपले विचार मांडण्यास सुरूवात केली.

हमीद दलवाईंना मुस्लिम समाजसुधारणेचा ध्यास लागला होता. त्यांच्या समोर मुस्लिम समाजसुधारणेचाच प्रश्न होता. आजाराची दोन वर्षे सोडली तर आठ-दहा वर्षां एवढाच काळ त्यांना या कार्यासाठी मिळाला. मात्र या अल्पावधीत त्यांनी मुसलमान समाजाला हादरा दिला. जागतिक इस्लामच्या इतिहासात अभूतपूर्व घटना घडवून आणली. त्यांच्या कामगिरीचे गमक म्हणजे त्यांनी आपली भूमिका केवळ पुस्तकापर्यंत न ठेवता लोकांपर्यंत पोहोचविली. मुस्लिम जनतेत जागृती घडवून आणावी यासाठी त्यांची सतत धडपड चालु होती.

प्रि. गोपाळ आगरकरांना देव न मानणारा देवमाणूस म्हंटले जाते. त्याचप्रमाणे हमीद दलवाई हा महाराष्ट्रातला देव न मानणारा देवमाणुस होय.[152] पण देव न मानणे हे हमीद दलवाई मात्र आगरकरांहुन अधिक

धोक्याचे होते. ज्या इस्लाम धर्मात त्यांचा जन्म झाला त्यात हिंदूधर्मासारखी उदारमतवादी परंपरा नव्हती किंवा नाही. आगरकरांना सनातन्यांचा विरोध झाला तरी त्यांच्या मताला पाठिंबा देणारे हिंदू तेव्हांही होते. हमीद दलवाईंचा लढा हा मुस्लिम समाजात अभूतपूर्व होता. हिंदू समाजात अनेक अनिष्ट रूढी आहेत, परंतु त्या रूढी नष्ट करण्यासाठी आपले आयुष्य देणारे समाजसुधारक हिंदू समाजात वेळोवेळी निर्माण झाले. अनिष्ट रूढी नाहीशा करू पाहणाऱ्यांना नेस्तनाबुत करण्याची हिंमत तथाकथित हिंदू धर्मगुरूतही राहिलेली नाही पण मुसलमान समाजात धर्मसत्तेचे बळ अजूनही टिकुन आहे. धर्मसुधारणेचा प्रत्येक प्रयत्न सर्व प्रकारच्या शक्ती पणाला लावून थांबवला जातो अशी वस्तुस्थिती आहे. आणि म्हणुन राजा राममोहन रॉय यांच्या पासून ते महात्मा फुले, आगरकरांपर्यंत समाजसुधारकांची आणि त्या सुधारणांचा कालांतराने का होईना परंतु स्वीकार करण्याची हिंदूची परंपरा भारतीय मुसलमानांत येऊ शकली नाही.

हमीद दलवाईंना असे वाटत होते, मुसलमान लोक मध्ययुगीन अंधश्रध्दांना कवटाळून बसल्यामुळे आधुनिक जगात ते मागे पडत चालले आहेत. त्यामुळे त्यांचा बौध्दीक व आर्थिकदृष्ट्या विकास दिसुन येत नव्हता. इज्जत, खानदान, मजहब, मुल्ला-मौलवींचे फतवे, जहन्नमतची दशहत अशा विविध प्रकारच्या भिंती उभारून स्त्रियांवर जो अन्याय केला जात होता याबाबत दलवाई म्हणतात, ‘‘जर इहवादी लोकशाही ध्येये प्रत्यक्षात आणायला हवी असतील तर भारतातल्या सर्व उदारमतवादी शक्ती एकत्र यायला पाहिजेत. त्यांनी अपक्ष भूमिकेवरून आणि कोणत्याही राजकीय सत्ता संपादनाच्या हेतु मनात न ठेवता कार्य करायला हवे. हताश होऊन जे जे होईल ते ते पहावे अशी भूमिका घेऊन चालणार नाही. माणसांना पशुचे जीवन जगायला लावणारे नियम कोणीही केलेले असले तरी ते बदलले पाहिजेत.’’[153] मुस्लिम मन हे कुराण, हदीस, पैगंबरांचे जीवन व इस्लामिक परंपरा यांच्या आधारे बनलेले असते. या शब्दप्रामाण्यातून व धर्मांधतेतून मुस्लिम मन मुक्त व्हावे असा त्यांचा प्रयत्न होता.

भारतीय मुसलमान कम्युनिष्टांना देखील मुसलमानातील धार्मिक अनिष्ठ रूढी विरूध्द बंड पुकारता आले नाही. ब्रिटिशांनी उघडलेल्या शाळा कॉलेजात मुसलमान मुलांनी शिक्षण घ्यावे यासाठी प्रयत्न करणारे सर सय्यद अहमदखान यांच्या सारखे सुधारक झाले. परंतु त्यांनाही स्त्रीशिक्षण, बुरखापध्दती, तलाक या बाबतीत सुधारणा करण्यांची हिम्मत दाखवणे अवघड होते. इतकेच नव्हे तर आपले धार्मिक निराळेपण टिकवून ठेवण्याच्या अट्टाहासात आपल्याच धर्मातल्या स्त्रियांवर होणारे अन्याय देखील बुध्दीपुरस्सर अजूनही जोपासले जात आहेत. त्याविरूध्द कोणी आवाज उठविला तर त्याला वैचारिक व्यासपिठावरून उत्तर देण्याऐवजी त्याचे जीवितच धोक्यात

आणण्याचे प्रयत्न होत होते व आजही होत आहेत. अशा या समाजात स्वसमपर्णाच्या तयारीने हमीद दलवाई उभे राहिले होते.[154]

कोणत्याही धर्माचा इतिहास पाहिल्यास प्रत्येक धर्म सर्वांगीण, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा आग्रह धरून उदयास येतो आणि थोड्या फार प्रमाणात परिवर्तन घडवून आणतो. परंतु कालक्रमाने प्रत्येक धर्म सामाजिक स्थैर्याचा प्रवक्ता आणि नंतर प्रस्थापित हितसंबंधाचा आक्रमक संरक्षक या स्वरूपात प्रत्ययास येतो. हा नियम केवळ धर्मांच्याच दृष्टीने पहावयास मिळतो असे नाही तर प्रत्येक मानवी संस्थेस तो लागू पडतो. परंतु इतर संस्थाच्या भोवताली पारलौकिक पावित्र्याचे फसवे तेजोवलय नसल्यामुळे प्रत्येक पिढीस त्यांची मानवी हिताच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ चिकित्सा करणे सहज शक्य असते. पण धर्माच्या बाबतीत हे किती अवघड असते, याची हिंदू किंवा ख्रिस्ती समाजातील आद्य प्रबोधनकारांना सोसाव्या लागलेल्या हालांचा विचार केल्यास आपणास कल्पना येते. इस्लामच्या बाबतीत अशी चिकित्सा हमीद दलवाई सोडल्यास मुस्लिम जगातील एकाही विचारवंताने, मार्क्सवादी विचारवंतानेही, इस्लामची मूलगामी चिकित्सा केली आहे असे दिसत नाही.[155] एवढेच काय, तर मुसलमानांचा असा एकही राजकीय पक्ष नाही की ज्याने समाजसुधारणेच्या प्रश्नावर धर्मनिरपेक्ष उदारमतवादी भूमिका घेतली आहे.[156] सुधारणेस अनुकुल असलेले मुसलमानसुध्दा आपल्या भूमिकेचे इस्लामच्या नावाने समर्थन करत असतात.

ज्याप्रमाणे म. फुल्यांनी फक्त हिंदू धर्मांवर टीका केली असे नाही तर ख्रिस्तीधर्म व इस्लामसारखे एकेश्वरवादी धर्मही त्यांच्या टीकेच्या कक्षेतून सुटले नाहीत. याचे एक कारण म्हणजे सर्वच उपलब्ध धर्म कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पारलौकिकाची कल्पना करतात आणि मृत्युनंतरच्या जीवनात सुख शांती मिळावी यासाठी कर्मकांड सांगतात. म. फुलेंना हे मान्य नव्हते. तर कोणत्याही धर्मांची संकल्पना सत्य आणि मानवी समतेच्या तत्वावर उभी पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. मुस्लिमांमध्येही शिया, सुन्नीसारखे पंथ किंवा शेख, पठाण, कुरेशी यासारख्या जातिसदृष्य लोकांचे विभाजन करणारी तत्वे घूसली आहेत. म्हणूनच आज जगातील सर्वच धर्म आदर्शापासून ढळले आहेत. ईश्वराचे अस्तित्व मान्य केले की धर्म ओघानेच येतो. म. फुले नास्तिक नव्हते. ईश्वर आहे यावर म. फुल्यांची श्रध्दा होती. हिंदू, ख्रिस्ती, इस्लाम या धर्मांपैकी कोणताही एक धर्म त्यांचे समाधान करू शकत नव्हता तेव्हा म. फुल्यांनी आपल्या अनुयायांसाठी एक अभिनव धर्म सुचविला. म. फुलेंनी परमेश्वराला चराचर सृष्टीच्या निर्मिकाच्या स्वरूपात स्वीकारले. आगरकर तर देव न मानणारा देवमाणूस होते आणि हमीद दलवाईंनी देव मृत आहे या पाश्चिमात्य संकल्पनेकडे आपल्या मुस्लिम समाजाचे लक्ष वेधले.[157] जर्मन विचारवंत नित्शे ने हेच सांगीतले आहे की God is dead, therefore man is free![158]

महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय ही महाराष्ट्रातील सामाजिक जीवनातील एक महत्वपूर्ण घटना आहे. मुसलमानांच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी त्या समाजाचे विचारप्रबोधन करणे, त्याच्या मध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे, धर्मांकडे बघण्याचा मुस्लिमांचा दृष्टीकोन बदलला जावा आणि ते आपल्या राष्ट्रीय विचारप्रवाहात सामील व्हावेत म्हणजे खऱ्या अर्थाने हिंदू-मुस्लिम समाजाचे ऐक्य होईल. मुसलमान समाजावर मुल्ला मौलवींच्या परंपरागत रूढी परंपरांचा फार मोठा प्रभाव होता. समाज सुधारण्यासाठी समाजाला नवे विज्ञानपर विचार समजून घेण्यासाठी अशा धर्मांध विचारांचा काहीही उपयोग नाही, हे समाजाला पटवून देणे गरजेचे होते. मुस्लिम समाजात प्रबोधन पर्व सुरू झाल्याशिवाय राष्ट्रीय ऐक्य होणार नाही असे हमीद दलवाईंना वाटत होते. ख्रिश्चन समाजात मार्टिन ल्युथरच्या धर्मसुधारणेमुळे आणि युरोपातील प्रबोधनयुगामुळे युरोपीय समाजात आमूलाग्र बदल झाला आणि त्या समाजात आधुनिकतेचे वारे वाहु लागले होते.[159] त्यातूनच युरोपात औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. भारतातील हिंदू समाजातही 13 व्या शतकापासुन सुरू झालेली बहुजनवादी संत परंपरा निर्माण झाली व समाजात बदल होऊ लागला.[160] 18 व्या शतकात राजा राममोहन रॉय यांनी सतीविरूध्द (प्रथेविरूध्द) चळवळ सुरू करून आधुनिक शिक्षणाला चालना दिली.[161] 19 व्या शतकात म. फुले यांनी मुलींसाठी आणि अस्पृश्यांच्या मुला-मुलींसाठी शाळा सुरू करून आणि ब्राह्मणशाही विरूध्द आवाज उठवून समाजक्रांतीला चालना दिली.[162] अशाच प्रकारे हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजात परंपरानिष्ठ अस्मिते ऐवजी आधुनिक व राष्ट्रीय ऐक्याला पूरक अशी अस्मिता प्रबोधनाच्या सहाय्याने निर्माण करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळ सुरू केली.

हमीद दलवाई यांच्या मते मुस्लिम मन हे कुराण, हदीस, महंमद पैगंबराचे जीवन व इस्लामिक परंपरा यांच्या आधारेच बनलेले आहे. मुस्लिम समाजाच्या दृष्टीने महंमद पैगंबराने जे सांगितले त्याचे फक्त अनुकरण करणे, त्यात कोणत्याही परिस्थितीत बदल न करणे अशा प्रकारचे मुस्लिम मन बनले आहे. म्हणजेच मुस्लिम समाजातील व्यक्तीजीवनात धर्म वरचढ ठरला आहे. व्यक्तिवर धर्माचे नियंत्रण निर्माण झाले व व्यक्ती पूर्णपणे धर्माधीन झाली. त्यावेळी धर्म सोडून वेगळा विचार करणे गैर मानले गेले. ताठर धर्म भावनेतूनच मुस्लिम धर्मामध्ये अनेक अंधश्रध्दांचा जन्म झाला. अनेक खुळचट रूढी व परंपरा निर्माण झाल्या व त्याला धर्मांचा एक भाग बनविण्यात आला. त्यामुळे धर्मांचे स्वरूप विकृत होत गेले.[163] हे चित्र बदलून मुस्लिम समाजात खऱ्या धर्मांचा प्रसार करून धर्माचा व्यक्ति विकासातील अडथळा दूर करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची निर्मिती झाली.

परंपरानिष्ठ अस्मितेऐवजी आधुनिक व राष्ट्रीय ऐक्याला पूरक अशी अस्मिता प्रबोधनाच्या सहाय्याने मुस्लिम समाजात निर्माण झाली पाहिजे असे हमीद दलवाईंचे मत होते. अमेरिकेमध्ये पूर्वी 'कढई सिध्दांत'

प्रचलित होता. या सिध्दांतामध्ये अशी कल्पना होती की सर्व अमेरिकन वंशीयांनी उकळत्या तेलाच्या कढईत आपल्या पुरातन जाणिवा विसर्जित कराव्यात म्हणजे आपले सनातनी किंवा जुने विचार टाकुन द्यावेत व नवीन विचारांचा स्विकार करावा अशी कल्पना होती. आता अमेरिकेमध्ये कढई सिध्दांता ऐवजी 'फ्रुट सॅडलचा' वाडगा असा नवा सिध्दांत निर्माण झालेला आहे. फ्रुट सॅलडमध्ये प्रत्येक फळाची वेगळी चव राहुनही सर्व मिळुन एक संमिश्र स्वादिष्ट रस तयार होतो. याला काहीजण इंद्रधनुष्य सिध्दांत ही म्हणतात.[164] हमीद दलवाई यांच्या मते अशा प्रकारचे आधुनिक पध्दतीने राष्ट्रीय ऐक्य निर्माण व्हावे.

मुस्लिम समाजाच्या प्रबोधनासाठी विवेकनिष्ठ आचाराची गरज आहे. त्याबरोबरच वैज्ञानिकतेचा आधार आचाराच्या जोडीला असावा असे हमीद दलवाईंचे मत होते. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे म्हणणाऱ्या कोपर्निक्स, गॅलिलिओ आदी शास्त्रज्ञांचा युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात छळ झाला.[165] कारण त्यांचे संशोधन बायबल विरोधी मानले गेले. सृष्टीच्या व्युत्पत्तीचे सिध्दांत पुराण, कुराण, बायबल येथे ईश्वरी अस्तित्व गृहीत धरून आलेले आहेत परंतु आधुनिक विज्ञान असे उत्पत्तिशास्त्र मान्य करीत नसतानाही कट्टरवादी व मूलतत्ववादी शब्दप्रामाण्याची कास धरतात. परंतु हमीद दलवाईंना वाटत होते की, शब्दप्रामाण्य ऐवजी वैज्ञानिकतेचा आधार प्रबोधनासाठी आवश्यक आहे व त्याचा स्विकार मुस्लिम समाजाने करावा. कारण जो पर्यंत मानव शब्दप्रामाण्यामध्ये अडकला जातो तोपर्यंत त्याच्यामध्ये धर्मचिकित्सा घडवून आणणे अवघड आहे हे ओळखून हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केलेली दिसून येते.

मुस्लिम समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रध्दा चौकटीमुळे उदारमतवादी विचारापासुन हा समाज दूर गेला. आत्मनिरिक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाजामध्ये त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. आर्थिक दारिद्र्य, शैक्षणिक मागासलेपण परिणामतः मुस्लिम समाजाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक विकासात अडसर निर्माण झाला. मुस्लिम समाजात असलेली विसंगती स्पष्ट करून ती दूर करणे, धर्मांतर्गत सुधारणांबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक विकास घडवून आणून मुस्लिम समाजाला सांप्रदायिकतेच्या व अंध प्रामाण्यवादाच्या जोखडातून मुक्त करण्याची गरज आहे. त्याशिवाय मुस्लिम समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. म्हणूनच सत्यशोधक मुस्लिम चळवळ आधुनिक लोकशाही समाजाची मूल्ये, धर्मातीत इहवाद व विज्ञानवादाच्या साहाय्याने मुस्लिम समाजाचे कल्याण साधु इच्छिते.

हमीद दलवाई हे भारतीय राष्ट्रवादाशी संपूर्ण निष्ठा ठेवून तो राष्ट्रवाद बलवान करण्याचा प्रयत्न करीत होते. मुस्लिम समाजाने त्या राष्ट्रवादाची कास धरावी असा त्यांचा आग्रह होता. आज जगात जी पन्नासपेक्षा अधिक मुस्लिम राष्ट्रे आहेत ती काही वेळा एकत्र येत असली तरी त्यापैकी कोणीही राष्ट्रवाद सोडलेला नाही. तर इराण-

इराक, इजिप्त-सिरिया, जॉर्डन-अफगाणिस्तान-पाकिस्तान या मुस्लिम राष्ट्रांतील भांडणे राष्ट्रवाद किती प्रबळ आहे हेच दाखवितात.[166]

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू-मुस्लिमांच्या एकजुटीतून स्वातंत्र्याचा लढा उभा करण्याचे प्रयत्न करण्यात आले. खिलाफत चळवळ, लखनौ करार इत्यादी त्यापैकी काही यशस्वी झाले.[167] तर काही अयशस्वी झाले. ब्रिटिशांच्या 'फोडा झोडा व राज्य करा' या कूटनितीमुळे मुस्लिम समाज व हिंदू समाज परस्परांपासून दुरावले गेले.[168] भारतात धार्मिक तत्वावर मुस्लिम लीगची निर्मिती झाली. भारत स्वतंत्र होताच धार्मिक तत्वावर पाकिस्तानची निर्मिती झाली. या फाळणीला अनेक मुस्लिम नेत्यांचा विरोध होता. मौलाना अब्दुल कलाम आझाद यांना ही फाळणी नको होती व त्यांचा धर्माधिष्ठित राज्यालाही विरोध होता. हिंदू-मुस्लिम ऐक्य निर्माण होऊन धर्मनिरपेक्ष तत्वावर भारतीय समाजाची निर्मिती होणे महत्वाचे होते.[169] हजारो वर्षापासुन एकत्र राहणारे भारताचे नागरिक फाळणीमुळे केवळ धर्माच्या नावावर वेगळे झाले. फाळणीमुळे लाखो लोक निर्वासित झाले, दंगली झाल्या. अनेक वर्षांपासून जोपासलेली मानवी मूल्ये पायदळी तुडविली गेली. भारतातील हिंदू मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी व धर्मनिरपेक्ष लोकशाही अशा भारतीय समाजाची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळीची निर्मिती करण्यात आली.

राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी कायद्याची आवश्यकता असते व त्यातही समाज व राज्य यांच्या सुसंवाद प्रस्थापित होण्यासाठी समान नागरी कायद्याची आवश्यकता असते. समान नागरी कायद्याला मुस्लिम समाजाचा विरोध आहे. मुस्लिम समाजातील सनातनी आणि कर्मठ नेत्यांचे म्हणणे असे आहे की, भारतीय राज्यघटनेने सर्वच नागरिकांना धर्माचे स्वातंत्र्य किंवा उपासनेचा अधिकार दिला आहे. मुस्लिम व्यक्तिगत कायदा हा आमच्या धर्मश्रध्देचा अविभाज्य घटक असल्यामुळे त्यात बदल म्हणजे आमच्या धार्मिक स्वातंत्र्यावर बंधन घालणेच आहे.[170] शिवाय राज्यघटनेचे 44 वे कलम मार्गदर्शक तत्व म्हणून असल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष वापर करणे योग्य नाही. अशीही त्यांची भूमिका आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये समान नागरी कायद्याचा उल्लेख आहे [171] व भारतात निर्माण होणाऱ्या अनेक जातीय व धार्मिक ताणतणावाच्या मूळाशी असलेल्या कारणांपैकी समान नागरी कायद्याचा अभाव हे एक कारण आहे. त्यामुळे हमीद दलवाईंनी भारतात समान नागरी कायद्याची निर्मिती होऊन समान व निकोप राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी सत्यशोधक मुस्लिम चळवळीची स्थापना केली होती.

मुस्लिम समाजाने उर्दू भाषेऐवजी प्रादेशिक भाषेत शिक्षण घेतले पाहीजे. तसे झाले तरच समाजात शेजारी राहुनही दोन्ही जमातीत तो परकेपणा आहे तो कमी होईल कारण भाषिक जीवनाबरोबरच सामाजिक मूल्ये आणि

सांस्कृतिक एकता यांचा विकास होत असतो असा सर्वांचाच अनुभव आहे. मुल्ला मौलवी किंवा सनातनी विचारांचे मुस्लिम नेते उर्दू ही मुसलमानांची मातृभाषा आहे, तसेच ज्याला उर्दू येत नाही तो मुस्लिम कसला ? असे सांगून अडाणी किंवा सामान्य मुसलमानांची फसवणूक करतात. हमीद दलवाईंच्या मते भारतातील मुसलमान मुळचे याच देशातील आहेत. ते अरबस्तानातून आलेले नाहीत, त्यांचे पूर्वज भारतीयच होते. पूर्वजांची जी भाषा तीच आजच्या मुसलमानांची मातृभाषा. महाराष्ट्रातील मुसलमानांची मातृभाषा मराठी आहे आणि तीच त्यांनी आपल्या मुलाबाळांना शिकवून समाजाचा व व्यापक अर्थाने देशाचा विकास घडवून आणता येईल.[172]

भाषा ही विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी मानवाने निर्माण केलेले एक साधन आहे. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण कोणत्या भाषेत चालते याला महत्व देण्यापेक्षा देवाण घेवाण सुलभ आहे किंवा नाही याला महत्व दिले पाहिजे. तसेच राष्ट्रवादाच्या निर्मितीतही भाषा व तिचे समानतत्व महत्वाचे असते. केवळ धर्मभावनेतुन एखाद्या भाषेचा आग्रह धरणे हे राष्ट्रवादाला पूरक न ठरता मारक ठरत असते. भारतात काही परंपरावादी मुस्लिम धर्मीयांकडून उर्दू भाषेची मागणी होत होती. मुस्लिमांच्या विकासाची कोंडी होऊ नये म्हणून उर्दू भाषेबरोबरच प्रामुख्याने प्रादेशिक किंवा राष्ट्रीय भाषेचे ज्ञान मुस्लिमांनी संपादन करावे[173] या मागणीसाठी सत्यशोधक मुस्लिम चळवळीची निर्मिती झाली.

मुस्लिम समाजामध्ये धर्माच्या माध्यमातून अनेक जाचक रूढी आणि परंपरा निर्माण झाल्या होत्या. हिंदू समाजात धर्मांची चिकित्सा करणारे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर यांच्या सारख्या थोर समाजसुधारकांनी हिंदु समाजातील स्त्रियांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपला देह झिजविला. त्याप्रमाणेच मुसलमान समाजात स्त्रियांना समान हक्क दिले पाहिजेत, सवतबंदी आणि तोंडी तलाक देण्याची प्रथा कायद्याने बंद झाली पाहिजे हे करण्यासाठी धर्माची चिकित्सा होणे गरजेचे होते. सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता होती. त्याशिवाय मुस्लिम समाजात सामाजिक सुधारणा होणे शक्य नव्हते.[174] त्यासाठीच हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना केली होती.

मुस्लिम समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या अभावातुन अशिक्षितपणा, परंपरावाद, रूढीप्रियता यामुळे मुस्लिम समाजामध्ये धर्मांच्या माध्यमातून अनेक प्रथा अशा होत्या की, ज्या कालबाह्य ठरलेल्या होत्या. त्यासाठी प्रबोधनाची नितांत गरज होती. धर्माची मान्यता असूनही सनातनी किंवा परंपरावादी धर्मवाद्यांच्या खोट्या प्रचाराला बळी पडून आपले कुटुंब वाढवून आर्थिक मागासलेपण मुस्लिम समाजाने ओढवुन घेतले. मुस्लिम समाजात कुटुंब नियोजनाचा प्रसार करून लोकसंख्यावाढीला नियंत्रण घालण्याची गरज पटवून दिली पाहिजे[175] याची जाणीव मुस्लिम समाजाला करून देण्यासाठी महाराष्ट्रात सत्यशोधक मुस्लिम चळवळीचा उदय झाला.

कुराणात कोठेही कुटुंबनियोजन व संतती नियमन याविरूध्द स्पष्ट आदेश नाही. त्या काळात लोकसंख्या वाढीची समस्या आणि लोकसंख्येचे सांख्यिक राजकारण नसल्यामुळे तसा नियम व आदेश निघण्याचे कारणही नव्हते. 'इस्लाम मुस्लिम्स अँड फॅमिली प्लॅनिंग' या ग्रंथात एस. वाय कुरेशी यांनी दाखवून दिले आहे की, 'इस्लाम मुलांच्या गुणवत्तेवर भर देणारा आहे आणि इस्लाम संख्येवर भर देत नाही. लोकसंख्यावाढीचा पुरस्कार इस्लाम करत नाही, आग्रह धरत नाही, कुटुंब नियोजन करायचे या तत्वाचा इस्लामने प्रथमपासून पुरस्कार केला आहे.[176] तरीही परंपरावादी किंवा रूढीनिष्ठ लोकांमुळे मुस्लिमांचा कुटुंब नियोजनास विरोध आहे. तेव्हा परंपरावादी लोकांना विरोध करून मुस्लिम समाजात लोकसंख्यावाढीला नियंत्रण घालण्याची गरज पटवून देण्यासाठी महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना झालेली दिसून येते.

धर्मांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय चालीरिती व परंपरा, रूढी यांच्याविरूध्द लढण्याचा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा मानस होता. मुस्लिम समाजात असणाऱ्या अनेक प्रश्नांपैकी सर्वात अन्यायकारक गोष्ट म्हणजे स्त्रियांना तलाक देण्याची पध्दत होय. मुस्लिम व्यक्तीगत कायद्याप्रमाणे पतीने पत्नीला 'तलाक-तलाक-तलाक' असे तीन वेळा म्हंटले किंवा तशी नोटीस पाठविली किंवा तलाक दिल्याबद्दल नुसता निरोप पाठविला तरी तलाक अमलात येतो आणि तीन वेळा तलाक या शब्दाचा उच्चार केल्याबरोबर तो शब्द मुस्लिम स्त्रीवर अन्याय करतो. तीन शब्द एका कुटुंबाची वाताहात करू शकतात. यावेळी स्त्रीला कोर्टात आपली कैफियत मांडता आली पाहिजे. यासाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय झाला.[177] तसेच शरियतच्या आधारे पत्नीला जर पतीपासुन तलाक मिळवायचा असेल तर कोर्टात जाऊन तो मिळवावा लागतो असा विचित्र न्याय प्रकार स्त्रियांबाबत असल्यामुळे असा हा अन्याय कायदा बदलून घेण्याचा आणि स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना झाली.

आज बहुपत्नीत्त्वाची प्रथा स्त्रियांकरीता अपमानास्पद समजली जाते. शरीयतच्या नावाखाली मुस्लिम स्त्रीवर होणारा आणखी एक अन्याय म्हणजे मुस्लिम पुरूषाला एकवेळा चार बायका करण्याचा अधिकार प्रचलित कायद्याने दिलेला आहे. मुस्लिम पुरूषाला ही परवानगी म्हणजे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर व स्त्री-पुरूष समानतेशी विसंगत गोष्ट समजली जाते. त्यामुळे मुस्लिम समाजात स्त्री म्हणजे फक्त एक उपभोग्य वस्तु आहे असे समजले जाते. तो प्रचलित कायदा बदलण्यास सरकारला भाग पाडणे हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे आद्य कर्तव्य मानले जाते. पण मुसलमान समाज म्हणतो, शरीयतच्या आदेशानुसार ठरविलेले नीतिनियम बदला येत नाहीत तसा बदल करणे म्हणजे इस्लाम धर्मांत ढवळाढवळ करणे असे मानले जाते व त्या व्यक्तिला काफिर समजले जाते[178] हमीद

दलवाईंनी मुस्लिम स्त्रीयांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी मुस्लिम समाजातील परंपरावादी विचाराला विरोध करून मुस्लिम सत्यशोधक चळवळची उदय घडवून आणला होता.

### 4.7 मुस्लिम सत्यशोधक चळवळीची उद्दिष्ट्ये :-

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात ब्राह्मणी वर्चस्वावर घणाघाती प्रहार करून बहुजन समाजाला जागे करणारे जसे महात्मा फुले, दलितांना तुम्ही पशु नाहीत, माणसे आहात म्हणून माणुसकीच्या अधिकारासाठी लढा देण्यास तयार व्हा असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच भारतामधील परंपरावाद्याच्या आणि रूढींच्या बेड्यात अडकून पडलेल्या मुसलमानांना पैगंबराचा इस्लाम अशा भ्रमातून सोडविण्याचा प्रयत्न करणारे हमीद दलवाई. मुस्लिम समाज सर्व भारतभर पसरलेला असताना सर्वप्रथम महाराष्ट्रातच हमीद दलवाईंना इस्लाम परिवर्तनाचा विचार सुचावा ही गोष्ट कोणाला नवलाची वाटेल. महात्मा फुले ह्यांचे कार्य त्यांच्या काळातील जसे आव्हानात्मक कार्य होते. हमीद दलवाई यांचे आजच्या काळातील कार्य अधिक आव्हानात्मक वाटते कारण आजचा मुस्लिम समाज हा कल्पनेपेक्षाही अधिक अस्वस्थ आणि धर्मश्रध्देच्या बाबतीत अधिक कडवा बनलेला दिसून येतो. तसे हिंदू धर्माच्या तुलनेत इस्लाम हा अधिक संघटित किंवा अधिक परंपरावादी धर्म म्हणून ओळखला जातो. त्यास एकच प्रेषित आणि एकच धर्मग्रंथ आहे. त्यावर कुठलीही समीक्षा तो मानत नाही. ह्या धर्मांधतेस आव्हान देणारे महाराष्ट्रातील पहिले मुस्लिम विचारवंत हमीद दलवाई होते.

22 मार्च 1970 रोजी पुणे येथे हमीद दलवाईंनी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' ही समाजातील पहिली सुधारणावादी व पुरोगामी चळवळ सुरू केली.[179] मुसलमानांच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी त्या समाजाचे विचार प्रबोधन करणे हा महत्वाचा उद्देश मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा होता. तसेच त्याला पोषक अशा वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळावी, धर्मांकडे बघण्याचा मुस्लिमांचा दृष्टीकोन बदलला जावा आणि ते आपल्या राष्ट्रवादी विचारप्रवाहात सामील व्हावेत म्हणजे खऱ्या अर्थाने हिंदू-मुस्लिम समाजाचे ऐक्य होऊ शकेल. थोडक्यात मुसलमानांना सेक्युलर राष्ट्रवादी बनविणे हा विचार आणि त्यासाठी केले जाणारे कार्य मंडळाच्या दृष्टीने महत्वाचे होते.[180]

भारतीय समाजाचे सर्वार्थाने अविभाज्य अंग असलेला मुस्लिम समाज आणि पर्यायाने महाराष्ट्रातील मुस्लिम समाज, सामाजिक विकास, सामाजिक सुधारणा आणि सामाजिक परिवर्तनाच्या बाबत आजवर दुर्लक्षित राहिल्याचे नमुद करावे लागेल. 2001 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 102,86,10,328 एवढी होती. पैकी महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या 9,68,78,627 असून महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाची लोकसंख्या 1,02,70,485 असून त्यामध्ये एकुण पुरूष 54,37,926 आणि एकुण स्त्रियांची संख्या 48,32,559 एवढी आहे. भारताप्रमाणे

महाराष्ट्रात धार्मिक वर्गीकरणानुसार मुस्लिमांचा क्रमांक दुसरा लागतो. महाराष्ट्रात धर्मनिहाय लोकसंख्येच्या बाबतीत मुस्लिम धर्म दुसऱ्या क्रमांकावर असुन एकुण लोकसंख्येपैकी त्याचा वाटा 10.60 % एवढा आहे. [181]

मुस्लिम समाजाच्या एकूण लोकसंख्येपैकी 18.50 % लोकसंख्या मुंबई शहरात आहे. नागपूर शहरामध्ये 11.00 % आहे. सर्वात जास्त लोकसंख्या औरंगाबाद शहरात 39 % आहे. तर मालेगाव आणि भिवंडी मध्ये मुस्लिम लोकसंख्या सर्वाधिक आहे.[182] मुस्लिम समाज हा इतर समाजाच्या तुलनेने असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे तसेच मुस्लिम समाजात विशिष्ट जातीनुसार व्यवसायाचे वर्गीकरण झालेले दिसून येते. त्याचप्रमाणे मुस्लिम समाजाची शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक स्थिती दयनिय असलेली आढळुन येते.

भारतीय मुस्लिम समाज सनातनी, कर्मठ, अंधश्रध्दाळू व संघटित आहे. एकुण भारतीय समाजाप्रमाणे तो दारिद्र्याने, निरक्षरतेने, बेकारी-महागाई इत्यादी आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला आहे. धर्मचिकित्साविरोध आदी बाबतीत तो अति संवेदनशील आहे. अनेक प्रकारच्या चळवळी व आंदोलने उभारून समाजाला पुढे नेण्याचा इतिहास असलेल्या संघटित मध्यमवर्गाचा त्यात अभाव आहे. अल्पसंख्य असल्याने या समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. आणि म्हणूनच त्याचा सतत राजकीय वापर होत राहिला आहे. याशिवाय आपला धर्म परिपूर्ण असल्याची त्यांची परोकोटीची अंधश्रध्दा असल्याने मुस्लिम समाजाच्या बाबतीत धर्मनिष्ठा जास्त प्रभावी असल्याचे दिसते. हमीद दलवाईंच्या मते ‘‘मुस्लिम समाजात मोकळ्या मनाने विचार करणारी आत्मनिरिक्षणाची सवय असलेली आणि धर्मातीत विचार करणारी माणसे थोड्याफार प्रमाणात सापडतील. यासाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष आत्मपरिक्षणपर बौध्दीक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात आहे.’’ [183] त्यामुळे मुस्लिम समाजाचा विकास घडून न येता समाजात अनेक जुन्या प्रथा आहेत, त्याला विरोध करण्याच्या उद्देशाने पुण्यात हमीद दलवाईंनी सत्यशोधक मुस्लिम चळवळ सुरू केली होती. भारतीय मुस्लिम परंपरेच्या वैभवाबरोबरच महाराष्ट्रातील आजवरच्या समाजपरिवर्तनाच्या परंपरा शिरोधार्य मानणारी मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही एक संघटनात्मक सामाजिक चळवळ आहे.

इस्लामची चौकट बंदिस्त आहे. कुराण हा इस्लामचा अंतिम आदेश असून कुराणातील विचारांवर या धर्माच्या सर्व प्रक्रिया अवलंबून आहेत. शरियत नुसारचे वर्तन ग्राह्य मानले जाते. या व्यवस्थेला आव्हान देण्याला धर्म विरोधी कृत्य मानले जाते. ही सर्व प्रक्रिया राबविण्यामध्ये पुरूषी वर्चस्व स्पष्टपणे दिसत आहे. याचा सर्वाधिक फटका मुस्लिम स्त्रियांना बसला. दीर्घकाळाची ही व्यवस्था  बदलायला हवी यासाठी  एकोणिसाव्या शतकात आग्रह झाला. सर सय्यद अहमद खान यांनी शिक्षणाच्या प्रक्रियेतून नवा विचार मुस्लिम समाजात रूजविण्याचा प्रयत्न

केला. पण त्यामध्ये आक्रमकतेपेक्षा समाजाला समजावून घेण्याचा पवित्रा होता.[184] फाळणीनंतर भारतीय मुस्लिम समाज इथल्या बहुसंख्य हिंदू समाजाशी सामंजस्य साधून नव्या धर्मातीत राष्ट्रात एकात्मतेची गरज भागवेल अशी अपेक्षा होती. परंतु मुस्लिम समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणांचा अभाव असल्याने दोन्ही समाजमानसांत मोठा फरक होता. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा म्हणतो -

"भारतात सर्वधर्मीय राष्ट्रीयता निर्माण करण्याच्या झालेल्या प्रयत्नात एक मूलभूत चूक सतत होत राहिली आहे. ती अशी की, हिंदू समाजाला आधुनिक, विशाल आणि पुरोगामी बनविण्याच्या आड येणाऱ्या जुनाट धर्मनिष्ठा बदलण्याचा एक सतत प्रयत्न चालला असतानाच मुस्लिम समाजाच्या कालविसंगत अशा परंपरागत श्रध्दांना हात न लावण्याचा आटापिटा मुस्लिम समाजाकडून करण्यात येत होता. आणि बहुसंख्य हिंदू समाजातील परिवर्तनवादी मंडळी देखील या प्रक्रियेला कळत नकळत हातभार लावीत होती. आज देखील या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. याचा परिणाम म्हणजे हिंदू समाजात आधुनिक राष्ट्रवादाचे धर्मनिरपेक्षतेचे आणि समानतेच्या आधुनिक मानवी मूल्यांचे प्रवाह तुलनेने अधिक बळकट होत गेले आणि मुस्लिम समाज मात्र आपल्या जुन्याच श्रध्दांना चिटकून राहिला. सुशिक्षित मुस्लिमांची मजल यामुळे विभक्तवादी प्रवृत्तीपलीकडे कधी जाऊ शकली नाही. बदललेल्या परिस्थितीचे आव्हान यामुळेच मुस्लिम समाज स्वीकारू शकला नाही."[185] ही दरी भरून काढणे हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे.

हमीद दलवाईसारख्या सत्यशोधक आणि त्यांनी स्थापन केलेले मुस्लिम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रातच निर्माण व्हावे याला महाराष्ट्रातील सव्वाशे वर्षाची महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, सुधारक गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटीलांपासुन आजतागायत 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ हाती घेणाऱ्या बाबा आढावांपर्यंत लक्षणीय आणि अविरत चालत आलेली झपाटलेल्या समाजसुधारकांची परंपरा कारणीभूत आहे. सत्यशोधक या शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे मुस्लिम सत्यशोधक मंडळ हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या सभासदांपुढे आहे.[186] असा उल्लेख मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहीरनाम्यात आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे तत्वज्ञान मनुष्य केंद्रीत आहे. मुस्लिम तत्वज्ञ, मौलवी व इमाम यांच्याशी मुस्लिम सत्यशोधकांचे मतभेद आहेत. मानवाचे त्याच्या परमेश्वराशी संबंध आहेत. हे संपूर्णतः खासगी आहेत असे

मुस्लिम सत्यशोधकांचे म्हणणे आहे. इबादत व आदत हे धर्मांचे दोन भाग आहेत. इबादत म्हणजे उपासनेचे अंग जे वैयक्तिक स्वरूपाचे असते. ते तुम्ही आपल्या इच्छेप्रमाणे चालवा, पण त्याचे आदत म्हणजे इहलोकाविषयीचे जे अंग आहे त्याचा संबंध इतर माणसांशी, समाजाशी, देशाशी असतो म्हणून त्याचे आचरण इतर समाजाच्या संदर्भातच केले पाहिजे. थोडक्यात इबादत म्हणजे ईश्वरभक्ती ही व्यक्तीची खाजगी बाब आहे. तर आदत म्हणजे व्यक्ती व्यक्तीशी संबंध.[187] ह्या गोष्टी मंडळाच्या दृष्टीकोनातून राजकीय व सामाजिक संस्था ठरतात. शास्त्रीय प्रतिक्रिया व विचार यातून उत्क्रांत झालेल्या जगभराच्या आधुनिक संस्था माणसांच्या सामाजिक वर्तणूकीवर नियंत्रण ठेवतात असे मुस्लिम सत्यशोधकांचे म्हणणे आहे.

मुस्लिम सत्यशोधक चळवळीकडे अनेक व्यक्तींनी आकृष्ट होण्याच्या कारणांपैकी एक म्हणजे मंडळाची तत्वप्रणाली होय. अशा प्रकारची सडेतोड व व्यवहार्य तत्वप्रणाली जागतिक मुस्लिमांच्या इतिहासात पहिल्यांदा मांडण्यात आली व ती मुस्लिम सत्यशोधक मंडळाव्दारे व्यवहारात उतरविण्यात आली. कुठल्याही कार्यरत चळवळीच्या तत्वप्रणालीप्रमाणे ती लवचिक आहे असे मंडळ मानते. हमीद दलवाई इतरांच्या धर्मस्वातंत्र्याला प्राधान्य देणारे होते. मुस्लिम समाजाच्या धार्मिक श्रध्दा, इबादतच्या बाबी या संदर्भात त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य मान्य केलेले होते. फक्त धर्माच्या नावाने अन्याय होत असेल, प्रगतीमध्ये बाधा येत असेल किंवा इतरांच्या अस्तित्वाला काही गोष्टी बाधक ठरत असतील तर त्या बाजुला ठेवल्या पाहीजेत असा त्यांचा आग्रह होता. माणसाची भौतिक सुधारणा व विकास हा मुस्लिम सत्यशोधक विचारसणीचा गाभा आहे.[188]

मुस्लिम सत्यशोधकांना समाजवादाची कल्पना पसंत आहे. धर्म ही सार्वजनिक जीवनातील एक सामाजिक शक्ती आहे. म्हणून तीत सुधारणा झाली पाहीजे असे मुस्लिम सत्यशोधक मानतात. तसेच देशाची घटना व कायदा सर्वोच्च मानतात. धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही या कल्पनांचा उगमच आधुनिककाळातील असल्याने त्याचा जर आपण स्वीकार करायचा तर तो अंध धर्मश्रध्देचा पगडा दूर करूनच मुस्लिमांना करता येईल. अशी मंडळाची धारणा आहे. म्हणून मुस्लिम समाजाला त्यांच्या पारंपारिक अंधश्रध्दातून किंवा परंपरावादी रूढीतील विचारातून बाहेर काढून त्याला वास्तवाची परखड जाणीव करून देणे हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.[189]

मानवी आयुष्याच्या भौतिक व मानसिक पैलूंशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या धर्मनिरपेक्षवादाचा संबंध आहे. भारतात महाराष्ट्रासह मुस्लिमांनी प्रादेशिक भाषा अनुसरावी व उर्दूचा आग्रह सोडून द्यावा. असा मुस्लिम सत्यशोधकांचा आग्रह आहे. कारण मुसलमानांनी उर्दू ऐवजी प्रादेशिक भाषेत शिक्षण घेतले तर समाजात शेजारी शेजारी (हिंदू-मुस्लिम) राहूनही दोन्ही जमातीत जो परकेपणा राहतो तो कमी होईल पण एक भारतीय भाषा म्हणून

उर्दूचा विकास होणे मंडळाला महत्वाचे वाटते. मुस्लिमांचे आधुनिक भारतीय नागरिकांत रूपांतर होण्यासाठी पुनर्जागृती व्हावी हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे उद्दिष्ट आहे.[190]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहिरनाम्यात म्हंटले आहे की ''वास्तविक स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना विशिष्ट धर्मगटासाठी मंडळे काढण्याची आवश्यकता असायला नको होती याची जाणीव आहे. परंतु मुस्लिम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची दरी नष्ट होईल तेव्हा हे मंडळ मुस्लिम समाजापुरते कार्य करणार नाही. आधुनिक विचारांच्या, सर्वधर्मीय राष्ट्रवादी परंपरा मानणाऱ्या सर्वच भारतीयांच्या इच्छा आकांक्षानुसार एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही. ती अवस्था यावी आणि लवकर यावी म्हणून हे मंडळ कार्य करीत राहील.''[191] थोडक्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही एक सामाजिक परिवर्तनाची स्वयंसेवी चळवळ होती असे दिसून येते.

हिंदू-मुस्लिम यांच्यात घटनेने समानता यावी म्हणून सर्वप्रथम देशात समान नागरी कायदा झाला पाहिजे. घटनेत तसे आश्वासन देऊनही राज्यकर्त्यांनी त्या दिशेने आजवर काहीही केलेले नाही. यासाठी समान नागरी कायद्याची मागणी मुस्लिम सत्यशोधक मंडळ अनेक मार्गांनी आजतागायत अविरतपणे करीत आहे. तसेच मुस्लिम स्त्रीला आवश्यक ते अधिकार प्राप्त व्हावेत, मुस्लिम स्त्रियांना समान हक्क मिळावे (बहुपत्नीत्वाची प्रथा), तोंडी तलाक देण्याची प्रथा कायद्याने बंद केली जावी, पडदा पध्दत बंद व्हावी, कुटुंबनियोजनाचा प्रचार व्हावा यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ झगडत आहे. तलाकपीडित मुस्लिम महिलांना कायद्याने पोटगी मिळवून देवून आजपर्यंत कित्येक मुस्लिम स्त्रियांचा पाठिंबा मंडळाने मिळविला आहे. वक्फ बोर्डाची चौकशी होऊन तो पैसा विधायक कार्यासाठी वापरला जावा. अशी मंडळाची एक प्रमुख मागणी आहे. थोडक्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आजपर्यंत अनेक प्रश्न हाती घेऊन त्यात यश मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

''मुस्लिम जातीयवादाविरूध्द प्रहार करायचे टाळून हिंदू जातीयवादी शक्ती निष्प्रभ करता येतील, या भ्रमात सेक्युलरवाद्यांनी दीर्घकाळ राहू नये. मुस्लिम जातीयवाद्याविरूध्दचा लढा सुरू करून मुस्लिम समाजातील परिवर्तनाची प्रक्रिया सुरू करणे हाच हिंदू जातीयवादावर प्रहार करण्याचा प्रभावी मार्ग आहे'' असे हमीद दलवाईंचे म्हणणे होते.[192]

''जेव्हा उदारमतवादी हिंदू-मुस्लिम जातीयवादाचा अपवाद न करता सर्वच प्रकारच्या जातीयवादाविरूध्द स्पष्ट भूमिका घेतली जाईल तेव्हा माझी भूमिका बदलावी लागेल'' [193] असे हमीद दलवाई म्हणतात. थोडक्यात

मुस्लिम जातीयवादाबरोबर हिंदू जातीयवादावर कोरडे ओढून तथाकथित ढोंगी लोकांचे बुरखे फाडणे हे मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे उद्दिष्ट्य, ध्येय आहे.

मुस्लिम स्त्रियांनी बुरखा पध्दती सोडावी, शिक्षण घेऊन नोकऱ्या कराव्या, स्वतःच्या पायावर उभे रहावे. यासाठी शक्य तितका प्रयत्न मुस्लिम सत्यशोधक वैयक्तिक व संघटनात्मक पातळीवर करीत आहेत. शिक्षणाचे माध्यम, व्यवसाय व नोकरीची संधी आणि अल्पसंख्याक म्हणुन मुस्लिमांच्या प्रश्नाविषयी जनमत संग्रहित करणे, हिंदू-मुस्लिम तणावाच्या वेळी मंडळाची भूमिका मांडणे या गोष्टी तसेच इस्लामी पध्दतीबरोबरच सिव्हील मॅरेज ॲक्ट नुसार मुस्लिमांनी विवाह करावेत, असा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा आग्रह आहे. [194]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य, प्रकाशन, जाहीर सभा, मोर्चा, धरणे, सत्याग्रह व उपोषणे, निवेदन प्रदान करणे, कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर निरनिराळ्या कार्यक्रमांत भाग घेऊन पाहणी, संशोधन व सांस्कृतिक कार्यक्रम करणे या प्रकारे चालते.

### 4.8 मुस्लिम सत्यशोधक चळवळीची भूमिका :-

कोणताही समाज मुळातच परंपरावादी असतो. 'बाबा वाक्य प्रमाणम्' ही त्यांची मूळपिठीका असते. प्रबोधनपर चळवळीस पहिल्यापासून विरोध होत राहिला आहे. त्यामुळे प्रबोधनाची प्रक्रिया अतिशय मंद असते. हिंदू, ख्रिश्चन या प्रमुख धर्मांचा विचार करता इस्लामचे वय केवळ तेराशे वर्षाचे आहे. इतर धर्मांच्या तुलनेत या धर्मावर कुराण मत विचारसरणीचा पगडा मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. मुस्लिमांचे प्रबोधन व्हावे व हा समाज जास्तीजास्त इहवादी दृष्टीकोन अंगीकारून प्रगतीच्या मार्गावर जावा ही भूमिका घेऊन हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. कोणताही समाज सहजपणे सुधारणांचा स्विकार करत नाही. त्यासाठी त्या समाजाच्या विचारसरणीची कठोर चिकित्सा करणे अत्यावश्यक असते. मुस्लिम जातीयवाद व त्याचे मागासलेपण नेमके कशात आहे. याचा अनेक मुस्लिम विचारवंतांनी आपल्या परीने उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये सय्यद अहमद खान, मौलाना आझाद, मौलाना हाली यांच्यासारख्या अनेक विचारवंतांची नावे आपल्या समोर येतात. हमीद दलवाई यांनी मुस्लिम जातीयवादाचे मूळ कशात आहे याचा शोध घेतला तेव्हां त्यांना दिसून आले की इस्लाम धर्मांची व मुस्लिम इतिहासाची कठोर चिकित्सा करणे आवश्यक आहे. तशी कठोर चिकित्सा करून ती जनतेसमोर मांडण्याचा हमीद दलवाईंनी प्रयत्न केला. हमीद दलवाईंच्या या कार्यात त्यांना प्रा. अ. भि. शहा, प्राचार्य नरहर कुरूंदकर, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य या मुस्लिमेत्तर सहकाऱ्यांबरोबर सय्यद भाई, हुसेन जमादार, बाबुमिया बँडवाले, प्रा. वि. अ. शेख यांच्यासारख्या अनेक मुस्लिम सुधारणावादी व्यक्तीचे सहकार्य लाभले.[195]

15 ऑगस्ट 1947 रोजी हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. मुस्लिम लीगच्या जातीयवादाची परिणती अखेर देशाची फाळणी होण्यात झाली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्व भारतीय एकत्र आले होते. परंतु यामध्ये मुस्लिमांचा सहभाग कमी प्रमाणात होता. मुळात मुस्लिम मन हे राजकीय व ऐहिक बाबतीत उदासीनच असते असे दिसून येते. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनी मुस्लिम समाजाला स्वातंत्र्य चळवळीत ओढण्याचे अनेक प्रयत्न केले पण त्यामध्ये त्यांना फारसे यश मिळाले नाही. लोकमान्य टिळकांनी सन 1916 मध्ये लखनौ करार केला.[196] परंतु टिळकांच्या या औदार्याचा मुस्लिम समाजावर फारसा परिणाम झाला नाही. पुढे सन 1920 च्या असहकार चळवळीला खिलाफत चळवळीची जोड देण्याचा महात्मा गांधींनी प्रयत्न केला परंतु त्यामुळे मुसलमानांच्यात अलगपणाची भावनाच वाढीस लागली. त्याचे कारण उघड आहे की खिलाफत चळवळ ही मूळातच धार्मिक चळवळ होती. तिचे मूल्यमापन केवळ एवढ्याच शब्दात करता येईल की 'धर्मांच्या कारणाने का होईना पण मुस्लिम समाज ब्रिटिशांच्या विरूध्द उभा राहिला.'[197]

सन 1940 च्या लाहोर अधिवेशनात मुस्लिम लीगने जिनांच्या नेतृत्वाखाली वेगळया राष्ट्राची, पाकिस्तानची मागणी केली. तेच त्यांचे ध्येय होते. 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका' या पुस्तकात याविषयी असे नमुद करण्यात आले आहे. एकवेळ ब्रिटिश या देशातुन गेले नाहीत तरी चालतील, स्वातंत्र्य मिळाले नाही तरी चालेल, पण जर ते मिळणार असेल तर मग मात्र आम्हाला हिंदुस्थानात रहावयाचे नाही. आम्ही विभक्त होणारच, आम्हाला आमचे वेगळे मुस्लिम राष्ट्र व्हावे असे मुस्लिम लीगचे नेते म्हणू लागले. [198]

याउलट देवबंदच्या उलेमांना या देशाचे विभाजन नको होते. त्यांचा फाळणीला विरोध होता. त्यांचे म्हणणे असे होते की, फाळणी स्विकारून एका लहानशा पाकिस्तानच्या तुकड्यावर आम्ही काय म्हणून समाधान मानावे ? हा सर्व देश आमचाच म्हणजे मुसलमानांचा आहे. नुसते पाकिस्तान मिळवून उरलेल्या भारतावरील ताबा आम्ही काय म्हणून सोडावा ! ते शक्य नाही. सर्व हिंदुस्थान हा परत मुस्लिम अंमलाखाली आला पाहिजे. [199]

उपरोक्त विचारसरणीपेक्षा वेगळा विचार असणारे ही काही मुस्लिम विचारवंत होते. उदा. मौलाना आझाद त्यांना फाळणीही नको होती व धर्माधिष्ठीत राष्ट्रही नको होते. आझाद यांच्या मते हिंदू मुस्लिम यांनी एकत्र येऊन धर्मनिरपेक्ष समाजाच्या पायावर उभारलेले सर्वार्थाने नवे असे राष्ट्र हे त्यांचे स्वप्न होते.[200]

परंतु या देशाची फाळणी झाली व धर्माधिष्ठीत पाकिस्तान आणि धर्मनिरपेक्ष भारत ही दोन राष्ट्रे उदयास आली. स्वातंत्र्योत्तर भारतात अनेक जातीय दंगली झाल्या. राष्ट्रीय एकात्मतेचा बोजवारा उडाला. धर्मनिरपेक्षतेचे धिंडवडे निघाले. धर्मांच्या नावाखाली राष्ट्रीय एकता व अखंडतेला आव्हान देण्याची भाषा जातीयवाद्याच्या मुखातुन

निघू लागली. विसाव्या शतकाच्या सातव्या दशकात मुस्लिम जातीयवादी राजकारणाची कठोर चिकित्सा करणारा एक मुस्लिम तरूण हमीद दलवाई उदयास आला. त्याने मुस्लिम जातीयवादावर चौफेर हल्ला चढविला. आक्रमक मुस्लिम जातीयवाद हे इस्लामच्या परंपरेचे दृश्य स्वरूप आहे. हे इतिहासाच्या आधाराने उघड करून सांगण्याचा त्याने प्रयत्न केला. हा मुस्लिम जातीयवाद तर समाप्त करावयाचा असेल तर मुस्लिम धर्म, इतिहास व संस्कृतीची कठोर चिकित्सा केली गेली पाहिजे असे त्याने नम्रपणे सांगितले. ज्याप्रमाणे शरीरातील सडलेला अवयव शस्त्रक्रिया करून काढून टाकला जातो त्याप्रमाणे इस्लामी परंपरा व धर्मांची चिकित्सा करून धर्मांकडे बघण्याचा आपला पारंपारिक दृष्टीकोन बदलला पाहिजे. थोडक्यात धर्माकडे पाहण्याची आपली परंपरावादी विचारधारा सोडली पाहिजे. धर्मातील टाकाऊ भाग हा बदलला पाहिजे. ज्या राजकीय नेत्यांनी मताच्या राजकारणासाठी मुस्लिम जातीयवादाला प्रोत्साहन दिले. त्यांनी मुसलमानांचा अनुयय करणे सोडले पाहिजे असे ठाम प्रतिपादन हमीद दलवाईंनी केले. मुस्लिम जातीयवाद हा धर्म व पंरपरेच्या आधाराने बळकट झाला आहे हे त्यांनी सिध्द केले. तसेच 'हिंदू जातीयवाद हा मुस्लिम जातीयवादाची केवळ प्रतिक्रिया आहे' हे ठाम मत त्यांनी मांडले.[201]

हमीद दलवाईच्या या अनपेक्षित विरोधामुळे मुस्लिम जातीयवादी व सनातनी खवळून उठले व हमीद दलवाई यांच्या विरोधात त्यांनी विषारी प्रचार सुरू केला. काफिर, जनसंघी, हिंदूचा एजंट, अस्तनीतील निखारा, श्रध्दाहीन अशा अनेक विशेषणांने त्यांना संबोधीत करण्यात येऊ लागले. पण दलवाई थांबायला तयार नव्हते कारण परिस्थिती हाताबाहेर जाण्याअगोदरच इलाज करावयास हवा होता. धर्मांधतेच्या चिखलात अडकलेल्या मुस्लिम समाजाला अंधश्रध्देच्या जोखडाखालून मुक्त केले पाहिजे. मुस्लिम समाजाला धर्मांच्या नावाखाली कैद करणाऱ्याच्या तावडीतून सोडविले पाहीजे. कारण हमीद दलवाईंच्या मते, "धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही समान नागरी कायदा, लोकसंख्या वाढीवर नियंत्रण, तोंडी तलाकला विरोध, बुरखा पध्दतीस विरोध, प्रादेशिक भाषेचा स्विकार, धर्मांची कठोर चिकित्सा या सर्व बाबी आधुनिक राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक आहेत त्याचा स्विकार केला तरच अंध धर्मश्रध्देचा पगडा दूर होईल."[202] ही सर्व उद्दिष्टे यासाठी महत्वपूर्ण आहेत.

मुस्लिम समाजामध्ये सुधारणा घडवून आणून समाजातील प्रत्येक माणसामध्ये आर्थिक, सामाजिक प्रतिष्ठा, प्रस्थापित करणे तसेच मनुष्य दुसऱ्या मनुष्याशी, मग तो कोणत्याही धर्मांचा असो, प्रत्येक व्यक्तिचे परस्परांशी संबंध सद्सद्विवेक बुध्दीच्या आधारे व समानतेच्या तत्वावर आधारित ठेवले पाहिजे. या विचाराला मुस्लिम सत्यशोधक चळवळीने प्राधान्य दिले. या उद्दिष्टपूर्तीसाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळीने वेळोवेळी राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधारणेसाठी जी भूमिका घेतली ती अत्यंत महत्वाची होती.

आज आपण म्हणतो आम्ही सर्व ईश्वराची लेकरे आहोत परंतु ही समानता आपणास दिसून येत नाही. त्यामुळे अनेक प्रकारची विषमता समाजामध्ये निर्माण झाली. मुस्लिम समाजामध्ये धर्माचाच आधार घेऊन स्त्रीयांवर अनेक निर्बंध टाकून स्त्रीचे स्वातंत्र्य मर्यादित झाल्याचे दिसून येते. मुस्लिम समाजामध्ये तलाकचा संपूर्ण अधिकार पुरूषालाच एकतर्फी देण्यात आला आहे. तसेच स्त्रीने केवळ चुल व मूल हीच भूमिका बजावली पाहीजे. तसेच बुरखा पध्दतीमुळे पुरूषाला सर्व प्रकारचे अधिकार दिले जात होते. व स्त्रियांना जगण्याचा अधिकार ही नाकारला जात होता. ही विषमता संपूर्ण मानवी समाजाच्या विकासात कशी अडथळा निर्माण करते हे मुस्लिम सत्यशोधक चळवळीने समाजाला पटवून दिले व समाजात स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित व्हावी या भूमिकेसाठी जुबानी तलाकवर बंदी, सवत बंदी कायदा मुस्लिमांना लागू व्हावा, तलाक पीडित स्त्रियांना पोटगी, तलाक पीडित महिलांचे पुनर्वसन इत्यादी मागण्या वेळोवेळी करून धर्मांतर्गत स्त्री,पुरूष समानता व समाजान्तर्गत समानता प्रस्थापित करण्यासाठी सतत प्रयत्न केले.[203] थोडक्यात मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्त्री-पुरूष समानता ही भूमिका असलेली दिसते.

हिंदुस्थानच्या फाळणीमुळे भारतात धार्मिक तेढ निर्माण झाली. त्यातून हिंदू-मुस्लिम दंगली झाल्या. हिदूं-मुस्लिम दंगलीमुळे भारताची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली. ऐक्याच्या अभावी देश खिळखिळा होण्याची वेळ आली. पण राष्ट्रविकासासाठी राष्ट्रीय ऐक्याची आवश्यकता असते. किंबहुना राष्ट्रीय ऐक्या अभावी कोणतेही राष्ट्र आपला विकास साधू शकत नाही. मुस्लिम जातीयवाद निर्माण होऊ नये, मुस्लिमांमध्ये धर्मांधता कमी होऊन त्यांच्यामध्ये विवेकशीलता निर्माण होण्यासाठी मुस्लिम धर्मांची चिकित्सा करण्याची आवश्यकता आहे. कारण धर्मचिकित्सेतुन योग्य काय व अयोग्य काय ? याचा निर्णय होऊ शकेल अशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची भूमिका असलेली दिसून येते.[204]

मुस्लिम सत्यशोधक मंडळ धर्मनिरपेक्षतेला मानवी जीवनात प्राधान्य देणारे आहे. भारताने राज्यघटनेच्या सुरूवाती पासूनच धर्मनिरपेक्षता या तत्वाला मान्यता दिलेली आहे. सन 1976 साली 42 वी घटना दुरूस्ती करून राज्यघटनेच्या सुरूवातीला उद्देश पत्रिकेमध्ये ‘धर्मनिरपेक्षता’ या शब्दाचा समावेश करण्यात आला. [205] व्यक्तिगत पातळीवर नागरिकांना आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे, धर्मविचार जोपासण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. अर्थात आपल्या धर्मस्वातंत्र्याचा उपयोग करीत असताना दुसऱ्याच्या धर्मस्वातंत्र्याला बाधा येणार नाही. या मर्यादेपर्यंत प्रत्येकाला व्यक्तिगत पातळीवर धर्मस्वातंत्र्य आहे. ही भूमिका मुस्लिम सत्यशोधक मंडळाची आहे. धर्म ही बाब मंडळ नाकारीत नाही परंतु निकोप समताप्रधान मानवी जीवन निर्माण होण्यामध्ये धर्मांची आडकाठी घेण्याला मंडळाचा विरोध आहे. धर्मांच्या बाबतीत मुस्लिम मन इतके संवेदनाक्षम आहे की सुधारणा,

बदल हा विचारच त्यांना सहन होत नाही. त्यांच्यावर धर्मांचा प्रचंड पगडा आहे. त्यांच्या मते इस्लाम धर्म हा परिपूर्णच आहे व सर्व समस्यांची उत्तरे धर्मातच आहेत असे त्यांच्यावर बिंबवले गेल्यामुळे बदल हा विचार त्यांना सहन होत नाही. थोडक्यात धर्मांच्या पलीकडे जग असू शकते याचा विचारच न केल्यामुळे जग कोठे चालले आहे ? विज्ञानाने किती प्रगती केली आहे ? हे त्यांना कळू शकत नाही. परिणामी मुस्लिम समाज जीवनाच्या बऱ्याच क्षेत्रात, प्रगतीच्या बाहेर फेकला गेला. जर मुस्लिम समाजाची प्रगती व्हावयाची असेल तर त्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्ष बनणे आवश्यक आहे. व धर्मनिरपेक्षता म्हणजे व्यक्तीला धर्म स्वातंत्र्य आहे, परंतु धर्माला स्वातंत्र्य नाही ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची भूमिका होती.[206]

इस्लाम धर्म जगात अतिशय पुरोगामी व उच्चधर्म आहे जो मनुष्यजातीला जगाशी कसे संबंध ठेवावेत याबद्दल मार्गदर्शन करतो. उदा. कुटुंब नियोजनातच कुटुंबाचा कल्याणाचा मार्ग आहे हे इस्लाम धर्माने सांगितले आहे. परंतु भारतीय मुस्लिम समाजाने कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला विरोध केला कारण मुल्ला-मौलवींनी व जातीयवादी पुढाऱ्यांनी मुस्लिम लोकसंख्या वाढावी असे सांगितले. खरे तर परिवर्तन ही स्वाभाविक व नैसर्गिक अवस्था आहे व म्हणूनच मनुष्याचे आपल्या हितासाठी काळाच्या बरोबरीने बदलणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जो समाज किंवा व्यक्ती कालक्रमानुसार बदलून आपली प्रगती करणे पसंत करीत नाही तो समाज किंवा ती व्यक्ति उत्कर्षाच्या शर्यतीत मागे पडतात. इस्लाम धर्म कालक्रमानुसार सामाजिक उत्कर्षाच्या प्रत्येक दिशेला आवश्यक ते बदल करण्याची परवानगी देतो. सर्वच मुस्लिम देशांनी ती पुरोगामी नवीन जीवनशैली स्वीकारली आहे व उत्कर्षाचा नवीन उच्चांक गाठला आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाला याच इस्लामिक धार्मिक तत्वसाराची पुनर्स्थापना करून भारतातही प्रगतीचा उच्चांक गाठावयाचा आहे [207] अशी मंडळाची भूमिका आहे.

### 4.9 मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना :-

कोणत्याही विचारवंताच्या विचारांचा समाजात किती खोलवर प्रभाव पडला त्याचे मोजमाप करण्याचे काही निश्चित परिमाण नाही. त्यासाठी त्या विचारवंताचे विचार समजून घेणे आवश्यक आहे. अशा विचारवंताच्या विचारांच्या प्रचार व प्रसारासाठी लोकांनी उत्स्फुर्तपणे काही चळवळी केल्या का ? त्या चळवळी सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचल्या का ? त्याचप्रमाणे अशा विचारवंताचे विचार बहुसंख्य लोकांनी मान्य केले का ? त्या विचारांना प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न केले का ? तो विचार लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला का ? आणि झाला असल्यास किती प्रमाणात झाला ? हा विचार करणे आवश्यक असते. हमीद दलवाईंनी 22 मार्च 1970 मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. त्याव्दारे आपल्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आणि आपल्या विचारांना प्रत्यक्षात आणण्यासाठी एक सामाजिक चळवळ उभी केली.

महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय ही महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक जीवनातील एक महत्वपूर्ण घटना आहे. मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही सामाजिक परिवर्तनवादी चळवळ असली तरी ती महाराष्ट्रातील राजकीय परिवर्तनाला सहाय्यभूत ठरली आहे. भारतात खऱ्या अर्थाने निकोप व एकसंघ राष्ट्रवादाची निर्मिती करावयाची असेल तर त्यासाठी महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक समाजाची चळवळ सुरू झाली. मुस्लिम समाजामध्ये धर्माच्या माध्यमातून अनेक जाचक रूढी, परंपरा निर्माण झाल्या होत्या. तलाक पध्दती, त्यातून निर्माण झालेली स्त्री-पुरूष विषमता, जाचक रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी धर्माची चिकित्सा होणे गरजेचे होते. त्यासाठी सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता होती. अशिक्षितपणा, परंपरावाद, रूढीप्रियता, यामुळे मुस्लिम समाजामध्ये धर्माच्या माध्यमातून अनेक प्रथा अशा होत्या की ज्या कालबाह्य ठरलेल्या होत्या. मुस्लिम समाजातील पुरूषाला बहुपत्नी विवाहाची संमती आहे. याला धर्मापेक्षाही तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आधार आहे. मुस्लिम समाजातील व्यक्तीजीवनात धर्म वरचढ ठरला. व्यक्तीवर धर्माचे नियंत्रण निर्माण झाले. व्यक्ती ही पूर्णपणे धर्माधीन झाली. त्यातून मुस्लिम धर्मात अनेक अंधश्रध्दांचा जन्म झाला.[208] त्यामुळे धर्माचे स्वरूप विकृत होत गेले. या सर्व प्रथा कालक्रमानुसार अयोग्य आहेत हे सांगण्याची मुस्लिम समाजाला आवश्यकता होती. त्यामुळे महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळीची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील ही एक पुरोगामी चळवळ होती.

महात्मा फुलेंना जीवनात एक उदात्त परंतु प्रसंगी प्राणाचे मोल मागणारे प्रयोजन सापडले. इहलोकात स्वार्थापोटी सत्यधर्म दडपला जातो आणि अन्याय चालू ठेवले जातात. हे सत्य सांगण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी केली होती. परंतु फुलेंच्या वाट्याला समाजाचा उपहास आणि उपेक्षा आली. मात्र मुस्लिम सत्यशोधकांची वाट महाभयंकर होती. मुस्लिम समाजाला धर्मनिरपेक्ष अशी समाजसुधारणाच मंजुर नव्हती. जे काही सांगावयाचे ते प्रेषिताच्या मुखातुन एकदा बाहेर पडलेले आहे तेच अंतिम सत्य त्यात बदल मुस्लिम समाजाला मान्यच नाही. त्यात बदल करणारा अल्ला हा स्तुतीस पात्र असा जगातील एकमेव देव आहे.[209] महंमद पैगंबर हा अल्लाचा रसूल (दूत) असून त्याच्या करवी अल्लाने कुराणाची शिकवण माणसाला दिली. ही इस्लामची असलेली भूमिका या भूमिकेला कोणीही आव्हान दिले नव्हते ते हमीद दलवाईंनी दिले. हमीद दलवाईंच्या पूर्वी पुरोगामी विचारांचे अनेक मुस्लिम विचारवंत होऊन गेले. मौलाना आझाद सारख्यांनी कुराणाचे वेगळे स्पष्टीकरण केले. न्यायमूर्ती छागलांनी मुस्लिम जातीच्या राजकारणावर टीका केली. परंतु कुराणावर कुणी टीका केली नव्हती. मात्र हमीद दलवाईंना मुस्लिम समाज सुधारणेचा ध्यास लागला होता. म्हणून त्यांनी सुरूवातीस असे सांगितले की 'महंमद हा देवाचा दूत नसून माणूस आहे. महंमदाने समाजात सुधारणा करण्यासाठी कुराण हा ग्रंथ लिहिला. त्या

काळात समाजात कुराणातील नियम आवश्यक असले तरी बदलत्या परिस्थितीनुसार त्या नियमांमध्ये बदल व्हावयास हवा अशी दलवाईंनी विचारसरणी होती.' [210]

भारतीय समाज व्यवस्थेत इस्लाम रूजला पण हे रूजणे भारतीय मानसिकतेच्या अंगाने घडले. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी इस्लाम चा स्वीकार सोयीनुसार केला. भारतीयांसाठी इस्लाम हा परकीय धर्म, स्वाभाविकपणे स्थानिक हिंदूच्या धर्मांतराने येथील मुस्लिम समाजाने आकार घेतला. यावर हिंदू जातीव्यवस्थेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. हिंदू धर्माने जातनिहाय व्यवसायाची निश्चिती केली तीच पध्दत मुस्लिम समाजामध्ये राहिली. त्यामुळे धर्म बदलला पण व्यवसाय मात्र जुनाच राहिला. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. खरे तर इस्लाममध्ये समानतेला प्राधान्य आहे. पण भारतीय मुस्लिम समाजात ही समानता अभावानेच आढळते. महाराष्ट्राचा विचार केला तर शहर, ग्रामीण भागात मुस्लिम समाजाच्या एकंदर स्वरूप रचनेमध्ये विविधता आहे. इस्लामची चौकट बंदिस्त आहे. कुराण हा इस्लामचा अंतिम आदेश असुन कुराणातील विचारावर या धर्माच्या सर्व प्रक्रिया अवलंबून आहेत. शरियत नुसारचेच वर्तन ग्राह्य मानले जाते. या व्यवस्थेला आव्हान देण्याला धर्मविरोधी कृत्य मानले जाते. यामध्ये पुरूषांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणात दिसते. याचा सर्वाधिक फटका मुस्लिम स्त्रीयांना बसला. ही दीर्घकाळची व्यवस्था बदलायला पाहिजे. यासाठी 19 व्या शतकात सर सय्यद अहमद खान यांनी शिक्षणाच्या माध्यमातून नवा विचार रूजविण्याचा प्रयत्न केला. पण त्यामध्ये आक्रमकतेपेक्षा समाजाला समजावून घेण्याचा पवित्रा होता.[211]

मुसलमान समाजात आधुनिक उदारमतवादी प्रवाह सुरू करणे, तरूणांमध्ये चिकित्सक बुध्दी जागृत करणे, परंपरागत रूढींनी जोडलेल्या मुस्लिम समाजाचे प्रबोधन करणे, मुस्लिम स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करणे, समान नागरी कायदा करवून घेऊन जाती जमातीतल्या भिंती पाडून टाकणे इ. उद्दिष्टांसाठी हमीद दलवाईंनी सन 1966 पासून प्रबोधन आंदोलनाची धुरा उचलली होती. मुस्लिम स्त्रीची दयनीय अवस्था आणि दर्जा सुधारण्यासाठी योग्य त्या कायद्याच्या मागणीसाठी हमीद दलवाईंनी मुंबई येथे कौन्सिल हॉलवर सात मुस्लिम स्त्रियांचा मोर्चा 18 एप्रिल 1966 रोजी नेला. 7 स्त्रिया ही काही संख्या होत नाही मात्र 7 मुस्लिम स्त्रिया ही विशेष बाब होय. हा मोर्चा पुढे होणाऱ्या मुस्लिम प्रबोधनवादी चळवळीची नांदी ठरला. सन 1968 नंतर मुस्लिम समाजसुधारणेचे पूर्णवेळ काम करण्यासाठी दलवाईंनी नोकरी सोडली. हिंदू धर्माच्या तुलनेत इस्लाम एक संघटित व परंपरावादी धर्म मानला जातो. या समाजाच्या मागासलेपणाचे मुख्य कारण त्याचे आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण आहे.[212]

हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजाला जुन्या विचारसरणीतून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्यामध्ये वैज्ञानिक आणि इहवादी दृष्टीकोन जोपासण्यासाठी व मुस्लिम समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्रथमतः सन 1968 सालीच 'सदा ए निसर्वा' नावाची मुस्लिम स्त्रियांची संघटना उभारली[213] पुढे त्यांनी अ. भि. शहाच्या बरोबरीने 'इंडियन सेक्युलर सोसायटी' सन 1968 सालीच मुंबईत स्थापन केली. परंतु पुढे या सोसायटीकडे दलवाई खेरीज एकही मुस्लिम न फिरकल्याने ते निराश झाले. परंतु या सोसायटीमार्फत अनेक मेळावे आयोजित करण्यात आले होते. त्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र पुरते मर्यादित नव्हते. दिल्ली, अलिगढ, हैद्राबाद, कलकत्ता यासारख्या शहरांतून आपले हे विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी लेख, भाषणे, सभा व्दारे दलवाईंनी मोहीमच आखली होती. यावेळी त्यांनी मुस्लिम तरूणात प्रचार केला व अनेकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला होता. खरे तर त्यांनी काढलेल्या पहिल्या स्त्री मोर्चापासुन स्त्रियांना हक्क मिळवून देऊन स्त्री मुक्तीच्या मार्गाने स्त्री पुरूष समानता साधणे हे तर दलवाईंचे मिशनच होते असे म्हणावे लागेल.

महाराष्ट्रामध्ये महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी समाजसुधारणेसाठी स्त्रीशिक्षणासाठी, समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे हिंदू स्त्रियांबाबतीत संमती वयाचा कायदा, व्दिभार्या प्रतिबंधक कायदा, सती बंदीचा कायदा असे कायदेशीर बदल होत गेले व हिंदू स्त्रियांची स्थिती थोडी थोडी सुधारत गेली. परंतु मुस्लिम समाजातील स्त्रियांबाबतीत अशी सुधारणा झाली नाही. ज्या ज्या वेळी समाजसुधारणेच्या दृष्टीकोनातून मुस्लिम कायद्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला गेला त्या त्या वेळी मुस्लिम मूलतत्ववाद्यांनी धर्मामध्ये ढवळाढवळ होते या नावाखाली त्याला विरोध केला. त्यामुळे मुस्लिम समाजात फारशा सुधारणा होऊ शकल्या नाहीत व स्त्रीयांबाबतीत तर हा समाज जास्तच मागास राहिला. दोन्ही समाजातील सामाजिक बदलाबाबतची ही दरी वाढतच गेली.[214] मुस्लिम स्त्रीला तिच्या या मानसिक व बौध्दीक गुलामगिरीतुन मुक्त करून तिला समाजामध्ये मानाचे स्थान व समानता मिळवून देणे, एक व्यक्ती म्हणून तिला समाजामध्ये विकासाच्या सर्व संधी उपलब्ध करून देणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे हे ओळखून जुन्या परंपरागत विचाराला घट्ट चिकटून बसलेल्या या मुस्लिम समाजाला नवी दिशा दाखवून देण्यासाठी हमीद दलवाई यांनी 22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना पुणे येथे केली.[215] या वेळी त्यांना प्रा. अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, सय्यदभाई, मुनीर सय्यद, अमीर शेख, हुसेन जमादार, आय. एन. बेग व मुमताज रहिमतपुरे इत्यादी समविचारी मंडळीनी साथ दिली. मुस्लिम समाजाच्या

इतिहासातील ही पहिली क्रांतिकारी घटना म्हणावी लागेल. हमीद दलवाई यांचा या मंडळाच्या निर्मिती मागे पुरोगामी दृष्टीकोन होता.

हमीद दलवाई आणि त्यांनी स्थापन केलेले मुस्लिम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रातच निर्माण व्हावे याला महाराष्ट्रातील 125 वर्षांची महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, सुधारक प्रि. गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रार्जिषि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, वीर सावरकर यांचे पासून आजतागायत डॉ. बाबा आढावांपर्यंत अविरत चालत आलेली समाजसुधारकांची परंपरा कारणीभूत आहे. या मंडळाला मुस्लिम शब्द घालावा की नाही या बद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. या शब्दाने जातीयवाद तर सूचित होत नाही ना ? अशी शंका व्यक्त केली गेली.[216] परंतु यावेळी हमीद दलवाईंनी शंका निरसन केले. परंपरागत धर्म मानत असो अगर नसो जन्माने आपण मुस्लिमच मानले जातो. शिवाय आपणास मुस्लिम समाजात काम करायचे आहे, त्या समाजात सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही. म्हणून मुस्लिम शब्द हवाच असे मत हमीद दलवाईंनी मांडले. तसेच या मंडळाला 'सत्यशोधक' हा शब्द डॉ. बाबा आढावांनी सुचविला आणि तो तात्काळ स्वीकारण्यात आला.[217] महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीपासून प्रेरणा घेऊनच मंडळाला हे नाव देण्यात आले.

सत्यशोधक या शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या सभासदांपुढे आहे. असा उल्लेख मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या जाहीरनाम्यात आहे.[218]

महात्मा जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून हिंदू धर्मातील जुनाट रूढी, परंपरा, अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला. म. फुल्यांचा आदर्श समोर ठेवून सामाजिक सुधारणेचे कार्य मुसलमान समाजात करावयाचे असल्याने मुस्लिम सत्यशोधक मंडळ असे संस्थेचे नाव ठेवण्यात आले. हिंदू समाजात राजा राममोहन रॉय, म. फुले, प्रि. आगरकर यांच्यासारखे अनेक सुधारक होऊन गेले. त्यांचीच परंपरा पुढे चालविणारे अनेक हिंदू अजूनही कार्य करत आहेत पण मुस्लिम समाजात असे कार्य करणारे कोणीच नसल्याने प्रबोधनाची चळवळ मुस्लिम समाजामध्ये सुरू करण्याचे हे पहिले पाऊल होते.[219]

22 मार्च 1970 यादिवशी हमीद दलवाईंच्या नेतृत्वाखाली सुमारे 100 पुरोगामी मंडळी मोर्चाने साधना कार्यालयातील आंतरभारती सभागृहात जमली आणि तिथे गुरुवर्य जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व यास्मिन

लुकमानी यांच्या हस्ते उद्‌घाटन होऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. मंडळाच्या जाहीरनामा व घटना यावेळी हमीद दलवाईंनी प्रसारित केली. भारतीय मुस्लिम समाजात प्रबोधनाचे आंदोलन चालविणे हे मंडळाचे उद्दिष्ट असल्याचे घटनेव्दारे जाहीर करण्यात आले. [220] यावेळी पुण्याचे सय्यदभाई, मुनीर सय्यद, अमीर शेख, ए. जी. शेख, हुसेन जमादार या कार्यकर्त्यांबरोबरच नगर जिल्ह्यातील श्रीगोंद्याचे स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले यांना घेऊन मंडळाची पहिली कार्यकारणी नियुक्त करण्यात आली.[221]

अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर इत्यादी बरोबरच भाई वैद्य व डॉ बाबा आढाव या समविचारी मंडळीनी हमीद दलवाईंना त्यांच्या कामात साहाय्य केले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापने पासून बाबुमिया बँडवाले हे आजीवन मंडळाचे अध्यक्ष होते.[222] हे सर्व मुंबई, पुणे, फलटण, अमरावती, इचलकरंजी, सातारा या ठिकाणी काम करत होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली त्या समविचारी मित्रांपैकी कुणालाही हमीद दलवाईंनी आपण नेता आणि ते अनुयायी अशी भावना येऊ दिली नाही. कारण हमीद दलवाईंना नवा प्रेषित होऊन नवा पंथ स्थापन करायचा नव्हता.

मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा रोख केवळ मुसलमान स्त्रियांवरचा अन्याय दूर व्हावा एवढ्यापुरताच मर्यादित नव्हता तर धर्मांच्या नावाखाली सोसावे लागणारे अन्याय दूर व्हावे म्हणुन चाललेल्या समाजप्रबोधनाच्या चळवळीचाच तो एक भाग होता. 20 व्या शतकातील मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही एक क्रांतिकारी घटना आहे. इस्लामची ध्येये धोरणे काळाशी सुसंगत ठेवून बदलाची प्रक्रिया सुरू करावयास हवी अशी हमीद दलवाईंनी भूमिका घेतली होती.[223] खरे तर ही पुरोगामी विचारांची चळवळ नवा विचार घेऊन पुढे आली होती. या चळवळीचा अर्थ असा नव्हता की स्त्रियांचे प्रश्न (हक्क), समान नागरी कायदा, कुटुंब नियोजन इत्यादी गोष्टी मुस्लिम समाजाने मान्य केल्या किंवा शासनाने तसे कायदे केले व तशा सुधारणा घडून आल्या म्हणजे मंडळाचे कार्य संपले असे मानता येणार नाही. सुधारणांचा अर्थ असा मर्यादित करता येणार नाही. काही सुधारणा पदरात पडल्यावर जो थांबतो तो खरा सुधारकच नव्हे असा आगरकरांचा बाणा मुस्लिम सत्यशोधक मंडळा समोर असल्याने काही सुधारणा घडून आल्या किंवा काही ध्येये साध्य झाली तरी मंडळ थांबणे शक्य नव्हते. आपणास असे दिसून येते की एक बदल घडून आला की दुसऱ्याची मागणी आणि त्यासाठी समाजमन तयार करणे, अधिकाधिक सुधारणा होण्यासाठी संघर्ष करीत राहणे, एका नवसमाजाची उभारणी करणे हे मंडळाचे अंतिम ध्येय होते. जोपर्यंत मानवी स्वभाव असाच राहणार आहे, जोपर्यंत त्याच्यातील हीन पशुवृत्तीही जाग्या राहणार आहेत. तोपर्यंत तो पूर्णत्वाला पोहोचणार नाही. एक सुसंस्कृत मानव म्हणून जगण्याची त्यांची इच्छा तोपर्यंत अपूर्णच राहणार. हा फक्त काही व्यक्तिंचा, केवळ मुस्लिम समाजाचा, फक्त या देशातील सर्व नागरिकांचा नव्हे तर अखिल मानव जातीचाच हा

प्रश्न आहे. म्हणूनच आपणास असे म्हणता येईल की मुस्लिम सत्यशोधक मंडळा ने बाळगलेले ध्येय हे काही फक्त मुसलमान समाजापुरतेच मर्यादित नाही तर त्याची व्याप्ती संपूर्ण मानवजातीलाच जाऊन भिडते.

**4.10 तत्कालीन महाराष्ट्रातील परिस्थिती :-**

**4.10.1 महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती :-**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला आणि 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना अंमलात आली.[224] या संविधानात भाषिक राज्यांची स्थापना करण्यासंदर्भात नियमावली नव्हती. पण स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये 1921 साली राष्ट्रीय काँग्रेसच्या अहमदाबाद अधिवेशनामध्ये भाषावार प्रांतरचना करण्याचा ठराव संमत झाला होता.[225] सन 1928 साली नेहरू कमिशनने भाषावार प्रांतरचनेला पाठिंबा दिला. पुढे 15 ऑक्टोबर 1938 स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अध्यक्षतेखालील मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषकांचा एक प्रांत निर्माण व्हावा असा ठराव झाला.[226] पाठोपाठ 28 जानेवारी 1940 रोजी मुंबईत 'संयुक्त महाराष्ट्र सभा' स्थापन झाली.[227] 24 मे 1924 रोजी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या स्वागताध्यक्षपदाखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरवली गेली.[228] मराठी भाषेचे राज्य व्हावे, या भूमिकेतुन अनेक लहान-मोठ्या घटना घडामोडी घडत होत्या. या पार्श्वभूमी वर 1 नोव्हेंबर 1956 रोजी महाव्दैभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. यशवंतराव चव्हाण त्याचे मुख्यमंत्री झाले.[229] हे राज्य स्थापन झाल्यावर संयुक्त महाराष्ट्र स्थापनेसाठी दंगली उसळल्या आणि यशवंतराव चव्हाणांनी चळवळ दडपण्यासाठी मी हत्यार वापरणार नाही असे जाहीर केले. याच दरम्यान यशवंतराव चव्हाणांनी पंडित नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावर छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करायचे ठरविले. त्यादिवशी वाई ते प्रतापगड मार्गावर संयुक्त महाराष्ट्र समितीने प्रचंड निदर्शने केली. त्या आंदोलनातील लोकभावना पंडित नेहरूंच्या ध्यानी आली. सन 1957 च्या विभानसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीला 102 जागा मिळाल्या. यावेळी यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेसच्या नेतृत्वाला हे पटवून दिले की, या पुढच्या निवडणुकीत महाराष्ट्र व गुजरातमध्ये आपल्याला बहुमत मिळणे अशक्य आहे. ही गोष्ट पंडित नेहरू व श्रीमती इंदिरा गांधी यांना पटली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राशिवाय गत्यंतर नाही, हे लक्षात घेऊन महाराष्ट्र व गुजरात ही राज्ये स्थापन करण्याचा निर्णय झाला. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाले.[230]

1 मे 1960 रोजी अस्तित्वात आलेले महाराष्ट्र राज्य एका दैदीप्यमान लढ्यातून आकाराला आले आहे. स्वातंत्र्यानंतर स्वकीय सरकारविरोधात लोकशक्तीने लोकशाही मार्गाने केलेले हे सर्वात मोठे आंदोलन होते. सन

1942 च्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात महाराष्ट्रातील तेरा हजार लोक तुरूंगात गेले होते. तर सन 1955 ते 1960 या पाच वर्षांत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीसाठी 68 हजार लोक तुरूंगात गेले. 106 हुतात्म्यांनी बलिदान दिले.[231] यावरूनच या आंदोलनाची मोठी लोकभागीदारी ध्यानात येते.

महाराष्ट्राचा विस्तार भारताच्या दक्षिणेतील भूखंडावर आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील राज्यांत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश ही राज्ये प्रथम व व्दितीय क्रमांकावर आहेत. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ 3,07,690 चौरस किलोमीटर इतके आहे. भारताच्या एकंदर भूभागाच्या तो 9.36 टक्के आहे. $15.8^0$ अक्षांश ते $22.1^0$ अक्षांश (उत्तर) आणि $72.6^0$ ते $80.9^0$ रेखांश (पूर्व) यातील पट्ट्यात महाराष्ट्राचा विस्तार आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेस अरबी समुद्राचा सुमारे 720 कि. मी. लांबीचा किनारा लाभला आहे. महाराष्ट्राच्या वायव्य भागात गुजरात राज्य आणि दादरा व नगर हवेली हे संघराज्य क्षेत्र आहे. उत्तर व पूर्वेस मध्यप्रदेश आणि दक्षिणेस कर्नाटक व आंध्रप्रदेश यांच्या सीमा आहेत. गोवा राज्य दक्षिण-पश्चिम किनाऱ्याच्या बाजुस आहे. [232]

1 मे 1960 रोजी आजचे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले तेव्हा महाराष्ट्रात 26 जिल्हे होते. आज तेथे 35 जिल्हे आहेत. महाराष्ट्र राज्याची विभागणी, कोकण (ठाणे), नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशा सहा प्रशासकीय विभागात केली आहे. अशा सहा विभागातून 357 तालुक्यांत आज महाराष्ट्र पसरलेला आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे.[233] गेल्या पन्नास वर्षामध्ये महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, पी. के. सावंत, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बॅ. अ. र. अंतुले, बॅ. बाबासाहेब भोसले, डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर, सुधाकर नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, विद्यमान मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असे मुख्यमंत्री लाभले. त्यापैकी 20-21 वर्षे पश्चिम महाराष्ट्राला, 13-14 वर्षे मराठवाड्याला, कोकणाला दोन-तीन वर्षे व विदर्भला 13 वर्षे मुख्यमंत्रीपद मिळालेले आहे. याचा अर्थ कमी अधिक प्रमाणात सर्व विभागांना राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. [234]

आज उत्क्रांत झालेल्या महाराष्ट्राची राजकीय, आर्थिक, सामाजिक मुहुर्तमेढ व काही प्रमाणात प्रत्यक्ष पायाभरणी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी विचारपूर्वक ध्येयवादाने प्रेरित होऊन व दीर्घकालीन विकासाचे सूत्र लक्षात घेऊन करण्याचा प्रयत्न केला. भारतीय राज्यघटनेत जी मूल्ये अंगभूत व अभिप्रेत आहेत, त्या मूल्यांच्या आधारावर महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रावर मराठी भाषेचा जो जनसमुह, त्या जनसमुहाच्या जीवनाची नवउभारणी करणे, त्या मूल्यांचा अविष्कार व अनुभव देणारी समाज व्यवस्था निर्माण करणे हा क्रांतिकारक उद्देश महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या मूळाशी होता. [235]

दैनिक 'तरूण भारत' मधील 'पन्नास वर्षीय पुरोगामित्व' या लेखात जेष्ठ पत्रकार मधुकर भावे लिहितात - संयुक्त महाराष्ट्राच्या राज्याची सूत्रे यशवंतराव चव्हाणांनी स्विकारल्यानंतर एक सुसंस्कृत राज्य म्हणुन आणि त्यावेळी एक पुरोगामी राज्य म्हणून या महाराष्ट्राची प्रतिमा देशात, उभी करण्याचा प्रयत्न यशवंतराव चव्हाणांनी जाणीवपूर्वक केला. महाराष्ट्र हे नाव सार्थ करणारे निर्णय यशवंतरावांच्या पुरोगामी भूमिकेतून महाराष्ट्रात पहिल्या दिवसापासून घेतले गेले. आज सर्व राजकीय नेते फुले, शाहू, आंबेडकर या नावाचा राजकारणासाठी जप करीत असतात. यशवंतरावांनी या तीन पुरोगामी नेत्यांना अभिप्रेत असलेल्या परिवर्तनाची भूमिका पहिल्या निर्णयापासून घेतली. म्हणून महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतरचा पहिला निर्णय डोक्यावरून मैला वाहून न्यायला कायद्याने बंदी करणारे विधेयक यशवंतरावांनी सादर केले. संपूर्ण देशाने डोक्यावरून मैला वहायला बंदी करणारे हे विधेयक जसेच्या तसे स्वीकारले. महाराष्ट्र या नावाची सार्थकता अशाच पुरोगामी निर्णयात प्रत्येक टप्प्यात पुढे दिसली. [236]

आज देशात सहजपणे उच्चारली जाणारी 'पंचायत राज' ही व्यवस्था पहिल्या प्रथम महाराष्ट्रात सुरू झाली. 1 मे 1960 ला राज्याची निर्मिती झाल्यानंतर 13 मार्च 1962 ला देशातील पहिला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष महाराष्ट्रात खुर्चीवर बसवण्यात आला.[237] महाराष्ट्राचे हे विधेयक देशपातळीवर केंद्र सरकारने जसेच्या तसे मान्य केले आणि सर्व राज्यांनी अंमलबजावणी केली.

लोकशाही राजकारण म्हणजे पक्षीय राजकारण असे म्हणता येईल. देशातील सर्व प्रमुख राजकीय पक्ष महाराष्ट्रातही आहेत. त्याखेरीज काही प्रादेशिक पक्षही आहेत. महाराष्ट्रातील राजकारणावर काँग्रेस पक्षाचे अनेक वर्षे सतत प्रभुत्व राहिले. सन 1978 पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाकडे सत्तेची मक्तेदारी सतत होती.[238] सत्तेच्या या मक्तेदारीमुळे काँग्रेस पक्षाला सत्तेची मजबुत चौकट उभारणे शक्य झाले आहे. पंचायती राज्य, सहकारी संस्थेचे जाळे, पक्ष संघटना इत्यादींचा पाया शिडीसाठी भरभक्कम ठरला होता. सत्तेच्या या चौकटीला मजबुती येण्यासाठी सामाजिक रचनाही कारणीभूत ठरली आहे. विधिमंडळ, पंचायती राज्य, सहकारी संस्था, अन्य निर्वाचित संस्था अशा सर्व ठिकाणच्या बहुतांश जागा मराठा जाती समुहातील वर्गानेच काबीज केल्या होत्या. सत्तेची ही मक्तेदारी इतर गटांना कधीच मोडता येणार नाही असे सन 1990 पर्यंत वाटत होते. याला अपवाद 1978-80 या काळातील पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारचा आहे. पण या आघाडीचे नेतृत्व देखील पूर्वाश्रमीच्या शरद पवारांसारख्या मूळच्या काँग्रेसी नेत्याकडे होते. [239] याकाळात महाराष्ट्र आर्थिक विकास, औद्योगिक प्रगती, राजकीय स्थैर्य, जागृत

मतदार, निस्पृह व धडाडीची वर्तमानपत्रे व कार्यक्षम नोकरशाही या सर्वच बाबतीत अनेक राज्यांच्या तुलनेत वरचढ ठरतो.

महाराष्ट्रात काँग्रेसचे अधिराज्य स्वातंत्र्यापासून होते. विरोधी पक्ष हे नाममात्र होते. आज महाराष्ट्रात तग धरून राहिलेल्या विरोधी पक्षांत भारतीय कम्युनिष्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, जनता दल, रिपब्लीकन पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा उल्लेख करता येतो. सन 1995 मध्ये काँग्रेस पक्षाची मक्तेदारी संपुष्टात येऊन सत्ता शिवसेना-भाजप युतीला मिळाली.[240]

खरे तर महाराष्ट्रात सत्ता रचनेची एक उतरंड रचलेली दिसुन येते. खेड्यातून विभागाकडे, विभागातून जिल्ह्याकडे, जिल्ह्यातून राज्याकडे व राज्यातून केंद्राकडे असे सत्तेचे जाळे विणलेले असते. या जाळ्याचे उभे-आडवे धागे भिन्न-भिन्न सत्ताधाऱ्यांना एकत्रित करण्याचे काम करीत असतात. ही व्यवस्था उतरंडीसारखी असते. यात प्रत्येक सत्ताधाऱ्याला विशिष्ट स्थानी ठेवलेले असते. पंतप्रधान ते सरपंच या उतरंडीचा अविभाज्य भाग असतात. या व्यवस्थेचा परिणाम म्हणजे प्रत्येक सत्ताधारी व्यक्तीला वरच्या स्थानावरील सत्ताधाऱ्यांशी सत्तेचा दुवा जोडावा लागतो, तर आपल्या स्थानाहून कमी असलेल्या स्थानावरील व्यक्तिंचा पाठिंबा मिळविणे भाग असते. सत्तेच्या या साखळीत प्रत्येकजण बांधलेला असतो.

महाराष्ट्रात राजकीय सहिष्णुतेची परंपरा अन्य राज्यांच्या तुलनेने अधिक आढळून येते. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचे हे एक प्रमुख वैशिष्ट्य मानता येईल. 19 व्या शतकात महाराष्ट्रात उदारमतवादी परंपरा निर्माण झाली. न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सारख्यांमुळे व त्यांच्या शिष्यांमुळे ही उदारमतवादी वैचारिक परंपरा टिकुन राहिली. परंतु अलीकडील काळात या परंपरेला तडे गेले आहेत. उदारमत वादाप्रमाणेच गांधीवादी विचारांचांही थोडाफार प्रभाव महाराष्ट्रावर पडला आहे. विनोबा भावे, शंकरराव देव, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, आप्पासाहेब पटवर्धन हे गांधीवादी नेते महाराष्ट्रीय आहेत. त्यांच्यामुळे गांधीवाद महाराष्ट्रात टिकून राहिला आहे.[241] गांधीवादामुळे राजकीय सहिष्णुतेच्या परंपरेला पाठिंबा मिळाला. पण याचबरोबर अत्यंत कडवे गांधीविरोधक देखील महाराष्ट्रात निर्माण झाले. तसेच समाजवादी विचारप्रणाली महाराष्ट्रातील सत्ता राजकारणात यशस्वी ठरली नसली, तरी तिचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकीय विचारांवर व जीवनावर झाल्याखेरीज राहिला नाही. पुरोगामी धोरणामुळे भारतातील पुढारलेले राज्य असेच महाराष्ट्राला म्हणण्यात येते.

मुंबई हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचे एक अंग आहे. महाराष्ट्रातील मुंबईसह नागरी क्षेत्राची संस्कृती आणि ग्रामीण जनतेची संस्कृती दोन भिन्न संस्कृती आहेत. आधुनिकता आणि परंपरा या दोन संकल्पनांवरील दोन

संस्कृती भिन्न दर्शवितात. भारतातील सर्वात अधिक नागरीकरण महाराष्ट्रात झालेले आहे. पण मुंबई वगळल्यास उरलेला महाराष्ट्र ग्रामीण आहे. आजही 65 टक्के जनता खेड्यात राहते. आज आधुनिकतेचे वारे ग्रामीण भागात पोहोचले आहे. वाहतुक, संचार, दूरचित्रवाणी, नभोवाणी आणि साखर कारखाने यांच्या माध्यमातून आधुनिकता ग्रामीण भागात पसरते आहे. तसेच शहरी भागात देखील ग्रामीण वाटणाऱ्या भजनी मंडळ, जातपंचायती, उत्सव आणि खेड्यांना नियमित भेटी या सर्व गोष्टी ग्रामीण संस्कृतीलाच शोभणाऱ्या असतात. महाराष्ट्राची राजकीय संस्कृती घडण्यात बिगरमराठी धनिक, उद्योगपती व व्यापारी यांचाही हातभार आहे. केवळ महानगरे व शहरे यापुरताच या अप्रादेशिक धनिकांचा वावर नाही तर अगदी लहान खेड्यातही मारवाडी आणि गुजराती व्यापारी आढळतात. मराठ्यांचे प्रभुत्व असलेल्या मुंबईत आपले आर्थिक साम्राज्य अप्रादेशिक लोकांनी टिकविले आहे. आज मुंबईतील बड्या उद्योगपतींना महाराष्ट्र शासन आपल्या जवळचे वाटते तसेच महाराष्ट्र शासन उद्योगपतींच्या हितसंबंधांना जपते.[242]

सन 1960-2000 या कालावधीत महाराष्ट्रात 16 राज्यपाल होउन गेले. त्यातील काहींनी अत्यंत कुशलतेने आणि सन्मानपूर्वक काम करून स्वतःच्या कर्तृत्वाचा प्रत्यय दिला. महाराष्ट्रातील दोन मुख्यमंत्र्यांची वसंतदादा पाटील व सुधाकरराव नाईक यांची राज्यपालपदी नेमणूक झाली होती.[243] पण दोघांनी ही वर्षभरातच राजीनामे देऊन पुन्हा सक्रिय राजकारणात येण्याचे ठरविले. महाराष्ट्रात गेल्या 50 वर्षांत फक्त एकदाच राष्ट्रपती राजवट लादण्यात आली. 1980 मध्ये लादलेली राष्ट्रपती राजवट फार थोडा काळ होती.

महाराष्ट्राचे विधिमंडळ व्दिगृही आहे. विधानसभेची सदस्य संख्या 288 आहे. त्यात 18 जागा अनुसुचित जाती व 22 जागा जमातींसाठी राखून ठेवल्या आहेत. 1 जागा अँग्लो इंडियन जमातीसाठी असून त्या सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतात. विधानसभेतील महिला सदस्यांची संख्या घटत असलेले दिसून येते. महाराष्ट्र विधान परिषदेची सदस्यसंख्या 78 आहे. 1935 च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायद्यान्वये 1937 साली विधान परिषदेची स्थापना झाली. 1987 साली विधान परिषदेने आपली सुवर्णजयंती साजरी केली.[244] 1987 साली विधान परिषदेच्या सदस्या शकुंतला परांजपे यांच्या प्रयत्नामुळे कुटुंब नियोजन कार्यक्रम महाराष्ट्र सरकारने अंमलात आणला. काही काळानंतर तो राष्ट्रीय कार्यक्रम झाला.[245] अलीकडील काळात विधानपरिषदेने आपल्याला विधानसभे इतकीच प्रतिष्ठा असल्याचा दावा केला आहे. आज लोकसभेसाठी महाराष्ट्रातून 48 सदस्य निवडले जातात. 1960 नंतर यशवंतराव चव्हाण, अण्णासाहेब शिंदे, डी. आर. चव्हाण, मोहन धारिया, मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, शंकरराव चव्हाण, वसंत साठे, सरोज खापर्डे, शिवराज पाटील, एन. के. पी. साळवे, विठ्ठलराव गाडगीळ, राम नाईक, प्रमोद

महाजन, शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, मधुकर सरपोतदार इत्यादींनी आपला ठसा दिल्लीच्या राजकारणावर उमटविला.

महाराष्ट्राच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीत सर्वांत महत्वाचे स्थान पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे आहे. चव्हाणांसारखा राजकीय मुत्सद्दी, सामाजिक चळवळीकडे आस्थेवाईकपणे पाहणारा प्रगतिशील राजकारणी सर्व मराठी जनतेचे प्रेम मिळालेला नेता या राज्याला मुख्यमंत्री म्हणून लाभला म्हणून सुरूवातीचा 10-12 वर्षांचा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने मूलभूत जडणघडणीचा ठरला. ग्रामीण भागातील लोकशाही सशक्त (बळकट) करावयाची असेल तर राज्यकारभाराबरोबरच सत्ता, नेतृत्व यांचेही विकेंद्रीकरण करावे लागेल हे सूत्र यशवंतराव चव्हाणांनी ओळखले. या कालावधीतच भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व धनंजयराव गाडगीळ यांनी महाराष्ट्रात सहकारी पर्वाची मुहुर्तमेढ रोवली.[246] यशवंतराव चव्हाणांच्या काळात सामाजिक क्षेत्रात दलित मागासवर्गीय यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न झाले. साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व विश्वकोश निर्मिती मंडळ, आर्थिक क्षेत्रात सहकार, कृषी-औद्योगिक समाजरचना यासारखी दीर्घ परिणाम करणारी धोरणे सर्वच क्षेत्रात स्वीकारली गेली. परिणामी लोकांना जबाबदार असणाऱ्या राजकीय नेतृत्वाला लोकांचा प्रतिसाद मिळाला व त्यातूनच राज्यकर्त्यांची फळी उभी राहिली.

आज महाराष्ट्राने शिक्षण, आरोग्य, कृषीविकास, पाटबंधारे, सहकार, औद्योगिकरण, दळणवळण, रोजगार, पर्यटन इत्यादी अनेक बाबींत प्रगती केलेली आहे. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्राचा विकास पाहता रस्त्यांची लांबी 39,241 कि. मी. वरून 2,33,664 कि. मी. झाली आहे. 8010 कारखान्यांची संख्या आज 30684 झाली आहे. 35.1 टक्के असलेली साक्षरता 77.27 टक्यांवर गेली आहे. वार्षिक दरडोई उत्पन्न 533 रूपयांवरून 4705 झाले आहे. 299 रूग्णालयांची संख्या आज 1816 वर गेली आहे. 12,20,000 हेक्टर असलेले सिंचनक्षेत्र, आज तिपटीने वाढून 38,10,000 हेक्टर झाले आहे.[247] त्यामुळेच महाराष्ट्राची अनेक बाबतीत देशाच्या आघाडीच्या राज्यांत गणना केली जाते. याचा अर्थ असा नव्हे की महाराष्ट्रात आज सर्व परिस्थिती व्यवस्थित आहे. आज पन्नास वर्षांनंतर महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा करताना तो विकास समतोल पध्दतीने झाला नाही तर महाराष्ट्रात असमान पध्दतीने विकास झाल्याने अनेक प्रश्न गंभीर बनले आहेत. याबाबत डॉ. विश्वास मेहेंदळे 'यशवंतराव ते विलासराव' या पुस्तकात म्हणतात, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्याचे मागासलेपण, अडाणीपणा, कर्जबाजारीपणा हे आहे तसेच राहिले. पाण्याचा प्रश्न, विजेचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला. पाणी किंवा वीज आता खूप महाग होत चालली आहे. पण त्या गोष्टी दुर्मीळही होणार की काय, याची चिंता वाटत आहे. महाराष्ट्र त्याच्या निर्मितीच्या वेळी पाच कोटी लोकसंख्येचा होता. आता तो दहा कोटीचा म्हणजे लोकसंख्येने दुप्पट झाला आहे. पण

म्हणुन या राज्यातल्या सुविधांचे प्रमाण हे काही दुप्पटीने वाढलेले नाही.[248] यावरून महाराष्ट्र हे विकसित राज्य आहे मात्र त्याचे अनेक विभाग विकासापासून दूर राहिले आहेत.

सन 1960 पासून महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाकडे सत्तेची मक्तेदारी असलेले दिसते. 1978-1980 मधील पुरोगामी लोकशाही दलाची कारकीर्द सोडली तर 1995 पर्यंत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. 1995 मध्ये भा.ज.प., शिवसेना युती सत्तेवर आली आणि काँग्रेसला मोठा धक्का बसला. परंतु आज महाराष्ट्रात काँग्रेसची मक्तेदारी आहे. राजकीय क्षेत्रावर नव्हे तर सामाजिक जीवनाच्या अनेक क्षेत्रांत व अनेक स्तरावर काँग्रेसच्या मक्तेदारीचा प्रत्यय येतो. सहकार क्षेत्रामध्ये काँग्रेसचीच मक्तेदारी दिसून येते. परंतु समाज जीवनातील एक प्रमुख क्षेत्र म्हणजे उद्योग व व्यापार या क्षेत्रावर अजूनही फारसा काँग्रेसचा प्रभाव नाही.

महाराष्ट्र हे केवळ मराठी भाषकांचे राज्य नव्हे, तर लोकशाही भारताचे एक मराठी भाषिक घटक राज्य आहे. महाराष्ट्र राज्याच्या मार्गदर्शक तत्वात म्हंटले आहे की, संयुक्त महाराष्ट्र केवळ साध्य नाही, तर सामाजिक एकता व समानता निर्माण करण्याचे साधन आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती हे इतिहासाने दिलेले आव्हान आहे. प्रगतीची ही यात्रा दीर्घकाळ चालणार आहे. जनतेचे अंतिम कल्याण साधणे, हेच या यात्रेचे अंतिम उद्दिष्ट आहे. आज महाराष्ट्रात सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी अन्यायाविरूध्द आवाज उठवून महत्वाच्या प्रश्नांवर प्रचंड मोर्चे काढण्यात येतात.

### 4.10.2 महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती :-

सामाजिक दृष्ट्या महाराष्ट्र हे प्रगतीपथावर असलेले पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम, संत रामदास, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज ह्या विविध संतांनी समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रध्दा निर्मूलनाचा आणि सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समता, बंधुता यांचा संदेश देऊन धार्मिक, सामाजिक प्रबोधन केले. महाराष्ट्राला संत चळवळीप्रमाणेच समाजसुधारकांची ही मोठी परंपरा आहे. जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिबा फुले, न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे, प्रि. गोपाळ गणेश आगरकर, महर्षि धोंडो कर्वे, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, रार्जर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रा. गो. भांडारकर, कर्मवीर भाऊराव पाटील, इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यासारखे अनेक नामवंत याच भूमीत होऊन गेले व त्यांनी संपूर्ण भारतावर आपला प्रभाव टाकला. या थोर विचारवंत समाजसुधारकांनी महाराष्ट्रात विविध सामाजिक चळवळींव्दारे सामाजिक समतेचा, सामाजिक न्यायाचा संदेश देऊन समाज जागृती व परिवर्तनात मोलाचा हातभार लावला.

महाराष्ट्राच्या रहिवाशांना महाराष्ट्रीय अथवा मराठी माणूस असे संबोधतात. सन 2011 च्या जनगणेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11,23,72,972 आहे. महाराष्ट्र लोकसंख्येनुसार भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. मराठी बोलणाऱ्यांची संख्या 6,24,81,681 आहे. लोकसंख्येपैकी 5.88 कोटी पुरूष व 5.40 कोटी स्त्रिया आहेत. महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येची टक्केवारी 42.4 टक्के आहे. लिंग गुणोत्तर 1000 पुरूषामागे 946 महिला इतकी संख्या आहे. तर 82.9 टक्के लोक साक्षर आहेत.[249] मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा आहे. त्याचबरोबर हिंदी भाषा व इंग्रजी भाषा शहरी भागात बोलली जाते. उत्तर-पश्चिम महाराष्ट्रात अहिराणी बोलीभाषा तर दक्षिण कोकणात मालवणी या मराठीच्या बोली भाषा बोलल्या जातात. दखखनच्या देशी भागात 'देशी' व विदर्भात 'वऱ्हाडी' या बोलीभाषा अस्तित्वात आहेत.[250]

महाराष्ट्रात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, जैन, बौध्द, शीख, लिंगायत, ज्यु या धर्मांचे आणि पंथांचे लोक राहतात. तसेच आदिवासी भटक्या, विमुक्त जमातींचेही लोक येथे राहतात. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात 80.2 टक्के हिंदू धर्मीयांची संख्या आहे. हिंदू धर्मीयांची संख्या राज्यात जास्त आहे. हिंदूमध्ये अनेक जाती, पोटजाती आहेत. ग्रामीण भागात व्यवसायावरून पडलेली बलुतेदारी पध्दत मोठ्या प्रमाणावर पूर्वी टिकून होती. परंतु सध्याच्या काळी ती अस्तित्वात नसलेली दिसते. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात हिंदू धर्मीयांप्रमाणे 10.6 टक्के मुस्लिम, 6.2 टक्के बौध्द, 1.3 टक्के जैन व 1 टक्का ख्रिश्चन धर्मीय जनता आहे. अल्प प्रमाणात ज्यु व पारशी धर्मीय जनता देखील महाराष्ट्रात आहे.[251]

महाराष्ट्रातील खेड्यांमध्ये हिंदू बहुसंख्य आढळतात पण काही कुटुंबे मुस्लिमांची, बौध्द आणि जैनांची तसेच ख्रिश्चनांचीही आढळतात. शीख, पारशी धर्मियांची संख्या मात्र नगण्य आढळते. मुस्लिम समाजाचे जीवनमान, आचार विचार जवळपास हिंदूसारखेच आढळतात. भाषा, प्रार्थना अशा काही मोजक्या बाबींमध्ये विविधता आढळते. बऱ्याच खेड्यांमध्ये हिंदू व मुस्लिमांच्या देवता एकसारख्या आढळतात. (पीर, बाबा, सूफी संताचे दर्गे) तेथे उदबत्ती ओवळणे,नवस बोलणे, बोकड बळी देणे, पिराचा उरूस भरवणे असे एकत्रित विधी केले जातात. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ग्रामदैवतांची उपासना केली जाते. उदा. वेताळ, यमाई, तुकाई, म्हसोबा, ज्योतिबा, भैरोबा इत्यादी ग्रामदैवते पूजली जातात. स्थानिक परंपरेनुसार त्यांचे उत्सव व जत्राही आयोजित केल्या जातात.

महाराष्ट्रात गुढी पाडवा, अक्षयतृतीया, नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळअष्टमी, गणेश उत्सव, दसरा, दिवाळी, संक्रांत, महाशिवरात्री, होळी व रंगपंचमी हे सण प्रामुख्याने साजरे केले जातात. महावीर जयंती, बुध्दपौर्णिमा, गुरूनानक जयंती, शिवजयंती, डॉ. आंबेडकर जयंती हे उत्सव साजरे केले जातात. ख्रिश्चनांचे ईस्टर

डे, गुड-फ्रायडे व ख्रिसमस हे सण साजरे करतात. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले सार्वजनिक शिवजयंती व गणेशोत्सव[252] असे विविध कार्यक्रम, देखावे करून सार्वजनिक मंडळामार्फत साजरे केले जातात. यामध्ये 15 ऑगस्ट, 26 जानेवारी ह्या राष्ट्रीय सणांची भर पडली आहे. त्याचबरोबर 1 मे महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस व कामगार दिन ह्या प्रकारे साजरे केले जातात. सण आणि उत्सवांचे हे चक्र केवळ निसर्गचक्राशी जोडलेले नसून ते संस्कार व मनोरंजन यांच्याशीही निगडीत आहे.

महाराष्ट्रातील हिंदू, मुस्लिमांमध्ये विविध पंथांचे अस्तित्व दिसते. महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजजीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणारा पंथ म्हणजे वारकरी पंथ (वैष्णव पंथ) हा पंथ म्हणजे पंढरपुरच्या विठ्ठल देवतेला मानणारा भक्ति संप्रदाय. ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, नरहरी सोनार, जनाबाई आदि संतांनी सर्वसामान्यांसाठी विठ्ठलभक्तीची ही वारकरी चळवळ महाराष्ट्राच्या खेडोपाडी पोहोचविली. आज ही वारीचे महत्व अनन्यसाधारण आहे.[253]

महाराष्ट्रातील समाज उर्वरित भारताप्रमाणेच जातीय, जमातीय, धार्मिक व पांथिक समुह, उपसमुहांनी बनलेला आहे. पारंपारिक ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक संबंध हे जातीपरत्वे निर्माण झालेले आणि राखले गेलेले होते. महाराष्ट्र अठरा पगड जातींनी भरलेला आहे. महाराष्ट्रात तीन प्रमुख जाती आहेत. ब्राह्मण, मराठा व महार इतरही अनेक जाती महाराष्ट्रात आहेत. ब्राह्मण ही धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या सर्वांत प्रभावी मानली जाणारी जात होती. ऐतिहासिक दृष्ट्या महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय जीवनात ब्राह्मण वर्गाने लक्षणीय व सक्षम नेतृत्व केले आहे. परंपरेने ब्राह्मण हा पुरोहित वर्ग आहे. चातुर्वर्ण्यांच्या श्रेणीनुसार ब्राह्मणांना अग्रस्थान दिले जाते.[254] ब्राह्मणांखालोखाल प्रभावी जात म्हणजे मराठा. मराठा ही जात शेतकरी आणि लढवय्ये अशा दुहेरी भूमिका बजावणारी मानली जात असे. शिवकालीन राजसत्तेचा वारसा मराठा जातीला असल्याने इतरांपेक्षा आपण उच्च दर्जाचे आहोत. असे त्यांना वाटत असते. त्यातही शहाण्णव कुळी मराठे अन्य मराठ्यांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात. श्रीमंत मराठा वर्ग सामान्य मराठ्यांना 'कुणबी' म्हणतो त्यामुळे त्यांनी कमी दर्जाचे व कमी प्रतिष्ठेचे मानले जाते. मराठा जाती समुहात अनेक पोटजाती आहेत.[255] महाराष्ट्रातील तिसरी महत्वाची जात म्हणजे महार. महाराष्ट्रात महार समाज सर्वत्र पसरला असला तरी विदर्भ आणि मराठवाड्यात त्यांची संख्या अधिक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील महार समाजापेक्षा विदर्भातील महार समाज हा संपन्न व सुस्थित आहे. मराठ्यांप्रमाणेच महार देखील लढाऊ जात आहे. भारतीय सेनेत 'महार रजिमेंट' प्रसिध्द आहे.[256]

जाती विशिष्ट असमानता नष्ट करून समाजाकडे सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी यासाठी गेल्या शंभर वर्षांमध्ये शर्थीने प्रयत्न झाले. महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेकांनी त्यासाठी प्रयत्न केले, आणि त्यातूनच घटनेनेही अस्पृश्यता रद्द ठरविली. जन्मावरून व्यवसाय न ठरता सर्व क्षेत्रांमध्ये व्यक्तिच्या कर्तृत्वाला वाव देण्यासाठी आणि विकासाची संधी न मिळालेल्यांना अग्रहक्क देण्यासाठी वर्गीकृत जाती निश्चित करून ती यादी सरकारने प्रसिध्द केली. अशा महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमध्ये महार, मांग, चांभार हे संख्येने जास्त आहेत. त्यानंतर ढोर, होलार, खाटिक, डोंब, कैकाडी, बेरड, शेणवी, मेडगी इत्यादी जातींचा समावेश होतो.[257] महाराष्ट्रात सन 1961 मध्ये 22 लाख 27 हजार इतकी अनुसूचित जातींची लोकसंख्या होती. सन 2001 मध्ये ती 98 लाख 82 हजार इतकी असलेली दिसते.[258] महाराष्ट्रात हिंदूची संख्या सर्वाधिक असणे अगदी साहजिक आहे. पण नवबौध्दांची महाराष्ट्रातील लोकसंख्या संपूर्ण देशातील अन्य राज्यांपेक्षा अधिक आहे. नवबौध्दांची संख्या सन 1991 च्या जनगणनेनुसार 6.3 टक्के आहे. हे प्रमाण वाढण्याचे कारण महाराष्ट्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी या बौध्द धर्माचा स्विकार केला. अशा नवबौध्दांचाही समावेश शासनाने महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये केलेला आहे.

वर्ण किंवा जातीव्यवस्थेत स्थान नसलेल्या मुख्यतः जंगलात व डोंगरात राहणाऱ्या आदिवासींनाही शासनाने वर्गीकृत जमाती अशा नावाने विकासात अग्रक्रम दिला आहे. राज्यातील आदिवासी सह्याद्री विभाग, सातपुडा विभाग आणि गोंडवन अशा तीन भौगोलिक पट्यात आहेत. महाराष्ट्रात आदिवासी किंवा अनुसूचित जमातींचे सुमारे 47 समुह आहेत. त्यापैकी महत्वाच्या जमात समुहांमध्ये महादेव कोळी, वारली, ठाकर, काथोडी, गोमित, मल्हार कोळी, कोरकु, कोलाभ, गोंड, भिल्ल, कोया, कातकरी, कोकणा, हलबा इत्यादींचा समावेश होतो. सन 1961 च्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातींची लोकसंख्या 23 लाख 97 हजार म्हणजे 6.06 % एवढी होती. सन 2001 मध्ये महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातींची लोकसंख्या 85 लाख 77 हजार म्हणजे 8.85 % एवढी होती.[259] याचा अर्थ असा होतो की महाराष्ट्रात अतिशय जलद गतीने अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. मागील 50 वर्षांत महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना पुरविलेल्या विविध सोयी-सवलतींचाच हा एक चांगला परिणाम झाला आहे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. कारण यामुळेच हे मागासलेले लोक विकासाच्या मुख्य प्रवाहात अलीकडील काळात मोठ्या प्रमाणात येऊ लागलेले आहेत. परंतु अजूनही पूर्णतः आलेले नाहीत हे वास्तव आहे. कारण सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राचे साक्षरतेचे प्रमाण 77.27 टक्के आहे. यामध्ये अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे प्रमाण

अनुसूचित जातींपेक्षा बहुतेक जिल्ह्यात कमी आहे.[260] अर्थात, जोपर्यंत हे साक्षरतेचे प्रमाणे वाढत नाही तोपर्यंत या लोकांमध्ये सर्वच बाबतीत जागृती होणे कठीण आहे.

पारंपारिक समाजव्यवस्थेत स्थान नसलेल्या व मुख्यतः डोंगराळ भागात राहणाऱ्या किंवा सतत स्थलांतर करणाऱ्या भटक्या जमातीही राज्यात आहेत. महाराष्ट्रातील भटक्या जमातींमध्ये गोसावी, गोपाळ, बाबा बैरागी, बेलदार, भराडी, गारूडी, गोंधळी, घिसाडी, कोल्हाटी, वैदु, वासुदेव, ओतारी, भोई, ठाकर, बहुरूपी इत्यादींचा समावेश होतो. महाराष्ट्र शासनाने भटक्या जमातींची यादी प्रसिध्द केली असून त्यांना विकासाची संधी प्रथम दिली जाते.[261]

महाराष्ट्र शासनाने विमुक्त म्हणजे ब्रिटिश काळात गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातींचीही यादी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये रामोशी, बेस्तर, बेरड, वडारी, राजपुत, भामटा, कैकाडी, कंजारभाट, बंजारा, फासे पारधी, पाथरवट, करबु इत्यीदीचा समावेश होतो.[262] सन 1991 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील भटक्या व विमुक्त जमातींची लोकसंख्या सुमारे 20 लाख एवढी होती. या भटक्या व विमुक्त जमाती विशिष्ट हंगामामध्ये ग्रामीण समाजात आढळत असत. पारंपारिक पण हंगामी व स्थानांतरित असे व्यवसाय करत, ते आपली उपजिविका करत असत. अलीकडे (सध्याच्या काळात) या भटक्या, विमुक्त जातींचे बरेचसे व्यवसाय बुडाले, कालबाह्य झाले. त्यामुळे त्यांना ग्रामीण व्यवसाय रचनेत स्थान उरले नाही.

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत महाराष्ट्र हे सर्वात पुरोगामी राज्य मानले जाते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून 80 % पेक्षा जास्त लोक मराठी भाषिक आहेत. याशिवाय गुजराती, तेलगु, तामिळ, कानडी बोलणारेही लोक आहेत. यामध्ये गुजराथी लोकांचे प्रमाण जास्त आहे. मुंबई शहरात त्यांनी प्रामुख्याने वास्तव्य केलेले आहे. तसेच अल्पप्रमाणात महाराष्ट्राच्या इतर शहरी भागातही ते राहतात. फाळणीच्या काळातील परिस्थितीमुळे जे सिंधी निर्वासित आले त्यांनी देखील मुंबईत राहणे पसंत केले. महाराष्ट्राची मुख्य भाषा मराठी असली तरी या बोलीभाषेचे उच्चार, बोलण्याचा ढंग (पध्दत) इत्यादी बाबतीत प्रादेशिक तफावत बरीच जाणवते. पुण्याची मराठी भाषा शुध्द मानतात. खानदेशी मनुष्य थोडा हेल काढून बोलतो. सातारा, कोल्हापूरकडील मराठी भाषेचा नूर आणखी वेगळाच आहे. वऱ्हाडमधील लोकांच्या बोलण्यात हिंदी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. मराठवाड्याची भाषादेखील भिन्न आहे. कोकणी भाषा तर आपले प्रादेशिक वैशिष्ट्य जतन करून आहे. असे असले तरी महाराष्ट्रीयन आहोत याचाही त्यांना सार्थ अभिमान आहे.[263]

सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11,23,72,972 इतकी आहे. महाराष्ट्रातील समाज खेडे व शहर या विभागात वसलेला आहे. येथे विविध जातिधर्माचे लोक राहतात. महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य

असल्याने ग्रामसंस्था सर्वदूर पसरलेली आहे. सन 2000-2001 मध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीची संख्या 27,738 इतकी आहे. खेड्यांचे स्वरूप आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण व नवतंत्रज्ञानामुळे बदलले आहे. महाराष्ट्रीयन ग्रामसंस्थेचे वैशिष्ट्य असणारी अलुतेदारी व बलुतेदारी पध्दत लोप पावत चालली आहे. जहागीरदार, पाटील, जोशी, कुलकर्णी, खोत या वतनदारांचे पारंपारिक हक्क कायद्याने नष्ट होऊन जमिनदारांच्या जमिनी कुळ कायद्याने कुळांकडे गेल्या आहेत. इंग्रजी राजवटीनंतर विविध क्षेत्रात बदल झाले. संपूर्ण देशात एकच कायदा लागू केल्यामुळे जात पंचायती निष्प्रभ झाल्या. आधुनिक शिक्षण, पुरोगामी विचार, औद्योगीकीकरण, नागरीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे ग्रामीण समाज हा बाह्य जगाशी जोडला गेला. समाजात एक प्रकारचा उदारमतवादी दृष्टीकोन येऊन जातिसंस्थेचे प्राबल्य कमी होत असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे शिक्षण, उद्योग व्यवसाय, नोकरी या कारणांसाठी शहरात स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्रामीण भागात बहुतांश संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात आहे.[264]

जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया गतिमान झालेली आहे. शहरी जीवनमानाचा वाढता खर्च, जागेची टंचाई व व्यवसायिक गतीशीलता या सर्वांमुळे एकत्रित कुटुंबपध्दती शहरी भागात फारशी दिसत नाही. अनेक प्रदेशातून व भिन्न संस्कृतीतून आलेल्या वेगवेगळ्या जातीधर्मांचे लोक शहरात एकत्र आल्याने एका संमिश्र नागरी संस्कृतीचा विकास नगरे व महानगरांतून झाला आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत जातिसंस्थेचा प्रभाव शहरी भागात कमी जाणवतो. यामुळे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढले आहे. सर्वसमावेशक अशी संस्कृती शहरांमधून विकसित होत आहे. त्याबरोबर शहरी भागात गलिच्छ वस्त्या, रोगराई, अनैतिक व्यवसाय व इतर सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. जागतिकीकरणाचा परिणाम महाराष्ट्राच्या समाज जीवनावर झाल्याचे दिसून येते.[265]

महाराष्ट्रात अनेक थोर विचारवंत समाजसुधारक होऊन गेले. विविध सामाजिक चळवळींव्दारे त्यांनी सामाजिक समतेचा, सामाजिक न्यायाचा संदेश देऊन समाज जागृती व परिवर्तनात मोलाचा हातभार लावला. त्याचाच आदर्श घेऊन महाराष्ट्रात युवक क्रांती दल, दलित पँथर यांनी सुरू केलेल्या चळवळी, धरणग्रस्तांच्या चळवळी, स्त्रियांच्या चळवळी, ग्राहक चळवळी, मुस्लिम सत्यशोधक चळवळी, पर्यावरणवादी चळवळी, आदिवासी चळवळी, बिगर शासकीय संस्थांच्या चळवळी उभारल्या गेल्या. युवक क्रांती दलाने भांडवलशाही, मनुवाद, बेरोजगारी, जातियव्यवस्था, वर्णव्यवस्था, स्त्री दास्यत्व, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार या विरूध्दच्या आंदोलनांपासून आणीबाणी विरोधी लोकस्वतंत्रता आंदोलनापर्यंत लढे देऊन विद्यार्थी हा घटक समाजपरिवर्तनात महत्वाचे योगदान देऊ शकतो हे दाखवून दिले. डॉ. बाबा आढावांनी असंघटित कष्टकऱ्यांच्या, धरणग्रस्ताच्या

चळवळी उभारल्या. हमाल पंचायत, असंघटित श्रमिक वर्ग, रिक्षा चालक संघटनेव्दारे त्यांच्या न्याय हक्कांसाठी आंदोलने उभारली. जातिनिर्मूलनाच्या संदर्भातील 'एक गाव एक पाणवठा' ही महत्वपूर्ण चळवळ त्यांनी सुरू केली.[266] 20 जुलै 1978 साली दलित व पुरोगामी संघटनांनी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून नामांतर चळवळ सुरू केली. 14 जानेवारी 1994 रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामकरण केल्यानंतर हा संघर्ष थांबला.[267]

राष्ट्राच्या जडणघडणीमधील एक महत्वाचा पैलू म्हणजे महिलांचा विकास. सक्षम महिला ही राष्ट्रउभारणीच्या कार्यास मोठा हातभार लावू शकते. त्यासाठी स्त्रियांच्या आत्मशक्तीचा विकास करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रियांचा वाटा मोलाचा आहे. छ. शिवरायांना घडविणाऱ्या जिजाबाई, निर्भीडपणे राज्यकारभार करणाऱ्या अहिल्याबाई होळकर, सत्यशोधक परंपरेतील ताराबाई शिंदे, स्त्री सुधारक सावित्रीबाई फुले, महिला सक्षमीकरणासाठी झटणाऱ्या पंडिता रमाबाई, स्त्री समाजसुधारक रमाबाई रानडे, पहिल्या भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, स्त्री जीवनाविषयी दर्जेदार साहित्य लेखन करणाऱ्या बहिणाबाई चौधरी अनेक संशोधनपर लेखांच्या लेखिका डॉ. इरावती कर्वे व दुर्गा भागवत, आदिवासी समाजोन्नतीसाठी कार्य करणाऱ्या अनुताई वाघ, अशा कर्तृत्वसंपन्न अनेक स्त्रियांनी महाराष्ट्राला घडविले आहे. हे जरी खरे असले तरीही आज महाराष्ट्राने महिला विकासाची अपेक्षित पातळी गाठलेली नाही.

19 व्या शतकापासूनच स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या व त्यांच्या हक्कांसाठीच्या चळवळी महाराष्ट्रात सुरू झाल्या. महाराष्ट्रातील स्त्री चळवळीने महिलांवरील अत्याचार, लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसाचार व परित्यक्त्यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. महिला आरक्षण, सक्षमीकरण यावर स्त्री चळवळीने भर दिला आहे. सन 1975 हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले. सन 1975 मध्ये महाराष्ट्र शासनाने दारिद्र्यरेषेखालील स्वतःचा व्यवसाय सुरू करणाऱ्या स्त्रियांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ सुरू केले. केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्राने 25 एप्रिल 1993 रोजी राज्य महिला आयोगाची स्थापना केली.[268] केंद्र शासनाप्रमाणेच महाराष्ट्र शासनाने 24 जून 1993 रोजी महिला व बालकल्याण विभाग सुरू केला.[269] राज्य व केंद्रपातळीवरील योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी महिला व बालकल्याण आयुक्तालय आहे. सन 1994 मध्ये महिला धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले.[270] महाराष्ट्र शासनाने महिलांचा विकास करण्यासाठी, शासकीय महिला वस्तीगृह, महिला संरक्षण गृह, सुधारित माहेर योजना, देवदासींसाठी कल्याणकारी योजना, हुंडा दक्षता समिती, बहुउद्देशीय महिला केंद्र, कामधेनु योजना अशा अनेक योजना यशस्वीरित्या राबविल्या आहेत.

आज महाराष्ट्रात महिला विकासासाठी खास योजना, अनेक कार्यक्रम राबविले जातात मात्र त्यांची अंमलबजावणी होत नाही. लाभार्थी घरापर्यंत योजनांचे फायदे पोहचत नाहीत. अजूनही महिला आपल्या हक्कांसंबंधी जागरूक नाहीत. स्त्री-पुरूष भेदभावाविषयी असलेली समाजाची मानसिकता अजूनही बदलत नाही आणि म्हणूनच लोकसंख्येतील स्त्रियांचे घटते प्रमाण हा एक गंभीर प्रश्न बनत चालला आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील हे प्रमाण दर हजारी 946 इतके आहे.[271] समाजात मुलांचा हव्यास अजून कमी झालेला नाही. 'नॅशनल क्राईम रिसर्च ब्युरो' च्या अहवालानुसार महाराष्ट्रात दर 10 लाख लोकसंख्येत महिला अत्याचारांची 173.81 प्रकरणे आढळून येतात. मुलींच्या लग्नाच्या वयात सुधारणा झाली असली, तरीही अजूनही 39 % विवाह हे 18 वर्षांपूर्वी होतात. स्वयंसेवा संस्था व शासन यांनी एकत्रितपणे मोठ्या प्रमाणात जाणीव जागृतीचे कार्यक्रम राबविले पाहिजेत. त्याशिवाय स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात विकास शक्य नाही.[272]

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये मराठा, कुणबी, माळी, धनगर इत्यादी जाती मुख्य आहेत. पैकी मराठा जात समुह संख्येने सर्वात मोठा आहे. मराठ्यांमध्ये ज्याप्रमाणे मोठे शेतकरी आहेत त्याचप्रमाणे मध्यम व लहान शेतकऱ्यांचा एक मोठा गट आहे. माळी हे जरी सधन बागायतदार असले तरी ते मराठ्यांच्या तुलनेत संख्येने कमी आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा, माळी या श्रीमंत शेतकऱ्यांचा प्रभाव आहे. त्याचप्रमाणे शहरातील प्रामुख्याने अमराठी कारखानदार, भांडवलदार व व्यापाऱ्यांचाही प्रभाव आहे. महार, मांग, चांभार इत्यादी पूर्वास्पृश्य जाती या अल्पसंख्य जाती आहेत. यांचा एक वर्ग ग्रामीण भागात आहे. पण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आणि सामाजिक दृष्ट्या नाडलेल्या या जातींमध्ये अत्यल्प भूधारक शेतकरी आणि अधिक करून शेतमजुरांचे प्रमाण मोठे आहे.[273]

सन 1970 नंतरच्या दशकात महाराष्ट्रात काही महत्वाची आंदोलने झाली. धुळे जिल्ह्यांतील शहादा तालुक्यातील मार्क्सवादी विचारांच्या श्रमिक संघटनेने चालविलेले भिल्ल आदिवासी शेतकऱ्यांचे आंदोलन हे एक आणि दुसरे ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील भूमिसेना या डाव्या संघटनेने चालविलेले वारली आदिवासींचे आंदोलन.[274] याशिवाय सन 1970 च्या दशकाच्या अखेरीस महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली मोठी चळवळ सुरू झाली व शेतकरी संघटना या संघटनेच्या नेतृत्वाखाली उभी राहिली. ती देशाच्या इतरही भागात पसरली. महाराष्ट्रातील समकालीन शेतकरी आंदोलनांमधील सर्वात प्रभावी आणि व्यापक प्रमाणावरील चळवळ शेतकरी संघटनेने उभी केली.[275] 1 मार्च 1980 रोजी शेतकरी संघटनेने शरद जोशीच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी चाकणा येथे कांद्याच्या भावासाठी पहिले महत्वाचे आंदोलन केले व त्यासाठी रस्ता रोको चे तंत्र वापरले. या आंदोलनामूळे संपूर्ण देशाचे लक्ष या शेतकरी संघटनेकडे व तिच्या मागण्याकडे वेधले गेले. कांद्याच्या पाठोपाठ

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली उसाच्या भावाचा प्रश्न उचलला. या दोन्ही आंदोलनांमध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. या आंदोलनात शेतकरी जमिनी मागत नव्हते, शेतमजुरी वाढविण्याचीही मागणी करीत नव्हते. तर आपल्या मालाचे भाव वाढवून मागत होते. शरद जोशींनी या मागणीला संघटनेचा एक कलमी कार्यक्रम असे म्हंटले आहे.[277]

सामाजिक अंधश्रध्दा निर्मूलनासाठी नरेंद्र दाभोळकर व त्यांच्या कार्यकर्त्यांनी अंधश्रध्दा निर्मुलन समितीव्दारे ठिकठिकाणी कार्यक्रम व प्रात्यक्षिके या व्दारे समाजप्रबोधनाचे महत्वपूर्ण कार्य केले.[278] धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता मेघा पाटकर, भारत पाटणकर व सहकाऱ्यांनी मोठी चळवळ उभारून विस्थापितांच्या हक्कांसाठी लढा दिला. [279] महाराष्ट्रात बाल-कामगार व बालमजुरीला विरोध करणांऱ्या कष्टकरी, शेतकरी, धरणग्रस्त, स्त्रिया इत्यादी घटकांच्या न्याय हक्कासाठी चळवळी, आंदोलने व लढे उभारले जाऊन संबंधित घटकांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करण्याकरिता झालेले विविध कायदे हा सामाजिक प्रगतीचा महत्वाचा भाग मानावा लागेल. हा भाग सामाजिक एकता व प्रबोधनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा आहे.

मानवता व सामाजिक जाणिवेतुन बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाकरिता उभारलेले ‘आनंदवन’ व आदिवासी विकासाकरिता केलेले कार्य हे सामाजिक प्रगतीच्या वाटचालीत मोठे योगदान आहे. त्यांच्या पत्नी साधनाताई आमटे आणि विकास व प्रकाश आमटे या दोन पुत्रांसह सर्व कुटुंबियानी त्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालवला आहे.[280] अनाथ पोरक्या मुलांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांनी केलेले कार्य ही सामाजिक बांधीलकी चे उत्तम उदाहरण आहे. डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांचे कुपोषित बालकांच्या विकासाकरिता (गडचिरोली) केलेले कार्य उल्लेखनीय आहे.[281]

समाजात शांतता, समता व बंधुभाव राहील व समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही. याकरिता शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य शासनाव्दारे विविध योजना राबवल्या जातात. रोजगार हमी योजना, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, संत तुकडोजी महाराज नागरी स्वच्छता अभियान, निर्मल ग्राम अभियान, कुटुंब नियोजन योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना, जल व भूसंवर्धन अभियान, महिला बालकल्याण, पर्यटन विकास, पर्यावरण संरक्षण व संवर्धन, जंगल व वन्यजीवन संरक्षण इत्यादी अनेक योजना म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीच्या वाटचालीतील महत्वपूर्ण टप्पे आहेत.

### 4.10.3 महाराष्ट्र : धार्मिक परिस्थिती :-

धर्म हा भारतीय समाजाचा एक महत्वाचा भाग होय. धर्म ही एक व्यापक कल्पना असून या कल्पनेशिवाय समाजाची उभारणी होऊ शकणार नाही. 19 व्या शतकात धर्म हा आधार मानून समाजसुधारणांचे अनेक प्रयत्न झाले. धर्माचा अभ्यास करताना त्यातील धर्मकल्पना या केवळ भावनिकपणे मांडून चालत नाही तर त्याचे वस्तुनिष्ठ व वास्तववादी विश्लेषण करावे लागते. याबाबत नरेश परळीकर म्हणतात 'धर्मासंबंधी विवेचन करीत असताना धर्माची समाजशास्त्रीय बाजु विचारात घेणे आवश्यकच असते. त्याशिवाय ते विवेचन पूर्ण झाले असे म्हणता येणार नाही. एकोणिसाव्या शतकात या स्वरूपाचे विवेचन शास्त्रीय दृष्टीने प्रथम सुरू झाले.'[282] ही परंपरा आधुनिक विचारवंतानी पुढे जोपासली आहे.

आधुनिक काळाचे वर्णन आपण विज्ञान युग, यंत्र युग, बुध्दिवादाची वाढ, आय. टी. युग यांच्या संदर्भात करीत असतो. सार्वजनिक जीवनातून व वैयक्तिक जीवनातून धर्मश्रध्देस घालवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही आपणास या कामी यश आलेले नाही. सन 1971 सालच्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 54,79,49,809 इतकी होती. सन 1991 साली 84,63,00,000 इतकी झाली आणि ऑगस्ट 1997 पर्यंत भारताची लोकसंख्या 93,35,53,873 इतकी झालेली आहे. यातील फक्त 36083 लोकांनी आपल्या धर्माची नोंद केलेली नाही.[283] यातील काहीना कदाचित धर्म या शब्दाचीही जाणीव नसावी किंवा या विज्ञान युगात धर्म न मानण्याची काहींची प्रवृत्ती असावी.

सन 1961 साली जेव्हा भारतात दशवर्षीय शिरगणती झाली तेव्हा भारताची एकूण लोकसंख्या 43 कोटी 90 लाख होती. तेव्हा धार्मिक समाज गटांची लोकसंख्येतील टक्केवारी हिंदूचे प्रमाण 83.5 टक्के होते मुस्लिमांचे प्रमाण 10.7 टक्के होते. ख्रिश्चन 2.4 टक्के होते. शीख 1.8 टक्के होते. बौध्द व जैन मिळून 1 टक्यापेक्षा कमी होते.[284] सन 1961 च्या वरील आकड्यांवरून भारतीय लोकसंख्येतील धार्मिक अनुयायांचे चित्र स्पष्ट होण्यासारखे आहे.

सन 2001 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 102,86,10,328 एवढी होती. तेव्हा धार्मिक समाज गटांची लोकसंख्येतील टक्केवारी हिंदूचे प्रमाणे 80.5 टक्के होते. मुस्लिमांचे प्रमाण 13.4 टक्के होते. ख्रिश्चन, शीख, बौध्द व जैन यांच्यामध्ये फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. परंतु लोकसंख्येतील हिंदूचे प्रमाण 83.5 टक्क्यांवरून 80.5 टक्के होऊन 3 टक्के प्रमाण घटले आहे. तर मुस्लिमांच्या लोकसंख्येचे प्रमाण 10.7 टक्यावरून 13.4 टक्क्यांवर गेले. मुस्लिमांच्या लोकसंख्येचे प्रमाण 40 वर्षात 2.7 टक्क्यांनी वाढले आहे.[285] यावरून मुस्लिम

भारतातील सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा धार्मिक गट म्हणून व सर्वात मोठा धार्मिक अल्पसंख्याक गट आहे. भारतीय लोकसंख्येची धर्मानुसार टक्केवारी अशी दिसते.

भारताच्या धर्मासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे चित्रही निरखून पाहण्यासारखे आहे. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येचे 1971 च्या जनगणनेनुसार धार्मिक चित्र असे आहे.

| अ.न. | महाराष्ट्रातील धर्मनिहाय लोकसंख्या (1971) | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | हिंदू | 4,13,07,287 | 81.94 |
| 2 | मुसलमान | 42,33,023 | 8.40 |
| 3 | ख्रिस्ती | 7,17,174 | 1.42 |
| 4 | शीख | 1,01,732 | 0.20 |
| 5 | बौध्द | 32,64,223 | 6.47 |
| 6 | जैन | 7,03,664 | 1.40 |
| 7 | इतर | 80,023 | 0.16 |

संदर्भ - Census of India, 1971.[286]

वरील आकड्यांवरून महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील धार्मिक अनुयायांचे चित्र स्पष्ट होईल. महाराष्ट्रात जवळ जवळ ब्याऐंशी टक्के हिंदू असून साडे आठ टक्के मुसलमान आहेत. दीड टक्का ख्रिस्ती, पाव टक्का शीख, साडे सहा टक्के बौध्द, दीड टक्का जैन[287] अशी साधारणतः विभागणी महाराष्ट्रातील धार्मिक अनुयायांची आहे.

सन 1951 साली महाराष्ट्रात बौध्द केवळ 2,487 होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मजागृतीच्या प्रेरणेमुळे हजारो दलितांनी बौध्द धर्म 14 ऑक्टोबर 1956 मध्ये स्वीकारला व बौध्दांची संख्या सन 1961 साली 27,79,501 पर्यंत वाढली. सन 1971 मध्ये ती 32,64,223 पर्यंत स्थिरावली,[288] महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या साडेसहा टक्के बौध्द आहेत हे ध्यानात घेतले पाहीजे.

सन 2001 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 102,86,10,328 एवढी होती पैकी महाराष्ट्राची लोकसंख्या 9,68,78,627 असुन त्याचे धार्मिक चित्र असे आहे.

| अ.न. | महाराष्ट्रातील धर्मनिहाय लोकसंख्या (2001) | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | हिंदू | 7,78,59,385 | 80.36 |
| 2 | मुसलमान | 1,02,70,485 | 10.60 |
| 3 | ख्रिस्ती | 10,58,313 | 1.09 |
| 4 | शीख | 2,15,337 | 0.22 |
| 5 | बौध्द | 58,38,710 | 6.02 |
| 6 | जैन | 13,01,843 | 1.34 |
| 7 | इतर धर्म समुदाय | 2,36,841 | 0.24 |

संदर्भ :- Census of India - 2001[289]

वरील तक्त्यावरून महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 9,68,78,627 असुन सर्वाधिक लोकसंख्या हिंदूधर्माची 80.36 % आहे. तर सर्वांत कमी लोकसंख्या शिख धर्माची 0.22 % आहे. महाराष्ट्रात धर्मनिहाय लोकसंख्येच्या बाबतीत मुस्लिम धर्म दुसऱ्या क्रमांकावर असुन एकूण लोकसंख्येपैकी त्यांचा वाटा 10.60 % एवढा आहे.

मुस्लिम समाजाच्या एकूण लोकसंख्येपैकी 18.5 % लोकसंख्या मुंबई शहरात आहे. नागपुर शहरामध्ये 11 % सर्वात जास्त लोकसंख्या औरंगाबाद शहरात 39 % तर मालेगाव आणि भिवंडी येथे मुस्लिम लोकसंख्या सर्वाधिक आहे.[290]

भारतात बहुसंख्य हिंदू आहेत. एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण 80.5 % टक्क्यांचे असून महाराष्ट्रात हे प्रमाण 80.36 % पर्यंत आहे याचा अर्थ असा की भारताचा, महाराष्ट्राचा प्रमुख धर्म हिंदू आहे. वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत इत्यादी ग्रंथ, पुराणे आणि देशी भाषांतील संतसाहित्य यांनी या धर्माची बांधणी मजबुत केली आहे. पूजापाठ, उपासना, व्रतकैवल्ये, कर्मकांड, यात्रा, उत्सव, सण, तीर्थयात्रा इत्यादीच्या निरिक्षणावरून हिंदू धर्माचे अंतरंग समजून येण्यासारखे आहे. जैन, बौध्द, शीख, लिंगायत इत्यादी धर्मांचे अनुयायी महाराष्ट्रात असले तरी हे धर्म वैदिक धर्मांचीच विकसित अंगे असल्याची नोंद अभ्यासक करतात. महाराष्ट्रात राम, विष्णु, कृष्ण, विठ्ठल, ज्योतिबा, खंडोबा, देवी, महादेव, गणपती, दत्तात्रय इत्यादी अनेक दैवदैवतांची पूजाअर्चा आजही वाढत्या प्रमाणात होत आहे.[291] महाराष्ट्रात हिंदु धर्माप्रमाणे अनेक भक्ति संप्रदाय उदयास आले. त्यांचे कार्य या संदर्भात उल्लेखनीय आहे. ज्यामध्ये वारकरी संप्रदाय, रामदासी संप्रदाय, दत्त संप्रदाय, गाणपत्य संप्रदाय हे असून महानुभव संप्रदाय या सर्वातील आद्य संप्रदाय आहे.[292]

महानुभव संप्रदायाची स्थापना गोविंदप्रभु यांनी केली. या संप्रदायाचे उपास्य श्रीकृष्ण हे आहे. चक्रधर स्वामी हे यातील प्रमुख संत आहेत.

वारकरी संप्रदाय 12 व्या शतकापासून अस्तित्वात होताच.[293] नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम हे या संप्रदायातील प्रमुख संत होत. पंढरपुरचा विठ्ठल या संप्रदायातील प्रमुख दैवत असले तरी शिव-विष्णु यांच्या समानतेचा व उपासनेला या पंथात मान्यता आहे. या सर्व संतांच्या महाराष्ट्राची सामाजिक भूमिका घडवण्यात फार मोलाचा वाटा आहे.

दत्त संप्रदायाची स्थापना ब्रह्मा, विष्णु व शिव यांच्या एकत्वासाठी व उपासनेसाठी झाली. महाराष्ट्राबरोबर कर्नाटक व आंध्र प्रदेशात या पंथाचे अनुयायी सापडतात. दत्त उपासनेची महाराष्ट्रात मोठी परंपरा आहे. श्रीपाद वल्लभ, नृसिंह सरस्वती, एकनाथ, माणिक प्रभु आदि महापुरूषांनी दत्त उपासनेला बळ दिले.[294]

महाराष्ट्रात गणपतीची उपासना करणारे गाणपत्य समाजाचे उपासक ही आहेत. चिंचवडच्या मोरया गोसाव्यांनी या परंपरेची सुरूवात केली.[295] महाराष्ट्रात अष्टविनायक प्रसिध्द आहेत परंतु त्याच बरोबर लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक रूप प्राप्त करून दिले हेही महत्वपूर्ण आहे.

इ. स.च्या 8 व्या शतकापासून भारताचा इस्लामी धर्माशी संबंध येत राहिला. तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्राकडे त्यांचे लक्ष गेले आणि देवगिरीच्या यादवांचे राज्य नष्ट होऊन इस्लाम धर्मियांची राजवट येथे हळूहळू सुरू झाली.[296] आज महाराष्ट्रात हिंदूच्या खालोखाल मुसलमानांची संख्या असलेली दिसते. इस्लाम धर्मियांनी हिंदूस्थानावर व महाराष्ट्रावर अनेक वर्षे राज्य केले असल्यामुळे हिंदूच्या दैनंदिन जीवनावर इस्लामी प्रभाव मोठा असलेला आज दिसून येतो. आजचे राज्यकारभारातील कित्येक शब्द फार्सी व उर्दू भाषांतील आहेत. उदा. दानत, मजकुर, जिन्नस, तसबीर, माफक, अस्सल, खुद्द, कीर्द, खत, मुनसफ, हुकुमनामा, सुभा, तालुका, पेटा, परगाणा, कसबा, मौजे असे अनेक शब्द महाराष्ट्रात इस्लामी परंपरेमुळे रूढ झाले. याशिवाय जिलेबी, रसगुल्ला, बिर्याणी, पुलाव इत्यादी खाद्यपदार्थ तबक, खुर्ची, चारपाई इत्यादी रोजच्या वापरातील शब्द इस्लामी परंपरेशी निगडित आहेत.[297]

महाराष्ट्रातील मुस्लिम समाजावर धार्मिकतेचा प्रखर पगडा आहे. त्यामुळे बहुसंख्येने मुस्लिम समाज धार्मिक शिक्षणाकडे वळलेला दिसतो. मुस्लिम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला तर मुसलमानाचा धर्म, त्यांची संस्कृती, त्यांचे स्वतंत्र अस्तित्वच नष्ट होईल म्हणुन इस्लाम धर्म, संस्कृती यांचे रक्षण करण्यासाठी पारंपारिक मदरसा शिक्षण पध्दतीने अरबी, फारशी, उर्दू भाषेतून धार्मिक शिक्षण दिले जाते. मदरसा शिक्षणाने मुस्लिमांत धार्मिक शिक्षणाचा प्रसार केला आहे.[298] परंतु आज धार्मिक शिक्षणाचे प्रत्यक्ष जीवनातील महत्व लक्षात घेऊन आता काही मदरसा संस्थांत आधुनिकीकरण सुरू झाले आहे.

महाराष्ट्रातील मुसलमान मराठी जीवनाशी एकरूप होण्याच्या प्रयत्नात असले तरी त्यांनी आपले धार्मिक वेगळेपण कायम राखलेले आहे. मुसलमानांची आजची जीवनपध्दती बहुतेक अंशी कुराण धर्मग्रंथावर आधारलेली आहे. त्याचे कायदे ही या धर्मग्रंथाशी संबधित आहेत. मोहरमसारखे सण, रमझान सारखे उपवास, मक्केची यात्रा, नमाज आणि कुराण-पठण, पीराला किंवा दर्ग्याला नवस इत्यादी बाबी आजही मुसलमानी धर्मात लक्षणीय असल्याचे दिसते. इस्लाम धर्मात शिया व सुन्नी असे त्याचे पंथ आहेतच त्याचप्रमाणे महाराष्ट्रात बोहरी, खोजे, मोपला इत्यादी इस्लामधर्मीय उपपंथ दिसतात. आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मशिदी, कबरस्थाने, दर्गे इत्यादींची निर्मिती झालेली दिसते. कुराणपठण व नमाज यांच्या बरोबरच पीरांची व फकिरांची संख्या वाढलेली दिसते.[299]

मुसलमानांचा महाराष्ट्राशी ऐतिहासिक काळात जसा संबंध आला तसाच तो ख्रिस्ती धर्मियांशी आला. पेशवे, भोसले आणि मराठे सरदार यांच्याकडून मराठी राज्य इंग्रजांनी 19 व्या शतकाच्या प्रारंभी घेतले असले तरी त्यापुर्वी किती तरी अगोदर ख्रिस्ती धर्मोपदेशक हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर येऊन धर्मप्रचाराचे कार्य करीत होते. महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्माच्या प्रचारासाठी मिशनऱ्यांनी दवाखाने घातले, शाळा चालविल्या, प्रार्थनामंदिरे बांधली, छापखाने सुरू केले, वृत्तपत्रे काढली, मराठी भाषेत बायबल छापून प्रसिध्द केले.

सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ख्रिस्ती लोकांची संख्या 1.09 % आहे. महाराष्ट्रात आज कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, अँग्लिकन्स, मेथॉडिस्ट अशा अनेक उपपंथाचे लोक दिसतात.[300] ख्रिस्तजन्माचा नाताळचा सण आजही महाराष्ट्रात साजरा केला जातो. 1 जानेवारी हा नव्या वर्षाचा दिवस किंवा गुड फ्रायडेसारखा दिवस आजही साजरा होत असतो. सेंट पॉल, सेंट पीटर, सेंट झेवियर, डी नोबिली इत्यादी ख्रिस्ती धर्मोपदेशकांची नावे महाराष्ट्रात अजूनही लोकप्रिय आहेत. दीनदु:खितांबद्दलची कणव व समाजसेवा हे ख्रिस्ती धर्मांचे एक महत्वाचे अंग आजही इतर धर्मियांना अनुकरणीय वाटते. मुंबईचे विल्सन कॉलेज, सेंट झेविअर कॉलेज, नागपुरचे हिस्लॉप कॉलेज आणि महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेल्या मिशनरी शाळा महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्मांचे उदात्त व उदार धोरण प्रकट करण्यास समर्थ अशाच आहेत. आज महाराष्ट्रात ख्रिस्ती लोकांनी स्थापत्य आणि शिल्प यांचा भव्य आदर्श ठरावीत अशी अनेक प्रार्थनामंदिरे उभारली आहेत. महाराष्ट्राला उज्वल शिक्षण परंपरा एका अर्थानी ख्रिश्चनांकडूनच मिळाली असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. युरोपीयन इंग्रजांनी येथील राज्यकारभार सोडून दिला असला तरी ख्रिस्ती धर्मियांचा येथील लोकजीवनावरचा प्रभाव आजही कमी झालेला नाही. आधुनिक काळात ज्या धर्मसुधारणेच्या चळवळी झाल्या उदा. - ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज इत्यादी त्यांना ख्रिस्ती विचारपरंपरेची पार्श्वभूमी होती. शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रात ख्रिस्ती धर्मानुयायांची कामगिरी महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचीच मानावी लागेल. ख्रिश्चन धर्माचा पगडा महाराष्ट्रातील संपूर्ण प्रबोधनावर आहेच आहे.[301] 19 वे शतक हे आधुनिकतेचे, नवतेचे, परिवर्तनाचे शतक आहे. याच काळात महाराष्ट्राने पाश्चात्य शिक्षण स्विकारले.

हिंदू धर्माच्या कर्मकांडास व यज्ञीय हिंसेस कंटाळून काहींनी नव्या धर्मांचे प्रवर्तन केले. अहिंसा, त्याग, तप इत्यादी गुणांची महती काही व्यक्तींना पटली व त्यातून जैन धर्म अस्तित्वात आला. महावीरापासुन वाढत राहिलेला जैन धर्म हा जरी हिंदू धर्मांपासून परका नसला तरी आज त्याला स्वतंत्र धर्म म्हणून मान आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात जैन लोकांची संख्या 1.34 % असुन व्यापार, उद्योगधंदे यात त्यांनी पुढाकार घेतलेला दिसतो. श्वेतांबर आणि दिगंबर असे त्याचे दोन पंथ असून आणखीही काही उपपंथ निर्माण झाले आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी महावीर जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.[302]

गौतम बुध्दाने बौध्द धर्माची स्थापना केली, आणि दया, क्षमा, शांती, अहिंसा, सदाचार इत्यादी मानवी सद्‌गुणांचा प्रसार सर्वप्रथम लोकभाषेत केला. त्याने व त्याच्या शिष्यांनी आपल्या धर्माचा प्रसार भारतात केला. महाराष्ट्रात अजिंठा, वेरूळ इत्यादी ठिकाणची लेणी व चित्रकला बौध्द धर्मियांचे कला व धर्म यांवरील प्रेम व्यक्त करते. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात बौध्द लोकांची संख्या 6.02 % आहे. महायान व हिनयान या उपपंथाबरोबर आणि काही उपपंध बौध्द धर्मात निर्माण झालेले दिसतात. भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे नवबौध्दांची संख्या वाढली आणि काही उपपंथ बौध्द धर्मात निर्माण झालेले दिसतात.[303] भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे नवबौध्दांची संख्या वाढली आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातूनही 'बुध्दं सरणं गच्छामि', 'धम्म सरणं गच्छामि' व 'संघ शरणं गच्छामि' या पाली भाषेतील त्रिशरणांचा घोष कानी येतो.[304]

सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात शिख लोकांची संख्या 0.22 % आहे. हिंदू धर्माशी समांतर राहणार पण स्वतंत्र धर्म म्हणून विकसित झालेला एक धर्म म्हणजे शीखांचा धर्म होय. गुरूनानकांनी या धर्माची स्थापना केली. या धर्माचे अनुयायी पंजाब मध्ये असले तरी महाराष्ट्रातही उद्योगधंद्यांच्या निमित्ताने यांची वस्ती वाढलेली आहे. महाराष्ट्राचा शीख धर्माचा जवळचा संबंध आहे. पंजाब मधील संत नामदेवाचे कार्य पाहुन गुरूनानक यांना स्फुर्ती मिळाली असावी. शीखांच्या 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात संत नामदेवांची अनेक पदे आहेत. महाराष्ट्रामधील नांदेडचे गुरूव्दार फार प्रसिध्द असून शीखांच्या दहाव्या गुरूची, गुरू गोविंदसिंगांची समाधी येथे असल्यामुळे या स्थानास फार महत्व आलेले आहे. महाराष्ट्रात शीख धर्मिय गुरू नानक व गुरू गोविंदसिंग यांची जयंती, गुरू अर्जुनसिंग व गुरू तेगबहाद्दुर यांची पुण्यतिथी उत्साहाने साजरी करतात.[305]

महाराष्ट्रातील इतर धर्म समुदायांचा विचार करता महाराष्ट्रात येऊन स्थायिक झालेल्या व मराठी संस्कृतीशी एकरूप झालेल्या ज्यू धर्मियाची आठवण येते. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, पेण (रायगड) येथे काही ज्यु कुटुंबे दिसतात. या ज्यु धर्मियांनी येथील व्यापार, उद्योगधंदे, शिक्षणप्रसार या क्षेत्रात भाग घेतलेला दिसतो. तसेच महाराष्ट्राच्या कीर्तीत भर घालणारा आणखी एक धर्म दिसून येतो तो म्हणजे झरतुष्टाचा पारशी धर्म होय. महाराष्ट्रात सुमारे पन्नास हजार पारशी लोक आहेत. पारशी धर्मांतील अग्निपूजा वैदिक धर्मातील यज्ञपूजेच्या जवळ येणारी आहे. महाराष्ट्राच्या वैभव वाढविण्यात पारशी धर्मियांचा फार मोठा वाटा आहे.[306] वाडिया व टाटा ही नावे उद्योग व व्यापार यांच्या भरभराटीची द्योतक आहेत. तसेच मुंबईचे टाटा मेमोरियल हॉस्पिटल हे आशियात अग्रगण्य

म्हणून ओळखले जाते. पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त, भूकंपग्रस्त इत्यादीच्यासाठी पारशी जमातीची नेहमीच मोठी मदत असते.

## 4.10.4 महाराष्ट्र आर्थिक परिस्थिती :-

1 मे 1960 रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन महाराष्ट्राला वेगळी व्याप्ती व अस्तित्व प्राप्त झाले. भारतीय संघराज्यातील एक महत्वाचे घटक राज्य म्हणून महाराष्ट्राची नव्याने ओळख संपूर्ण देशाला याच दिवशी झाली.[307] महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा विचार केल्यास राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ हे 3,07,713 चौरस किलोमीटर आहे.[308] मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून, भारताची आर्थिक, वित्तीय व वाणिज्य विषयक राजधानी समजली जाते. महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार त्रिकोणाकृती असून, दक्षिणेकडे चिंचोळा, तर उत्तरेकडे रूंद होत गेलेला आहे. महाराष्ट्राने देशाचा 9.36 टक्के प्रदेश व्यापलेला आहे.[309] कोकण किनारपट्टी, सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट व डोंगराळ प्रदेश, महाराष्ट्र पठार असे प्रमुख तीन भाग राज्याचे पडतात. राज्यात कृष्णा, कोयना, पंचगंगा, भीमा, गोदावरी, तापी, पूर्णा, नर्मदा, सावित्री यांसारख्या महत्वाच्या नद्या आहेत. थळघाट, बोरघाट, फोंडाघाट, आंबाघाट यांसारखे घाट आहेत. महाराष्ट्राच्या कोकण भागात उष्ण, सम व दमट, तर सह्याद्री पर्वतावर आर्द्र व थंड हवामान असते. महाराष्ट्राच्या पठारावर उष्ण, कोरडे व विषम हवामान आढळते.[310] गोदावरी, भीमा व कृष्णा तसेच तापी नदीच्या खोऱ्यात जाड व खोल थराची सुपीक काळी मृदा आढळते. पठारावर इतरत्र मध्यम थराची काळी मृदा विस्तृतपणे पसरली आहे. सह्याद्रीच्या पर्वतमाथ्यावर कोकणात रत्नागिरी व सिंधुदुर्ग, तर पठारावर कोल्हापूर व सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात जांभा मृदा आहे. कोकण किनारपट्टीवर किनाऱ्याची गाळाची मृदा उत्तर-दक्षिण दिशेने आढळते. उत्तर कोकण, विदर्भाच्या पूर्व भागात भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यांत तांबडी व पिवळसर मृदा आढळते.[311] पशुधनाबाबतीत महाराष्ट्र सधन आहे. राज्यात सह्याद्री पर्वत, दखखनच्या पठारावरील डोंगररांगा, सातपुडा पर्वतरांगा व कोकणात वन्य प्राणी आढळतात.[312]

महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही अशा घटना, घडामोडी, प्रवाह, प्रतिप्रवाह यांच्या गुंतागुंतीच्या संबंधाच्या व संघर्षाच्या पार्श्वभूमीवर झालेली असल्याने, निर्मिती नंतरच्या राजकारणावरही त्याचे प्रभाव अटळच होते. राष्ट्रीय राजकारणाच्या कक्षेत महाराष्ट्रातील राजकीय प्रवाह, प्रवृत्ती व शक्ती यांची वाटचाल सुरू झाली. त्यामध्ये यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली काँग्रेस एका बाजुला आणि डाव्या विचारांच्या नेतृत्वाखाली मराठी जनतेचे व्यापक पाठबळ मिळालेली 'संयुक्त महाराष्ट्र समिती' दुसऱ्या बाजुला असे स्वरूप आरंभीच्या काही काळात टिकून होते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर थोड्याच काळात यामध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक बदल

झाले, आणि हे बदल घडवून आणण्यात कृषी, औद्योगिक समाजाचे धोरण, पंचायत राज्याचा कार्यक्रम यांनी मोठा वाटा उचलला आहे. राज्यात शेती हाच प्रधान व्यवसाय असुन, आजही राज्यातील 70 टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्राशी निगडित व्यवसायांत गुंतली आहे. 2001 च्या आकडेवारी नुसार राज्यात एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी 70.41 % क्षेत्र लागवडी खाली आहे. व जंगलव्याप्त क्षेत्र 20.13 % इतके आहे.[313] 1960 पासून यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील व शरद पवार इत्यादी मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या शेती विकासासाठी भरीव स्वरूपाच्या योजना आखल्या. शेती विकासासाठी पत पुरवठा, जलसिंचन, खते व बी-बियाण्यांचा वापर, यंत्रांचा वापर, शेती संशोधन इत्यादी बाबतीत राज्याने केलेली प्रगती वाखाणण्याजोगी आहे. राज्याच्या कृषी विकासाचे धोरण ठरविताना जिरायती व बागायती क्षेत्राचा विकास घडवून आणण्यात येत आहे. आज राज्यात खरीप हंगामात सुमारे 135 लाख हेक्टर जमीन लागवडीखाली येते. तर रब्बी हंगामात 62 लाख हेक्टर जमीन लागवडीखाली येते. राज्यात एकूण ज्वारी क्षेत्राखाली 55 लाख हेक्टर क्षेत्र असून, हेच महत्वाचे पीक आहे. 1960-61 ते आजपर्यंतच्या काळात राज्यात तांदुळ, गहु, ज्वारी, बाजरी, हरभरा, ऊस, कापुस, भूईमुग, तंबाखु इत्यादी पिकांच्या उत्पादनवाढीसाठी शासनाने शेती व्यवसायाला मदतीचा हात दिला.[314] त्यामुळे पिकांच्या उत्पादनात लक्षणीय प्रमाणात वाढ झाली आहे.

राज्याच्या जलसिंचनाचा विचार करता राज्यात पडणारा पाऊस अनिश्चित व असमान स्वरूपाचा आहे. 1960-61 ते 2005-2006 याकाळात राज्यातील एकुण सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकुण क्षेत्राशी असलेले प्रमाण 6.47 टक्क्यांवरून 16.89 टक्क्यांपर्यंत वाढले. म्हणजेच राज्यातील अजूनही 83 टक्के शेतीही निसर्गावर अवलंबुन आहे.[315] विशेषतः मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके हे जिरायती शेतीवरच अवलंबुन आहेत ही बाब आपणास दुर्लक्षित करून चालणार नाही.

महाराष्ट्रातील विविध जलसिंचनाचे प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी राज्य सरकारने फेब्रुवारी 1996 ते ऑगस्ट 1998 दरम्यान पाच जलसिंचन विकास महामंडळाची स्थापना केली. त्यामध्ये 1) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ 2) कोकण जलसिंचन विकास महामंडळ 3) तापी जलसिंचन विकास महामंडळ 4) गोदावरी मराठवाडा जलसिंचन विकास महामंडळ आणि 5) विदर्भ जलसिंचन विकास महामंडळाचा समावेश होतो. सध्या या महामंडळांमार्फत सुरू असलेल्या जलसिंचन प्रकल्पांची संख्या जून 2008 च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्रातील मोठे, मध्यम व लघु असे एकूण 56400 प्रकल्पपैकी 53729 प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले होते व उर्वरीत प्रकल्पांची कामे सुरू होती.[316] उर्वरीत राहिलेल्या प्रकल्पांची कामे त्वरित पूर्ण करणे गरजेचे आहे म्हणजे सिंचित जमिनीचे अपेक्षित ध्येय गाठणे शक्य होईल. तसेच कृषी व्यवसायाचे महत्व ओळखुन शासनाने शेती व शेतीपुरक

योजनांवरील तरतुद वाढविली आहे. कृषी क्षेत्रातील विभागीय असमतोल दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करून अनुशेष भरून काढण्याची विविध योजना राबविल्या आहेत.[317]

महाराष्ट्रातील शेती 1960-61 पासुन जरी प्रगत होत असली तरी राज्यातील कृषी व्यवसायासमोर आज अनेक समस्या भेडसावत आहेत. यामध्ये अपुरे जलसिंचनाचे प्रमाण, शेती व्यवसायास होणारा अपुरा पतपुरवठा, शेतीसाठी विजेचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, शेतीमालाचे अनिश्चित भाव इत्यादी समस्यांचा समावेश त्यामध्ये करता येईल.

पायाभूत आर्थिक सुविधांचा विकास हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील अनिवार्य घटक आहे. पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव म्हणजे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील मोठा अडथळा ठरतो. साधारणतः पायाभूत सुविधांचे दोन प्रकार पडतात. सामाजिक पायाभूत सुविधा यामध्ये आरोग्य सुधारणा, शिक्षण सुधारणा, अंधश्रध्दा निर्मूलन यासारख्या बाबींचा समावेश होतो तर दोन आर्थिक पायाभूत सविधा यामध्ये वीजनिर्मिती, वाहतुक व दळणवळण सुविधा, जलसिंचन सुविधा यांसारख्या बाबींचा समावेश होतो.

मानवाला प्रगतीचा मार्ग शिक्षणाने सापडतो. 1960-61 ते 2005-2006 या कालावधीचा विचार करता प्राथमिक शिक्षण संस्थांची संख्या जवळजवळ दुप्पट झाली आहे. माध्यमिक शिक्षण संस्थांची संख्या जवळजवळ आठपट झाली आहे, तर सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या जवळजवळ आठपट वाढली आहे. ज्याप्रमाणे शैक्षणिक संस्थांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. त्याप्रमाणे विद्यार्थीसंख्येतही सर्व पातळ्यांवर वाढ झाल्याचे दिसते. भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात शाळेत जाणाऱ्या मुलींची टक्केवारी चांगली आहे. शिक्षणातील मुलींचा सहभाग आणखी वाढवा यासाठी महाराष्ट्रात काही खास योजना राबविण्यात येतात.[318] उदा. सावित्रीबाई फुले दत्तक योजना, अहिल्याबाई होळकर योजना सारख्या अनेक उपक्रमांमुळे आज महाराष्ट्रात शिक्षणात मुलींचा सहभाग वाढत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनचा विचार करता साक्षरतेचे प्रमाण प्रत्येक दशकात वाढल्याचे दिसते. महाराष्ट्रात 1961 मध्ये साक्षरतेचे प्रमाण 35.08 टक्के होते. पुरूष साक्षरता ही 49.26 टक्के, तर स्त्री साक्षरता अगदीच कमी म्हणजे 19.80 टक्के होती. सन 2001 च्या जणगणनेनुसार राष्ट्रीय साक्षरतेचे प्रमाण 65.38 टक्के आहे. तर महाराष्ट्राचे साक्षरतेचे प्रमाण 77.27 टक्के आहे. पुरूष साक्षरतेचे प्रमाणे 86.27 टक्के, तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण 67.51 टक्के आहे. साक्षरतेच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा दहावा क्रमांक लागतो.[319]

1960 ते 2010 याकाळात महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणात्मक व संख्यात्मक बदल मोठ्या प्रमाणात झाले. आज प्रत्येक जिल्हा, तालुका व ग्रामीण डोंगराळ भागातही महाविद्यालये झाली आहेत. 1980

नंतरच्या काळात कै. वसंतदादा पाटील यांच्या विनाअनुदानित तंत्रशिक्षण धोरणाने राज्यभर विकेंद्रित पध्दतीने व्यावसायिक उच्च शिक्षणाचा मोठा विस्तार झाला आहे.[320]

महाराष्ट्रात गेल्या 50 वर्षांत सरासरी आयुर्मान समाधानकारक वाढले. स्थानिक पातळीवर आरोग्यसेवा, वाढता पोषक आहार यामुळे स्त्री-पुरूषांचे आयुर्मान वाढले आहे. महाराष्ट्र राज्याने कुटुंबकल्याण योजना योग्य पध्दतीने राबविली आहे. खासगी क्षेत्रात महागड्या असल्या तरी सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा, जिल्हा व तालुका केंद्रात वाढत्या प्रमाणात मिळत आहेत. दुर्बल घटकांच्या मुलांसाठी अनेक पोषण कार्यक्रम राबविले जात आहेत.[321] आज महाराष्ट्रात मलेरिया नियंत्रण, कुष्ठरोग नियंत्रण, क्षय नियंत्रण यासारख्या क्षेत्रात समाधानकारक सुधारणा झाली आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मिती नंतर उर्जा साधनांबाबतीत अत्यंत वेगाने प्रगती झाली आहे. त्याचा परिणाम औद्योगीकरण झपाट्याने झाले व महाराष्ट्र हे देशातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य बनले. आज महाराष्ट्रात खोपोली, भिवपुरी, भाटघर, कोयना, राधानगरी, भिरा व येलदरी येथे प्रमुख जलविद्युत केंद्रे आहेत, तर दुर्गापुर, खापरखेडा, बल्लापुर, कोराडी, पारस, एकलहरे, तुर्भे, चोला व परळी येथे औष्णिक केंद्रे आहेत. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला कोयना वीज प्रकल्पाची मदत मोठ्या प्रमाणात होत आहे. 1960 पासून 2006 पर्यंतच्या कालावधीत राज्यात सर्व प्रकारची उर्जा निर्मिती पाहता 1960-61 मध्ये 759 मेगावॅट ऊर्जा निर्मिती होती तर सन 2006-07 मध्ये 15453 मेगावॅटची निर्मिती झाली.[322] याचा परिणाम महाराष्ट्रात खाद्य वस्तुंचे उत्पादन, रबर, प्लॅस्टिक, पेट्रोलियम पदार्थ, वाहतुक सामग्री व सुटे भाग, रासायनिक पदार्थ, मूलभूत धातु व मिश्रधातु या उद्योगांचा विकास वेगाने झाला. आज महाराष्ट्रात साखर उद्योग-धंद्याने ग्रामीण भागाचा चेहरा बदलून टाकला आहे. त्याचबरोबर कापड उद्योग हा एक महत्वपूर्ण उद्योग आहे. दक्षिण महाराष्ट्रात महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणुन इचलकरंजी प्रसिध्द आहे. तसेच विदर्भ, खानदेश व मराठवाड्यातही कापड गिरण्या मोठ्या प्रमाणावर आहेत. आज भारताच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा 24 टक्के आहे.[323] उर्जानिर्मितीच्या क्षेत्रात महाराष्ट्राने प्रगती केली असली तरी अजूनही भारनियमनासारखा प्रश्न महाराष्ट्राला विशेषतः ग्रामीण भागाला मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे.

महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात ही जी उत्तुंग भरारी मारली आहे तिच्या पाठीमागे उद्योगी प्रवृत्तीच्या महाराष्ट्रीयन मानसिकतेचा, शिस्त आणि शांतताप्रिय व कुशल कामगारांचा तसेच या बाबींना पूरक धोरण स्वीकारणाऱ्या शासनकर्त्यांचा विविध विकास संस्थांचा वाटा महत्वाचा आहे. शेती क्षेत्राच्या विकासावर असणाऱ्या नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन राज्याच्या स्थापनेपासूनच पूर्वापार चालत आलेला औद्योगिक वारसा बळकट

करण्याचे प्रयत्न महाराष्ट्र शासनाने केले. यातूनच केवळ राज्यस्तरावरच नव्हे, तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरारवर नावारूपास आलेले उद्योगसमुह, औद्योगिक घराणी महाराष्ट्राने विकसित केली. टाटा, बिर्ला, किर्लोस्कर, बजाज, अंबानी ही त्यापैकी नमुन्याची उदाहरणे होत. भविष्यकाळात महाराष्ट्राचे औद्योगिक चित्र अधिक गतिमान करण्याची धोरणात्मक व्युहरचना ठरवावी लागेल.

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी जलद, सुरक्षित व स्वस्त वाहतुकीची सुविधा असणे ही अनिवार्य बाब आहे. योग्य वाहतुक सुविधामुळे मागासलेल्या विकासाबरोबरच शहरी भागाचा विकास देखील घडून येतो, तसेच राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी व उत्पादन वाढीसाठी चांगली वाहतुक सुविधा उपयुक्त ठरते. सन 1965-66 मध्ये महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या रस्त्यांची एकुण लांबी 51,788 किलोमीटर होती. यामध्ये 2007-08 या वर्षापर्यंत 455 टक्क्यांनी वाढ होऊन ही लांबी 2,35,595 किलोमीटर झाली.[324] महाराष्ट्रातील 1960-61 पासुनची रेल्वेची प्रगती लक्षात घेत असता असे दिसून येते, की त्याकाळी महाराष्ट्रात एकुण 5056 किलोमीटर लांबीचा लोहमार्ग होता. त्यामध्ये 31 मार्च 2008 अखेर यामध्ये 6.17 टक्क्यांनी वाढ होऊन लोहमार्गांची लांबी 5917 किलोमीटर झाली. यामध्ये महाराष्ट्राचा कोकण रेल्वेच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या 382 किलोमीटरचा समावेश आहे.[325] गेल्या 50 वर्षांत महाराष्ट्रात फक्त 1000 किलोमीटर लांबीचा लोहमार्ग विस्तार झाला आहे.

महाराष्ट्राला एकुण 720 किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. जलवाहतुक स्वस्त पर्याय असूनही सागरी जलवाहतुकीची महाराष्ट्रात म्हणावी तशी प्रगती झाली नाही. मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन मोठी बंदरे वगळता नैसर्गिक दृष्ट्या योग्य असणाऱ्या वेंगुर्ला, रत्नागिरी, विजयदुर्ग, मालवण, देवगड, चिपळुण यांसारख्या बंदराचा योग्य विकास करण्याकडे महाराष्ट्र शासनाने म्हणावे तितके प्रयत्न केले नाहीत.[326]

महाराष्ट्रात सद्यःस्थितीत मुंबई, नागपुर व पुणे हे तीन आंतराष्ट्रीय विमानतळ, तर मुंबई, पुणे, नागपुर, औरंगाबाद व कोल्हापूर असे पाच देशांतर्गत विमानतळ आहेत. महाराष्ट्रात आंतर्राष्ट्रीय व देशांतर्गत या दोन्ही प्रकारच्या विमानतळांवरून प्रवाशांची व मालाची वाहतुक करण्यात येते. विमान वाहतुकीच्या जिल्हा केंद्रापर्यंत वापर होण्यासाठी तसेच आणखी आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने सन 2002 मध्ये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीची स्थापना केली आहे.[327] महाराष्ट्र शासनाने उचललेले हे योग्य पाऊल आहे असे म्हणावे लागेल.

महाराष्ट्रात प्रामुख्याने 1991 च्या नवीन आर्थिक धोरणानंतरच खऱ्या अर्थाने दळणवळण सुविधा वेगाने वाढू लागल्याचे दिसून येते. अलीकडे तर महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातच दळणवळण सुविधांसंदर्भात मोठी

क्रांती झाली आहे. महाराष्ट्रात खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांमधून आज पोस्ट व दूरध्वनी सेवा पुरविल्या जातात. विशेष बाब म्हणजे या सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांची आज मोठी गर्दी झालेली आहे. त्यांच्यामध्ये ग्राहक मिळविण्यासाठी मोठी स्पर्धा लागली आहे. त्यामुळे ग्राहकांना कमी खर्चात खर्चात जास्ती जास्त चांगली सेवा देण्याचा प्रयत्न प्रत्येक कंपनी करीत आहे. महाराष्ट्रात बी. एन. एन. एल. (भारत संचार निगम लि.) व एम. टी. एन. एल. (महानगर टेलिफोन निगम लि.) यांचे कार्य कौतुकास्पद आहे. [328]

भारतात 1904 मध्ये सहकारी चळवळ कायदा पास झाल्यावर सन 1905 मध्ये त्यावेळच्या महाराष्ट्रात पहिली शेती पतपुरवठा सहकारी संस्था धारवाड जिल्ह्यातील कणगीहाळ येथे स्थापन झाली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीस जे खंबीर व गतीमान नेतृत्व लाभले त्यामध्ये गो. कृ. गोखले, विठ्ठलदास ठाकरसी, न. चिं. केळकर, भाऊसाहेब हिरे, शंकरराव मोहिते-पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील, वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ तसेच यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, शरद पवार, तात्यासाहेब कोरे इत्यादींनी महाराष्ट्रात सहकारी चळवळ रूजविण्यासाठी प्रयत्न केले. सन 1960 ते 1990 हा कालखंड महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा तेजीचा कालखंड मानला जातो. महाराष्ट्रात ग्रामीण भागात प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था आणि दुग्ध सहकारी संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. त्याचबरोबर प्राथमिक सहकारी बँका, साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था या क्षेत्रांतही सहकारी चळवळीने केलेला विकास उल्लेखनीय आहे.[329] महाराष्ट्रात नियोजनव्दारे विकास घडवून आणताना 1990 पर्यंत सहकारी चळवळीला नियोजनात महत्वपूर्ण स्थान दिले होते. तसेच सहकारी चळवळ सरकारनिर्मित सहकारी चळवळ एवढे महत्वाचे स्थान या चळवळीने यावेळी पटकविले होते. परंतु पुढे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रियेत चळवळीला वेगळी दिशा मिळाली आणि तिची परवड झाली.

**निष्कर्ष :-**

आज ही इस्लामी मन कुराण व धर्माच्या जोखडाखाली आहे. इस्लामी मन स्वतंत्र बुध्दीने विचार करू शकत नाही. या साठी धर्माच्या, धर्मग्रंथाच्या पलिकडे जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे आणि अंधश्रध्दा, रूढी यांचा मुस्लिम मनावर जो पर्यंत पगडा आहे तो पर्यंत मुस्लिम मन ऐहिक गोष्टींऐवजी पारलौकिक गोष्टींमध्येच सदैव रमत असते. आपले जीवन यशस्वी व सुंदर होण्यासाठी धर्माने सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून जे वर्तमानाशी सुसंगत आहे केवळ त्याचाच स्वीकार करणे गरजेचे आहे. धर्मग्रंथ अपरिवर्तनीय आहे आणि त्यात कसलाही बदल अपेक्षित नाही अथवा कोणीही त्यात बदल करू शकत नाही असा दुराग्रह बाळगणाऱ्या धर्मांचे व

समाजाचे भविष्य हे कायम अंधारात बुडलेले असते. यासाठी इहवादाचा स्वीकार करूनच समाजाला प्रगतीचे इप्सित साध्य करता येईल हा हमीद दलवाईंच्या इहवादाचा गाभा आहे असे संशोधकास वाटते.

18 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारतीय समाज परंपरावादाच्या विळख्यात अडकून पडला होता. त्याला स्वतःच्या दोषांची जराही जाणीव नव्हती. उलट तेथील सनातनी व परंपरावादी मंडळी आपला धर्म आणि आपली संस्कृती आदर्शवत आहे असे समजून चालली होती. परंतु सामाजिक सुधारणा चळवळींनी भारतीयांना त्यांच्या दोषांची जाणीव करून दिली. त्यामुळे समाजाची हळूहळू मानसिकता बदलु लागली. आपल्या धर्मात व समाजात अनेक चुकीच्या गोष्टी आहेत. आपल्या प्रगतीसाठी या गोष्टीवर मात करणे गरजेचे आहे असे त्यांना वाटु लागले. महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीमुळे भारतीय जनतेच्या सामाजिक व राजकीय जाणिवाही प्रगल्भ होत गेल्या. आपल्या समाजातील अनेक समस्यांचे मूळ सामान्य लोकांच्या निरक्षरतेत आहे याची जाणीव समाजसुधारकांना झाली त्यामुळे त्यांनी समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी याविरूध्द लोकांत जागृती घडवून आणतानाच शिक्षण प्रसाराकडेही लक्ष दिले. त्यातुन सामाजिक व राजकीय जागृती घडून येण्यास चांगली मदत झाली. भारतातील सुधारणा चळवळींचा प्रभाव राजकीय क्षेत्रावरही पडला होता. सुधारणा चळवळींनी भारतीय जनतेत नवजागृती घडवून आणली. त्यांच्यात आधुनिक विचारांचा प्रसार केला. भारतीय लोकांत विज्ञानवादी दृष्टीकोन रूजविण्याचे कार्यही या चळवळींनी केले. त्यातुन भारतीय लोकांना राष्ट्रवादी विचारांची माहिती झाली. त्यांच्यात आपल्या राष्ट्राविषयी आत्मीयता निर्माण झाली.

सर सय्यद अहमदखान, शाह वलीउल्लाह, सय्यद अहमद बरेली, रशीद अहमद गंगोही, इत्यादी नेत्यांनी मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यातुन वहाबी चळवळ, अलिगढ चळवळ, देवबंद चळवळ इत्यादी चळवळी आकाराला आल्या. मुस्लिम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि मुस्लिमांनी आधुनिक दृष्टीकोनाचा अंगीकार करावा म्हणून सर सय्यद अहमद खान यांनी अलिगढ चळवळीव्दारे प्रयत्न केले. परंतु वहाबी चळवळ आणि देवबंद चळवळ या चळवळींवर सांप्रदायिकतेचा व परंपरावादाचा प्रभाव होता. देवबंद चळवळीचा प्रमुख उद्देश मुस्लिमांना धार्मिक शिक्षण देणे आणि धर्मकार्यासाठी तरूणांना प्रशिक्षित करणे हा होता. त्यामुळे मुस्लिम धर्मीयात सांप्रदायिकतेला उत्तेजन देण्यास ही चळवळ कारणीभूत ठरलेली दिसते. मुस्लिम समाजातील या सुधारणा चळवळींमुळे शहरी मुस्लिम समाजाने आधुनिकता स्विकारण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रबोधन प्रक्रियेस गती आली. धार्मिक पुनर्रचना, नैतिक सुधारणा आणि एकतेची गरज या गोष्टी मुस्लिम समाजात मान्य होऊ लागल्या. या सुधारणावादी चळवळीमुळेच सत्यशोधक हमीद दलवाईंनी आधुनिक काळात मुस्लिम समाजामध्ये असणाऱ्या मागासलेपणाचे मुख्य कारण त्याचे आर्थिक व शैक्षणिक

मागासलेपण आहे हे जाणून मुस्लिम समाजाला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्यामध्ये वैज्ञानिक आणि इहवादी दृष्टीकोन जोपासण्यासाठी व मुस्लिम समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केलेली दिसून येते.

मुस्लिम समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रध्दा चौकटीमुळे उदारमतवादी विचारापासुन हा समाज दूर गेला. आत्मनिरिक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाजामध्ये त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. आर्थिक द्रारिद्र्य, शैक्षणिक मागासलेपणा, परिणामतः मुस्लिम समाजाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक विकासात अडसर निर्माण झाला. मुस्लिम समाजात असलेली विसंगती स्पष्ट करून ती दूर करणे, धर्मांतर्गत सुधारणांबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक विकास घडवून आणून मुस्लिम समाजाला सांप्रदायिकतेच्या व अंधप्रामाण्यवादाच्या जोखडातून मुक्त करण्याची गरज आहे. त्याशिवाय मुस्लिम समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. म्हणुनच सत्यशोधक मुस्लिम चळवळ आधुनिक लोकशाही समाजाची मूल्ये, धर्मांतीत इहवाद व विज्ञानाच्या सहाय्याने मुस्लिम समाजाचे कल्याण साधु इच्छिते.

अशा असंख्य मुद्यांचा विचार करून हमीद दलवाईंनी सेक्युलर व राष्ट्रवादी समाजनिर्मितीसाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. जगामध्ये जो पर्यंत मानव जात आहे. तो पर्यंत नवनवीन समस्या निर्माण होत राहतील. या सर्व समस्या शेवटी भाकरीशी, पर्यायाने आर्थिक कारणाशी निगडीत असतात. जगण्याची धडपड हा माणसाचा खरा धर्म आहे आणि या धडपडीतूनच या समस्या निर्माण होत असतात. जी गोष्ट मानव जातीला लागू आहे. पर्यायाने ती इस्लामलाही लागू आहे. समस्या ह्या सदैव निर्माण होत असतात आणि त्यावर मात करीत मानव जातीचा प्रवास सदैव चालूच असतो. समस्यांचा पाडाव करण्यासाठी शुध्द वैज्ञानिक दृष्टीकोनाची आवश्यकता असते आणि ते इहवादामुळेच निष्पन्न होते. मुस्लिम समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व इहवादाची जोपासना व्हावी हे हमीद दलवाई यांचे स्वप्न होते. हिंदू धर्माला ज्याप्रमाणे चार्वाक, बुध्द, महावीरापासुन अनेक विचारवंताची परंपरा आहे. दुर्दैवाने इस्लामच्या इतिहासात अशी परंपरा 19 व्या शतकापर्यंत दिसून येत नाही म्हणून भारतातील हिंदू धर्म चिकित्सेचा आधार घेऊन पुढे निघून गेला तर मुस्लिम समाज तेराशे वर्षांच्या जुन्या रूढी, परंपरा व धर्मश्रध्दा यांना कवटाळून बसला आहे, हे हमीद दलवाई यांच्या लक्षात आले. महात्मा फुले यांनी हिंदू धर्मामध्ये सुधारणा करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व हिंदू धर्मातील जुनाट रूढी, परंपरा व अंधश्रध्दा यांना दूर करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुल्यांचा आदर्श समोर ठेवून सामाजिक सुधारणाचे कार्य मुस्लिम समाजात करण्यासाठी हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन केले.

जोपर्यंत या भूतलावर मनुष्य प्राणी अस्तित्वात आहे तो पर्यंत तो आपल्यापुढे नवीन समस्या निर्माण करणार. जगण्याच्या धडपडीतूनच समस्या निर्माण होत असतात म्हणजे समस्या या न संपणारी साखळी आहे. त्याचमुळे समस्यांवर उपाय हाही न संपणारी धडपड बनते. मुस्लिम सत्यशोधक मंडळ त्या न संपणाऱ्या सुधारणा मागत राहणार असा त्याचा अर्थ आहे. खरे तर समस्या दूर करता येतील पण त्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन हाच एकमेव उपाय अंमलात आणता येईल व त्याव्दारेच समाजाची प्रगती करता येईल. म्हणूनच हमीद दलवाईंनी मुस्लिम स्त्रीला तिच्या मानसिक व बौध्दीक गुलामगिरीतून मुक्त करून तिला समाजामध्ये मानाचे स्थान व समानता मिळवून देण्यासाठी, तसेच जुन्या परंपरागत विचारांना घट्ट चिकटून बसलेल्या मुस्लिम समाजाला नवी दिशा दाखवून देण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.

आज महाराष्ट्राने शिक्षण, आरोग्य, कृषिविकास, पाटबंधारे, सहकार, औद्योगिकरण, दळवळण इत्यादी अनेक बाबतीत मोलाची प्रगती केली आहे. त्यामुळेच महाराष्ट्राची अनेक बाबतीत देशातील आघाडीच्या राज्यात गणना केली जाते. याचा अर्थ असा नव्हे की महाराष्ट्रात आज सर्व काही व्यवस्थीत आहे. आज पन्नास वर्षांनंतर महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा करताना, तो विकास समतोल पध्दतीने झाला नाही, हे स्पष्ट दिसते. शिक्षणापासुन आरोग्यापर्यंत आणि गृहनिर्माणापासून शेतकऱ्याच्या प्रश्नांपर्यंत सर्वत्रच विषमतेची दरी वाढत आहे. महाराष्ट्र हे विकसित राज्य आहे. मात्र त्याचे अनेक विभाग विकासापासून दूर राहिले आहेत. विदर्भात हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी या विकासासमोर प्रश्नचिन्ह उभे केलेले आहे. तसेच राज्यात दरवर्षी कुपोषणाला बळी पडणाऱ्या शेकडो आदिवासी मुलांच्या मृत्युचेही तेवढेच मोठे प्रश्नचिन्ह आता उभे राहिले आहे. विकासाच्या असमतोलाचे चटके विदर्भाएवढेच मराठवाडा आणि कोकण या प्रदेशाला बसत आहेत. कोणत्याही राज्याच्या आर्थिक विकासाचे मोजमाप त्याच्या तिजोरीत पडणाऱ्या पैशांच्या आकडेवारीवरून करता येत नाही. तर या तिजोरीतून बाहेर पडणारा पैसा, त्या राज्याच्या सामान्य नागरिकांपर्यंत किती प्रमाणात व कसा पोहोचतो यावरच त्याचे गणित मांडता येणे शक्य आहे. पुरोगामी विचारसरणीचा वारसा असलेल्या या राज्यात वैचारिक व सामाजिक क्रांतीही अत्यंत वेगाने होत आहे. देशाच्या नकाशावर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्राने आपले नाव कोरले आहे. एकुणच महाराष्ट्राचा विकास अत्यंत वेगाने होत असतानाच विकासाची दुसरी बाजुही अत्यंत विदारक स्वरूपाची असलेली दिसते. विकासाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीची हानी होत आहे. पाण्याचा अनियोजीत वापर, शहरांची भरमसाठ वाढ व त्यातून निर्माण होणारे सांडपाण्याचे प्रश्न, अत्यंत वेगाने होणारी वाहन उद्योगाची प्रगती व वाढत्या वाहनांमुळे रस्त्यांवर पडणारा ताण, कृषिविकासाच्या चुकीच्या संकल्पना व त्यातून निर्माण होणारी हरितवायु उत्सर्जनाची समस्या, पश्चिम महाराष्ट्राच्या ऊस पट्ट्यात निर्माण

झालेली जमिनीच्या क्षारीकरणाची समस्या, खनिजांचे अतिरेकी उत्खनन इत्यादी सारख्या समस्या आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. या समस्या राज्याच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करीत आहेत. महाराष्ट्राच्या भविष्यकालीन प्रगतीवर या गंभीर परिणाम करणाऱ्या आहेत. या सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करून त्यावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**


1. बॅडवाले बाबुमिया - 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका', (प्रस्तावना) इंडियन सेक्युलर सोसायटी, पुणे, 1979 पृ. क्र. 6.
2. अवचट अनिल, 'हमीद' नीलकंठ प्रकाशन, पुणे, 1977 पृ. क्र. 39.
3. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), 'मराठी विश्वकोश' खंड XII, 1987, पृ. क्र. 785.
4. कित्ता पृ. क्र. 785.
5. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स हाऊस पुणे प्रथम आवृत्ती 27 एप्रिल 2009 पृ. क्र. 13.
6. कित्ता पृ. क्र. 13.
7. कित्ता पृ. क्र. 13.
8. उपरोक्त - जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) 'मराठी विश्वकोश' खंड-XIII पृ. क्र. 785.
9. कित्ता पृ. क्र. 785.
10. कित्ता पृ. क्र. 785.
11. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा (संपा.) 'महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुर्नमांडणी', शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर 2011 पृ. क्र. 232.
12. उपरोक्त तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 14.
13. कित्ता पृ. क्र. 14.
14. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), 'निवडक साधना खंड' – VIII, साधना प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 8 सप्टेंबर 2007 पृ. क्र. 128.
15. उपरोक्त बॅडवाले बाबुमिया, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका' पृ. क्र. 16.

16. दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन पुणे, 2002, पृ. क्र. 47.

17. के. सागर, 'महाराष्ट्रातील समाजसुधारक व भारतीय विचारवंत', के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, 2011 पृ. क्र. 133.

18. कित्ता पृ. क्र. 134.

19. उपरोक्त प्रा. तांबोळी शमुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 15.

20. कित्ता पृ. क्र. 35.

21. उपरोक्त के. सागर, 'महाराष्ट्रातील समाजसुधारक व भारतीय विचारवंत' पृ. क्र. 133.

22. उपरोक्त डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालवा (संपा.), 'महाराष्ट्राचा इतिहास मांडणी व पुर्नमांडणी' पृ.क्र. 233.

23. जमादार हुसेन, 'जिहाद' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑक्टोंबर 2006 व्दितीयावृत्ती पृ. क्र. 115.

24. उपरोक्त डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालवा (संपा.) 'महाराष्ट्राचा इतिहास मांडणी व पुर्नमांडणी' पृ. क्र. 233.

25. उपरोक्त - अवचट अनिल, 'हमीद' पृ. क्र. 37.

26. दलवाई हमीद, 'इस्लामचे भारतीय चित्र' (प्रस्तावना) श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 3 मे 1982 पृ. क्र. 13.

27. उपरोक्त - अवचट अनिल, 'हमीद' पृ. क्र. 44.

28. कित्ता पृ. क्र. 53.

29. कित्ता पृ. क्र. 50.

30. उपरोक्त - प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), 'निवडक साधना खंड' – VIII पृ. क्र. 131.

31. प्रा. तांबोळी शमशुद्दीन, 'महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती 1 नोव्हेंबर 2009 पृ. क्र. 160.

32. उपरोक्त - प्रधान ग. प्र. जाधव रा. ग. (संपा.), 'निवडक साधना' खंड-VIII, पृ. क्र. 133.

33. उपरोक्त - जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 140.

34. कित्ता पृ. क्र. 142.

35. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 16.

36. उपरोक्त - जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 146.

37. कित्ता पृ. क्र. 147.

38. उपरोक्त - डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा, 'महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुर्नमांडणी' पृ. क्र. 233.

39. कित्ता पृ. क्र. 234.

40. कित्ता पृ. क्र. 234.

41. उपरोक्त - अवचट अनिल, 'हमीद' पृ. क्र. 40.

42. दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय', साधना प्रकाशन पुणे 1978 पृ. क्र. 7.

43. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 28.

44. कित्ता पृ. क्र. 28.

45. कुरूंदकर नरहर, 'शिवरात्र' साधना प्रकाशन पुणे नोव्हेंबर 1970 पृ. क्र. 87.

46. देशपांडे पु. ल., 'मैत्र' मौज प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, 2006 पृ. क्र. 98.

47. रामजीसिंह, 'नया समाज और नयी संस्कृति', कॉमनवेल्थ पब्लिशर्स, नवी दिल्ली 1998 पृ. क्र. 14.

48. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), 'निवडक साधना राजकीय व आर्थिक साधना' खंड V प्रकाशन पुणे 2007 पृ. क्र. 143.

49. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन (संपा.), 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 9.

50. उपरोक्त - दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय' पृ. क्र. 40.

51. कित्ता पृ. क्र. 40,41.

52. कित्ता पृ. क्र. 42.

53. वाडीकर भु. द., भगत दत्ता (संपा.) कुरूंदकर नरहर, 'अन्वय' इंद्रायणी साहित्य पुणे, 1991 पृ. क्र. 114.

54. कित्ता पृ. क्र. 114.

55. उपरोक्त - दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय', पृ. क्र. 15.

56. उपरोक्त - अवचट अनिल, 'हमीद' पृ. क्र. 49.

57. उपरोक्त - दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' पृ. क्र. 57.

58. उपरोक्त - दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय' पृ. क्र. 14,15.

59. इंडियन सेक्युलर सोसायटी, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका', प्रकाशक इंडियन सेक्युलर सोसायटी पुणे प्रथमावृत्ती जानेवारी 1979, पृ. क्र. 17.

60. प्रा. राऊत गणेश, प्रा. राऊत ज्योती, 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास', डायमंड पब्लिकेशन्स पुणे प्रथम आवृत्ती सप्टेंबर 2005 पृ. क्र. 220.

61. डॉ. शिंदे ज. रा., 'भारतीय प्रबोधनकार', कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद प्रथमावृत्ती 1987 पृ. क्र. 1.

62. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), 'मराठी विश्वकोश' खंड XI, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई 1982, पृ. क्र. 814.

63. जावडेकर आचार्य, 'आधुनिक भारत' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 1938 पृ. क्र. 156.

64. उपरोक्त - शिंदे ज. रा., 'भारतीय प्रबोधनकार' पृ. क्र. 14.

65. उपरोक्त - जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) 'मराठी विश्वकोश' खंड XI पृ. क्र. 815.

66. उपरोक्त - शिंदे ज. रा., 'भारतीय प्रबोधनकार' पृ. क्र. 15.

67. प्रियोळकर आ. कृ. (संपा.), 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, 1967, पृ. क्र. 247.

68. डॉ. सहस्त्रबुध्दे पु. ग. (संपा.), 'लोकहितवादीची शतपत्रे' पृ. क्र. 11,12.

69. माडखोलकर ग. त्र्यं., 'आधुनिक महाराष्ट्राचा वारसा', पृ. क्र. 8, 9.

70. शिखरे दा. नं., 'धार्मिक संस्था संप्रदाय : आधुनिक काळ', ग. बा. सरदार (संपा.) महाराष्ट्र जीवन, प्रथमावृत्ती, पुणे, 1960 पृ. क्र. 165.

71. कित्ता पृ. क्र. 167.

72. कित्ता पृ. क्र. 176.

73. कित्ता पृ. क्र. 176.

74. क्रिस्टाईन डॉबिन, 'अर्बन लीडरशीप इन वेस्टर्न इंडिया - पॉलिटिक्स ॲन्ड कम्युनिटीज इन बॉम्बे सिटी' (1840-1885) मुंबई, 1972 पृ. क्र. 71.

75. प्रियोळकर अनंत काकबा, ‘रा. बा. दादोबा पांडुरंग आत्मचरित्र व चरित्र’, 1947 पृ. क्र. 252.

76. कित्ता पृ. क्र. 296.

77. कित्ता पृ. क्र. 296.

78. पद्मनजी बाबा, ‘अरूणोदय’, बॉम्बे ट्रॅक्स ॲन्ड बुक सोसायटी, मुंबई 1963, पृ. क्र. 201.

79. उपरोक्त क्रिस्टाईन डॉबिन, ‘अर्बन लीडरशीप इन वेस्टर्न इंडिया’ - पृ. क्र. 250.

80. कित्ता पृ. क्र. 250.

81. उपरोक्त - शिखरे दा. नं., ‘धार्मिक संस्था संप्रदाय आधुनिक काळ’ पृ. क्र. 252.

82. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, धर्म सुधारणेचे आंदोलन, भिमराव कुलकर्णी (संपा.) ‘अस्मिता महाराष्ट्राची’, मराठा मंदिर प्रकाशन पुणे, 1971 पृ. क्र. 545.

83. वैद्य व्दा. गो. (संपा.), ‘रा. गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्याने’ तिसरी आवृत्ती 1919 पृ.क्र. 158.

84. उपरोक्त - शिखरे दा. नं., ‘धार्मिक संस्था संप्रदाय : आधुनिक काळ’ पृ. क्र. 259.

85. जोशी श्रीपाद, ‘महर्षि दयानंद सरस्वती’, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, नांदेड, प्रथम आवृत्ती 1992, पृ. क्र. 72.

86. कित्ता पृ. क्र. 78.

87. चिपळुणकर विष्णुशास्त्री, ‘निबंधमाला’, पुणे, 1957 पृ. क्र. 344.

88. कित्ता पृ. क्र. 345.

89. सरस्वती महर्षि दयानंद (अनु. जोशी श्रीपाद) सत्यार्थ प्रकाश, अकरावी आवृत्ती, आर्य समाज, पिंपरी, पुणे, 1990 पृ. क्र. 123.

90. रामराव टी. के. (अनु. दीक्षित वामन), ‘लाला लजपतराय’, भारत-भारती, नागपुर, प्रथम आवृत्ती, 1980 पृ. क्र. 72.

91. उपरोक्त - शिंदे ज. रा., ‘भारतीय प्रबोधनकार’ पृ. क्र. 32.

92. कित्ता पृ. क्र. 41, 42.

93. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), 'मराठी विश्वकोश' खंड II, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1976, पृ. क्र. 245.

94. कित्ता पृ. क्र. 246.

95. वऱ्हाडपांडे व. कृ. (संपा.), 'गरूडझेप सावरकर गौरव ग्रंथ', प्रथमआवृत्ती विजय प्रकाशन नागपूर 1983 पृ. क्र. 146.

96. जावडेकर आचार्य, 'आधुनिक भारत', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 1938, पृ. क्र. 227.

97. सहस्त्रबुध्दे पु. ग. (संपा.), 'इहवाद शासन', केसरी प्रकाशन पुणे, 26 जानेवारी 1972 प्रथम आवृत्ती पृ. क्र. 185

98. देशपांडे स. ह., लेले य. श. (संपा.), 'भारताचा राष्ट्रवाद' कॉन्टिनेन्टल प्रकाशन व ज्ञानप्रबोधिनी, पुणे, 1972, पृ. क्र. 200.

99. कित्ता पृ. क्र. 200.

100. बेडेकर दि. के., भणगे भा. रा. (संपा.), 'भारतीय प्रबोधन', समाज प्रबोधन संस्था पुणे, प्रथम आवृत्ती जुलै 1973, पृ. क्र. 203,204.

101. डॉ. सहस्त्रबुध्दे पु. ग., 'इहवादी शासन', केसरी प्रकाशन पुणे, जानेवारी 1972 पृ. क्र. 186.

102. उपरोक्त देशपांडे स. ह., लेले य. शं. (संपा.), 'भारताचा राष्ट्रवाद' पृ. क्र. 200,201.

103. ग्रोव्हर बी. एल., 'आधुनिक भारताचा इतिहास', एस. चंन्द आणि कंपनी दिल्ली 2003 पृ. क्र. 139.

104. कित्ता पृ. क्र. 139, 140.

105. पगडी सेतुमाधवराव, 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध', परचुरे प्रकाशन, मुंबई 1986 पृ. क्र. 116.

106. उपरोक्त देशपांडे स. ह., लेले य. शं. (संपा.), 'भारताचा राष्ट्रवाद' पृ. क्र. 206.

107. गुप्त शिवकुमार (संपा.), 'आधुनिक भारत का इतिहास', पंचशील प्रकाशन जयपुर पृ. कर्. 78, 79.

108. गर्दे दि. का., 'आधुनिक भारतीय राज्यविचार', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 1975 पृ. क्र. 200.

109. दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन पुणे, 2002 प्रथम आवृत्ती पृ. क्र. 51.

110. Imtiaz Ahmad, 'Modernization and Social change among Muslim in India', Manohar N. D. 1983 Page No. 97.

111. कित्ता पृ. क्र. 99.

112. Bipin Chanddra, 'Indias struggle for Independence', Penguin Book, New Delhi, 1997 Page No. 77.

113. भोळे भास्कर लक्ष्मण, 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपुर, व्दितीय आवृत्ती, जुन 2003, पृ. क्र. 705.

114. उपरोक्त - ग्रोव्हर बी. एल., 'आधुनिक भारताचा इतिहास' पृ. क्र. 139.

115. उपरोक्त - सहस्त्रबुध्दे पु. ग., 'इहवाद शासन' पृ. क्र. 190.

116. बेन्नुर फक्रुद्दिन, 'भारतीय मुसलमानाची समाजरचना आणि मानसिकता', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 2 ऑक्टोबर 2012 पृ. क्र. 127.

117. कित्ता पृ. क्र. 127.

118. कीर धनंजय, 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1973 पृ. क्र. 144.

119. जोशी महेश, 'सत्यशोधक समाजाचा इतिहास', प्रस्तावना, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, व्दितीय आवृत्ती 2002 पृ. क्र. 13, 14.

120. ठाकुर रवींद्र, 'महात्मा', मेहता प्रकाशन, पुणे, 1999 पृ. क्र. 5.

121. मंगुडकर मा. प., 'महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ', इंडियन कमिटी फॉर फ्रीडम, पुणे, 1990 पृ. क्र. 29.

122. कित्ता पृ. क्र. 53.

123. पाशा जावेद, 'भारत - बहुजनांचा इस्लाम स्वीकारण्याचा सामाजिक इतिहास', भूमी प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, 18 जानेवारी 2013 पृ. क्र. 95, 96.

124. इंडियन सेक्युलर सोसायटी, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका', पुणे 1979 पृ. क्र. 18.

125. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा पृ. क्र. 2.

126. नानिवडेकर मेधा (संपा.), 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 1 जानेवारी 2006 पृ. क्र. 172.

127. उपरोक्त - मंगुडकर मा. प., ‘महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ’ पृ. क्र. 14.

128. वैद्य प्रभाकर, ‘महात्मा फुले आणि त्यांची परंपरा’ लोक वाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई प्रथमावृत्ती 1974 पृ. क्र. 217.

129. चौसाळकर अशोक, ‘महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ’ लोक वाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई 2003 पृ. क्र. 43.

130. उपरोक्त वैद्य प्रभाकर, ‘महात्मा फुले आणि त्यांची परंपरा’ पृ. क्र. 218.

131. ‘पुरोगामी सत्यशोधक’, एप्रिल, मे, जून 1990 पृ. क्र. 39.

132. कित्ता पृ. क्र. 38.

133. शेख वि. अ., ‘मुस्लिम समाज दशा व दिशा’, लोकजागर प्रकाशन, फलटण प्रथमावृत्ती, 1993 पृ. क्र. 32.

134. कुरूंदकर नरहर, ‘वाटचाल’, इंद्रायणी साहित्य पुणे 1987 पृ. क्र. 136.

135. कित्ता पृ. क्र. 136.

136. उपरोक्त - गर्दे दि. का., ‘आधुनिक भारतीय राज्यविचार’ पृ. क्र. 201.

137. देशपांडे ल. सं., ‘विचारवंत नरहर कुरूंदकर’, श्री. गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर 2010 पृ. क्र. 153.

138. उपरोक्त कुरूंदकर नरहर, ‘वाटचाल’, पृ. क्र. 137.

139. कित्ता पृ. क्र. 137.

140. कित्ता पृ. क्र. 138.

141. सरदार गं. बा., ‘महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल’, नवनिर्माण न्यास दौंड, 1986 पृ. क्र. 7.

142. जाधव तुकाराम (संपा.), ‘महाराष्ट्र वार्षिकी’ 2012, द युनिक ॲकॅडमी पुणे 2012 पृ. क्र. 214.

143. पाटील व्ही. बी., ‘एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास’, के. सागर प्रकाशक, पुणे, 2004 पृ. क्र. 39.

144. कुलकर्णी कुसुम, ‘प्रबोधन पर्व’, सिंहवाणी प्रकाशन कोल्हापूर व्दितीय आवृत्ती 26 जानेवारी 2002 पृ. क्र. 23.

145. पगडी सेतु माधवराव, ‘सूफी संप्रदाय : तत्वज्ञान आणि कार्य’, परचुरे प्रकाशन मुंबई 1953 पृ. क्र. 17.

146. कित्ता पृ. क्र. 18.

147. मौलाना सय्यद वहीदअली, ‘सूफी संतांचा सर्वधर्मसमभाव’ (त्रैमासिक) भारत इतिहास व संस्कृती, पुणे जानेवारी-मार्च 1986 पृ. क्र. 46,50.

148. पठाण यु. म., ‘मुस्लिम संतकवी व श्रीविठ्ठल’, महाराष्ट्राची सत्वधारा मध्ये (संपा.) गो. म. कुलकर्णी, दास्ताने, प्रकाशन पुणे, 1981 पृ. क्र. 205.

149. पगडी सेतु माधवराव, ‘भारतीय मुसलमान शोध आणि बोध’, परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई, मार्च 1986 पृ. क्र. 50, 52.

150. देशपांडे केजकर, ‘भारताची राष्ट्रीय संस्कृती’, नॅशनल बुक ट्रस्ट दिल्ली 1987 पृ. क्र. 66.

151. मुरे टायटस, ‘भारतीय इस्लाम’, ओरियंटल बुक्स दिल्ली 1930 पृ. क्र. 48.

152. देशपांडे पु. ल., ‘मैत्र’ मौज प्रकाशन मुंबई, सातवी आवृत्ती 2006 पृ. क्र. 93.

153. कित्ता पृ. क्र. 96.

154. कित्ता पृ. क्र. 95.

155. बेडेकर दि. के., भणगे भा. शं. (संपा.), ‘भारतीय प्रबोधन’, समाज प्रबोधन संस्था पुणे जुलै 1973 पृ. क्र. 63,64.

156. कित्ता पृ. क्र. 64.

157. दलवाई हमीद, ‘मुस्लिम व्यक्तिगत कायदा परंपरा विरूध्द परिवर्तन’, समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, सप्टेंबर 1972 पृ. क्र. 19.

158. डॉ. शिंदे - चौगुले सहदेव, ‘पाथेय’ भाग 2 रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर व्दितीय आवृत्ती, मार्च 2012, पृ. क्र. 137.

159. उपरोक्त - कुलकर्णी कुसम, ‘प्रबोधन पर्व’ पृ. क्र. 7.

160. कित्ता पृ. क्र. 8.

161. उपरोक्त - डॉ. शिंदे ज. रा., 'भारतीय प्रबोधनकार' पृ. क्र. 14.

162. कीर धनंजय, मालशे सं. ग. (संपा.), 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, व्दितीय आवृत्ती, 1980 पृ. क्र. 16.

163. सहस्त्रबुध्दे पु. ग., 'इहवादी शासन', केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 26 जानेवारी 1972 पृ. क्र. 234.

164. दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', पृ. क्र. 10.

165. कित्ता पृ. क्र. 11.

166. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे एप्रिल 2009, पृ. क्र. 116.

167. पाध्ये कमल (अनुवादक) 'भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास' (1858-1947), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1988 पृ. क्र. 67.

168. कित्ता पृ. क्र. 69.

169. उपरोक्त - गर्दे दि. का., 'आधुनिक भारतीय राज्यविचार' पृ. क्र. 229.

170. बेडकिहाळ किशोर, प्रकाश बाळ, (संपा.), 'धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती', अक्षर प्रकाशन, सातारा, सप्टेंबर 2004 पृ. क्र. 36.

171. गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान', नववी आवृत्ती 2006 पृ. क्र. 227.

172. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 55.

173. कित्ता पृ. क्र. 55, 56.

174. कित्ता पृ. क्र. 56.

175. डॉ. शानेदिवाण राजेखान (संपा.), 'भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य', निर्मिती विचारमंत कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर 2008 पृ. क्र. 92, 93.

176. उपरोक्त - प्रकाश बाळ, बेडकिहाळ किशोर, 'धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती' पृ. क्र. 41.

177. उपरोक्त - कुलकर्णी कुसुम, 'प्रबोधन पर्व', पृ. क्र. 121.

178. कित्ता पृ. क्र. 122.

179. उपरोक्त प्रकाश बाळ बेडकिहाळ किशोर, ‘धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती’ पृ. क्र. 36.

180. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, ‘हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत’ पृ. क्र. 53.

181. Source - Census India 2001.

182. कित्ता - Census India 2001.

183. दलवाई हमीद, ‘मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय’, साधना प्रकाशन, पुणे पृ. क्र. 14,15.

184. उपरोक्त - देशपांडे स. ह., लेले य. शं., ‘भारताचा राष्ट्रवाद’ पृ. क्र. 206, 207.

185. मुस्लिम सत्यशोधक मंडळ, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा

186. कित्ता - मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा.

187. काझी बाबासाहेब - ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळ - एक पुनर्परिचय’, दैनिक केसरी सांगली, 26 सप्टेंबर 1987 पृ. क्र. 2.

188. उपरोक्त - मुस्लिम सत्यशोधक मंडळ जाहीरनामा.

189. कित्ता

190. प्रा. तांबोळी शमशुद्दीन, ‘महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास’, डायमंड पब्लीकेशन्स पुणे प्रथम आवृत्ती 1 नोव्हेंबर 2009 पृ. क्र. 160.

191. उपरोक्त - मुस्लिम सत्यशोधक मंडळ जाहीरनामा

192. समाज प्रबोधन पत्रिका 1989 त्रैमासिक, सातारा, समाजप्रबोधन संस्था पृ. क्र. 17.

193. कित्ता पृ. क्र. 19.

194. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा (संपा.), ‘महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी’, शाहु संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती 18 नोव्हेंबर 2011, पृ. क्र. 237.

195. उपरोक्त - मेधा नानिवडेकर, ‘महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा’ पृ. क्र. 172.

196. उपरोक्त - प्रा. राऊत गणेश, प्रा. राऊत ज्योती, ‘महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास’ (1818 ते 1960) पृ. क्र. 74, 75.

197. उपरोक्त - देशपांडे स. ह., लेले य. शं., ‘भारताचा राष्ट्रवाद’ पृ. क्र. 213.

198. इंडियन सेक्युलर सोसायटी, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका', जानेवारी 1979 पृ. क्र. 10.

199. कित्ता पृ. क्र. 10.

200. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपळापुरे ॲन्ड कंपनी, नागपुर, व्दितीय आवृत्ती, जुन 2003, पृ. क्र. 775.

201. उपरोक्त इंडियन सेक्युलर सोसायटी, मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका पृ. क्र. 16.

202. कित्ता पृ. क्र. 17.

203. थत्ते यदुनाथ मुस्लिम सत्यशोधक मंडळ मराठी विश्वकोश (संपा. जोशी लक्ष्मणशास्त्री) खंड VIII, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1987 पृ. क्र. 785.

204. समाज प्रबोधन पत्रिका (मार्च, एप्रिल त्रैमासिक 1989) समाजप्रबोधन संस्था, सातारा पृ. क्र. 14.

205. उपरोक्त - गायकवाड प्रदीप, 'भारताचे संविधान', घटना सरनामा पृ. क्र. 204.

206. उपरोक्त - इंडियन सेक्युलर सोसायटी, मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका पृ. क्र. 52, 53.

207. कित्ता पृ. क्र. 59.

208. बेडेकर दि. के., भणगे भा. श., 'भारतीय प्रबोधन', समाजप्रबोध संस्था पुणे, प्रथम आवृत्ती जुलै 1973 पृ. क्र. 205, 206.

209. मौहुदी अबुल आला, 'इस्लाम प्रबोध', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट मुंबई, जुलै 2007 पृ. क्र. 57.

210. अवचट अनिल, 'हमीद', नीलकंठ प्रकाशन पुणे, 1977 पृ. क्र. 31.

211. उपरोक्त - सहस्त्रबुध्दे पु. ग. 'इहवादी शासन' पृ. क्र. 157.

212. उपरोक्त इ तांबोळी शमशुद्दीन (संपा.), 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 8.

213. उपरोक्त - कुलकर्णी कुसुम, 'प्रबोधन पर्व' पृ. क्र. 122.

214. रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक', पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1992 पृ. क्र. 79.

215. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड XIII, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई 1987 पृ. क्र. 785.

216. दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले', आहे मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, चौथी आवृत्ती ऑगस्ट 2008 पृ. क्र. 77.

217. उपरोक्त प्रा. तांबोळी शमशुद्दीन (संपा.), 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 14.

218. मुस्लिम सत्यशोधक मंडळ - मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा.

219. इंडियन सेक्युलर सोसायटी पुणे, मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका 1979 पृ. क्र. 18.

220. मुस्लिम सत्यशोधक मंडळ -मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा 4.

221. कित्ता पृ. क्र. 4.

222. जमादार हुसेन, 'जिहाद', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती 1 मे 1993 पृ. क्र. 155.

223. जमादार हुसेन, 'मुस्लिम समाजातील प्रबोधनाची चळवळ', दैनिक सकाळ 3 मे 1992 पृ. क्र. 4.

224. उपरोक्त गायकवाड प्रदीप - 'भारताचे संविधान' पृ. क्र. 204.

225. फडके य. दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड 3, श्री. विद्या प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 2 ऑक्टोंबर 1991 पृ. क्र. 53.

226. पेंडसे लालजी - 'महाराष्ट्राचे महामंथन', लोकवाङ्मय गृह मुंबई तीसरी आवृत्ती 10 जून 2010 पर्व पहिले पृ. क्र. 3.

227. उपरोक्त - फडके य. दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', श्री. विद्या प्रकाशन पुणे 15 एप्रिल 1997 पृ. क्र. 356.

228. कित्ता पृ. क्र. 362.

229. जोशी रामभाऊ, 'यशवंतराव इतिहासाचे एक पान', केसरी प्रकाशन पुणे, 1976 पृ. क्र. 52.

230. पाटील रा. तु., 'यशवंतराव चव्हाण एक वादग्रस्त पण कर्तबगार मुत्सद्दी', परख प्रकाशन तडसर 1987 पृ. क्र. 53.

231. लोकराज्य, मार्च 2012 पृ. क्र. 12.

232. दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, पृ. क्र. 12, 13.

233. कित्ता पृ. क्र. 12, 13.

234. जाधव तुकाराम (संपा.) वार्षिकी 2012 द युनिक अ‍ॅकॅडमी पुणे, 2012, पृ. क्र. 357,358.

235. देशपांडे म. द. ‘महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्ष कृषी औद्योगिक समाजाची 25 वर्षे’, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, 1985 पृ. क्र. 27.

236. दैनिक तरूण भारत, 1 मे 2010 पृ. क्र. 5.

237. दैनिक तरूण भारत, 29 सप्टेंबर 2012 पृ. क्र. 3.

238. सिरसीकर व. मं., ‘आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण’, कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 1 मे 2001 पृ. क्र. 238.

239. मेहेंदळे विश्वास, ‘यशवंतराव ते विलासराव’, अनुबंध प्रकाशन, पुणे व्दितीय आवृत्ती 2007, पृ. क्र. 132.

240. उपरोक्त - सिरसीकर व. मं., ‘आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण’ पृ. क्र. 239.

241. कित्ता पृ. क्र. 119.

242. कित्ता पृ. क्र. 120.

243. डॉ. जिचकर श्रीकांत, विश्वकोश वार्षिकी 2005, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई पृ. क्र. 301, 302.

244. दास्ताने संतोष, महाराष्ट्र 1992 दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे 1992 पृ. क्र. 208.

245. www.govt.of maharashtra public health department disectorate of helth service.

246. मोहिते बी. एच., ‘जागतिकीकरणाच्या युगामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सिंहावलोकन,’ सहकारी महाराष्ट्र जुलै 2012, पृ. क्र. 13.

247. डॉ. गगराणी भुषण, स्मरणिका प्रकाशन, (समिती प्रमुख) उद्योगसमृध्दी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुवर्ण महोत्सव स्मरिणिका मुंबई 2012 पृ. क्र. 4, 5.

248. डॉ. मेहेंदळे विश्वास, ‘यशवंतराव ते विलासराव’, अनुबंध प्रकाशन, पुणे 2007 पृ. क्र. 271.

249. Census of India - 2011.

250. दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे 2000 पृ. क्र. 35.

251. Census of India - 2011.

252. फाटक न. र., ‘लोकमान्य’, मौज प्रकाशन मुंबई प्रथम आवृत्ती 1972 पृ. क्र. 100-101.

253. सरदार गं. बा., ‘संत साहित्याची सामाजिक फलश्रुती’ पृ. क्र.

254. सिरसीकर व. मं., ‘आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण’, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 1 मे 2001 पृ. क्र. 71.

255. कित्ता पृ. क्र. 73.

256. कित्ता पृ. क्र. 74.

257. उपरोक्त - दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 पृ. क्र. 29.

258. Economic Survey of Maharashtra 2008-2009, Directorate of Economics & Statistics. Govt. Of Maharashtra, 2009 पृ. क्र. 13.

259. Census of India - 2001.

260. उपरोक्त Economic Survey of Maharashtra, 2008-2009 पृ. क्र. 16.

261. उपरोक्त दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 पृ. क्र. 32.

262. कित्ता पृ. क्र. 32, 33.

263. सवदी ए. बी., ‘महाराष्ट्राचा भूगोल’, निराली प्रकाशन पुणे तृतीयावृत्ती 2000 पृ. क्र. 227.

264. प्रा. घोटाळे रा. ना., ‘ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास’, मंगेश प्रकाशन, नागपूर 1994 पृ. क्र. 137.

265. डॉ. कोपर्डेकर हे. द., ‘नगरांची कथा आणि व्यथा’, इंद्रायणी साहित्य पुणे 1980 पृ. क्र. 67.

266. आढाव बाबा, ‘एक गाव एक पाणवठा’ मौज प्रकाशन गृह पुणे पृ. क्र. 2.

267. लिंबोळे शरणकुमार (संपा.), दलित पँथर सुगावा प्रकाशन पुणे 1989 पृ. क्र. 44.

268. Govt. of Maharashtra, Education, Helth, Women and child welfare संबंधित विविध वेबसाईट्स.

269. कित्ता

270. कित्ता

271. Census of India - 2011.

272. जाधव तुकाराम (संपा.), महाराष्ट्र वार्षिकी 2013 युनिक ॲकॅडमी पुणे 2013 पृ. क्र. 24.

273. प्रा. सवदी ए. बी., ‘महाराष्ट्र’, निराली प्रकाशन पुणे 2001 पृ. क्र. 48.

274. पाध्ये रमेश, ‘शेतकरी आंदोलन’, एलगार प्रकाशन, मुंबई 1985 पृ. क्र. 51.

275. जोशी शरद, ‘शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती’, शेतकरी प्रकाशन अलिबाग (रायगड) 1982 पृ. क्र. 9.

276. कित्ता पृ. क्र. 96.

277. कित्ता पृ. क्र. 98.

278. अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र, जानेवारी 2014 पृ. क्र. 17.

279. धर्माधिकारी भालचंद्र, ‘क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी’, गौरवग्रंथ समिती वाळवा पृ. क्र. 75.

280. आमटे प्रकाश, ‘प्रकाशवाटा’, समकालीन प्रकाशन पुणे पृ. क्र. 154-155.

281. बंग राणी, ‘कानोसा’, ग्रंथाली प्रकाशन मुंबई 4 मार्च 2006 मनोगतामधून पृ. 1-2.

282. परळीकर नरेश (प्रस्तावना), ‘धर्माचे समाजशास्त्र’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1986 पृ. क्र. 12.

283. मुरसल हुमायुन (अनु), सच्चर समिती अहवाल, निर्मिती विचारमंच कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 2010 पृ. क्र. 19.

284. कित्ता पृ. क्र. 20.

285. Census of India - 2001.

286. Census Report Govt. of India - 1971.

287. कित्ता - Census of India - 1971.

288. सूर्यवंशी जी. एस., ‘धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता’, प्रयत्न प्रकाशन औदुंबर, प्रथमावृत्ती 15 ऑगस्ट 1989 पृ. क्र. 37.

289. Census of India - 2001.

290. उपरोक्त - मुरसल हुमायुन (अनु) सच्चर समिती अहवाल पृ. क्र. 17.

291. डॉ. बोबडे प्रकाश, ‘भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक’, श्री मंगेश प्रकाशन नागपुर, पृ. क्र. 123.

292. डॉ. दिवाकर कृष्ण, ‘श्री. संत गुलाबराव महाराज और उनका हिंदी काव्य’, विश्व संत साहित्य प्रतिष्ठान प्रकाशन नागपुर 1983 पृ. क्र. 39, 40, 41, 42.

293. देशपांडे अ. ना., 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास' खंड -2, व्हीनस प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती जानेवारी 1996 पृ. क्र. 410.

294. उपरोक्त दिवाकर कृष्ण, 'श्री. संत गुलाबराव महाराज और उनका हिंदी काव्य', पृ. क्र. 39-40.

295. देशपांडे अ. ना., 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास' खंड 1, व्हीनस प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1977 पृ. क्र. 447.

296. मेहता जे. एल., 'मध्ययुगीन भारताचा बृहत् इतिहास' खंड 3, के. सागर पब्लिकेशन्स पुणे 2010 पृ. क्र. 132.

297. प्रा. सूर्यवंशी अ. प. (अनु), 'इस्लामची जीवनपध्दती', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई प्रथमावृत्ती 1976 पृ. क्र. 9.

298. पानसरे गोविंद, 'सच्चर समिती आणि मागासलेले मुस्लिम', नाग नालंदा प्रकाशन इस्लामपुर 4 मे 2007 पृ. क्र. 77.

299. उपरोक्त - प्रा. सूर्यवंशी अ. प. (अनु), 'इस्लामची जीवनपध्दती' पृ. क्र. 8, 9.

300. उपरोक्त जिचकर श्रीकांत विश्वकोश वार्षिकी 2005 पृ. क्र. 432.

301. प्रा. राऊत गणेश, प्रा. राऊत ज्योती, 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास', डायमंड पब्लिकेशन्स पुणे सप्टेंबर 2005 पृ. क्र. 166.

302. डॉ. डांगे सिंधु, 'जैन धर्म आणि तत्वज्ञान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे पृ. क्र. 47.

303. सवदी ए. बी., 'महाराष्ट्राचा भुगोल', निराली प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती 2000 पृ. क्र. 227.

304. जोशी चिंतामण विनायक, 'बुध्द सांप्रदाय आणि शिकवण', पुणे विद्यापीठ प्रकाशन 1 ऑगस्ट 1963 पृ. क्र. 135.

305. उपरोक्त जिचकर श्रीकांत विश्वकोश वार्षिकी 2005 पृ. क्र. 434, 435.

306. कित्ता पृ. क्र. 425, 426.

307. उपरोक्त सिरसीकर व. मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' पृ. क्र. 36.

308. दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2007 दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे 2007 पृ. क्र. 14.

309. उपरोक्त सिरसीकर ब. मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' पृ. क्र. 36.

310. उपरोक्त सवदी ए. बी., 'महाराष्ट्राचा भूगोल' पृ. क्र. 10.

311. कित्ता पृ. क्र. 10.

312. उपरोक्त दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 पृ. क्र. 25.

313. के. सागर कृषी विषयक घटक, के. सागर प्रकाशन पुणे, 27 वी आवृत्ती 2009 पृ. क्र. 16, 17.

314. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 1991-92 ते 2007-08 महाराष्ट्र शासन मुंबई, 2008 पृ. क्र. 37.

315. कित्ता पृ. क्र. 39.

316. Economic survey of Maharashtra 2008-09 Directorate of Economics and Statistics Govt. of Maharashtra, June 2009 P. No. 93, 94.

317. उपरोक्त - के. सागर, कृषी विषयक घटक पृ. क्र. 24.

318. दास्ताने संतोष महाराष्ट्र 2005 दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे 2005 पृ. क्र. 49, 50.

319. Census of India - 2001.

320. जाधव मोहन, भोसले आरती, सरपोतदार प्राची, 'भारतीय शिक्षणाचा विकास', फडके प्रकाशन कोल्हापूर 2007 पृ. क्र. 56.

321. www.govt. of maharashtra public health department directorate of health service.

322. उपरोक्त - Economoc survey of Maharashtra P. No. 135.

323. उपरोक्त - दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 पृ. क्र. 92.

324. उपरोक्त Economic survey of Maharashtra P. No. 154.

325. कित्ता पृ. क्र. 147, 148.

326. कित्ता पृ. क्र. 148, 149.

327. उपरोक्त - दास्ताने संतोष, महाराष्ट्र 2000 पृ. क्र. 123.

328. कित्ता पृ. क्र. 127.

329. डॉ. पाटील रविंद्र पुंडलिक, 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास', सहकारी महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी अंक, नोव्हेंबर 2011 पृ. क्र. 65.

# प्रकरण 5

# मुस्लिम सत्यशोधक समाजाचे योगदान.

## 5.1 प्रस्तावना :-

14 व्या शतकापासून ते 17 व्या शतकापर्यंतच्या सुमारे 300 वर्षाचा कालखंड हा युरोपच्या इतिहासात 'प्रबोधन युग' म्हणून ओळखला जातो. या कालखंडात पारंपरिक ग्रीक, रोमन संस्कृतीच्या मध्ययुगीन पारंपरिकेच्या विरोधात कला, साहित्य तसेच जीवन व्यवहाराच्या संदर्भात नवीन विचार मांडले गेले. या नवविचारांची प्रथम सुरूवात इटलीत झाली. नंतर त्याचा प्रसार युरोपात तसेच जगात झाला. 'सर्व विश्वाच्या अस्तित्वाचा मानदंड मनुष्य होय' या ग्रीक तत्वज्ञ प्रोटॅगोरसच्या मानवतावादी सिध्दांताचा वैचारिक विकास म्हणजे 'प्रबोधन युग',[1] या नवमतवादी विचाराने जगास भौतिकतेकडून अवकाशाकडे नेले. या कालखंडाने मानवी विचारशक्तीचा विकास घडवून आणला. यातून मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली.

महाराष्ट्रात प्रबोधन युग उदयास आले ते 19 व्या शतकाच्या मध्यास. 'दर्पण', 'ज्ञानोदय', 'विविधज्ञानविस्तार', 'निबंधमाला' यासारख्या नियतकालिकांतून प्रकाशित होणाऱ्या लेखांव्दारे धार्मिक व सामाजिक सुधारणांसंबंधी विचार सुरू झाला. वाईट चालीरीती, अंधश्रध्दा, बालविवाह, पुनर्विवाह, हुंडा पध्दती, बहुपत्नीत्वप्रथा, स्त्री शिक्षण इत्यादी संबंधी विचारातून तत्कालीन सुशिक्षित तरूणांत परिवर्तन घडून आले. त्यातून चातुर्वर्ण्य, जातिभेद, कालबाह्य रूढी विरोधी वातावरण तयार झाले. यावेळी राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, महर्षी कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी महत्वपूर्ण योगदान दिले. तसे पाहता महाराष्ट्रातील समाज सुधारणांना संत साहित्याची व्यापक पार्श्वभूमी आहे. येथील वारकरी संप्रदायाने आपल्या भक्ती आंदोलनांने संतांची विचार परंपरा वृध्दिंगत केली. यातूनच महाराष्ट्रात उदयास आलेल्या वैचारिक उदारतेमुळे हमीद दलवाई सारखे समाजसुधारक मुस्लिम परंपरेविरूध्द बंड करू शकले. त्यासाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना केली. खरे तर कोणतीही चळवळ परिवर्तनाची चळवळ व्हावयाची असेल तर प्रचलित समाजव्यवस्थेतील कोणत्या तरी मुलभूत जुन्या प्रथेबद्दल तिच्या प्रवर्तकांच्या मनात असंतोष असावा लागतो. या असंतोषामधून ती जुनी प्रथा नाहीशी करून तिच्या जागी नवी व्यवस्था आणण्याची त्यांना उत्सुकता वाटते. उदा. दलित चळवळीतील मूळ असंतोष, अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढीविरूध्द होता. त्यामधून जातिव्यवस्थेचे विच्छेदन करण्याचे उद्दिष्ट त्यांनी समोर ठेवले होते. त्याप्रमाणेच मुस्लिम सत्यशोधक चळवळीने पडदा पध्दती, तलाक पध्दती, बहुपत्नीत्व पध्दती इत्यादी जुन्या वाईट प्रथा

कायद्याने बंद केल्या जाव्यात व मुस्लिम समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण करावी व धर्माकडे बघण्याचा दृष्टीकोनात बदल घडवून आणावा तसेच मुस्लिम समाजात राष्ट्रवादी वृत्ती निर्माण करावी अशी उद्दिष्ट्ये त्यांनी समोर ठेवली होती.

## 5.2 मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य :-

भारतीय समाज जीवनाचे आकलन केले असता असे दिसते की, धर्म हा भारतीय राष्ट्र जीवनातील एक महत्वाचा घटक आहे. धर्माने समाजाची धारणा होते. अशी प्राचीन भारतीय परंपरा आहे. धर्म या कल्पनेचे भारतीय राष्ट्र जीवनातील महत्व सांगताना महादेवशास्त्री जोशी म्हणतात, ‘‘इतिहासाला अवगत असलेल्या सर्व संस्कृतीत धर्माने मोठा प्रभाव दाखवला आहे. प्रगल्भ स्थितीला पोहोचलेल्या भूत आणि वर्तमान काळातील समाजात व राष्ट्रात धर्महीन असे राष्ट्र किंवा समाज आढळणार नाही. भारतीय प्रगतीचा पराक्रम व सांस्कृतिक घडामोडींचा अर्थ समजायला धर्म संस्थेचाच अभ्यास करावा लागतो. धर्म हा आजपर्यंतच्या मानवी इतिहासाचा एक मुलभूत घटक ठरला आहे.’’[2]

भारतीय धर्म जीवनातील प्रत्येक धर्माचे अस्तित्व हे स्वतंत्र व भिन्न असे आहे. तसेच परस्परांना पुरक आहे. ते जसे परस्परांना पूरक आहे तसे ते काही बाबतीत परस्पर विरोधक आहे. जेव्हा हे विरोधाचे घटक तीव्र होतात तेव्हा सुसंवाद राखणारा धर्म विसंवादाचे कारण बनतो. आणि त्यातून राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो.

भारतीय मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाच्या इतिहासात पुरोगामी नेत्यांचा अभाव आढळतो. समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रध्द चौकटीमुळे उदारमतवादी नेतृत्वाचा विकास खुंटल्याने धार्मिक व सांप्रदायिक नेत्यांचा मुस्लिम समाजात सुळसूळाट आढळतो. ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी धडपड केली म्हणूनच ते महामानव झाले. तसेच स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या पूर्ण आयुष्यात कष्ट सहन केले म्हणून ते स्वामी विवेकानंद म्हणून प्रसिध्द झाले. तसेच जोतिबा फुले यांनी मनोधैर्य ढळू न देता हिंदू धर्माकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पाहून पुरोहितशाही विरूध्द आवाज उठवून सत्यशोधक समाजाची स्थापना केली व ते महात्मा म्हणून ओळखले गेले. अशाच प्रकारे मुस्लिम समाजातील रूढीनिष्ठ, परंपरावादी विचाराला विरोध करण्यासाठी हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली व मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विचार मुस्लिम समाजातील लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही एक संघटनात्मक सामाजिक चळवळ आहे.

अल्पसंख्य समाज नेहमीच स्थितीप्रिय व सनातनी असतो. उलट व्यक्ती स्वातंत्र्य व सामाजिक न्याय या मूल्यांना धरून जुन्या कालबाह्य रूढींविरूध्द बंड करणारी मंडळी ही संस्थेने नेहमीच अल्प असतात. म्हणूनच प्रबोधनाच्या चळवळीत आकडेवारी ही नेहमी दुय्यम महत्वाची असते. खरे महत्व असते ते या चळवळीने दिलेला नवा विचार व दाखविलेली नवी दिशा. या दोन मुद्यांना धरूनच मुस्लिम सत्यशोधक समाजातील प्रबोधनाच्या चळवळीचे मूल्यमापन केले पाहीजे. खरे तर ही मुस्लिम सत्यशोधक चळवळ फक्त मुस्लिम समाजाच्या नव्हे तर देशाच्याही हिताची आहे.

आधुनिक विचारांचे वारे मुस्लिम समाजात फार जोराने शिरलेले नाही. हिंदू समाजात जशा सुधारणांच्या चळवळी 150 वर्षाहून अधिक काळ चालू आहेत. तशा प्रकारच्या चळवळींनी म्हणावा तसा जोर मुस्लिम समाजात धरलेला नाही. धार्मिक समजुती, रूढी, दडपणे यांची पकड मुस्लिम समाजामध्ये आजही आहे. उदा. अल्लाह सोडून इतर कुठल्याही देवावर श्रध्दा ठेवू नये, अशी श्रध्दा जे ठेवतात त्यांना ‘काफीर’ म्हंटले जाते व त्या कृत्याला ‘कुफ्र’ म्हंटले जाते. हे ‘कुफ्र’ इस्लाममध्ये हराम आहे. काफिर लोक सर्वात जास्त पापी लोक आहेत. कारण त्यांनी अल्लाहसोबत इतर देवतांना भागीदार बनविले व ते मरणानंतर अखिरतच्या दिवशी जहन्नूममध्ये (नरकात) जाणार आहेत. अल्लाह हाच एकमेव खरा देव आहे. तो सोडून इतर सर्व सैतान आहेत.[3] तसेच इस्लामला मूर्तिपूजा मान्य नाही.[4] त्याचप्रमाणे अनेकेश्वरवाद इस्लामला मान्य नाही.[5]

इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे जगाची वाटणी दोन भागांत केलेली आहे. दार-ऊल इस्लामः ज्या भूमीवर इस्लामी पध्दतीने राज्य व शासन चालते, अशी पवित्र भूमी. दार-ऊल हरबः ज्या भूमीवर मुस्लिम सोडून इतर लोक शासक आहेत, जेथे संपूर्णपणे इस्लामी राज्यपध्दती नाही असा भूभाग. अशा दार-ऊल-हरबचे, दार-ऊल इस्लाममध्ये रूपांतर करण्यासाठी प्रयत्न करणे, हे प्रत्येक मुस्लिमाचे धर्मकर्तव्य आहे.[6]

थोडक्यात मुस्लिम समाजातील लोकांवर वरील विचार बिंबवले गेल्याने मुस्लिम समाज मुर्तिपूजक, अनेकेश्वरवादी बहुसंख्य समाजापासून नेहमीच अलिप्त राहतात व पर्यायाने मुख्य प्रवाहापासून लांब राहतात. कोणताही पारंपारिक समाज आधुनिक होण्याच्या प्रक्रियेत जे अडथळे येतात. तेच मुस्लिम समाजातही जाणवतात. या विरोधात मुस्लिम सत्यशोधक चळवळीने मुस्लिम समाजात प्रबोधन करून त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे जे महत्वपूर्ण कार्य केले. त्याला भारताच्या इतिहासात महत्वपूर्ण स्थान आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची वैचारिक भूमिका मंडळाचे कार्यकर्ते व मुस्लिम समाजापर्यंत स्पष्ट करण्यात प्रा. नरहर कुरूंदकरांनी मोठा हातभार लावला होता. ज्यावेळी मुस्लिम जातीयवादावर हमीद दलवाई

कोरडे ओढत होते. त्यावेळी प्रा. नरहर कुरूंदकरांनी हिंदू जातीयवाद्यांवर टीकास्त्र सोडले होते. धर्म आणि धर्माच्या नावाने होणारे राजकारण यांचे संबंध स्पष्ट करताना आपल्या ‘शिवरात्र’ मध्ये कुरूंदकर लिहितात “धर्म हे मागासलेल्या समाजातील जीवनातील एक नशा आणणारे द्रव्य आहे या द्रव्याचे सेवन करून गुलाम प्राणपणाने मालकाचे रक्षण करतात, गुलामांच्या मुक्ततेसाठी येणाऱ्यांचे प्राण घेण्यास तयार होतात.”[7] धार्मिक, राजकीय नेत्यांना धर्म हा धार्मिक आचरण करून मोक्षाला जाण्यासाठी नको असतो, तर धर्माचा आधार घेऊन इहलोकातील हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हवा असतो.

मुस्लिम समाजामध्ये प्रबोधन करीत असताना हमीद दलवाईंना ज्या ज्या व्यक्तींनी सहकार्य केले होते त्यात यदुनाथ थत्ते यांची भूमिका महत्वाची होती. ‘साधना’ साप्ताहिक व यदुनाथ थत्ते यांनी दलवाईंची भाषणे ठिकठिकाणी घडवून आणली तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाची भूमिका अनेक लेख लिहून समाजापुढे वारंवार मांडली.[8] विशेषतः मंडळाच्या समान नागरी कायद्याच्या मागणीबाबत तर त्यांनी एक मिशनच चालवले होते. डॉ. बाबा आढाव व त्यांच्या हमाल पंचायत यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाला स्थापनेपासून सर्वतोपरी सहकार्य दिले होते.[9] हीच भूमिका निळूभाई लिमये व त्यांचे मासिक ‘पूनम’ यांनी दलवाईंच्या काळात पार पाडली होती.[10] तसेच कोल्हापूरचे कोरगांवकर ट्रस्ट आणि त्यांचे कार्यकारी विश्वस्त अनिलपंत कोरगांवकर यांचा फार मोठा आधार मंडळाला मिळालेला होता.[11]

हमीद दलवाई आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांच्या मुस्लिम समाजप्रबोधनाच्या कार्यात भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, प्रा. ग. प्र. प्रधान, अ. भि. शहा, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर, सय्यद भाई, मुन्नीर सय्यद, अमीर शेख, अन्वर शेख, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी, हुसेन जमादार, एन. आर. बारगीर, महंमदगौस नाईक, आय. एन. बेग, मुमताज रहिमतपुरे यासारख्या समाजवादी विचारवंत व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा होता. तसेच ‘इंडियन सेक्युलर सोसायटी’, ‘राष्ट्र सेवा दल’, ‘महात्मा फुले समता प्रतिष्ठान’, ‘समाजवादी महिला सभा’, ‘मंडलिक ट्रस्ट’, ‘महिला दक्षता समिती’, ‘आंतरभारती’, अहमदाबादची ‘सेवा संस्था’, ‘युक्रांद’, दिल्लीची ‘जनवादी महिला विषमता निर्मुलन समिती’ इत्यादी संस्थांचा व संघटनांचा हातभार मंडळाच्या वाटचालीत होता.

हमीद दलवाई एक लोकशाही समाजवादी कार्यकर्ता होता. त्यांच्यावर राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व काही प्रमाणात महात्मा गांधीचा प्रभाव होता. भारतीय समाजात व विशेषतः भारतीय मुस्लिमांत जी धर्म आणि राजकारण यांची गल्लत झाली आहे. तिच्यावर प्रहार करून त्या दोहोंची फारकत दलवाईंना अभिप्रेत होती.

तसेच सध्याच्या मुस्लिम जातीयवादाला भारतातील सर्वच राजकीय पक्ष कारणीभूत आहेत. त्यांनीच मतांच्या राजकारणापायी मुस्लिमांचा जातीयवाद अप्रत्यक्षपणे पोसला आहे.[12] असा विचार हमीद दलवाईंनी मांडला होता. देशातील राजकीय पक्षांना मुस्लिम-अनुनय सोडण्याचे कळकळीचे आवाहन वारंवार त्यांनी केले होते.

मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समता, बंधुभाव या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी 22 मार्च 1970 रोजी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. मुस्लिम समाजाच्या इतिहासातील ही पहिली सुधारणावादी व पुरोगामी क्रांतिकारी संघटना म्हणावी लागेल. खरे तर ही संघटना आता महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता भारतातील अन्य राज्यांसाठीही प्रेरक ठरली आहे. चार दशकांच्या कालावधीत सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई यांच्या नेतृत्वाखाली मुंबई, पुणे, अमरावती, कोल्हापूर व इतर अन्य ठिकाणी मंडळाच्या वतीने अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. मंडळाच्या स्थापने नंतर 28 नोव्हेंबर 1971 ची अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद (पुणे), 3 व 4 डिसेंबर 1971 ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम (नवी दिल्ली), 27 व 28 डिसेंबर 1971 मुस्लिम महिला परिषद (पुणे) 30 व 31 डिसेंबर 1973, मुस्लिम शिक्षण परिषद (कोल्हापूर), 11 मार्च 1973, महाराष्ट्र मुस्लिम सामाजिक परिषद (मुंबई), 9 जुन 1974, मुस्लिम महिला मेळावा (चिपळुण), जिहाद-ए-तलाक परिषद (पुणे) राज्यव्यापी सामाजिक परिषद (पुणे) 3 ते 18 नोव्हेंबर 1985 कोल्हापूर ते नागपूर अशा पंधरा जिल्ह्यांत तलाक मुक्ती मोर्चा, 17 ऑगस्ट 1985 पोटगी बचाव परिषद (मुंबई), 21 व 22 फेब्रुवारी 1986 दिल्ली येथे पंतप्रधान व राष्ट्रपती यांना निवेदन देण्यासाठी कार्यक्रम, 26 व 27 सप्टेंबर 1987 मध्ये ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्सची स्थापना या व्यासपीठावरून कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, केरळ, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, गोवा इत्यादी ठिकाणी सामाजिक, शैक्षणिक व महिलांच्या प्रश्नांवर परिषदांचे आयोजन करणेत आले, यावेळी मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही राष्ट्रीय चळवळ बनली.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने मुस्लिम महिला मदत केंद्राची स्थापना, हमीद दलवाई स्मृती पुरस्कार, सांप्रदायिक सद्भावना परिषद, राष्ट्रीय एकात्मता परिषद, सच्चर समिती शिफारस अंमलबजावणी, जनजागृती उपक्रम, मुस्लिम सत्यशोधक पत्रिका प्रकाशन, हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्युट स्थापना या उपक्रमाबरोबरच मंडळाने मोर्चा, उपोषणे, व्याख्याने, शिबीरे, वैचारिक लिखाण याव्दारे मुस्लिम समाजामध्ये प्रबोधन व समाजसुधारणेसाठी प्रयत्न केले.[13] या प्रेरणेतूनच आज देशभर अनेक मुस्लिम महिला संघटना कार्यरत झाल्या आहेत. अखिल भारतीय मुस्लिम साहित्य परिषद स्थापन झाली. प्रादेशिक भाषेतून शिकणाऱ्या मुस्लिमांचे प्रमाण वाढत आहे. उदारमतवादी विचार असणारे मुस्लिम कार्यकर्ते विविध सामाजिक संघटनांमध्ये

मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. खरे तर अतिशय प्रतिकुल परिस्थितीत हमीद दलवाई यांनी सुरू केलेल्या व मंडळाने पुढे चालविलेल्या कार्याचा एक आलेखच आहे.

खरे तर आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य अडचणीत (संकटात) सापडले आहे. आज मंडळाचे अस्तित्व टिकविण्यासाठी कार्यकर्त्यांची धडपड सुरू आहे. जागतिक पातळीवरील दहशतवादाच्या संदर्भात इस्लाम व मुस्लिम जगतावर वैचारिक व सशस्त्र हल्ले सुरू आहेत. काही अमेरिकन विचारवंतांनी गेले काही वर्षात या वादाला ख्रिश्चन विरूध्द मुस्लिम असे स्वरूप दिले आहे.[14] तर भारतात हिंदू विरूध्द मुस्लिम असे त्याचे स्वरूप आहे. जगातील दहशतवादाचा उगम इस्लाममधील जिहाद संकल्पनेतून आहे असे काहीनी आपले मत मांडले आहे.[15] तरीही अशावेळी मुस्लिम समाजात सामाजिक प्रबोधनाचे कार्य चालू ठेवण्याचे अग्निदिव्य मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांना करावे लागत आहे. अशा या मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### 5.2.1 मुस्लिम सत्यशोधक मंडळा तर्फे आयोजित पुरोगामी परिषदा :-

हमीद दलवाई यांनी 22 मार्च 1970 रोजी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाची' स्थापना केली. म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीपासून प्रेरणा घेऊनच मंडळाला हे नाव देण्यात आले. मंडळाच्या स्थापनेनंतर कार्यकर्त्यांचा हा गट ठिकठिकाणी जोमाने कामाला लागला. मंडळातील कार्यकर्त्यांच्या कामाला संघटित कार्यक्रमाचे स्वरूप आणण्यासाठी प्रथम 28 नोव्हेंबर 1970 रोजी पुण्याच्या नेहरू मेमोरियल हॉलमध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने "अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद" घेण्यात आली. या परिषदेसाठी कोल्हापूर, बेळगाव, अमरावती, इंदूर, त्रिवेंद्रम येथून सुमारे 200 प्रतिनिधी हजर होते. या परिषदेतील महत्वाची गोष्ट म्हणजे या परिषदेमधील 200 प्रतिनिधी मध्ये 56 मुस्लिम प्रतिनिधीमध्ये 12 स्त्री प्रतिनिधी होत्या. यावेळी हमीद दलवाईंनी परिषदेचे अध्यक्षपद स्विकारले होते व त्यांनी अध्यक्षस्थानावरून प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.[16] या परिषदेत कामाविषयी माहिती मिळाल्या नंतर वेगवेगळ्या भागातील प्रतिनिधी (कार्यकर्ते) आपआपल्या भागात गेले आणि त्यांनी स्थानिक पातळीवर कामास सुरूवात केली. यातूनच 31 मे 1971 रोजी प्राचार्य ए. डी. आत्तार, माधवराव बागल, साहित्यिक वि. स. खांडेकर, हमीद दलवाई यांच्या उपस्थितीत कोल्हापूरात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या शाखा स्थापनेचा समारंभ झाला.[17] यावेळी मुस्लिम समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मौलाना जमीउल अंसारी सुध्दा हजर होते. त्यांनी यावेळी समारंभात गोंधळ माजविण्याचा प्रयत्न केला पण तो त्याचा प्रयत्न निष्प्रभ ठरला. या समारंभासाठी निपाणीचे महंमद गौस नाईक, आय. एन. बेग,

इचलकरंजीचे गाझीउद्दीन सलाती ही मंडळी उपस्थिती होती. कोल्हापूर येथे ज्याप्रमाणे मंडळाची शाखा स्थापन झाली त्याप्रमाणे मुंबई, अहमदनगर, सोलापूर, सातारा, पंढरपूर, फलटण, अमरावती, चिपळूण, निपाणी, इचलकरंजी, अलिबाग येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थानिक शाखा स्थापन होत होत्या. पुण्यातील कार्यकर्त्यांनी तर मंडळाच्या स्थापनेपासूनच पुणे भागात कामास सुरूवात केली होती.

कोल्हापूरात मंडळाची शाखा स्थापन झाल्यानंतर सुरूवातीला तेथील कार्यकर्त्यांनी छोटे कार्यक्रम हाती घेतले होते. यावेळी 15 ऑगस्ट 1971 रोजी समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी राष्ट्रसेवादलाच्या साहाय्याने शहारातून सायकल फेरी काढली व त्यावेळी तेथील आमदारांना निवेदने दिली. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुस्लिमांसाठी म्हणून वेगळं राष्ट्र मागून घेणाऱ्या पाकिस्तानमधून सन 1971 साली भाषिक व आर्थिक प्रश्नावर बांगला देश पाकिस्तान पासून वेगळा झाला. यावेळी लाखो निर्वासित भारतात आले. त्यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आपल्या परीने बांगला निर्वासितांसाठी निधी गोळा करण्याचे काम हाती घेतले होते. त्याप्रमाणे कोल्हापूरातील मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी, सर्वोदय मंडळाच्या सहकार्याने सर्वसामान्य लोकांकडून एकेक रूपया मदत गोळा करून रू. 101/- चा निधी शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला.[18]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने 18 व 19 सप्टेंबर 1971 रोजी कोल्हापूरात अभ्यास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिमांनी या अभ्यास शिबीरात सहभागी व्हावे म्हणून वर्तमानपत्रांतून आवाहन करण्यात आले होते. यावेळी इस्लामिक राष्ट्रातील कायदे व समान नागरी कायदा, राष्ट्रीय एकात्मता, इस्लाम धर्माचा अभ्यास अशा विविध विषयांवर बोलण्यासाठी हमीद दलवाई, प्रा. नरहर कुरूंदकर, यदुनाथ थत्ते व कोल्हापूरातील अकबर मोहल्यातील मौलानांना निमंत्रित केले होते. यावेळी कोल्हापूर शहर मुस्लिम जमाअतच्या वतीने या अभ्यास शिबीरात भाग घेण्यास बंदी करणारे फतवावजा पत्रक काढण्यात आले होते. ते पत्रक ''ऐलाने आम होशियार'' अशा शीर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आले होते. या पत्रकात म्हंटले होते. ''कोल्हापूर और अतराफ के तमाम मुसलमान भाईयों इस बातकी खबर दी जाती है की मुस्लिम सत्यशोधक मंडळ के नाम से हमीद दलवाई मुसलमानोंको मजहबे इस्लाम के नामपर धोखा देकर और मुसलमानों में फूट डालने की और मजहबे इस्लामसे मुसलमानोंको नफरत दिलानेकी एक जमाअत बनाने की फिकर लेकर कोल्हापूर आ रहा है। इस जमाअतका कोई भी मुसलमान मेंबर न बने और उसके किसी कारोबारके अंदर शरीक न होवे। जो उसका मेंबर बनेगा और उसका साथ देगा वो मुसलमान न रहेगा। लिहाजा अपने इमान को बचाते हुए अपने घरवालोंको और

दोस्त अहबाब को और हर मुसलमान भाई को खतरेसे आगाह करे।"[19] या पत्रकाचा परिणाम होऊन स्थानिक मुस्लिम या अभ्यास शिबीरापासून लांब राहिले. परंतू जिल्ह्यातील मंडळाचे कार्यकर्ते दोन्ही दिवस शिबीरात उपस्थित होते.

या पत्रकाविरूध्द 'साधना' साप्ताहिकात 'सरकार झोपा काढीत आहे काय ?' या शीर्षकाखाली अग्रलेख आला. त्यामध्ये जातीय बहिष्काराची मुस्लिम जमाअतने सदर पत्रकाव्दारे धमकी दिली आहे. आणि महाराष्ट्र राज्यात कायद्यान्वये हा सरळ सरळ गुन्हा आहे. महाराष्ट्र सरकार अशा मंडळीचा बंदोबस्त करणार की नाही ? की सरकार झोपा काढण्याचे सोंग करणार आहे ? असे विचार प्रसिध्द झाले होते.[20]

तसेच 'महाराष्ट्र टाइम्स' ने ही मुसलमान समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन जातीय बहिष्काराची धमकी जाहीररित्या देणे हा गुन्हा आहे. सरकारने या गुन्ह्याची गय करता कामा नये. कोणत्या छापखान्यावर व कोणी हे पत्रक काढले ह्याचा तपास लावण्यात यावा व बहिष्कारवाद्यांना कायद्याचा तडाखा काय असतो तो दाखवावा अशा आशयाचा स्पष्ट अग्रलेख लिहिला होता.[21]

खरे तर मुस्लिम नेतृत्वाच्या धमक्याचा मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांवर कोणताही परिणाम झाला नाही. तर त्यांनी आपले कार्य अधिक मोठ्या जोमाने करण्यास सुरूवात केलेली आपणास दिसून येते.

हमीद दलवाईंनी सुरूवातीपासूनच मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा ध्यास घेतला होता. त्याचाच एक परिणाम म्हणून दिल्ली मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने 4 व 5 डिसेंबर 1971 रोजी ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्सने मीटिंग आयोजित केली.[22] त्यासाठी भारत व बांगला देशातून शंभर प्रतिनिधी हजर होते. यावेळी समान नागरी कायद्याची मागणी, कुटुंबनियोजन प्रसाराला पाठिंबा व प्रोत्साहन, बांगला देशाला मान्यता इत्यादी विषयांवर परिषदेने चर्चा करून ठराव संमत केले.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने 27 व 28 डिसेंबर 1971 रोजी पुणे येथे मुस्लिम महिला परिषद घेण्यात आली. मुस्लिम महिलांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांबाबत चर्चा केलेली इस्लामच्या इतिहासातील ही पहिलीच परिषद होती. या परिषदेस महाराष्ट्राशिवाय दिल्ली, अहमदाबाद, कलकत्ता, म्हैसूर, सूरत येथून सुमारे 176 मुस्लिम महिला या परिषदेस उपस्थित होत्या. या परिषदेचे अध्यक्षस्थान श्रीमती शरिफा तय्यबजी यांनी भुषविले होते. तर श्रीमती सुलताना फैजी, ॲड. नजमा शेख, मरियम रिफाई इत्यादींनी ठराव मांडले. तर शमिम आत्तार यांनी महिलांचे प्रतिनिधित्व केले. या परिषदेत मुस्लिम स्त्रियांना समान हक्क, व्दिभार्या

प्रतिबंध, जुबानी तलाक इत्यादी विषयांवर महिलांनी चर्चा केली व ठराव संमत केले. यावेळी दिल्लीचे कायदेतज्ज्ञ असफ ए. ए. फैजी यांनी शरियत कायद्यातील त्रुटी दाखविल्या व कायदे बदलून मुस्लिम स्त्रीने पतीच्या बरोबर चालले पाहिजे असे मत व्यक्त केले. तसेच या परिषदेत 'परचम-ए-हिंद' या साप्ताहिकाचे संपादक अमेसुर रहमान यांनी मौलवींच्या धोरणावर हल्ला चढविला.[23]

या परिषदेस हमीद दलवाईंसह मंडळाचे कार्यकर्ते हजर होतेच. तसेच एस. एम. जोशी व हरीभाऊ परांजपे हे ही दोन दिवस हजर होते. या परिषदेत मंडळाच्या उपक्रमांविषयी जाहीर संघटित कार्यक्रमातुन माहिती देण्याचा प्रयत्न झाल्यानंतर हमीद दलवाई व पुण्यातील कार्यकर्त्यांनी एक वेगळाच उपक्रम हाती घेतला. मुस्लिम समाजातील नेत्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणे बाजूला ठेवून प्रत्यक्ष सामान्य मुसलमानांना आपले विचार पटविण्यासाठी व चर्चा करण्यासाठी त्यांनी पुणे शहरात घरोघरी संपर्क मोहीम चालू केली. पुण्यातील मोमिनपुरा या मुस्लिम बहुसंख्य वस्तीत हे काम करत असताना गैरसमजाने पछाडलेल्या काही सनातनी मुस्लिमांनी हमीद दलवाई व इतर कार्यकर्त्यांवर हल्ला केला.[24]

मुस्लिम महिला परिषदेहून मुस्लिम महिला गावी परत गेल्यावर सनातनी लोकांकडून या महिलांना शिवीगाळ झाली, धमक्या देण्यात आल्या, मंडळाच्या काही कार्यकर्त्यांवर हल्ले झाले. सनातनी लोकांकडून वारंवार मंडळाला विरोध होतच होता. याला मुख्यत्वेकरून अल्पसंख्याकांमध्ये असलेली असुरक्षिततेची भावना व मुस्लिमांमध्ये असणारा शिक्षणाचा अभाव व मागासलेपणा कारणीभूत होता. हमीद दलवाईंचा शास्त्रशुध्द बुध्दिवाद व विज्ञानवादी दृष्टिकोन बहुसंख्य मुस्लिमांना पटत नव्हता.

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्य विविध भागात जोमाने सुरू असतानाच आपले विचार मुस्लिम समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविले पाहीजे म्हणून सन 1973 च्या जानेवारी महिन्यात मंडळाचे मुखपत्र 'मुस्लिम सत्यशोधक पत्रिका' हे त्रैमासिक कोल्हापुरातून सुरू केले. आणि मंडळाच्या मुखपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. हमीद दलवाई हे त्याचे संपादक व हुसेन जमादार कार्यकारी संपादक होते. मंडळ व त्याचे कामकाज याविषयी कार्यकर्ते, हिचचिंतक व सामान्य हिंदू-मुसलमान यांना अधिकृत माहिती देण्यासाठी या पत्रिकेचा मंडळाचा सुरूवातीच्या काळात मोठा उपयोग झाला. पुढे ती मुस्लिम सत्यशोधक पत्रिका कोल्हापूरहुन पुण्यास नेण्यात आली. परंतु ती काही वर्षांनंतर बंद पडली तेव्हा हुसेन जमादार यांनी 'मुस्लिम प्रबोधन संवाद' या नावाचं मासिक पत्र सुरू केले. परंतु मुस्लिम प्रबोधन संवाद या नावास शासकीय परवानगी न मिळाल्यामुळे पत्रिकेचे 'पुरोगामी मुस्लिम' असे नामकरण करण्यात आले.[25]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 'पुरोगामी मुस्लिम' हे मासिक सुरू केले व याच्या पहिल्याच अंकात हमीद दलवाईंचे मुस्लिम समाजाविषयीचे विचार मांडले होते. त्यामध्ये हमीद दलवाई म्हणतात "मुसलमानांनी हिंदूप्रमाणे स्वतःच्या समाजातील दोष व कुप्रवृत्तीविरूध्द झगडले पाहीजे. हे न झाल्याने मुसलमान समाज मागे पडला आहे. केवळ तक्रारी करून परिस्थिती बदलत नाही. जोपर्यंत मुस्लिम समाजात या देशाच्या राष्ट्रवादाशी आणि समान नागरिकत्वाच्या कल्पनेशी मिळते जुळते घेणाऱ्या प्रवृत्ती निर्माण होत नाहीत, तो पर्यंत हिंदू मुस्लिम समस्या आपल्याला भेडसावीत राहणार आहे. तो सोडवावयाचा असेल तर प्रथम मुस्लिम समाजाचे मनोगत आणि आकांक्षा समजावून घ्याव्या लागतील. इतर प्रश्नांसारखाच हा प्रश्न नाही हे ओळखून तो अनेक आघाड्यावर सोडविण्याच्या दृष्टीने पावले टाकावी लागतील. मुस्लिम समाजातच जेव्हा धर्मनिरपेक्ष आधुनिक राष्ट्रवादी प्रवृत्ती मूळ धरतील तेव्हाच या प्रश्नाची तीव्रता कमी होऊ लागेल." [26]

कार्यक्रमांचे वेगळेपणा हे तर मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे एक वैशिष्ट्यच मानाने लागेल. सन 1973 च्या जानेवारीत 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' सनातनी मुस्लिमांच्या संघटनेने समान नागरी कायद्यास विरोध करणारी एक परिषद भरवली होती. तिथे दहा हजार प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी त्या परिषदेच्या विरोधात त्याच ठिकाणी हमीद दलवाईं व मंडळाचे इतर कार्यकर्ते आणि युक्रांदचे कार्यकर्ते यांनी निषेधात्मक निदर्शने करण्याचे जीवघेणे धाडस केले. त्यावेळी महाराष्ट्रभर या घटनेचा प्रसार माध्यमातून मोठ्या प्रमाणात गवगवा झाला होता.[27] यावरून असे दिसून येते की हमीद दलवाईं व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी रूढीनिष्ठ परंपरावादी विचाराला विरोध केलेला होता.

11 मार्च 1973 या दिवशी 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' या सनातनी जातीयवाद्यांच्या परिषदेला आव्हान देण्यासाठी मराठा मंदिर मुंबई येथे 'महाराष्ट्र मुस्लिम सामाजिक परिषद' मंडळाने भरविली. नेहमीप्रमाणेच यावेळीही इंडियन सेक्युलर सोसायटीचे सहकार्य होतेच. या परिषदेसाठी पुणे, मुंबई, मुंबई उपनगरे, कोल्हापूर, निपाणी, इचलकरंजी, आजरा, सांगली, सोलापूर, अमरावती, नागपूर, फलटण, चिपळूण, सासवड, अहमदनगर, भिवंडी, वर्धा, पालघर, गुलबर्गा, श्रीगोंदा इत्यादी ठिकाणाहून सुमारे 250 प्रतिनिधी हजर होते. त्यात 50 महिलांचा समावेश होता. या परिषदेत प्रा. असफ ए. ए. फैजी, अ. भि. शहा, डॉ. मोईन शाकीर आदींनी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. मुस्लिम स्त्रियांना समान हक्कांची कायदेशीर व्यवस्था, मुस्लिमांचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे, समान नागरी कायदा इत्यादी विषयांवर चर्चा होऊन मागण्या करणारे ठराव झाले. यावेळी 'ब्लॅक डिसेंबर' या जात्यंध दहशतवादी मुस्लिमांच्या संघटनेने 'मराठा मंदिर' हे परिषदेचे ठिकाण उडवून देऊ अशी धमकी दिली

होती.[28] परंतू यावेळी मुंबई पोलीसांनी योग्य ती काळजी घेतली. तसेच मंडळाचे कार्यकर्ते आपल्या विचारांशी ठाम असल्यामुळे या परिषदेवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही.

मुस्लिम स्त्रीच्या पोटगीविषयी एक महत्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने या काळात घेतला. फौजदारी कायद्याच्या 125 कलमाखाली घटस्फोटित स्त्रीला पोटगी मिळू शकत असे. या कलमात दुरूस्ती होऊन मुस्लिम तलाकपीडितेचा अंतर्भाव त्यात झाला. त्याप्रमाणे अंमलबजावणी 1 एप्रिल 1973 पासून सुरू झाली. याचा परिणाम म्हणून मुस्लिम तलाकपीडितांना कायद्याने पोटगी मिळवून देण्याचा प्रश्न मुस्लिम सत्यशोधक मंडळाने हाती घेतला. यावेळी ठिकठिकाणी तलाकपीडित स्त्रियांसाठी मोफत कायदेविषयक सल्ला केंद्रे सुरू झाली. आणि मंडळाने आपल्या समाजपरिवर्तनांच्या कामाला विधायक कार्याची जोड दिली.

सत्तरच्या दशकामध्ये मदरसा शाळांचे प्रमाण भारतामध्ये वाढले. यासाठी कारण म्हणजे अरब देशांतील तैलक्रांती. तेथून अशा शाळा काढण्यासाठी पैसा येत असे व या शाळांच्या वेळा संध्याकाळी असत. मदरशांमध्ये येणाऱ्या मुलांना कपडे, जेवण इत्यादी आर्थिक मदत दिली जात असे. परंतू यामध्ये धार्मिक शिक्षण जास्त दिले जाई व आधुनिक विज्ञानवादी शिक्षणापासून मुस्लिम मुलामुलींना वंचित ठेवले जाई.[29] मुस्लिम समाज मागास राहण्याचे हे एक मुख्य कारण होते. यामुळेच लोकसंख्या 12 % च्या जवळपास असूनही त्यांचे प्रमाण इंजिनिअर्स 2.5 %, डॉक्टर्स 2 %, आय. ए. एस. 2.8 %, आय. पी. एस. 2 % व खाजगी नोकऱ्या 4 % [30] इतके अल्प आहे हे ओळखून मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 30 व 31 डिसेंबर 1973 ला इंडियन सेक्युलर सोसायटीच्या सहकार्याने कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात मुस्लिम शिक्षण परिषद घेतली. या परिषदेचे उद्‌घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले. हमीद दलवाई परिषदेचे अध्यक्ष होते. याशिवाय अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, प्रा. ना. गो. कालेलकर, एस. एम. जोशी इत्यादींनी परिषदेत मार्गदर्शन केले. परभणी, जळगाव, उस्मानाबाद, नाशिक, बीड, पुणे, ठाणे, कुलाबा, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी, चिपळूण, कणकवली, मनमाड, श्रीगोंदा, अहमदनगर, अमरावती, पंढरपूर, सोलापूर, सांगली, सातारा, कराड, मुंबई, निपाणी, कोल्हापूर इत्यादी ठिकाणाहून सुमारे 800 मुस्लिम प्रतिनिधी या परिषदेला हजर होते. त्यापैकी यामध्ये 250 स्त्रिया होत्या. शिक्षणाचे माध्यम म्हणून उर्दू ऐवजी प्रादेशिक भाषेचा अंगीकार, वक्फ संस्था सरकारने धर्मनिरपेक्ष संस्थाच्या ताब्यात द्यावी, व मुस्लिमांचा विकास विशेषतः शैक्षणिक विकास साधण्यासाठी त्याचा विनियोग, माध्यमिकपर्यंतचे शिक्षण मोफत, उच्चशिक्षणासाठी फी माफीच्या सवलतीसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रू. 1200/- वरून रू. 5000/- करावी, मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण इत्यादी विषयांवर चर्चा करून ठराव करण्यात आले.[31] पुढे मदरसा शिक्षणाबाबत अभ्यासक्रम बनवण्यासाठी उर्दू

माध्यमातील मंडळीना घेऊन एक समिती बनवण्यात आली. दुर्दैवाने हमीद दलवाईंच्या आजारपणामुळे पुढे तिची म्हणावी तशी कार्यवाही झाली नाही. परंतु पुढे महाराष्ट्र शासनाने वरील मागणीची अंमलबजावणी केली.

या परिषदेत श्रीमती गुलाबबानू पंजवाणी, मुख्तार अहमद, नझिरअल्ली सुलेमान पठाण, एस. इ. तांबोळी, शेख शब्बीर, आय. एन. बेग, प्रा. के. जी. पठाण, प्राचार्य ए. डी. आत्तार, मोईयुद्दीन शेख, ए. जी. खान, लसणे गुरूजी, जी. बी. तांबोळी, ए. के. शेख, म. वा. पठाण, अब्बास तांबोळी, प्रा. एफ. एच. बेन्नूर इत्यादी सहभागी झाले होते. कारण या परिषदेस येण्यासाठी मंडळाचा सभासद असण्याचे कारण नाही व मुस्लिमांच्या शिक्षणाविषयी आस्था असणाऱ्या मुस्लिमांनी परिषदेस यावे असे जाहीर आवाहन मंडळाने केले होते. त्यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांशिवाय पहिल्यांदाच या आव्हानास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. आणि यासाठीची पुढची कृती म्हणून 26 जानेवारी 1983 पासून कोल्हापूर येथे. तलाकपीडित महिलांच्या मुलांसाठी हुसेन जमादार यांनी मोफत वसतिगृह सुरू केले[32] व आयेशा जमादार यांनी या मुलांना स्वतःच्या घरी जेवण्याखाण्याची सोय केली.

9 जून 1974 रोजी चिपळूण येथे मुस्लिम महिला मेळावा आयोजित केला होता. याला सुमारे 90 मुस्लिम महिला उपस्थित होत्या. [33] हा मेळावा होऊ नये म्हणून चिपळूण येथील सनातनी लोकांनी याला खूप विरोध केला. रस्ते अडवले, धमक्या दिल्या. हमीद दलवाईंच्या राहत्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या सगळयाला न जुमानता मेळावा पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन डॉ. शमीम आत्तार यांनी केले. अध्यक्षस्थानी मेहरून्निसा दलवाई होत्या. समान नागरी कायदा करण्यासाठी सरकारकडे मागणी करण्यात आली. यावेळी स्थानिक मुस्लिम महिलांची एक समिती नेमण्यात आली. आणि या समिती मार्फत मंडळाचा प्रसार मुस्लिम स्त्रियांमध्ये करण्याचे ठरले.[34]

पुढे सन 1974 मध्येच मुस्लिम सत्यशोधक मंडळाने तलाकच्या प्रश्नावर देशभरातील 500 घटस्फोटित महिलांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून तलाकच्या प्रश्नाची भयानकता दिसून येत होती. त्याविरूध्द निवेदने, लेख याव्दारे सर्वांचे लक्ष वेधण्यात आले. याचा योग्य असा परिणाम झाला व तलाक मिळालेल्या स्त्रियांना पोटगी मागण्याचा अधिकार देणारी भारतीय दंड संविधान 125 मध्ये सन 1974 मध्ये दुरूस्ती झाली. त्यानुसार मुस्लिम स्त्रीला पोटगी मागण्याचा अधिकार देण्यात आला.[35] यानंतर मंडळातर्फे पुणे, कोल्हापूर, मुंबई याठिकाणी मुस्लिम महिला मदत केंद्रे सुरू करण्यात आली. पुढे जे लोक मंडळाला विरोध करीत, त्यांच्यां स्वतःच्या घरी तलाकची एखादी केस झाली, तर ते मंडळाकडे येत असत. मुस्लिम स्त्रीला पोटगी मिळवून देण्यासाठी मंडळाने मोफत सल्ला केंद्रातून वकील मिळवून दिल्याने अनेक तलाक पिडीत मुस्लिम महिला मंडळाकडे येऊ लागल्या. व चळवळीचा

जोर वाढू लागला. यावेळी कोल्हापूरात ॲड. समुद्रे, ॲड. अविनाश खंडेराव महाडिक यांनी मंडळाच्या वतीने मोफत सल्ला देण्याची जबाबदारी घेतली होती.

### 5.2.2 सामुदायिक नेतृत्वास सुरूवात :-

हमीद दलवाईंना मुस्लिम सत्यशोधक चळवळीसाठी सन 1966 ते 1977 अशी 11 वर्षे देता आली. त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाव्दारे नवी दिल्लीची ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिमस, पुण्याची महाराष्ट्र राज्य मुस्लिम महिला परिषद, मुंबईची मुस्लिम सामाजिक परिषद व कोल्हापूरची मुस्लिम शिक्षण परिषद असे काही कार्यक्रम आयोजित केले व ते यशस्वी करून दाखविले.

सन 1974 ते 1977 या काळात हमीद दलवाई किडनीच्या विकाराने अधूनमधून आजारीच होते. या आजारपणाच्या काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी चांगल्या प्रकारे मंडळाचे कार्य केले. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय चालीरीती व परंपरा, रूढी यांच्या विरूध्द लढण्याचा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा निर्धार होता. अशा अनेक प्रश्नापैकी सर्वात अन्याय करणारी गोष्ट म्हणजे स्त्रियांना तलाक देण्याची पध्दत. तलाक संबंधी मंडळाची भूमिका स्पष्ट होती. पती व पत्नी यांना एकत्र राहणे कठीण होत असेल तरी त्यांनी आपल्या स्वभावांना कोठेतरी मुरड घालून तडजोड करावी आणि आपले भावी आयुष्य सुखी करण्याचा प्रयत्न करावा. यात केवळ पती-पत्नी यांच्या सुखाचा प्रश्न नसून त्यांची मुले, आई-वडिल यांचे ही प्रश्न असतात म्हणून पती-पत्नीने तलाक घेण्याचे टाळावे असे स्पष्ट मत मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे होते. दलवाईंच्या आजारपणाच्या काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी 2 नोव्हेंबर 1975 रोजी कोल्हापूरात मुस्लिम तलाक पीडित स्त्रियांची पहिली परिषद घेतली.[36] या परिषदेसाठी एकंदरित 100 महिला उपस्थित होत्या. पुढे पुण्यामध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जिहाद-ए-तलाक परिषद घेतली. यावेळी 500 पेक्षा अधिक स्त्रिया या परिषदेत हजर होत्या. त्याचप्रमाणे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी चिपळूणलाही तलाकपीडित महिलांची परिषद घेतली. यावेळीही मोठ्या संख्येने स्त्रिया हजर होत्या. यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्याची गाऱ्हाणी ऐकून घेऊन त्यांना मार्गदर्शन केले व न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. हमीद दलवाईंच्या आजारपणाच्या काळात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तलाकच्या प्रश्नावर ‘‘जिहादे तलाक परिषदा’’ ठिकठिकाणी घेऊन यशस्वी केल्या. त्याचे दलवाईंना फार समाधान वाटले. यावेळी त्यांनी माझ्यामागे चळवळ संपणार नाही ही पावतीच आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.[37] हमीद दलवाईंनी 27 मार्च 1977 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकारणीच्या सदस्यांना मुंबईत नेपियन सी रोडवर शरद पवारांच्या रामटेक बंगल्या वरील औट हाऊस मध्ये मिटींग साठी एकत्रित बोलविले. यावेळी मंडळाचे महाराष्ट्रातील सर्व सभासद हजर होते. त्यावेळी हमीद दलवाईंनी मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले यांच्या हाती मंडळाच्या

सेक्रेटरीपदाच्या राजीनाम्याचे पत्र दिले. परंतु यावेळी मंडळाच्या कार्यकारणीने त्याला विरोध केला. परंतु त्यावेळी दलवाई यांनी कार्यकारणीची समजुत काढताना सागितले की ''माझी प्रकृती अशी आहे. आग्रह  करू नका. तुम्ही मंडळाचे काम चालू ठेवा.'' पुढे 3 मे 1977 या दिवशी हमीद दलवाईंचा मृत्यु झाला.[38] व मुस्लिम सत्यशोधक मंडळ नेतृत्वहीन झाले. त्यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने सामुदायिक नेतृत्व स्वीकारले.

दरम्यान मुस्लिमांतील पुरोगामी चळवळीच्या इतिहासात एक महत्वपूर्ण घटना घडली. सनातनी मुस्लिमांनी (तबलीग जमातीसारख्या संघटनांनी) मुस्लिम स्त्रियांनी चित्रपट पाहायचा नाही. म्हणून त्यांच्यावर सिनेमाबंदी लादली. थोडक्यात ''मुस्लिम स्त्रियांनी सिनेमा पाहू नये'' असे फतवे काढून महाराष्ट्रात व कर्नाटकात एक फॅड सुरू केले होते. त्याविरूध्द मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्या रजिया पटेल यांनी जळगावात व नजमा बांगी यांनी विजापुरात मुस्लिम स्त्रियांचे बंड संघटित केले. व्यक्तिगत व संघटित लढा देऊन मुस्लिम स्त्री जागृत असल्याची पावती दिली.[39]

मुस्लिमांमध्ये कुटुंबनियोजनाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे कुटुंबावर व स्त्रीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. यासाठी अमरावतीमध्ये व सर्व विदर्भात वजीर पटेल यांनी कुटुंबनियोजन शिबिरे आयोजित करून शस्त्रक्रिया पार पाडल्या. विदर्भात वजीर पटेल यांनी सुरू केलेले मुस्लिमांतील कुटूंब नियोजनाचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे.[40] 26 डिसेंबर 1977 रोजी अमरावतीमध्ये विदर्भातील 700 स्त्रियांची जिहादे तलाक परिषद घेण्यात आली.[41] त्यामध्ये तलाक, कुटूंबनियोजन आदी प्रश्नांवर चर्चा होऊन जनजागृती करण्यात आली. कुटूंबनियोजनाच्या कार्याबद्दल वजीर पटेल यांना पुरस्कृत करण्यात आले.

कोल्हापूरात मुस्लिम समाज प्रबोधन संस्था उभी राहिली. घटस्फोटित स्त्रियांना उद्योग द्यावा म्हणून तलाकपीडित महिला उद्योगाची स्थापना सन 1989 ला झाली. भाजी भाकरी केंद्र, पेपर फाईल, लोणची, पापड, कॉम्प्युटर ट्रेनिंग यासाठी महाराष्ट्र फौंडेशनचे साहय्य मिळाले. हमीद दलवाईं इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्युटमध्ये धर्मनिरपेक्षतेवर महाराष्ट्रात मुंबई, नागपूर, यवतमाळ, सातारा, चिपळूण, पुणे येथे चर्चा सत्रे आयोजित करण्यात आली. कोल्हापूरात सुरू असलेले तलाकपीडितांच्या मुलांचे वस्तीगृह या संस्था ही दलवाईंच्या कार्याची परिणती होती. पुढची पायरी म्हणजे महाराष्ट्रात उभे राहत असलेले विधायक कार्य. हमीद दलवाईंच्या बरोबर काम करणारी मंडळीच आज या कामात रस घेताना दिसतात.

हमीद दलवाईंच्या मृत्युनंतर मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या हुसेन जमादार यांनी सन 1983 च्या प्रजासत्ताकदिनी कोल्हापूरच्या विक्रमनगरात तलाकपीडित महिलांच्या मुलांसाठी वस्तीगृह सुरू केले.[42] प्रत्यक्षात

त्यांनी या मुलांची सोय आपली घरी आपल्या कुटुंबीयासमवेत केली होती. या वस्तीगृहाच्या मदतीसाठी जयंत वालावलकर यांची 'बहुरूपी' नावाची नाट्यनिर्मिती संस्था यांनी, सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते व समाजवादी कार्यकर्ते निळु फुले यांनी 'राजकारण गेलं चुलीत' या नाटकाचे प्रयोग देऊन निधी उपलब्ध करण्यास मदत केली.[43] खरे तर हमीद दलवाईंच्यानंतर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामाची दिलेली पोहोच पावती आहे असे म्हणावे लागेल.

### 5.2.3 शाहबानो प्रकरण :-

पुरोगामी मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या संदर्भात आणखी एक महत्वाची घटना घडली आणि ती घटना म्हणजेच शाहबानो पोटगी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल होय. शाहबानो प्रकरणाचा इतका गाजावाजा होण्याचे कारण म्हणजे शाहबानोच्या पतीने मोहमद अहमद खानने आपल्या या प्रकरणात 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' लाही ओढले होते.[44]

सन 1932 मध्ये शाहबानो या मुस्लिम स्त्रिचा विवाह मोहमद अहमद खान याच्याशी झाला. अहंमदखान यांनी वकिलीचे शिक्षण इंदूरमध्ये पूर्ण करून, तेथील न्यायालयात ते वकिलीचा व्यवसाय करत होते. या दरम्यानच्या काळात शाहबानोची पूर्व परवानगी न घेताच त्यांनी आपली आते बहिण खलिदा हिच्याशी दुसरा विवाह केला आणि 45 वर्षांच्या वैवाहिक सहजीवनानंतर शाहबानोच्या नवऱ्याने तिला घराबाहेर काढले. सन 1979 मध्ये तिला तलाक दिला. यावेळी शाहबानोचे वय 60 वर्षाचे होते. पती मोहमद अहंमद खानने घराबाहेर काढल्यानंतर तिने इंदोरच्या कोर्टात पोटगीसाठी अर्ज दाखल केला. यावेळी न्यायालयाने तिला दरमहा रू. 25/- पोटगी ठरवून दिली. याविरूध्द शाहबानोने मध्यप्रदेश हायकोर्टात गाऱ्हाणे मांडले. तेव्हा नवऱ्याचे उत्पन्न पाहून न्यायालयाने रू. 179.20 इतकी पोटगी ठरवून दिली. या निकालाविरूध्द मोहमद अहंमद खान स्वतःच सुप्रीम कोर्टात गेला. दरम्यान 125 कलमाला जोडून असलेल्या 127 (3) ब कलमाप्रमाणे तलाकपीडितेस मेहेर व इद्दतकाळात पोटगी दिल्यास नवऱ्याची जबाबदारी संपते. या युक्तीवादाने बरेच निकाल येत होते. याचाच आधार घेऊन मोहमद अहंमद खानने पोटगीपासून सुटका मागितली. तेव्हा 23 एप्रिल 1985 रोजी सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री. यशवंतराव चंद्रचुड यांनी मोहमद अहंमद खानचा युक्तिवाद अमान्य करताना म्हंटले की - "योग्य निर्णय करताना ग्रंथातील पुरावे पुरेसे नाहीत आणि तलाकपीडित स्त्रीस तिच्या उपजिविकेसाठी घटस्फोटित पतीकडून दरमहा काही निश्चित रक्कम पोटगी म्हणून मिळण्याचा मुस्लिम स्त्रीस हक्क आहे." असा क्रांतिकारक निकाल दिला.[45] मुस्लिम सत्यशोधक मंडळाने या क्रांतिकारक ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले.

इंदोरच्या शाहबानो हिच्या खटल्यातील फौजदारी कायद्याचे कलम 125 व 127 (3) ब हे कलम असे सांगते की घटस्फोटानंतर स्त्रीला तिच्या पतीकडून उदरनिर्वाहाचा खर्च मिळण्याचा पूर्ण हक्क आहे. खरे तर या कायद्याच्या चौकटीतील प्रश्नाला मोहमद अहंमद खान व मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने ओढून ताणून शरीयतमध्ये घुसडायचा प्रयत्न केला. त्याच्या दाव्या प्रमाणे विवाह व घटस्फोट ही शरीयतची अंगे आहेत. म्हणून याबाबतीत शरीयत हाच अखेरचा शब्द मानला पाहिजे. आपल्या प्रतिपादनात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने पुढे असेही म्हंटले होते की, फौजदारी कायद्याचे कलम 125 म्हणजे शरीयतवर उघड उघड आक्रमण अशा स्वरूपाचे आहे. म्हणून समान नागरी कायद्याशी संबंधित असलेली 44 वी घटनादुरूस्ती करण्यात यावी आणि त्यानुसार असे मान्य करण्यात यावे की, हे कलम मुसलमानांना लागू करण्यात येणार नाही.[46] मात्र विवेकी न्यायाधिशांनी दोन्ही पक्षाच्या प्रतिपादनाचा स्वीकार करून आपल्या निकालात असे स्पष्ट केले की, फौजदारी कायद्याचे कलम 125 म्हणजे शरीयतमध्ये हस्तक्षेप नाही. समाजाला अशा प्रकारच्या शोषणातून मुक्त करण्यासाठी समान नागरी कायद्याची आवश्यकता आहे. आपल्या घटनेने राजकारणाच्या निर्देशक सिध्दांतामध्ये या कायद्याची तरतुद करून ठेवली आहे. यामुळे आता सरकारने हा कायदा लागू करण्याचे आपले कर्तव्य पूर्ण करण्यात हयगय करू नये.[47]

शाहबानोच्या पोटगी प्रकरणामध्ये तलाकपीडित मुस्लिम स्त्रीला तिच्या नवऱ्याकडून पोटगी मिळावी असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. या निर्णयाविरूध्द मुसलमानांनी ठिकठिकाणी मोर्चे काढण्यास सुरूवात केली. आमच्या व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप होतो आहे म्हणून हा सुप्रीम कोर्टाचा निकाल रद्द करा अशी मागणी मूलतत्ववादी मुस्लिम संघटनाकडून देशभर होऊ लागली. मध्यप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, पं. बंगाल येथे मुल्ला मौलवी रस्त्यावर आले. त्यानिमित्त हिंसाचार झाला. महाराष्ट्रात मुंबईत हाजी मस्तानच्या नेतृत्वाखाली दोन लाख मुसलमानांचा एक मोर्चा निघाला.[48] त्यात सर्वोच्च न्यायालयाचा निषेध करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी मुंबईत मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला की, सुप्रीम कोर्टाच्या निकालाविरूध्द सर्व मुस्लिम समाज आहे. खरे पाहता या निकालाने आपल्याला अभय मिळाल्याची भावना मुस्लिम स्त्रीमध्ये होती. बहुसंख्य मुस्लिम समाज या निर्णयाचे स्वागत करताना दिसत होता. पण उघड बोलण्यास अजून धजावत नव्हता. शाहबानो केसमध्ये सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत व या निर्णयाला विरोध करणाऱ्या ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डासारख्या प्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुंबईच्या 'मराठा मंदिरा'त 17 ऑगस्ट 1985 रोजी 'पोटगी बचाव परिषद' आयोजित केली होती.[49] या परिषदेचे उद्‌घाटन प्रा. मुमताज रहिमतपुरेंनी केले. प्रा. एस. टी. लोखंडवाला प्रमुख पाहुणे होते. यावेळी गोव्यातील पुरोगामी मुस्लिम कार्यकर्त्यां रशिदा मुजावर, समाजवादी नेत्या मृणाल गोरे, मुमताज रहिमतपुरे, डॉ. शमुन

लोखंडवाला, सय्यद भाई, हुसेन जमादार, श्रीमती मेहरून्निसा दलवाई आदिनीं परिषदेस मार्गदर्शन केले. सर्वप्रथम शाहबानोचा मंडळातर्फे सत्कार करण्यात आला व पुरोगामी मुस्लिम या पोटगी समर्थन विशेषांकाचे मृणाल गोरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच शाहबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालाचे स्वागत करणारा ठराव या परिषदेत एकमताने संमत करण्यात आला. यावेळी डॉ. शमुन लोखंडवाला यांनी इस्लामच्या इतिहासातील दाखले देत इस्लाममध्ये असलेल्या मूळ चांगल्या कल्पना मुल्ला मौलवींनी कशा भ्रष्ट केल्या हे मांडले व मुस्लिम स्त्रीस पोटगी मिळण्याचे समर्थन केले. परंतु ही सभा 'ऑल इंडिया युथ कॉन्फरन्स'च्यां सनातनी मुस्लिम भगिनींनी उधळायचा प्रयत्न केला. व बाहेर नारी की रक्षा कौन करेगा ? इस्लाम करेगा, मुस्लिम सत्यशोधक मुर्दाबाद अशा घोषणा सनातनी मुस्लिम भगिनींच्या बंधुनी देवून मोठ्या प्रमाणात निदर्शने केली.[50] वि. म. तारकुंडे यांच्या मते शाहबानो प्रकरणाबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालास मुल्ला-मौलवींनी केलेला विरोध हा मूलतत्ववादातुन प्रकट झालेला दिसतो. ते म्हणतात, "Fundamentalism becames socially harmful when orthrodox beliefs and practices are imposed on others who do no necessarily cherish them"[51] कर्मठ रूढी व परंपरा ज्यांना मान्य होत नाहीत अशा लोकांवर जेव्हा त्या लादल्या जातात तेव्हा मूलतत्ववाद सामाजिक दृष्ट्या अधिक हानिकारक ठरतो.

मूलतत्ववादाच्या संदर्भात इराण या देशाचे उदाहरण देऊन वि. म. तारकुंडे म्हणतात, "This was the case in Iran when the power of the state was visted with Khomeni who used it for executing large number of non-beivers and enforcine several orthodox custom." [52] जेव्हा इराणमध्ये सर्व सत्ता खोमेनी यांच्या हाती एकवटली होती तेव्हा या सत्याची प्रचिती आली. खोमेनी ने ज्यांना मान्य नाही अशा लोकांवर आपली धर्म तत्वे लादली आणि त्यांच्यावर अनेक कर्मठ रूढी पालनाची सक्ती केली.

तारकुंडे यांनी मूलतत्ववादी कर्मठ रूढी परंपरांचे पुनरूज्जीवन करून त्या इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतो ही बाब खोमनींच्या उदाहरणाव्दारे दर्शविली आहे.

शाहबानो पोटगी प्रकरणाच्या निकालानंतर कट्टरपंथी मुस्लिमांनी ज्याप्रकारे विरोध केला तो पाहिल्यावर मनस्मृतीची आठवण होते. हजारो वर्षांपूर्वी स्त्रीविषयी मनुचे जे विचार होते तेच विचार शाहबानो प्रकरणी कर्मठ मुल्ला मौलवींचे सन 1985 मध्ये असलेले दिसतात. आपण सर्वच मनुचे वंशज आहोत त्यामुळे जग कितीही बदलले तरी ते प्राचीन संस्कार आपल्या मनाच्या कप्प्यात कुठे ना कुठे कायम आहेत. म्हणूनच भारतीय उपखंडात आजही स्त्रीला दुय्यम दर्जाचे नागरिकत्व आहे. भारतीय उपखंडातील मुस्लिम समाज स्वतःला कितीही पुरोगामी

समजत असला व हिंदू समाजाच्या तुलनेने आपण क्रांतिकारक आहोत असे जरी त्यास वाटत असले तरी हे सर्व निव्वळ ढोंग आहे. इस्लामी शरियतचे प्रत्येक वेळी गुणगान केले जाते. परंतु संपूर्ण इस्लामी समाज आजही सरंजामी मनोवृत्तीतून मुक्त झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. महिलांचे हक्क पायदळी तुडविणे आणि त्यांना गुलामासारखे वागविण्याच्या बाबतीत मुस्लिम पुरूष हिंदू पुरूषांहून एक पाऊल पुढेच असलेला दिसतो. शाहबानो खटला वरवर मुस्लिम शरियत व धर्मतत्वांशी संबंधित वाटत असला तरी वस्तुतः तो मुस्लिम पुरूषांच्या वर्चस्वास आव्हान देणारा आहे. हा फक्त शरियतचा प्रश्न असता तर मुस्लिम वैयक्तिक कायदा व शरियतचे उल्लंघन करणारे जे कायदे आहेत त्यास का विरोध करत नाहीत हा प्रश्न निर्माण होतो.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 1 व 2 मे 1985 ला पुण्याच्या हमालभवनात राज्यव्यापी सामाजिक परिषद भरवली होती. यावेळी या परिषदेसाठी मंडळाचे कार्यकर्ता मोठ्या प्रमाणात हजर होते. त्यावेळी तेथे समान नागरी कायदा, उर्दूचा प्रश्न, तसेच जातीय दंगली, जातीय संघटनांना वाढती बळकटी इत्यादी विषयांवर चर्चा झाली. [53]

### 5.2.4 शरीफा मुल्ला प्रकरण :-

कोल्हापूरातील अकबर मोहल्ल्यात 20 जानेवारी 1985 रोजी शेख यांचा मुलगा हरून-रशिद शेख यांच्याबरोबर नबीसाब मुल्ला ची मुलगी हिचा विवाह मुस्लिम समाजातील पंचा समक्ष झाला होता. परंतु मुलीकडून कोणतीही चूक नसताना किंवा काहीही दोष नसताना अचानकपणे मुलगीला कुष्ठरोग झाला आहे, तिच्या चेहऱ्यावर डाग आहेत. मुलगी आम्हाला पसंत नाही. असे सांगून तिला तलाक देणेचे ठरविले. यातून मुलीचे जीवन उद्ध्वस्त होण्याची वेळ आली तेव्हा नबीसाब मुल्ला ने आपल्या मुलीचे प्रकरण प्रथम मुस्लिम जमातीतील सरपंचाकडे नेले परंतु यावेळी योग्य तो न्याय मिळाला नाही तेव्हा मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते एन. आर. बारगीर यांनी नबीसाब मुल्ला यांना व शरीफाला घेऊन हे प्रकरण मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडे नेले. तत्पूर्वी हरून रशिद शेखने शरीफाला पोस्टाने तलाक पाठवून दिला. यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे सेक्रेटरी हुसेन जमादार यांनी शरीफा मुल्ला व तिच्या कुटुंबियाशी बोलून 17 जून 1985 रोजी एक पत्रकार परिषद घेतली व शरीफा मुल्ला हिच्या छळाची कहाणी (बातमी) मांडली[54] व दिनांक 18 जून 1985 रोजी बिंदू चौकातील महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास शरीफा मुल्ला हिच्या हस्ते हार घालून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले. यावेळी शरीफा मुल्ला सह तिचे वडिल नबीसाब मुल्ला, तिची बहिण व कोल्हापूर शहरातील इतर भागातील मुस्लिम महिला या उपोषणाच्या ठिकाणी येऊन त्यांनी शरीफा मुल्लास पाठिंबा दिला. या सर्व मुस्लिम महिलांचे एक मत होते आणि ते म्हणजे जुबानी तलाकची अनिष्ट प्रथा शासनाने कायदा करून बंद करावी.[55]

18 जून 1985 रोजीच सायंकाळी पावणेपाच वाजता हे उपोषण सोडण्यात आले. त्यानंतर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोर्चाने जाऊन जिल्हाधिकारी दिनकरराव पाटील यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनात जुबानी तलाक पध्दती बंद करावी, घटनेच्या 44 व्या कलमाची अंमलबजावणी करावी, समान नागरी कायदा करावा, मुस्लिम महिलांना संरक्षण द्यावे इत्यादी मागण्या करण्यात आल्या होत्या. या मोर्च्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळाबरोबरच भारतीय महिला फेडरेशन, युथ फेडरेशन, समाजवादी महिला सभा, महिला दक्षता समिती, मास मुव्हमेंट इत्यादी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी या मोर्च्यासाठी दलितमित्र बापूसाहेब पाटील व कोरगांवकर ट्रस्टच्या सुचेता कोरगांवकर ह्या उपस्थित होत्या.[56] खरे तर शरीफा मुल्ला प्रकरणामुळे मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मुस्लिम समाजाचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. ही आपणास मंडळाची यशस्वी वाटचाल म्हणावी लागेल.

यानंतर शरीफा मुल्लाने मेहरून्निसा दलवाईंच्या मदतीने शिक्षण पूर्ण केले. व कोल्हापुरातील आंतर भारती शिक्षण मंडळात नोकरी मिळविली व मुस्लिम सत्यशोधक मंडळातील राजेश पेंढारीशी विवाह केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळ व कोरगावकर ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित केलेल्या या तलाकपिडीत स्त्रीच्या नोंदणीपध्दतीच्या विवाहास आमदार बाबुराव धारवाडे, दै. सकाळचे संपादक अनंत दीक्षित, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी व इतर सामाजिक संस्थाचे कार्यकर्ते उपस्थित होते.[57]

थोडक्यात कोल्हापूर येथे शरीफा मुल्ला या तरूणीवर झालेल्या अन्यायकारक तलाक विरोधात मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 18 जून 1985 रोजी बिंदू चौकात एक दिवसाचे उपोषण केले व मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी अकबर मोहल्ल्यातील जमातीने शरीफा मुल्लाला पाठिंबा देऊन तिच्या सासरच्या लोकांवर बहिष्कार टाकला होता. असंख्य मुस्लिम महिलांनी बिंदू चौकात येऊन या अन्यायाच्या विरोधात आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या होत्या हे मंडळाचे मोठे यश मानावे लागेल.

### 5.2.5 तलाक मुक्ती मोर्चा :-

शरीफा मुल्ला उपोषणप्रसंगी कोल्हापूरातील जनसामान्यांच्या मिळालेल्या उत्स्फूर्त पाठिंब्याने उत्साहित होऊन शाहबानोच्या निकालाच्या बाजूने जनमत तयार करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 3 नोव्हेंबर ते 18 नोव्हेंबर 1985 या दरम्यान सर्व महाराष्ट्रभर 'तलाक मुक्ती मोर्चा' या ऐतिहासिक जन अभियानाचे आयोजन केले. परंतु समान नागरी कायद्याला मुस्लिमांचा होणारा विरोध लक्षात घेता मंडळाने फक्त 'जबानी तलाक बंद करा', 'मुस्लिमांना व्दिभार्या प्रतिबंधक कायदा लागू करा', व 'मुस्लिम स्त्रीला पोटगीचा हक्क मिळालाच पाहिजे' या

तीन प्रमुख मागण्या केल्या. एस.टी. बसमधून 40 मुस्लिम सत्यशोधक यापैकी 22 स्त्रिया व 9 मुले यांनी कोल्हापूर येथून सुरूवात करून मिरज, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, आंबेजोगाई, परभणी, नांदेड, चंद्रपूर, अमरावती, बुलढाणा, जळगांव, अहमदनगर या ठिकाणी मुस्लिम जनसामान्यांशी संपर्क साधत फिरले, प्रत्येक ठिकाणी जाहीर सभा, पोस्टर प्रदर्शन, जिल्हाधिकाऱ्यांना मोर्चाने निवेदन देणे आणि शक्य तेथे मुस्लिमांच्या बैठका असा कार्यक्रम पार पाडला. हुसेन जमादार व मेहरून्निसा दलवाई यांनी या तलाक मुक्ती मोर्चा चे संघटन व नेतृत्व केले.[58]

तलाक मुक्ती मोर्चा मध्ये प्रा. मुमताज रहिमतपुरे, आप्पासाहेब इनामदार, महंमद गौस नाईक, प्रा. ऐनुल आत्तार, समीर मणियार, प्रा. मेहबुब, सोमजाल, अजमतबी सय्यद, कु. शहनाज सय्यद, कु. शबनम सय्यद, बिलालबी जमादार, सलिम मुलाणी, अब्दुल मजीद नगारजी, शाहमुद्दीन सय्यद, वहिदा बँडवाले, बाबासाहेब मुलाणी, रमेजाबी मुलाणी, दिदार शेख, हमीद तांबोळी, अय्युब आत्तार, जमीर अत्तार, सुहेल जमादार, फारूक सय्यद, फिरोज नायकवडी, शरीफा मुल्ला, लैला पटेल, फातिमा आत्तार, हव्वाबी आत्तार, शानुरबी शेख, आय. एन. बेग इत्यादी व्यक्ती सहभागी होत्या.[59]

3 नोव्हेंबर 1985 रोजी तलाक मुक्ती मोर्चा निघण्यास सिध्द झाला. कोल्हापूरात बिंदू चौकात सभा होऊन मोर्चाला सुरूवात झाली. पुढे हा मोर्चा मिरजेत गेला त्यावेळी मोर्चाला मोठा विरोध झाला. मिरजेत काळे झेंडे व निषेधाचे फलक लावले गेले होते. पुढे हा मोर्चा सोलापूर, उस्मानाबाद येथे पोहचला. उस्मानाबाद येथील या मोर्चाच्या सभेत बोलताना तत्कालीन उस्मानाबादचे उपनगराध्यक्ष श्री. यशपाल सरवदे म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी आहे असे सांगितले होते तेव्हा शरियत ही माणसासाठी असल्याने ती मानवाच्या कल्याणासाठी असली पाहीजे. असे विचार व्यक्त केले.[60]

या मोर्चाला अहमदनगर, जळगाव, परभणी, नांदेड याठिकाणी ही मोठ्या प्रमाणात विरोध झाला. अहमदनगरला तर दहा हजार मुस्लिमांचा जमाव मोर्चावर चालून आला. दगडफेक केली, एस. टी. बसची नासधूस करण्यात आली. परंतु पोलीसांनी या चाळीस सत्यशोधकांना संपूर्ण संरक्षण दिले. श्रीरामपूर व नाशिक येथे मोर्चा जाऊच शकला नाही. तर औरंगाबादेत तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी मोर्चास जिल्हाबंदी घातली होती. या जिल्हाबंदी विरूध्द रजिया पटेल यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देणारी याचिका सादर केली. तेव्हा न्यायालयाने ही बंदी बेकायदेशीर ठरविली. सरकारच्या या निर्णयाविरूध्द न्यायालयात जाऊन बंदी उठवल्यावर औरंगाबाद मध्ये तलाक मुक्ती मोर्चा चे आयोजन करून शहरात सरस्वती भुवन सभागृहात एक सभा घेतली. या सभेच्या अध्यक्षा श्रीमती रजिया पटेल होत्या. या सभेत बोलताना डॉ. हबिबुद्दीन म्हणाले, ‘‘जातीयवादी गैरप्रचार रोखण्यासाठी सरकार कधी पुढे येत नाही, परंतु चांगल्या व न्याय मागण्यांसाठी लढणाऱ्यांना बंदी घालण्यास सरकार

पुढे येते ही गोष्ट निषेधार्ह आहे.''[61] तसेच ते शाहबानो प्रकरणाचा गाजावाजा करणाऱ्यांना उद्देशून म्हणाले, ''आज जिल्हा न्यायालयात रोज अनेक पोटगीचे दावे मुस्लिम महिला दाखल करत असून मुस्लिम वकिलच या महिलांना न्याय मिळवून देतात. तेव्हा आजच या निर्णयाविरूध्द ओरड करण्याचे कारण नाही.''[62] थोडक्यात डॉ. हबिबुद्दीन यांनी आपल्या भाषणातून सरकारवर तर टिका केलीच त्याचप्रमाणे तलाक मुक्ती मोर्चाने मुस्लिम स्त्रियांच्या पोटगीचा व समान नागरी कायद्याचा मुलभूत प्रश्न उभा केल्याचे त्यांनी नमुद केले व मुस्लिम समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला.

औरंगाबाद येथील सभेतच श्रीमती रजिया पटेल आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या, ''सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा आदर करणाऱ्याविरूध्द सरकार कायद्याचा बडगा उभारते. ही विसंगती असून या मुस्कटदाबीचा निषेध साऱ्यांनी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. गुलाम राष्ट्रातील स्वातंत्र्य लढे पराभूत होतात, म्हणून गुलामगिरी अमर राहील असे आपण मानणार आहोत काय ? दहा उठाव फसतील परंतु शेवटी गुलामगिरी संपणारच आहे.''[63] रजिया पटेल यांनी तलाक मुक्ती मोर्चाला बंदी घालण्याचा निर्णय हा लोकशाही विरोधी असून जातीयवादी शक्तीचे हात बळकट करणारा आहे. तेव्हा मुस्लिम समाजातील लोकांनी पुढे येऊन पुरोगामी विचारांचा स्वीकार करावा व आपल्यावरील गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न करावा असे मत व्यक्त केलेचे दिसून येते.

ठिकठिकाणी एवढ्या तणावपूर्ण वातावरणात देखील आपली गाऱ्हाणी घेऊन अनेक स्थानिक तलाकपीडित मुस्लिम स्त्रीया मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी येत होत्या. अमरावतीत तर 500 स्थानिक मुस्लिम स्त्रिया तिथे काढलेल्या मोर्चात सामील झाल्या.[64] तलाक मुक्ती मोर्चा ची महाराष्ट्रातील व देशातील सर्व प्रसारमाध्यमांनी या मोर्चाची योग्य दखल घेतली. ज्या ज्या ठिकाणी हा मोर्चा गेला होता तेथील सर्व पुरोगामी संघटनांनी या मोर्चाला सर्वतोपरी सहाय्य केले. परंतु या तलाक मुक्ती मोर्चा घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते ज्या ज्या ठिकाणी गेले. तेव्हा त्या ठिकाणच्या जनसंपर्कामुळे त्याच्या लक्षात आले की, धार्मिक, सनातनी, राजकीय पुढारी अर्धसत्य माहिती सामान्य जनतेला देतात. हमीद दलवाई नास्तिक होते. त्यांनी स्वतःच्या मृत्युनंतर दहन करून घेतले त्यामुळे ते काफीर आहेत, असा प्रचार सनातन्यांनी केल्यामुळे या तलाक मुक्ती मोर्चाला विरोध होत होता. परंतु मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा तत्वतः धर्म, अस्तिकता याला कधीही विरोध नव्हता. मंडळाचे कार्यकर्ते हुसेन जमादार यांनी विक्रमनगर येथे मशीद उभी केली. तसेच मंडळाचे इतर कार्यकर्ते नमाज अदा करत होते. खरे तर आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये कोणीही आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे रहावे, अशी मंडळाची भूमिका होती. परंतु हमीद दलवाईंनी मुस्लिमांमधील मागासलेपण, धर्मांधता व वाईट रूढी यावर कडाडून टीका केली होती. त्यामुळे

दलवाईंचे ते स्वतंत्र विचार सनातन्यांना पेलत नव्हते. परंतु मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नावर जनजागृतीचे उद्दिष्ट तलाक मुक्ती मोर्चामुळे निश्चित गाठले गेले असे म्हणावे लागेल.

पुढे नागपुरात विधानसभेचे अधिवेशन सुरू झाल्यावर 16 जानेवारी 1986 रोजी विधानभवनासमोर तलाक मुक्ती मोर्चाने एक दिवसाचे धरणे धरले. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लजचे जनता पक्षाचे आमदार ॲड. श्रीपतराव शिंदे, डॉ. भा. ले. भोळे, डॉ. रूपा कुलकर्णी, छात्र युवा संघर्षवाहिनी चे कार्यकर्ते यांनी मोठे सहकार्य केले. नागपूर येथे छात्र युवा संघर्षवाहिनीच्या कार्यकर्त्यांनी मुस्लिम समाजातील प्रश्नावर सौ. विमलाबाई जठार सभागृहात जाहीर सभा ठेवली होती. यावेली डॉ. बाबा आढावांनी एकूण मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाची आवश्यकता व त्याची दिशा मांडून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास पाठिंबा दिला होता.[65] या एकदिवशीय धरणे आंदोलनासाठी मुंबईहून मेहरून्निसा दलवाई, तलाकपीडित लैला पटेल, कोल्हापूरहून निजाम मुलाणी, हाशमुद्दीन सय्यद, आयेशा जमादार, आय. एन. बेग, नगरहून समीर मणियार, जळगावचे भाऊ रायसोनी व भिकचंद शर्मा, उस्मानाबादचे बशीर तांबोळी, बाबामियॉ बॅडवाले, मुमताज रहिमतपुरे अशा व्यक्ती हजर होत्या त्यावेळी शिवाजीराव पाटील निलंगेकर हे मुख्यमंत्री होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.[66]

यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्यापुढे आपले मत मांडताना सांगितले, आम्ही मुस्लिम समाजात जनजागरणाचे, प्रबोधनाचे कार्य करीत आहोत. परंतु मुस्लिम समाजातील सनातन्यांचा आमच्या या कार्याला विरोध आहे. खरे तर कोणत्याही समाजातील सामाजिक, सुधारणांना त्या त्या वेळी विरोध होत असतो. तेव्हा या विरोधाला किंवा दबावाला बळी पडून राज्य व केंद्र शासनाने सनातन मुस्लिमांच्या अनुनयाची भूमिका घेऊ नये असे विचार मांडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी तलाक मुक्ती मार्चाने केलेल्या जनजागरण अभियान कार्याची प्रशंसा केली. व मुस्लिम स्त्रियांच्या व्यथा पंतप्रधानाकडे मांडण्याची ग्वाही दिली. अशा रितीने कोल्हापूर ते नागपूर जाणाऱ्या तलाक मुक्ती मोर्चाची 16 जानेवारी 1986 रोजी नागपुरात सांगता झाली.

शाहबानो पोटगी निकालानंतर देशभरातील मुस्लिम समाजातील जातीयवादी संघटनांनी या निकाला विरोधी जनमत तयार करण्याचे प्रयत्न चालवला होता. या सनातनी मुस्लिमांनी हा निकाल म्हणजे धर्मात हस्तक्षेप आहे. अशी भूमिका घेऊन लाखो मुस्लिमांना त्यांनी रस्त्यावर उतरविले. त्याचा परिणाम असा झाला की तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी पोटगीचा अधिकार रद्द करणारे तलाक हक्क संरक्षण विधेयक आणायचे ठरवले.

भारतीय दंडविधान संहिता कलम 125 मधून मुस्लिमांना वगळणारे नवे विधेयक 20 फेब्रुवारी 1986 ला काँग्रेस सरकार मांडणार आहे. असे माजी खासदार प्रमिलाताई दंडवते यांच्याकडून समजल्यानंतर मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते तलाक हक्क संरक्षण विधेयकला विरोध करण्यासाठी दिल्लीस जाणेचे ठरविले.[67]

तलाक मुक्ती मोर्चा अभियानाचा भाग म्हणून 21 व 22 फेब्रुवारी 1986 रोजी सुमारे 35 मुस्लिम स्त्रिया यापैकी 22 स्त्रिया तलाकपीडित होत्या.[68] व 15 कार्यकर्ते मुस्लिम महिला (तलाक हक्क संरक्षण) विधेयकास विरोध करण्यासाठी दिल्लीत पंतप्रधान राजीव गांधी, त्यावेळचे राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग व त्यावेळेचे कायदामंत्री अशोक सेन यांना भेटले व मुस्लिम महिला हक्क संरक्षण विधेयकास विरोध दर्शविला. याच वेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नजमा हेपतुल्ला यांची देखील भेट घेतली. यावेळी प्रमिलाताई दंडवते व श्री. मधु दंडवते यांची मोठी मदत झाली. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्त्यांनी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याशी जवळजवळ एक तास चर्चा केली. त्यावेळी राजीव गांधीनी आश्वासन दिले की ‘‘आम्ही जे करू ते तुमच्या फायद्याचे करू’’ तसेच मंडळाचे कार्यकर्ते राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांना भेटले तेव्हा झैलसिंग यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना ‘‘तुम्ही माझ्याकडे येण्याऐवजी मुल्ला-मौलवींकडे का जात नाही ?’’ असे विचारले त्यावेळी मंडळाचे कार्यकर्ते त्यांना म्हणाले ‘‘आम्ही मुल्ला-मौलवींकडे का जायचे ? आम्ही भारतीय आहोत. आपण आमचे सरकार आहात. आपण आमचा अधिकार आम्हाला द्या. सरकार आमच्याकडून तो काढून घेऊ पाहत आहे. त्याला तुम्ही विरोध करा.’’ अशी विनंती केली, परंतु मंडळाच्या या प्रयत्नाला यश आले नाही. व मुस्लिम विधेयक 25 फेब्रुवारी 1986 रोजी लोकसभेत मांडले गेले.[69] याच्या निषेधार्थ काँग्रेसमधील एक सच्चे मुस्लिम पुरोगामी नेते उर्जा राज्यमंत्री अरिफ मोहंमद खान यांनी 25 फेब्रुवारी 1986 रोजीच मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

मुस्लिम महिलांसाठी हा काळा दिवस होता, यामुळे 125 व्या कलमातून मुस्लिम महिलांना वगळण्यात आले व पोटगीचा तिचा हक्क काढून घेण्यात आला. तलाकपीडितेची जबाबदारी वक्फ बोर्ड व माहेरकडील नातेवाईक यांच्यावर सोपविण्यात आली. दारिद्र्याने पिचलेला मुस्लिम समाज आपल्या तलाक पीडित नातेवाईक स्त्रीची जबाबदारी कशी घेणार ? यामुळे मुस्लिम स्त्री निराधार झाली. तिला कायद्याचे संरक्षण राहिले नाही. यावेळी सरकार मुंबईमध्ये निघालेल्या मुस्लिम प्रतिगाम्यांच्या एक लाखाच्या मोर्चाच्या दडपणाला बळी पडले व मतांच्या राजकारणासाठी मुस्लिम स्त्रिचा बळी घेतला गेला. मुस्लिमांच्या मतांवर डोळा ठेवूनच मुस्लिम महिला विधेयक पास झाले होते. सरकारने हे विधेयक पास केल्यानंतर मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मुस्लिम समाजातून होणारा

विरोध मोठ्या प्रमाणात वाढला. याला मुख्यत्वेकरून दोन कारणे होती. मुस्लिमांची धर्मांधता, कोणत्याही सुधारणेला धर्मामध्ये होणारी ढवळाढवळ म्हणून विरोध करणे व मुस्लिम राजकारण्यांनी स्वार्थासाठी केलेला त्याचा वापर.

सन 1986 च्या एप्रिल महिन्यात जनवादी महिला, महिला दक्षता समिती, ऑल इंडिया वुमेन्स फेडरेशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ इत्यादी संघटनांच्या वतीने सुमारे दोन हजार मुस्लिम महिला महाराष्ट्र, राजस्थान, बंगाल, तामिळनाडू, केरळ, मध्यप्रदेश, कर्नाटक, आसाम अशा विविध प्रांतातून एकत्र आल्या व त्यांनी मुस्लिम महिला (तलाक हक्क संरक्षण) विधेयक मागे घेण्याच्या मागणीसाठी मोर्चा व निदर्शने करून राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निवेदने दिली. यावेळी शाहबानो प्रकरणामध्ये असलेले ॲड. डॅनियल लतिफ व पुरोगामी मुस्लिम नेते माजी उर्जा राज्यमंत्री अरिफ मोहमद खान यांच्या वकिल पत्नी तसेच मेहरून्निसा दलवाई व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.[70]

धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय चालिरिती, परंपरा व रूढी याविरूध्द लढण्याचा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा निर्धार होता. अशा अनेक प्रश्नापैकी सर्वात अन्याय बाब म्हणजे स्त्रियांना तलाक देण्याची पध्दत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाविषयी गैरसमज पसरविला जातो की मुस्लिम सत्यशोधक तलाकच्याच विरूध्द आहेत. खरे तर तलाकच्या विरूध्द मंडळ आहे हे फक्त अर्ध सत्य असलेले दिसते. त्यातील सत्य एवढेच की कोणाही अगदी क्षुल्लक कारणांवरून तलाकच्या हक्काचा वापर करू नये. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची ही भूमिका दिसून येते. मंडळाचा खरा लढा तलाकविरूध्द नसून स्त्रियांना तलाक देण्याची जी अन्याय पध्दत आहे त्या पध्दतीविरूध्द होता. मुस्लिम सत्यशोधक मंडळ धर्माचे आदत आणि इबादत असे सरळ दोन भाग मानतो व त्यातील आदतचा भाग परिवर्तनीय असला पाहीजे असे मंडळाचे स्पष्ट मत होते. महंमद पैगंबरां विषयी आदर, सद्भाव दाखवून मंडळाचे असे म्हणणे होते की काळाबरोबर मानवी व्यवहार, कायदे बदलत असतात, नीती-अनीतीच्या संकल्पना बदलत असतात. नवीन नवीन मानवी मूल्यांची नवीन काळाशी सुसंगत अशी उभारणी करावी लागते. त्यासाठी आजच्या काळातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी 7 व्या शतकातील अरबस्तानातील चालीरितीवर आधारित शरियतचा कायदा उघडण्याची गरज नाही. तर आधुनिक काळात निर्माण झालेल्या समस्यांची उत्तरे नवीन सामाजिक जाणिवेने वैज्ञानिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून शोधली पाहीजेत आणि म्हणूनच स्त्रीला जर तलाक द्यायचाच असेल तर त्यासाठी काझी (मुल्ला मौलवी) यांचेकडे न जात आधुनिक राज्य व्यवस्थेने निर्माण केलेल्या कोर्टात जावे, तेथे आरोप सिध्द करावेत, मगच घटस्फोट व्हावा.

या आधुनिक जगात स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. सर्व स्वातंत्र्याचा भोक्ता एकटा पुरूष ही भावनाच चूक आहे. केवळ धर्मात सांगितले आहे, तो आमचा हक्क आहे, त्यात बदल म्हणजे आमच्या धर्मात

ढवळाढवळ अशी भूमिका असणाऱ्या प्रतिगाम्यांना जग कोठे चालले आहे हेच माहीत नसावे. जगातील अनेक मुस्लिम राष्ट्रांनीही नवीन काळाशी सुसंगत असे कायदे तयार केले आहेत. तेथे शरियतचे कायदे चालत नाहीत. आधुनिक मूल्यांना अनुसरूनच संपूर्णपणे नव्हे पण निदान काही प्रमाणात तरी नवीन कायदे चालतात. मुस्लिम समाजात तलाक हे एक मजेचे खेळणेच बनले होते आणि त्याचा दुरूपयोग करून मुस्लिम समाजातील कित्येक महिलांचे जीवन उध्दवस्त होत होते म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळाने तलाक मुक्ती मोर्चाचे जनअभियान चालवून समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तसेच मुस्लिम नेत्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन इस्लामच्या नावाखाली होणारा हा अनाचार थांबवावा, त्याचप्रमाणे जर एखादा समाज असले प्रकार बंद करू शकत नसेल तर सरकारने पुढाकार घेऊन त्यांना आळा घालावा असे मत मंडळाचे असलेले दिसून येते.

**5.2.6 समान नागरी कायदा :-**

भारतात मुस्लिम महिलांच्या प्रश्नांविषयीची चर्चा सन 1970 पासून सुरू झाली. पुणे येथे हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही समाजातील पहिली सुधारणावादी व पुरोगामी चळवळ सुरू केली. मुस्लिम व्यक्तीगत कायदा हा स्त्रियांवर अन्याय करणारा असल्यामुळे तो रद्द करून समान नागरी कायद्याची मागणी करणे, हे या चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट होते. हीच भूमिका घेऊन डिसेंबर 1971 मध्ये पुणे येथे पहिली मुस्लिम महिला परिषद घेण्यात आली. या परिषदेत प्रथमच समान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली व त्याला विरोध करण्यासाठीच जानेवारी 1973 मध्ये 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'ची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून हा विषय सतत चर्चेत आहे. आता इतरही संस्था, विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते ही समान नागरी कायद्याची मागणी उचलून धरत आहेत.

मुस्लिम समाज एकेकाळी देशाचा राज्यकर्ता समाज होता. मुस्लिम अल्पसंख्य असूनही राज्यकर्ते म्हणून त्यांनी बहुसंख्यांकांकरिता कायदे बनवले हे करीत असताना मुस्लिम समाज जेते म्हणून या देशात वावरत होता व बहुसंख्य समाजाकडे जित म्हणून बघण्याची मुस्लिम समाजाची दृष्टी होती. पुढे ब्रिटिशांनी हा देश मुस्लिम व हिंदू यांच्याकडून आपल्या ताब्यात घेतला तरी ब्रिटिशांच्या फोडा व झोडा या धोरणाप्रमाणे त्यांनी मुस्लिमांना जवळ केल्यामुळे मुस्लिम समाज एका संरक्षक छत्राखाली वावरत होता. पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाले. व भारताने लोकशाही पध्दत स्वीकारली व धर्माधिष्ठित राज्य ही कल्पना फेटाळून लावली. मुस्लिम समाज अजून भूतकाळातच वावरत आहे. लोकशाहीची कल्पनाच मनापासूनच स्वीकारण्यास तयार नाही. एकेकाळचे आम्ही राज्यकर्ते, कायदा करण्याचा अधिकार आमचा, लोकशाहीत बहुमत हिंदूचे, ते आमच्यावर अन्याय करणारेच कायदे बनवणार अशी त्यांची समजुत असलेने मुस्लिम समाज समान नागरी कायद्याला विरोध करीत आहे. त्याच्या मते

दारूल इस्लाम व दारूल हर्ब या दोन धर्मकल्पना महत्वाच्या आहेत. दारूल इस्लाम म्हणजे जेथे मुस्लिम राज्य आहे, त्यांच्याच हातात सत्ता आहे असे राज्य व दारूल हर्ब म्हणजे जेथे मुस्लिम राज्य नाही. सत्ता त्यांच्या हातात नाही असे राज्य.[71] दोन्ही कल्पनांचा मुस्लिम समाजावर अजूनही पगडा मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या मते भारत हे बहुसंख्य हिंदूचे राष्ट्र आहे. येथे लोकशाही असली तरी बहुमत हिंदूचेच आहे. त्यामुळे येथे दारूल इस्लाम नसून दारूल हर्ब आहे व दारूल हर्बला मुसलमानांसाठी कायदे बनविण्याचा अधिकारच पोहोचत नाही. याचाच अर्थ येथील लोकशाही पध्दत स्वीकारण्यासाठी मुस्लिम मन तयार नाही. दारूल हर्बच्या सबबी खाली समान नागरी कायद्यास विरोध करणाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही की निधर्मी घटना आणणाऱ्या एका देशाचे नागरिक म्हणून आपण राहत आहोत व भारत कधीही दारूल इस्लाम होण्याची थोडीशी देखील शक्यता नाही. शिवाय दारूल हर्ब, दारूल इस्लाम या दोन्हीही कल्पना आता कालबाह्य झाल्या आहेत.

मुसलमानांच्या मते कुराण हा आमचा दैवी धर्मग्रंथ आहे. त्यातील आज्ञा अल्लानेच पैगंबरा करवी आमच्यासाठी पाठविल्या आहेत. त्यात बदल करण्याचा मानवाला अधिकार नाही. जर कायदे बनवायचे असतील तर ते कुराणातील आज्ञेविरूध्द असता कामा नये. आणि सर्व नागरिकांना समान नागरी कायदाच निर्माण करावयाचा असेल तर एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे आमच्या शरियतचा जो कायदा आहे तो सर्व नागरिकांना लागू होईल अशी तरतुद करावी. असा घातक युक्तिवाद ते करतात परंतु त्यांचा हा युक्तिवाद फोल आहे.

समान नागरी कायद्यास विरोध करणारा आणखी एक विचार प्रवाह आहे तो अज्ञानावर आधारित आहे. त्यांच्या मते मुसलमानांना भारतीय घटनेने अल्पसंख्याकांचे खास हक्क म्हणून काही हक्क बहाल केलेले आहेत. त्यानुसार आम्हांला आमची संस्कृती, भाषा व धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. याचाच अर्थ शरियतच्या कायद्याचा उगम आमच्या धर्मातच असल्याने तो अबाधित ठेवण्याचे स्वातंत्र्य आम्हांला घटनेने दिलेले आहे. त्यात बदल करण्याचा, त्याऐवजी दुसरा कायदा आमच्यावर लादण्याचा सरकारला अधिकारच नाही. जर त्यांनी आमच्या शरियतचा कायदा बदलून भारतातील सर्व नागरिकांना समान कायदा केला तर आमचा धार्मिक व सांस्कृतिक हक्क हिरावला जाईल.[72]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आजपर्यंत अनेक प्रश्न हाती घेऊन त्याविरूध्द आवाज उठवून मुस्लिम समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. हिंदू व मुस्लिम यांच्यात घटनेने समानता यावी व मुस्लिम स्त्रीला आवश्यक ते अधिकार प्राप्त व्हावेत यासाठी समान नागरी कायद्याची मागणी मंडळ अनेक मार्गांनी आजतागायत करीत आहे. मुस्लिम जातीयवादा बरोबरच हिंदू जातीयवादावर कोरडे ओढून तथाकथित ढोंगीचे बुरखे फोडणे हे कामही मुस्लिम सत्यशोधक मंडळ करीत आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने जाहीर सभा, मोर्चे, धरणे, सत्याग्रह, निवेदन प्रदान करणे इत्यादीव्दारे मुस्लिम स्त्रियांनी बुरखा पध्दती सोडावी, शिक्षण घेऊन नोकऱ्या कराव्यात, स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी मुस्लिम सत्यशोधक वैयक्तिक संघटनात्मक पातळीवर प्रयत्न करत आहे. वैचारिक पातळीवर मुस्लिम सत्यशोधक मंडळाने इस्लामबरोबरच भारतातील मुस्लिम परंपरेच्या काटेकोर मूल्यमापनास राष्ट्रीय आणि चिकित्सक भूमिकेतून चर्चा करण्याची मुहूर्तमेढ रोवली. या चळवळीने भारताच्या घटनांतर्गत मूल्यांसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी जे योगदान दिले आहे त्याचे मूल्यमापन समाजकार्य संशोधन पध्दतीने करता येणे अवघड आहे. याचा अर्थ अशा प्रकारच्या मूल्यमापनात मुस्लिम सत्यशोधक मंडळ कमी पडते असा नाही. वैचारिक क्रांतीचा वेग नैसर्गिक उत्क्रांतीपेक्षाही कमी असतो हे लक्षात घेऊन या चळवळीचे मूल्यमापन झाले पाहीजे. हमीद दलवाईंना आपण घडवीत असलेल्या या वैचारिक क्रांतीची संपूर्ण व्यावहारिक कल्पना असल्यामुळे त्यांनी आपल्या कार्यास जिहाद[73] म्हणजे धर्मयुध्द असे म्हटले आहे.

भारतासारख्या परंपराप्रधान देशातील बहुतांश सामाजिक व सांस्कृतिक व्यवहार त्या त्या धर्मांच्या रूढ पध्दतीनुसारच चालतात. उलट आपल्या राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला स्वायत्त व्यक्ती मानून तिला स्वातंत्र्य दिले आहे. एखादी व्यक्ती स्वतःच्या विकासासाठी अशा स्वातंत्र्याचा उपयोग करीत असेल तर तिला तसे वागण्याची मुभा आपली राज्यघटना देते. प्रत्यक्षात सर्व व्यक्ती आपल्या जाती व धर्माच्या विरोधात भूमिका घेऊ शकतातच असे नाही. अशा वेळी त्या व्यक्तीला कायद्याचे संरक्षण असेल तर स्वतःच्या अधिकारासाठी लढताना तिला बळ मिळते. धर्माची भूमिका व व्यक्तीचे हक्क या पेचात राज्यघटनेने व्यक्तीची बाजू घेतली आहे. पण समान नागरी कायद्याअभावी ते शक्य होत नाही. प्रत्येक व्यक्तीला तिच्या इच्छेनुसार आणि धर्माने नव्हे तर कायद्याने घातलेल्या मर्यादेत जगता यावे यासाठी समान नागरी कायदा असणे आवश्यक आहे.

या देशातील सर्व धर्मांचे नागरिक पुरूष-स्त्रियांसह समान आहेत असे ज्यावेळी मुस्लिम धर्मीय मान्य करतील त्याच वेळी मुस्लिमांच्या वृत्तीत बदल घडून आला असे सिध्द होईल. अर्थात हे करण्यासाठी मुस्लिम समाजाला आपल्या तर्कदुष्ट मागण्या सोडल्या पाहीजेत व त्यांना शरियतच्या कायद्यापेक्षा या देशाची घटना पवित्र वाटली पाहीजे. तसेच संसदेचे सार्वभौमत्व मान्य करून सर्वांना समान लेखणारा समान नागरी कायदा व्हावा अशी मागणी आता मुस्लिमांनीच केली पाहिजे. त्यामुळे देशातील निरनिराळ्या नागरिकांमधील दरी कमी होईल व एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागेल. एकमेकांविषयीचा अविश्वास कमी होईल व सर्व नागरिकांना एकाच पातळीवर आणले गेल्याने समानतेच्या व लोकशाहीचा पायावर देशाच्या नव उभारणीचे कार्य करणे सुलभ होईल.

असा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा विश्वास असलेने अनेक ध्येयांपैकी समान नागरी कायदा हे एक ध्येय मंडळाने उराशी बाळगले व त्याच्यासाठी मोठा आग्रह धरला होता.

## 5.3 मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर :-

मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे प्रयत्न 26 सप्टेंबर 1987 रोजी यशस्वी झाले. या दिवशी कोल्हापूरात मुस्लिम सत्यशोधक मंडळाने ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स भरवली. 26 व 27 सप्टेंबरला झालेल्या राष्ट्रीय पातळीवरच्या या परिषदेचे उद्घाटन मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती एस. एम. दाऊद यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले "धार्मिक स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीसाठी आहे परंतु या वैयक्तिक स्वातंत्र्याला सार्वजनिक स्वरूपात परिवर्तित करून आपल्यात धर्म, जात, भाषा, प्रांत यासारखे भेदभाव आणणे चुकीचे आहे. कोणत्याही धर्मग्रंथा पेक्षा राज्यघटना श्रेष्ठ आहे, धर्मनिष्ठेपेक्षा राज्यनिष्ठा श्रेष्ठ आहे. भारतीय घटना ही कुराण, बायबलप्रमाणे आहे." [74] अध्यक्षस्थानी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बॅडवाले होते. अब्दुल लतीफ आझमी, सीमा काझी, मोहमद रहिमान खुददुस, प्रा. रहिमान खान, डॉ. के. एस. दुराणी, रशिदा मुजावर, मेहरून्निसा दलवाई, सय्यद भाई, हुसेन जमादार, सारा अबुबकर आदींनी परिषदेस मार्गदर्शन केले. महाराष्ट्रासह दिल्ली, कर्नाटक, बंगाल, आंध्रप्रदेश, गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, बिहार, मध्यप्रदेश, गोवा या बारा प्रांतातून आलेल्या 400 मुस्लिम प्रतिनिधींनी जातीयवादी हिंसाचाराचा विरोध, मुस्लिमांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती, बहुपत्नीत्व, जुबानी तलाक इत्यादींसाठी नव्या कायद्याची मागणी केली. आणि सन 1986 च्या प्रतिगामी कायद्याचा व राजस्थानच्या रूपकंवर सती घटनेचा निषेध इत्यादी विषयांवर चर्चा करून ठराव संमत केले. पुढे देशभरच्या प्रतिनिधीतून ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स ची कार्यकारीणी तयार होऊन कार्यरत झाली. यावेळी लखनऊचे डॉ. प्रमोदकुमार, हैद्राबादचे केशवराव जाधव, दिल्लीचे रेवतीशरण शर्मा, ॲड. सी. आर. दळवी, पन्नालाल सुराणा, बाबा आढाव इत्यादीनीही उपस्थित राहून या परिषदेतील लोकांना मार्गदर्शन केले. या परिषदेचा उद्घाटन कार्यक्रम राजर्षी शाहू स्मारक भवनात पार पडला, तर बाकीचे कामकाज अक्षता मंगल कार्यालयात झाले. त्या ठिकाणास प्रा. मुमताज रहिमतपुरे नगर असे नाव देण्यात आले होते.[75]

ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स कोल्हापूर येथे भरली. त्यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळ भूमिका व उद्दिष्टे या पुस्तकाची उर्दू आवृत्ती दिल्लीचे अब्दुल लतीफ आझमींच्या हस्ते प्रकाशित झाली. या पुस्तकाचे उर्दू भाषांतर हैद्राबादचे रहिमान खूददु यांनी केले होते. या परिषदेच्या काळात 'महिलांच्या समस्या' या विषयावर रशिदा मुजावर (गोवा) रजिया पटेल, सीमा काझी, सीमा मक्की, सारा अबुबकर (कर्नाटक) इत्यादींनी

मार्गदर्शन केले होते. पुढे ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स हेच नाव घेऊन संस्था स्थापन करावी व तिने देशपातळीवर राष्ट्रीय एकात्मता व मुस्लिम समाज प्रबोधनाचे कार्य करावे असे ठरले, व त्यानुसार संस्थेचे अध्यक्ष म्हणून अब्दुल लतीफ आझमी तर सरचिटणीस म्हणून सय्यदभाई व चिटणीस म्हणून हुसेन जमादार अशा मुस्लिम सत्यशोधक व्यक्तींची वर्णी लागली होती. पुढे या संस्थेच्या मुंबई, हैद्राबाद येथे बैठका घेऊन घटना तयार करण्यात आली होती. अशा या ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स या संस्थेने मुस्लिम समाजामध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी व पुरोगामी विचारांचा स्वीकार करावा म्हणून 31 जुलै 1988 मध्ये अहमदाबादला तलाकपीडित महिला परिषद घेतली. सन 1989 मध्ये बेंगलोर येथे व फेब्रुवारी 1990 मध्ये तामीळनाडूत मदुराई येथे व सन 1992 मध्ये पुणे येथे परिषदा घेतल्या होत्या.[76] या परिषदांमध्ये पुरोगामी विचारांच्या नवीन नवीन व्यक्ती त्यात सहभागी होत आहेत व ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्सचे काम मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

यानंतरची महत्वाची घटना म्हणजे ऑल इंडिया प्रोगेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्सची नवी शाखा कर्नाटकात मंगलोर येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या धर्तीवर आधारित 'कर्नाटक मुस्लिम समाज प्रगती मंच' या नावाने स्थापन झाली.[77] यावरून आपणास असे दिसून येते की महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक समाजाचे पुरोगामी विचार देशातील इतरही राज्यांनी स्वीकारण्यास सुरूवात केली. यावरून राष्ट्रीय पातळीवर मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य पोहोचलेले दिसून येते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात 30 व 31 डिसेंबर 1973 रोजी मुस्लिम शिक्षण परिषद घेण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले. हमीद दलवाई परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेस अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, प्रा. ना. गो. कालेलकर, एस. एम. जोशी इत्यादींनी मार्गदर्शन केले होते. या परिषदेस महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून सुमारे 800 मुस्लिम प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी सुमारे 250 स्त्रिया होत्या.[78] या परिषदेत महाराष्ट्रातील मुस्लिमांनी शिक्षणाचे माध्यम म्हणून उर्दू ऐवजी प्रादेशिक भाषेचा अंगीकार करावा म्हणजेच महाराष्ट्रातील मुस्लिमांनी मराठीतून शिक्षण घ्यावे असा ठराव केला होता आणि त्याचेच फलित म्हणजे मुसलमान लेखकासाठी विचारपीठ असावे म्हणून सोलापूर येथे सन 1989 साली मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली.[79] या साहित्य परिषदेची स्थापना करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते विलास सोनवणे यांनी दिली. यावेळी प्रा. फ्रकरूद्दीन बेन्नूर, अजिज नदाफ, फ. म. शहाजिंदे, मुबारक शेख, बशारत अहमद, कवि ए. के. शेख या सर्वांनी एकत्रित येऊन मुस्लिम मराठी लेखकांना एकत्रित आणण्याचे प्रयत्न केले. 1990 मध्ये सोलापूर येथे पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेऊन मुस्लिम मराठी साहित्य चळवळीची सुरूवात केली. आतापर्यंत सात मुस्लिम मराठी साहित्य संमेलने पार पडली आहेत.[80] यावरून

आपणास असे म्हणता येईल मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही 20 व्या शतकातील क्रांतिकारी घटना आहे. इस्लामची ध्येये, धोरणे, काळाशी सुसंगत ठेवून बदलाची प्रक्रिया सुरू करावयास हवी अशी भूमिका हमीद दलवाईंनी घेतली. पुरोगामी विचारांची ही चळवळ नवा विचार घेऊन पुढे आली. त्याप्रमाणेच मुस्लिम मराठी साहित्य परिषदेने पुरोगामी विचारांचा स्वीकार केला व मुस्लिम समाजाला नवा विचार दिलेला दिसून येतो.

महाराष्ट्रातील दुसरी पुरोगामी घटना म्हणजे मुस्लिम ओ.बी.सी. संघटनेची स्थापना. सन 1901 च्या जनगणना अहवालापासून मुसलमानातील जातीचे उल्लेख आणि सर्वेक्षण अस्तित्वात होते. सन 1973 मध्ये प्रा. इम्तियाज अहमद यांनी भारतीय मुसलमानांतील जातीच्या प्रश्नावर ‘मुसलमानांतील जाती आणि सामाजिक स्तरीकरण’ हे पुस्तक लिहून भारतीय मुसलमानांत जातीयव्यवस्था असून मुसलमानांत ओ.बी.सी. आणि मागास जाती-जमाती आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील सर्व मुसलमानांत हिंदू समाजात असणाऱ्या सर्व प्रकारच्या मागास जाती, बलुतेदार आणि व्यावसायिक जाती, भटक्या आणि गुन्हेगार जाती आहेत. सर्व ठिकाणी श्रेणीबध्द जाती आहेत. त्यांच्यात जातीय रचनांचे सर्व गुणधर्म आहेत. काही जाती उच्च आणि काही जाती नीच मानल्या जातात हे दाखवून दिले. आणि त्यातूनच सन 1993 मध्ये रत्नागिरी येथे झालेल्या तिसऱ्या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी मुसलमानातील जातीच्या प्रश्नावर काम करण्यासाठी प्रत्यक्ष चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर, अजीज नदाफ, बशारत अहमद, शब्बीर अन्सारी, विलास सोनवणे इत्यादी मंडळीनी महाराष्ट्रात मुस्लिम ओ.बी.सी. संघटनेची स्थापना केली. या ओ.बी.सी. चळवळीतून महाराष्ट्रात वेगवेगळ्या शहरांतून मुस्लिम ओ.बी.सी. संघटनेच्या शाखा स्थापन केल्या. या चळवळीतून कोल्हापूरात गणी आजरेकर, कऱ्हाडमधून अरिफ बागवान, सांगलीतून डी. जी. फकीर, पुण्यातून गुलाम हुसेन तांबोळी, नागपूरातून जावेद कुरेशी असे तरूण कार्यकर्ते पुढे आले. या सर्वांनी मिळून 1 मे 1994 रोजी जालना येथे असगर अली इंजिनियर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र पातळीवरील परिषद घेतली. जून 1994 मध्ये उस्मानाबाद येथे मेळावा घेतला. 4 सप्टेंबर 1994 रोजी सोलापुरात मुस्लिम ओ. बी.सी. आणि ख्रिश्चन ओ.बी.सी.ची महाराष्ट्र पातळीवरील परिषद घेतली.[81] चळवळीच्या दबावामुळेच महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रात मुस्लिम ओ.बी.सींच्या संबंधाने विचार करायला सुरूवात केली.

स्वातंत्र्य आणि मानवीदृष्ट्या समृध्द व मंगल जीवनासाठी मनुष्याने चालविलेल्या अविरत प्रयत्नांमध्ये कालबाह्य झालेल्या धर्माच्या आदेशांचे पालन करण्याऐवजी त्यांनी बुध्दिप्रामाण्य व शास्त्रीय दृष्टिकोणाची कास धरावी असे पुरोगामी विचार हमीद दलवाईंनी आपल्या मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या आधारे मुस्लिम समाजासमोर मांडले व मुस्लिम समाजात आधुनिक मानवतावादी दृष्टीकोन रूजविण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणेच

महाराष्ट्रातील ओ.बी.सी. चळवळही पुरोगामी चळवळ आहे. कारण महाराष्ट्रातल्या हिंदू धर्मीय ओ.बी.सींच्या बरोबर नाळ जोडण्याचा हा उपक्रम आहे.

**5.4 मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा परिवर्तनशील कार्याचा ठसा :-**

हमीद दलवाई हे इस्लामच्या इतिहासात मार्टिन ल्युथरपेक्षा ही मोठे होते. मुस्लिम समाजात आधुनिक मानवतावादी दृष्टीकोण रूजविण्यास न घाबरणारे असे इस्लामी जगातील पहिले पूर्ण मानवतावादी असे त्यांचे वर्णन करावे लागेल. इस्लामच्या तेराशे वर्षांच्या इतिहासात त्यांच्यासारखा समाजसुधारक झालेला नाही. त्यांचे सर्व सामर्थ्य, त्यांचे विचार, त्यांचे निर्मल चारित्र्य, त्यांची मानवतावादी मुल्यांशी असलेली अव्यभिचारी निष्ठा या सर्वांतून हमीद दलवाईंनी भारतीय मुसलमानांच्यामध्ये प्रबोधनाची सुरूवात करण्याचा एक खंबीर प्रयत्न केला. अशा या हमीद दलवाईंना आधुनिक महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाचा आद्य प्रवर्तक म्हणून ही ओळखले जाईल. कारण कोणतीच अंधश्रध्दा न स्वीकारणारे मूलतः नवे मन आणि त्या मनातील विचार जगासमोर ठेवण्यासाठी लागणारा बंडखोर निर्भयपणा हेच दलवाईंचे सामर्थ्य होते. खरे तर राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांपेक्षा समाज प्रबोधन करणाऱ्यांचे जीवन खडतर असते. त्याला स्वतःच्याच समाज बांधवाकडून फार त्रास होतो. अशा समाजसुधारकांचा संपूर्णपणे शेवट करण्यासाठी त्याचेच बांधव हातात शस्त्र घेऊन उभे असतात. त्या सर्वांना प्रेमाने जिंकून त्यांना नवविचारांची प्रेरणा देण्याचे खडतर काम त्या समाजसुधारकास करावयाचे असते. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर यांचा हिंदू समाजाने छळ केला. त्याप्रमाणे मुस्लिम समाजात आधुनिक उदारमतवादी विचार प्रवाह रूजवित असताना हमीद दलवाईंना सुध्दा अशा छळाला तोंड द्यावे लागले. मुस्लिम समाजातील सनातनी वृत्तीच्या धर्मबांधवांनी त्यांच्यावर अनेक वेळा प्राणघातक हल्ले केले. तसेच ते आजारी असताना त्यांची चौकशीसुध्दा केली नाही. उलट हमीद दलवाईंच्या निधनाची वार्ता समजल्यावर काही ठिकाणी पेढे वाटण्यात आले. पण त्यांच्या त्यागाने मुसलमान समाजातील स्त्रियांची दयनीय अवस्था संपेल व मुस्लिम समाज जास्त निरोगी होऊन भारतीय जीवनाशी एकरूप होईल. जोपर्यंत मुसलमान समाजात बंडखोरीची भावना सामुदायिक रीतीने प्रकट होत नाही तोपर्यंत हा समाज अतिशय दलित, वंचितच राहणार आणि त्यांची जुलुमातून सुटका झाली तर भारतीय एकात्मतेच्या मार्गातील एक अडथळा दूर होईल. या विचारांने प्रेरित होऊन जून 1999 मध्ये मुंबईत 'आवाज-ए-निस्वाँ' या संघटनेने मुस्लिम व्यक्तिगत कायदा या विषयावर राष्ट्रीय परिषद बोलविली होती. या परिषदेत मुस्लिम स्त्रियांसाठी काम करणाऱ्या उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, आंध्र, केरळ, कर्नाटक, पं. बंगाल, गुजरात इत्यादी राज्यातील मुस्लिम स्त्री संघटना सहभागी झाल्या. जवळजवळ 18 राज्यांत अशा संघटना स्थापन झाल्या आहेत.[82]

मंडळाच्या वतीने पुढे नागपूर, हैद्राबाद व कोल्हापूर येथे परिषदा झाल्या व यावेळी निकाहनामा व मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी एक अभ्यास गट नेमला आहे.

सन 2001 मध्ये अमेरिकेमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सर्वत्र दहशतवाद वाढला. त्याचे पडसाद भारतात देखील उमटले. खरे तर अशा वातावरणात समाजसुधारणेचे सर्व प्रश्न मागे पडतात. याचा बळी प्रथमतः स्त्रिया होतात. तालिबान राजवटीमध्ये स्त्रियांवर होत असणारा अन्याय अत्याचार आपणास माहितच आहे. अशा काळात स्त्रियांवर जास्तीजास्त निर्बंध लागत असतात. जसे काश्मीरमध्ये दहशतवादी संघटनेने मुस्लिम स्त्रियांना बुरख्याची सक्ती केली. याचे पडसाद मुंबई, हैद्राबाद येथे थोड्या फार प्रमाणात उमटले गेले. वास्तविक पाहता कुराणामध्ये देखील चेहरा झाकण्यासाठी बुरखा घ्यावा असे म्हंटलेले नाही व बुरखा न घेतल्यास त्यासाठी कोणतीही शिक्षा सुचविण्यात आलेली नाही. मुस्लिम सत्यशोधक मंडळ अशा दहशतीचा निषेध करते. यासाठीच मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 8 व 9 नोव्हेंबर 2001 रोजी कोल्हापूर येथे मुस्लिम हक्क परिषद घेतली.[83] त्यासाठी सर्व भारतातून 150 प्रतिनिधी हजर होते. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रामध्ये सर्वांना पाहीजे ते कपडे घालण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यासाठी कोणी बळजबरी करू शकत नाही. स्वखुशीने कोणी बुरखा घेतला तर आमची हरकत नाही. तसेच बुरखा घेतला पाहीजे अशा प्रकारचा फतवा काढण्याचा अधिकार कोणत्याही संघटनेला नाही. अशा प्रकारचे विचार परिषदेत मांडले गेले.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याची दखल मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डालादेखील घ्यावी लागली. 7 व 8 एप्रिल 2001 रोजी बोर्डाने दिल्ली येथे मुस्लिम महिलांच्या प्रश्नांसाठी एक परिषद आयोजित केली होती. त्यावेळी मंडळाचे कार्यकर्ते हुसेन जमादार, अैनुल आत्तार परिषदेला हजर होते. यावेळी बोर्डाने देखील कयामत पर्यंत शरियतच्या अंतर्गत राहून तलाकचा प्रश्न सोडविण्यास आपण असमर्थ आहोत याची कबुली दिली व तलाक न देण्यासाठी मुस्लिम पुरूषांमध्ये, समाजामध्ये जनजागृतीचे आवाहन केले. यावरून असे दिसून येते की हे मुस्लिम सत्यशोधक समाजाने केलेल्या कार्याचे यश आहे.

मुस्लिम सत्यशोधक चळवळी ने भारतीय समाजाच्या परिवर्तनशील कार्यक्रमात आपला ठसा कित्येक अंगानी उठविला आहे. समान नागरी कायद्याला मुस्लिम समाज विरोध करतो. तो विरोध का करतात व त्यातील फोलपणा पाहूनही प्रश्न संपत नाही तर मंडळाच्या मते खरा प्रश्न निव्वळ समान नागरी कायद्यापुरताच मर्यादित नाही तर हा प्रश्न हा देशातील सहा कोटी मुस्लिमांच्या वृत्तीत बदल घडवून आणल्यानेच संपविता येईल. मुसलमानानी मनापासून लोकशाही मान्य केली तरच ती वृत्ती बदलेल असे मंडळाचे मत होते. समान नागरी कायदा केल्याने देशातील निरनिराळ्या नागरिकांमधील दरी कमी होईल व एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागेल

एकमेकांच्या विषयीचा अविश्वास कमी होईल व सर्व नागरिकांना एकाच पातळीवर आणले गेल्याने समानतेच्या व लोकशाहीच्या पायावर देशाच्या नव उभारणीचे कार्य करणे सुलभ होईल. त्यामुळेच खरी राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या बाबतीत एक पाऊल पुढे पडेल असा मंडळाचा विश्वास असल्याने अनेक ध्येयांपैकी समान नागरी कायदा हे एक ध्येय मंडळाने उराशी बाळगले होते. व तो लवकरात लवकर व्हावा म्हणून मंडळाने समान नागरी कायद्याचा प्रश्न महाराष्ट्रात व आता भारतभरही कसोशीने धसास लावला. तसेच न्यायसंस्थेची सद्सदविवेक बुध्दी जागृत करून मंडळाने कित्येक पुरोगामी निर्णय मिळविले. शेकडो स्त्रियांना पोटगीबरोबरच पोटगीचा हक्कही मिळवून दिला. भारतीय मुस्लिम समाजाने कुटूंब नियोजनाच्या कार्यक्रमाला धर्माच्या नावाखाली विरोध दर्शविला होता. मुस्लिम समाजाला कुटूंब नियोजनाचे महत्व लक्षात येण्यासाठी धर्मभोळ्या लोकांचे अज्ञान दूर करून त्यांना वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी कायदा व प्रबोधन या दोन्हीचा वापर करण्यात यावा असे मंडळाचे मत होते.[84] कायद्याने सक्ती करून कुटूंब नियोजनाचा कार्यक्रम पार पाडावयास हवा तसेच लोकसंख्या वाढीला आळा घातल्याशिवाय देशाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही. तशा सर्वागीण प्रगतीसाठी मुस्लिम समाजाने पण आपला वाटा उचलला पाहिजे. कुटूंब नियोजन करून त्यांनी आपल्या कुटूंबाचे, समाजाचे व पर्यायाने देशाचे हित साधण्यासाठी सहभागी झाले पाहिजे. यासाठी मंडळाने विशेषत्वाने मुस्लिम समाजात कुटुंबनियोजनाचा प्रसार व प्रचार केला.[85]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या अस्तित्वानेच महाराष्ट्रातील हिंदू-मुस्लिम जमातवादाची धार बोथट झाली. मुस्लिम समाजात धार्मिक राहूनही घटनेवर श्रध्दा ठेवणाऱ्या मुस्लिमांची व्यावहारिक प्रतिमा एक पर्याय म्हणून मंडळाने निर्माण केली. स्वतःचे वेगळे अस्तित्व कालबाह्य ठरावे हे मंडळ स्थापनेच्या वेळीच जाहीर करणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाने[86] आपल्या चळवळीचा सांधा पुरोगामी बोहरा चळवळ, इंडियन सेक्युलर सोसायटी, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, स्त्री मुक्ती चळवळ, दलित चळवळ, जनवादी महिला इत्यादी आधुनिक भारतीय चळवळींशी व संघटनांशी सातत्याने जुळता ठेवला. जनसामान्याच्या पातळीवर हिंदू आणि मुस्लिमांतील एकतेस प्रोत्साहन दिले. मंडळाच्या तत्वज्ञानाच्या धर्तीवर काम करणाऱ्या इतर मुस्लिम संघटनांना, व्यक्तींना मुस्लिम सत्यशोधक मंडळाने आपल्या आंदोलनाचे पाठबळ दिले.

मुसलमान समाजात आधुनिक उदारमतवादी प्रवाह सुरू करणे, तरुणांमध्ये चिकित्सक बुध्दी जागृत करणे, परंपरागत रूढींनी जोडलेल्या समाजाचे प्रबोधन करणे. अस्पृष्याहूनही अधिक पीडित अशा गरीब मुसलमानी स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करणे, समान नागरी कायदा करवून घेऊन जाती जमातीतल्या भिंती पाडून टाकणे इत्यादी उद्दिष्टांसाठी मुस्लिम सत्यशोधक समाज महाराष्ट्रात उभा राहिला. यावेळी हमीद दलवाई आक्रमकपणे आपला विचार मांडत. त्याच्या विचारांना व्यावहारिकतेची जोड होती. सत्तर ऐंशीच्या दशकात या चळवळीने जोर

धरला. त्यांना महाराष्ट्राच्या विविध प्रांतातून प्रतिसादही मिळाला पण या चळवळीची बीजं खोलवर रूजू शकली नाहीत. मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील त्रुटी या ह्या चळवळीच्या मर्यादा आणि समस्या ठरल्या. त्यामुळे चळवळीकडे कार्यकर्त्यांचा ओघ मर्यादित राहिला. हमीद दलवाईंनंतर मंडळाच्या तत्वप्रणालीची मीमांसा थांबल्याने तीत स्पष्टता येणे बाजूस पडले.[87] पुरोगामी विचार घेऊन पुढे आलेली ही चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचली नाही. कारण चळवळीचा केंद्रबिंदू धर्मसुधारणा हा होता. धर्मासंदर्भात संवेदनशील असणाऱ्या मुस्लिमांना हा सुधारणावादी विचार फारसा पचनी पडला नाही. हमीद दलवाईंची भूमिका निःसंशय मुस्लिमांना मुख्य प्रवाहात आणण्याची आहे. पण ही भूमिका लोकांपर्यंत नीटपणे पोहोचली नाही. मूलतः हमीद दलवाईंनी आपण नास्तिक आहोत अशी जाहीरपणे भूमिका घेतली. मग अशावेळी सर्वसामान्यांच्या मनात इस्लामला सुधारण्याचा तुम्हाला हक्क कोणी दिला असा प्रश्न निर्माण झाला. दलवाईंच्या काळात काही काळ या चळवळीस व्यक्तिस्तोमाने ग्रासले होते. परंतु पुढे निधी उभारण्याचा बाबतीत, परिपूर्ण कार्यकर्ते उभे करण्याच्या बाबतीत आणि उपलब्ध साधनांचा पुरेपूर वापर करण्याच्या बाबतीत मुस्लिम सत्यशोधक मंडळाला पुरेसे यश मिळाले नाही. हमीद दलवाई आणि त्यांचे सहकारी लोकांपर्यंत आपली भूमिका नीटपणे पोहोचवू शकले नाहीत. त्यामुळे सुरूवातीला सोबतीला असणारे ही पुढील काळात बाजूला झाले. कदाचित कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक मर्यादांचा अडसर या चळवळीस अडथळा ठरला असावा याच कारणाने देशाच्या कानकोपऱ्यांत असलेल्या समविचारी मुस्लिम तरूण तरूणींशी संपर्क साधण्यात मंडळ कमी पडले.

हमीद दलवाईंनी स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक समाजाचे विचार तळागाळापर्यंत जायला हवेत. खरे तरी आततायी सनातन्यांच्या विरोधामुळे मुस्लिम समाजातील प्रबोधनाची ही चळवळ निष्प्रभ होणे या समाजाला आणि देशाला परवडणारे नाही. म्हणून मुस्लिम विचारवंतांनी ही चळवळ पुढे नेली पाहिजे. तसेच मुस्लिमेत्तरांनीही याला हातभार लावला पाहिजे. या देशातील विविध समाजामध्ये एकमेकांबद्दल विश्वास आणि स्नेह भाव निर्माण होण्यासाठी सत्यशोधक चळवळीचा उपयोग निश्चितच होईल. मुस्लिम समाजातील कर्मठ विचारसरणीच्या (सनातनी) लोकांनी मुस्लिम जातीयवादी लोकांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ हे जातीयवाद्यांचे हस्तक आहे हे आरोप प्रथमतः मोठ्या प्रमाणात केले होते. परंतु मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या विरोधकांनी केलेल्या या आरोपाचे खंडन या मंडळाला समाधानकारकरित्या करता आले नाही. तसेच या चळवळीला वृत्तपत्रीय प्रसिध्दी मोठ्या प्रमाणात मिळाली याचे काही परिणाम चळवळीवर झाले. त्याचप्रमाणे तलाकपीडित महिलांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याच्या विधायक कार्यास सर्वोतोपरी प्रोत्साहन मिळाल्याने या चळवळीचे वैचारिक क्रांतीचे मुख्य उद्दिष्ट बाजूला पडल्यासारखे झाले आणि तलाकपीडित स्त्रियांच्या संदर्भात नेमके असे संस्थापक व संघटनात्मक कार्य पुढे

आले नाही.[88] परंतु याबाबतीत यापूर्वी झालेल्या छोट्या मोठ्या प्रयत्नांना ठोस स्वरूप येण्याचे संघटित प्रयत्न आता सूरू झाल्याचे दिसते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक आणि संघटनात्मक मर्यादामुळे ही चळवळ ग्रामीण भागापर्यंत मोठ्या प्रमाणात पोहचू शकली नाही.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे भवितव्य वादातीत आहे. 3 मे 1977 रोजी हमीद दलवाईंचा मृत्यू झाला तेव्हा मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कामाकडे सहानुभूतीने पाहणारी मंडळीसुध्दा मंडळाचे काम चालेल की नाही याविषयी साशंक बनली होती. पण दलवाईंचा विचार एक शक्ती होती तो विचार कधीच नष्ट होणार नव्हता. ती काळाची गरज होती. काळाच्या बरोबरीने पावले टाकणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाची ध्येये आणि उद्दिष्टे सन 1971 च्या डिसेंबरात दिल्लीत भरलेल्या ऑल इंडिया कॉन्फरन्स ऑफ फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम च्या अध्यक्ष स्थानावरून ही उद्दिष्टे हमीद दलवाईंनी नेमकी मांडली होती. व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तिप्रतिष्ठा आणि सामाजिक समता या आधुनिक संकल्पनांच्या अनुषंगाने मुस्लिम समाजात परिवर्तन घडवून आणणे, धर्मातीत राष्ट्राच्या चौकटीत मुस्लिम व गैरमुस्लिमांत सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करणे अशी आपली ध्येये स्पष्ट केली होती.[89] कोणताही समाज नेहमीच स्थितीप्रिय व सनातनी असतो. उलट व्यक्ति स्वातंत्र्य व सामाजिक न्याय या मूल्यांना आधारभूत धरून जुन्या कालबाह्य रूढींविरूध्द बंड करून उठणारी मंडळी ही संख्येंने नेहमीच अल्प असतात. म्हणूनच प्रबोधनाच्या चळवळीत आकडेवारी ही नेहमीच दुय्यम स्वरूपाची असते. खरे महत्व असते ते या चळवळीने दिलेला नवा विचार व दाखविलेली नवी दिशा दोन मुद्यांना धरूनच मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचे मूल्यमापन केले पाहिजे. ही चळवळ फक्त मुस्लिम समाजाच्या नव्हे तर देशाच्याही हिताची आहे. हा विचार सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. खरे तर आपल्या या देशात सवर्णांनी दलित समाजावर अन्याय केलेच पण त्यामुळे त्यांची अस्मिताच हरपली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही अस्मिता निर्माण करण्यासाठी, जागृत करण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. पुढे सवर्णांनी आपली चूक मान्य केली. व सुधारली सुध्दा. तसेच या देशातील मुस्लिम समाजही हिंदू समाजाबरोबर गुण्यागोविंदाने राहण्याच्या मनस्थितीत आहे. पण मुस्लिम जातीयवादी नेतृत्वाच्या मागे तो ही फरफटत जात आहे. त्याला हमीद दलवाई सारखे समन्वयवादी नेतृत्व मिळणे आवश्यक आहे. आणि अशा प्रकारचे नेतृत्व मुस्लिम सत्यशोधक मंडळातूनच मिळू शकेल. यासाठी विज्ञानवादी दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून परिवर्तनशील असा मुस्लिम समाज घडविण्याचा ध्यास घेतलेले सेक्युलर, राष्ट्रवादी व लोकशाही विचारांचे मुस्लिम तरूण व तरूणी यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चळवळी सहभागी झाले पाहिजे.

## 5.5 मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील अध्वर्युचा परिचय :-

हमीद दलवाई यांना कार्यामध्ये अनेक लोकांनी मदत केली. त्यातील काही ठळक अध्वर्युचा परिचय करून देणे क्रमप्राप्त ठरते. या सर्वांनी हमीद दलवाई यांना मुस्लिम सत्यशोधक चळवळीमध्ये जे मोलाचे सहकार्य दिले त्याचा संक्षिप्त परिचय पुढील प्रमाणे देता येईल.

### 5.5.1 अ. भि. शहा (1920 ते 1981) :-

अ. भि. शहा हे इंडियन सेक्युलर सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष होते. गुजरातमधील एका दिगंबर जैन परिवारात त्यांचा जन्म झाला होता. वयाच्या 17 व्या वर्षापर्यंत त्यांनी एक श्रध्दाळू जैन म्हणून आपले आयुष्य व्यतित केले. अ. भि. शहा यांच्यावर नार्वेच्या प्रसिध्द तत्ववेत्ता फिन्यागैर हॉर्थ (Finngeir Hiorth) यांचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात त्याचबरोबर डॉ. एम. एन. रॉय, गोरा आणि पेरियार यांच्याही विचाराचा प्रभाव दिसून येतो.[90] इ. स. 1968 मध्ये इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना अ. भि. शहा यांनी केली. तिच्या माध्यमातून त्यांनी सेक्युलरीझमवर आपले विचार मांडले. अ. भि. शहा हे महाविद्यालयीन जीवनापासूनच एक चांगले वाचक होते त्यांनी Emst Haeckel यांचे The Riddle of the Universe आणि Hyman Leve यांचे The Univese of the Science ही पुस्तके वाचली तेव्हा पासून त्यांचा जैन धर्मातील श्रध्दा वरील विश्वास संपुष्टात आला. त्यावेळी शहा यांनी Winwood Reade यांचे The Martyrdeom of man या ही पुस्तकाचे वाचन केले होते. अ. भि. शहा यांच्यावर मानवेंद्रनाथ रॉय यांचा फार मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. हे सर्वश्रुत आहे. रॉय यांच्या Man and Nature, Science and Superstition, The ideal of Indian women-hood and memoirs of a cat या पुस्तकांचा अ. भि. शहा यांच्यावर प्रभाव होता. रॉय यांच्या विचारासंबंधी स्पष्टीकरण देताना शहा म्हणतात. ‘‘रॉय यांनी नवीन दृष्टी नवीन विचार आणि बौध्दीक स्वातंत्र्य मला दिले. त्यामुळे माझी नकारात्मक विचारसरणी सकारात्मक झाली.’’[91]

अ. भि. शहा यांच्या मते जो पर्यंत माणूस धर्म व धर्माच्या संबंधी श्रध्दा सोडून देत नाही आणि स्वतंत्र विचार करत नाही तो पर्यंत तो धर्मापासून दूर जाऊ शकत नाही. हिंदू-मुस्लिम जातीयवाद्यांशी शहा जन्मभर संघर्ष करत राहिले. शहा यांच्या इस्लामसंबंधी वैचारिक चिकित्सेबाबत लिहिताना डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात ‘‘अ. भि. शहा यांनी इस्लामची वैचारिक चिकित्सा ज्या धाडसाने आणि प्राधान्याने केली तेच धाडस जर मुस्लिम समाजाच्या सामाजिक, आर्थिक प्रश्नांच्या चिकित्सेला वापरले असते तर शहांचे विवेचन अधिक समृध्द झाले असते.’’[92]

भारतीय समाज विज्ञाननिष्ठ व आधुनिक झाल्याशिवाय भारतामध्ये धर्मनिरपेक्षता येणार नाही अशी त्यांची मनोधारणा होती. त्यामुळे ते इस्लामबरोबर हिंदुत्वाचीही समीक्षा करीत होते. शहा यांनी संघटित धर्माचे वैशिष्ट्ये सांगताना Challenges of Secularism (1969) या पुस्तकात म्हंटले आहे. “Organized religion therefore not only units men, it also divides them into Chritians and Heathens. Muslim and Kafirs, Hindu and Mlenchchas, Caste Hindus and Shudras.”[93] संघटित धर्माचे स्वरूप माणसांना एकत्रित आणणे एवढेच नव्हे तर माणसांमध्ये जे भेद आहेत उदा. ख्रिश्चन आणि हिदनस, मुस्लिम आणि काफिर, हिंदू आणि म्लेंच्छ आणि सवर्ण हिंदू आणि शुद्र यांना एकत्रित आणणे होय. कारण ही विभागणी मानवाच्या कल्याणाची नाही. हिंदूना राजा राममोहन रॉय ते महात्मा फुले अशी थोर समाजसुधारकांची परंपरा आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये ही ती सुधारकाची परंपरा आढळून येते. परंतु ती मुस्लिमांमध्ये असावी असा त्यांचा आग्रह होता. शहा इस्लामची चिकित्सा कठोरपणे करतातच परंतु मुस्लिम समाजामध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू व्हावी म्हणून त्यांनी हमीद दलवाई यांनाही सहकार्य केले.

याच संदर्भात शहा यांनी नोव्हेंबर 1968 मध्ये इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीच्या मार्फत त्यांनी आपले विचार मांडताना असे म्हंटले आहे. “The Indian secular society has chosen to work mainly at the level of ideas and communication. It would document and discuss secularist as well as obsurantist trends in Indian society. It would exmine the grivances pertaining to religious freedom and the other handicaps of minority groups with a view to suggesting and canvassing their secular solutions. It would explore ways and means of secularising public life through a change in the prevalent accommodative attitude of the Indian intettigentisia to obscurantism and communalism. And finally, it would expose anomalies and contradictions in our national life which amount to a betrayal of the spirit of the Indian constitution and the United Nations Charter of Human Rights.”[94]

इंडियन सेक्युलर सोसायटी आपले कार्य संपर्काच्या माध्यमातून करेल. भारतीय समाजाच्या प्रगतीमध्ये असंख्य अडथळे आहेत. त्यांची गंभीर दखल घेऊन जे दुर्बल अल्पसंख्याक गट आहेत त्यांना धर्मनिरपेक्षतेची तत्वे समजून देईल. जे विरोध आणि विरोधाभास आमच्या राष्ट्रीय जीवनात आहेत त्यांना दूर करण्याचा प्रत्यत्न करेल आणि युनो व्दारा मानवी हक्काचे जी सनद प्रस्तुत केली गेली आहे तिचा अर्थ समजावून सांगेल.

इंडियन सेक्युलर सोसायटीच्या माध्यमातून शहा यांनी समान नागरी कायद्याची मागणी केली. त्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जातीय दंगली घडून आल्या.[95]अ. भि. शहा यांनी Religion and Society in India हे

पुस्तक सन 1981 मध्ये प्रकाशित केले. शहा यांनी New Quest या पत्रिकेचे संपादनही केले होते. अ. भि. शहा यांनी Seienhtific Method, (1964), Religion and society in India (1981), What ails our Muslims (1981), Challenges to Secularism planning for Democracy and other Essays. ही पुस्तके लिहिली तसेच त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या Prison Diary चे संपादन केले होते.[96]

22 मार्च 1970 रोजी हमीद दलवाई यांनी अ. भि शहा, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर, सय्यद भाई, हुसेन जमादार, अन्वर शेख, मुनीर सय्यद यांच्या मदतीने पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांनी एकत्रित होऊन बरेचसे कार्य केले. अ. भि. शहा यांनी इस्लाम आणि भारतीय मुस्लिमांचे प्रश्न या विषयावर मूलगामी चिंतन केले होते. हमीद दलवाई यांनी इंडियन सेक्युलर सोसायटीच्या स्थापनेमध्ये महत्वाची भूमिका बजावलेली होती.[97] मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातून हमीद दलवाई यांनी आधुनिकता आणि धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला. हमीद दलवाई यांच्या मते धर्म हा मनुष्य आणि देव यांच्यामधील वैयक्तिक संबंध आहे. असे म्हणणारे दलवाई वैयक्तिक जीवनात नास्तिक होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यामध्ये अ. भि. शहा यांनी फार मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आणि हमीद दलवाई यांना व त्यांच्या कार्याला मोलाची मदत केली होती. इंडियन सेक्युलर सोसायटीच्या माध्यमातून कार्य करताना शहा यांनी अनेक पुस्तके लिहिलीच पण त्याबरोबर अनेक पुस्तकाचे प्रकाशनही केले होते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने 27 व 28 डिसेंबर 1971 ला पुण्यात मुस्लिम महिला परिषद घेण्यात आली. मुस्लिम महिलांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांबाबत चर्चा केलेली इस्लामच्या इतिहासातील ही पहिलीच परिषद म्हणावी लागेल. या परिषदेस प्राध्यापक अ. भि. शहा यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले होते. तसेच दिनांक 11 मार्च 1973 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुंबई येथे महाराष्ट्र मुस्लिम सामाजिक परिषद घेतली त्यावेळी इंडियन सेक्युलर सोसायटीने सहकार्य केले व मुस्लिम स्त्रियांना समान हक्कांची कायदेशीर व्यवस्था, मुस्लिमांचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे, समान नागरी कायदा इत्यादी विषयांवर चर्चा होऊन मागण्या करणारे ठराव झाले. त्यावेळी प्रा. अ. भि. शहा यांनी तेथील प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. 30 व 31 डिसेंबर 1973 रोजी कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात सत्यशोधक मंडळाच्या वतीने मुस्लिम शिक्षण परिषद घेण्यात आली. त्यावेळी या परिषदेचे उद्‌घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले व हमीद दलवाई अध्यक्ष होते.[98]

अ. भि. शहा यांनी स्थापन केलेल्या इंडियन सेक्युलर सोसायटीच्या सहकार्याने हमीद दलवाईंना त्यांच्या कामात साहाय्य केले. अनेक मेळावे, परिषदा यास उपस्थित राहून अ. भि. शहा यांनी मार्गदर्शन केले. हमीद

दलवाईंच्या कार्याचे मूल्यमापन करताना अ. भि. शहा म्हणतात, “हमीद दलवाई हे भारतातील नव्हे तर जगातील एकमेवाव्दितीय मुस्लिम विचारवंत होते. इस्लामच्या इतिहासात ते मार्टिन ल्युथरपेक्षाही मोठे होते. आपल्या मानवतावादी श्रध्देचा उद्घोष करावयास न घाबरणारे असे इस्लामी जगातील पहिले ‘पूर्ण मानवतावादी मुसलमान’” असे वर्णन केले आहे.[99] अ. भि. शहा Indian Institute of Education, Pune या संस्थेमध्ये मानद प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. अशा या व्यक्तीने इंडियन सेक्युलर सोसायटीच्या माध्यमातून कार्य केले. परंतु त्यांचा मृत्यु हृदय विकारामुळे सन 1981 मध्ये झाला. त्यावेळी ते Study of Indian Traditions Pune या संस्थेचे संचालक होते.

मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या अनेक सभा परिषदांमधून शहा यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. तलाक पीडित मुस्लिम महिलांच्या मोर्चामध्ये सहभागी होऊन त्यांनी मुस्लिम स्त्रियांना मार्गदर्शन केले होते.

### 5.5.2 नरहर कुरूंदकर (1932-1982) :-

‘गुरूजी’ म्हणुनच नरहर कुरूंदकर मराठवाड्यात प्रसिध्द होते. मराठवाडा त्यांना दुसरा ज्ञानेश्वर म्हणून ओळखत असे. 15 जुलै 1932 रोजी नरहर कुरूंदकर यांचा परभणी जिल्ह्यातील नांदापूर येथे जन्म झाला. शालेय जीवनात कुरूंदकर वर्गातील तासांना बहुधा गैरहजरच असत. परंतु हैद्राबादच्या स्टेट लायब्ररीत ते दिवस दिवस बसत असत. संस्कृती, धर्म, तत्वज्ञान, शिक्षण, वाङ्मय, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांचा त्यांचा व्यासंग फार मोठा होता. रूढी परंपरेंचा विरोधात जाऊन त्यांनी वयाच्या अवघ्या 22 व्या वर्षी प्रभा नावाच्या मुलीशी विवाह केला. दोन गोष्टी साठी त्यांनी आपल्या निष्ठा वाहिलेल्या होत्या. ज्ञान (अध्ययन) आणि प्रबोधन (अध्यापन) हीच आपल्या जीवनाची ध्येय मानून आयुष्यभर कुरूंदकर संन्यासाप्रमाणे वाटचाल करीत गेले. अनासक्ती आणि अपरिग्रह घेऊन ते व्रतस्थ जीवन जगले.

सन 1963 पासून पिपल्स कॉलेज नांदेड येथे ते मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले आणि पुढे त्याच कॉलेजचे प्राचार्यपद त्यांनी अखेरपणे सांभाळले. राज्यशास्त्र, मराठी, इतिहास, संगीत, संस्कृत, काव्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र इत्यादी विषयातील संशोधकांना ते मार्गदर्शन करीत असत. कुरूंदकरच्या मते माणसाने नेहमी तर्कशुध्द पध्दतीने विचार केला पाहिजे आणि विद्वता संपादन करण्यासाठी किंवा जोपासण्यासाठी त्याने सर्वतोपरी प्रयत्न केले पाहीजेत. शोषणरहित समाज निर्मिती करण्यासाठी त्यांनी समाजवादाकडे जीवनाचे नैतिक तसेच ऐहिक तत्वज्ञान सांगणारी विचारसरणी म्हणून पाहिले. कुरूंदकरांनी अनेक पुस्तके लिहिली जी कालानुक्रमे पुढीलप्रमाणे होत. मागोवा (1967), जागर (1969), शिवरात्र (1970), रूपवेध (1971), धार आणि काठ (1971), पायवाट (1974),

छाया प्रकाश (1979), भजन (1981), आकलन (1982), मनुस्मृती (1982) तसेच त्याची काही मरणोत्तर प्रकाशित झालेली काही पुस्तके पुढीलप्रमाणे, ठराविक पत्रे, रससूत्र, अभयारण्य, अन्वय, त्रिवेणी, वारसा, अभिवादन, परिचय, व्यासाचे शिल्प, रंगविमर्श आणि वाटा तुझ्या माझ्या इत्यादी.

नरहर कुरूंदकरांनी आपली मुस्लिम विषयक मते विविध लेखांमधून 1958 ते 1982 या काळात मांडलेली आहेत. हिंदू मुस्लिम प्रश्नाच्या संदर्भात कुरूंदकरांनी भरपूर लेखन केले आहे. बुध्दीवादी, समाजवादी, जडवादी, पुरोगामी, स्वयंप्रज्ञ प्रतिभावंत विचारवंत म्हणून कुरूंदकर प्रसिध्द होते. मुस्लिम जातीयवादाची चिकित्सा करताना कुरूंदकर 'शिवरात्र' या आपल्या पुस्तकात लिहितात, 'इस्लामचा अर्थ शांतता असा आहे परंतु त्या धर्माचा शांततेशी काहीही संबंध नाही. शांततेशी कसला ही संबंध नसलेला हा धर्म इस्लाम म्हणजेच शांतता या नावाने ओळखला जातो.'[100]

सन 1966 नंतर नरहर कुरूंदकर, हमीद दलवाई, अ. भि. शहा आणि असगरअली इंजिनिअर या कठोर इहवाद्यांच्या संपर्कात आले आणि या सर्वांनी इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. हमीद दलवाई, अ. भि. शहा आणि कुरूंदकर यांनी मुस्लिम जातीयवादाची परखड व धारदार चिकित्सा केली आहे. कोणताही स्वार्थ, पूर्वग्रह, पक्षपात किंवा लोकप्रियता यांचा विचार न करता केवळ सत्य आणि राष्ट्रहित या दृष्टीकोणातूनच कुरूंदकरांनी आपली चिकित्सा केलेली आहे. जातीयवादी व जमातवादी राजकारण राष्ट्रीय ऐक्याला व भावनिक एकात्मतेला घातक आहे. धर्मनिष्ठ राजकारणामुळे मूलवाद व कट्टरवाद फोफावतो या संदर्भात त्यांनी आपले विचार परखडपणे मांडले आहेत. कुरूंदकरांची मानवी मूल्यांवर मोठ्या प्रमाणात श्रध्दा होती परंतु मनाने विचारांने ते जडवादी इहवादी व नास्तिकच होते. त्यांनी हिंदू व मुस्लिम जातीयवादाची जी कठोर चिकित्सा केली आहे. तिचा उगम 'मी अस्तिक का नाही' या वैचारिक लेखा मध्ये दिसून येतो. कुरूंदकर लिहितात "माझ्या नास्तिक्याचा उगम माझ्या धर्मग्रंथाच्या वाचनात आहे. ज्याला तुम्ही धार्मिक वाङ्मय म्हणून संबोधता त्यात तुम्हाला नैतिक बनविण्याचे सामर्थ्य नाही. ऐहिक जगातील तुमच्या हितसंबंधाना शक्ती देण्याचे व त्याचे संरक्षण करण्याचे कार्य धर्म करित असतो. तुमचा भोंदूपणा तो झाकून ठेवतो. आणि तुमच्या प्रगतीच्या मार्गात धोंड, अडसर निर्माण करतो, धर्म जर तुम्हाला या सर्व अर्थशून्य बाबी करायला लावत असेल तर तुम्ही त्याला विरोध केला पाहीजे व तुम्ही आस्तिक का व कसे नाहीत हे लोकांना पटवून द्यायला पाहीजे. परमेश्वर मानवात शांततेने जीवन जगण्याची शक्ती निर्माण करीत नाही किंवा नैतिक जीवन जगण्यास मदत करीत नाही."[101] हिच विचारधारा स्विकारून कुरूंदकर जन्मभर वाटचाल करीत राहिले आणि त्यांनी धर्मचिकित्सा केली.

नरहर कुरूंदकरांच्या मते मुस्लिम प्रश्नाचा अभ्यास म्हणजे इस्लामच्या इतिहासापासून आढावा घेणे होय. मुस्लिम प्रश्न, जातीयवाद समजून घेणेसाठी इस्लामचे त्याचे मूळ स्वरूप आणि इस्लामचा इतिहास या सर्व बाबी आवश्यक आहेत. कुरूंदकर म्हणतात खरी अडचण धर्माची नाही ती उघड राजकीय आकांक्षाची आहे. जे लोक संविधानाशी एकनिष्ठा जाहीर करतात पण व्यवहारात मात्र संविधानाच्या गृहित आशयाच्या विरोधी वागतात, त्यांच्या निष्ठेच्या घोषणा एक राजकीय चाल मानल्या जातात.[102]

नरहर कुरूंदकर मुसलमानांना उपदेश करीत की ‘‘शरियतचा आग्रह सोडून समान नागरी कायद्यासाठी तयार व्हा. त्यातच तुमचे हित आहे मुळचे शरियत आज कुठे राहिले आहे ? न्याय देणारा कायदा मुस्लिम स्त्रियांना हवा आहे. यामुळे मुस्लिम समाज आता यापुढे तुमचे ऐकणार नाही. हिंदुस्तान मध्ये शरियतचा 80 % भाग रद्द होऊन गेला आहे. शरियतचा 80 % भाग संपून जाणे ज्यांनी स्वस्थ चित्तांनी सहन केले ते 20 % साठी धमक्या देऊ लागले. तर त्या गंभीरपणे कशा घ्यायच्या.’’[103] या वाक्यावरून कुरूंदकरांनी शरियाबद्दल आपले विचार स्पष्ट केलेले दिसून येतात. अत्यंत निर्भयपणे हजारों कर्मठ मुसलमानांसमोर जमाते इस्लामीच्या व्यासपिठावरून हे विचार मांडले गेले आहेत हे महत्वपूर्ण आहे.

हमीद दलवाई व कुरूंदकर यांची भेट 1966 मध्ये झाली. कधी कधी गंमतीने दलवाई स्वतःस पैगंबर म्हणवित आणि या पैगंबरासह अगदी आरंभापासून असलेले दोन सहकारी म्हणून ते अ. भि. शहा यांचा व कुरूंदकरांचा उल्लेख करीत त्यापैकी अ. भि. शहा दलवाईंना वडिल होते त्यामुळे ते त्यांना अबुबकर म्हणत आणि दुसरा म्हणजे कुरूंदकर दलवाईंना लहान होते त्यामुळे ते कुरूंदकरांना अली म्हणत.[104]

हमीद दलवाईंच्या कार्याचे मूल्यमापन करताना कुरूंदकर आपल्या ‘अन्वय’ या पुस्तकात लिहितात ‘‘हिंदूच्या परंपरेत कर्मकांडा वरील टीकेची परंपरा हजारो वर्षांची आहे. ती आधुनिक काळात धर्म टिकेचे स्वरूप होते. मुसलमानाच्या मध्ये बाराशे वर्षे फक्त धर्माच्या जयघोषाची व समर्थनाची परंपरा आहे. ती आधुनिक काळात धार्मिक राजकारणाचे रूप घेते. इस्लामची कठोर चिकित्सा करण्याचा पहिला प्रयत्नच हमीद दलवाई यांच्यापासून सुरू होतो. स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या एकाही विचारवंताने हे कार्य करण्याचे धाडस दाखविले नाही. मुस्लिम समाजात हमीद दलवाई व हिंदू समाजात लोकहितवादी व महात्मा फुले अपवाद आहेत. अनेक पुरोगामी विचारवंतानी इस्लाम म्हणजे समता, इस्लाम म्हणजे लोकशाही, इस्लाम म्हणजे समाजवाद, इस्लाम म्हणजे राष्ट्रवाद अशा भ्रामक समजुती आग्रहाने सांगण्यात या नेत्यांनी आपला जन्म घालविला. धर्मश्रध्दा व धर्मग्रंथ प्रमाण मानून त्यांचा आशय बदलण्याचा अयशस्वी पण महत्वाचा प्रयोग करणारे मौलाना आझाद तेवढे याला अपवाद

दिसतात. मुस्लिम नेतृत्वच सर्वस्वी धार्मिक दिसते आणि हे धार्मिक नेतृत्व बेजबाबदारपणे जातीय आणि आक्रमक भाषेत बोलते.''[105]

यावरून असे दिसते की कुरूंदकराच्या मते इस्लामची जी कठोर चिकित्सा व्हायला पाहिजे ती मौलाना आझाद व हमीद दलवाई यांचा अपवाद वगळता कोणीच केलेली नाही. हिंदू धर्म आणि इस्लामचा तौलनिक अभ्यास करून कुरूंदकर असे म्हणतात की हिंदू परंपरा आधुनिक काळात धर्म टीकेचे रूप प्राप्त करते तर इस्लाम आजही स्वसमर्थन आणि धार्मिक राजकारणच करतो.

नरहर कुरूंदकर पुढे इस्लामी राजकारणाचे स्वरूप व मांडणी मांडताना असे लिहितात ''मुसलमान समाजातील नेते दोन गटात विभागलेले असतात एक गट उलेमाचा असतो तो स्वतः धर्मश्रध्द असतो व धर्माचा भाग म्हणून राजकारण करतो. स्वातंत्र्यपूर्व काळात लीग मध्ये मौ. नदवी, मौ. दर्याबादी असे अनेक नेते होते. या उलेमांचा गट पाकिस्तान विरोधी होता. पाकिस्तान निर्माण होणे म्हणजे सर्व भारत मुस्लिम वर्चस्वाखाली आणण्याचे स्वप्न सोडून देणे याला त्यांची तयारी नव्हती. उलेमांचा हा गट राष्ट्रीय मुसलमान म्हणून ओळखला जाई. स्वातंत्र्योत्तर काळात या उलेमांना राष्ट्रीय म्हणुन मान्यता मिळाली मुसलमान नेत्यांचा दुसरा गट धार्मिक नसतो. परंपरागत धर्मावर त्यांची श्रध्दा नसते हा गट सोईस्करपणे धर्माचा वापर करत असतो. राजकारणासाठी धर्माचा वापर त्यांना गैर वाटत नाही जिना, मौलाना आझाद हे या प्रवृत्तीचे नेते आहेत. सय्यद अहमद या गटाचे पहिले नेते होते.[106]

वरील विवेचनावरून मुस्लिम राजकारणाचे व समाजकारणाचे खरे स्वरूप नरहर कुरूंदकर उघड करतात. तथाकथित राष्ट्रीय मुसलमांनाचा जो प्रभाव भारतीय मुस्लिमांच्यावर होता. त्याच्या मागील जातीयवादाची कारणमीमांसा कुरूंदकरांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या व्यासपीठावरून अनेक वेळा विशद केली आहे. भारतीय मुस्लिमांच्या मध्ये प्रबोधन व्हावे, भारतीय मुस्लिम समाज सुखी, समृध्द, इहवादी असावा ही कुरूंदकराची शेवटपर्यंत धडपड चाललेली होती. हमीद दलवाईंच्या संपर्कामध्ये आल्यानंतर कुरूंदकरांनी आपले विचार अधिक तर्कशुध्द पध्दतीने आपल्या व्याख्यानातून आणि लेखनातून मांडलेले आहेत. कुरूंदकरांचे बरेचसे लेखन हे मुस्लिम जातीयवाद आणि मुस्लिम समस्या या संदर्भातच झालेले दिसून येते. सन 1966 साली दलवाईंशी भेट झाल्यानंतर क्रमशः मागोवा, शिवरात्र, आणि जागर ही पुस्तके, कुरूंदकरांनी लिहिली, पैकी शिवरात्र हे पुस्तक कुरूंदकरांनी हमीद दलवाईना अर्पण केले आहे. इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लिम सत्यशोधक मंडळ या दोन्ही संस्थाच्या कार्यामध्ये कुरूंदकरांनी केवळ सहभागच घेतला नाही तर आपल्या व्याख्यानामधून आणि लेखनामधून त्यांनी या प्रबोधनपर चळवळीला पाठिंबा दिला. कुरूंदकर अनेक रूपांनी महाराष्ट्राला परिचित आहेत. परंतू आदर्श शिक्षक,

प्राध्यापक, प्राचार्य, साहित्यकारण व समाजकारण ढवळून काढणारा कार्यकर्ता, साहित्य समीक्षक, राजकीय विश्लेषक, समाजचिंतक अशा विविधागांनी त्यांनी ओळख आहेच परंतु लेखक आणि वक्ता या दोन्हीच्या माध्यमातून कुरूंदकरांनी प्रबोधनपर चळवळीसाठी जे योगदान दिले आहे. त्याची तुलना कोणाशीच होऊ शकणार नाही. जवळपास 14 वर्षे कुरूंदकरांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वाटचालीमध्ये आपले योगदान दिलेले दिसून येते.

नरहर कुरूंदकर आणि हमीद दलवाईंचा अगदी आरंभापासून म्हणजे मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करण्याच्या काही वर्षे आधीपासून संबंध होता. हमीद दलवाई आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांच्या मुस्लिम समाजप्रबोधनाच्या कार्यात भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा. अ. भि. शहा यांसारख्या समाजवादी विचारवंत व कार्यकर्त्यांचा पाठिंबा होता त्याप्रमाणे दलवाईंच्या कामात नरहर कुरूंदकर यांनी ही साहाय्य केले होते. नरहर कुरूंदकर महात्मा फुले आणि हमीद दलवाई यांना समोरासमोर ठेवून विचार करताना म्हणतात. ‘‘आधुनिक भारतीय मुस्लिम राजकारणाच्या इतिहासात दलवाईंच्या इतका मूलगामी चिंतन करणारा असा निर्भय विचारवंत दुसरा नाही.’’ [107] कारण महात्मा फुले यांच्या काळात त्यांचे कार्य जितके अवघड होते त्यापेक्षा दलवाईंचे काम काही अधिक प्रमाणात कठिण होते. दलवाईंना मुस्लिम समाजात फारसा पाठिंबा कधीच नव्हता. मुस्लिम समाजातील सर्व राजकीय नेते प्रामुख्याने दलवाईंचा विरोध करीत होते. नरहर कुरूंदकर दलवाई बाबत म्हणतात ‘‘दलवाईंच्या कार्यातील अडचणी लक्षात घेता खऱ्या आश्चर्यकारक गोष्टी दोन आहेत. पहिली आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्यांना आजारी पडून मरण्याची संधी मिळाली, त्यांना हुतात्मा व्हावे लागले नाही. त्यातून अधिक आश्चर्यांची दुसरी गोष्ट म्हणजे तेराशे वर्षांच्या परंपरेविरूध्द बंड करणाऱ्या या बंडखोराला पाहता पाहता तीन चारशे अनुयायी मिळाले.’’ [108]

**5.5.3 सय्यदभाई :-**

भारतीय राज्यघटनेप्रमाणे प्रत्येक नागरिकाला उपासना स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळेच सर्व मुस्लिमांना त्यांच्या श्रध्देप्रमाणे धर्माचे आचरण करता येते. परंतु सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये मुस्लिम समाजाच्या अनेक समस्या आहेत. या समस्यांचे नेमके स्वरूप काय आहे आणि मुस्लिमांची प्रगती होण्यात कोणते अडथळे आहेत याबाबत मुस्लिम समाजाचे प्रबोधन झालेले नाही. हमीद दलवाई यांनी मुस्लिम प्रबोधनाची चळवळ व्हावी यासाठी प्रयत्न केले आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. यावेळी हमीद दलवाई यांना परंपरावादी मुस्लिमांनी प्रखर विरोध केला. हमीद दलवाई यांची बुध्दीवादी पुरोगामी भूमिका, मुस्लिमांनी प्रादेशिक भाषेतच

शिक्षण घ्यावे हा त्यांचा आग्रह आणि मुस्लिम स्त्रियांवरील सर्व निर्बंध दूर व्हावेत यासाठी त्यांनी केलेली आंदोलने यांच्यामुळे काही ध्येयवादी मुस्लिम कार्यकर्त्यांना मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाची आवश्यकता मनोमन पटली. त्यामध्ये अमीर शेख, अन्वर शेख, मुनीर सय्यद, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी, हुसेन जमादार, एन. आर. बारगीर, महंमदगौस नाईक, आय. एन. बेग, मुमताज रहिमतपुरे व त्याचबरोबर सय्यदभाई इत्यादी मंडळी होती. [109]

मुस्लिम समाजात बुध्दिप्रामाण्य विवेकशीलतेचा एक प्रवाह सुरू व्हावा. मुस्लिमांच्या धार्मिक विचारात उदारता येण्यासाठी व त्यांच्या मध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी हमीद दलवाई यांच्या प्रेरणेतून 22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. सय्यद भाई मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे हमीद दलवाई यांच्या बरोबर संस्थापक सदस्य म्हणून कार्य करू लागले. गेली 43 वर्षे मुस्लिम प्रबोधनाचे अव्याहतपणे सय्यदभाई कार्य करित आहेत. सध्या ते मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष, तसेच प्रोग्रेसिव्ह मुस्लिम फोरमचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तलाक पीडित महिलांची परिषद, तोंडी तलाक, शाहबानो केस, समान नागरी कायदा, काश्मीर प्रश्न इत्यादी विविध प्रश्नांवर सय्यदभाई यांनी राज्यांत विविध ठिकाणी परिषदा घेतल्या, तसेच मुस्लिम प्रश्नावर वृत्तपत्रांतून सतत लिखाण त्यांनी केले. या त्याच्या कार्याबद्दल त्यांना नगरकर फाउडेंशन, फाय फाउन्डेशनचे पुरस्कार मिळाले आहेत. सय्यदभाई यांना सुधारक कार गोपाळ गणेश आगरकर हा पुरस्कार जुलै 2012 मध्ये जेष्ठ नाट्यकर्मी आणि विवेकवादी विचारवंत डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते देण्यात आला. या पुरस्काराला उत्तर देताना सय्यदभाई म्हणाले की मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि अंधश्रध्दा निर्मूलन समितीची धर्मचिकित्सेबाबत एकच भूमिका समाज विवेकाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी आपण सर्व एकत्र आहोत. तसेच एकूण कार्याचा आढावा घेताना सय्यदभाई तलाक पिडीत महिलांच्या विषयावर भाष्य करताना म्हणाले "प्रत्येक धर्माने स्त्रीला दुय्यमच स्थान दिले त्यामुळे इतर धर्मातील स्त्रियांप्रमाणे मुस्लिम स्त्रीवर देखील अन्याय झाला, तोंडी तलाक, बहुपत्नीत्व अशा अनेक गोष्टीमुळे तिचे शोषण झाले आहे. केवल भारतातच नव्हे तर जगभरातील स्त्रियांचा हा प्रश्न आहे. माझी छोटी बहिण जाहीरा हिच्या तलाकमुळे मी या प्रश्नाकडे वळलो. हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली लढत असताना समाजातील विरोध सहन करून हे कार्य आज इथवर पोहचले आहे." [110] एकूणच मुस्लिम समाजातील परिस्थितीवर भाष्य करताना सय्यदभाई यांनी मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तनाची गरज आहे असे सांगितलेले दिसते.

सय्यदभाई यांचा जन्म 1936 मध्ये हैद्राबाद येथे झाला. परंतु पुढे त्यांचे आई-वडिल सन 1940 च्या सुमारास पुण्यात स्थाईक झाले. त्याच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यामुळे त्यांना फार काळ शिक्षण घेता

आले नाही. खरे तर हलाखीच्या परिस्थितीने आपण शिक्षण घेऊ शकत नाही यांची जाणीव लहान वयातच त्यांना होती. पण आजही वेगळ्या अर्थाने शिक्षण प्रक्रियेशी त्यांनी स्वतःला जोडून घेतले आहे. आपली शिक्षणाची भूक त्यांनी प्रतिकुल परिस्थितीशी झगडून शिकू इच्छिणाऱ्या मुलांना शक्य ती मदत करून भरून काढली आहे. बालपणीचा काळ हा संस्कारक्षम मुस्लिम कुटूंबात लहानपणी मुलांवर नमाज, कुराणवाचन या बाबींचे संस्कार जाणीवपूर्वक होतात. सय्यदभाईंच्या आयुष्यातील बराचसा काळ आईच्या शिकवणीने व्यापलेला होता. प्रथमतः सय्यदभाईंना धार्मिक पुस्तके वाचनाची सवय होती त्यामुळे आपण पंचगाना नमाजी बनून आपल्यावर तबलिकी (जुन्या) विचारांचा पगडा बसला असे सय्यदभाई सांगतात.[111]

तबलिकी वातावरणाचा प्रभाव होता यांचे वर्णन करताना आपल्या 'दगडावरची पेरणी' या आत्मचरित्रात ते म्हणतात, माझ्यावर मुसलमान आणि इस्लामचा कडवा पगडा बसू लागला. त्यात मी अधिकाधिक रूतु लागलो.[112] धर्माच्या विशिष्ट चौकटीमध्ये वर्तन करण्याची भूमिका याकाळात सय्यदभाईंनी स्विकारलेली दिसते. परंतु तात्या मराठे यांच्या कारखान्यात नोकरी करताना सय्यदभाई यांचा भिन्न धर्मियांशी संबंध आला. या लोकांबरोबर विविध प्रश्नांवर चर्चा होऊ लागली. या चर्चेतून समाजकारण, राजकारण, धर्मकारण समजू लागले. यांचा परिणाम सय्यदभाईंना आपला मुस्लिम कट्टरवाद चुकीचा आहे असे वाटू लागले. कारखान्यातील कामगाराच्या सानिध्यात काम करीत असताना त्यांच्या विचारात मानवी समता, सामाजिक समता, धार्मिक समता ह्या मूल्यांचा ठसा उमटला गेला त्याचप्रमाणे त्यांच्यावर तात्या मराठे, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, साने गुरूजी यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. जुन्या (तबलिकी) धर्मनिष्ठ विचारांनी भारावलेले हे व्यक्तिमत्व पुढे मानवी समतेचा आग्रह धरू लागले. विशेषतः स्त्रियांसंदर्भातील सय्यदभाई यांची भूमिका शुध्द मानवतावादाने प्रेरित आहे.

सय्यदभाई यांच्या आयुष्याचे एकमेव ध्येय जिहाद-ए-तलाक हे आहे.[113] सय्यदभाईचा एकतर्फी तलाक विरोधी संघर्ष एकट्याने सुरू झाला. मुस्लिम समाजातील परंपरेची स्वरूप लक्षात घेतले तर या संघर्षाचे फलित काय असू शकेल यांची साधारण कल्पना सय्यदभाईंना असावी. पण त्यांनी परिणामा संदर्भात आशावादी दृष्टी ठेवून लढा सुरू ठेवला. दीर्घकाळ एकतर्फी तलाकची चळवळ पुढे नेत असताना हमीद दलवाई, बाबा आढाव, एस. एम. जोशी या व्यक्तीबरोबर सेवादलाच्या विचारसरणीचा सिंहाचा वाटा आहे. या बाबत सय्यदभाई म्हणतात, मी दलवाईवादी आहे. दलवाईंच्या सावलीत राहून मी बरेच काही शिकलो. तसाच माझ्यावर समाजवादी विचारांचा पण प्रभाव आहे.[114]

सय्यदभाईंच्या खतिजा बहिणीच्या एकतर्फी तलाकचा प्रश्न आकस्मितपणे उभा राहिला आणि एका संघर्षासाठी त्यांची मानसिक तयारी सुरू झाली. आणि एका संपूर्ण व्यवस्थेशी लढा देण्याचा त्यांनी निर्धार केला.

यांची सुरूवात करताना त्यांनी आपल्या घरातूनच केली. सय्यदभाई यांनी सर्वप्रथम खतिजाच्या चेहऱ्यावरचा बुरखा काढला. हे मुस्लिम धर्माविरूध्द पहिले पाऊल होते.[115] खरे तर ही भविष्यकालीन चळवळीची नांदी होती असे म्हणावयास हरकत नाही. एकतर्फी तोंडी तलाकविरूध्द लढा सय्यदभाईंनी उभा केला. त्यावेळी समाजवादी विचारांचे भाई वैद्य यांनी मुस्लिम समाजातील विविध व्यक्ती व संघटनांशी चर्चा करून एकतर्फी तलाक विरोधातील भूमिका समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. या संघर्षामध्ये पुरोगामी विचारांची कास धरून धर्मांच्या संदर्भात परिवर्तनवादी विचार मांडण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ ही संघटना कार्यरत झाली.[116] यांचा परिणाम सय्यदभाईंनी हमीद दलवाईंची साथ सोडावी असा दबाव आला परंतु या वेळी त्यांनी एकतर्फी तोंडी तलाक विरोधची लढाई व हमीद दलवाई यांची साथ न सोडता आपल्या समाजात जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

मुसलमान समाजावर मुल्ला मौलवींच्या परंपरागत रूढी परंपरांचा फार मोठा प्रभाव आहे. अशावेळी समाज सुधारण्यासाठी समाजाला नवे विज्ञानपर विचार समजून घेण्यासाठी धर्मांध विचारांचा काहीही उपयोग नाही असे सांगण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्या संदर्भात तीव्र प्रतिक्रिया उमटते. मुस्लिम समाजातील प्रतिगामी विचार सरणीचे लोक काही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नसतात. त्याच्यामते नवा विचार म्हणजे इस्लामवर हल्ला, शरियताविरोधी भूमिका अशीच मानसिकता ठेवल्यामुळे धर्मसंस्थेला प्रतिगामी स्वरूप प्राप्त होते.[117] परंतु सय्यदभाईंचा लढा ही उघडपणे विरोध करणाऱ्यातला आहे. त्यांनी धर्मांध विचाराला विरोध करून विज्ञानपर विचार समाजाला देण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी कोणत्याही परिणामांची तमा बाळगली नाही.

सय्यदभाईंच्या विचारांना हमीद दलवाईंची साथ मिळाली. हमीद दलवाईंना मुस्लिम समाजाने कधीच आपले म्हंटले नाही. पण हमीद दलवाईंना वाटे की आपण ज्या समाजात जन्मलो त्यातील दोष आणि अन्याय चालीरीती दूर करणे हे आपले कर्तव्य आहे. दलवाई स्वतः नास्तिक होते. परंतु आपण मुसलमान आहोत याचा त्यांना मौलाना आझाद यांच्याप्रमाणे अभिमान वाटत होता. त्याप्रमाणे सय्यदभाई यांना सुध्दा वाटत होते की आपण मुस्लिम समाजात जन्मास आलो आहोत तेव्हा आपण आपल्या समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा दूर करणे हे आपले कर्तव्यच आहे आणि त्याप्रमाणे सय्यदभाईंनी मुस्लिम प्रश्नावर वृत्तपत्रांतून सतत लिखाण करून समाज जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे.

सय्यदभाईंनी आपल्या ‘दगडावरची पेरणी’ या आत्मचरित्रात अल्लामा इक्बाल यांच्या शेरने मुस्लिम समाजाचे मूळ दुखणे अतिशय समर्पक शब्दात व्यक्त केले आहे. -

**“ खुदा ने आज तक उस कौम की हालत नहीं बदली**

**जिसे न हो एहसास अपनी हालत के बदलने का ”**[118]

सय्यदभाईंना यांची पूर्ण जाणीव आहे की मुसलमानांच बदल नको असेल तर परमेश्वर सुध्दा बदलाला मान्यता देणार नाही. त्यामुळेच आपण दगडावर पेरणी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशी सय्यदभाईंनी भावना व्यक्त केली आहे.

सय्यदभाई यांनी मुस्लिम समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा यांच्या विरोधात आवाज उठवून मुस्लिम समाजाला वैज्ञानिक दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ या संघटनेने ज्या ज्या वेळी अनेक ठिकाणी तलाकपीडित महिला परिषदा, तोंडी तलाक विरोधी मोर्चे, शाहबानो केस, काश्मीर प्रश्न, समान नागरी कायदा, पोटगी बचाव परिषदा इत्यादी कार्यामध्ये सहभाग घेतला म्हणून पुरोगामी मुस्लिम चळवळीतील महत्वपूर्ण नाव म्हणून सय्यदभाईंचा उल्लेख होतो. सय्यदभाईंची प्रतिमा कार्यकर्ता अशी आहे. पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांनी एका विशिष्ट ध्येयासाठी प्रयत्न केले. या वाटचालीत अनेक अनुभव त्यांच्या पाठीशी आहेत. आजही मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांची सारखी धडपड सुरू आहे. खरे तर समाज आपल्याला बदलायचा आहे म्हणून चिकाटी न सोडता खूप संयमाने आपण वागले पाहीजे ही भूमिका त्यांनी स्वीकारलेली दिसते.

### 5.5.4 मेहरून्निसा दलवाई :-

मेहरून्निसा हमीद दलवाई यांचा जन्म पुणे येथे 25 मे 1930 रोजी झाला. त्याच्या वडिलाचे नाव चाँदखान तर आईचे नाव आयेशा पटेल होते. सनातनी कुटुंबातील त्याच्यावर संस्कार झालेले होते. मेहरून्निसाचे यांचे शिक्षण उर्दू माध्यमातून झालेले होते. इंटरला नापास झाल्यामुळे मेहरून्निसा यांचे शिक्षण थांबले. मे 1954 मध्ये ऑल इंडिया खादी कमिशन मध्ये त्यांनी जवळपास 35 वर्षे नोकरी केली. त्यांच्या ऑफीसमधील उषा वढावकर यांनी मेहरून्निसा यांची हमीद दलवाईंशी ओळख करून दिली.[119] सुरूवातीला मेहरून्निसा यांच्यावर दलवाईंचा फारसा प्रभाव पडला नव्हता. परंतु पुढे एकमेकांचे विचार पटल्यानंतर 16 जुलै 1958 रोजी मेहरून्निसा यांनी हमीद दलवाईंशी मुस्लिम धार्मिक पध्दतीने निकाह केला.[120] 4 ऑगस्ट 1958 रोजी मेहरून्निसा यांनी रजिस्टर ॲक्ट प्रमाणे हमीद दलवाईंशी विवाह केला.[121] त्यांना रूबिना, इला या दोन मुली आहेत.

हमीद दलवाई यांना रेल्वे मध्ये नोकरी मिळाली. 1962 साली रूबीना, हमीद दलवाई व मेहरून्निसा पाकिस्तानला आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले. पाकिस्तानातील मुजाहिराची (फाळणी नंतर पाकिस्तानात

गेलेले हिंदी मुस्लिम) स्थिती फारसी चांगली नाही हे दिसले. मेहरून्निसाच्या मते हिंदुस्थानच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना तेथे चांगले वाटेल असे काही नाही.[122] दोन महिन्यानंतर दलवाई दांपत्य हिंदुस्थानात परत आले. हमीद दलवाईंनी रेल्वेतील नोकरी सोडली व ते आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' मध्ये पत्रकारिता करू लागले.

हमीद दलवाई यांच्यामुळे मेहरून्निसा यांचा अनेक लेखक व विचारवंताशी परिचय झाला. नरहर कुरूंदकर, अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, भाई वैद्य यांच्या विचारांचा प्रभाव हमीद व मेहरून्निसा यांच्यावर पडू लागला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना भाई वैद्य यांच्याच घरी 22 मार्च 1970 रोजी करण्यात आली. हमीद दलवाई, मेहरून्निसा यांना अनेक पुस्तके आणून देत असत. त्या पुस्तकाचे वाचन करण्यासाठी ते सांगत असत. दलवाई हे शिक्षणाचे मध्यम मराठीच असावे याबद्दल आग्रह धरीत असत. त्यामुळे मेहरून्निसा यांनी रूबिना व इला या दोघींना मराठी माध्यमातून शिक्षण दिले.[123] नोव्हेंबर 1968 मध्ये इंडियन सेक्युलर सोसायटी तर्फे 'मुस्लिम पॉलिटिक्स इन इंडिया' हे दलवाईंचे पुस्तक प्रकाशित झाले. जे खूप गाजले. त्यांना नंतर 'इंधन' ही कांदबरी, 'लाट' हा कथासंग्रह व इतर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आणि हमीद दलवाई लेखक म्हणून प्रसिध्द झाले.

भाई वैद्य यांनी हमीद दलवाई, यदुनाथ थत्ते, बाबा आढाव यांच्या बरोबर तीन चार बैठक घेतल्या. मुस्लिम समाजासाठी काहीतरी वेगळे करायचे ही भूमिका घेऊन हमीद दलवाई यांनी एक मोर्चा काढण्याचे ठरविले. त्यामध्ये मेहरून्निसा यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. महिलांसाठी एक मोर्चा काढून त्यामध्ये सवतबंदीचा कायदा, समान नागरी कायदा, त्याचबरोबर जबानी तलाक अशा अनेक बाबींचा मागण्यांमध्ये समावेश होता. स्त्रियांचा मोर्चा म्हणजे स्त्रियांनी अन्यायाविरूध्द आवाज उठविणे ही फार मोठी गोष्ट आहे. कुठल्याही मुस्लिम इतिहासामध्ये अशा प्रकारच्या स्त्रियांचा मोर्चा निघाला नव्हता. सन 1966 सालचा हा मोर्चा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक होता. समान नागरी कायदा झाला पाहीजे, जबानी तलाक बंद झाला पाहीजे, मुल्ला मौलवीचा धिक्कार असो असे फलक हातात घेऊन केवळ सात स्त्रियां या मोर्चा मध्ये सहभागी होत्या. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी या मोर्चाचे निवेदन स्विकारले.[124] या मोर्चाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली.

इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष प्रा. अ. भि. शहा होते तर हमीद दलवाई उपाध्यक्ष होते. एकदा या संस्थेची मिटींग होती. दलवाई यांनी मेहरून्निसा यांना त्या मिटींगसाठी पाठविले. ए. ए. सॉलोमन, सी. आर. दळवी, प्राध्यापक मे. पु. रेगे हे सभासद मेहरून्निसा यांच्या परिचयाचे होते. या मिटींग मध्ये मेहरून्निसा यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. या मंडळाच्या मार्फत तलाकपीडित मुस्लिम स्त्रियांची परिषद सन 1973 मध्ये झाली. त्यामध्ये मेहरून्निसा यांनी केवळ सहभागच घेतला नाही तर परिषदेला उद्देशून भाषण केले. त्याच वर्षी अखिल भारतीय स्तरावर मुसलमानांनी मुंबईच्या महाराष्ट्र कॉलेज मध्ये मुस्लिम पर्सनल लॉ (मुस्लिम व्यक्तिगत कायदा) संबंधी गुप्त मिटींग घेतलेली होती. या मिटींगला विरोध करण्यासाठी मुंबई सेंट्रलला एस. टी. महामंडळाच्या डेपोपासून युवादल, राष्ट्रसेवादल व मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते जमा झाले. 25 जणाच्या या मोर्चात मेहरून्निसा यांच्या व्यतिरिक्त केवळ तीन महिला होत्या या मोर्चावर जात्यंध मुसलमानांनी हल्ला केला. मोर्चातील लोकांना किरकोळ मारहाण झाली. या सर्वांना पोलिसांनी घरी नेऊन सोडले. त्यानंतर हमीद दलवाई यांनी बोहरा समाजाचे धर्मगुरू सय्यदना यांच्या विरोधात मुंबई येथे व्हिटी रेल्वे स्थानकापासून मोर्चा काढला होता.[125] त्या मोर्चामध्ये मेहरून्निसा यांनी सहभाग घेतला होता.

4 व 5 डिसेंबर 1971 रोजी ऑल इंडिया फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम कॉन्फरन्स दिल्ली येथे झाली. या परिषदेसाठी भारतातील जवळपास सर्वच प्रांतातून 100 प्रतिनिधीनी सहभाग घेतला होता. समान नागरी कायदा, कुटूंब नियोजन या संबंधीचे ठराव या परिषदेत पास करणेत आले. मेहरून्निसा यांची ही पहिलीच कॉन्फरन्स होती.[126]

मार्च 1973 मध्ये मुंबईत मुस्लिम सोशल रिफॉर्म्स कॉन्फरन्स ही परिषद झाली. मोईन शाकीर यांनी या परिषदेचे आयोजन केले होते. तर हमीद दलवाई हे अध्यक्ष होते. या परिषदेमध्ये मेहरून्निसा यांनी अनेक ठराव मांडले होते. डिसेंबर 1973 मध्ये कोल्हापूर येथे शैक्षणिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी 750 मुस्लिम प्रतिनिधी आलेले होते. त्यामध्ये 200 मुस्लिम स्त्रियांचा समावेश होता. या ही परिषदेमध्ये काही ठराव पास करणेत आले. वक्फच्या पैशांचा दुरूपयोग का होतो ? त्यातील पैसे खाजगी कारणासाठी आणि राजकारणासाठी वापरले जाऊ नयेत, तसेच ट्रस्टीनी त्याचा हिशोब व्यवस्थित ठेवावा, शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा असावे. अशा अनेक गोष्टीचा या परिषदेमध्ये ऊहापोह झाला. भारतामध्ये सर्वाची ओळख भारतीय अशीच असली पाहीजे हे देखील मत व्यक्त करणेत आले. या परिषदेमध्ये ही मेहरून्निसा यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला होता.

3 मे 1977 रोजी हमीद दलवाईंचा किडनीच्या आजाराने निधन झाले. त्यानंतर मेहरून्निसा यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य पुढे चालविले. सन 1978 साली अमरावती येथे वजीर पटेल यांनी मुस्लिम परिषदेचे आयोजन केले होते. कुलसुम पारेख, जनार्दन वाघमारे, मुमताज रहिमतपुरे यांनी परिषदेमध्ये सहभाग घेतला होता. या परिषदेसही मूलतत्ववाद्यांनी विरोध केला होता. त्यावेळी मेहरून्निसा यांच्या असे लक्षात आले की ऐतिहासिक

तथ्य ठामपणे मांडले तर त्यावर विवाद होतो.[127] अलिगढ सन 1978 साली हिंदू-मुस्लिम जातीय दंगल झाली. त्यावेळी मेहरून्निसा यांनी अलिगढ मध्ये मुस्लिम महिलांची बैठक घेतली. त्या बैठकीला उद्देशून मेहरून्निसा यांनी भाषण केले त्यावेळी त्याचा आत्मविश्वास वाढू लागला.[128] वसंत व्याख्यानमाला वाई येथे, भारतीय मुसलमान राजकीय आणि सामाजिक विश्लेषण या विषयावर मेहरून्निसा यांनी व्याख्याने दिली. मुस्लिम महिलांचे प्रश्न या विषयावर त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. दादर येथे हमीद दलवाईंच्या स्मृतिप्रित्यर्थ तीन दिवसाच्या व्याख्यान मालांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी 3 मे ला त्या कोणत्या ना कोणत्या कार्याक्रमाचे आयोजन त्या करतात.[129] मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते यांनी या कार्यक्रमामध्ये सहभाग घेतलेला आहे.

सावित्रीबाई यांची 150 जयंती सर्व महाराष्ट्रात साजरी करणेत आली. मुंबईला एक दोन दिवसाचे शिबीर घेणेत आले. या शिबीरामध्ये मेहरन्निसा दलवाई यांनी भाषण केले. भाषणानंतर त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. त्यामधील एक प्रश्न म्हणजे तुमच्याकडे शिकलेले लोक आहेत ते तुम्हाला कसे वाटतात ? त्यावेळी मेहरून्निसा यांनी जे उत्तर दिले, त्यामध्ये त्या म्हणतात, 'ते खूप कडवे, धर्मवेडे असतात त्यांच्या डोक्यामध्ये वैचारिक गोंधळ फार असतो. कोणतीही गोष्टी अशिक्षित माणसाला पटविणे सोपे जाते पण शिकलेल्या माणसाना पटविणे सोपे जात नाही.' यावर तेथे उपस्थित असलेल्या काही सुशिक्षित मुस्लिम महिलांनी गोंधळ करणेस सुरूवात केली. त्यानंतर मेहरून्निसा दलवाई म्हणाल्या, 'आत्ता मी जे सुशिक्षित स्त्रियाबद्दल विधान केले त्यांचाच हा पुरावा आहे.'[130] मेहरून्निसा यांना या प्रकरणामध्ये खूप मनस्ताप झाला. सातत्याने पुढे पोलीस खात्याकडून होणाऱ्या चौकशीला सामोरे जावे लागले.

हुसेन जमादार यांनी तलाक मुक्ती मोर्चा याची संकल्पना मांडली. ती मेहरून्निसा यांना आवडली. 3 नोव्हेंबर ते 18 नोव्हेंबर 1985 या कालावधी मध्ये या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूर ते नागपूर असा हा मोर्चा होता. या मोर्चाचा खरा हेतू शाहबानो केस प्रकरण हा होता. शाहबानो ही 60 वर्षांची महिला होती तिने आपल्याला पोटगी मिळावी या साठी भारतीय दंडसंहिता 125 कलमाखाली केस दाखल केली. शेवटी सुप्रिम कोर्टात या केसचा निकाल लागला. भारताचे तत्कालीन सरन्यायाधिश डॉ. वाय. बी. चंद्रचुड यांनी शाहबानोच्या बाजुने या केसचा निकाल दिला. त्यामुळे मुल्ला मौलवी खवळले. त्यांच्या मते हा मुस्लिम कायद्यामध्ये हस्तक्षेप होता. दुसरे कारण असे होते की घटनेच्या 44 व्या कलमाच्या आधारे समान नागरी कायदा लागू झाला पाहीजे असे मतप्रदर्शन करण्यात आले होते. त्यामुळे भारत सरकारवर दडपण आले. आणि सरकारने मुस्लिम महिला विधेयक

पास केले. ही पार्श्वभूमी या मोर्चामागे होती. कोल्हापूर येथून या मोर्चाची सुरूवात झाली होती. मेहरून्निसा यांच्या बरोबर 80 वर्षीय बाबुमियाँ बॅंडवाले पासून 9 महिन्याच्या लहान मुलापर्यंत 42 जणांनी यामध्ये सहभाग घेतला होता. या मोर्चाच्या माध्यमातून तलाक मुक्ती का आवश्यक व गरजेची आहे. यावर अनेक ठिकाणी व्याख्यानाचे व सभांचे आयोजन करण्यात आले होते. परभणी, नांदेड पासून मोर्चाला विरोध सुरू झाला. तर जळगांवमध्ये मोर्चातील सहभागी लोकांना मारहाण करण्यासाठी अनेक मूलतत्ववादी धावून आले होते. जळगाव हून मेहरून्निसा नगरला गेल्या. मालेगाव मधील त्यांचा कार्यक्रम जात्यंध लोकांनी बंद पाडला. नगरमध्ये ही त्याच्या कार्यक्रमात अडथळा आणला गेला. या तलाक मुक्ती मोर्चामध्ये मेहरून्निसा यांच्याबरोबर आय. एन. बेग, शामकाका पटवर्धन, अन्वर राजन, शमशुद्दिन तांबोळी, समीर मणीयार, विलायत शेख, वजीर पटेल, हुसेन जमादार, मुमताज रहिमतपुरे इत्यादी हे सहभागी झाले होते.[131]

तलाक मुक्ती मोर्चातील काही व्यक्तिंना व तलाकपीडित महिलांना घेऊन मेहरून्निसा यांनी मुस्लिम महिला विधेयकाच्या संदर्भात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांची भेट घेतली त्यावेळी पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले, 'आप अपने मुल्ला मौलवीयोंसे मिलें, उनसे बातचीत करे, अपने समाजको अपने साथ लाये, जब तक वो आपके साथ नहीं आते हम कुछ नहीं कर सकते.' मेहरून्निसा यांनी समाजसुधारकांची शोकांतिका स्पष्ट करताना असे म्हंटले आहे. समाजसुधारकांच्या मागे समाज कधीच नसतो. त्यानंतर मेहरून्निसा राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांना ही भेटल्या. त्यांनी तलाकपीडित महिलांची दु:खे ऐकून घेतली व ग्यानी झैलसिंग म्हणाले, 'आप बिलकुल फिकर न करें, मैं सब लोगोंको समझाऊगाँ, आपने बहुत अच्छा सवाल हाथ में लिया है।' परंतु मेहरून्निसा दलवाई यांचे हे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. मुस्लिम विधेयक लोकसभेने मंजूर केले.[132] मेहरून्निसा यांच्या मते हे विधेयक पास झाले. आणि आमच्या बायकांची दुर्दशा झाली. त्यामुळे आमची चळवळ शंभर वर्षे मागे गेली.

पुणे येथे पूलगेट येथे कृष्णकुंज या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर हमीद दलवाई यांनी एक सदनिका विकत घेतली होती. दलवाईंच्या मृत्युनंतर मेहरून्निसा यांनी इस्लामिक रिसर्च सेंटर साठी या सदनिकेचा हॉल व दलवाईंची सर्व पुस्तके दिली आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे इस्लामिक रिसर्च सेंटर आज तेथे चालविण्यात येते. मेहरून्निसा या सेंटरच्या संस्थापक आहेत.[133]

मेहरून्निसा यांच्या मते धर्मचिकित्सा ही झालीच पाहीजे जे चांगले आहे त्याचे जतन करूया, जे वाईट आहे, अन्यायकारक आहे, ते टाकून दिले पाहीजे. मुसलमानांमध्ये प्रबोधनाला अजून फार वाव आहे. मुस्लिम महिलांचे प्रश्न म्हणजे त्यांच्या शिक्षणाचे, दत्तकविधान संबंधी वारसा हक्क, कुटुंब नियोजन, त्यांना स्वावलंबी बनविणे,

तलाकपीडित महिलांचे पुनर्वसन झाले पाहीजे. लोकांचे विचार बदलले पाहीजेत. त्यासाठी मेहरून्निसा मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या मार्फत आजही कार्यशाळा, शिबीरे, परिषदा, वेगवेगळ्या प्रकारचे प्रबोधनपर अनेक कार्यक्रम घेतात. सर्व महाराष्ट्रात त्यांची आजही मोफत सल्ला केंद्रे चालू आहेत. आता त्यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर चालू आहे. 1400 वर्षापूर्वी शरिया त्याकाळाच्या अनुषंगाने बरोबर होता. पण आता काळ बदलला आहे. समाज बदलत आहे त्यामुळे आपल्या राज्यघटनेमध्ये जे लिहिलेले आहे, त्यांच्या आधारावर मेहरून्निसा आपल्या मागण्यांचे समर्थन करित आहेत. त्याचा आधार समता आणि न्याय ही मूल्ये आहेत. धर्माच्या आधारावर न्याय देवू नये. प्रत्येकाने आपला धर्म घरातच ठेवला पाहीजे आणि माणुसकी हा एकच धर्म मानला पाहीजे. हमीद दलवाई गेल्या नंतर त्यांच्या सहकार्यांनी जितके जमेल तेवढे मंडळाला पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मेहरून्निसा यांच्यामते आम्ही दुसरा हमीद उभा करू शकलो नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे पण आम्ही शेवटपर्यंत काम करू याची त्या खात्री देतात. हमीद दलवाईंच्या मृत्युनंतर मेहरून्निसा यांनी अशा पध्दतीने मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कामामध्ये आपले योगदान दिलेले दिसून येते.

### 5.5.5 हुसेन जमादार :-

हुसेन चाँद जमादार मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे एक सक्रिय अध्वर्यू आहेत. कोल्हापूर आणि परिसरात त्यांनी या मंडळाच्या माध्यमातून आपले मुस्लिम समाजाच्या विकासासाठी योगदान दिले आहे. ‘जिहाद’ आणि ‘मुस्लिम मनाचा कानोसा’ त्यांची ही पुस्तके प्रसिध्द आहेत. अनेक वृत्तपत्रातून त्यांनी मुस्लिम समाजसुधारणे विषयी अनेक लेख लिहिलेले आहेत. आपल्या सामाजिक प्रबोधनाची सुरूवात त्यांनी कोल्हापूर येथूनच केली.

हमीद दलवाईंचे विविध वृत्तपत्रातील लेख वाचून हुसेन जमादार यांना आपण मुस्लिम समाजसुधारणेच्या संदर्भात काम करावे असे वाटू लागले. सन 1969 सालच्या डिसेंबर महिन्यात जमादार यांनी एक पत्रक काढले ‘‘सामाजिक सुधारणा यहीं लक्ष्य’’ त्यामध्ये ‘‘बदलते जमाने की आहट, बदलते जमाने के साथ जो बदलेगा वहीं बचेगा ! जो नहीं बदलेगा वह खत्म हो जाएगा। यह उत्क्रांतिवाद का सिध्दांत है।’’ [134] हे धोरण घेऊन त्यांनी इस्लाममधील दोषांवर बोट ठेवून त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या पत्रकामध्ये बहुविवाह प्रथा, बहुपत्नीत्व प्रथा, कुटुंबनियोजन, सामाजिक सुधारणा यावर आपले विचार मांडले. जमादार यांच्या मतानुसार चार विवाह करणे चुकीचे आहे. कुराणामध्ये असे म्हंटले आहे की ज्या स्त्रिया विधवा आहेत आणि आयुष्यात त्यांना कोणाचा आधार नाही त्यासाठी विवाह करणे वैध आहे. पूर्वी वारंवार, लढाया होत असत त्यामुळे लोकसंख्या घटत असे आणि समाजात विधवा स्त्रियांचे प्रमाण वाढत असे म्हणून सुन्नतने (शरिया) अनेक लग्ने करण्यास परवानगी

दिली होती. आज बदलत्या समाज व्यवस्थेत लहान कुटुंबाची गरज आहे. त्यामुळे कुटुंबनियोजन करणे गरजेचे आहे. आपण आपल्या समाज बांधवांना नमाज पढण्यासाठी वारंवार बोलावतो परंतु त्यांच्या मदतीसाठी धावत नाही. मशिदीमध्ये फक्त धर्माबाबत शिकवण दिली जाते, पण मुल्ला मौलवीच्या भाषणामध्ये समाज सुधारणे बाबत एकही शब्द नसतो. मशिदी मधून सामाजिक सुधारणांवर सुध्दा विचार मांडले गेले पाहीजेत.

हुसेन जमादार यांच्या पत्रकावर मुस्लिम समाजातील मूलतत्ववाद्यांनी मोठ्या प्रमाणात टिकास्त्र सोडले. त्यावेळी जमादार आपल्या विचारापासून बाजूला न जाता मुस्लिम समाजाचे आपण प्रबोधन केले पाहीजे असे त्यांना वाटू लागले. याचवेळी हमीद दलवाईंचे मुस्लिम प्रश्नावरील लिखाण वर्तमानपत्रात प्रसिध्द होत होते. यातूनच जमादार हे हमीद दलवाईंच्या विचाराने प्रभावित झाले व त्यांना वाटू लागले की ज्याप्रमाणे मुस्लिम समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी दलवाई कार्य करतात त्या कार्यास आपण हातभार लावावा आणि आपल्या समाजाला सनातनी, मूलतत्ववाद्यांच्या विचारांपासून मुक्त करावे. यासाठी प्रथमतः हुसेन जमादार, वसंत पवार, दीपक पवार कोल्हापूरचा विद्यार्थी परिषदेचे रवी भानगावकर इत्यादी तरूणांनी एकत्र येऊन पुणे येथे 'प्रगत भारतीय युवक संघटना' स्थापन केली.[135] यावेळी जमादार यांची ओळख सय्यदभाई, अमीर शेख, अन्वर शेख अशा मुस्लिम मित्रांशी झाली होती. यातून मुस्लिम समाजात उदारमतवाद निर्माण करण्यासाठी काही करावे असा विचार पुढे आला. प्रगत भारत युवक संघटनेच्या माध्यमातून हुसेन जमादार यांचा प्रा. श्री. अ. दाभोळकर, यदुनाथ थत्ते व साधना साप्ताहिकाचा परिचय झाला. समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने सह्या गोळा करण्याचे चालले होते. त्यावेळी हुसेन जमादार यांनी कोल्हापूरात चांगले कार्य केले. त्यातूनच पुढे हमीद दलवाई व हुसेन जमादार यांची पहिली भेट कोल्हापूरातील बिंदू चौकात रंगराव साळुंखे विद्यालयात मुस्लिम समाजाची एक सभा भरली होती तेथे झाली.[136] या सभेचे अध्यक्ष एन. आर. बारगीर होते. यावेळी हमीद दलवाई यांनी स्वातंत्र्य चळवळीतील मुस्लिमांचे कार्य, जमाते इस्लामी व मुस्लिम लीगचे राजकारण, पाकिस्तानची निर्मिती, राष्ट्रीय मुसलमान, इस्लाममधील चुकीचे कायदे, मुस्लिम मानसिकता यावर भाषण केले. यातूनच हुसेन जमादार प्रभावित झाले व त्यांनी मुस्लिम समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपणही कार्य केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले.

मुसलमान समाजावर मुल्ला मौलवींच्या परंपरागत रूढी परंपरांचा फार मोठा प्रभाव आहे. समाज सुधारण्यासाठी समाजाला नवे विज्ञानपर विचार समजून घेण्यासाठी अशा धर्मांध विचारांचा काहीही उपयोग नाही. म्हणून पुरोगामी मुसलमानांची संघटना आवश्यक होती. त्यासाठी 22 मार्च 1970 रोजी पुण्यात हमीद दलवाई, सय्यदभाई, हुसेन जमादार, सय्यद मुनीर, उस्मान सय्यद, अमीर शेख, बशीर शेख, मकबुल तांबोळी, आर. ए. शेख

इत्यादी काही मुस्लिम तरूणांनी एकत्र येऊन सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम धर्माच्या इतिहासात ते प्रथमच घडले असे म्हणता येईल. या मंडळाच्या पहिल्या कार्यकारणीमध्ये हुसेन जमादार यांचा समावेश करण्यात आला होता. मुस्लिम समाजात प्रबोधन करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. मुस्लिम बांधवांना राष्ट्रवादी करणे, यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण करणे, धर्माकडे बघण्याच्या दृष्टीकोनात बदल घडवून आणणे, सामाजिक रूढी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या जाचक प्रथा नष्ट करणे असे मंडळाचे ध्येय धोरण जाहीर करण्यात आले. हे मुस्लिम सत्यशोधक मंडळ महात्मा जोतिबा फुले यांचा वारसा घेऊन मुस्लिम समाजात काम करणार होते म्हणून मंडळाला 'सत्यशोधक' हे नाव घेतले होते.[137]

मुस्लिम स्त्रीला शिक्षण घेता आले पाहीजे, तिला बुरख्याची सक्ती नको. मुस्लिम पुरूषाला मनमानी तोंडी तलाक देण्याचा अधिकार आहे तो रद्द व्हावा. सवत बंदीचा कायदा मुस्लिमांना लागू करावा. तलाक मिळालेल्या स्त्रीला पोटगी मिळाली पाहीजे या मागण्यांना अग्रक्रम देऊन मुस्लिम सत्यशोधक चळवळ सुरू झाली. याबरोबरच मुस्लिम समाजाने आपल्या परिघातून बाहेर पडावे, राष्ट्रीय चळवळीत मुस्लिम समाजाने सहभागी व्हावे, हिंदू-मुस्लिमांतील दरी कमी व्हावी, कुटुंबनियोजनाचा मुस्लिम समाजाने स्वीकार करावा, उर्दू ही भारतीय भाषा आहे, तिचा भाषा म्हणून जरूर विकास व्हावा, परंतु महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी आहे. म्हणून महाराष्ट्रातील मुस्लिमांनी मराठीतून शिक्षण घ्यावे. भारतातील विविध धर्म हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेने केलेल्या अत्यांचारामुळे वाढले आहेत भारतातील मुसलमान काही अरबस्तानातून आलेले नाहीत म्हणून मुसलमान येथील भूमिपूत्र आहेत. तेव्हा इथे धर्माचा विचार न करता जो जो भारतीय वंशाचा आहे. त्या प्रत्येकाला भारतात राहण्याची व आपला विकास करून घेण्याची संधी असली पाहीजे अशी भूमिका घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळ वाटचाल करीत आहे.[138]

31 मे 1971 रोजी हुसेन जमादार यांनी कोल्हापूरात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची शाखा स्थापन केली. यावेळी प्राचार्य ए. डी. आत्तार, हमीद दलवाई, भाई माधवराव बागल, साहित्यिक वि. स. खांडेकर हे उपस्थित होते. कोल्हापूरात मंडळाची शाखा स्थापन केल्यानंतर सुरूवातीला मंडळाच्या वतीने लहान लहान कार्यक्रमाचे आयोजन केले होते.[139] उदा. - 15 ऑगष्ट 1971 ला समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी राष्ट्रसेवादलाच्या सहाय्याने शहरातून सायकल फेरी काढली व कोल्हापूरातील आमदारांना निवेदन दिले. 18 व 19 सप्टेंबर 1971 मध्ये कोल्हापूरात मंडळाच्या वतीने मुस्लिम समाजाच्या प्रबोधनासाठी अभ्यास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विचार मुस्लिम समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी जानेवारी 1973 मध्ये मंडळाचे पहिले मुखपत्र 'मुस्लिम सत्यशोधक पत्रिका' हे प्रथम कोल्हापुरात सुरू झाले. त्याचे संपादक हमीद दलवाई होते तर कार्यकारी संपादक हुसेन जमादार होते. परंतु ही पत्रिका पुढे बंद पडली तेव्हा हुसेन

जमादार यांनी मुस्लिम प्रबोधन संवाद या नावाचे मासिक सुरू केले परंतु 'मुस्लिम प्रबोधन संवाद' या नावास शासकीय परवानगी न मिळाल्यामुळे पत्रिकेचे नामकरण 'पुरोगामी मुस्लिम' असे करण्यात आले.[140]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाने 30 व 31 डिसेंबर 1973 रोजी कोल्हापुरात हुसेन जमादार यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम शिक्षण परिषद घेतली यावेळी हुसेन जमादार यांना हानिफ बागवान, जहाँगीर जमादार, गाझीउद्दीन सलाती, गनी फरास, महंमद सोलापुरे, एन. आर. बारगीर, निजाम मुलाणी यांनी सहकार्य केले होते.

भारतीय दंड संविधान 125 मध्ये सन 1974 मध्ये दुरूस्ती झाली. त्यानुसार मुस्लिम स्त्रियांना पोटगी मागण्याचा अधिकार मिळाला. तेव्हा याचा फायदा मुस्लिम स्त्रियांना मिळवून देण्यासाठी हुसेन जमादार यांनी मंडळाच्या वतीने कोल्हापूरात कायदाविषयक मोफत सल्ला केंद्र सुरू केले. यावेळी ॲड. समुद्रे आणि ॲड. अविनाश खंडेराव महाडिक यांनी मंडळाच्या वतीने मोफत सल्ला देण्याची जबाबदारी घेतली होती. त्यामुळे कोल्हापूरात तलाकपिडीत मुस्लिम महिलांशी त्यांचा संपर्क येऊ लागला. व त्यातून 2 नोव्हेंबर 1975 मध्ये तलाकपीडित स्त्रियांची पहिली परिषद कोल्हापुरात घेतली.[141] या परिषदेसाठी 100 मुस्लिम तलाकपीडित महिला उपस्थित होत्या. पुणे व चिपळुण येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाने हमीद दलवाईंच्या कारकिर्दीत जिहाद-ए-तलाक परिषदा घेतल्या त्यामध्ये सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई इत्यादी व्यक्तिंचा सहभाग होता. त्यावेळी हमीद दलवाई आजारी होते. या परिषदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या पाहून हमीद दलवाईंना समाधान वाटले व त्यावेळी ते म्हणाले "माझ्यामागे चळवळ संपणार नाही याची ही पावतीच आहे."[142] यावरून आपणास असे दिसून येते की हमीद दलवाईंच्या विचारांचे कार्य मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते यांनी जे चालू ठेवले आहे यावरून ही चळवळ संपुष्टात आली नाही हे दिसून येते.

हुसेन जमादार यांनी मुस्लिम सत्यशोधक चळवळीमध्ये कार्य करित असताना आजपर्यंत त्यांनी अनेक मुस्लिम समाजातील प्रश्नावर आवाज उठविला आहे. त्यांनी सन 1978 मधील शाहबानो प्रकरण, जून 1985 मध्ये कोल्हापूर येथील शरीफा मुल्ला प्रकरण, 17 ऑगस्ट 1985 मध्ये पोटगी बचाव परिषद अशा वेगवेगळ्या कार्यात सहभाग घेतला. तसेच त्यांनी तलाकपीडित स्त्रियांच्या मुलांची जबाबदारी घेऊन त्यांनी कोल्हापूर येथील विक्रमनगर मध्ये तलाकपीडित महिलांच्या मुलांचे वस्तीगृह जानेवारी 1986 रोजी सुरू केले.[143] त्या वस्तीगृहाची जबाबदारी हुसेन जमादार व त्यांची पत्नी आयेशा जमादार यांनी घेतली. प्रत्यक्षात हुसेन जमादार यांनी या मुलांची सोय आपल्या घरी आपल्या कुटुंबीयांसमवेत केली होती. या वस्तीगृहाच्या मदतीसाठी निळू फुले व जयंत वालावलकर यांनी 'राजकारण गेलं चुलीत' या नाटकाचे प्रयोग देऊन निधी उपलब्ध करण्यास मदत केली होती. या

वस्तीगृहामधून शहाजहान पटेल, अन्सार नदाफ, मिनाज नदाफ, रमजान शेख, मेहबूब सोमजाळ, मेहबूब मदारखान इत्यादी मुस्लिम मुलांनी राहून आपली प्रगती केली आहे.[144]

हुसेन जमादार यांनी शाहबानो केस निकालाच्या समर्थनासाठी मुस्लिम महिलांचा मोर्चा महाराष्ट्रभर काढण्याचे ठरविले. सन 1985 चा शाहू पुरस्कार मेहरून्निसा दलवाईंना मिळाला होता. त्यावेळी मोर्चाची कल्पना हुसेन जमादार यांनी मेहरून्निसा दलवाईंना सांगितली. व या मुस्लिम स्त्रियांच्या मोर्चाला 'तलाक मुक्ती मोर्चा' हे नाव दिले गेले. पुरोगामी मुस्लिम या मासिकामधुन या मोर्चाची सविस्तर योजना मांडली. शक्यतो मोर्चाची ठिकाणी जिल्ह्याची घ्यावीत. जिल्हाधिकाऱ्यांना मोर्चाने जाऊन निवेदन द्यावे. जाहीर सभा घ्यावी. जमल्यास मुस्लिमांची बैठक घ्यावी. पोस्टर प्रदर्शन लावावे. शक्य तेथे पथनाट्य करावे. मुस्लिम मोहल्यात जाऊन प्रबोधन करावे असा मोर्चाचा आराखडा तयार करणेत आला होता.[145]

हुसेन जमादार यांनी तलाक मुक्ती मोर्चाला कोल्हापूरमधुन 3 नोव्हेंबर 1985 ला सुरूवात केली. त्यावेळी त्यांना मिरज येथील राष्ट्रसेवा दलाचे ॲड. चिमण लोकुर, सोलापुरचे प्रा. फक्रुद्दिन बेन्नुर, उस्मानाबादचे बशीर तांबोळी, लातूरचे ॲड. मनोहरराव गोमारे, नांदेडमध्ये 'दै. प्रजावाणी' चे संपादक सुधाकर डोईफोडे, प्रा. मुमताज रहिमतपुरे, प्रा. ऐनुल आत्तार, आप्पासाहेब इनामदार, बाबुमियाँ बँडवाले, हमीद तांबोळी, फातिमा आत्तार, हव्वाबी आत्तार, आय. एन. बेग, सय्यदभाई, वजीर पटेल, महंमद गौस नाईक, रजिया पटेल इत्यादींनी सहकार्य केले होते.

तलाक मुक्ती मोर्चाचे निवेदन नागपूर येथे देण्यासाठी मुंबईहून मेहरून्निसा दलवाई, तलाकपीडित लैला पटेल, कोल्हापुरहून निजाम मुलाणी, हुसेन जमादार, हाशमुद्दीन सय्यद, आयेशा जमादार, आय. एन. बेग, नगहूनर समीर मणियार, जळगावचे भाऊ रायसोनी व भिकचंद शर्मा, उस्मानाबादचे बशीर तांबोळी, मुमताज रहिमतपुरे इत्यादी व्यक्तिंनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना निवेदन दिले. या निवेदनात पुढील प्रमुख मागण्या होत्या.

1. जुबानी तलाकपध्दती कायद्याने बंद व्हावी.
2. मुस्लिम समाजाला सवतबंदीचा कायदा लागू करण्यात यावा.
3. सर्वोच्च न्यायालयाने तलाकपीडित मुस्लिम स्त्रियांना दिलेला पोटगीचा हक्क अबाधित राहावा.[146]

यावेळी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी तलाक मुक्ती मोर्चाने केलेल्या जनजागरणाच्या कार्याची प्रशंसा केली व 'मुस्लिम स्त्रियांच्या व्यथा स्वतः पंतप्रधानांकडे मांडेन' अशी ग्वाही दिली.

पुढे हुसेन जमादार, सय्यदभाई, मेहरून्निसा दलवाई, अन्वर राजन, वजीर पटेल इत्यादींनी तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग तसेच तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांची भेट घेतली व तलाकपीडित मुस्लिम स्त्रियांची व्यथा त्याचे समोर मांडली. परंतु 25 फेब्रुवारी 1986 रोजी मुस्लिम महिला विधेयक सादर करण्यात आले. यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळ, जनवादी महिला, महिला दक्षता समिती, ऑल इंडिया वुमेन्स फेडरेशन इत्यादींनी विधेयकाला विरोध केला.[147] हुसेन जमादार यांच्या कार्याला जरी अपयश आले तरी ते आपल्या कार्यापासून बाजुला न जाता त्यांनी आजपर्यंत आपला लढा हा चालू ठेवलेला दिसून येतो. हुसेन जमादार यांच्या मते भारतीय मुस्लिम समाजाला प्रगतीच्या मार्गाकडे वळविण्यासाठी समाजाचे सध्याचे तथाकथित कुचकामी नेतृत्व आणि मुस्लिम समाज यातील विसंगती व दरी नष्ट करणे गरजेचे आहे.

हुसेन जमादार यांना हमीद दलवाईंच्या नास्तिक भूमिकेमुळे मुस्लिम समाज त्यांना आपले मानीत नव्हता हे कितपत सत्य आहे असे संशोधकांने मुलाखती मध्ये विचारले असता. जमादार म्हणाले ‘‘नास्तिकतेची चळवळ चालवावयाची आहे, अशी दलवाईंची कधीच भूमिका नव्हती, हमीद दलवाई सोडून सर्वजण ‘खुदा’ मानणारे होते व आहेत. हमीद दलवाईंना मुस्लिम समाजाने कधीच आपले मानले नाही उलट ‘काफीर’ म्हणून त्यांचा तिरस्कारच केला.[148] ज्या गोष्टीबद्दल हमीद दलवाई बोलत होते त्या सर्व गोष्टी इस्लामशी निगडीत होत्या. त्यात परिवर्तन व्हावे असे हमीद दलवाईंना वाटत होते मात्र इस्लाम अपरिवर्तनीय आहे अशी मुस्लिमांची श्रध्दा आहे.

मुस्लिम समाजाला सुधारणावादी विचार देणारी ही एक महत्वाची चळवळ आहे. प्रबोधनाची चळवळ ही क्रांती असते. दीर्घकाळाने का होईना पण समाजाला त्या मार्गावर यावेच लागते, कारण त्यातच समाजाचा विकास असतो. ती समाजाची गरज असते व त्यासाठी राजकीय फायदे, तोटे न पाहता काहींना हे सतीचे वाण घ्यावे लागते. ते हुसेन जमादार यांनी मुस्लिम सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून घेतले आहे. हुसेन जमादार यांची सुधारणावादी भूमिका आणि त्या अनुषंगाने चालविलेली चळवळ दीर्घकाळ सुरू आहे. या दरम्यान त्यांना अनेक कटु प्रसंग आले. परंतु धर्माच्या नावाखाली समाजाला, व्यक्तीला आणि व्यवस्थेला वेठीस धरण्याच्या या प्रवृत्तीविरोधात आपली भूमिका तीव्र करताना ते म्हणतात. ‘तबलिग जमात हा पंथ धर्मजागृतीच्या नावाखाली पुरोहितशाही प्रस्थापित करण्याच्या मागे लागला आहे. पण. पुरोहितशाहीमुळे धर्म भ्रष्ट होतो असा सर्वच धर्माचा इतिहास सांगतो. तेच इस्लाम धर्माचे होईल, हे सांगण्यास कोण्या एका ज्योतिषाची गरज नाही.’ हुसेन जमादार यांच्या मते धर्म किंवा समाज वाचवायाचा असेल तर धर्मव्यवस्थेवर प्रशासनाची नजर असावयास हवी असे

सांगितले आहे.[149] परंतु हे कठीण आहे, पण. ते करावे लागेल असे सांगून प्रखर जनआंदोलनाने ते शक्य आहे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

हुसेन जमादार यांचा जन्म सामान्य मुस्लिम कुटुंबात झाला आणि सर्वसामान्य मुस्लिम समाजातील व्यक्तीला जसे जगणे वाट्याला येते तसे जीवन त्यांना लाभले. पण लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये बंडखोर वृत्ती जोपासल्यामुळे धर्मासाठी माणूस नसून माणसासाठी धर्म आहे अशी व्यापक भूमिका घेऊन नवसुधारणावादी व पुरोगामी स्वरूपाची विचारसरणी अंगीकारली आणि कोल्हापूरात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची एक शाखा उभारली. आपल्या विचार आणि कृतीवर श्रध्दा ठेवून काहीशा कर्मठ आणि प्रतिगामी विचारसरणीचा प्रभाव असणाऱ्या मुस्लिम समाजाला पुरोगामित्वाचे धडे देऊन सुधारणेच्या वाटेवर आणण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

### 5.5.6 डॉ. बाबा आढाव :-

महात्मा फुल्यांच्या चळवळीचे स्वातंत्र्योत्तर काळातील खंदे वारस म्हणून बाबा आढाव ह्यांच्या कार्याचा उल्लेख केला पाहीजे. त्यांचे पूर्ण नाव बाबासाहेब पांडुरंग आढाव असे असून त्यांचा जन्म 1 जून 1930 रोजी झाला. बाबा आढाव यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा तसेच समाजवादी विचारसरणीचा प्रभाव आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची समाजाला आजही गरज आहे असे त्यांचे मत आहे.[150] सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. त्याकरिता विधायक संघर्षाच्या मार्गाचा त्यांनी पुरस्कार केला आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी बाबा आढावांनी असंरक्षित शोषित, उपेक्षित कष्टकऱ्यांचे लढे संघटित केले. हमाल, हातगाडीवाले, पथारीवाले आणि मोलकरणींचे प्रश्न धसास लावले. हमालाला कामाचा योग्य मोबदला मिळावा आणि त्याचे जीवन सुखकर व्हावे म्हणून हमाल पंचायती ची स्थापना केली. गोवा मुक्ति आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचा सहभाग होता.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीत बाबा आढावांनी भाग घेतला आहे. देवदासी आणि विडी कामगार स्त्रियांच्या प्रश्नावर लढे दिले. अंधश्रध्दा निर्मुलनासाठी चळवळ चालवली. दुष्काळात अन्नधान्याचा विनाकारण होम करणाऱ्या विश्वशांती यज्ञाविरुध्द त्यांनी सत्याग्रह केला. सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी सामाजिक कृतज्ञता निधी उभारण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना दरमहा मानधन दिले जाऊ लागले. ह्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. बाबा आढावांनी महात्मा फुले प्रतिष्ठानची स्थापना करून आपल्या सामाजिक कार्याला भक्कम आधार दिला. त्यांनी पुरोगामी सत्यशोधक हे नियतकालिक सुरू करून सामाजिक समतेचा विचार लोकांपर्यंत

पोहचवला.[151] परिवर्तनवादी चळवळीला गती यावी म्हणून ‘विषमता निर्मूलन परिषदे’ची उभारणी करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.[152] त्यांनी आपल्या ग्रंथातून आणि लेखांमधून सामाजिक समतेची सतत पाठराखण केली आहे आणि विषमतेवर कडाडून हल्ला केला आहे.

बाबा आढावांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ, धरणग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी झालेले आंदोलन, दलित, भटक्या व विमुक्त जातींच्या न्याय हक्कांसाठी चाललेल्या चळवळी, तसेच मुस्लिम समाजात सुधारणावादी विचार देणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक चळवळीत ते नेहमी अग्रभागी राहिले आहेत. हिंदू-मुस्लिम व अल्पसंख्याकांतील सांस्कृतिक अंतर कमी करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक समाजात सत्यशोधक विचारांचा प्रसार वाढविला पाहीजे. यातून समान नागरी कायदा, गोवंश हत्याबंदी, संतती नियमन, कुटुंब नियोजन इत्यादी प्रश्नांवर आवाज उठवून समाजात परिवर्तन घडवून आणले पाहीजे व हिंदू-मुस्लिम प्रश्नाचा वापर ‘जैसे थे’ वादासाठी कुशलतेने केला जातो ही बाब जनतेच्या लक्षात आणुन दिली पाहिजे असे त्यांचे मत आहे.[153]

सन 1973 साली सत्यशोधक समाज शताब्दी, सन 1974 साली रार्जर्षि शाहू छत्रपती आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची जन्मशताब्दी या निमित्ताने महाराष्ट्रात ‘एक गाव एक पाणवठा’ ही मोहीम सुरू झाली. या मोहिमेत अनेक सामाजिक पदर उलगडून आले. ही मोहीम बाबा आढावांनी सुरू केली. म. फुले ह्यांनी अस्पृश्यांसाठी आपल्या घरातल्या पाण्याचा हौद खुला केला होता. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता. बाबा आढावांनी हीच पाणी आंदोलनाची चळवळ अधिक व्यापक केली. खेड्यापाड्यातून दलितांना पाणी भरण्यासाठी वेगळा पाणवठा असे. बाबा आढावांनी दलित आणि गावकरी ह्यांना एकत्र केले. बाबा आढावांची एक गाव एक पाणवठा ही चळवळ वेगाने वाढली.[154] काही ठिकाणी ह्या चळवळीला विरोधही झाला. हमीद दलवाई आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांच्या मुस्लिम समाजप्रबोधनाच्या कार्यात भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, प्रा. ग. प्र. प्रधान यासारख्या समाजवादी विचारवंत व कार्यकर्त्यांच्या सिंहाचा वाटा आहे. भाई वैद्य व बाबा आढाव यांना हमीद दलवाईंच्या विचारांना प्रतिसाद देतील असे पुण्यातील काही मुस्लिम तरूण परिचित होते. सय्यदभाई, मुनीर सय्यद, अमीर शेख, अन्वर शेख, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी इत्यादी तरूणांशी हमीद दलवाईंचा परिचय करून दिला व हमीद दलवाईंच्या मुस्लिम समाज प्रबोधनाच्या कार्याला प्रेरणा दिली.[155]

मुस्लिम समाजावर मुल्ला मौलवींच्या परंपरागत रूढी-परंपरांचा फार मोठा प्रभाव आहे व तो पदोपदी अनुभवला येतो. समाज सुधारण्यासाठी समाजाला नवे विज्ञानपर विचार समजून घेण्यासाठी अशा धर्मांध विचारांचा काहीही उपयोग नाही. हे मुस्लिम समाजाला सांगून मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि सामाजिक समतेची आधुनिक मानवी मूल्ये प्रस्थापित व्हावीत या हेतूने सामाजिक जागृती करण्यासाठी पुणे शहरात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याचे ठरले. 'मुस्लिम' शब्द घालवा की नाही याबद्दलची चर्चा झाली. या शब्दाने जातीयवाद तर सुचित होत नाही ना ? अशीही शंका निर्माण झाली. यावेळी हमीद दलवाईंनी आपणास मुस्लिम समाजात काम करायचे आहे, त्या समाजात सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही म्हणून मुस्लिम शब्द हवाच असे मत मांडले तर सत्यशोधक शब्द डॉ. बाबा आढावांनी सुचवला आणि तो तात्काळ स्वीकारण्यात आला.[156] आणि महात्मा फुले यांच्याशी नाते जोडणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याचे निश्चित झाले. 22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापने दिवशी डॉ. बाबा आढाव आपल्या 'हमाल पंचायत' च्या मुस्लिम हमालांसह उद्घाटनाच्या कार्यक्रमाला मिरवणुकीने आले होते. यावेळी ते भारत माता की जय, समान नागरी कायदा झालाच पाहिजे, मुस्लिम सत्यशोधक मंडळ झिंदाबाद अशा घोषणा देत होते. मुस्लिम समाजात सुधारणावादी विचार देण्यासाठी डॉ. बाबा आढावांनी मंडळाला सहकार्य केले.[157]

बाबा आढाव यांनी हमीद दलवाईंच्या मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापनेला ज्याप्रमाणे सहकार्य केले. त्याचप्रमाणे मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या ज्या पुरोगामी परिषदा झालेल्या होत्या त्यामध्ये आपले पुरोगामी विचार मुस्लिम समाजाला देण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते हुसेन जमादार यांनी मुस्लिम प्रबोधन संवाद या नावाचे मासिक सुरू केले होते. त्यामध्ये त्यांनी तबलीग जमातीची तुलना आर. एस. एस. शी केली होती. तबलीग मुळे मुसलमानांना मागास ठेवले जाते असे विचार मांडले होते. तेव्हा हुसेन जमादार यांच्या घरावर बहिष्कार टाकला. तेव्हा हुसेन जमादार यांनी मुल्ला मौलवी यांना सांगितले की मी स्वतः मुसलमान आहे, म्हणून मुस्लिम समाजातील चुका दाखविण्याचा पहिला अधिकार मला आहे. कारण आमचा समाज सुधारावा त्याची शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक इत्यादी सर्वच बाबतीत प्रगती व्हावी असे मला वाटते. परंतु हे मुल्ला मौलवी ऐकून घेण्याच्या स्थितीत नव्हते. तेव्हा या सर्व प्रकरणावर 'हा विजय बहिष्कारवाद्यांचा आहे' या शीर्षकाचा लेख 'मुस्लिम प्रबोधन संवाद' मध्ये लिहिला. यावेळी बाबा आढाव यांनी हुसेन जमादार यांना धीर दिला व त्यांना सांगितले, मला बहिष्कारवाद्यांचा विजय व तुझा पराजय वाटत नाही. संवाद प्रबोधनाच्या कामात जय पराजयाला

वाव नसतो, ती प्रक्रिया असते. तुझ्या मनातील प्रतिक्रियेपेक्षा घडलेल्या घटनांचा परिणाम आजुबाजूला शोधायचा असतो. मुस्लिम शेजाऱ्यांना, मित्रांना याबद्दल काय वाटते ते अजमावले पाहिजे. संवादाच्या अगोदर ही फॅसिस्ट पध्दत दूर करावी लागेल. आजकाल हा प्रकार वरचेवर जाणवतो. माणुसकीची नाती विलक्षण ताणली जातात. माणसाचे माणूसपण अमान्य करणारी ही व्यवस्था मोठी जीवघेणी असते.[158] बाबा आढाव यांनी हुसेन जमादार यांना मुस्लिम समाजात घुसून काम करण्याची गरज आहे असे मत मांडलेले दिसते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य प्रकाशने, जाहीरसभा, मोर्चा, धरणे, सत्याग्रह व उपोषणे, पुरोगामी परिषदा घेणे, राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर निरनिराळ्या कार्यक्रमांत भाग घेऊन मुस्लिम समाजाचे प्रबोधन करणे. अशा प्रकारे कार्य मुस्लिम सत्यशोधक मंडळ कार्य करीत असताना सन 1983 मध्ये मंडळातर्फे महाराष्ट्रव्यापी दोन दिवसांची मुस्लिम सामाजिक परिषद पुण्याच्या मार्केटयार्ड येथील हमाल भवन येथे घेण्यात आली. या परिषदेला महाराष्ट्राच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणात प्रतिनिधी आले होते. यावेळी मुस्लिम सनातन्यांनी ही परिषद इस्लामविरोधी आहे असे प्रतिनिधींना सांगण्यास सुरूवात केली होती. परंतु विरोधाला न जुमानता परिषदेचे कामकाज व्यवस्थित पार पाडले. या परिषदेत प्रा. कुलसुम पारेख, रशिदा मुजावर, शकिरा बेगम, मेहरून्निसा दलवाई, प्रा. विलायत शेख व डॉ. बाबा आढाव यांनी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. बाबा आढाव म्हणाले, काळ बदलत गेला की, माणसानेही बदलायला हवं,[159] यावरून मुस्लिम समाजाने काळाप्रमाणे बदलत जाऊन आधुनिक काळातील नवनवीन विचाराचा स्विकार केला पाहीजे असे मत आढावांनी मांडलेले दिसते.

3 नोव्हेंबर 1985 पासून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने तलाक मुक्ती मोर्चाचे आयोजन करणेत आले होते, हा मोर्चा कोल्हापूर, मिरज, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, आंबेजोगाई, परभणी, नांदेड, चंद्रपूर, अमरावती, बुलढाणा, जळगाव, अहमदनगर या ठिकाणी मुस्लिम जनसामान्यांशी संपर्क साधत फिरले. यावेळी या मोर्चाला काही ठिकाणी विरोध झाला. परंतु काही ठिकाणी स्थानिक मुस्लिम तलाक पीडित स्त्रिया मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी येत होत्या. नागपूर येथे संघर्षवाहिनीच्या मंडळीनी तलाक मुक्ती मोर्चा या प्रश्नावर डॉ. विमलाबाई जठार सभागृहात जाहीर सभा ठेवली होती. यावेळी बाबा आढाव व हुसेन जमादार प्रमुख वक्ते होते. यावेळी डॉ. बाबा आढाव यांनी मुस्लिम तलाक मुक्ती मोर्चाचे स्वागत केले व त्यांनी एकूण मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाची आवश्यकता व त्याची दिशा मांडून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास पाठिंबा दिला. व तलाकपीडित महिलांच्या शिक्षण पुनर्वसनासाठी सेवासदनसारखी संस्था उभारली जावी असे मत मांडले.[160]

डॉ. बाबा आढाव यांनी हमीद दलवाई व त्यांच्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाबाबत आपले मत मांडत असताना हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत या पुस्तकात म्हणतात, 'डॉ. राममनोहर लोहियांनी हिंद पाक महासंघाची कल्पना मांडून भारतीय उपखंडात एक अभियान सुरू केले. लोहियांनी देशभर संवादाची मोहीम सुरू केली. डॉ. लोहिया विद्रोही दार्शनिक होते. भारताच्या शेजारी राष्ट्राबरोबर मैत्रीचे संबंध जोपासण्यासाठी हिमालय नीतिची मांडणी लोहियांनी केली. लोहियांनी नेपाळ, तिबेट, गोवा इतकेच काय अमेरिकेत सत्याग्रह केले. लोहियांनी प्रांतोप्रांती जाऊन तेथील सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आंदोलनांचा वेध घेतला. देशाच्या फाळणीने भाजलेल्या मनांना दिलासा दिला. याच काळात वा सुमारास हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजात प्रबोधनाची मोहीम सुरू केली, व मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. ह्या चळवळीचा रोख केवळ मुसलमान स्त्रियांवरचा अन्याय दूर व्हावा एवढ्या पुरताच मर्यादित नव्हता. धर्माच्या नावाखाली सोसावे लागणारे अन्याय दूर व्हावे म्हणून चाललेल्या समाजप्रबोधनाच्या चळवळीचाच तो एक भाग होता.'[161]

आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य गर्तेत सापडले आहे. अस्तित्व टिकविण्यासाठी कार्यकर्त्यांची पराकाष्ठा सुरू आहे. जागतिक पातळीवरील दहशतवाद्यांच्या संदर्भात इस्लाम व मुस्लिम जगतावर वैचारिक व सशस्त्र हल्ले सुरू आहेत. काही अमेरिकन विचारवंतानी गेले काही वर्षांत या वादास ख्रिश्चन विरूध्द मुस्लिम असे स्वरूप दिले आहे. भारतात हिंदू विरूध्द मुस्लिम असे त्याचे स्वरूप आहे. दुनियेतील दहशतवादाचा उगम इस्लाममधील जिहाद संकल्पनेतून आहे असे काहींचे आग्रही प्रतिपादन होत आहे. अशावेळी मुस्लिम समाजात सामाजिक प्रबोधनाचे कार्य चालू ठेवण्याचे अग्निदिव्य मुस्लिम सत्यशोधकांना करावे लागत आहे. तेव्हा आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुस्लिम समाजात चर्चासत्रे, सभा, मोर्चा, संवाद, प्रबोधन, संघर्ष या मार्गाचा अवलंब करून हमीद दलवाईंना काफर ठरवून सत्यशोधक मंडळाला बहिष्कृत करणारा विरूध्द खऱ्या अर्थाने सत्यशोधकी भूमिका वठवावयास हवी.[162]

अशा प्रकारे डॉ. बाबा आढाव यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा तसेच समाजवादी विचारसरणीच्या आधारे सामाजिक सुधारणा चळवळीत भाग घेतला. जातिभेद व वर्णव्यवस्था यास विरोध केला. स्त्री जातीवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द संघर्ष केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या उभारणीत व त्याच्या कार्यात त्यांचा सहभाग आहे.

**निष्कर्ष :-**

भारतीय धर्मजीवनातील प्रत्येक धर्माचे अस्तित्व स्वतंत्र व भिन्न आहे. तसेच परस्पराना पूरक आहे. ते जसे परस्परांना पूरक आहे तसे काही बाबतीत विरोधक ही आहे. जेव्हा हे विरोधी घटक तीव्र होतात तेंव्हा सुसंवाद

राखणारा धर्म विसंवादाचे कारण बनतो आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मतेला धोका होतो.

मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समता, बंधुभाव या मूल्यांचा प्रसार करणेसाठी हमीद दलवाईंनी 22 मार्च 1970 रोजी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम समाजाच्या इतिहासातील ही पहिली सुधारणावादी व पुरोगामी क्रांतिकारी संघठना म्हणावी लागेल. अशा या संघटनेने 1970 ते 2000 या काळात ज्या पुरोगामी परिषदांचे आयोजन केले आणि त्यातून समाजाला नवी दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे या चळवळीने शाहबानो पोटगी प्रकरण, शरीफा मुल्ला प्रकरण, तलाक मुक्ती मोर्चा, समान नागरी कायदा या बाबतही चांगल्या प्रकारचे योगदान देऊन मुस्लिम समाजाचे प्रबोधन घडवून आणले आणि त्याच प्रमाणे मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करणेमध्ये व मंडळाचे कार्य पुढे नेण्यामध्ये समाजवाद्यांनी ज्या प्रमाणे सहकार्य केले त्या प्रमाणेच मुस्लिम समाजातील पुरोगामी विचार सरणीच्या काही व्यक्तिंनी हातभार लावला. अशा व्यक्तिंमध्ये प्रा. अ. भि. शहा, प्राचार्य नरहर कुरूंदकर, सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई, डॉ. बाबा आढाव इत्यादी व्यक्तिंचा उल्लेख करावा लागेल.

**संदर्भ सूची**


1. कुलकर्णी कुसुम, 'प्रबोधन पर्व', सिंहवाणी प्रकाशन कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती 26 जानेवारी 2002 पृ. क्र. 7.
2. जोशी महादेव शास्त्री (संपा.) 'भारतीय संस्कृतीकोश खंड चौथा', भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, 1967 पृ. क्र. 578.
3. कुराणातील सुरह व आयात क्र. 2:83, 4:56, 6:22, 8:12.
4. कित्ता - 14:36, 21:21.
5. कित्ता - 6:56, 12:40, 14:8.
6. Dr. Ambedkar Babasaheb, Pakistan - Partition of India, Govt. Of Maharashtra Publication P.No. 294.
7. कुरूंदकर नरहर, 'शिवरात्र' साधना प्रकाशन, पुणे, 1970 पृ. क्र. 37.
8. http:/hamiddalwai.blogspot.in/2012-01-01 archive.html
9. सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' अक्षर मानव प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जून 2009 पृ. क्र. 57.

10. कित्ता पृ. क्र. 59.

11. जमादार हुसेन, 'जिहाद', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, 1 मे 1993 पृ. क्र. 116.

12. दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय', साधना प्रकाशन पुणे पृ. क्र. 47.

13. दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती, 9 ऑगस्ट 1995, पृ.क्र. 82.

14. तांबोळी शमशुद्दिन (संपा.), 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, 27 एप्रिल 2009 प्रस्तावने मधुन.

15. कित्ता - प्रस्तावने मधुन

16. जमादार हुसेन 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ एक आढावा' मुस्लिम सत्यशोधक पत्रिका, अंक पहिला, कोल्हापूर, जानेवारी 1973, पृ. क्र. 4.

17. उपरोक्त जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 117.

18. कित्ता पृ. क्र. 117.

19. कित्ता पृ. क्र. 119.

20. 'साधना' साप्ताहिक पुणे सप्टेंबर 1971 पृ. क्र. 4.

21. दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, 22 सप्टेंबर 1971 पृ. क्र. 3.

22. उपरोक्त दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' पृ. क्र. 82.

23. 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ : दोन दशकांची वाटचाल', प्रकाशक मुस्लिम सत्यशोधक मंडळ, 1998 पृ. क्र. 17.

24. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, जानेवारी 1971 पृ. क्र. 1.

25. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (1977) हमीद दलवाई स्मृती अंक पृ. क्र. 9.

26. जमादार हुसेन (संपा.) पुरोगामी मुस्लिम 1981 पृ. क्र. 7.

27. दैनिक मराठा, मुंबई जानेवारी 1973 पृ. क्र. 1.

28. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, 12 मार्च 1973 पृ. क्र. 3.

29. दरेकर समीर, 'धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेलाच सुरूंग', अभिनव निर्माण प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती, ऑक्टोंबर 2009 पृ. क्र. 73.

30. हाजी महंमदगौस नाईक, 'सच्चर का सच', मुस्लिम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, कोल्हापूर 2008, पृ. क्र. 43.

31. दैनिक पुढारी, कोल्हापूर, 31 डिसेंबर 1973 पृ. क्र. 1.

32. उपरोक्त - जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 181.

33. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा, (संपा.), 'महाराष्ट्राचा इतिहास मांडणी व पुनर्मांडणी', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 18 नोव्हेंबर 2011 पृ. क्र. 241.

34. कित्ता पृ. क्र. 241.

35. मुझफ्फर हुसैन 'मुस्लिम मानस' (तरंग-अंतरंग), भारतीय विचार साधना पुणे, 4 जुलै 1989 पृ. क्र. 35.

36. उपरोक्त जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 143, 144.

37. कित्ता पृ. क्र. 144.

38. उपरोक्त दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' पृ. क्र. 143.

39. थत्ते यदुनाथ, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' मराठी विश्वकोश (संपा.) जोशी लक्ष्मणशास्त्री खंड 13. मुंबई 1987, पृ. क्र. 785.

40. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ. क्र. 120.

41. मेधा नानिवडेकर (संपा.), 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा', शिवाजी विद्यापीठ 2006 पृ. क्र. 178.

42. उपरोक्त हुसेन जमादार, 'जिहाद' पृ. क्र. 179.

43. कित्ता पृ. क्र. 181.

44. दैनिक लोकसत्ता 21 नोव्हेंबर 1985 पृ. क्र. 7.

45. लतिफी डॅनियल, 'शहाबानोंका मुकदमा और सुप्रीम कोर्ट का फैसला', जनवादी महिला समिती, कानपुर 1985 पृ. क्र. 27.

46. कित्ता पृ. क्र. 34.

47. कित्ता पृ. क्र. 34.

48. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ. क्र. 129, 130.

49. दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई, 18 ऑगस्ट 1985 पृ. क्र. 1.

50. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, 18 ऑगस्ट 1985 पृ. क्र. 1,2.

51. Tarkunde V. M., 'Hindu Communaism is it Beginning of Fascim', The Times of India 30 May 1990 पृ. क्र. 4.

52. कित्ता पृ. क्र. 4.

53. मणियार समीर, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ, राज्यव्यापी सामाजिक परिषद' (संपा.) जमादार हुसेन, कोल्हापूर 1985, पृ. क्र. 3.

54. उपरोक्त जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 190.

55. दैनिक सकाळ, कोल्हापूर, 18 जून 1985 पृ. क्र. 1.

56. उपरोक्त जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 191.

57. कित्ता पृ. क्र. 191.

58. रानडे प्रतिभा, 'बुरख्या आडच्या स्त्रिया', श्री. विद्या प्रकाशन पुणे 15 मे 1987 पृ. क्र. 149, 150.

59. उपरोक्त जमादार हुसेन 'जिहाद' पृ. क्र. 207.

60. कित्ता पृ. क्र. 207.

61. कित्ता पृ. क्र. 221.

62. कित्ता पृ. क्र. 221.

63. कित्ता पृ. क्र. 221.

64. उपरोक्त - रानडे प्रतिभा, 'बुरख्या आडच्या स्त्रिया' पृ. क्र. 166.

65. जमादार हुसेन (संपा.) 'तलाक मुक्ती मोर्चाने इतिहास घडविला' पुरोगामी मुस्लिम फेब्रुवारी 1986 पृ. क्र. 2.

66. कित्ता पृ. क्र. 1,2.

67. उपरोक्त नानिवडेकर मेधा, 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा' पृ. क्र. 176.

68. उपरोक्त - रानडे प्रतिभा, ‘बुरख्या आडच्या स्त्रिया’ पृ. क्र. 253 ते 257.

69. कित्ता पृ. क्र. 256.

70. Indian Express (Daily) New Delhi, 10th April 1986.

71. इंडियन सेक्युलर सोसायटी, ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका’ पुणे, 1979 पृ. क्र. 27.

72. कित्ता पृ. क्र. 31.

73. Times of India (Daily) 10th March 1986 P. No. 7.

74. उपरोक्त जमादार हुसेन, ‘जिहाद’ पृ. क्र. 243.

75. दैनिक केसरी, कोल्हापूर, सांगली 27 सप्टेंबर 1987 पृ. क्र. 1.

76. उपरोक्त जमादार हुसेन, ‘जिहाद’ पृ. क्र. 244.

77. दैनिक सकाळ पुणे 14 डिसेंबर 1988 पृ. क्र. 3.

78. उपरोक्त सय्यदभाई ‘दगडावरची पेरणी’ पृ. क्र. 88.

79. प्रा. बेन्नुर फक्ररूद्दीन, ‘भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता’, प्रतिमा प्रकाशन पुणे 2 ऑक्टोंबर 2012 पृ. क्र. 39.

80. कित्ता पृ. क्र. 39.

81. कित्ता पृ. क्र. 41.

82. उपरोक्त - रानडे प्रतिभा, ‘बुरख्या आडच्या स्त्रिया’ पृ. क्र. 259.

83. उपरोक्त - नानिवडेकर मेधा, ‘महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा’ पृ. क्र. 179.

84. इंडियन सेक्युलर सोसायटी ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळ’ उद्देश व भूमिका पुणे 1979 पृ. क्र. 57,58.

85. थत्ते यदुनाथ, ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळ’ मराठी विश्वकोश (संपा.) जोशी लक्ष्मणशास्त्री खंड XIII 1987, पृ. क्र. 785.

86. मुस्लिम सत्यशोधक मंडळ : मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा पृ. क्र. 7.

87. जमादार हुसेन (संपा.), ‘पुरोगामी मुस्लिम’ अंक 5, कोल्हापूर मे 1988 पृ. क्र. 1.

88. मुकादम अब्दुल कादर, ‘मुस्लिम सत्यशोधक चळवळ शोध आणि बोध’ मुस्लिम सत्यशोधक पत्रिका हमीद दलवाई स्मृती अंक (संपा. हुसेन जमादार, सय्यद मुनीर) पुणे, सप्टेंबर 1977, पृ. क्र. 95, 96.

89. Dalwai Hameed, Mulim Politics in Secular India, Hind Pocket Book, New Delhi, 1968 P. No. 125.

90. Shah A. B., Philosopedia.

91. कित्ता - Shah A. B. Philosopedia.

92. कसबे रावसाहेब, 'हिंदु मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद', सुगावा प्रकाशन, पुणे, 1994 पृ. क्र. 124.

93. Shah A. B., 'Challenges to secularism', Nichiketa Publication Bombay, 1969 P. No. 54, 55.

94. उपरोक्त - Shah A. B. Philosopedia

95. उपरोक्त - दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे', पृ. क्र. 76, 77.

96. Shah A. B. Philosopedia

97. उपरोक्त दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' पृ. क्र. 82.

98. उपरोक्त डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा, 'महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी' पृ. क्र. 239, 240.

99. उपरोक्त - प्रा. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 28.

100. कुरूंदकर नरहर, 'शिवरात्र', साधना प्रकाशन पुणे 1970 पृ. क्र. 97.

101. देशपांडे ल. स., 'विचारवंत नरहर कुरूंदकर' गधर्ववेद प्रकाशन पुणे 2010 पृ.क्र. 146, 147.

102. उपरोक्त - कुरूंदकर नरहर, 'शिवरात्र' पृ. क्र. 145.

103. कित्ता पृ. क्र. 149.

104. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 16.

105. कुरूंदकर नरहर, 'अन्वय' नरहर कुरूंदकर साहित्य प्रकाशन, नांदेड, 1988 पृ. क्र. 114.

106. कित्ता पृ. क्र. 113, 114.

107. कुरूंदकर नरहर, 'वाटचाल' इंद्रायणी साहित्य पुणे, 1987 पृ. क्र. 135.

108. कित्ता पृ. क्र. 138.

109. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ.क्र. 53.

110. http://www.berational.co.in.

111. उपरोक्त - सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ. क्र. 8.

112. कित्ता पृ. क्र. 9.

113. कित्ता पृ. क्र. 95.

114. उपरोक्त प्रा. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत' पृ. क्र. 36.

115. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ. क्र. 29.

116. डॉ. शानेदिवाण राजेखान, 'मुस्लिम आत्मचरित्रे एक दृष्टिक्षेप', भूमी प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती 27 फेब्रुवारी 2010, पृ. क्र. 192.

117. मुकादम अब्दुल कादर, 'मुस्लिम सत्यशोधक चळवळ शोध आणि बोध', मुस्लिम सत्यशोधक पत्रिका सप्टेंबर 1977 पृ. क्र. 97.

118. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी' पृ. क्र. 4.

119. उपरोक्त दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' पृ. क्र. 21.

120. कित्ता पृ. क्र. 25, 26.

121. कित्ता पृ. क्र. 26.

122. कित्ता पृ. क्र. 39.

123. उपरोक्त जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 156.

124. जमादार हुसेन 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ एक आढावा', मुस्लिम सत्यशोधक पत्रिका अंक I कोल्हापूर जानेवारी 1973 पृ. क्र. 3.

125. कित्ता पृ. क्र. 4, 5.

126. उपरोक्त -नानिवडेकर मेधा, 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा' पृ. क्र. 173.

127. कित्ता पृ. क्र. 178.

128. उपरोक्त - दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे' पृ. क्र. 155.

129. कित्ता पृ. क्र. 157, 158.

130. कित्ता पृ. क्र. 163.

131. उपरोक्त - रानडे प्रतिभा, ‘बुरख्या आडच्या स्त्रिया’ पृ. क्र. 149 ते 153.

132. गुहा रामचंद्र लोकसत्ता 25 डिसेंबर 2011 पृ. क्र. 9.

133. उपरोक्त दलवाई मेहरून्निसा, ‘मी भरून पावले आहे’ पृ. क्र. 175, 176.

134. उपरोक्त जमादार हुसेन ‘जिहाद’ पृ. क्र. 106.

135. कित्ता पृ. क्र. 111.

136. कित्ता पृ. क्र. 114.

137. उपरोक्त डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. विभुते भालबा (संपा.) ‘महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी’, पृ. क्र. 236.

138. जमादार हुसेन, ‘मुस्लिम सत्यशोधक मंडळ एक आढावा’ मुस्लिम सत्यशोधक पत्रिका अंक I कोल्हापूर, जानेवारी, 1973, पृ. क्र. 4.

139. उपरोक्त - जमादार हुसेन, ‘जिहाद’ पृ. क्र. 117.

140. कित्ता पृ. क्र. 172.

141. कित्ता पृ. क्र. 143.

142. कित्ता पृ. क्र. 144.

143. मुस्लिम प्रबोधन संवाद, 26 जानेवारी 1983 पृ. क्र. 6.

144. उपरोक्त जमादार हुसेन, ‘जिहाद’ पृ. क्र. 181.

145. जमादार हुसेन (संपा.) ‘तलाक मुक्ती मोर्चाने इतिहास घडविला’ पुरोगामी मुस्लिम फेब्रुवारी 1986 पृ. क्र. 1.

146. कित्ता पृ. क्र. 3.

147. गुहा रामचंद्र, लोकसत्ता, 25 डिसेंबर 2011 पृ. क्र. 8.

148. मुलाखत 22 मार्च 2014.

149. मुलाखत 22 मार्च 2014.

150. के. सागर, ‘महाराष्ट्रातील समाजसुधारक व भारतीय विचारवंत’ के. सागर पब्लिकेशन्स पुणे 1994 पृ. क्र. 130

151. पुरोगामी सत्यशोधक, एप्रिल ते जून 1990.

152. उपरोक्त के. सागर, 'महाराष्ट्रातील सुमाजसुधारक व भारतीय विचारवंत', पृ. क्र. 131.

153. चव्हाण रामनाथ, 'जाती आणि जमाती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे 1990 पृ. क्र. 87.

154. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) निवडक साधना, खंड VIII साधना प्रकाशन, पुणे, 8 सप्टेंबर 2007, पृ. क्र. 114.

155. उपरोक्त सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी', पृ. क्र. 36.

156. कित्ता पृ. क्र. 52.

157. कित्ता पृ. क्र. 57.

158. उपरोक्त - जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 174, 175.

159. उपरोक्त - सय्यदभाई 'दगडावरची पेरणी', पृ. क्र. 119, 120.

160. उपरोक्त - जमादार हुसेन, 'जिहाद' पृ. क्र. 231.

161. उपरोक्त - तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', प्रस्तावनेमधून.

162. कित्ता - प्रा. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', प्रस्तावनेमधून.

# प्रकरण 6

# उपसंहार

सामाजिक जीवनातील कोणत्याही प्रश्नावर लोक संघटित होऊन कृती करू लागले की ती सामाजिक चळवळ आहे असे म्हंटले जाते. मात्र सर्वच सामाजिक चळवळी परिवर्तनाच्या नसतात. तर काही चळवळी एखाद्या विशिष्ट सामाजिक प्रश्नापुरत्याच मर्यादित असतात. परिवर्तनाची भाषा आज सर्वच जण बोलतात. परंतु कोणतीही चळवळ परिवर्तनवादी आहे किंवा नाही हे ठरविताना तिचा आशय, तिच्या अनुयायीवर्गाचे स्वरूप, तिने हाती घेतलेले निरनिराळे कार्यक्रम आणि त्यांचा समाजजीवनावर होणारा परिणाम या सर्वांचा विचार करावा लागतो. समाज परिवर्तन एक तर आपोआप घडत असते किंवा ते जाणीवपूर्वक घडवावे लागते. आपोआप घडून येणारे समाजपरिवर्तन परिस्थितीच्या रेट्याने घडत असते. त्यामुळे ते समाजाला हितकारक व इष्ट वाटणाऱ्या दिशेनेच घडुन येईल असे नाही. त्याची तीव्रता आणि गती बदलत्या परिस्थितीच्या तीव्रतेवर व गतीवर अवलंबून असते. आचार्य जावडेकरांनी म्हंटल्याप्रमाणे, ‘‘ब्रिटिशांनी हिंदुस्थानात जिंकून केवळ एक राज्यक्रांतीच केली नाही तर सर्वांगीण समाजक्रांती करण्याचे बीजारोपण केले.’’ समाज परिवर्तनाचे काम प्रभावी रीतीने करण्यासाठी वैचारिक पातळीवरची निश्चितता आणि लोकांच्या भावनेला आवाहन करण्याची ताकद असावी लागते. खरे तर नूसतेच वैचारिक पाठबळ असुन चालत नाही. त्याची परिणती कृतीत व्हावयाची असेल तर विचारांचा व्यापक प्रसार व्हावा लागतो. त्यासाठी संघटना शास्त्राचा आधार घ्यावा लागतो. त्याचे पुढे चळवळीत रूपांतर होण्यासाठी ज्ञान-विज्ञानाच्या कसोटीवर, वेळोवेळी तो विचार तावुन-सुलाखून निघावा लागतो. ‘चळवळ’ ही दीर्घकाळ टिकविण्याची गोष्ट असल्यामुळे, प्रत्येक येणाऱ्या नव्या पिढीला त्यांची आपल्या जीवनाशी व काळाशी असलेली सुसंगतता जाणवावी लागते. चळवळ यशस्वी व्हावयाची असेल तर त्यांत सहभागी होणाऱ्यांचे प्रबोधन व्हावे लागते. विनोबा भावेंच्या मते ‘‘प्रथम हृदय परिवर्तन, मग जीवन परिवर्तन आणि त्यानंतर समाजपरिवर्तन’’ असे परिवर्तनाचे मार्ग आहेत. आपणास परिवर्तनाचा हा मार्ग सामान्यतः लांबचा वाटतो. परंतु याशिवाय समाजपरिवर्तन पुर्णतः घडुन येणार नाही. आणि जे काही येईल ते टिकुनही राहणार नाही हे ही तेवढेच खरे आहे. त्यामुळे लांबचा आणि कठीण मार्ग असला तरी तोच एकमेव मार्ग ठरतो.

सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी तीन अंगांनी काम करीत असतात. एक विविध कार्यक्रमांव्दारे विशिष्ट प्रश्नांविषयी जनजागृती करणे, दोन सरकारवर दबाव आणुन आवश्यक ते कायदे करवून घेणे व त्यांची अंमलबजावणी परिणामकारक करणे, आणि तीन विशिष्ट प्रश्नांच्या बाबतीत विरोधी भूमिका असणाऱ्यांच्या

विरोधात उभे राहुन त्यांच्यावर दबाव आणुन त्यांची भूमिका व कृती बदलायला भाग पाडणे. आणि हे सर्व घडून यायचे असेल तर समाजाच्या सर्व स्तरांमध्ये, समाजाच्या या विविधांगी मागासलेपणाविषयी सुरूवातीला निदान, कुतूहल, मग जाणिव आणि मग त्या जाणिवेचे पर्यावसन कृतीत घडून येणारी कृतिशीलता जन्माला यावी लागते. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असे आपण म्हणतो तेव्हा हे गृहीतच धरतो की माणसांचे माणसांशी निसर्गतःच भावबंध जुळलेले असतात. परंतु आपणास असे दिसते की कळत नकळतपणे माणसाने भावबंधाचा हा परीघ फार संकुचित केलेला आहे.

इस्लाम जगाबरोबरच भारतातील एक प्रमुख धर्म आहे. या धर्मांच्या अनुयायांना मुस्लिम अथवा मुसलमान म्हणून ओळखले जाते. इस्लामचा प्रभाव हिंदुस्तानच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक जीवनावर पडलेला दिसून येतो. इस्लाम हा भारतातील एक प्रमुख धार्मिक अल्पसंख्य समाज होय. इ. स. 2001 च्या जनगणनेनूसार भारतात 13 % मुस्लिम आहेत.

भारतीय संस्कृतीमध्ये प्रबोधनाची परंपरा फार प्राचीन आहे. ज्यामध्ये बुध्द, महावीर, चार्वाक, कपील हे येतात. मध्ययुगात संत महात्म्यांनी या परंपरेला आधार दिला ज्यामध्ये कबीर, सूरदास, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, गुरूनानक, चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वर यांच्या पासुन थेट संत गाडगे महाराजांपर्यंत या परंपरेचा प्रवाह दिसतो. इस्लाममध्येही प्रबोधनाची परंपरा आहे. ज्यामध्ये निजामुद्दीन, ख्वाँजा मुईनुद्दीन, बंदेनवाज, बाबा फरीद, इत्यादींचा समावेश होतो. आधुनिक काळात ब्रिटिश राजवटीमुळे भारतामध्ये अनेक सुधारक उदयास आले. त्यात प्रामुख्याने राममोहन रॉय, महर्षी देवेंद्रनाथ ठाकुर, महर्षी दयानंद सरस्वती, न्यायमूर्ती म. गो. रानडे, प्रि. गो. ग. आगरकर, महात्मा फुले, राजर्षि शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, वि. रा. शिंदे, प्रबोधनकार के. सी. ठाकरे इत्यादी नावे समोर येतात.

इस्लाममध्ये सुरूवातीपासून सुधारवादी प्रवाह दिसून येतात. कर्मठ मुसलमान पोथीनिष्ठ मुसलमान तर सूफी उदारमतवादी होते. कर्मठ इस्लाम व सूफी पंथ यामध्ये अल गजाली याने समन्वय घडवून आणला. आधुनिक काळात सर सय्यद अहमदखान यांनी मुस्लिम समाज आधुनिकतेकडे कसा जाईल यांचा प्रयत्न केला. डॉ. इक्कबाल, शेख हाली, मौलाना आझाद हे प्रबोधन परंपरेचे पाईक होते.

महाराष्ट्रातील मुसलमानांच्या प्रबोधनासाठी हमीद दलवाई यांनी 22 मार्च 1970 रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. या प्रबोधनपर चळवळी मध्ये त्यांना अनेक विचारवंताचे सहाय्य मिळाले ज्यामध्ये प्राचार्य नरहर कुरुंदकर, प्रा. अ. भि. शहा, मुमताज रहिमतपुरे, मोईन शाकीर, सय्यदभाई, हुसेन जमादार, अन्वर शेख, बशीर तांबोळी इत्यादी होते. या सर्वांनी महाराष्ट्राची प्रबोधन परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

इस्लामपूर्व परिस्थितीचा अभ्यास करताना असे दिसून येते की इस्लामपूर्व अरब समाज हा रूढीग्रस्त होता. सौदी अरेबियात इस्लाम हा धर्म जन्मास आला. अरबांचे पूर्वीचे जीवन एकुण भटके होते. मेंढपाळ, व्यापार, लुटमार हे अरबांचे प्रमुख व्यवसाय होते. सदैव संघर्षाची परिस्थिती असल्यामुळे व उदरनिर्वाहाची निश्चित साधन उपलब्ध नसल्यामुळे त्यांना भविष्यकालाचे भय वाटत असे. त्यामुळे हे अरब पराकोटीचे दैववादी झाले होते. अरबांचे एकूण कौटुंबिक जीवन अस्थिर होते. अरबांमध्ये गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. स्त्रियांना समाजामध्ये फारसा सन्मान नव्हता. 'बळी तो कान पिळी' हा तत्कालीन दंडक होता. थोडक्यात टोळी करून राहणारा हा समाज होता.

अरबी लोकांमध्ये अरब-उल-बायदा, अरब-उल् मुतअर्बिया व अरब-उल्-मुस्तादिबा असे तीन समूह होते. यांचे सत्तेसाठी आपसात सारखे संघर्ष चालत असत. रोमन व प्रशियन साम्राज्य अरबस्तानच्या चोहीकडे पसरले होते. त्यांच्याशी अरबांचा तंटा होत असे. प्राचीन काळापासून मक्का हे शहर एक मध्यवर्ती व्यापारी केंद्र असल्यामुळे त्यांची फार मोठ्या प्रमाणात भरभराट झाली होती. अरबस्तानात टोळ्यांचे राज्य असल्यामुळे सर्वत्र अनागोंदी व बेबंदशाही माजली होती. यामुळे व्यापारी काफिल्यांना त्याचा सदैव उपद्रव पोहचत असे. आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना असे दिसते की अरब भारत व बाह्य जगादरम्यानच्या व्यापारी संबंधातील एक दुवा होते. भारतातुन वस्तू आणून युरोप मध्ये विकणे हा अरबांचा मुख्य व्यवसाय होता. अरबस्तानात गुलामगिरीची प्रथा होती. गुलामांबरोबर स्त्रियांचाही व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. अरबी लोकांचे जीवन अस्थिर होते. लुटमार, व्यापार, शेती, पशुपालन यावर ते आपला उदरनिर्वाह करीत असत. मक्का, मदीना, ताईफ ही शहरे व्यापार केंद्र म्हणुन भरभराटीस आली होती.

इस्लाम मधील धार्मिक परिस्थितीचा विचार करता असे दिसून येते की हा समाज अनेकेश्वरवादाची शिकार झालेला दिसुन येतो. प्राचीन अरबी धर्मात सेमिटिक धर्मांचे मिश्रण आहे. सेमिटीक विचारधारे मध्ये ख्रिस्ती, यहुदी आणि इस्लाम बरोबरच खालडीयन, फिनिशियन, कॅननाईटस् वगैरे धर्मांच्या खुणा ही दिसून येतात. प्रत्येक दिवशी एक अशाप्रमाणे 360 देवतांची उपासना केली जात होती.

इस्लाम हा एक धर्म असुन ती एक श्रध्दा व्यवस्था देखील आहे. अल्लाह सर्वश्रेष्ठ, महंमद अंतिम प्रेषित व कुराण ईश्वरीय धर्मग्रंथ हा इस्लामचा पाया आहे. अल्लाह निर्गुण निराकार आहे. सबब इस्लामला मूर्तीपूजा मान्य नाही. परमेश्वराला शरण जाणे, महंमदास अंतिम प्रेषित मानणे, कुराणयुक्त मार्गाचा अवलंब करणे ही इस्लामची जीवन पध्दती होय. त्यातूनच इस्लामी धर्म व संस्कृती आकारास येते. इस्लामची प्रमुख तत्वे नमाज, रोजा, जकात, हज व तौहीद ही आहेत. इस्लामी समाजव्यवस्था शरियत अर्थात मुस्लिम नागरी कायद्यावर चालते. शरियतचे चार प्रमुख स्त्रोत, कुराण, सुन्ना (हादिस), इज्जमा (एकमत), कियास (अनुमान) व फतवा हे आहेत. इस्लामी संस्कृतीचे

पुढील आधारस्थंभ होत ज्यामध्ये परमेश्वर, कुराण, प्रेषित रसूल, ईश्वरीय आदेश, अंतिम निवाड्याचा दिवस आदी आहेत. ईश्वरी प्राप्तीच्या मार्गामध्ये तक्वा, इस्लाम, तवकुल, सब्र व शुक्र या तत्वाचे मार्गदर्शन होते.

प्रेषित कुरेशी या टोळीत जन्मास आला. वयाच्या 25 व्या वर्षी प्रेषिताने खदिजा नामक विधवा स्त्रीशी विवाह केला. तरूण वयापासून प्रेषित एकांतप्रिय होता. हिरा पर्वतावर महंमदास साक्षात्कार झाला आणि त्याने इस्लामची स्थापना केली. आपले संपूर्ण जीवन प्रेषिताने इस्लामच्या प्रचार प्रसारासाठी घालविले. इ.स. 632 मध्ये प्रेषिताचे निधन झाले पण तो पर्यंत जवळस संपूर्ण अरबस्तान इस्लाममय झाला होता. प्रेषिताच्या शिकवणुकीने अरब समाजाला आत्मविश्वास प्राप्त झाला. शंभर वर्षांच्या कालावधीत इस्लामचे साम्राज्य युरोप, आफ्रिका, मध्य आशिया पर्यंत पसरले होते. तत्कालीन ख्रिश्चन धर्माची तुलना करता इस्लामचा संदेश केवळ अरबांच्या वर नव्हे तर ते ज्या ज्या ठिकाणी गेले त्या त्या ठिकाणच्या लोकांवर फार मोठा परिणाम झाला. बेलगाम राजे व शिरजोर पुरोहित यांच्यामुळे जनता त्रस्त झाली होती. तिला बदल हवा होता. इस्लामने तो बदल दिला. यावरून असे म्हणता येईल, महंमद पैगंबर आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत जनतेला सन्मार्ग दाखविण्यासाठी झटत होते.

इस्लामच्या साम्राज्याला इ. स. 1258 पासुन उतरती कळा लागली. पुढे खलिफाचे पद नामधारी राहिले. जे कमाल पाशाने 3 मार्च 1924 रोजी रद्द करून टाकले. भारतामध्ये अरबांच्या वसाहती इ. स. 7 व्या शतकापासून होत्या आणि भारताच्या किनारपट्टीवर अनेक अरब स्थाईक झाले होते. इ. स. 710 मध्ये महंमद बीन कासिमने आक्रमण केले. सिंध प्रांत जवळपास 150 वर्षे अरबांच्या ताब्यात होता. इ. स. 1206 पासुन इ. स. 1757 पर्यंत भारतामध्ये इस्लामिक राजवट होती आणि त्यानंतर ब्रिटिश सत्तेचा उदय झाला. भारतामध्ये धर्मांतराने व काही वेळा हुकुमशाहीमुळे हजारो भारतीय इस्लामचा स्विकार करून मुसलमान झाले. भारतातील बहुसंख्य मुसलमान हे पूर्वाश्रमीचे हिंदूच आहेत. त्यामुळे जरी ते धर्मांतरित झाले. तरी त्यांनी आपली जातीव्यवस्था इस्लाममध्येही कायम ठेवलेली दिसते. भारतामध्ये अनेक वेगवेगळया पंथातील मुसलमानांमध्ये अनेक फरक दिसून येतात. मुस्लिम समाजरचनेवर प्रादेशिक संस्कृती आणि भाषा यांचा प्रचंड प्रभाव दिसून येतो. भारतीय मुसलमान हा धार्मिक व वांशिकदृष्ट्या येथील हिंदूपेक्षा फारसा वेगळा नाही. यांचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील बहुसंख्य मुस्लिम हे धर्मांतरित आहेत. मूलतत्ववादाच्या चळवळीस भारतात फारसा प्रतिसाद मिळालेला दिसत नाही कारण भारतीय मुसलमान पूर्णतः पोथीनिष्ठ नाहीत. अनेक जाती जमातींनी इस्लामचा स्विकार केला असला तरी सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या ते भारतीय संस्कृतीचा एक घटक आहेत.

मुस्लिमांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करताना असे दिसून येते की मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. शिक्षणाबाबतची अनास्था व आधुनिकतेला विरोध मुसलमानांमध्ये अधिक प्रमाणात

जाणवतो. मुसलमानांमध्ये असलेले आर्थिक व सामाजिक मागासलेपण या बाबीस कारणीभूत आहेत. शिक्षण नसल्यामुळे आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मुसलमान मागे आहेत. मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येचा 80 % पेक्षा अधिक भाग हा अकुशल कामगारांचा आहे. हिंदू धर्मीयातील ज्या बलुतेदारांनी धर्मांतर केले त्यांच्यातील जातीव्यवस्था नष्ट होऊ शकली नाही त्यामुळे त्यांच्यात रोटी व्यवहार होत असले तरी बेटी व्यवहार होऊ शकत नाहीत. जगातील सर्व मुसलमान एक आहेत असे इस्लामचे मत असले तरी भारतीय मुसलमान जातीव्यवस्थेपासून मुक्त होऊ शकला नाही. उर्दूला मुसलमानांची धर्मभाषा बनविण्याचा प्रयत्न गेल्या 70/80 वर्षापासून होत आहे पण उत्तर भारतातील काही भाग वगळता भारतीय मुसलमान हा प्रादेशिक बोली भाषा व हिंदीचा वापर करतो. सरकारी नोकरीमध्ये फक्त 5 % मुसलमान आहेत यावरून सार्वजनिक क्षेत्रातील मुस्लिमांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसते. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वितरण व्यवस्था या क्षेत्रातील सुविधा मुस्लिमांना उपलब्ध होत नाही. साक्षरतेचे प्रमाण या समाजामध्ये अत्यंत कमी आहे. मुस्लिम महिलांची परिस्थिती अधिक वाईट आहे. बुरखा पध्दती, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, यामुळे मुस्लिम महिलांची स्थिती निराधार झाली आहे.

वरील सर्व बाबींवरून असे म्हणता येईल की मुस्लिम समाजामध्ये प्रगतीची चिन्हे दिसून येत नाहीत कारण मुस्लिम समाजाची वाटचाल अत्यंत संथ गतीने सुरू आहे. एकीकडे हा समाज डबक्याप्रमाणे दिसतो तर काही क्षेत्रामध्ये या समाजातील लोक आपली छाप सोडून देत आहेत.

जागतिकीकरणाचा रेटा मानव जातीला प्रगतीपथाकडे ढकलत आहे. यास हिंदुस्थान ही अपवाद नाही. आजच्या मुस्लिम समाजाने शिक्षणाची कास धरली तर तो समाज निश्चित प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागेल व एका समृध्द बलशाली व बलिष्ठ हिंदुस्तानच्या पायाभरणीत आपले योगदान देईल याबद्दल संशोधकाच्या मनात कोणताही संशय नाही.

विज्ञानवादाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे माणूस आपली बुध्दी धर्मश्रध्दांकडे गहाण न ठेवता स्वतंत्र विचार करू लागतो आणि नवनवीन माहिती व तंत्रज्ञान शोधून काढतो. या सर्वांसाठी तो असंख्य वेळा प्रयोग करतो आणि येणारे निष्कर्ष वैज्ञानिक नियमांच्या माध्यमातून स्वीकारतो. विज्ञानवादी दृष्टीकोनामुळे यंत्रसंस्कृतीचा विकास होतो. वैज्ञानिक नियम सत्यतेच्या कसोटीवर उतरतात. आज माणसाचे पाऊल आकाश गंगेच्या दुसऱ्या टोकाकडे जात आहे. मानव निर्मीत याने शनि, मंगळ नव्हे तर सूर्यमालेच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन पोहचली आहेत. या सर्वांतून मानव जातीचे भविष्य मंगलमय होणार आहे आणि मानव जातीचा ऐहिक अभ्युदय होण्यास मदत होत आहे. एक निरोगी जीवनशैली विज्ञानवादी दृष्टीकोनाचा स्वीकार केल्यामुळे मानवाला उपलब्ध होत आहे. वेगवेगळ्या रोगांवर नवनवीन औषधे बाजारामध्ये आज उपलब्ध होत आहेत. त्याचे कारण देखील

विज्ञानवाद हेच आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार केल्यानंतर आपण म्हणू शकतो की विज्ञानवादी विचारांच्या स्वीकारामुळेच मनुष्य सुखी होईल. या सर्व बाबींसाठी विज्ञान वादाची मनुष्यजातीला गरज आहे नव्हे तर ती त्याची आवश्यकता सुध्दा आहे. धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व इहवाद या कल्पनांचा जगभर सर्वत्र स्वीकार झाला याचे साधे, सोपे कारण आहे की जगातील इस्लामेत्तर धर्म आपणामध्ये सुधारणांना वाव आहे असे मानतात. युरोप व हिंदुस्थानात प्रबोधनाची दीर्घ परंपरा आहे. परंतु दुर्दैवाने इस्लामला ती परंपरा नाही आणि इस्लाममध्ये कुराणापलिकडे काही नाही हा जो दुराग्रह दिसून येतो त्याचाच दुष्परिणाम इस्लाममध्ये या तत्वाचा जाणीवपूर्वक स्वीकारलेला गेला नाही.

आजच्या युरोपच्या प्रगतीचे रहस्य इहवादी परंपरेत लपलेले आहे असे म्हणणे अनुचित होणार नाही बुध्दीप्रामाण्यवाद, विवेक स्वातंत्र्य प्रवृत्तीपरता, धर्माची, इतिहासाची, परंपराची कठोर चिकित्सा करणारे, वेळप्रसंगी मृत्युदंड हसत स्विकारणारे तत्वज्ञ, शास्त्रज्ञ, कलावंत आणि लेखक युरोपमध्ये सदैव निर्माण होत राहिले म्हणूनच युरोप इहवादाचा स्विकार करू शकला आणि अंध धर्मसत्तेला त्याने फेकून दिले. गेल्या सहाशे वर्षाचा युरोपचा इतिहास हा प्राधान्याने अंध धर्मश्रध्दा व धर्मसत्ता या बरोबर इहवादाच्या संघर्षाचाच इतिहास आहे.

मध्ययुगीन भारतीय समाजाचे स्वरूप व जडण घडण यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यात एक सामाजिक शक्ती म्हणून सूफी पंथाने महत्वाची भूमिका बजावली. शांततामय व अहिंसक मार्गानी इस्लाममध्ये धर्मांतर घडवून आणण्यास उत्तेजन देवून सूफींनी मुस्लिम समाजाचे संख्याबळ वाढविले. मुस्लिमांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन घडविण्यात सूफींनी महत्वाची भूमिका बजावली. मुस्लिमांचे भारतीयकरण लवकरात लवकर घडून यावे यासाठी त्यांनी अनुकूल घटनांना चालना दिली. जीवनाकडे पाहण्याचा एक निरोगी व विवेकनिष्ठ दृष्टीकोन विकसित केला. हिंदू मुस्लिम यांच्यात समेट घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावली. थोडक्यात सूफींनी भारतात मानवतावादी व हिंदू-मुस्लिम यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. हिंदू-मुस्लिमांच्या आचार विचारांची देवाण घेवाण होवून एक संमिश्र संस्कृती उदयास आली. परस्पराबद्दलची व्देष भावना कमी होवून दोन्ही धर्माच्या समाजात समन्वय निर्माण झाला.

पहिल्या महायुध्दानंतर उध्वस्त झालेला, अस्मिता विसरलेल्या आणि अपमानित झालेल्या तुर्कस्थानात नवचैतन्याचे वारे निर्माण करून नवराष्ट्राची निर्मिती करणारा म्हणून कमाल पाशाचे नाव जगाच्या इतिहासात अजरामर झाले. कमाल पाशाने मातृभूमीवरच्या आपल्या प्रेमातून निराश झालेल्या तुर्की तरूणात जागृतीचे कार्य केले. राष्ट्रप्रेमाची ज्योत त्यांच्या मनात निर्माण केली. अत्यंत कठीण परिस्थितीत देशाचे नेतृत्व कमालने आपल्याकडे घेतले. देशात नैराश्याची लाट पसरली होती. सेव्हरेस तहाने तुर्कस्थानच्या प्रदेशाची चिरफाड केली

होती. त्याच वेळी देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी कमालने आपल्या अंगावर घेतली त्याने लोकात राष्ट्रप्रेम निर्माण केले. स्वत्व आणि स्वाभिमान तुर्कांच्या अंतःकरणात रूजविला. तुर्की परंपरा सुदृढ करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक होत्या, त्या कमाल पाशाने विरोधकांची पर्वा न करता केल्या. आधुनिक वैज्ञानिक युगात उद्योग व्यवसाय, वाहतुकीची साधने, कृषी विस्तार, लष्करीकरण, आरमार अशासारखे योजनाबध्द कार्यक्रम हाती घेवून राष्ट्राची उन्नती केली. कारागीर, व्यापारी आणि मजूर वर्ग या सर्व वर्गात सहकार्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्योत्तर भारतीय मुस्लिम विचारवंताच्या विचाराचा हा धावता आढावा घेतल्यावर आपण या निष्कर्षप्रत पोहचवतो की आधुनिक हिंदी मुस्लिम विचारवंत धर्माच्या पलीकडे पाहू लागले आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब म्हणून स्विकारण्यास त्यांची काहीही हरकत नाही परंतु धर्माच्या नावाखाली कर्मठ, पुरातन, रूढी व परंपरा जपण्यास त्यांचा विरोध आहे. एवढेच नव्हे तर इतिहासाकडे पाहण्याची त्याची दृष्टीही वेगळीच आहे. अनिष्ठ रूढी परंपरामुळे मुस्लिम समाजाला वारंवार शिकार व्हावे लागते त्या सर्व परंपराचा मुस्लिम विचारवंतानी धिक्कार केलेला दिसतो. जागतिकीकरणाच्या या लाटेमध्ये आज धर्मापेक्षा अर्थशास्त्र महत्वाचे ठरले आहे. त्याचेच प्रतिबिंब प्रस्तुत विचारवंतांच्या लेखनात पडलेले आपणास दिसून येते.

मुस्लिमांचे मागासपण, बेरोजगारी, जातीय मनोवृत्ती, तलाक समस्या, बहुपत्नीत्व समस्या, फुटीर प्रवृत्ती, धर्मांधता, शैक्षणिक मागासलेपण, उर्दू भाषेचा अतिरेकी आग्रह, कुटुंब नियोजना बाबत अज्ञान स्वतःच्या कोषात रमण्याची प्रवृत्ती, बुरखा पध्दती इत्यादी बाबीवर खुल्या मनाने विचार व्यक्त करणारी हिंदी मुस्लिम विचारवंताची पिढी आज पुढे येत आहे व मुस्लिम समाजाला प्रबोधनाच्या दिशेने पुढे घेऊन जात आहे असे म्हणता येईल.

आज ही इस्लामी मन कुराण व धर्माच्या जोखडाखाली आहे. इस्लामी मन स्वतंत्र बुध्दीने विचार करू शकत नाही. या साठी धर्माच्या, धर्मग्रंथाच्या पलिकडे जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे आणि अंधश्रध्दा, रूढी यांचा मुस्लिम मनावर जो पर्यंत पगडा आहे तो पर्यंत मुस्लिम मन ऐहिक गोष्टींऐवजी पारलौकिक गोष्टींमध्येच सदैव रमत असते. आपले जीवन यशस्वी व सुंदर होण्यासाठी धर्माने सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून जे वर्तमानाशी सुसंगत आहे केवळ त्याचाच स्वीकार करणे गरजेचे आहे. धर्मग्रंथ अपरिवर्तनीय आहे आणि त्यात कसलाही बदल अपेक्षित नाही अथवा कोणीही त्यात बदल करू शकत नाही असा दुराग्रह बाळगणाऱ्या धर्मांचे व समाजाचे भविष्य हे कायम अंधारात बुडलेले असते. यासाठी इहवादाचा स्वीकार करूनच समाजाला प्रगतीचे इप्सित साध्य करता येईल हा हमीद दलवाईंच्या इहवादाचा गाभा आहे असे संशोधकास वाटते.

18 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारतीय समाज परंपरावादाच्या विळख्यात अडकुन पडला होता. त्याला स्वतःच्या दोषांची जराही जाणीव नव्हती. उलट तेथील सनातनी व परंपरावादी मंडळी आपला धर्म आणि आपली संस्कृती आदर्शवत आहे असे समजून चालली होती. परंतु सामाजिक सुधारणा चळवळींनी भारतीयांना त्यांच्या दोषांची जाणीव करून दिली. त्यामुळे समाजाची हळूहळू मानसिकता बदलू लागली. आपल्या धर्मात व समाजात अनेक चुकीच्या गोष्टी आहेत. आपल्या प्रगतीसाठी या गोष्टीवर मात करणे गरजेचे आहे असे त्यांना वाटू लागले. महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीमुळे भारतीय जनतेच्या सामाजिक व राजकीय जाणिवाही प्रगल्भ होत गेल्या. आपल्या समाजातील अनेक समस्यांचे मूळ सामान्य लोकांच्या निरक्षरतेत आहे याची जाणीव समाजसुधारकांना झाली त्यामुळे त्यांनी समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी याविरूध्द लोकांत जागृती घडवून आणतानाच शिक्षण प्रसाराकडेही लक्ष दिले. त्यातुन सामाजिक व राजकीय जागृती घडुन येण्यास चांगली मदत झाली. भारतातील सुधारणा चळवळींचा प्रभाव राजकीय क्षेत्रावरही पडला होता. सुधारणा चळवळींनी भारतीय जनतेत नवजागृती घडवुन आणली. त्यांच्यात आधुनिक विचारांचा प्रसार केला. भारतीय लोकांत विज्ञानवादी दृष्टीकोन रूजविण्याचे कार्यही या चळवळींनी केले. त्यातून भारतीय लोकांना राष्ट्रवादी विचारांची माहिती झाली. त्यांच्यात आपल्या राष्ट्राविषयी आत्मीयता निर्माण झाली.

सर सय्यद अहमदखान, शाह वलीउल्लाह, सय्यद अहमद बरेली, रशीद अहमद गंगोही, इत्यादी नेत्यांनी मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यातुन वहाबी चळवळ, अलिगढ चळवळ, देवबंद चळवळ इत्यादी चळवळी आकाराला आल्या. मुस्लिम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि मुस्लिमांनी आधुनिक दृष्टीकोनाचा अंगीकार करावा म्हणून सर सय्यद अहमद खान यांनी अलिगढ चळवळीव्दारे प्रयत्न केले. परंतु वहाबी चळवळ आणि देवबंद चळवळ या चळवळींवर सांप्रदायिकतेचा व परंपरावादाचा प्रभाव होता. देवबंद चळवळीचा प्रमुख उद्देश मुस्लिमांना धार्मिक शिक्षण देणे आणि धर्मकार्यासाठी तरूणांना प्रशिक्षित करणे हा होता. त्यामुळे मुस्लिम धर्मीयात सांप्रदायिकतेला उत्तेजन देण्यास ही चळवळ कारणीभुत ठरलेली दिसते. मुस्लिम समाजातील या सुधारणा चळवळींमुळे शहरी मुस्लिम समाजाने आधुनिकता स्विकारण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रबोधन प्रक्रियेस गती आली. धार्मिक पुनर्रचना, नैतिक सुधारणा आणि एकतेची गरज या गोष्टी मुस्लिम समाजात मान्य होऊ लागल्या. या सुधारणावादी चळवळीमुळेच सत्यशोधक हमीद दलवाईंनी आधुनिक काळात मुस्लिम समाजामध्ये असणाऱ्या मागासलेपणाचे मुख्य कारण त्याचे आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण आहे हे जाणून मुस्लिम समाजाला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्यामध्ये वैज्ञानिक

आणि इहवादी दृष्टीकोन जोपासण्यासाठी व मुस्लिम समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केलेली दिसून येते.

मुस्लिम समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रध्दा चौकटीमुळे उदारमतवादी विचारापासुन हा समाज दूर गेला. आत्मनिरिक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाजामध्ये त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. आर्थिक द्रारिद्रय, शैक्षणिक मागासलेपणा, परिणामतः मुस्लिम समाजाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक विकासात अडसर निर्माण झाला. मुस्लिम समाजात असलेली विसंगती स्पष्ट करून ती दूर करणे, धर्मांतर्गत सुधारणांबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक विकास घडवून आणून मुस्लिम समाजाला सांप्रदायिकतेच्या व अंधप्रामाण्यवादाच्या जोखडातुन मुक्त करण्याची गरज आहे. त्याशिवाय मुस्लिम समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. म्हणूनच सत्यशोधक मुस्लिम चळवळ आधुनिक लोकशाही समाजाची मूल्ये, धर्मातीत इहवाद व विज्ञानाच्या सहाय्याने मुस्लिम समाजाचे कल्याण साधू इच्छिते.

अशा असंख्य मुद्यांचा विचार करून हमीद दलवाईंनी सेक्युलर व राष्ट्रवादी समाजनिर्मितीसाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. जगामध्ये जो पर्यंत मानव जात आहे. तो पर्यंत नवनवीन समस्या निर्माण होत राहतील. या सर्व समस्या शेवटी भाकरीशी, पर्यायाने आर्थिक कारणाशी निगडीत असतात. जगण्याची धडपड हा माणसाचा खरा धर्म आहे आणि या धडपडीतूनच या समस्या निर्माण होत असतात. जी गोष्ट मानव जातीला लागू आहे. पर्यायाने ती इस्लामलाही लागु आहे. समस्या ह्या सदैव निर्माण होत असतात आणि त्यावर मात करीत मानव जातीचा प्रवास सदैव चालुच असतो. समस्यांचा पाडाव करण्यासाठी शुध्द वैज्ञानिक दृष्टीकोनाची आवश्यकता असते आणि ते इहवादामुळेच निष्पन्न होते. मुस्लिम समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व इहवादाची जोपासना व्हावी हे हमीद दलवाई यांचे स्वप्न होते. हिंदू धर्माला ज्याप्रमाणे चार्वाक, बुध्द, महावीरापासुन अनेक विचारवंताची परंपरा आहे. दुर्दैवाने इस्लामच्या इतिहासात अशी परंपरा 19 व्या शतकापर्यंत दिसून येत नाही म्हणुन भारतातील हिंदू धर्म चिकित्सेचा आधार घेऊन पुढे निघुन गेला तर मुस्लिम समाज तेराशे वर्षांच्या जुन्या रूढी, परंपरा व धर्मश्रध्दा यांना कवटाळुन बसला आहे, हे हमीद दलवाई यांच्या लक्षात आले. महात्मा फुले यांनी हिंदू धर्मामध्ये सुधारणा करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व हिंदू धर्मातील जुनाट रूढी, परंपरा व अंधश्रध्दा यांना दूर करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुल्यांचा आदर्श समोर ठेवून सामाजिक सुधारणाचे कार्य मुस्लिम समाजात करण्यासाठी हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन केले.

जोपर्यंत या भूतलावर मनुष्य प्राणी अस्तित्वात आहे तो पर्यंत तो आपल्यापुढे नवीन समस्या निर्माण करणार. जगण्याच्या धडपडीतुनच समस्या निर्माण होत असतात म्हणजे समस्या या न संपणारी साखळी आहे.

त्याचमुळे समस्यांवर उपाय हाही न संपणारी धडपड बनते. मुस्लिम सत्यशोधक मंडळ त्या न संपणाऱ्या सुधारणा मागत राहणार असा त्याचा अर्थ आहे. खरे तर समस्या दूर करता येतील पण त्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन हाच एकमेव उपाय अंमलात आणता येईल व त्याव्दारेच समाजाची प्रगती करता येईल. म्हणूनच हमीद दलवाईंनी मुस्लिम स्त्रीला तिच्या मानसिक व बौध्दीक गुलामगिरीतून मुक्त करून तिला समाजामध्ये मानाचे स्थान व समानता मिळवून देण्यासाठी, तसेच जुन्या परंपरागत विचारांना घट्ट चिकटुन बसलेल्या मुस्लिम समाजाला नवी दिशा दाखवून देण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.

आज महाराष्ट्राने शिक्षण, आरोग्य, कृषिविकास, पाटबंधारे, सहकार, औद्योगिकरण, दळवळण इत्यादी अनेक बाबतीत मोलाची प्रगती केली आहे. त्यामुळेच महाराष्ट्राची अनेक बाबतीत देशातील आघाडीच्या राज्यात गणना केली जाते. याचा अर्थ असा नव्हे की महाराष्ट्रात आज सर्व काही व्यवस्थीत आहे. आज पन्नास वर्षांनंतर महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा करताना, तो विकास समतोल पध्दतीने झाला नाही, हे स्पष्ट दिसते. शिक्षणापासून आरोग्यापर्यंत आणि गृहनिर्माणापासून शेतकऱ्याच्या प्रश्नांपर्यंत सर्वत्रच विषमतेची दरी वाढत आहे. महाराष्ट्र हे विकसित राज्य आहे. मात्र त्याचे अनेक विभाग विकासापासुन दूर राहिले आहेत. विदर्भात हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी या विकासासमोर प्रश्नचिन्ह उभे केलेले आहे. तसेच राज्यात दरवर्षी कुपोषणाला बळी पडणाऱ्या शेकडो आदिवासी मुलांच्या मृत्युचेही तेवढेच मोठे प्रश्नचिन्ह आता उभे राहिले आहे. विकासाच्या असमतोलाचे चटके विदर्भाएवढेच मराठवाडा आणि कोकण या प्रदेशाला बसत आहेत. कोणत्याही राज्याच्या आर्थिक विकासाचे मोजमाप त्याच्या तिजोरीत पडणाऱ्या पैशांच्या आकडेवारीवरून करता येत नाही. तर या तिजोरीतून बाहेर पडणारा पैसा, त्या राज्याच्या सामान्य नागरिकांपर्यंत किती प्रमाणात व कसा पोहोचतो यावरच त्याचे गणित मांडता येणे शक्य आहे. पुरोगामी विचारसरणीचा वारसा असलेल्या या राज्यात वैचारिक व सामाजिक क्रांतीही अत्यंत वेगाने होत आहे. देशाच्या नकाशावर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्राने आपले नाव कोरले आहे. एकुणच महाराष्ट्राचा विकास अत्यंत वेगाने होत असतानाच विकासाची दुसरी बाजूही अत्यंत विदारक स्वरूपाची असलेली दिसते. विकासाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीची हानी होत आहे. पाण्याचा अनियोजीत वापर, शहरांची भरमसाठ वाढ व त्यातून निर्माण होणारे सांडपाण्याचे प्रश्न, अत्यंत वेगाने होणारी वाहन उद्योगाची प्रगती व वाढत्या वाहनांमुळे रस्त्यांवर पडणारा ताण, कृषिविकासाच्या चुकीच्या संकल्पना व त्यातुन निर्माण होणारी हरितवायु उत्सर्जनाची समस्या, पश्चिम महाराष्ट्राच्या ऊस पट्ट्यात निर्माण झालेली जमिनीच्या क्षारीकरणाची समस्या, खनिजांचे अतिरेकी उत्खनन इत्यादी सारख्या समस्या आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. या समस्या राज्याच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करीत आहेत.

महाराष्ट्राच्या भविष्यकालीन प्रगतीवर या गंभीर परिणाम करणाऱ्या आहेत. या सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करून त्यावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे.

भारतीय धर्मजीवनातील प्रत्येक धर्माचे अस्तित्व स्वतंत्र व भिन्न आहे. तसेच परस्पराना पूरक आहे. ते जसे परस्परांना पूरक आहे तसे काही बाबतीत विरोधक ही आहे. जेव्हा हे विरोधी घटक तीव्र होतात तेंव्हा सुसंवाद राखणारा धर्म विसंवादाचे कारण बनतो आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मतेला धोका होतो.

मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समता, बंधुभाव या मूल्यांचा प्रसार करणेसाठी हमीद दलवाईंनी 22 मार्च 1970 रोजी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम समाजाच्या इतिहासातील ही पहिली सुधारणावादी व पुरोगामी क्रांतिकारी संघटना म्हणावी लागेल. अशा या संघटनेने 1970 ते 2000 या काळात ज्या पुरोगामी परिषदांचे आयोजन केले आणि त्यातुन समाजाला नवी दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे या चळवळीने शाहबानो पोटगी प्रकरण, शरीफा मुल्ला प्रकरण, तलाक मुक्ती मोर्चा, समान नागरी कायदा या बाबतही चांगल्या प्रकारचे योगदान देऊन मुस्लिम समाजाचे प्रबोधन घडवून आणले आणि त्याच प्रमाणे मुस्लिम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करणेमध्ये व मंडळाचे कार्य पुढे नेण्यामध्ये समाजवाद्यांनी ज्या प्रमाणे सहकार्य केले त्या प्रमाणेच मुस्लिम समाजातील पुरोगामी विचार सरणीच्या काही व्यक्तिंनी हातभार लावला. अशा व्यक्तिंमध्ये प्रा. अ. भि. शहा, प्राचार्य नरहर कुरूंदकर, सय्यदभाई, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई, डॉ. बाबा आढाव इत्यादी व्यक्तिंचा उल्लेख करावा लागेल.

आधुनिक काळातील सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा प्रारंभ इंग्रजी राजवटीत झाला. ह्यापुर्वीच्या शेकडो वर्षाच्या काळात सामाजिक सुधारणांसाठी कुणी प्रयत्न केले नसतीलच असे म्हणता येणार नाही. परंतु तत्कालीन समाजजीवनावर धर्माचे प्राबल्य असल्याने नव्या कल्पनांचा अविष्कारही धर्माच्या माध्यमातून झाला. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हणुन महात्मा फुले यांचेच नाव घ्यावे लागते. ‘परमेश्वराने सर्व स्त्री-पुरूषांना जन्मतः सारखेच अधिकार दिलेले आहेत. म्हणून एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर बळजबरी करण्याचा किंवा तिचे शोषण करण्याचा अधिकार नाही.’ असे महात्मा फुले यांनी विचार मांडले होते. महात्मा फुले यांनी ब्राह्मणी वर्चस्वावर जोराचा हल्ला चढविला आणि स्वतःच्या धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक हक्कांसाठी लढण्याची बहुजन समाजाला शिकवण दिली.

भारतीय राज्यघटनेप्रमाणे प्रत्येक नागरिकाला उपासना स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळेच सर्व मुस्लिमांना त्यांच्या श्रध्देप्रमाणे धर्माचे आचरण करता येते. परंतु सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये मुस्लिम समाजाच्या

अनेक समस्या आहेत. या समस्याचे नेमके स्वरूप काय आहे ? आणि मुस्लिमांची प्रगती होण्यात कोणते अडथळे आहेत ? याबाबत मुस्लिम समाजाचे प्रबोधन झालेले नव्हते, तेव्हा हमीद दलवाई यांनी मुस्लिम प्रबोधनाची चळवळ व्हावी यासाठी प्रयत्न केले आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. हमीद दलवाई यांना परंपरावादी मुस्लिमांनी प्रखर विरोध केला. हमीद दलवाई यांची बुध्दिवादी पुरोगामी भूमिका, मुस्लिमांनी प्रादेशिक भाषेतच शिक्षण घ्यावे हा त्यांचा आग्रह आणि मुस्लिम स्त्रियांवरील सर्व निर्बंध दूर व्हावेत यासाठी त्यांनी केलेली आंदोलने यांच्यामुळे काही ध्येयवादी मुस्लिम कार्यकर्त्यांना मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाची आवश्यकता पटली. खरे तर मुस्लिम समाजात आधुनिकता आणि देशाभिमान यांचा प्रसार करणे हा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा मुख्य उद्देश होता. प्रा. अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव इत्यादी या हिंदू पण हिंदुत्ववादी नसलेल्या सेक्युलर विचारवंतानी तसेच सय्यद भाई, मुनीर सय्यद, अमीर शेख, अन्वर शेख, बशीर तांबोळी, मकबुल तांबोळी, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर, हुसेन जमादार इत्यादींनी हमीद दलवाईंच्या प्रयत्नास मोलाची साथ दिली.

भारतातील इस्लाम धर्माचे आगमन ८ व्या शतकामध्ये झाले. परकीय भूमीवरील हा धर्म येथे रूजवण्यामागे स्थानिक पातळीवरील अनेक कारणे आहेत. विशेषतः हिंदू धर्मातील जातीय चौकट, वर्णाश्रम पध्दती यांमुळे नव्या धर्माकडे लोक आकर्षित झाल्याचा अभ्यासकांचा दावा आहे. इस्लाममध्ये समानतेचा अनुभव दर्शनी पातळीवर अनुभवता येतो असे वाटल्याने अनेकांनी इस्लामचा स्वीकार केला. भारतीय समाज व्यवस्थेत इस्लाम रूजला. पण हे रूजणे भारतीय मानसिकतेच्या अंगाने घडले. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी 'इस्लाम'चा स्वीकार सोयीनुसार केला. भारतीयांसाठी इस्लाम परकीय धर्म स्वाभाविकपणे स्थानिक हिंदूच्या धर्मांतराने येथील मुस्लिम समाजाने आकार घेतला. भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता यामध्ये प्राध्यापक फकरूद्दीन बेन्नुर लिहितात. "भारतातील बहुसंख्य मुसलमान हे धर्मांतरीत आहेत. हे पूर्वाश्रमीचे हिंदू म्हणजे तळागाळातील मागास जाती आणि व्यावसायिक बलुतेदारी जाती-जमाती असून त्यांचे धर्मांतर संपत्तीसाठी किंवा तलवारीच्या जोरावर झालेला नाही. तसे असते तर या मुसलमान जाती दरिद्री आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राहिल्या नसत्या. हिंदू धर्मातील जाती व्यवस्थेच्या जाचापासून सुटण्यासाठी झालेले हे धर्मात्तर आहे."

इस्लाममध्ये समानतेला प्राधान्य आहे. पण भारतीय मुस्लिमांमध्ये ही समानता अभावाने आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा धर्मांतराचा विचार करीत होते तेव्हा त्यांनी 'इस्लाम' धर्म स्वीकारावा असा प्रस्ताव त्याच्या समोर मौलवी हिफ्जू रहमान सय्यदानी व इतरांनी मांडला होता. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले

होते. "मी हे मानतो की तत्वत: इस्लाम धर्म सामाजिक न्याय व मानवी समतेचा पुरस्कर्ता आहे. परंतु भारतात तुम्ही मुसलमान लोक मनुच्या वर्णाश्रम धर्माप्रमाणे वागता व तुम्ही आपल्या समाजाची विभागणी जातीपातीत करून ठेवली आहे." महाराष्ट्राचाच विचार केला तर शहर, ग्रामीण, वाड्या, वस्त्या, भटकंती करणारे अशा विविध पातळ्यांवर मुस्लिमांचे जगणे अनुभवता येते. भारतीय स्तरावर जशी विविधता आहे, तशीच विविधता मुस्लिम समाजाच्या एकंदर स्वरूप रचनेमध्ये आहे.

हमीद दलवाईंच्या मते मुस्लिम मन हे कुराण, हदीस, पैगंबराचे जीवन व इस्लामिक परंपरा यांच्या आधारेच बनले आहे. सनातनी व मूलतत्ववादी हे इस्लाममध्ये पूर्ण धर्म व परिपूर्ण समाज आहे असे मानतात. त्यांच्या दृष्टीने महंमद पैगंबरानी जो विचार दिला त्याचे फक्त अनुकरण करणे व कोणत्याही परिस्थितीत चिकित्सा न करणे हे आपले काम आहे. थोडक्यात इस्लामची चौकट बंदिस्त आहे. कुराण हा इस्लामचा अंतिम आदेश असून कुराणातील विचारावर या धर्मांच्या सर्व प्रक्रिया अवलंबुन आहेत. 'शरियत' नुसारचे वर्तन ग्राह्य मानले जाते या व्यवस्थेला आव्हान देण्याला धर्मविरोधी कृत्य मानले जाते. ही सर्व प्रक्रिया राबविण्यामध्ये पुरूषी वर्चस्व स्पष्टपणे पुढे असलेले दिसते. याचा सर्वाधिक फटका मुस्लिम स्त्रियांना बसलेला दिसून येतो. मुसलमान आजही मध्ययुगीन अंधश्रध्दांना कवटाळुन बसल्यामुळे आधुनिक जगात ते मागे पडत चाललेले दिसतात. तेंव्हा इस्लामची ध्येये, धोरणे काळाशी सुसंगत ठेवून बदलाची प्रक्रिया सुरू करावयास हवी अशी भूमिका हमीद दलवाईंनी घेतली. 20 व्या शतकातील ही क्रांतिकारी घटना आहे. पुरोगामी विचारांची ही चळवळ नवा विचार घेऊन पुढे आली. शरियत, तलाक, बहुपत्नीत्व अशा मुद्यांना घेऊन 'मुस्लिम सत्यशोधक चळवळ' महाराष्ट्रात उभी राहिलेली दिसते.

19 व्या शतकातील उदारमतवाद्यांनी धर्म आणि व्यवहार यांची फारकत केली होती. प्रत्येक माणसाचे धार्मिक स्वातंत्र्य त्यांनी मान्य केले. लोकांच्या धर्मभावनेला नवे वळण लावण्यासाठी त्यांनी प्रार्थना समाज सत्यशोधक समाज अशा संस्था स्थापन केल्या. यावेळी राजा राममोहन रॉय, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिबा फुले, न्या. महादेव गोविंद रानडे इत्यादींनी पाश्चात्य देशातील सामाजिकशास्त्रे व भारतीय परंपरा यांचा सखोल अभ्यास करून भारतात समाजविज्ञानाचा पाया घातला. पुढे भारतीय संविधानाची उभारणी धर्मनिरपेक्ष शासनाच्या तत्वावर करण्यात आली. घटनेने भारतातील सर्व नागरिकांना समान अधिकार दिलेले आहेत. प्रत्येकाला धार्मिक बाबतीत श्रध्दा, आचार, विचार, प्रसार आणि धर्मांतर यांचे स्वातंत्र्य आहे. धर्म, पंथ, जाती, भाषा आणि लिंग या पायावर शासन नागरिकांमध्ये भेदाभेद करणार नाही अशा घटनेने नागरिकांना हमी दिलेली आहे. मात्र घटना मंजूर होऊन 63 वर्षे गेली असली तरी सामाजिक व राजकीय व्यवहारातील धर्मांचे प्रस्थ

कमी होण्याऐवजी वाढतच आहे. घटनेचा पाठिंबा हे इहवादाचे मोठे सामर्थ्य असलेले दिसते. घटनेतील या धर्मनिरपेक्ष शासनाच्या तत्वाचा आधार घेऊन धर्मनिरपेक्षतेच्या दिशेने समाजाला वाटचाल करायला लावण्यासाठी परिवर्तनवाद्यांनी प्रयत्न केले पाहिजेत या विचारसरणीतुन हमीद उमर दलवाई यांनी पुणे येथे स्थापन केलेली मुस्लिम सत्यशोधक चळवळ ही 20 व्या शतकातील एक क्रांतिकारी घटना असलेली दिसते. इस्लामची ध्येये धोरणे काळाशी सुसंगत ठेवुन बदलाची प्रक्रिया सुरू करावयास हवी अशी भूमिका हमीद दलवाईंनी घेतलेली दिसून येते. पुरोगामी विचारांची ही चळवळ नवा विचार घेऊन पुढे आली. हमीद दलवाई यांनी प्रथमतः भारतातील मुसलमानांच्या वर्तणुकीचा अभ्यास केला. चिंतन केले आणि ते अशा निष्कर्षाला आले की, मुसलमानांच्या वर्तणुकीमागे विशिष्ट संस्कारांनी बनलेले त्याचे मन आहे. आणि हे संस्कार प्रामुख्याने मुसलमानांच्या धर्मामधून म्हणजे इस्लाममधुन उगम पावलेले आहेत. तेव्हा सामाजिक जीवनामधुन धर्माचे प्रामाण्य नष्ट करून आणि या देशाच्या भवितव्याशीच आपले भवितव्य जोडलेले आहे हे लक्षात घेऊन त्यांनी मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हावे असे प्रबोधन करीत देशभर भ्रमंती केली होती.

हिंदू समाजात अनेक धर्मसुधारक झाले. त्यांनी आपल्या समाजातील रूढ आचार विचारांचे परीक्षण करून आपल्या धर्माला काळानुरूप असे नवे रूप देण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची जागृती भारतीय मुसलमानांत झाली नव्हती. हमीद दलवाई हे या दृष्टीने भारतीय मुसलमानांमध्ये पहिले धर्मचिकित्सक होते असे म्हणावयास हरकत नाही. हमीद दलवाईंनी आपल्या लेखांमधुन व भाषणांमधून मुस्लिम मनोवृत्ती व वर्तन यांचे कठोरपणे आणि बुध्दिवादी, इहवादी दृष्टीतून परीक्षण केले. त्यांचे दोष दाखविले, तसेच सनातनी, कर्मठ ढोंगी नेत्यांवर कोरडे ओढले आणि 'आधुनिक व्हा', 'जुने कालबाह्य आचार-विचार सोडा' असे मुसलमानांना आवाहन केले.

मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे संस्थापक हमीद दलवाई यांची चळवळ विषयक भूमिका फार व्यापक होती. भारतात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद रूजला पाहीजे. त्यातही मुस्लिम समाजामध्ये धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रवाद या दोन्ही गोष्टी रूजवण्यासाठी चळवळीचे प्राधान्य राहील असे दलवाई म्हणत असत. मुस्लिम समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव असुन तो दृष्टीकोन मुस्लिमांनी स्विकारावा, उर्दू भाषेऐवजी प्रादेशिक भाषेत शिक्षण घ्यावे व प्रादेशिक संस्कृतीपासुन अलग राहण्याचा आग्रह धरू नये असे मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे प्रवर्तक हमीद दलवाई यांना वाटत असे. हमीद दलवाईंना अल्प आयुष्य मिळाले परंतु त्या काळात त्यांनी केलेल्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद देणारे सहकारीही लाभले व प्रचंड विरोधही झाला. पण चळवळीचे मुद्दे ठळकपणे लोकांसमोर नेण्यात त्यांना यश लाभले. हमीद दलवाई जितक्या कठोरपणे मुस्लिम धर्मांधांना रागवत असत तितक्याच कठोरपणे ते हिंदुत्ववाद्यांच्या विरोधातही बोलत होते. त्याकाळी गोहत्या प्रतिबंधक कायद्याच्या मागणीला विरोध

करणाऱ्यांमध्ये प्रा. अ. भि. शहांबरोबर दलवाईंसुध्दा आघाडीवर होते. तसेच त्या काळात अरब-इस्त्राईल व पॅलेस्टाइनचा मुद्दा गाजला होता. त्याही प्रश्नांवर दलवाईंनी पॅलेस्टाईनच्या लढ्याला पाठिंबा देण्याची व इस्त्राईलच्या आक्रमतेला विरोध करणारी भूमिका घेतली होती.

हमीद दलवाई आपली भूमिका जाहीरपणे मांडत. पण त्या काळातील मुस्लिमांना ते आवडत नव्हते. हमीद दलवाईंनी कर्मकांडावर टीका केली त्यावेळी त्यांना मुस्लिम विरोध करू लागले. हिंदू-मुस्लिम दंगलीत मुस्लिमांनी संयम पाळला पाहीजे हे दलवाईंचे म्हणणे कोणला पटत नव्हते. पण हमीद दलवाई यांनी कोणत्याही धर्माचा अनादर केला नाही. त्यांची नास्तिक असण्याची भूमिका व्यक्तिगत होती. ती संपूर्ण सत्यशोधक मंडळाची नव्हती असे दिसते. कोल्हापूरातील ज्या मोमीनपुरा इथे हमीद दलवाईंवर हल्ला झाला होता तिथे आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाला काम करण्यासाठी विनामूल्य जागा मिळाली आहे. हे मंडळाचे यश मानावे लागेल.

भारतीय मुस्लिम समाज नोकऱ्यांच्या व आर्थिक बाबतीत मागासलेला दिसतो त्याचे खरे कारण तो शिक्षणात मागासलेला आहे. त्यांनी उर्दू हीच मुस्लिमांची मातृभाषा आहे असा प्रथम आग्रह धरला होता. परंतु मुस्लिम सत्यशोधक मंडळाने कार्य करीत असताना मुसलमानांनी काळाची पावले ओळखुन उर्दूचा आग्रह सोडून द्यावा व आपापल्या प्रादेशिक भाषेतून मुलांना शिक्षण घ्यावे तरच ते या दुष्टचक्रातून बाहेर पडू शकतील अन्यथा नाही असे मत सत्यशोधक मंडळाने व्यक्त केले होते. ज्यावेळी सर सय्यद अहंमद यांनी मुस्लिमांना इंग्रजी शिकवण्याचा पुरस्कार केला आणि मुस्लिम समाजात नवविचार रूजविण्याचे कार्य सुरू केले त्यावेळी मुस्लिम समाज रूढीवादाच्या चिखलात अडकलेला होता असे दिसून येते. यावेळी धर्मांध किंवा सनातनी मुस्लिम लोकांनी सर सय्यद अहंमद यांना काफीर व इस्लामचा शत्रू म्हणून संबोधले व मुस्लिमांनानी इंग्रजी शिकू नये म्हणून प्रयत्न केला. त्याचाच परिणाम होऊन इंग्रजी शिक्षण न घेतल्यामुळे मुस्लिम समाज इंग्रज काळात खास संरक्षण मिळुनसुध्दा शिक्षणात व परिणामी नोकऱ्यांत, आर्थिक बाबतीत मागासलेला राहिला. धर्मांचा अतिरिक्त प्रभाव, शिक्षणाचा अभाव, धर्मचिकित्सेबद्दलचा अनुत्साह आणि पराकोटीची आग्रही भूमिका यांमुळे मुस्लिमांमध्ये सुधारणेच्या वाऱ्याला सहजा सहजी प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे हा समाज मागासलेला राहिला. शिक्षणाच्या प्रश्नावर मुस्लिम समाजात जागृती करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने कोल्हापूर येथे डिसेंबर 1973 मध्ये एक शिक्षण परिषद भरवून मुसलमानांनी शालेय शिक्षण उर्दूमधून घेण्याऐवजी आपल्या प्रादेशिक भाषेतून घ्यावे असे मुस्लिम समाजाला आवाहन करण्यात आलेले दिसून येते.

धर्मांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय चालीरिती, परंपरा व रूढीविरूध्द लढण्याचा मुस्लिम सत्यशोधकांचा निर्धार होता व अशा अनेक प्रश्नांपैकी सर्वात अन्याय बाब म्हणजे स्त्रियांना तलाक देण्याची पध्दत,

बहुपत्नीत्वाची पध्दत, हमीद दलवाईनी सात महिलांसह पहिला मोर्चा काढला (1969) व पंतप्रधान इंदिरा गांधीना निवेदन दिले होते. व पुढे स्त्रियांच्या विविध प्रश्नाबाबत मंडळाने महत्वाचे कार्य केले. खरे तर मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्त्रियांच्या तलाक बाबत भूमिका वेगळी होती. ती अधिक विशाल अशी होती. त्याचा खरा लढा तलाकविरूध्द नसून स्त्रियांना तलाक देण्याची जी अन्यायी पध्दत आहे त्या पध्दती विरूध्द होता असे म्हणावे लागेल. आज मुस्लिम महिलांनी जी चळवळ पुढे नेण्याचे काम स्वतंत्रपणे सुरू केले आहे त्यात त्यांनी आपल्या मागण्या करताना आधुनिक स्वरूपातील निकाहनामा तयार केला आहे. आता 43 वर्षात देशभरात अनेक मुस्लिम महिला संघटना स्वतंत्रपणे उभ्या राहिलेल्या दिसत आहेत व त्या आपले प्रश्न मांडत आहेत. जसे मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाची स्थापना मुळातच मुस्लिम सत्यशोधकच्या विरोधात करण्यात आली. पण त्यात असलेल्या महिलांचे असे म्हणणे आहे की हे बोर्ड आमच्या प्रश्नांचा कधी विचारच करीत नाही. म्हणून त्यात असलेल्या महिलांनीच पुढे जाऊन आपली अशी स्वतंत्र संघटना काढली आहे. स्त्रीयांच्या हक्काचा विचार करताना त्यांनी तोंडी तलाकला बंदी, फोनवरून तलाकला बंदी, तलाकच्या अगोदर नवरा-बायकोने तीन महिने थांबून समेटाने बोलणी करण्याचे मार्ग सुचविले आहेत. हे मंडळाचे यशच मानावे लागेल. ज्याप्रमाणे तुर्कस्थानात कमाल पाशा यांनी सन 1900 ते 1925 याकाळात कायदाच केला व तो तेथे लागू झाला. त्याप्रमाणे आपल्या शासनाने जर कायद्यांचे संरक्षण दिले तर अधिक योग्य होईल व स्त्रियांना न्याय मिळेल असे मंडळाचे मत दिसते.

महात्मा फुल्यांनी सत्यशोधक चळवळ सुरू केली. त्यात त्यांनी स्त्रिया व शुद्रातिशुद्र यांचे शोषण संपविण्यावर भर दिला. म्हणजे जातियव्यवस्थेमुळे दलितांची गुलामगिरी व पुरूष प्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची गुलामगिरी यातून दोहोंची मुक्तता या दोन्ही प्रश्नावर लक्ष केंद्रित करून ते सोडविण्याचा म. फुल्यांनी प्रयत्न केला. मुस्लिम सत्यशोधक चळवळीने मुस्लिम स्त्रियांचे विविध प्रश्न हाती घेतले. पण जातिव्यवस्थेचा प्रश्न फारसा उचलला नाही. हा प्रश्न नंतरच्या स्वतंत्रपणे पुढे आलेल्या मुस्लिम ओ. बी. सी. चळवळीने हाती घेतला. खरे तर हमीद दलवाईंच्या निधनानंतर मुस्लिम सत्यशोधक चळवळ फार काळ तग धरू शकली नाही. पण मुस्लिम मागासवर्गीयांच्या प्रश्नावर एक चळवळ उभी राहिली आहे तसेच मुस्लिम मराठी साहित्य संमेलन पण भरवले जात आहे. हे मंडळाचे यशच मानावे लागेल.

पुरोगामी विचार होऊन पुढे आलेली ही चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचली नाही. कारण चळवळीचा केंद्रबिंदू धर्मसुधारणा हा होता. धर्मासंदर्भात संवेदनशील असणाऱ्या मुस्लिमांना हा सुधारणावादी विचार फारसा पचनी पडला नाही. हमीद दलवाईंच्या मृत्यु नंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे काम काही एक प्रमाणात पुढे चालविले आहे. समान नागरी कायदा, मातृभाषेतून शिक्षण इत्यादी विषयांचा पाठपुरावा त्यांनी चालविला आहे. त्यातही त्यांचा

मुख्य रोख तोंडी तलाक व त्यामधून होणारा मुस्लिम स्त्रियांवरील अन्याय यावर राहिलेला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी तलाक पीडित महिलांचे मेळावे घेणे, निदर्शने करणे अशा महिलांसाठी मदत केंद्रे स्थापन करणे इत्यादी कार्यक्रम त्यांनी राबविलेले आहेत. या त्यांच्या कार्याला अधिकाधिक प्रतिसाद मिळतो आहे असे दिसते. महाराष्ट्राच्या बाहेरही कर्नाटक, लखनौ-मदुराई इत्यादी ठिकाणी मदत केंद्रे स्थापन झाली आहेत.

खरे तर मुस्लिम सत्यशोधकांच्या मते मनुष्य स्वतःची कर्मगती ठरवतो आणि तो त्याच्या शारीरिक व मानसिक ज्ञानानूसार तसे करण्यास पात्र असतो. मुस्लिम सत्यशोधक महंमद पैगंबरांच्या कार्याविषयी व महानतेविषयी आदर बाळगतात. त्यांनी त्याकाळात समाजातील अराजकाशी संघर्ष करून समानता आणली हे ते मान्य करतात. माणसांची भौतिक सुधारणा व विकास हा मुस्लिम सत्यशोधक विचारसणीचा गाभा आहे असे मानतात. तसेच मुस्लिम सत्यशोधकांना समाजवादी कल्पना पसंत आहेत. धर्म ही सार्वजनिक जीवनातील एक सामाजिक शक्ती आहे. म्हणून त्यात सुधारणा झाली पाहीजे असे मुस्लिम सत्यशोधक मानतात तसेच देशाची घटना व कायदा ते सर्वोच्च मानतात. मानवी आयुष्याच्या भौतिक व मानसिक पैलूशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा सेक्युलॅरिझमचा संबंध आहे. भारतीय मुस्लिमांचे आधुनिक भारतीय राजकारणात रूपांतर होण्यासाठी पुनर्जागृती व्हावी हे मंडळाचे ध्येय असल्याचे दिसते. असे असले तरी मात्र मुस्लिम समाजाचा फार मोठा प्रतिसाद या नव्या विचाराच्या मंडळीना मिळाला आहे असे दिसत नाही. कारण चळवळीचा केंद्रबिंदू धर्मसुधारणा हा होता. धर्मासंदर्भात संवेदनशील असणाऱ्या मुस्लिमांना हा सुधारणावादी विचार फारसा पचनी पडला नाही. म्हणजेच मुस्लिम समाज अजून कडवे मुल्ला मौलवी आणि मतलबी राजकारणी यांच्या पकडीतून सुटलेला नाही. तसेच बहुतेक राजकीय पक्षांनी पुरोगामी आणि खऱ्याखुऱ्या राष्ट्रवादी मुसलमानांना जवळ करण्याऐवजी मतपेटीवर डोळा ठेवून त्यातल्या प्रतिगामी आणि देशविघातक प्रवृत्तींना उत्तेजन दिले आहे. त्यामुळे समाजात प्रबोधन घडवून आणणे हे मंडळापुढे फार मोठे आव्हान आहे.

आज मुस्लिम सत्यशोधक मंडळाची प्रगती अत्यंत मंदगतीने होत आहे. कारण धर्मचिकित्सेचा जो मुलभूत भाग दलवाई व त्यांचे सहकारी यांच्या शिकवणीत होता त्याच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. समान नागरी कायदा, तोंडी तलाकवर बंदी यासंबंधीच्या प्रयत्नांतून धार्मिक रूढींना मुरड घालण्यास उत्तेजन दिले जाते. शिवाय हे विषय उचलून धरताना मानवता, सामाजिक न्याय इत्यादींवरच केवळ जोर दिला जातो असे दिसते. आणि तो जोर देतानाही कधी-कधी मूळ धर्म न्यायाचाच आहे, असा युक्तिवाद वापरलेला दिसून येतो. तसे पाहीले तर हे प्रश्न मानवतेचे व न्यायाचे आहेत. पण मूळात सामाजिक जीवनात धर्माज्ञे ऐवजी विवेकाची प्रतिष्ठापना करण्याशी धर्मनिरपेक्षतेशी जोडलेले आहेत. धर्मनिरपेक्षतेचा व्यापक आग्रह आणि त्या दृष्टिकोनातून धर्मपरीक्षण या बाबींवर

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जोर राहिलेला नाही. तसे पाहिले तर मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा विषय हा केवळ मुस्लिम समाजापुरता मर्यादित नाही. तो या देशाच्या भवितव्याशी निगडीत आहे. म्हणून प्राप्त परिस्थितीत भारतीय समाजात विविध उद्दिष्ट्ये घेऊन काम करणाऱ्या या संघटनेला भवितव्य आहे. भारतीय मुस्लिम समाजाला आणि पर्यायाने भारतीय समाजाला या अशासारख्या चळवळीशिवाय पर्याय नाही.

आजची मुस्लिम समाजाची स्थिती पाहता काहीशी अधिकच उव्दिग्न करणारी आहे. भारतीय मुस्लिमांपुढे आणि काळाच्या ओघात जगातील मुस्लिमांना या चळवळीने प्रतिपादलेली मूल्ये आणि समोर ठेवलेली उद्दिष्टे स्वीकारणे अगर काळाच्या ओघात नाश पावणे हे दोनच पर्याय शिल्लक आहेत. तेव्हा आज मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना जपतच आपले कार्य केले पाहिजे. महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींचा समग्र इतिहास जेव्हा लिहिला जाईल त्यावेळी मुस्लिम सत्यशोधक मंडळाने केलेल्या पुरोगामी चळवळीची दखल घ्यावी लागेल. सदर संशोधनात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना का व कशी झाली ? त्याचा इतिहास तसेच त्याने चालविलेले कार्य तसेच आपल्या डोळ्यांपुढे मंडळाने जे ध्येये ठेवलेली होती त्याचे विश्लेषण संशोधकाने या शोध प्रबंधाच्या माध्यमातून केलेले आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक संदर्भ साधने

1. जमादार हुसेन, 'जिहाद', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, व्दितीय आवृत्ती, 2006.
2. जमादार हुसेन (संपा.), 'मुस्लिम मनाचा कानोसा', मानसन्मान प्रकाशन, पुणे, 1986.
3. तांबोळी शमशुद्दीन, 'हमीद दलवाई क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती 2009.
4. दलवाई हमीद, 'इस्लामचे भारतीय चित्र', श्रीविद्या प्रकाशन, पुणे
5. दलवाई हमीद, 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय', साधना प्रकाशन पुणे, 1978.
6. दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन पुणे, 2002.
7. दलवाई मेहरून्निसा, 'मी भरून पावले आहे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, 9 ऑगस्ट 1995.
8. बँडवाले बाबुमियाँ, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका' इंडियन सेक्युलर सोसायटी, पुणे, 1979.
9. मणियार समीर, 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ', राज्यव्यापी सामाजिक परिषद (संपा.) हुसेन जमादार, कोल्हापूर, 1985.
10. मौदुदी सय्यद अबुल आला, 'दिव्यकुराण', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई, 2006.
11. शेख वि. अ., 'मुस्लिम समाज दिशा आणि दशा', लोकजागर प्रकाशन, फलटण, 1993.
12. सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी', अक्षर मानव प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जुन 2009.
13. Dalwai Hameed, 'Muslim Politics in secular India', Hind Pocket Book New Delhi 1968.
14. Shah A. B., 'Challenges to Secularism', Nichiketa Publication, Bombay, 1969.

## दुय्यम संदर्भ साधने

### मराठी संदर्भ साधने

1. अमीन सय्यद अहंमद, 'अतातुर्क गाजी कमालपाशा', प्रकाशक अमीन सय्यद सांगली, प्रथमावृत्ती 1942.

2. अमीन सय्यद अहंमद, ‘इस्लाम आणि संस्कृती’, प्रकाशक अमीन सय्यद, सांगली, प्रथमावृत्ती 1950.

3. अमीन सय्यद अहंमद, ‘हजरत महंमद पैगंबर’, प्रकाशक अमीन सय्यद सांगली, तृतीय आवृत्ती 1956.

4. अवचट अनिल, ‘हमीद’ नीलकंठ प्रकाशन, पुणे 1977.

5. आचार्य धनंजय, ‘भारताचा इतिहास’, साईनाथ प्रकाशन, नागपुर, 2004.

6. आचार्य कृ. अ., आपटे भा. कृ. ‘मध्ययुगीन भारत’, साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, 1978.

7. आठवले सदाशिव, ‘चार्वाक इतिहास आणि तत्वज्ञान’, प्रज्ञापाठ शाळा मंडळ, वाई, 1980.

8. आढाव बाबा, ‘एक गाव एक पाणवठा’, मौज प्रकाशन, पुणे, 2003.

9. आपटे वामन शिवराम, ‘संस्कृत हिंदी कोश’, विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी 1966.

10. आमटे प्रकाश, ‘प्रकाशवाटा’ समकालीन प्रकाशन पुणे 2004.

11. इंजिनिअर असगर अली डॉ., ‘आधुनिक जगाचा इस्लाम’, अक्षर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती 2012.

12. इंडियन सेक्युलर सोसायटी, मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका, पुणे जानेवारी 1979.

13. ऑक्सफर्ड डिक्शनरी, अशोक प्रकाशन, दिल्ली 2000.

14. करजावी युसुफ डॉ., ‘ईस्लाम मुसलमान आणि देशबांधव’, इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई, 2000.

15. कसबे रावसाहेब, ‘हिंदू मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद’, सुगावा प्रकाशन, पुणे, 1997.

16. काहाळे एम. यु., ‘प्रेषित महंमद (स.) विश्वनायक’, इस्लामी मराठी पब्लिकेशन्स मुंबई, प्रथम आवृत्ती, 2007.

17. किस्टाईन डॉबिन, ‘अर्बन लिडरशिप इन वेस्टर्न इंडिया’, पॉलटिक्स अ‍ॅण्ड कम्युनिटीज इन बॉम्बे सिटी, 1840 ते 1885, मुंबई 1972.

18. कीर धनंजय, ‘महात्मा जोतीराव फुले’, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, 1973.

19. कीर धनंजय, मालशे स. ग. (संपा.), ‘महात्मा फुले समग्र वाङ्मय’, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1988.

20. कुरूंदकर नरहर, ‘अन्वय’ नरहर कुरूंदकर साहित्य प्रकाशन, नांदेड, 1988.

21. कुरूंदकर नरहर, ‘जागर’ नरहर कुरूंदकर साहित्य प्रकाशन, नांदेड, 1988.

22. कुरूंदकर नरहर, ‘वाटचाल’ इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, 1987.

23. कुरूंदकर नरहर, ‘शिवरात्र’ साधना प्रकाशन, पुणे, 1970.

24. कुलकर्णी भिमराव (संपा.) ‘अस्मिता महाराष्ट्राची’, मराठा मंदिर प्रकाशन पुणे, 1971.

25. कुलकर्णी कुसुम, ‘प्रबोधन पर्व’, सिंहवाणी प्रकाशन कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती, 26 जानेवारी 2002.

26. गर्गे स. म., ‘भारतीय समाजविज्ञानकोश’, समाज विज्ञान मंडळ, पुणे, 1986.

27. गर्दे दि. का., ‘आधुनिक भारतीय राज्यविचार’, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, 1975.

28. गायकवाड प्रदीप, ‘भारताचे संविधान’, संपादक व प्रकाशक, नागपूर, नववी आवृत्ती, 2006.

29. घुगरे सुर्यकांत डॉ., ‘वीरशैव व इतर धर्म आणि समाज’, साधना बुक स्टॉल गडहिंग्लज, दुसरी आवृत्ती, 2002.

30. चिटणीस कृ. ना., ‘मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था’, भाग II, समाज व संस्कृती प्रकाशन, पुणे, 1987.

31. चिस्ती अनीस, ‘मदरसे आणि जागतिक दहशतवाद’, सुशील प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, एप्रिल 2004.

32. चौबळ बा. मो., ‘विज्ञान आणि संस्कृती’, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, 1961.

33. चौसाळकर अशोक (संपा.), ‘समाज प्रबोधन पत्रिका’, समाज प्रबोधन संस्था पुणे, एप्रिल, जुन 2013.

34. चौसाळकर अशोक, ‘महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ’, लोकवाङ्मयगृह मुंबई, 2003.

35. जाफरी जमील अली, ‘इस्लाम एक अध्ययन’, इस्लामी मराठी पब्लिकेशन्स मुंबई, 1997.

36. जावडेकर आचार्य, ‘आधुनिक भारत’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1938.

37. जोगळेकर ज. द., ‘निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार’, राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन, पुणे, 1980.

38. जोशी चि. वि., ‘बुध्द सांप्रदाय आणि शिकवण’, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963.

39. जोशी प्र. न., ‘विज्ञान उदय आणि विकास’, सन प्रकाशन, पुणे, 1989.

40. जोशी महादेवशास्त्री (संपा.), ‘भारतीय संस्कृतीकोश’, खंड IV, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, 1967.

41. जोशी महेश, ‘सत्यशोधक समाजाचा इतिहास’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 2002.

42. जोशी रामभाऊ, ‘यशवंतराव इतिहासाचे एक पान’, केसरी प्रकाशन, पुणे, 1976.

43. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड II’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.

44. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड VI’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.

45. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड VII’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1977.

46. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड VIII’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1979.

47. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड XI’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1982.

48. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड XIII’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1987.

49. जोशी शरद, ‘शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती’, शेतकरी प्रकाशन, अलिबाग (रायगड), 1982.

50. टिळक लोकमान्य, ‘सुक्तीसंग्रह’, केसरी प्रकाशन, पुणे, 1963.

51. ठाकुर रविंद्र, ‘महात्मा’, मेहता प्रकाशन, पुणे, 1999.

52. तांबोळी शमशुद्दीन, ‘महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास’, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती 2009.

53. थत्ते यदुनाथ, ‘मुस्लिम समाजातील वाहते वारे’, मानसन्मान प्रकाशन, पुणे, 2006.

54. दरेकर समीर, ‘धर्मनिरपेक्षततेच्या कल्पनेला सुरूंग’, अभिनव निर्माण प्रकाशन, पुणे, ऑक्टोंबर 2009.

55. देव प्रभाकर डॉ., ‘इतिहास शास्त्र लेखन परंपरा संशोधन आणि अध्ययन’, ब्रेन टॉनिक प्रकाशन, नाशिक, 2007.

56. देवधर स. कृ. (संपा.), ‘मुंडकोपनिषद व मांडुक्योपनिषद’, प्रसाद प्रकाशन, पुणे, 1987.

57. देशपांडे अ. ना., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', व्हीनस प्रकाशन, पुणे, 1973.

58. देशपांडे पु. ल., 'मैत्र', मौज प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, 2006.

59. देशपांडे ल. स. 'विचारवंत नरहर कुरूंदकर', श्रीगंधर्व वेध प्रकाशन, पुणे, 2010.

60. देशपांडे स. ह., लेले य. श., 'भारताचा राष्ट्रवाद', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1972.

61. नाडगोंडे गुरूनाथ, 'सामाजिक संशोधन पध्दती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1986.

62. नानिवडेकर मेधा (संपा.), 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2006.

63. पठाण यु. म., 'मुस्लिम संतकवी व श्री. विठ्ठल', दास्ताने प्रकाशन, पुणे, 1981.

64. पगडी सेतुमाधवराव, 'भारतीय मुसलमान शोध आणि बोध', परचुरे प्रकाशन, मुंबई, मार्च 1986.

65. पगडी सेतुमाधवराव, 'सूफी संप्रदाय : तत्वज्ञान आणि कार्य', परचुरे प्रकाशन, मुंबई, 1953.

66. परळीकर नरेश, 'धर्माचे समाजशास्त्र', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1986.

67. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) 'निवडक साधना खंड V', साधना प्रकाशन, पुणे, 2007.

68. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) 'निवडक साधना खंड VIII', साधना प्रकाशन, पुणे, 2007.

69. प्रियोळकर आ. कृ. (संपा.) 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1967.

70. पवार जयसिंगराव, विभुते भालबा (संपा.), 'महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी', शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, 2011.

71. पद्मजी बाबा, 'अरूणोदय', बॉम्बे ट्रॅक्स ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, 1963.

72. पाध्ये कमल, भारतीय मुसलमानाचा राजकीय इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1988.

73. पानसरे गोविंद, 'सच्चर समिती आणि मागासलेले मुस्लिम', नागनालंदा, प्रकाशन, इस्लामपूर, 2007.

74. पाटील रा. तु., 'यशवंतराव चव्हाण एक वादग्रस्त पण कर्तबगार मुत्सद्दी', परख प्रकाशन, तडसर, 1987.

75. पाशा जावेद, 'भारत-बहुजनांचा इस्लाम स्विकारण्याचा सामाजिक इतिहास', भूमी प्रकाशन, लातुर, 2013.

76. पेंडसे लालजी, 'महाराष्ट्राचे महामंथन', लोकवाङ्मयगृह, मुंबई, 2010.

77. फडके य. दि., ‘विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड III’, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1991.

78. फाटक न. र., ‘लोकमान्य’, मौज प्रकाशन मुंबई, 1972.

79. फैजी ए. ए., ‘इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टीकोन’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1991.

80. बाळ प्रकाश, बेडकिहाळ किशोर (संपा.), ‘धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती’, अक्षर प्रकाशन, सातारा, तृतीयआवृत्ती, सप्टेंबर 2004.

81. बंग राणी, ‘कानोसा’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 2006.

82. बायबल सोसायटी ऑफ इंडिया, ‘नवा करार दी गाईडोन्स इंटरनॅशनल’, सिकंदराबाद, 2007.

83. बेडेकर दि. के., भणगे भा. रा. (संपा.) ‘भारतीय प्रबोधन’, समाज प्रबोधन संस्था, पुणे, 1973.

84. बेन्नुर फक्रुरूद्दिन, ‘आधुनिक भारतातील मुस्लिम राजकीय विचारवंताचे राष्ट्रविषयक चर्चाविश्व’, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, 2013.

85. बेन्नुर फक्रुरुद्दिन, ‘धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?’, भूमी प्रकाशन, लातुर, 1991.

86. बेन्नुर फकरूद्दिन, ‘भारतीय मुसलमानाची समाजरचना व मानसिकता’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2012.

87. भावे विनोबा, ‘कुराण सार’, पर्रधाम प्रकाशन पवनार, वर्धा, 1983.

88. भांडारकर पु. ल., ‘सामाजिक संशोधन पध्दती’, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, तिसरी आवृत्ती, नागपुर, 1987.

89. भोळे भा. ल., ‘आधुनिक भारतातील राजकीय विचार’, पिंपळापुरे आणि कंपनी नागपुर, जुन 2003.

90. मंगुडकर मा. प., ‘महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ’, इंडियन कमिटी फॉर फ्रीडम, पुणे, 1990.

91. मुजफ्फर हुसैन, ‘समान नागरी कायदा’, चंद्रकला प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, जानेवारी, 1996.

92. मुझफ्फर हुसैन, ‘मुस्लिम मानस’, (तरंग-अंतरंग) भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, 4 जुलै 1989.

93. मुरसल हुमायुन (अनु), ‘सच्चर समिती अहवाल’, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, 2010.

94. मेहेंदळे विश्वास, ‘यशवंतराव ते विलासराव’ अनुबंध प्रकाशन, पुणे, 2007.

95. मोरे शेषराव, ‘मुस्लिम मनाचा शोध’, राजहंस प्रकाशन,पुणे, प्रथमआवृत्ती 2001.

96. मौदुदी अबुल आला (अनु.), शेख अब्दुल हमीद, 'इस्लाम प्रबोध', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई, सातवी आवृत्ती, 2007.

97. मौदुदी मौलाना, 'इस्लामची जीवनव्यवस्था', इस्लामीक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई, 1994.

98. मौलाना सय्यद वहीद अली, 'सूफी संतांचा सर्वधर्म समभाव', भारत इतिहास व संस्कृती, पुणे, 1986.

99. रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नाची चर्चा एकोणीसावे शतक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1992.

100. रामराव टी. के., 'लाला लजपत रॉय', भारत-भारती, नागपूर, 1980.

101. रेगे मे. पु. (संपा.) 'मराठी विश्वकोश, खंड IX', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1980.

102. रेगे मे. पु. (संपा.) 'मराठी विश्वकोश', खंड XVI, महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999.

103. लतिफी डॅनियल, 'शहाबानों का मुकदमा और सुप्रीम कोर्ट का फैसला', जनवादी महिला समिती, कानपुर, 1985.

104. लिंबाळे शरणकुमार (संपा.), 'दलित पँथर', सुगावा प्रकाशन, पुणे, 1989.

105. लेव्ही रूबेन (अनु.) केळकर श्रीपाद, 'इस्लामची सामाजिक रचना', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.

106. लोहिया राममनोहर डॉ., 'फाळणी हिंदू आणि मुसलमान', प्रकाशक मोकाशी गोपाळ, पुणे, प्रथम आवृत्ती, 1959.

107. वकील आलीम, 'सूफी संप्रदायाचे अंतरंग', प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2000.

108. वऱ्हाडपांडे व. कृ. (संपा.) 'गरूडझेप', सावरकर गौरव ग्रंथ, विजय प्रकाशन नागपूर, 1983.

109. वाड विजया (संपा.) 'महाराष्ट्र विश्वकोश, खंड XVII', महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 2007.

110. वैद्य भाई, 'धर्मनिरपेक्ष', सामाजिक समता परिषद, पुणे, 1993.

111. वैद्य प्रभाकर, 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा', लोकवाङ्मयगृह, मुंबई, 1974.

112. शरीफ जफर, 'इस्लामची जीवनपध्दती', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.

113. शहा मु. बा. (संपा.) 'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य', खंड X, धुळे, 1988.

114. शानेदिवाण राजेखान, 'भारतीय मुसलमान वर्तमान आणि भविष्य', निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, 2008.

115. शानेदिवाण राजेखान, 'मुस्लिम आत्मचरित्रे एक दृष्टिक्षेप', भूमी प्रकाशन, लातुर', प्रथमावृत्ती, 27 फेब्रुवारी 2010.

116. शिंदे ज. रा., 'भारतीय प्रबोधनकार', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 1987.

117. शिंदे, चौगुले सहदेव, 'पाथेय' भाग II, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, 2012.

118. शिरसीकर व. म., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2001.

119. शेख सईदा (संपा.), 'इस्लामी संस्कृती', ॲमिटी पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 1992.

120. शौरी अरूण, 'द वर्ल्ड ऑफ फतवा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1999.

121. सईद इब्राहिम, 'इस्लाम समज गैरसमज', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई, 2001.

122. सरदार ग. बा., 'महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल', नवनिर्माण न्यास, दौंड, 1986.

123. सरस्वती दयानंद (अनु.) जोशी श्रीपाद, 'सत्यार्थ प्रकाश', आर्य समाज, पिंपरी, पुणे, 1990.

124. सहस्त्रबुध्दे पु. ग., 'इहवादी शासन', केसरी प्रकाशन, पुणे, जानेवारी, 1972.

125. साने गुरूजी, 'इस्लामी संस्कृती', ॲमेटी प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती, 1993.

126. सावरकर वि. दा., 'समग्र सावरकर वाङ्मय', खंड VIII, महाराष्ट्र प्रांतीक हिंदू सभा, पुणे, 1964.

127. सावरकर वि. दा., 'विज्ञाननिष्ठ निबंध', खंड I व II, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, 2013.

128. सारथी अरूण, 'भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने', रविराज प्रकाशन, पुणे, 1993.

129. सारथी अरूण, 'हिंदू मुस्लिम वैमनस्याची ऐतिहासिक मीमांसा', अस्मिता प्रकाशन, पुणे, 2003.

130. सुर्यवंशी अ. प., 'इस्लामची जीवन पध्दती', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.

131. सुर्यवंशी जी. एस., 'धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता', प्रयत्न प्रकाशन, औदुंबर, 1989.

132. सुराणा पन्नालाल, बेडकिहाळ किशोर (संपा.), ‘आजचा महाराष्ट्र’ श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 24 ऑक्टोंबर 1988.

133. सुराणा पन्नालाल, ‘मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातील बदल’, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1998.

134. हाजी महमंदगौस नाईक, ‘सच्चर का सच’, मुस्लिम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था प्रकाशन, कोल्हापूर, 2008.

135. हुसेन आविद, ‘भारताची राष्ट्रीय संस्कृती’, नॅशनल बँक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, 1992.

## हिंदी संदर्भ साधने

1. कादीर गुलाम - ‘कुराण और हादीस के रोशनी में’, इस्लामी मरकजा पब्लिकेशन्स, दिल्ली, 1994.
2. गुप्त माणिकलाल, ‘विश्व का इतिहास’, अ‍ॅटलांटिक पब्लिशअर्स अ‍ॅण्ड डिस्ट्रीब्युटर्स दिल्ली, प्रथम आवृत्ती, 2001.
3. जमीला अली जाफर, ‘हिंदी कविता : इस्लामी संस्कृति के परिप्रेक्ष्य में’, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, 2001.
4. जैन विमलकुमार, ‘सूफीमत और हिंदी साहित्य’, हिंदी अनुसंधान परिषद, दिल्ली, 1955.
5. झारी विजयदेव, ‘हिंदी कहानी में मुस्लिम जीवन और संस्कृती’, शारदा प्रकाशन नई दिल्ली, 1979.
6. ‘दिनकर’ रामधारी सिंह, ‘संस्कृति के चार अध्याय’, उदयांचल प्रकाशन, पटना, 1970.
7. दीपककुमार, ‘मध्यकालीन भारत का संपूर्ण इतिहास’, राज पब्लिशिंग हाऊस, जयपुर, 2010.
8. व्दिवेदी हजारी प्रसाद, ‘मध्यकालीन धर्मसाधना’, साहित्य भवन, इलाहबाद, 1952.
9. नारंग गोपीचंद, ‘अमीर खुसरो का हिंदवी काव्य’, वाणी प्रकाशन, दिल्ली, 2002.
10. महाजन वी. डी., ‘मध्यकालीन भारत’, एस. चाँद अ‍ॅण्ड कंपनी दिल्ली 1990.
11. मिश्र दुर्गाशंकर, ‘नीरज का काव्य : एक विश्लेषण’, हिंदी साहित्य भांडार, लखनऊ 1985.
12. रामजी सिंह, ‘नया समाज और नई संस्कृति’, कॉमनवेल्थ पब्लिशर्स, दिल्ली, 1998.
13. शर्मा एल. पी. ‘मध्यकालीन भारत का इतिहास’, विनोद प्रकाशन मंदीर, आग्रा, 1975.

14. शर्मा शिवकुमार, 'हिंदी साहित्य युग और प्रवृत्तियाँ', अशोक प्रकाशन दिल्ली, 1996.

15. शास्त्री भक्तराज, 'आधुनिक हिंदी काव्य और संस्कृति', चंद्रलोक प्रकाशन, कानपूर, 1996.

### English Reference Books

1. Ambedkar Babasaheb Dr., 'Pakistan and partition of India,' Govt. of Maharashtra publication 1989.
2. Bhargava K. D., 'A Srvey of Islamic Culture and Institution' Kitab Mahal, Allahabad, 2nd Edition 1982.
3. Bipin Chandra, 'India's struggle for Independence', Penguin Book, New Delhi 1997.
4. Census of India 2001
5. Census of India 2011
6. Desai A. R., 'Social Background of Indian Natinalism, Popular Prakashan Bombay, 1976.
7. Ghurye G. S., 'Social Tensions in India', Popular Prakashan Bombay, 1968.
8. Hassnainse, 'Indian Muslim Challenge & Opportunity', Lavani Publishing house, Bombay 1986.
9. Imtiaz Ahmad, 'Modernization and social change among Muslim in India', Mahohar N. D. 1983.
10. Moore titas 'Indian Islam, Oriental Books Delhi, 1930.
11. Mukhi H. R. 'Modern Indian Political Thoughts' Surjeet Book Depo. Delhi 1970.
12. Seltiz C. M. Jahoda & others, 'Research Methods in Social Relation' V. S. Publication 1965.
13. Tarkunde V. M., 'Hindu Communaism is it Beginning of Fascim', The Times Of India 30 May 1990.
14. Zafer Imam, 'Muslims in India', Orient Langman, New Delhi 1975.

15. Zakaria Rafique, 'Rise of Muslims in Indian Politics', Somaiya Publications, Bombay 1970.

## इतर संदर्भ साधने

### नियतकालिके

1. पुरोगामी मुस्लिम 1981.
2. पुरोगामी मुस्लिम फेब्रुवारी 1986.
3. पुरोगामी मुस्लिम मे 1988.
4. पुरोगामी सत्यशोधक एप्रिल ते जुन 1990.
5. मुस्लिम सत्यशोधक मंडळ जाहीरनामा 22 मार्च 1970.
6. मुस्लिम प्रबोधन संवाद 26 जानेवारी 1983.
7. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (पुणे) जानेवारी 1973.
8. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (पुणे) सप्टेंबर 1977.
9. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (पुणे) 1998.
10. मुस्लिम सत्यशोधक पत्रिका (पुणे) एप्रिल-मे-जून 2014.
11. लोकप्रभा 5 डिसेंबर 2011.
12. लोकराज्य मार्च 2012.
13. समाज प्रबोधन पत्रिका (पुणे) 1972.
14. समाज प्रबोधन पत्रिका (सातारा) मार्च-एप्रिल 1989
15. समाज प्रबोधन पत्रिका (सातारा) 1993.
16. सहकारी महाराष्ट्र जुलै 2012.
17. सहकारी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी अंक नोव्हेंबर 2011.
18. साधना साप्ताहिक (पुणे) सप्टेंबर 1971.

### वृत्तपत्रे

1. दैनिक केसरी, 26 सप्टेंबर 1987.

2. दैनिक केसरी, (कोल्हापूर, सांगली) 27 सप्टेंबर 1987.
3. दैनिक तरूणभारत 1 मे 2010.
4. दैनिक तरूणभारत 29 सप्टेंबर 2012.
5. दैनिक पुढारी (कोल्हापूर) 31 डिसेंबर 1973.
6. दैनिक मराठा (मुंबई) जानेवारी 1973.
7. दैनिक महाराष्ट्र टाइम्स (मुंबई) 22 सप्टेंबर 1971.
8. दैनिक महाराष्ट्र टाइम्स (मुंबई) 12 मार्च 1973.
9. दैनिक महाराष्ट्र टाइम्स (मुंबई) 18 ऑगस्ट 1985.
10. दैनिक लोकसत्ता (पुणे) 21 नोव्हेंबर 1985.
11. दैनिक सकाळ (कोल्हापूर) 18 जून 1985.
12. दैनिक सकाळ (पुणे) 14 डिसेंबर 1988.
13. दैनिक सकाळ (पुणे) 3 मे 1992.
14. Indian Express (Daily) New Delhi April 1986.
15. Times Of India (Daily) 10th March 1986.
16. Times Of India (Daily) 30th May 1990.

## अप्रकाशित संदर्भ साधने

1. **अंबाडे किसन मारूती -** ‘‘महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक अभ्यास’’, अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे डिसेंबर 1998.
2. **काझी एन. एस. -** ‘मुस्लिम अल्पसंख्याकांची सामाजिक अभिवृत्ती’ अप्रकाशित एम. फिल. लघुशोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर 1986.
3. **घोमेशी रहिम -** ‘Civil Society in Iran, Developments problems & Future prospects with reference to Human rights.’ अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रकाशन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, नोव्हेंबर 2008.

4. **पटेल रजिया -** 'भारतीय मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचे राजकारण आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास' अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे जानेवारी 2005.
5. **मोकाटे नाथा रामभाऊ -** 'आधुनिक महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक नानासाहेब गोरे', अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, डिसेंबर 2008.
6. **युसुफ हुसेन महंमद -** 'Religion & State of Iraq' अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध. राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, 1982.

## विकिपिडीया व वेबसाईट्स

1. http://mr.wikipedia.org/w/indexphp?title इस्लामधर्म & oldid=1017232 dated 10/07/2012
2. mhtm/file./m.islam:mht. dated 04/08/2012
3. mhtml:/m/shariat.mht. dated 06/08/2012
4. en.wikipedia.org/wiki/mohammad hidaytullah dated 23/10/2012
5. www.govt.of Maharashtra public health department disoectorate of health service dated 28/10/2012
6. economics serve.of Maharashtra 2008-09 ditectorate of economics & statatics of govt. of Maharashtra 2009 dated 18/11/2012
7. Govt. of Maharashtra education health women & child welfare dated 05/12/2012
8. http:/hamiddalwai.blogspot.in/2012-01-01 archive html
9. shah A.B. philosopedia dated 15/01/2013
10. http://www.berational.co.in. dated 20/02/2013

**परिशिष्ट नं. 2**




मा. अब्दुल लतीफ आझमी, सय्यद मुनीर, अब्दुल कादर मुकादम
व अन्य मान्यवर, दिल्ली येथील परिषदेत.



प्रा. मे. पु. रेगे, हमीद दलवाई, प्रा. असफ ए. फैजी, प्रा. अ. भि. शहा.

# परिशिष्ट नं. 3



हमीद दलवाई यांच्या निधनानंतर आयोजित केलेली शोकसभा –
श्री. नंदा नारकर, भाई वैद्य, प्रा. अ. भि. शहा, ना. ग. गोरे, भाऊसाहेब रानडे व इतर.




ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम फोरममध्ये बोलताना – न्या. दाउद व उपस्थित मान्यवर – हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई, बाबूमिया बँडवाले, सय्यदभाई, पन्नालाल सुराणा आणि इतर.

# परिशिष्ट नं. 4




तलाकपीडित महिला परिषदेमध्ये – हमीद दलवाई,
बाबुमियाँ बँडवाले व इतर.



ॲड. नजमा शेख, प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई, आवाबेन देशपांडे (बोलताना),
मरियम रिफाई – मुस्लिम सामाजिक परिषदेमध्ये

# परिशिष्ट नं. 5




पुरोगामी मुस्लिम परिषद, नवी दिल्ली : बाबुमियां बँडवाले, प्रा. फारुकी, हमीद दलवाई, प्रा. ए. बी. शहा



मुस्लिम महिला परिषद, पुणे : अॅड. नजमा शेख, प्रा. ए. बी. शहा, हमीद दलवाई,
मरियम रिफाई व बोलताना बाबुमियां बँडवाले





ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम फोरममध्ये बोलताना – न्या. दाउद व उपस्थित मान्यवर – हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई, बाबूमिया बँडवाले, सय्यदभाई, पन्नालाल सुराणा आणि इतर.

# परिशिष्ट नं. 6



पुणे : शहाबानो सत्कार प्रसंगी भाषण करताना प्रमिला दडंवते. शेजारी बसलेले सय्यदभाई, जमील खान, शहाबानो.




पी. ए. कादर, जैनुदिन बिल्लारी, बोलताना सय्यदभाई, कन्नड साहित्यिका सारा अबुबकर, खुर्शीदबेगम, जाफर अली. कर्नाटक मुस्लिम प्रगती परिषदेच्या उदघाटन प्रसंगी, मंगलूर.

अब्दुलभाई, सारा अबुबकर, दलवाईभाभी, प्रा. नाजनीन. मस्लिम महिला सामाजिक परिषद, मदुराई.



# परिशिष्ट नं. 7


मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या हस्ते फाय फाउंडेशन पुरस्कार स्वीकारताना सय्यदभाई. मध्यभागी फाउंडेशनचे संस्थापक पंडितराव कुलकर्णी. इचलकरंजी.





तलाकपीडित महिलांची पोटगी रद्द करू नये अशी विनंती राष्ट्रपतींना करताना महाराष्ट्रातील तलाकपीडित महिलांचे शिष्टमंडळ - राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली.

## परिशिष्ट नं. 8





तलाकपीडित मुस्लिम महिलांची पोटगी रद्द करू नये या मागणीसाठी विधानसभेवर तलाकपीडित महिलांचा मोर्चा – मुंबई.




तोंडी एकतर्फी तलाक बंद करा या मागणीसाठी तलाकपीडित महिलांचा विधानसभेवर मोर्चा – मुंबई.



## परिशिष्ट नं. 9




तलाकपीडित महिलांची पोटगी रद्द करू नये या मागणीसाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण - पुणे.




एकतर्फी तलाकविरोधी
विधान परिषदेवर मोर्चा, मुंबई.
अग्रभागी दलवाईभाभी
हुसेन जमादार इ.

✓

# परिशिष्ट नं. 10



शहाबानोची पोटगी बचाव या मागणीसाठी मंडळातर्फे लोकसभेवर तलाकपीडित मुस्लिम महिलांचा मोर्चा, नवी दिल्ली.



एकतर्फी तोंडी तलाक रद्द करा या मागणीसाठी विधानसभेवर मंडळातर्फे मोर्चा. सय्यदभाई, प्रा. शमशोद्दीन तांबोळी, हुसेन जमादार, अब्दुल कादर मुकादम, इ. मुंबई

# परिशिष्ट नं. 11




**प्रा. बेनझीर तांबोळी चर्चा सत्रात मार्गदर्शन करताना.**



**मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष हुसैन जमादार यांची मुलाखत घेताना संशोधक.**

# परिशिष्ट नं. 12




**मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई यांची मुलाखत घेताना संशोधक.**



**न्यायमूर्ती शहापूरकर यांची मुलाखत घेताना संशोधक.**

**परिशिष्ट नं. 1**



सय्यदभाई, हमीद दलवाई, बाबूमियां बँडवाले




१९७१ ची पुण्यात झालेली जगातली पहिली मुस्लिम महिला परिषद.
बोलताना श्रीमती तय्यबजी, शेजारी हमीदभाई व बाबूमियां.
खाली – सामाजिक परिषदेत बोलताना ताहेर पूनावाला, राजाभाऊ इनामदार,
कुलसुम पारेख, रशिदा मुजावर, रजिया पटेल, सय्यदभाई



**परिशिष्ट नं. 13**

# मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा

भारतीय मुस्लिम समाजापुढे स्वातंत्र्योत्तर काळात नवी आव्हाने उभी राहिली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर सय्यद अहमदखान यांचा मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टिकोनातून मूलभूत बदल घडवून आणण्याचा आरंभीचा प्रयत्न वगळल्यास एरवी निराशाच पदरी येते. भारतीय मुस्लिम समाज या सर्व काळात आपल्या अल्पसंख्यांक स्थानाविषयी विनाकारण अतीव जाणीव बाळगून आपल्या सनातन, परंपरागत श्रध्दा कवटाळून बसलेला, आणि बहुसंख्य हिंदू समाजाविरोधी आंदोलने करीत राहिला. तर सय्यद अहमदखानांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या मुस्लिम सुधारणांचा गाडादेखील अखेरीला विभक्तवादाच्या दलदलीत रुतून गेला. पाकिस्तानची निर्मिती आणि भारतातील हिंदू-मुस्लिम संबंधातील तफावतीचा इतिहास सर्वांना माहीत आहेच. भारताला सर्वधर्मीय राष्ट्रीयता निर्माण करण्याच्या झालेल्या सर्व प्रयत्नांत एक मूलभूत चूक सतत होत राहिली आहे. ती अशी की, हिंदू समाजाला आधुनिक, विशाल आणि पुरोगामी बनवण्याच्या आड येणाऱ्या जुनाट धर्मनिष्ठा बदलण्याचा एक सततचा प्रयत्न चालला असतानाच मुस्लिम समाजाच्या काल-विसंगत अशा परंपरागत श्रध्दांना हात न लावण्याचा आटापिटा मुस्लिम समाजाकडून करण्यात येत होता; आणि बहुसंख्य हिंदू समाजातील परिवर्तनवादी मंडळीदेखील या प्रक्रियेला कळत-नकळत हातभार लावीत होती. आजदेखील या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. याचा परिणाम म्हणजे हिंदू समाजात आधुनिक राष्ट्रवादाचे, धर्मनिरपेक्षतेचे आणि समानतेच्या आधुनिक मानवी मूल्यांचे प्रवाह तुलनेने अधिक बळकट होत गेले, आणि मस्लिम समाज मात्र आपल्या जुन्याच श्रध्दांना चिकटून राहिला. सुशिक्षित मुस्लिमांची मजल यामुळे विभक्तवादी प्रवृत्तीपलिकडे कधी जाऊ शकली नाही. बदललेल्या परिस्थितीचे आव्हान यामुळेच मुस्लिम समाज स्वीकारू शकला नाही.

भारतातील हिंदू आणि मुसलमान समाजातील ही प्रबोधनाची दरी भरून काढल्याशिवाय खऱ्या अर्थाने या दोन्ही समाजाचे संबंध सुधारणार नाहीत; राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणार नाही; आणि नव्या भारतातील प्रजासत्ताकात मुस्लिम समाज राष्ट्रजीवनाचा एक सन्माननीय घटक म्हणून नांदू शकणार नाही. आपण लोकशाही जीवनपध्दती स्वीकारलेली असल्याने या प्रबोधनाची निकड निर्माण झालेली आहे. त्याशिवाय समाजातील सर्व क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानता निर्माण होणार नाही व लोकशाहीचा पाया कमकुवतच राहील.

हे कार्य व्हावे म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात येत आहे. सत्यशोधक शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या संस्थापक सभासदांपुढे आहे.

वास्तविक स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना विशिष्ट धर्मगटांसाठी मंडळे काढण्याची आवश्यकता असायला नको होती याची जाणीव आहे. परंतु मुस्लिम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र त्या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची ही दरी नष्ट होईल तेव्हा हे मंडळ मुस्लिम समाजापुरते कार्य करणार नाही. आधुनिक विचारांच्या सर्वधर्मीय राष्ट्रवादी परंपरा मानणाऱ्या सर्वच भारतीयांच्या इच्छा-आकांक्षानुसार एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही.

ती अवस्था यावी, आणि लवकर यावी - म्हणून हे मंडळ कार्य करत राहील.

☐

## परिशिष्ट नं. 14

# मुस्लिम सत्यशोधक मंडळ (महाराष्ट्र)

**दखलपात्र**

**जाहिरनामा — नवी दिशा**

हमीद दलवाई यांनी देशभर फिरून मुस्लिम समाजाचा अभ्यास केला, लेखन व संवादातून समाजाचे प्रबोधन केले आणि २२ मार्च १९७० रोजी आम्हा सहकाऱ्यांसह मुस्लिम सत्यशोधक मंडळाची पुणे इथे स्थापना केली.

आता मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना होऊन चार दशकांचा काळ लोटला आहे. या काळात भारतातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत दखल घेण्यासारखे खूप बदल झाले आहेत. या बदलांची नोंद घेऊन चळवळीच्या मूळ उद्दिष्टांमध्ये गुणात्मक बदल न करता काही विषयांच्या अग्रक्रमात बदल करून नवी दिशा ठरवणे आवश्यक झाले आहे म्हणून पुढीलप्रमाणे भूमिका मुस्लिम सत्यशोधक मंडळ घेत आहे.

### १. उदारमतवादी कुराणभाष्याचा आधार

इस्लाममध्ये कुराणाचा अर्थ सामान्य माणूससुद्धा लावू शकतो. म्हणून इस्लाममध्ये पुरोहित वर्गाची संकल्पनाच नाही, तरीही मुस्लिम समाजात असा पुरोहित वर्ग निर्माण झालाच. इस्लामी धर्मशास्त्राचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच असून तो अर्थ सर्वांनी मान्य केला पाहिजे. अशी टोकाची भूमिका घेऊन उलेमांनी मुस्लिम समाजावर आपले प्रभुत्व व नेतृत्व लादले आहे. या पारंपरिक उलेमांच्या प्रभावातून मुस्लिम समाजाला मुक्त करणे ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची प्राथमिकता राहील. त्यासाठी कुराणाच्या प्रागतिक व उदारमतवादी भाष्यकारांचा आधार घेऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळ यापुढे आपली वाटचाल करील.

### २. मुस्लिम समाजासमोरील जमातवादाचे (Communalism) आव्हान

गेल्या काही वर्षांत हिंदू जमातवादाचे प्रचंड आव्हान भारतीय मुस्लिम समाजासमोर उभे राहिले आहे. क्रिया-प्रतिक्रियात्मक स्वरूपात अस्तित्वात असणारा हिंदू जमातवाद आता उघडपणे आक्रमक आणि हिंसक झाला आहे. त्यामुळे मुस्लिम समाजातील जमातवादी प्रवृत्ती वाढत आहेत. पण एका समाजातील जमातवादाला दुसऱ्या समाजातील जमतावाद हे उत्तर होऊ शकत नाही. त्याचबरोबर जातीयवादी दंगली कुणामुळेही तसेच कुठल्याही कारणास्तव सुरू झाल्या तरी अंतिमतः त्यात अल्पसंख्य समाजाची जीवित व वित्तहानी अधिक होते. त्यामुळेच सामान्य मुस्लिम असुरक्षित, हतबल व अगतिक झाला आहे. अशा परिस्थितीत मुस्लिम समाजातील जातीयवादी प्रवृत्ती व संघटना यांच्याविरुद्ध भूमिका घेत असतानाच मुस्लिम सत्यशोधक मंडळ हिंदू जमातवादाच्या

विरोधातही नि:संदिग्ध भूमिका घेईल. भारतीय समाज बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक समूह घटकांनी तयार झाला आहे. अशा वैविध्यपूर्ण समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास सहिष्णुतेच्या आधारावर परस्पर सामंजस्य व भावनिक एकता निर्माण करणे आवश्यक असते, त्याचे भान ठेवून मुस्लिम सत्यशोधक मंडळ या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहील. त्याचबरोबर हिंदू वा इतर समाजात अशा तऱ्हेच्या प्रागतिक व्यक्ती, संघटना वा चळवळी असतील त्या सर्वांशी मुस्लिम सत्यशोधक मंडळ सर्वतोपरी सहकार्य करील. मात्र मुस्लिम किंवा हिंदू समाजातील कुठल्याही प्रतिगामी, जातीयवादी व जमातवादी प्रवृत्ती, संघटना वा व्यक्ती यांपासून मुस्लिम सत्यशोधक मंडळ व त्याचे सदस्य आणि कार्यकर्ते कटाक्षाने दूर राहतील.

## ३. सेक्युलॅरिझम व निरीश्वरवाद याबद्दल भूमिका

विविधतेतून एकात्म समाज निर्माण करण्यासाठी व सामाजिक न्याय, समता या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी भारत सेक्युलर राष्ट्र झाले. पण सर्वच सेक्युलर राजकीय पक्षांनी त्यांच्या सोयीप्रमाणे मतांचे गणित मांडून सेक्युलॅरिझमचा अर्थ लावला. सेक्युलॅरिझमचा हा अर्थ मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही, कारण तो अर्थ भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत स्वीकारल्या गेलेल्या मानवी मूल्यांच्या विरोधात जातो. म्हणूनच धर्म, जाती, लिंग, वर्ण, भाषा इत्यादी कसलेही भेद न मानता सामाजिक न्याय आणि समता या मानवी मूल्यांवर आधारित एकात्म समाज निर्माण करण्यास सहाय्यभूत होणारी विचारप्रणाली म्हणजे सेक्युलॅरिझम हा सेक्युलॅरिझमचा अर्थ मुस्लिम सत्यशोधक मंडळाला अभिप्रेत आहे. अशा तऱ्हेचा एकात्म समाज निर्माण करण्यात मुख्य अडसर असतो तो धर्मसत्तेचा! मग ती धर्मसत्ता कुठल्याही स्वरूपातील असो. म्हणून समाजकारण, राजकारण आणि धर्मसत्ता यांची फारकत केल्याशिवाय सामाजिक न्याय व समता यावर आधारित एकात्म समाज निर्माण करता येणार नाही, अशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची धारणा आहे. त्याचबरोबर सेक्युलॅरिझम म्हणजे निरीश्वरवाद हे समीकरणही मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग म्हणून एखादी व्यक्ती निरीश्वरवादी असू शकते. त्याला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. पण निरीश्वरवादाचे समर्थन किंवा पुरस्कार करणे ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची भूमिका नव्हती व पुढेही असणार नाही.

## ४. भारतीय मुस्लिम समाजाच्या विकासाचे प्रश्न

स्वातंत्र्योत्तर काळात सर्वच राजकीय पक्षांनी भारतीय मुस्लिमांचा केवळ मतपेटी (व्होट बँक) म्हणून विचार व वापर केला. त्यामुळे मुस्लिम समाजाचे रोजीरोटीचे व आर्थिक विकासाचे प्रश्न सतत दुर्लक्षित राहिले. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनेक आयोगांच्या व सर्वेक्षणांच्या अहवालातून हे विदारक सत्य बाहेर आले आहे. सुदैवाने

केंद्रशासनाने अलीकडे या वास्तवाची दखल घेऊन मुस्लिम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी काही ठोस पावले उचलण्याचे जाहीर केले आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळ अशा नव्या शासकीय धोरणांचा सतत पाठपुरावा करील. त्याचबरोबर अन्य मागासवर्गीयांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे शासकीय सवलती, सुविधा मिळतात त्या मुस्लिम समाजातील दुर्बल घटकांनाही मिळाव्यात म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळ आग्रही राहील.

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासात उलेमांच्या सनातनी भूमिकेमुळे अडसर निर्माण झाला आहे. या समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ विविध पातळ्यांवर प्रयत्न करील.

### ५. मुस्लिम महिलांच्या समस्या

मुस्लिम महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय-अत्याचारांचे प्रश्न मुस्लिम सत्यशोधक मंडळाने नेहमीच ऐरणीवर आणून ते दूर करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न केले आहेत परंतु उलेमांनी शरियत 'दैवी' म्हणून अपरिवर्तनीय आहे, अशी भूमिका घेऊन या प्रयत्नांना सतत विरोध केला आहे. वास्तविक इस्लामी धर्मशास्त्र व इतिहास यांच्या दृष्टीने उलेमांची ही भूमिका चुकीची आहे. इस्लामच्या सुरुवातीच्या काळापासून तत्कालीन इस्लामी धर्मशास्त्राच्या विद्वानांनी शरियतकडे समाजशास्त्र म्हणून पाहिले व त्याचा सतत विकास केला, हा इतिहास आहे. १३ व्या शतकानंतर उलेमांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली ही विकासाची प्रक्रिया बंद केली. आजही हीच भूमिका घेऊन हे मुस्लिम समाजाची दिशाभूल करत आहेत. या त्यांच्या चुकीच्या भूमिकेमुळे मुस्लिम स्त्रियांवर अन्याय होत आहे.

शरियत दैवी असल्यामुळे अपरिवर्तनीय आहे, अशी उलेमांची भूमिका आहे. वास्तविक मुस्लिमांच्या विविध पंथांमध्येसुद्धा एकाच प्रकारचे शरियत कायदे नाहीत किंबहुना त्यात प्रचंड विविधता आहे म्हणूनच जगातील अनेक मुस्लिम राष्ट्रांनी शरियत कायद्यात कालसुसंगत बदल करून एका दमात तीन तोंडी तलाक देण्यास प्रतिबंध करण्यासारखे कायदे केलेले आहेत. ब्रिटिशांनी लागू केलेल्या १९३७ च्या मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातही शरियतचा बहुसंख्य भाग रद्द करून तलाक, बहुपत्नीत्व, वारसा हक्क, मूल-दत्तक विधान एवढ्यापुरताच भाग ठेवला आहे. हा कायदा सुद्धा मुस्लिम महिलांवर अन्याय करणाराच आहे. त्यामुळे १९३७ च्या मुख्य कायद्यातही कालसुसंगत व न्याय्य बदल झाले पाहिजेत, अशी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची ठाम व आग्रही मागणी आहे म्हणून भारतीय संसदेने विद्यमान कायद्यात न्यायसंगत बदल करावेत व मुस्लिम समाजानेही अशा कायद्यांचे स्वागत करावे यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ प्रयत्नशील राहील.

**६. देशासमोरील संवेदनशील समस्या**

काश्मीर, दहशतवाद, बाबरी मशिद-रामजन्मभूमी यांसारख्या विद्यमान वा भावी काळात निर्माण होणाऱ्या संवेदनशील समस्यांबाबत मुस्लिम सत्यशोधक मंडळ नेहमी बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टिकोन आणि न्याय व देशहित यांच्याशी सुसंगत अशी भूमिका घेईल व त्याविषयी सतत आग्रही राहील.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचे वर्तमान व भावी कार्यक्रम निश्चित करताना भारतीय संविधान, त्यात अभिप्रेत असलेली सामाजिक न्याय, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये, समान नागरिकत्व, त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या व साऱ्या बाबी आधारभूत धरूनच मुस्लिम सत्यशोधक मंडळ आपल्या कार्यक्रमांची भावी दिशा निश्चित करेल.

●●

## परिशिष्ट 15

## 'मुस्लिम सत्यशोधक समाजाचे मुस्लिम समाजाच्या विकासातील योगदानाचा अभ्यास'

## विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवी करीता अनुसरून प्रश्नावली.

नाव - ----------------------------------------------------------------------------------------

पत्ता - ----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

मोबाईल / टेलिफोन नं. ----------------------------

दिनांक - ------------------------

प्रश्न 1. हमीद दलवाईंशी आपला कसा व केव्हां संबंध आला ?

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 2. मुस्लिम सत्यशोधक चळवळीमागे हमीद दलवाईंची काय भूमिका होती ?

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 3. मुस्लिम सत्यशोधक चळवळीमध्ये आपण कोण-कोणत्या कार्यात सहभागी होता ?

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 4. मुस्लिम सत्यशोधक चळवळीमुळे मुस्लिम समाजाची मानसिकता बदलली आहे असे आपणास वाटते का ?

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 5. हमीद दलवाईंच्या नास्तिक दृष्टिकोणामुळे मुस्लिम समाज त्यांना आपले मानीत नव्हता हे कितपत सत्य आहे ?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 6. हमीद दलवाईंची इस्लाममधील सर्व वाईट गोष्टी नष्ट करण्याची तळमळ मुस्लिम समाजात का रूजू शकली नाही ?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 7. शहाबानो प्रकरणात तत्कालीन सत्तारूढ सरकार ने घेतलेली भूमिका पूर्णपणे चुकीची आहे असे आपणास वाटते काय ?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 8. आपल्या मते मुस्लिम सत्यशोधक समाजाव्दारे चालविल्या जात असलेल्या चळवळींची फलश्रुती काय आहे ?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 9. वर्तमान संदर्भात मुस्लिम समाजात सुधारणा प्रत्यक्षात येण्यासाठी अजुन कोणते कार्य करणे अपेक्षित आहे ?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 10. आज सन 2014 मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ 'जुबानी तलाक' च्या विरोधी कायद्याचे स्वरूप कोणत्या प्रकारे निर्धारित करेल ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 11. आज आपण या चळवळीकडे कोणत्या दृष्टिने पाहता ? आणि मंडळापुढे भविष्यात कोणकोणत्या योजना आहेत ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 12. स्त्री शिक्षणा संदर्भात आपली कोणती भूमिका आहे ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न 13. आपल्या मते शिक्षणाचे माध्यम कोणते असावे ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

सही ------------------------

मुलाखत देणाऱ्याचे नाव ----------------------------